
कला व साहित्य यांविषयी
( वैचारिक लेख )

भाग – २.

चं. प्र. देशपांडे.



एकवीसावे शतक आणि माणसाचे
शहाणपण

३१ डिसेंबर २००० ला विसावे शतक संपले आणि ०१ जानेवारी २००१ ला एकविसावे शतक सुरू झाले. त्यामुळे अचानक विशेष असे काय घडले किंवा घडेल – असे प्रश्न मनात येतात. हा एका दिवसाच्या बदलाचा प्रश्न नाही. इथून पुढे होणाऱ्या बदलांची कारणे विसाव्या शतकात मागे खोलवर पसरलेली असू शकतात. ती तथाकथित कारणेही कशाचे तरी परिणाम म्हणूनच अस्तित्वात आलेली असतात. आणि अधिक खोलात जाऊन पाहिले तर एक कारण – एक परिणाम अशी साखळीही खूप बाळबोधपणाशिवाय कल्पिता येणार नाही, हेही लक्षात येते. असंख्य आणि अगम्यही कारणांचे एकमेकांवर होणारे परिणाम आणि त्यांचे कारणांत रूपांतर होऊन त्यांचे होणारे परिणाम – असे हे, विश्लेषणात न पकडता येणारे, अव्याहत चक्र चालू असते, असे दिसते. त्यामुळे, एखादा टप्पा वा एखादी रेषा कल्पून विचार करणे हे सदोष असल्याचे लक्षात येते. तरीही, बुद्धीने करता येणाऱ्या विचाराला एखादी चौकट ही गरजेचीच असल्याने आपण इथे एकविसाव्या शतकाचा विचार करतो आहोत.

शहाणपणाची गरज या आधी नव्हती किंवा कमी होती आणि आता यापुढे त्याची आत्यंतिक गरज लागणार आहे, अशा अर्थानेही हा विषय घेतलेला नाही. शहाणपणाची गरज नेहमीच असते आणि असेल, हे निर्विवाद आहे. आताचा वेगाने बदलता जगण्याचा माहोल समजून घेऊन त्या संदर्भात माणसाचे शहाणपण म्हणजे काय असू शकेल, हे समजून घेण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत. यासाठी सुरुवातीलाच काही प्रश्न समोर घेतले पाहिजेत. कोणत्या वस्तुस्थितीला आपण माणसाचे शहाणपण म्हणणार आहोत ? मानवजातीतली एखादी व्यक्ती अत्युच्च अशा बौद्धिक प्रगल्भपणाला पोचण्याला ? जगावर प्रभाव पाडणाऱ्या मोठ्या सत्ताधीशांना परिपक्वता येण्याला ? की माणसाच्या काल्पनिक अशा सरासरी समजुतीला ? यातली कुठलीही गोष्ट पूर्ण जगाची अवस्था आणि व्यवस्था जगण्यायोग्य करू शकेल ? की मनुष्यरूपात एखादा देवाचा अवतार यॆईल आणि त्याच्या शहाणपणावर सगळे काही तरून जाईल, असे आपल्याला वाटते ? या प्रश्नांबबतही काही आकलन होऊ शकते का, हेही आपल्याला इथे पाहायचे आहे.

विसाव्या शतकात नव्हत्या पण आता एकविसाव्या शतकात आहेत, अशा काही गंभीर गोष्टींपासून सुरुवात करू. २८ जानेवारी २०१२ च्या ‘ महाराष्ट्र टाइम्स ‘ मधली ही बातमी आहे. जागतिक आरोग्य संघटनेने पाहणीअंती काढलेले काही निष्कर्ष ही बातमी देते. संसर्गजन्य आजारांपेक्षा लठ्ठपणा, मधुमेह, रक्तदाब, हृदयरोग, कॅन्सर या असंसर्गजन्य रोगांनी जगाला विळखा घालायला सुरुवात केल्याची ही बातमी आहे. भारताला तर मधुमेहाची राजधानीच म्हणण्यात येत आहे. ज्यांवर वर्षानुवर्षे महागडी औषधे घेत राहावे लागते आणि जे स्वस्थता आणि कार्यक्षमता यांवर खूपच परिणाम करतात, असे हे आजार आहेत. बदलती जीवनपद्धती हे याचे मुख्य कारण असल्याचे सांगितले जात आहे. याच जीवनपद्धतीला दोष देणारी आणखी एक बातमी अशी आहे की षंढपणाची समस्याही वाढण्याच्या मार्गावर आहे. फास्ट फुड, निःसत्त्व व वेळीअवेळी घेतला जाणारा कसलाही आहार, व्यायामाचा अभाव आणि कामातले व एकूणच जगण्यातले ताणतणाव – ही अशा समस्यांची प्रमुख कारणे आहेत. अत्यंत यशस्वी समजले गेलेले आणि लग्नाच्या क्षेत्रात अत्यंत मौल्यवान समजले गेलेले असे काही तरुण लग्नानंतर अशा समस्यांनी ग्रस्त झाल्याने डॉक्टरांकडे चकरा मारू लागलेले दिसतात. लग्न टिकण्यालाच आव्हान निर्माण करणाऱ्या या समस्या आहेत. अर्थात, योग्य औषधोपचार व जीवनपद्धतीतले योग्य बदल यांनी या समस्यांचे निराकरण होऊ शकते, असेही डॉक्टरांचे म्हणणे आहे.

कुटुंबीय, नातेवाईक, मित्रमैत्रिणी यांच्यासह आनंदाने जगता यावे यासाठी खरे तर सगळा आटापिटा करायचा पण त्या आनंदाच्या शक्यतेलाच ब्रेक लावणारे हे प्रकार आहेत. ‘ इटालियन जॉब ‘ या सिनेमाचा शेवट इथे आठवावा.

अप्रतिम शेवट. सोन्याच्या चिपांनी भरलेली बस दरीत पडण्याच्या बेतात अशी अर्धी रस्त्यावर आणि अर्धी दरीकडे अशी तरंगतेय. चिपा दरीकडे घरंगळलेल्या आणि माणसे विरुद्ध बाजूला ! त्या चिपांच्या दिशेने एक पाऊलही कुणी टाकायचा प्रयत्न केला तरी बसचा तोल जातोय आणि ती दरीत पडणार आहे ! तसेच इथे होते आहे – सर्व सुखे समोर हात जोडून उभी आहेत पण त्यांतले एकही उपभोगू शकत नाही, अशी अवस्था !

जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण हे एकविसाव्या शतकाचे परवलीचे शब्द झालेले आहेत. यांबरोबरच चंगळवाद हा शब्दही लगेच येतो. मोठमोठे मॉल्स, असंख्य वस्तूंची रेलचेल, मल्टिप्लेक्स, असंख्य खाद्यपदार्थ, फॅशन्स, सेंटस आणि मनाला व शरीराला सुखे देणारे असंख्य प्रकार – हे सगळेही आताच्या जगण्याशी जणू अविभाज्य ठरते. महत्त्वाकांक्षा आणि स्पर्धा याही अटळ ठरतात. यांतून येणाऱ्या जीवनपद्धतीने काय होते, हे आपण वर पाहिले. त्यामुळे, साधी राहणी आणि उच्च विचारसरणी या आदर्शवादी जगण्याकडे मागे जावे का, असा प्रश्न येतो. म्हणजे यांतली बरीच उत्पादने, बऱ्याच सेवा लागणारच नाहीत, असा याचा अर्थ होतो. मग याचा पारिणाम मंदी आणि प्रचंड बेकारी यांत होऊ शकतो. ते नको असेल तर मग चाललेय तसे चालू द्या, असे म्हणावे लागते. अधिकाधिक उत्पादने, अधिकाधिक चांगली उत्पादने आणि जुन्यानव्या सर्व गरजा पुरवणारी उत्पादने यांसाठी संशोधन चालू राहते. त्यातून असे होते की संगणकीकरण, यांत्रिकीकरण आणि रोबोटीकरण अस्तित्वात येते आणि त्यानेही बेकारीचे संकट समोर येते ! शिवाय या जाउखा वातावरणात, आहेत त्या कामगारांनाही सुरक्षितता राहात नाही. इथल्यापेक्षा तिकडे मजूर स्वस्त मिळतात असे दिसले की कारखाने इथला सगळा बाडबिस्तरा उचलून तिकडे जाऊ शकतात, की झाले इथले बेकार ! मोबाईल निर्मितीतील अग्रेसर कंपनी ‘ नोकिया ’ यांनी युरोप व मेक्सिको स्थित स्मार्टफोन कारखान्यांमधील चार हजार कामगारांना नुक्तेच कमी केले कारण त्यांनी त्यांची स्मार्टफोन जुळणी यंत्रणा आशियाई राष्ट्रांत हलवण्याचा निर्णय घेतला ! एकीकडे एकमार्गी ‘ प्रगती ’ चालू दिसते पण दुसरीकडे उलटेपालटे परिणाम होत राहतात. पैसा मिळतो पण चैन करता येत नाही, उत्पादने वाढतात पण बेकारीही वाढते. अकुशल कामगारांची तर वाटच लागते. ‘ न्यूयॉर्क टाइम्स ’ चे थॉमस फ्रीडमन म्हणतात, “ Average is over – हे लक्षात घ्या आणि नेटाने अभ्यास करून कुशलता प्राप्त करून घ्या। “ ( ‘ गावकुसबाहेर ’ – प्रशांत दीक्षित, लोकसत्ता दि. ०७-०२-१२. ) पण जे सामान्यच आहेत त्यांना हा अतिकुशल होण्याचा बोजा अस्वस्थता निर्माण करणारा ठरू शकतो. म्हणजे नव्याने निर्माण होत असलेली ही संस्कृती सामान्य माणसाला जगणेच नाकारणारी आहे की काय, असा प्रश्न निर्माण होतो. कुणालाही जगणे नाकारले जाणे हे हिंसेचे आणि नाशाचे कारण ठरू शकते. इतकी सुबत्ता असूनही कुणीच सुखाने जगणे शक्य नाही, असे होऊ शकते.

समाजाच्या काही एका गटाकडे पैशाची आवक वाढलेली दिसत असली तरी त्यासाठी स्पर्धा आणि ताणतणाव प्रचंड वाढत आहेत. मूल जन्माला आल्याआल्याच जणू या रेसमध्ये सामील होते आहे. शाळाप्रवेश, अनेक गोष्टींत प्रावीण्य मिळवणे, भरपूर पैसे मिळवण्यासाठी स्वतःला तयार करणे, माध्यमांतून चमकण्यासाठीचे प्रयत्न या सर्व गोष्टींमुळे नॉर्मल जगणे जवळजवळ नष्टच होत चाललेले आहे. किंवा अनेक मनोशारीर व्याधी निर्माण करणारे असूनही हेच जगणे नॉर्मल आहे, असे म्हणावे लागत आहे. इथून आता मागे कसे फिरणार ? एखाद्या व्यक्तीला ठरवूनही यातून बाहेर पडायचा मार्ग सापडू शकेल ? एक तर या स्पर्धेत सामील व्हा नाही तर मरायला तयार व्हा, असा संदेशच जणू हा काळ घेऊन आलेला आहे. वेगाने बदलत्या काळाची वर्णने हजारदा केली गेली आहेत, नेहमी केली जातही असतात. गरीब-श्रीमंत यांतली दरी वाढणे, मासेमारीसारख्या पारंपरिक उद्योगांवर गदा येणे, अशा खूप तक्रारीही या जागतिकीकरणानंतरच्या काळाबद्दल केल्या जातात. पण ताबडतोब यावर कोणता मार्ग कुणाला सुचतोय ? मग, जगतील ते जगतील आणि

मरतील ते मरतील, असे बेफिकीर जगावे ? माणुसकी, सहानुभूती, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय वगैरे मूल्ये नामशेष होतील की काय, ही भीती तर आहेच पण शिवाय चाललेल्या या प्रक्रियेतून संघर्ष आणि हिंसा मोठ्या प्रमाणावर निर्माण होण्याचा धोकाही वाढतो आहे. म्हणजे, माणूस असंख्य गोष्टी चांगल्यासाठीच करतो आहे, पण त्याचे अनपेक्षित, विपरीत परिणामही समोर येत आहेत. ज्यातून सगळे फक्त ' चांगले ' होईल आणि ' वाईट ' असे काहीच होणार नाही, असे काही माणसाच्या बुद्धीला कधीतरी जमू शकेल का, याबद्दल शंका निर्माण व्हावी, अशी स्थिती आहे.

संस्कृती, देशीवाद, लोककला यांचे महत्त्व जोपासावे असे वाटणारी मानसिकता जरी एका बाजूला असली तरी, झपाट्याने होणारे शहरीकरण, वेगवान वाहतूकयंत्रणा, जाहिरातींचा सार्वत्रिक समान मारा आणि एकूणच आकर्षणांमध्ये आणली जाणारी समानता – यांमुळे सगळ्याच गोष्टींचे कंगोरे तासले जात असून सगळीकडेच एक प्रकारचे सपाटीकरण होते आहे. सूक्ष्म वैविध्याचे अस्तित्व संपत चाललेले असून माणसे जणू एकाच सैन्याच्या पलटणी बनत चालली आहेत. शरीरसुखांचे प्रकार, करमणुकींचे प्रकार, वस्तूंच्या उपयोगिततेबाबतच्या अपेक्षा यांत सर्वांचेच समानीकरण होत चाललेले आहे. याच प्रकारे जगणे व्यापणाऱ्या आणखीही अनेक गोष्टी घडत आहेत. संगणकांचा आकार कमी होत जाणे, घरी बसून शिक्षण शक्य होणे, घरी बसून ऑफिसचे काम करता येणे – हे सगळे शक्य होण्याच्या मार्गावर आहे. शाळा, कॉलेजेस, बँका, ऑफिसेस यांच्या मोठमोठ्या इमारतींची गरजच राहणार नाही, अशी शक्यता आहे. सगळे व्यवहार संगणकाद्वारे होतील, घरांत, कारखान्यांत रोबो कामे करतील. शरीरांत सेन्सर्स बसवून सूक्ष्म तपासण्या आपोआप होऊन त्यांचे रिपोर्टस तुमच्या डॉक्टरांकडे जातील, रोग आपोआप बरे करणारे नॅनो रोबो शरीरांत सोडले जातील – असे खूप सविस्तर वर्णन अच्युत गोडबोले यांनी त्यांच्या एका लेखात केले आहे. शिवाय जनुकअभियांत्रिकीद्वारे ( आणि शस्त्रक्रियांद्वारे ) कुरूपाला सुंदर बनवणे, मद्दडाला हुशार बनवणे – असेही प्रकार शक्य होणार आहेत. म्हणजेच शास्त्राच्या प्रगतीतूनही माणसाच्या जगण्यावर एक इस्त्रीच फिरणार असून वैविध्याला फारसा वावच राहणार नाही. मघाचाच थॉमस फ्रीडमन आणखी एका सपाटीकरणाबद्दल बोलतो. सगळ्या तांत्रिक प्रगतीमुळे जगातली खूप ठिकाणांची खूप माणसे आता ही जगण्याची क्रीडा, स्पर्धा, सहकार्य – हे सगळे एकत्रितपणे करू शकतात. या अर्थानेही जगाचे सपाटीकरण होत असल्याचे तो त्याच्या 'The World Is Flat या पुस्तकात सांगतो. त्याच्या मते, व्यापार, अर्थशास्त्रीय बदल यांच्याइतकीच ही एक महत्त्वाची गोष्ट आहे.

आपल्याला नुसती माहिती पाहात जायचे नाही आहे. त्या सगळ्यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांचाही वेध घेत जायचे आहे. जगण्याच्या समान माहोलामुळे येणारे सपाटीकरण माणसातले भेदाभेद कमी करू शकेल का ? म्हणजे दलित, मुसलमान, ब्राम्हण, मराठा, ख्रिश्चन सगळे जर एकच पिझ्झा खात असले, एकच पिक्चर बघत असले, एकच मॅच बघत असले आणि त्याच समान जाहिराती बघत असले तर त्यांच्या जगण्यातल्या जातीय वा धार्मिक अस्मिता गळून पडतील का ? दुसरे सपाटीकरण शास्त्राच्या आणि तंत्राच्य प्रगतीमुळे येणारे आहे. कृत्रिम अवयव म्हणा वा जनुक अभियांत्रिकी म्हणा, यांमुळे माणसाचे दिसणेच बदलले तर त्याचा स्वभावही बदलेल का ? आनुवंशिक गुणधर्मच बदलले तर धार्मिक वा जातीय अस्मितांना कितपत अर्थ राहील ? माणसांच्या अहंकारांचे काय होईल ? माणसे गट, टोळ्या कशाच्या आधारावर करतील ? तत्त्वज्ञानांचे प्रकार, विचारसरण्या आणि त्यांचे अनुयायी हे प्रकार चालूच राहतील का ? हजारो वर्षांची भांडणे, युद्धे यांची परंपरा असलेला माणूस शांत, सज्जन आणि संत होईल की काय ? तिसरे सपाटीकरण जगभरच्या समान संध्यांचे, समान स्पर्धेचे आहे. त्यामुळे काय होईल ? त्याला काय महत्त्व राहील ? पाहिजे त्या गुणांची माणसे वा रोबो उपलब्ध आहेत म्हटल्यावर कुठल्याही माणसांना काय महत्त्व राहील ? अमुक एक, हुशार डॉक्टर, वकील,

इंजिनियर, शास्त्रज्ञ, प्रशासक, नेता, वैमानिक वा अवकाशयात्री असण्याचे काय महत्त्व राहील ? कवी, चित्रकार, गायक, नर्तक यांचे तरी विशेष काय महत्त्व राहील ? यांतले उत्तुंग काम करून कीर्तीने अमर झालेले आता मृत होतील की काय ? प्रसिद्धी, ग्लॅमर यांचे महत्त्व नाहीसे होईल ? थोडक्यात म्हणजे माणसाची सध्याची सगळी जगण्याची पद्धतच हास्यास्पद होईल की काय ?

एकविसाव्या शतकाची आत्ता कुठे सुरुवात होते आहे. सगळ्याच गोष्टींना वेग असल्याने, कशामुळे नेमके काय घडेल हे कुणालाच सांगता येत नाही आहे. एखाद्या-दुसऱ्या गोष्टीचे काय परिणाम होतील त्याचा मानवी बुद्धी अंदाज घेऊ शकते, पण त्याचबरोबर असंख्य बदल घडत असताना त्या सगळयांच्या परिणामांतून काय काय घडेल असा समग्रतायुक्त आवाका मानवी बुद्धी घेऊ शकत नाही. त्यामुळे, एकविसाव्या शतकाबाबत जे काही लेखन, विचार, वाङ्मय उपलब्ध आहे ते सगळे या अपूर्णतेच्या दोषाने ग्रस्तच आहे. एका बाजूला आपण दोनतीन प्रकारे होणारे मानवी जगण्याचे सपाटीकरण पाहात असताना आणखी एखाद्याला याच सगळ्या मुद्यांच्या आधारे ' एक जग – एक शासन ' किंवा ' मानव सब एक है ' – अशी स्वप्नेही दिसू शकतात. जगाच्या अमुक एका भागात असाअसा आर्थिक प्रश्न आहे हे पाहून, जगाच्या एकूण अर्थशास्त्रीय परिस्थितीचा आवाका घेऊन संगणकच त्या प्रश्नावर मार्ग सुचवेल आणि ' एक शासन ' हे तत्त्व सर्वमान्य झालेले असल्याने तो उपाय अंमलातही आणला जाईल ! – असे स्वप्न पडायला बंदी कोण घालणार ? आणि ते स्वप्न दुष्प्राप्य तरी का म्हणावे ?

आम्ही बँकेत नोकऱ्या करणारे जे कर्मचारी होतो त्यांना पूर्वी असा प्रश्न पडायचा की राष्ट्रीयीकरणानंतर सुरू झालेले मास-बँकिंग हे शेवटी झेपण्याच्या पलीकडे तर जाणार नाही ? ते कंट्रोलच्या बाहेर तर जाणार नाही ? कारण त्या वेळी सगळी कामे मानवी श्रमानेच करावी लागत होती. कालांतराने संगणकीकरण झाले आणि तो प्रश्नच निरर्थक ठरला ! शिवाय बँकांनी दिलेल्या कर्जांचे खरे मूल्य जोखायची नेमकी पद्धत अंमलात आली आणि बँकांची नेमकी परिस्थिती समजण्यातला गोंधळ नष्ट झाला !

याच पद्धतीने माणसाचे खूप भयप्रद वाटणारे प्रश्नही सुटत जातील, असे वाटणारेही काही आहेत . स्टिव्हेन गिसलेसन या लेखकाने त्याच्या Existence and the Human Mind या पुस्तकात ( नेटवरून ) म्हटले आहे की एकवीसाव्या शतकाचे मुख्य उद्दिष्ट असेल – श्रद्धा, जीवनपद्धती, कट्टर विचारप्रणाली आणि त्यांतून निर्माण होणारे गटनिहाय संघर्ष ओलांडून शहाणपणाने आणि करुणेने येणारी एकात्मता ! प्रत्यक्षात हे कसे घडणार हे कुणालाच माहीत नसले तरी इथे आपण या एकूण प्रश्नांचा आवाका घेत जाऊ आणि या बाबतीत काही मानवी शहाणपणा शक्य आहे का हे पाहू.

सगळ्यात महत्त्वाचे, मोठे आणि अवघडही म्हणावे असे एकविसाव्या शतकातले प्रश्न आहेत तरी कोणते, ते आधी पाहू : --

<u>१. पृथ्वीचे वाढते तापमान</u> – यामुळे एकूणातच हवामानाचे प्रचंड नुकसान होण्याची शक्यता आहे. हे जर आटोक्यात आणता आले नाही तर या पृथ्वीची मूलभूत नियामक यंत्रणाच उलथून पडण्याचा धोका आहे.

<u>२. आत्यंतिक लोकसंख्यावाढ</u> – जगाची लोकसंख्या या शतकात ९ अब्जांपर्यंत पोचण्याची शक्यता आहे. त्यामुळे अन्नाची आणि कार्बनाधारित ऊर्जेची इतकी प्रचंड गरज वाढेल की ती पेलण्याची या पृथ्वीची क्षमताच नाही.

३. पाणी टंचाई – नद्या आणि जलाशय आटत चाललेले आहेत. शेतीसाठी व पिण्यासाठीही पाण्याची इतकी टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे की पाण्याच्या या प्रश्नावरून युद्धे होतील.
४. समुद्रातील जीवसृष्टीचा नाश – आत्ताच खाण्यायोग्य असे १० % मासे शिल्लक आहेत. ही टक्केवारीही वेगाने कमी होत चाललेली आहे.
५. व्यापक दुष्काळ – शेती उत्पादन कमी होण्याच धोका असून अन्नधान्य खूप महाग होईल. गरीब देशांचे यात खूप नुकसान होईल.
६. वाळवंटांची वाढ – जमिनीचा कस जात चाललेला असून सुपीक असणाऱ्या जमिनीचेही वाळवंटात रूपांतर होत आहे.
७. एडसचा प्रसार -- एडस हा भयानक सांसर्गिक रोग आटोक्यात येऊ शकलेला नाही आणि तो पसरतच चालला आहे. प्रचंड संख्येने माणसांचा नायनाट करायची त्याची शक्ती वाढत आहे.
८. आत्यंतिक दारिद्र्य – सुमारे २-३ अब्ज लोक कोणत्याही आरोग्यसुविधांशिवाय व स्वच्छतेशिवाय जीवन कंठत आहेत. श्रीमंत आणि गरीब यांतली दरी दिवसेंदिवस वाढतच चाललेली आहे.
९. झोपडपट्ट्यांची वाढ – अनेक शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर झोपडपट्ट्या वाढत आहेत. तिथल्या निराश तरुणांमुळे हिंसाचार वाढतो आहे.
१०. अनियंत्रित जागतिक स्थलांतर – मागास, गरीब देशांतून खूप लोक अधिक चांगल्या जीवनाच्या आशेने संधीच्या शोधात दुसऱ्या देशांत स्थलांतर करत आहेत.
११. देशांव्यतिरिक्त अनेक संघटनांकडे शस्त्रास्त्रे – अनेक अतिरेकी संघटना आणि राजकीय संघटना यांना अण्वस्त्रे व जैविक हत्यारे बनवणे व वापरणे शक्य होणार आहे.
१२. हिंसक धार्मिक मूलतत्त्ववाद – धार्मिक मूलतत्त्ववादी, जिहादी विचार फैलावत असून त्यातून आत्मघातकी अतिरेकी तयार होत आहेत. धार्मिक पायांवर युद्धांच्या शक्यता, विशेषतः मुस्लिम व ख्रिश्चन यांत, वाढत आहेत.
१३. संगणकीय बुद्धिमत्तेचा धोका -- संगणकांना अधिकाधिक बुद्धिमान करणे शक्य होत असून त्यांतल्या क्रिया-प्रतिक्रियांमुळे यंत्रे इलेक्ट्रॉनिक वेगाने माणसापेक्षा अधिक बुद्धिमान होण्याचा धोका आहे. तसे झाल्यास या यंत्रांवरचे माणसाचे नियंत्रणच जाऊ शकते.
१४. महायुद्ध -- सध्याची अण्वस्त्रे आणि जैविक अस्त्रे पाहता एखादे महायुद्ध झाल्यास मानवी संस्कृतीचा पूर्ण नाश होऊ शकेल.
१५. शास्त्रीय प्रयोगांचा धोका – माणूस अशा काही शास्त्रीय प्रयोगांत गुंतलेला आहे की त्यांच्या अकल्पित परिणामांमुळे हळूहळू मानवजात नष्ट होण्याच्या शक्यता त्यांत दडलेल्या आहेत. या अशा सर्व प्रयोगांचा मिळून एकत्रित धोका असा आहे की एकविसावे शतक संपेपर्यंत माणूस शिल्लकच राहणार नाही.
१६. एक नवे अंधारयुग -- असह्य गरिबी आणि भरभराटी श्रीमंती यांचे अजब रसायन, भूक, आण्विक व जैविक हत्यारे असलेला सामूहिक अतिरेकीपणा, जागतिक युद्ध, मुद्दाम पसरवलेल्या रोगांच्या साथी, धार्मिक वेडेपणा – या सर्वांमुळे पूर्ण जगच एका अंतहीन अशा द्वेषात आणि हिंसेत बुडून जाईल आणि तीच एका नव्या अंधारयुगाची सुरुवात ठरेल.

कुणी यांत आणखी काही समस्याही उल्लेखनीय असल्याचे दाखवून देऊ शकेल. या सगळ्या महासमस्या या आंतरराष्ट्रीय आहेत. एखादाच देश त्यांवर उपाय करू शकणार नाही. सगळ्याच देशांच्या वर्तणुकीतून या समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्यामुळे, त्यांच्या निराकरणातही सगळ्यांनाच सहभागी व्हावे लागेल. सगळ्यांचेच चुकीचे व्यवस्थापन आणि दूरदृष्टीचा अभाव हे या समस्यांना कारणीभूत आहेत. सगळ्यांच्या एकत्रित सहकार्याशिवाय यांवर मार्ग निघणे शक्य

नाही. या प्रयत्नात मोठमोठ्या  कॉर्पोरेशन्सचे व्यवस्थापन हा एक महत्त्वाचा भाग असणार आहे. नफा कमाईच्या दृष्टीने या कॉर्पोरेशन्सचे व्यवस्थापन उत्तम असते पण वर उल्लेख केलेल्या समस्यांबाबत मात्र बेफिकिरी असते.

आता या समस्यांना कोण किती जबाबदर, कुणी किती बदल करायचे, कुणी किती सुधारणा करायच्या, कॉर्पोरेशन्सची नफेखोरी आवश्यकतेप्रमाणे रोखणे शक्य आहे का, हे सर्व प्रयत्न कुणाच्या देखरेखीखाली चालणार, प्रत्येकाला सुधारणेला वेगवेगळी मुदत द्यावी लागणार का – असे असंख्य प्रश्न यात अंतर्भूत असणार आहेत. यासाठी जागतिक परिषदा होतात, काही मार्ग ठरवलेही जातात पण अजून तरी यात समाधानकारक प्रगती होताना दिसत नाही.

धोके दिसत नाहीत असे नाही. एकूण मानवजात बरबादीकडे चाललेली आहे, हे दिसत नाही, असे मुळीच नाही. पण प्रत्येकजण या प्रश्नाकडे आपापल्या मनाने – आपापल्या तुकड्यातून पाहतोय. मने, दृष्टिकोण, विचार, मते हे सगळे प्रत्येक माणसाचे आणि प्रत्येक राष्ट्राचे वेगवेगळे असल्यामुळे या एकूण प्रश्नावर एकत्रित कृती शक्य होत नाही. याचाच अर्थ असा होतो की हे सगळे प्रश्न सुटावे असे वाटत असेल तर आधी वेगवेगळ्या दृष्टिकोणांचा प्रश्न हाताळावा लागेल. स्वार्थ, स्वतःची सुरक्षितता, वर्चस्वाची इच्छा – अशा प्रेरणांतून हे सर्वांचे दृष्टिकोण वेगवेगळे होतात असे दिसते.आणि मन वापरण्याच्या आपल्या पद्धतीत मूलभूत बदल शक्य आहे, असे कुणालाच वाटत नाही. त्यामुळे, मनात स्वार्थ ठेवा पण बाहेर मानवजातीच्या भल्याचे बोला, हे सगळ्यांचेच चालू राहते. यातून किरकोळ काही सुधारणा होत असल्या तरी मुख्य गरजेची असलेली एकत्रित कृती घडू शकत नाही आणि जगाचे नाशाकडे जाणे थांबत नाही. एकत्रित कृती घडण्यासाठी पूर्ण मनाची रचनाच बदलावी लागेल पण ते तर कुणाच्याच आकलनाच्या कक्षेत येऊ शकत नाही. त्यामुळे मग मनात फारशी आशा न बाळगता, आपण काहीतरी फार महत्त्वाचे प्रयत्न करत आहोत अशा आभासात जगण्याशिवाय कुणालाच गत्यंतर राहात नाही. मानसिक तुकडेबाजीचे तत्त्व मान्य करा आणि त्याच वेळी एकात्मतेचे बोलत प्रयत्न करत राहा, अशी हास्यास्पद अवस्था स्वीकारली जाते.

स्वतःत आणि बाहेरही झालेली फुटीरतेची – विदीर्णतेची लागण आणि तीतून निर्माण होणारे गोंधळ यांचीच कशी पैदास वाढत जाते हे काही उदाहरणांनी पाहू. ही उदाहरणे सांस्कृतिक, राजकीय, वैचारिक, ( तथाकथित ) धार्मिक अशा अनेक क्षेत्रांतून घेतलेली आहेत. यांत अंतर्भाव होणाऱ्या दोनतीन गोष्टींनी सुरुवात करू. ‘ कर्मण्येवाधिकारस्ते ‘ असे म्हणत अत्यंत हावरट आणि महत्त्वाकांक्षी जीवनपद्धती असणे, आपला जन्म अमुक एका जातीत झालेला आहे हे सतत बिंबवत-गिरवत जातींचा अंत झाला पाहिजे असे निकराने मांडत राहणे, मनात साम्यवादी हुकुमशाही पटत असूनही बाहेर लोकशाही समाजवादात जगावे लागणे – हे सगळे यात येईल. अलीकडचे बोलायचे तर, दाराआडून बोलणारी स्त्री पुढे शिकली, जबाबदाऱ्या घेऊ लागली, समाजात मिसळू लागली. या प्रकारात नैतिक कल्पनांची जी घट्ट वीण होती ती सैल पडू लागली. आता मनाने आपण ही वीण  कितपत सैल करायला तयार आहे आणि बाहेर प्रत्यक्षात काय घडते आहे, यांतला विरोधही इथे समाविष्ट करावा लागेल. कोणत्याही आदर्श कल्पना आणि प्रत्यक्ष जगणे यांत हा विरोध तपासता येतो. विशेष म्हणजे हे सगळ्याच मानवी समूहांना लागू पडते, असे दिसते.  मान्यताप्राप्त धर्मतत्त्वे, नीतीतत्त्वे वेगळी आणि वागणे वेगळेच, असे सर्रास आहे. विशेष म्हणजे एका ठिकाणी ‘ संस्कृती ‘ या शब्दाचा अर्थ ‘ वागणे ‘ या एका शब्दात दिला आहे. ‘ अंतर्द्वंद्वासह वागणे ‘ असाच त्याचा अर्थ लक्षात घ्यावा लागेल. आता इतर उदाहरणांकडे वळू.

०९-११-०९ च्या ‘ महाराष्ट्र टाइम्स ‘ मध्ये आलेली ‘ सांस्कृतिक ऱ्हास रोखायलाच हवा ‘ ही बातमी पाहा. ती अशी आहे : -- “ सांस्कृतिक संवर्धनाची जबाबदारी पत्रकार, लेखक व प्राध्यापक या तीन बुद्धिप्रामाण्यवादी क्षेत्रांकडे असून त्यासाठी त्यांनी झटायला हवे. संस्कृतीचा ऱ्हास होत असताना बुद्धिप्रामाण्यवादाची कास धरली तरच वैचारिक प्रगल्भता साधता येईल व सांस्कृतिक संवर्धन होईल, असे विचार ज्येष्ठ पत्रकार डॉ. अरुण टिकेकर यांनी मांडले. गोवा हिंदू असोसिएशनचा ९० वा वार्षिकोत्सव उद्घाटन सोहळा शनिवारी दादर-माटुंगा सांस्कृतिक केंद्रात झाला. त्या सोहळ्याचे उद्घाटन डॉ. टिकेकरांच्या हस्ते झाले. त्या निमित्ताने
‘ संस्कृती-संवर्धन, परिवर्तन आणि पुनर्रचना ‘ या विषयावर परिसंवाद झाला. त्यात टिकेकरांसह ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर आणि विष्णू सूर्या वाघ हे सहभागी झाले होते. ‘ धर्म ‘ नावाच्या अजगराने आपल्या संस्कृतीला विळखा घालून तिच्या हाडांचा चक्काचूर केलाय, असे विधान विष्णू सूर्या वाघ यांनी केले आहे. कुवळेकर यांनी, ज्ञानसाधनेच्या २१ व्या शतकात आपण किती गांभीर्यपूर्वक ज्ञानाची कास धरतो, या प्रश्नाच्या उत्तरावरच सांस्कृतिक ऱ्हासाचे चित्र असल्याचे प्रतिपादन केले. ज्यांनी अंकुश ठेवायचा ती प्रसारमाध्यमेच पेड न्यूजच्या चक्रात सापडल्याचे हे चित्र धोकादायक असल्याचा इशारा त्यांनी दिला. प्रयत्नपूर्वक उदारमतवादी लोक निर्माण करून विचारांमधील विविधतेचा आदर राखला गेला पाहिजे. परंपरेचे संदर्भ काळाच्या निकषावर तपासायला हवेत, असे टिकेकर म्हणाले. “

कुणाला मानसिक ठेवा घातक वाटतो आहे तर कुणी त्यातल्या द्वंद्वावर भर देत आहे. तिघांनाही असे वाटते आहे की सध्याचा मानसिक ठेवा सांस्कृतिक ऱ्हासाला कारणीभूत होतो आहे. त्यात बदल करायला हवेत. वेगळ्या आदर्शांची तिथे प्रस्थापना व्हायला हवी, तरच संस्कृति-संवर्धन होईल. इथे हेही आठवते की परंपरेशी ताण आणि संघर्ष असतो पण तीपासून पूर्ण तुटणे नसते, असे म्हटले जाते. ‘ ओळख ‘ राहते. हे खरेखोटे काहीही असले तरी बदल, परिवर्तन कसे हवे याबद्दल आकलनभिन्नता असू शकते आणि त्यातले काय प्रभावी ठरेल हे अनेक गोष्टींवर अवलंबून असते. ‘ हाव ‘ असल्याशिवाय ‘ प्रगती ‘ होत नाही हे तत्त्व समाजात जोरात उभरत असणे ही त्याची पॉवरफुल पार्श्वभूमी असणार आहे. म्हणजे द्वंद्वच.

बुद्धीच्या – विचाराच्या – अभ्यासाच्या मार्गाने जात जातच उत्तर आधुनिकतावादात वा उत्तरसंरचनावादात बुद्धिप्रामाण्यवादाची कशी वाट लागते, याबाबतचे विवेचन इथे करत बसत नाही. पण मराठी लोकांनी बुद्धिप्राण्यवादाचे ‘ खूळ ‘, इतरत्र काय चालले आहे याकडे पूर्ण दुर्लक्ष करून, टिकवून ठेवलेले आहे, हे मात्र खरे.

दिवाळी ‘ सत्याग्रही विचारधारा ‘ २००९ मध्ये ‘ क्रांतीच्या मार्गातील अडचणी ‘ या लेखात डॉ. भालचंद्र कानगो काय म्हणतात पाहा – “ हा गौरवशाली इतिहास व परंपरा असताना उजव्या प्रतिगामी शक्तींची वाढ, मुक्त भांडवलशाहीची वाढती शक्ती व त्यांनी उभे केलेले आव्हान हे खरे आजचे प्रश्न आहेत. आधी सामाजिक समता की आर्थिक समता, आधी जातीअंत की आधी वर्गअंत, लोकशाही स्वातंत्र्य की कामगारांची हुकुमशाही, रचनात्मक कार्य की संघर्षात्मक कार्य, अहिंसक मार्गाने पुढे जावे की हिंसा अपरिहार्य, असे अनेक प्रश्न या सर्व पुरोगामी चळवळींना एकत्र आणताना उभे राहात होते व राहतात. स्वातंत्र्य, समता, बंधुता या त्रिसूत्रीपुढेच आव्हान उभे होत आहे. मानवी समाजाची विभागणी आहेरे आणि नाहीरे अशी सर्व स्तरांवर उभी राहात आहे. हे आव्हान कसे पेलायचे व पुढे कसे जायचे हाच खरा प्रश्न आज पुरोगामी शक्तींपुढे आहे. एकजुटीने वाटचाल हा पहिला टप्पा आहे. परंतु तो पुरेसा नाही. नवीन वास्तवात बदलत्या परिस्थितीची योग्य दखल घेऊन व्यूहरचन करणे हे पण तेवढेच महत्त्वाचे आहे. “

आता इतक्या गोष्टी ठरवायच्या आहेत तर त्यात एकमत होण्याऐवजी पंथपक्ष अशा चिरफळ्या उडणेच जास्त शक्य वाटते. त्यामुळे, ' एकजुटीने वाटचाल ' हा पहिला टप्पाच अशक्य दिसतो. या सगळ्या निवडी संगणकावर करून मिळण्याची सोय नाही. काही अणुचाचण्या प्रत्यक्षात घेतल्यावर पुढच्या चाचण्या संगणकावर घेता येतात, किंवा, यापुढे नवीन औषधांच्या चाचण्या संगणकावर घेता येणार असल्याने औषधे लौकर बाजारात येणे शक्य होणार आहे. तशी संगणकावर ' करेक्ट ' उत्तरे मिळण्याची यात शक्यता नाही. म्हणजेच, यातल्या निवडी आणि कल हे बुद्धीपेक्षा स्वभाव, लहर, आवड, स्वतःची सोय, स्वतःचे महत्त्व कसे वाढेल याचा विचार -- अशा गोष्टींवरच ठरण्याची शक्यता जास्त आहे. यातूनही क्लॅरिटी येणे याला पहिला टप्पा म्हणावे तर तो कधीच येणार नाही, हे तर स्पष्टच दिसते. मुद्दा तो नाही. चिरफळ्या उडणे – विदीर्णता – द्वंद्वात्मकता – हा मुद्दा आहे.

यानंतर, ' इत्यादी ' दिवाळी २००९ मधल्या ' दलित चळवळ की आंबेडकरवादी ? ' या लेखात भास्कर लक्ष्मण भोळे काय म्हणतात पाहा – " चळवळीच्या नामाभिधानापासूनच तिच्या समर्थकांच्या संभ्रमाची सुरुवात होताना आज दिसून येते. चळवळीला दलित चळवळ म्हणावे की आंबेडकरी चळवळ म्हणावे यावर तटबंद्या पडल्या असून उभयपक्षी बराच शब्दच्छल हिरीरीने केला जातो. प्रत्यक्षात हा वाद केवळ नामापुरता मर्यादित नाही, तर त्याला अनेक तत्त्ववैचारिक आणि व्यावहारिक संदर्भ प्राप्त झालेले असल्यामुळे त्याची दखल घेणे अगत्याचे वाटते. " आणि याच लेखाच्या शेवटी ते काय म्हणतात ते पाहा – " अशा परिस्थितीत चळवळीला आपण कोणत्या बाजूने लढत आहोत आणि आपल्या लढ्याची उद्दिष्टे काय आहेत याची स्पष्टता मनात बाळगूनच कोणताही निर्णय घेणे योग्य होणार आहे. चळवळीला दलित म्हटले किंवा आंबेडकरी म्हटले तरी फारसे काहीच बिघडत नाही. कारण दोन्ही नावे चांगलीच आहेत; पण, त्याबाबतची सूचना करणारे कोण आहेत, त्यांचे आंतरिक हेतू काय आहेत  आणि आजच्या स्पर्धेच्या युगात टिकाव धरण्याच्या दृष्टीने कोणती निवड करणे योग्य होणार आहे या गोष्टींचा विचार करण्यावाचून मात्र मुळीच गत्यंतर नाही. "  मी बऱ्याच वर्षांपूर्वी लिहिलेल्या एका एकांकिकेत एक अशाच प्रकारचा संवाद लिहिला होता. काळ्या लोकांची संघटना बांधली जात असतानाचा तो संवाद आहे. तो असा – " या पहिल्या सभेला अपेक्षेपेक्षा फारच चांगला प्रतिसाद मिळाला आहे. याचा अर्थ असा की या अन्यायाची बोचणी सतत आपल्या मनात आहे, पण कृती घडत नव्हती. ही कृतीची नांदी आहे. इथं निरनिराळे लोक बोलले. त्यांनी आपापले विचार मांडले. काही सूचना केल्या. प्रथम या बाबतीत थोडक्यात बोलतो. संघटनेचं नाव ' काळा हल्ला ' हे तात्पुरतं दिलेलं आहे. पण मलाही ते पसंत नाही. कारण ' हल्ला ' हा शब्द शत्रुत्व वाढवणारा आहे. आपल्याला शत्रुत्व वाढवायचं नाहीय. ' काळे दिवे ' या नावाची सूचना मला स्वतःला तितकीशी पसंत नाही. कारण आपल्या विरोधकांना ' काळे दिवे ' या नावामुळं आपली चेष्टा करायची संधी मिळेल. नाव हे फार विचारपूर्वक ठरवावं लागेल. ते अर्थात आपण करूच … " अनेक अपूर्णांतून एका अपूर्णाची निवड करावी लागण्याचा हा प्रकार. त्यात परत ' स्पर्धेच्या युगात टिकाव धरणे ' हा आणखी एक आयाम !

इथे डॉ. यशवंत मनोहर यांचा निवडणुकीला उभे राहण्याचा अनुभव आठवावा. सगळे परिवर्तनवादी एकत्र येताहेत हे पाहून ते उभे राहायला तयार झाले आणि कामाला लागले. आणि एका दिवशी सकाळी वर्तमानपत्रात, त्यांच्या नामवंत पुढाऱ्यांची नावे असलेली जाहिरात दिसली की ' आपल्या सर्व लोकांनी काँग्रेसला मतदान करायचे आहे. ' ते अर्थातच थक्क झाले ! आंबेडकरी चळवळीची जागाच मला कळली, असे त्यांनी विषादाने म्हटले आहे. आता हा कुठला आयाम असू शकेल, यावर टिप्पणीची गरज नाही.

पंधराव्या विचारवेध संमेलनात डॉ. आनंद तेलतुंबडे यांनी केलेल्या अध्यक्षीय भाषणातला ऑगस्ट २००८ च्या ' आपले वाङ्मयवृत्त ' मध्ये आलेला एक अंश इथे देण्यासारखा आहे. गंमतीशीर आणि ज्ञानदही – " आज विचारवंत आणि कार्यकर्ता या दोन कंपूंमध्ये एक भयंकर दरी निर्माण झालेली आहे. कार्यकर्ता-कंपू हा तथाकथित विचारवंतांपासून इतका दुरावला गेला आहे की त्याने विचार करणेच सोडून दिले आहे. त्याला याची धास्ती असते की विचार केल्याने आपण स्वतःच कदाचित ' विचारवंत ' बनू. म्हणून तो कोणत्याही विचाराशिवाय, परिणामाचासुद्धा विचार न करता, कृती करत असतो. दुसरीकडे विचारवंत आपल्या हस्तिदंती मनोऱ्यात बसून आधीच सुजलेला आपला अहंकार ( ego ) अधिकच फुगवीत, आपण विचार निर्माण करत आहोत अशी कल्पना करत असतात. आपला ' थोर ' विचार कृतीत न आणल्याबद्दल ते कार्यकर्त्यांना दूषणे देतात. त्यांना याची साधी जाणीवही होत नाही की जर तो विचार कार्यकर्त्यांना आकर्षित करत नाही तर त्याच्यातच काहीतरी त्रुटी असणार. याप्रमाणे आज सर्वत्र वांझ विचार व दिशाहीन कृती अशी दुःखदायक परिस्थिती आहे. म्हणून ही परिस्थिती लवकरात लवकर बदलण्याची गरज आहे. " आदर्श आणि कृती यांतलेच हे द्वंद्व. हे एका समाजातले म्हणूनही पाहता येईल आणि एका व्यक्तीतले म्हणूनही पाहता येईल.

अशाच प्रकारच्या द्वंद्वात्मकतेचे आणखी एक उदाहरण पाहू. हे उदाहरण विजाय तेंडुलकर यांच्या लेखाचे आहे. ' मी गोळी घालीन म्हणालो त्याबद्दल ... ' या ' महाराष्ट्र टाइम्स ' च्या दिवाळी २००९ च्या अंकात आलेल्या त्यांच्या लेखातला हा शेवटचा भाग आहे – स्टालिनच्या क्रौर्याबद्दल वगैरे लिहून ते पुढे लिहितात, " हा ' नरराक्षस ' कवितेचा वेडा आणि साहित्यकलांचा अव्वल रसिक होता, हे कोणाला खरे वाटेल ? त्याला आवडलेल्या कविता त्याला तोंडपाठ होत्या. त्याला आवडलेल्या साहित्यकृतींचा आणि चित्रपटांचा त्याचा स्वतःचा संग्रह होता. यातले काही तो पुनःपुन्हा पाही आणि त्यांचे मार्मिक विश्लेषण करी. राजकारणाशी आणि सत्ताकारणाशी काहीही संबंध नसलेल्या गणितासारख्या विषयांचा त्याचा व्यासंग मोठा होता. तो स्वतः चांगला गात असे. नाचत असे. विद्वत्तेविषयी त्याला खराखुरा आदर होता. अशा अव्वल रसिक आणि सुसंस्कृत नरराक्षसाला कसे समजून घ्यायचे ? मोदी निदान इतके गुंतागुंतीचे नसावेत. पण गुंतागुंतीचे असतीलच.

स्टालिन असता तर गोळ्या घालण्याच्या माझ्या यादीत तो अग्रभागी असता; आणि तरीही त्याच्याविषयीचे वर दिलेले सर्व तपशील चरित्रात वाचताना मी अचंबित होतो. जवळ जवळ त्याच्या प्रेमात पडतो.

माझा परमेश्वरावर विश्वास नाही. पण असे काही पाहिले, वाचले की माझे हात नकळत जुळतात. आणि ते गोळ्या घालण्यासाठी जुळलेले नसतात. तो बेत मी क्षणिक विसरलेला असतो. " जणू क्वचित दिसणारे अजब द्वंद्व अशा कौतुकमिश्रित आश्चर्याने तेंडुलकर जरी लिहीत असले तरी ही तशी, प्रमाणाच्या फरकाने, कॉमन गोष्ट आहे. याची बऱ्याच जणांना जाण असते. स्टालिनचे स्वतःच्या मुलीबद्दल हळवे असणे आणि इतरत्र क्रूर असणे हे तेंडुलकरांना दिसलेले त्याचे वैशिष्ट्यही अपवादात्मक समजण्यासारखे नाही.

आपल्या आसक्तीच्या ठिकाणी वेगळे वागणे आणि इतरत्र वेगळे वागणे, धर्मसंस्कृती वेगळी असणे आणि आपद्धर्म वेगळा असणे, वैचारिक भूमिका वेगळी असणे आणि पोलिटिकल अजेंडा वेगळा असणे, फलाशा नसावी म्हणत एक नंबरचे आत्मकेंद्री असणे, ' चांगले ' घडायचे असले तरी ते ' माझ्याच ' हातून घडले पाहिजे या विचाराने कामाची

नासाडी करणे, मला निस्पृह म्हणा पण मी नेतृत्व सोडणार नाही, म्हणणे, विचारस्वातंत्र्याचा पुकारा करत दडपशाही करणे, या अशा गोष्टी लक्षात यायला फार मोठ्या बुद्धिमत्तेची गरज लागत नाही. नैतिक, धार्मिक, वैचारिक, सर्वच क्षेत्रांत हे घडत असते. तरीही चांगले घडते, प्रगती होते, मदत मिळते, हक्क मिळतात. माणसे एकमेकांशी प्रेमाने वागतात, परिवर्तन होते, क्रांतीही होऊ शकते. पण हे सगळे त्या मूलभूत द्वंद्वाच्या नियमाला धरूनच होते. किंवा होत नाही. जगण्याच्या या ' नॉर्मल ' पद्धतीतूनच भीती, हिंसा, अन्याय, छळ, विषमता, अस्मिता, द्वेष, परिवर्तनाचे लढे, परिवर्तनविरोधी डावपेच, श्रद्धा, बुद्धिप्रामाण्यवाद, निराशावाद, हे सर्व निर्माण होते, हे स्पष्ट आहे. भगवद्गीता काय किंवा संतवाङ्मय काय, तिथे जे ' सत्य ' मांडण्यात आले आहे ते त्या त्या व्यक्तींना त्यांच्या त्यांच्या जगण्यात प्रत्यक्ष दिसले / समजले असेल. आपण तो नुसता मानसिक साठा या रूपात बाळगतोय. म्हणजे, त्या अर्थाने, हा सगळा साठा मृत आणि निरर्थकच नाही का ? कोणत्याही आदर्शांच्या बाबतीतही हेच घडत नाही का ?

अशा गोष्टींतला गोंधळ आणि सारवासारव फक्त आपल्याकडेच चालते, असे काही नाही. अमेरिकेच्या दोन राष्ट्राध्यक्षांचे हे उतारे पाहा –

' इट टेकस अ व्हिलेज ' या हिलरी क्लिंटन लिखित आणि विजया कुलकर्णी अनुवादित पुस्तकातील एक उतारा – ( पृष्ठ – १९५ ) माझ्या पतीने १९९५ च्या ऑक्टोबरमध्ये टेक्सासमधील ऑस्टिन येथे केलेल्या भाषणात असे म्हटले होते, " गोरे अमेरिकन आणि काळे अमेरिकन यांचे एकाच वास्तवाकाडे पाहण्याचे दृष्टिकोन पूर्णपणे भिन्न आहेत. या साध्या सरळ वस्तुस्थितीविषयी प्रत्येकाला जागृत ( सावध ) करण्यात आले आहे. " ते पुढे म्हणतात, " अर्थातच विभाजनाची कारणे अनेक आहेत. काहींची मुले आपल्या इतिहासात आणि वंशवादाच्या कडव्या दुराग्रहात सापडतात आणि काहींची मुले आधुनिक जीवनातील वैयक्तिक सुरक्षा, कौटुंबिक मूल्य आणि भक्कम सार्वजनिक संस्था इत्यादींना धोका निर्माण करणाऱ्या निरनिराळ्या दहशतीच्या प्रकारांत रुतली आहेत आणि काही भेडसावणाऱ्या समस्या अशा आहेत की, आजही या विषयाबाबत आपण मोकळेपणाने चर्चा करण्यास शिकलो नाही. वंशभेदाच्या ज्वलंत समस्येवर ध्यान देऊन सर्वांनी एकजुटीने झटून या प्रश्नावर तोडगा काढण्याची आवश्यकता आहे. " क्लिंटन वांशिक भिन्नवादावर बोलत असले तरी, त्यांनी सुचविलेला उपाय सर्वसाधारणपणे आपल्या बहुवंशिक आणि बहुधर्मी समाजातील सर्व प्रकारच्या पक्षपातांना लागू पडणारा बिनतोड उपाय आहे. – हे झाले तिकडचे. आपल्याकडे काय आहे ? कुणाला वाटते आहे की पृथ्वी मुस्लिम-मुक्त झाली की इथे स्वर्ग अवतरेल, कोण म्हणतेय की ब्राम्हणांची पूर्ण कत्तल केल्याशिवाय काही खरे नाही, तर कोण म्हणतेय की दलित फार माजले आहेत, त्यांचा बंदोबस्त आधी व्हायला हवा. – ही सर्व मनाच्या विदीर्णतेचीच सामाजिक विदीर्णतेच्या रूपात बाहेर दिसणारी अभिव्यक्ती नाही का ?

आणि दुसरे हे असेच द्वंद्वांनी भरलेले आणखी एक ' मोठे ' उदाहरण पाहा –

१० डिसेंबर २००९ ला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी शांततेचा नोबेल पुरस्कार घेताना केलेल्या भाषणातील काही अंश : --

१. – आपण आपल्या आयुष्यात हिंसक संघर्षाचे उच्चाटन करू शकणार नाही, हे सत्य स्वीकारूनच आपण सुरुवात केली पाहिजे. अशा वेळा येणारच की जेव्हा राष्ट्रांना स्वतंत्रपणे वा गटांनी कृती करताना बळाचा वापर हा नुसता आवश्यकच नव्हे तर नैतिक दृष्ट्या समर्थनीयही वाटेल. हे वाक्य बोलताना माझ्या मनात, काही वर्षांपूर्वी इथल्याच समारंभातल्या

भाषणात मार्टिन ल्यूथर किंग यांनी काढलेले उद्गार आहेत – " हिंसा कधीच शाश्वत शांतता आणत नाही. ती कुठलाही सामाजिक प्रश्न सोडवत नाही – उलट ती फक्त नवीन आणि अधिक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण करते. " डॉ. किंग यांच्या कामाचे फलित म्हणूनच जेव्हा माझ्यासारखा कुणी इथे उभा राहतो तेव्हा तो अहिंसेच्या नैतिक बळाचा जिताजागता पुरावाच असतो. मला याची जाणीव आहे की गांधी आणि किंग यांच्या तत्त्वात वा जगण्यात कोणताच कमकुवतपणा, कर्तव्यचुकारपणा अथवा खोटेपणा नव्हता. पण माझ्या राष्ट्राला सुरक्षितता आणि संरक्षण देण्याच्या बाबतीत प्रतिबद्ध असलेला एक राष्ट्रप्रमुख म्हणून मी फक्त त्यांच्या पावलावर पाऊल टाकत जाऊ शकणार नाही. जग जसे आहे तसेच ते मला पाहावे लागेल. अमेरिकनांना धमक्या येत असताना त्या मी कृतिहीनपणे पाहात राहू शकणार नाही. कारण उगीच भ्रमात राहण्यात अर्थ नाही. जगात दुष्ट प्रवृत्ती आहेतच. हिटलरच्या सैन्याला एखादी अहिंसक चळवळ मुळीच थांबवू शकली नसती. वाटाघाटी करून अल कायदाच्या पुढऱ्यांना त्यांनी त्यांची हत्यारे टाकावीत हे पटवता नाही येणार. कधीकधी बळाचा वापर अपरिहार्य असतो असे म्हणणे म्हणजे निराशावादाकडे जाणे नसून ते फक्त इतिहासाचे भान आहे. माणसातल्या कमतरता आणि त्याच्या तर्काच्या/बुद्धीच्या मर्यादा यांचे भान.

२. जग जसजसे अधिकाधिक छोटेछोटे होत जाते तसतशी माणसांना आपल्यातल्या समानतेची जाणीव होत जाणे सोपे होत जाते हे तुमच्या लक्षात येईल. मूलतः आपणा सर्वांना समानच गोष्टी हव्या असतात. आपण सगळेच आपापली आयुष्ये जमेल तशी आनंदाने आणि आपल्या कुटुंबियांसह समाधानात व्यतीत करू इच्छितो. आणि तरीही एक बघा – जागतिकीकरणाला भोवळ आणणारा वेग असूनही आणि आधुनिकतेमुळे सगळीकडे सांस्कृतिक सपाटीकरण होत असूनही, लोकांना, त्यांनी जोपासलेल्या त्यांच्या वैयक्तिक ओळखी, वंश, जमाती आणि बहुधा सर्वात प्राणपणाने जपलेला त्यांचा धर्म – हे सर्व नष्ट होण्याची भीती वाटते ! आणि यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. काही ठिकाणी तर या भीतीतून संघर्षही उद्भवलेले दिसतात. कधी कधी अशीही शंका येते की आपण पुन्हा मागे मागे तर जात नाही आहोत ? मध्यपूर्वेत तीव्र होत जाणाऱ्या अरब-ज्यू संघर्षावरून असेच दिसते. जी राष्ट्रे त्यांच्या टोळ्यासदृश अस्तित्वांमुळे एकमेकांपासून तुटलेली आहेत, तिथेही हेच दिसते.

सर्वात धोकादायक म्हणजे काहींनी इस्लामसारख्या महान धर्माला विकृत आणि मलिन बनवले आहे. ते धर्माचा वापर निरपराध्यांना ठार मारण्यासाठी करत आहेत, हे आपण पाहतोच आहोत. त्यांनीच तर अफगाणिस्तानातून माझ्या देशावर हल्ला केला. हे अतिरेकी म्हणजे देवाच्या नावावर खूनखराबा करणारे असे पहिलेच आहेत, असे काही नाही. क्रुसेडच्या युद्धांतला असा क्रूरपणा आधीच भरपूर नोंदला गेलेला आहे. पण या सगळ्यामुळे आपल्याला हीच जाणीव दिली जाते की कोणतेच तथाकथित धर्मयुद्ध हे कधीच समर्थनीय नसते. कारण तुम्ही खरोखरच देवाची इच्छा अंमलात आणत आहात यावर तुमची श्रद्धा असेल तर मग संयमाची गरजच राहात नाही. मग गरोदर स्त्रीलाही सोडून द्यायचे कारण राहात नाही, डॉक्टरलाही नाही, एवढेच काय, आपल्याच धर्माच्या एखाद्या अनुयायालाही नाही, असे घडते. असा तोडमरोड केलेला धर्माचा दृष्टिकोण हा शांतीच्या संकल्पनेशी तर विसंगत असतोच पण शिवाय तो श्रद्धेच्या हेतूशीही प्रतारणा करणारा असतो. कारण प्रत्येक मोठ्या धर्माच्या काळजात एक तत्त्व नेहमीच अंतर्भूत असलेले दिसते की तुम्ही लोकांशी तसेच वागा जसे त्यांनी तुमच्याशी वागावे, असे तुम्हाला वाटते. या प्रेमाच्या तत्त्वाप्रमाणे वागायचा प्रयत्न  करणे, हाच तर माणसाचा महत्त्वाचा मानसिक संघर्ष राहात आलेला आहे. आपण चुका करतो, गर्व, सत्ता किंवा काही वेळी दुष्टाव्याच्याही मोहात पडतो. आपल्यातले अगदी अत्युत्तम हितचिंतकही कधीकधी चुकीच्या गोष्टी सुधारण्याच्या बाबतीत अपयशी ठरतात.

परंतु, माणसाची परिस्थिती पूर्णत्वास जाऊ शकते यावर श्रद्धा ठेवण्यासाठी, माणसाचा स्वभाव हा परिपूर्ण आहे, असे समजण्याची गरज नाही. जगण्यासाठी हे जग अधिक चांगले व्हावे यासाठी जी ध्येये बाळगावी लागतील त्या ध्येयांच्या आदर्श जगात आत्ताच आपण राहतो आहोत, असे समजण्याची आवश्यकता नाही. गांधी किंवा किंग यांनी आचरणात आणलेली अहिंसा ही प्रत्येक परिस्थितीत व्यवहार्य किंवा शक्य असेलच असे नाही, पण, त्यांनी जो प्रेमाचा संदेश दिला, मानवी उत्थानावर त्यांची जी अढळ श्रद्धा होती, ती मात्र एखाद्या ध्रुव ताऱ्याप्रमाणे आपल्या प्रवासात आपल्याला सतत मार्गदर्शक ठरायला हवी. ती श्रद्धा जर आपण घालवून बसलो, तिला जर आपण मूर्खपणाची वा खोटी समजू लागलो आणि तिच्याशिवायच जर आपण युद्ध आणि शांतता यांचे निर्णय करू लागलो तर मानवी जीवनातली सर्वोत्कृष्ट गोष्टच आपण गमावून बसलो, असे होईल. काय शक्य आहे याची जाणीवच आपण हरवून बसू, आणि नैतिकतेचा आधारच घालवून बसू.

आपल्यानंतर अनेक पिढ्या येणार आहेत आणि तसले वाईट भविष्य आपण नाकारलेच पाहिजे. या अशाच प्रसंगी डॉ. किंग कित्येक वर्षांपूर्वी म्हणाले होते – " इतिहास अनाकलनीय असला तरीही, त्या बाबतीत, निराशा ही अंतिम प्रतिक्रिया म्हणून मला स्वीकारार्ह वाटत नाही. माणसाच्या स्वभावाचे आजचे जे ' असणे ' आहे ते त्याच्यासमोर नेहमीच असणाऱ्या ' कसे असावे ' च्या बाबतीत त्याला कुचकामी बनवते, हेही स्वीकारायला मी नकार देतो " ' कसे असावे ' अशा जगाकडे आपण जात राहू. आपल्या प्रत्येकाच्या प्राणात असणारी ती स्वर्गीय ज्योत तेवती ठेवू. आज एखाद्या ठिकाणी, इथे आणि आत्ता, एखाद्या सैनिकाच्या हे लक्षात येते की शत्रू वरचढ आहे आणि तरीही तो शांततेच्या तत्त्वासाठी अडिगपणे उभा राहतो; आणखी एखाद्या ठिकाणी, आज, याच जगात, एक तरुण निदर्शक मुलागी तिच्या शासनाच्या क्रौर्याची खात्री असूनही धैर्याने पुढे जात राहते; आजच एखादी माता जणू शिक्षा भोगत असल्याप्रमाणे अत्यंत दरिद्री आयुष्याला तोंड देते आणि त्यातूनही तिच्या मुलाच्या शिक्षणाची काळजी घेते – का ? तर तिचा विश्वास असतो की या क्रूर जगातही तिच्या मुलाच्या स्वप्नांना जागा आहे !

त्यांचे आदर्श समोर ठेवूनच आपण जगू या. आपण हे मान्यच करू शकतो की अत्याचार हा नेहमी अस्तित्वात असणारच आहे आणि तरीही आपण न्यायासाठी झगडत राहू शकतो. अनियंत्रितपणे बोकाळणारी अनैतिकता मान्य करूनही आपण मानवी प्रतिष्ठेसाठी प्रयत्नशील राहू शकतो. युद्धाची अटळता समजूनही आपण शांततेसाठी झटू शकतो. आपण हे करू शकतो कारण हाच तर मानवी प्रगतीच्या कहाणीचा मूलस्रोत आहे. हीच तर साऱ्या जगाची आशा आहे. आणि आजच्या या आव्हानात्मक क्षणी या पृथ्वीवरचे आपले तेच तर काम असायला हवे. ( --- अनुवाद माझा ).
आपण बोलत असलेल्या द्वंद्वात्मकतेची अनेक उदाहरणे तर वरील मजकूरात सापडतीलच, शिवाय त्या द्वंद्वात्मकतेचे उदात्तीकरणही सापडेल. आपण ' आदर्शा ' कडे जाण्याचा प्रयत्न करण्याइतपत आदर्श आहोत – असे या उदात्तीकरणाचे स्वरूप असते. माझे कल्याण, माझ्या राष्ट्राचे कल्याण ( काहीजण यात धर्म, भाषा, जात – हेही घेऊ शकतील ) हे सतत मनात ठेवून मी जगाचे, मानवजातीचे कल्याण करू इच्छितो, अशी ही भूमिका असते.

ढोबळ फरकाने हे सगळे आपण सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय वगैरे क्षेत्रांबद्दल बोललो असलो तरी प्रत्येक माणसाच्या आत, प्रत्येकाच्या जगण्यात काय चालले आहे, हेही पाहू.

## विदीर्णता आणि अराजक

विदीर्णता पूर्वी नव्हती आणि आताच आहे, असे काही नाही. आता प्रमाणाने ती फारच प्रचंड असून ती दर सेकंदाला जाणवते हे मात्र आजच्या जगण्याचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. मनाच्या विषयांची संख्या प्रचंड वाढणे हे त्याचे कारण आहे. वस्तू, संबंध, विचार यांच्यांत ताबाहीन वाढ झालेली आहे. मानवी मन जिथे जिथे आणि जितक्या ठिकाणी स्पर्श करेल तिथे तिथे आणि तितक्या ठिकाणी बाहेर आणि आतही शकले उडणे, चिरफळ्या उडणे, एकात्मता नष्ट होणे हेच अटळपणे घडताना दिसते. ‘ मी आणि जग ‘  हे विभाजन याच्या मुळाशी असते. यातूनच मला स्वतःवर आणि जगावर, दोहोंवरही ताबा ठेवण्याची, त्यांना अपेक्षित रूप देण्याची, त्यांना अपेक्षित वेगाने, अपेक्षित दिशेने नेण्याची गरज निर्माण होते. काय हवे आणि कसे हवे, योग्य काय, नैतिक काय, न्याय्य काय यांबाबतचे विचार थैमान घालत राहतात. मीच माझ्यावर ताबा चालवू इच्छित असल्यामुळे एक मूलभूत ताण आणि संघर्षाची अवस्था निर्माण होते. जग आणि जगातल्या वस्तू, माणसे हे सगळे इतके प्रचंड असते की त्यावर माझा ताबा येणे शक्यच नसते. तरीही तो प्रयत्न थांबत नाही. त्याचेही ताण आणि संघर्ष निर्माण होतात. परिणामतः मन हे सतत अराजकी अवस्थेत काम करत राहते. सुखेच्छा, वर्चस्वाची इच्छा, भीती, महत्त्वाकांक्षा, सुरक्षिततेची इच्छा – या सर्व बाबतींतल्या मानसिक कृती गोंधळ माजवत राहतात. या सगळ्या गोष्टींना कोणतीही शिस्त राहणे शक्यच नसते. त्यामुळे, मन म्हणजे अराजक असे होते आणि ते अराजक अर्थातच एकूण जगण्यातच पसरते.

हे सर्वच माणसांच्या बाबतीत घडते. विषमता, न्याय-अन्याय वगैरेंच्या कोणत्याही परिस्थितीत हे घडते. हाव तर आहे पण तिचा त्रास तर नको, अशी आणखी एक द्वंद्वात्मक अवस्था भोगणे हा आणखी एक ताण याबरोबर चालू राहतो. या परिस्थितीला, ताणांना, संघर्षांना दुःखाचे रूप येते. प्रश्नांचे रूप येते. हे सोडवावे कसे ? ‘ विचार ‘ हे साधन वापरून यांतला एकेक प्रश्न सोडवत जाणे हे महामूर्खपणाचे ठरेल, कारण प्रश्न असंख्य आहेत आणि ते एकमेकांत गुंतलेलेही आहेत, हे लक्षात येते. हे सगळेच एकत्रित, एकमेकांशी संबंधित, एकमेकांवर परिणाम करणारे असून स्वतंत्र अस्तित्व कशालाच नाही, हे स्पष्ट दिसते. मग असे कोणते साधन असेल की जे एका कटाक्षात हे सगळेच आवाक्यात घेईल, असा प्रश्न पडतो.

## भोग आणि हिंसा

नशा हा एक भोग असतो आणि भोग ही एक नशा असते. दोन्ही हवेच असतात कारण वर उल्लेख केलेले जंजाळ त्रासदयकच असते आणि त्यातून सुटका हवीच असते. या बाबतीत नेहमीच निकरावर आल्यासारखी अवस्था असते. यातून सुटका मिळवण्यासाठी माणूस काहीही करायला तयार असतो, कोणताही धोका पत्करायला तयार असतो. ही अवस्थाच हिंसक असते. बाहेर कुणाला भोसकले, कुणाचा खून केला, कुणाचा अपमान केला म्हणजेच हिंसा होते असे नाही. ‘ मी आणि जग ‘ यातल्या ‘ मी ‘ या प्रतिमेचे अस्तित्वच हिंसक असते. कारण ती प्रतिमा हे एक लादणेच असते. या दृष्टीने, माझा अपमान होतो तेव्हा, अपमान करणारा आणि मी दोघेही हिंसक असतो. कारण मुळात माझ्या हिंसक प्रतिमेच्या अस्तित्वामुळेच माझा अपमान होऊ शकतो. त्या प्रतिमेला धक्का बसायच्या दुःखालाच मी अपमान म्हणतो. ठिकठिकाणी मी माझ्या निरनिराळ्या प्रतिमा वापरतो म्हणजेच स्वतःत हिंसेची व्हरायटी बाळगतो. मी स्वतःला

जगापासून वेगळा काढत असल्याने जगाचे ताण, जगाशी संघर्ष हे सर्व अपरिहार्यच ठरते. त्यामुळे माझी प्रत्येक प्रतिमा ही हिंसकच असते. मीच एकूण हिंसेचे मूळ असतो.

## विषमता आणि अन्याय

विषमता ही अनेक प्रकारची असते. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, बौद्धिक, कार्यक्षमतेमधली, आरोग्यातली, रूपातली, संवेदनशीलतेतली, मिळणाऱ्या संधींमधली, वगैरे. न्यायाच्या बाबतीत तर आनंदच असतो. जवळजवळ प्रत्येक संबंध कमीजास्त प्रमाणात अन्याययुक्तच असतो. न्यायसंस्था म्हणून पाहायचे झाले तरी, उत्तम वकील देता येण्याबरोबरच, प्रत्यक्ष न्यायाच्या प्रक्रियेतले आणि बाहेरचेही इतर अनेक डावपेच न्यायालयातल्या यशापयशाला कारणीभूत होतात. माझा हेतू असो वा नसो, माझ्या जगण्यातून, वागण्याबोलण्यातून मी स्वतःही ठिकठिकाणी अन्याय करतच असतो. एखाद्या संबंधात, दुसऱ्या व्यक्तीला, माझा आक्रमकपणा जसा अन्यायकारक वाटू शकतो, त्याचप्रमाणे, माझा समजुतदारपणा वा माघार घेणे वा मवाळ वागणेही हर्ट करणारे वाटू शकते. प्रत्येक व्यक्तीने आपापल्या प्रतिमेने स्वतःला अलग करून घेणे हे याला मुख्यतः कारणीभूत असते. विषमता, अन्याय यांचा भीती आणि सुखेच्छा यांच्याशी संबंध असतो की नाही ? सुखेच्छेचा अस्मितेशी संबंध असतो की नाही ? स्वतःच्या बाबतीत असुरक्षितता टाळण्याचा प्रयत्न हा स्वतःला व दुसऱ्याला शून्य हानिकारक असू शकतो का ? हे सगळे लक्षात न घेता, आर्थिक विषमता हाच एक महत्त्वाचा प्रश्न आहे असे मानले तर जगण्याच्या एकूण रचनेवर कितपत परिणाम होईल ? अर्थात, काहीच बदल होणार नाहीत असे नाही. पण, जे काही बदल होतील ते या मानसिक रचनेच्या गुणवैशिष्ट्यांनी युक्त असतील हे निश्चित. मानवी मनाची एकूणात सडकी म्हणावी अशी अवस्था पाहता, ‘ वर्गहीन समाज ’ हे तर एक वेडे स्वप्नच ठरते. विषमता व अन्याय हे मानवी जीवन अधिकाधिक पोखरत जातील, हे स्पष्ट आहे. बुद्धीने प्रश्न सोडवणे हे क्रमशः आणि विश्लेषणात्मक असते. त्या पद्धतीने माणसाच्या जगण्यातल्या भयानक वास्तवात कितपत सुधारणा होऊ शकेल ?

## समृद्धी आणि चमचमाट

मॉल्स, मल्टिप्लेक्स, हॉटेल्स, बार्स, कॅसिनो, फॅशन्स, ग्लॅमर, जुगार-सट्टा, हजारो खाद्यपदार्थ, व्यसने, असंख्य वस्तू, स्त्रिया, पुरुष, रेस, कार्स, देशविदेश-सहली, वगैरे सगळे प्रचंड प्रमाणावर उपलब्ध असणे, त्यांच्या आकर्षक जाहिराती, माध्यमांतल्या चर्चा – या सगळ्या समृद्धीबरोबर आणि चमचमाटाबरोबर आणि झगमगाटाबरोबच हाव, अधाशीपणा, मत्सर, असूया, द्वेष यांची मानसिक जंगलेही अस्तित्वात येतात, हे नाकारता येत नाही. कोणत्याही प्रश्नात व्यग्र असलेले मन त्या प्रश्नाप्रमाणेच इतरत्रही त्या ताणानेच वागत राहते. अशा मनाचे सगळेच वागणे, त्याचे निर्णय हे त्या व्यग्रतेने बाधित होतात, हे सांगायला कुणा मानसशास्त्रज्ञाची गरज नाही. श्रीमंत होणे, प्रसिद्ध होणे, लोकांनी आपल्याकडे आदराने पाहावे असे वाटणे – अशा गोष्टींचे जगण्यातले महत्त्व वाढणे हे तफावत, तुलना यांचेही महत्त्व वाढवते आणि माणसाला विषमतेचा भोक्ता बनवते. जाती, धर्म, भाषा,, देश कोणतेही असोत, सर्व माणसांत हेच घडत राहते. याचा माणसाच्या एकूण जगण्यावर काहीच परिणाम होत नसेल असे समजणे हे अतीव भाबडेपणाचे ठरेल. बाहेरून आत मिळवत राहण्याची आत्मकेंद्री वृत्ती ही विघटन, दुःख आणि विध्वंस यांना जन्म देणार, हे अटळ असते. एकेक प्रश्न सोडवायला पाहिजे असे म्हणणारे बुद्धिप्रामाण्यवादी याकडे दुर्लक्ष करतात.

## अनिश्चितता आणि भीती

कमाईचे सर्व मार्ग आणि सर्व संबंध यांत अनिश्चितता आणि भीती यांचे सततचे, जणू दबा धरून बसलेले, वास्तव्य असते. माणूस कितीही बिझी असो, कितीही गर्दीत असो, कितीही झगमगाटात असो, तो अनिश्चितता आणि भीती यांच्या पकडीतून सुटत नाही. यातून तो थेट एकाकीपणाचे भक्ष्य होतो. एकाकी, वेडपट माणसांची गर्दी असे एकूण मानवजातीचे स्वरूप  बनते. प्रत्येकाचा एकाकीपणा वेगवेगळ्या प्रकारच्या अनिश्चितता, भीती, त्रास, दुःख, विवंचना, काळज्या, ताप-संताप इत्यादींनी युक्त असतो. यात ' सर्वसामान्य ' असे काही नसते. सर्वसामान्य असतो तो जीवघेणा एकाकीपणा. काहीच खरे न वाटणे. टिकाऊ न वाटणे. आपण काय कशासाठी करतो आहोत हे न कळणे. दिङ्मूढ होणे. यातून पळवाटा शोधण्याबाबत अधीर होणे आणि त्या पळवाटाही कुचकामी असल्याचे लक्षात येऊन अधिकच घाबरे होणे. ही एकूण मनःस्थिती सतत सहन करावी लागणार हे समजून जणू कडेलोटाचा अनुभव येणे. दुसऱ्याही व्यक्ती, या ना त्या प्रकारे याच नावेतून जात असल्याने कुणाचीही साथ नसल्याची भयंकर जाणीव होणे. दुसऱ्याला मदत करायला उद्युक्त होतानाही आपला एकाकीपणा कमी होत नसल्याचे लक्षात येणे. – हे सगळे प्रश्न सगळ्यांच्या आयुष्यात असतात की नसतात ? हे फक्त व्यक्तिगत प्रश्न असतात ? यांतूनच तथाकथित सामाजिक प्रश्नांची निर्मिती होते की नाही ? आजारी माणसासाठी लांबून अंगारा घेऊन येणाऱ्या माणसाला जसे आपण खूप प्रयत्न करतो आहोत असे वाटते, तसेच समाधान, सामाजिक प्रश्न हाताळून आपल्याला हवे असते का ?

## वेग आणि मद्दडपणा

प्रत्येकाला वेगात यश मिळवायचे आहे आणि अपयशाचे तोंडही पाहायची इच्छा नाही. मग यासाठी पर्यावरणनाशातून जगाचा अंत जवळ येवो की स्वतःला शिकवल्या गेलेल्या मूल्यांचा अंत लगेचच सुरू होवो ! आता आपल्याला जमेल त्या क्षेत्रात वेगात पुढे जाणे महत्त्वाचे आहे, मग ते गुन्हेगारीचे क्षेत्र का असे ना ! किंबहुना आता कायदासंमत नसलेले म्हणजे गुन्हेगारीचे क्षेत्र असे स्वतंत्र क्षेत्रही राहिलेले नाही. सगळ्याच क्षेत्रांत गुन्हेगारी बोकाळते आहे. काही ठिकाणी ' कसेही ' वागा, एखाद्या ठिकाणी ' चांगले ' वागा, इतरत्र ' व्यवहारकठोर ' राहा आणि आपल्या माणसांबद्दल ' हळवे ' राहा – हेच सवयीचे आणि नॉर्मल झालेले आहे. कला, तत्त्वज्ञान असल्या निरुपयोगी गोष्टींना आता स्थान नाही. हे चांगले की वाईट याची चर्चाही फालतू – निरुपयोगी आहे. एक प्रकारचे स्वयंचलित जगणे आता मान्य आहे. आपले मन जे जसे घडले असेल त्यातून आपापला वेग पकडा आणि यशस्वी व्हा ! बरे, आता या बिंदूवर यश परिपूर्ण झाले असे काही नसतेच, त्यामुळे, कंटिन्यू ! या पार्श्वभूमीवर तुलनेने वा एकूणच मद्दड व्यक्तींनी काय करावे ? पुढे जाणाऱ्यांतली आणि मागे राहणाऱ्यांतली विषमता कशी मिटवावी ? की मागे पडणाऱ्यांनी अणुतंत्रज्ञान हस्तगत करून त्याचा पुढे जाणाऱ्यांवर वापर करावा ? एका एका माणसाचे जगणे वेगवेगळे दिसत असले तरी वस्तुतः पूर्ण मानवजातच असे जगत असून आतल्या आत विद्ध होत आहे. वखवखत आहे. तडफडत आहे. आणि त्याचबरोबर ती नष्टही होत आहे, असे म्हटले तर चूक ठरेल ? हिंसा, यश, एकाकीपणा, विषमता, भीती हे सगळे सुटेसुटे वेगवेगळे प्रश्न आहेत ?

## भ्रष्टाचार आणि विषण्णता

आर्थिक भ्रष्टाचार, नैतिक भ्रष्टाचार, वैचारिक भ्रष्टाचार, धार्मिक भ्रष्टाचार यांत सर्वात हानिकारक कुठला ? प्रत्येक क्षेत्रातले आदर्श, पावित्र्याच्या कल्पना वेगवेगळ्या असल्यामुळे ठिकठिकाणचे भ्रष्ट होणे वेगवेगळे असते की भ्रष्ट होणे याचा अर्थ सगळीकडे एकच असतो ? राजकारणातला भ्रष्टाचार, शिक्षण क्षेत्रातला भ्रष्टाचार, कलेतला भ्रष्टाचार, आरोग्य क्षेत्रातला भ्रष्टाचार, संरक्षण खात्यातला भ्रष्टाचार, महसूल खात्यातला भ्रष्टाचार – असे भ्रष्टाचाराचे वेगवेगळे प्रकार असतात का ? की भ्रष्टाचार एकच असतो ? प्रत्येक भ्रष्टाचार जर वेगवेगळा असेल आणि भ्रष्टाचाराचे असे अगणित प्रकार असतील तर त्यांच्या निराकरणाचेही हजारो मार्ग असतील ! आणि भ्रष्टाचार म्हणजे एकच काही असेल तर याचे केंद्र कुठे असेल ? – हे असे कोणतेही प्रश्न समोर येऊ देणे हे खरे तर निरुपयोगीच आहे. पैसे कमवायला याचा काय उपयोग आहे ? आपल्या स्वतःच्या फायद्याचे यात काहीच नाही. त्यामुळे, हे सगळे चालू राहणे, हे वाईट आहे असे वाटत राहणे आणि सगळ्यांचीच नुसती तडफड होत राहणे, एवढेच ठीक आहे म्हणून दुर्लक्ष करणेच बरे पडते. त्यामुळे, एक सततचा असा विषण्णतेचा स्रोत मनत वाहात राहतो. या परिस्थितीच्या बाबतीत कोण काय करणार ? कुठे कुठे बक्षिसे, शिक्षा वगैरे दिसते. ते काय व्हायचे ते होईल, पण यात निरर्थक वेळ घालवण्यात काही अर्थ नाही. या विषण्णतेने एकाकीपणा वाढला किंवा इतर काही मानसिक त्रास उद्भवला तर मानसोपचार तज्ञाकडे जाता येईल. औषधे घेता येतील. त्यालाही पैसा लागेल. त्यामुळे, डोंट वेस्ट टाईम ! काम करा, मिळवा, थका, उत्साही व्हा, ट्रिपला जा, देशविदेश फिरा, रात्रीच्या वेळी अत्यंत सुखद प्रकाशयोजनेत शांत बसा किंवा शांतपणे दारू पीत बसा. आणि मग झोपा. पुन्हा सकाळ होईलच. पक्ष्यांच्या आवाजाने  जागे होऊ शकलात तर फारच बरे !

उत्सव आणि दुःख

उत्सव आणि इतर असंख्य प्रसंग साजरे करण्याचे इतके अगणित प्रकार पाहिले की वाटते, एकूण माणसांना काही कामधामच नाही, यांच्याकडे खूप पैसा आहे आणि हे मजेत आहेत, बास ! नवे कपडे, अत्तरे, रोषणाई, रांगोळ्या, पताका, झेंडे, देखावे, फटाके, दारू, नाच, गाणी, पार्ट्या, वाह ! निरनिराळ्या घटना आणि बातम्या ! अरे वा, काय आनंद, अरे वा, काय आनंद ! सर्वत्र हेच ! एक साहित्यिक म्हणताहेत की आपण आनंदी राहायचे ठरवले तर तसे राहता येते ! ठरवून टाका न काय मग ! दुसरे एकजण म्हणताहेत, जगात  दुःखी लोक आहेत हो, आम्ही स्वतःही काय कमी दुःखी आहोत ? पण तेच काय उगाळत बसायचे ! फरगेट इट ! क्लब्स, पार्ट्या, काही रिस्की खेळ हे सर्व हवेच ! नाही तर काय, लाईफ म्हणजे काय, फक्त ओन्ली वर्क अँड नो प्ले ? असे तर असू शकत नाही ! बोअरिंग होईल सगळे ! तुम्ही आयफेल टॉवर नाही बघितला अजून ? मी बघितला ! ट्रिमेंडस ! इट इज ऍन आर्किटेक्चरल मार्व्हेल ! अहो, मी अजून ताजमहालही नाही बघितला ! बघा, बघा, असे निराश आणि उदास नका राहू ! यू विल एंजॉय इट ! हे सगळे तयार करण्यात माणसाचे किती परिश्रम, किती प्रतिभा लागलेली आहे ! आपण बघावे, एंजॉय करावे  यासाठीच आहे हे सगळे ! नाही तर कोण कशाला एवढे करत बसले असते ? अहो, फटाके हे उडवण्यासाठीच असतात ! सिंपल ! लोक म्हणतात माणूस दुःख तयार करतो, ठीक आहे ना ! त्याचबरोबर सुख आणि आनंदही तयार करायची कुवत आहे माणसात ! तो नुसता दुःख, दुःख करत बसत नाही ! ही नोज हाऊ टु बॅलन्स, हाऊ टु लिव्ह ! दुःख आणि सुख असे वेगवेगळे ठेवायचे, म्हणजे झाले !

शक्य आणि अशक्य

हे एवढे मोठे जंजाळ --  प्रश्न, ताण, संघर्ष यांचे – रोज वाढत जाणारे, अधिकाधिक जटिल होत जाणारे – सुटणार

कसे ? माणसाकडे असणारे साधन म्हणजे विचार – बुद्धी. या साधनाचा वापर तर टप्प्याटप्प्याने आणि विश्लेषणात्मक पद्धतीनेच करता येतो. माझा मेंदू आहे असा होण्यासाठी हजारो वर्षांची उत्क्रांती, हजारो घटना, अनुभव हे सगळेच कारणीभूत झालेले असणार. आताही असंख्य गोष्टींचे एकमेकांवर परिणाम होणे आणि त्या सगळ्यांचे माझ्यावर परिणाम होणे, असे चालूच असणार आहे. हे सगळे स्वयंचलित बोंबलत चालले आहे, असेही जाणवू शकते. विचाराने हे समजून घ्यायला किती काळ लागेल ? एकेक परिणाम समजून घेईपर्यंत आणखी असंख्य गोष्टी घडतच राहणार नाहीत का ? म्हणजे, विचाराच्या, बुद्धीच्या मार्गाने या अवस्थेचे निराकरण अशक्य दिसते. इथे विचार म्हणणार, निराकरण हवेच कशाला ? आहे हेच नॉर्मल धरून, यातूनच मार्ग काढत, प्रगती करत आपण चालले पाहिजे ! आपण आशावादी राहिले पाहिजे ! आता विचाराचा हा आशावाद म्हणजे निराशावादच म्हणायला लागतो ! कारण, विकृती, ताण, दुःख, हिंसा, भीती हे सगळे गृहीत कसे धरणार ? नॉर्मल कसे समजणार ? विकृतीतून घडणाऱ्या कृती या विकृतच असणार नाहीत का ? हे सगळे असेच वाढत जाणार, हे गृहीत धरण्यात आशावाद कसला ? म्हणजे झाले तर एका क्षणात याचे निराकरण झाले पाहिजे ! ते मुळीच शक्य नाही, हे आपली बुद्धी तात्काळ सांगून टाकणार ! कोणतीही संस्कृती, कोणतीही अस्मिता या स्थितीपुढे हातच टेकणार ! म्हणजे काय, मग माणसाने स्वतःवरच अणुबॉंब टाकून घ्यावा ? ही पृथ्वीच नष्ट करावी ? डोळे उघडून पाहिले तर आपण त्याच दिशेने चाललो आहोत हे दिसते. हे असे जगणे आणि फक्त असेच जगणे शक्य आहे आणि दुसरे काहीच शक्य नाही, या निष्कर्षाचे आव्हान पेलतच जगायला हवे का ?

तथाकथित सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक अशा प्रश्नांच्या अंगाने मानवी जगण्यावर विचार करणारे / मांडणारे आपण पाहिले. त्याचबरोबर एका एका व्यक्तीच्या मनाचेही काय चालले आहे, तेही पाहिले. वस्तुतः या दोन वेगवेगळ्या गोष्टी नाहीतच. हे सगळेच एकमेकांवर परिणाम करणारे असून या सर्वच घडामोडींकडे एकत्रितपणेच पाहिले पाहिजे. आंतरद्वंद्वे, वैचारिक फाटे, मतभेद आणि समूहागणिक आदर्शांचे असंख्य प्रकार यांनी एकूणात माणसाचे जगणे भरलेले दिसते. आपापली दुःखे, संघर्ष, स्वप्ने यांत सगळे व्यग्र दिसतात. मनाला एक कट्टरपणा-रिजिडिटी-मर्यादितपणा आणणे हा जर मृत्यू असेल आणि मनाचा तरलपणा-संवेदनशीलता-समावेशकता जर जिवंतपणाचे लक्षण असेल तर सध्या भरपूर माणसे आत्महत्येच्या दिशेने जात आहेत, असे म्हणता येते. अनेक प्रकारच्या व्यग्रता दिसून येतात. जणू आपल्यापुरते आखूड होत आलेले डोके पाहता, सगळे जगणे बेशुद्धीतच चालल्याचे दिसते. जणू आपोआप आणि स्वयंचलित ! भरकटलेपण, गोंधळ, दुःख यांचे असणे हे आयुष्य थांबवणारेच ठरते कारण जगण्याचा खूप मोठा आवाका त्यात रद्दच होतो. जणू आभासी जगणे चालू राहते. जागतिकीकरणानंतरच्या आर्थिक क्षेत्राला कसे आभासी रूप आले आहे, त्याबाबतचा हा मजकूर पाहा. हा मजकूर Fritjof Capra यांच्या ‘ The Hidden Connections ‘ या पुस्तकातून घेतलेला आहे ( अनुवाद माझा ) –-

नव्वदीच्या मध्यात वर्ल्ड ट्रेड सेंटर ( W. T. O. ) ची स्थापना झाली. त्याबरोबरच आर्थिक जागतिकीकरण आले. त्याचे मुख्य वैशिष्ट्य होते ‘ मुक्त व्यापार. ‘ अनेक आघाडीचे उद्योगपती आणि राजकीय पुढारी यांनी त्याचे स्वागत केले. ही नवीन व्यवस्था जगातल्या सर्व राष्ट्रांना फायद्याची ठरेल, जगभर आर्थिक व्यवहारांचा प्रसार होईल आणि त्यांतून निर्माण होणारी संपत्ती सगळ्यांपर्यंत झिरपेल, असे त्यांना वाटत होते. परंतु, अधिकाधिक पर्यावरणवादी आणि तळागाळातले कार्यकर्ते यांच्या लौकरच हे लक्षात आले की नव्याने अंमलात आलेले हे नियम टिकू शकणारे नाहीत. कारण त्यांच्यामुळे, गुंतागुंतीचे अंतर्गत संबंध असलेले असंख्य परिणाम घडू लागले होते. सामाजिक विभाजन, लोकशाही मोडकळीला येणे,

वाढत्या वेगाने आणि मोठ्या प्रमाणात होणारा पर्यावरणनाश, नव्या रोगांचा प्रसार आणि त्याचबरोबर वाढती गरिबी आणि परात्मता – हे ते परिणाम होते. (   – page – 113. )

त्याच पुस्तकात कॅप्राने मॅन्युएल कॅस्टेल या लेखकाचा एक उतारा दिला आहे. संगणकांमुळे आर्थिक व्यवहार कसे गुणात्मक वा आभासी सत्यात रूपांतरित झाले त्याचे इथे वर्णन आहे. " तेच तेच भांडवल काही तासामिनिटांतच काय पण काही सेकंदांतही निरनिराळ्या अर्थव्यवस्थांमध्ये फिरवता येऊ लागले. अनियंत्रितता आणि स्थानिक बाजारपेठांतल्या प्रवेशांच्या अनुकूलतेमुळे, जबरदस्त पॉवरफुल संगणक कार्यप्रणालींच्या मदतीने, जगातल्या टेलेकम्युनिकेशन सेंटर्सवर बसलेले कुशल आर्थिक विश्लेषक / संगणकजादुगार  अक्षरशः करोडो डॉलर्सचे खेळ खेळू लागले ! हे जागतिक जुगारी कुणी ऐरेगैरे खिलाडी नव्हते तर निवडक गुंतवणूक बँका, पेन्शन फंडस, आंतरराष्ट्रीय कंपन्या आणि हेतूपूर्वक केल्या जाणाऱ्या उलथापालथींसाठीच उभारलेले म्युचुअल फंडस – हे सगळे यामागे होते ! "

याचा परिणाम कसा सांगितला आहे पाहा – "  परिणामस्वरूप अशी ही अर्थव्यवस्था आता इतकी गुंतागुंतीची आणि खळबळती झाली आहे की  पारंपरिक परिभाषेत तिचे विश्लेषण करताच येणार नाही. " कॅप्राच्यच पुस्तकात उल्लेखल्याप्रमाणे एक तज्ञ अधिकारी म्हणतो की ही यंत्रणा कशी चालते तेच आम्हाला नीट समजत नाही.

दुसऱ्या एका ठिकाणी कॅप्रा म्हणतो ( पृ. १२१ ) " इलेक्ट्रॉनिक्सवर चालणाऱ्या या जागतिक जुगार अड्ड्यांतले आर्थिक प्रवाह कोणत्याही बाजार-तर्कावर चालत नाहीत. इथे सगळा खेळ चालतो तो संगणकसंचलित गुंतवणूक-डावपेच, जगातल्या कुठल्याही भागात घडणाऱ्या राजकीय घडामोडी आणि सगळ्यांत प्रभावी म्हणजे कुठल्याही एकरेषीय बुद्धिगम्य पद्धतीने न चालणारे आणि गुंतागुंतीच्या क्रियाप्रतिक्रियांतून येणारे भांडवल प्रवाह, यांच्यावर ! या फार मोठ्या प्रमाणावर अनियंत्रित असलेल्या खळबळी, पारंपरिक मागणी-पुरवठा तत्त्वाइतक्याच, किंमती ठरवण्यात आणि बाजाराचे कल ठरवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

"पैसा हा आता उत्पादन आणि सेवा यांच्या बंधनात राहिलेला नसून तो इलेक्ट्रॉनिक नेटवर्कमधले गुणात्मक वा आभासी सत्य झालेला आहे. " ( पृ. १२४ ).

या सगळ्या प्रकारांमुळे आर्थिक घडामोडींवर नियंत्रण ठेवण्याचे पारंपरिक मार्ग निरुपयोगी ठरत चाललेले आहेत. एकूण जगणेच अराजकाच्या मार्गाने चालल्यावर दुसरे काय होणार ? आणि आता इथे जे. कृष्णमूर्तींच्या मुलाखतीतला मी अनुवादित केलेला काही भाग देणे इष्ट वाटते –

' The Future Of Humanity – A conversation  '  ( Published by Krishnamurti Foundation, India. ) हे पुस्तक म्हणजे प्रख्यात वैज्ञानिक डेव्हिड बोहम यांनी जे. कृष्णमूर्ती यांची घेतलेली एक दीर्घ मुलाखत आहे. त्यात जेके हे स्पष्ट करतात की वस्तुतः माणसाचे भान – त्याची एकूण जाणीव – एकच आहे, पण ते भान प्रत्येकाचे वेगळे आणि स्वतंत्र आहे असे कल्पिल्यामुळे घोळ होतो आहे. व्यक्तिवादाची कल्पना भ्रामक असल्याचे इथे जेके सांगतात. यानंतरची त्यांची चर्चा उद्बोधक असून त्या दोन-तीन पानांचा मी केलेला अनुवाद पुढे देत आहे. ( पृष्ठ ४७ ते ५१. )

डीबी – या ना त्या प्रकारे मानवी भानाने स्वतःची विभागणी केलेली आहे, खरे तर एकूणात ते एकच आहे पण विचारक्रियेने त्याने स्वतःचे विभाजन केलेले आहे. आणि त्यामुळेच आपण या स्थितीला पोचलो आहोत.
जेके – तेच तर ! मानवजातीला असलेले सध्याचे सगळे प्रश्न, मग ते मानसिक असोत वा इतर, सगळे विचारक्रियेमुळे निर्माण झालेले आहेत. आणि आपण विचाराची तीच ती पद्धत वापरत राहिलो आहोत. आणि ही विचारक्रिया माणसाचे यातले कुठलेच प्रश्न सोडवू शकणार नाही. त्यामुळे आता एक वेगळे साधन दिसते, ते म्हणजे आकलनप्रवाह.
डीबी -- हं, इथे आता एक वेगळाच विषय समोर येतो आहे. याचबरोबर तुम्ही प्रेम आणि करुणा यांचाही उल्लेख केला होतात.
जेके – प्रेम आणि करुणा यांच्याशिवाय आकलनप्रवाह असूच शकत नाही. आणि तुम्ही एखाद्या धर्माचे बांधील असाल तर तुमच्याकडे करुणा असू शकत नाही. म्हणजे दाव्याने एखादे जनावर एखाद्या खांबाला बांधलेले असावे तसे – धर्मबांधील.
डीबी – होय, अहं ला धोका येताच तो हे समजूच नाही शकत की –
जेके -- लक्षात घ्या, अहं हा लगेच कशाच्या तरी मागे दडायचा प्रयत्न करतो –
डीबी – इतर गोष्टींच्या मागे, म्हणजे उदाहरणार्थ, उदात्त आदर्श.
जेके – होय, स्वतःला दडवण्याची त्याच्याकडे प्रचंड ताकद असते. तर काय आहे मग मानवाचे भवितव्य ? जे दिसते त्यावरून हे सगळे विनाशाकडे चालल्याचे दिसते.
डीबी – होय, तसेच दिसते.
जेके – अत्यंत अंधकारमय, निराशाजनक आणि धोक्याचे. एखाद्याला मुले असतील तर काय आहे त्यांचा भविष्यकाळ ? या सगळ्यांत प्रवेश करणे ? आणि मग त्यातल्या दुःखपरंपरेतून जात राहणे ? त्यामुळे, शिक्षण ही अतिमहत्त्वाची गोष्ट ठरते. पण सध्या शिक्षण म्हणजे फक्त माहिती साठवणे, असे झाले आहे.
डीबी – माणसाने शोधलेले वा बनवलेले प्रत्येक साधन हे त्याला विनाशाच्या दिशेकडेच नेते आहे.
जेके – अगदी खरे आहे. ते निसर्गाचा नाश करताहेत. आता खूपच कमी वाघ शिल्लक आहेत.
डीबी – ते जंगले आणि शेतजमिनी यांचाही नाश करताहेत.
जेके – कुणाला कसली काळजीच नाही, असे दिसते.
डीबी – हं, आणि बहुसंख्य लोक स्वतःला वाचवण्याच्या योजनांत मश्गूल दिसतात, पण काही दुसरे लोक मानवजातीला वाचवण्याच्या योजना आखत असतात. आणि मला असेही वाटते की हे जे काही चाललंय त्यात निराशेकडे कल असणे हे अध्याहृतच आहे, कारण यात फारसे काही करण्यासारखे आहे, असे कुणाला वाटतच नाही.
जेके – होय. आणि वाटलेच समजा त्यांना की काही करता येईल तर ते काही छोटे गट स्थापन करतात आणि काही किरकोळ प्रणाली काढतात.
डीबी – काहींना आपण जे काय करतोय त्याबद्दल खूप आत्मविश्वास असतो –
जेके – बहुतेक पंतप्रधानांना असा खूप आत्मविश्वास असतो. वस्तुतः आपण काय करतोय हे त्यांना कवडीचे काही कळत नसते.
डीबी – होय, पण त्याचबरोबर खूप लोकांना ते काय करतायत त्याबद्दल मुळीच विश्वास नसतो.
जेके – तेही आहेच. आणि एखादा जर का प्रचंड आत्मविश्वास असलेला दिसला तर मी लगेच त्याचा तो आत्मविश्वास मान्य करतो आणि त्याच्या मागे जायला तयार होतो. असो. तर काय आहे माणसाचे भवितव्य ? मला नाही वाटत, याचे कुणाला काही पडलेय. की प्रत्येक माणूस, प्रत्येक गट हा फक्त स्वतःच्या जीवरक्षणाचाच विचार करतोय ?

डीबी – मला तर असेच दिसते की स्वतःचे वा आपल्या गटाचे जीवरक्षण हेच प्रत्येकाला आपले आद्य कर्तव्य वाटते. तोच माणसाचा इतिहास राहिलेला आहे.

जेके – त्यामुळे, सततची युद्धे आणि सततची असुरक्षितता.

डीबी – होय, आणि तुम्ही म्हटल्याप्रमाणे, स्वतःच्या अहंचे स्वतःच्या गटाशी वगैरे तादात्म्य मानण्याची ही घोडचूक माणसाच्या अपूर्ण असलेल्या विचारक्रियेकडून घडते आणि घडत राहते.

जेके – आता तुम्ही हे सगळे ऐकून घेताय. तुम्हाला हे पटतेही आहे आणि तुम्हाला यातले सत्यही दिसतेय. सत्तेत असलेले लोक हे ऐकूनही घेणार नाहीत.

डीबी – नाहीच.

जेके – ते अधिकाधिक दुःखाची निर्मिती करत राहतात. जग अधिकाधिक धोक्याचे होत चाललेले आहे. आपण एखादी गोष्ट सत्य असल्याचे पाहण्याचा उपयोग काय ? आणि त्याची परिणती काय ?

डीबी – मला वाटते, आपण जर परिणतीचा विचार करू लागलो तर पुन्हा आपण या सगळ्याला जबाबदार असलेल्या मानसिक काळाच्या कल्पनेकडेच येऊ. आणि याला मग प्रतिसाद असाच असणार की सत्वर उभे राहा आणि हा घटनाक्रम बदलण्यासाठी कोणत्या ना कोणत्या कामाला लागा.

जेके – आणि त्यासाठी एखादी सोसायटी, प्रतिष्ठान वा संघटना स्थापन करा आणि तत्सम काही करत राहा.

डीबी – पण हे पाहा की इथे चूक ही घडते की आम्ही कशाबद्दल तरी विचार केलाच पाहिजे असे आम्हाला वाटते. जरी तो विचार अपुरा असला तरी. काय घडतेय हे खरोखर आम्हाला कळतच नाही, पण अनेकांनी तर त्याच्या प्रणाली बनवल्या आहेत, त्यांनाही त्यातले काही न कळताच.

जेके – ठीक, तो परिणतीचा प्रश्न जरी चुकीचा असला तरी एक माणूस म्हणून, म्हणजेच पूर्ण मानवजात म्हणून माझी जबाबदारी काय ? परिणती वगैरे सोडूनही ?

डीबी – होय, परिणामांकडे आपल्याला पाहून चालणारच नाही. पण प्रकार तोच होतो – ‘अ’ ला दिसते आणि ‘ब’ ला नाही दिसत.

जेके – बरोबर.

डीबी – आता समजा ‘अ’ ला काही दिसते आणि उरलेल्यांतल्या बहुसंख्यांना ते दिसत नाही. अशा परिस्थितीत असेच म्हणावे लागेल की मानवजात स्वप्नात आहे, झोपेत आहे.

जेके – ती भ्रमव्यग्र आहे.

डीबी – भ्रम. आणि मुद्दा असा आहे की एखाद्याला काही दिसले तर ज्यांना ते दिसलेले नाही त्यांना भ्रमातून जागे व्हायला मदत करण्याची जबाबदारी त्याच्यावर येते.

जेके – अगदी बरोबर. हीच तर समस्या राहात आलेली आहे. याचसाठी बुद्ध लोकांनी बोधिसत्त्वाची कल्पना सादर केलेली आहे. तो करुणेचा अर्कच आहे आणि तो जणू मानवजातीला वाचवण्याचीच कामगिरी करणार आहे. ऐकायला हे छान वाटते. ही समाधानकारक गोष्ट आहे की कुणीतरी हे करणार आहे. पण आपण मात्र, प्रत्यक्षात, मानसिक व शारीरिक दृष्ट्या सुखकारक नसलेले, समाधानकारक नसलेले आणि सुरक्षित नसलेले असे काहीच करणार नाही.

डीबी – तेच तर भ्रमाचे मूळ आहे.

जेके – दुसऱ्यांच्या हे लक्षात यावे यासाठी काय करणार ? त्यांना वेळ नाही, त्यांना शक्ती नाही, कशाला, त्यांचा तिकडे कलही नाही. त्यांना करमणूक हवी आहे. एखाद्या ‘क्ष’ ला हे सगळे इतक्या स्पष्टपणे पाहायला कसे भाग पाडता येईल, की

तो म्हणेल, " ठीक, आले लक्षात. मी कृती करीन. आणि मला समजतेय की मी जबाबदार आहे " वगैरे. आणि मला वाटते की पाहणारे आणि न पाहणारे यांची हीच आहे शोकांतिका.
( ब्रॉकवुड पार्क, इंग्लंड, ११ जून १९८३. )

प्रगती, सुखे यांबरोबरच प्रश्न, संकटे आणि धास्तीही आहे. माणसाच्या ज्ञात माहितीपासून आत्तापर्यंत पाहिले तर चमत्कार वाटावा अशी प्रगती आहे. माणसाची बुद्धी, हुशारी, माहितीचा संचय आणि या सगळ्याचा वापर करण्याची अचाट कुवत, हे पाहून, दुसरे कोण, कुठलाही माणूसच स्तिमित होईल. अनेक शास्त्रे, अनेक कला आणि तत्त्वज्ञान यांच्यांत माणसाने पादाक्रांत केलेला प्रदेश महाप्रचंड म्हणावा इतका आहे. हा प्रदेश हातचा जाऊ नये यासाठी विशेष प्रयत्न करायला हवेत, असेही विचार आता सुरू आहेत. पण कल्पनेच्या आधारे यापुढे काय काय होऊ शकेल याचा विचार केला तर सध्या हातात असलेले नगण्य ठरेल, असेही म्हणता येईल. माणसाची सगळी कामे रोबोंनी परस्पर करणे, रोबोदुरुस्ती वा नवी रोबोनिर्मितीही रोबोंनीच करणे, माणसाच्या अन्नाचे शेतीऐवजी कारखान्यांतून उत्पादन होणे, रोगराई नष्ट होणे, अशा असंख्य कल्पना करणे शक्य असून त्यांना आता कुणीच मूर्खाचे नंदनवन म्हणू शकणार नाही. माणसाच्या मेंदूच्या क्षमतांमधूनच हे सर्व निर्माण होणार आणि नंतर कामाची सवय न राहिल्याने हे सर्व ज्ञान नष्ट तर होणार नाही, असाही काल्पनिक प्रश्न विचारावा, अशी परिस्थिती आहे. आणि हे सगळे असूनही माणासाला शहाणपण आले आहे का, असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर नकारार्थीच द्यावे लागते. नुसती राष्ट्रेच नव्हे तर व्यक्ती वा समूहही ही पृथ्वी नष्ट करण्याची क्षमता हासिल करताहेत वा बाळगून आहेत. कुणाचेही डोके कधीच फिरणार नाही, अशी खात्री कुणीच देऊ शकणार नाही. अस्मितेने वा द्वेषाने केल्या जाणाऱ्या कृतींबरोबरच दूरदृष्टीच्या अभावामुळेही पृथ्वीसाठी खूप मोठे धोके तयार होत आहेत. पर्यावरण, पाणी, जमिनीचा कस, या सर्वांबाबतचे प्रश्न गंभीर रूप धारण करू लागलेले आहेत. सेक्स, व्यसने, हिंसा, चोरटा व्यापार, काळा पैसा, भ्रष्टाचार, अत्याचार, छळ, गुन्हेगारी, विषमता, बेकारी, सांस्कृतिक-धार्मिक असुरक्षितता, वर्चस्वाचे प्रयत्न, असे असंख्य प्रश्न समोर आहेत. हजारो वर्षांत साध्य केलेली प्रगती, मिळवलेले ज्ञान या सगळ्याची एका क्षणात राखरांगोळी करता येईल, अशा पराक्रमी अवस्थेत माणूस सध्या आहे. बाकी सगळे छान असले तरी या अवस्थेला शहाणपण म्हणता येत नाही. शहाणपणाच्या दिशेने लौकर न गेल्यास हे कधीही बरबाद होऊ शकते, हे स्पष्ट आहे.

मग काय आहे शहाणपणाची शक्यता ? कोण, कसे मिळवू शकेल ते ? बारा वर्षे हिमालयात तपश्चर्या करून हे मिळवता येईल का ? की आहे याच बुद्धीने एखादे अशा शहाणपणाचे इंजेक्शन शोधून काढता येईल ? बाकी सगळे तसे वागणार मग मीच एकटा शहाणा होऊन असा का वागू ? आणि उपयोग काय त्याचा ? मीच एकटा अहिंसक झालो तर दुसरे लोक हिंसकपणे वागून माझे सगळे हिरावून घेणार नाहीत ? मला संरक्षणाची सोय नको ? ' मी आधी शहाणा होईन आणि मग सगळ्यांना मी शहाणपण देईन ' असे म्हणणे, हा सध्याच्या मनाच्या सवयीचाच भाग असणार नाही ? स्वतःला महत्त्व मिळवण्याच्या ? असे सगळे प्रश्न यात येतील. या प्रश्नांची कल्पना अर्थातच सध्याची बुद्धी आणि विचारच करेल.

एक स्पष्ट दिसते की माणसाची बुद्धी या सर्व प्रश्नांना एकामागोमाग एक असेही सोडवणे शक्य नाही आणि एका दृष्टिक्षेपात यांना नष्ट करणेही शक्य नाही. जगाचे जाऊ दे, मला माझ्या एखाद्या प्रश्नाची तरी तातडी, महत्त्व वाटतेय का ? माणसाच्या बुद्धीने ठरवून, आराखडा तयार करून हे होणार नाही. बुद्धी आणि विचार यांची कामाची पद्धतच एकरेषीय,

विश्लेषणात्मक आणि मर्यादित आहे. त्यामुळेच तर एवढी वर्षे माणूस शहाणपणहीन राहिला आहे, असे दिसते. म्हणूनच ' माझ्या जगण्याच्या पद्धतीत झाला समजा बदल तरी काय उपयोग आहे त्याचा ? मला वा जगाला ? ' -- या बौद्धिक प्रश्नालाही काही अर्थ राहात नाही. म्हणजेच ज्या व्यक्तीला या प्रश्नांची तातडी वाटत असेल त्या व्यक्तीने सुरक्षेच्या, भीतीच्या, उपयुक्ततेच्या अशा बौद्धिक प्रश्नांना नाकारावे लागेल. आणखी एक अत्यंत अडथळ्याचा ठरू शकणारा विचार म्हणजे कृष्ण कुठे, बुद्ध कुठे, ज्ञानेश्वर कुठे, तुकाराम कुठे – आणि माझी लायकी ती काय ? त्यांच्या नखाचीही सर मला नाही – हा तो विचार. तीच तौलनिक बौद्धिक करामत करून टाळाटाळीला प्रोत्साहन देणारा. बाकीचे काय करताहेत हे न पाहता मी या प्रश्नांचे महत्त्व ओळखणे हाच मार्ग आहे. कुणीतरी परस्पर शहाणपणाने वागेल आणि हे सगळे नीट होईल, हा भ्रम आहे, हे आधी लक्षात घेतले पाहिजे. असा तारणहार यावा असे वाटणे म्हणजे आपण आपली जबाबदारी टाळणेच आहे. अमेरिकेचे अध्यक्ष असो किंवा दुसरे कुणीही असो, त्यांच्या जगण्या-वागण्यावर माझा काहीच ताबा चालू शकत नाही. बुद्धीने आणि अनुभवाने येणारे तथाकथित शहाणपण कुचकामी ठरते, हे तर स्पष्ट आहे. मग शहाणपण म्हणजे काय ? याचा शोध कोण घेणार ? ' मी स्वतः ' या प्रश्नाची जबाबदारी घेणे हा एकच मार्ग आहे. तीच माणसाच्या शहाणपणाची सुरुवात असू शकते. तुकारामाने ' एकविध मन ' ( मनाची एकात्मता ) असलेले अस्तित्व प्रत्येकाला समजणे शक्य आहे, असे म्हटलेले आहे. हे समजून घेण्याच्या बाबतीत कोणत्याही कारणाने मी टाळाटाळ करणार असेन तर ' शहाणपणाची ' शक्यताच नाही, हे स्पष्ट आहे.

इथे अत्यंत प्रस्तुत असलेल्या खालील अर्थपूर्ण ओळींनी थांबू –

जगात शांतता असायला हवी असेल
तर राष्ट्रांत शांतता असायला हवी
राष्ट्रांत शांतता असायला हवी असेल
तर गावांत शांतता असायला हवी
गावांत शांतता असायला हवी असेल
तर शेजाऱ्याशेजाऱ्यांत शांतता असायला हवी
शेजाऱ्याशेजाऱ्यांत शांतता असायला हवी असेल
तर घरात शांतता असायला हवी
घरात शांतता असायला हवी असेल
तर हृदयात शांतता असायला हवी
-- लाओ त्झु.
--- ००० ---

मराठी नाटकाचे गुणदोष

गो. पु. देशपांडे यांच्या अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक बीजभाषणावर बोलण्यापूर्वी माझी भूमिका स्पष्ट करतो. आणि ' भूमिके ' पासून सुरुवात करणे एकूणात कलाक्षेत्रात अपेक्षितच असल्याने, तेही काम होऊन जाईल. बीएला माझे भाषाविषय होते, त्या वेळी वाङ्मयाच्या अभ्यासाला थोडी शिस्त होती. नंतर बँकेत नोकरीला लागलो आणि अठ्ठावीस वर्षे तिथे नोकरी केली. तिथले काम करून मग उरल्यासुरल्या एनर्जीत लेखन-वाचन करत आलो. शिस्त राहिली नाही. त्यामुळे, या क्षेत्रातला समीक्षक वा विचारवंत अशी भूमिका मी घेऊ शकत नाही. पण वीस एकांकिका आणि वीस नाटके लिहिलेली असल्याने, एक नाट्यलेखक ही भूमिका मला ठीक आहे. त्या भूमिकेतूनच मी इथे आपल्याशी संवाद साधत आहे. गोपूंच्या भाषणावर बोलायचे असल्याने, मी विचारवंत नसूनही मला वैचारिक बोलावे लागणार आहे, त्याबद्दल आधीच क्षमा मागून ठेवतो. गोपू म्हणतात, समाजविज्ञानाचा अभ्यास असला पाहिजे, आणखी कुणी म्हणतात की मानववंशशास्त्र तर पाहिजेच, तिसरे म्हणतात, अहो, मानसशास्त्राशिवाय नाटकाचे पान तरी हलू शकेल का ? यांतले काही किरकोळ वाचन कधीमधी झालेले असले तरी मी या क्षेत्रांचा अभ्यासक नाही. आणखीही खूप क्षेत्रांचा मी अभ्यासक नाही. एक माणूस -- एक मत, या पद्धतीने आणि अधिकाराने मी या क्षेत्रात कार्यरत आहे.

मध्यंतरी मी ' विद्वत्तेच्या कविता ' या नावाने बऱ्याच कविता लिहिल्या होत्या. त्यांतली एक छोटी कविता अशी आहे : --

मार्क्सिझम समजला की  
कम्युनिझम आपोआप समजेल –  
पुढे वर्षभर इतर इझम्सही बघू –

धर्मांचा तौलनिक अभ्यास,
थोडेफार आधुनिक सायन्स,
आणि भारतातल्या कादंबऱ्या

हेही विषय मनात आहेत ...
उद्यापासून ...

तर हे आणि असे खूप काही ' उद्यापासून ' मध्ये ज्यांनी टाकलेले आहे अशांपैकी मी एक आहे. मी कुठल्याच विषयाचा खास अभ्यासक नाही. इतिहास या विषयाबद्दल तर मला घृणाच आहे. आणि शेकडो क्षेत्रांत घडत असलेल्या घटना आणि प्रगती पाहता ' आपण सारे भाऊभाऊ ' असे म्हणायला बरेचजण तयार होतील, असे मला वाटते. पण या बाबतीतला खेद वा खंत व्यक्त करण्यासाठी मी हे बोलत नाही आहे. हे मात्र तुम्ही माझे वैशिष्ट्य म्हणू शकता. खेद-खंत न वाटणे ! अर्थात ही नुसतीच बेफिकिरी, आत्मसंतुष्टपणा किंवा उद्धटपणा नसून याची कारणे मी तुम्हाला सांगणार आहे. याचे मला दिसणारे मुख्य कारण हे आहे की अशा विश्लेषक आणि एकरेषीय पद्धतीने माणसाचे जगणे समजूच शकत नाही, कारण ते हजारो गोष्टींच्या सतत एकमेकांवर होणाऱ्या परिणामांनी आकारत असते. कुणीही डाव्या विचारसरणीचा होण्यात हजारो, लाखो कारणांचा, प्रक्रियांचा हातभार असतो. आता तर असे म्हणताहेत की तुम्ही साधारण कशा प्रकारच्या विचारसरणीचे असणार हे तुमच्या जनुकनकाशावर अवलंबून आहे ! ' विचारसरणी ' हा तसा एक मोठा प्रॉब्लेमच झालेला आहे. जो लेखक एखाद्या परिवर्तनवादी विचारसरणीला बांधील नाही तो स्थितिवादी किंवा शून्यवादी म्हणून हेटाळला जातो आहे. इतिहासाच्या विश्लेषक आकलनावर आधारित असलेली अशी विचारसरणी ही कलेच्या, नाटकाच्या क्षेत्रात अत्यावश्यक बाब मानली जाते आहे. ( हे विश्लेषण ज्याला जसे हवे तसे चालते, म्हणजे, भारताच्या इतिहासात महात्मा गांधींना पाच पाने आणि कम्युनिस्ट चळवळीला पन्नास पाने, असेही चालते ! ) अशी विचारसरणी असली की लेखक आपोआपच परिवर्तनवादी आणि बंडखोरही होतो. पण पिरांदेल्लो, आयनेस्को, बेकेट हे जगन्मान्य नाटककार कोणत्याही परिवर्तनासाठी लिहिणे नाकारत होते. नोबेल पुरस्कार विजेता गाओ झिंगजिआन हा नाटककार-कादंबरीकार काय म्हणतो पाहा -- Literature transcends ideology, national boundaries and racial consciousness in the same way as the individual's existence basically transcends this or that – ism. This is because man's existential condition is superior to any theories or speculations about life. Literature is universal observation on the dilemmas of human existence and nothing is taboo. Restrictions on literature are always externally imposed : politics, society, ethics and customs set out to tailor literature into decorations for their various frameworks. आपाल्याकडचे खानोलकर, एलकुंचवार, आळेकर हे कोणत्या परिवर्तनासाठी लिहीत होते ? हे सगळे स्थितिवादी आणि शून्यवादी ?

तेंडुलकरांच्याबद्दल लिहिताना गोपू म्हणतात, " या प्रचलित मध्यमवर्गीय समाजात अंतिम भूमिका घेताच येत नाही, अशी भूमिका तेंडुलकरांनी घेतली. त्यामुळे हिंसा ही हिंसा असते, मनुष्य हिंसक असतो म्हणजे काय याचा शोध घेण्याचं कारण नाही. मनुष्य हिंस्र असतो हे कळलं की संपलं. हिंस्र का असतो तर माहिती नाही. पण तो हिंस्र असतो हे वास्तव लक्षात ठेवलं पाहिजे, बस्स ! म्हणजे तत्त्वविचार दृष्टिकोनातून घालवून टाकायचा. " सर्व मांडणी

तत्त्वविचार बाजूला ठेवून केली की रणनीतीचा भाग काही राहात नाही – असा आक्षेप गोपू नोंदवतात. पण मला इथे असे विचारावेसे वाटते की माणूस हिंसक असतो म्हणजे काय, याचा शोध तथाकथित परिवर्तनवादी / बुद्धिवादी तरी घेतात का ? घेऊ शकतात का ? याचे स्पष्ट उत्तर ' नाही ' असे आहे. कारण मन वापरण्याची सवयीची पद्धत गृहीत धरली की शोध कसला घेणार ? दुःखाचा शोध म्हणजे दुःखाची व्हरायटी ! विचार ही गोष्ट मर्यादित असते आणि प्रत्येकाची वेगवेगळी असते, हे इथे लक्षात घ्यायला हवे. बुद्धीबद्दल खालील काही मुद्दे विचारात घ्यावे असे आहेत.

मी स्वतः काही तत्त्वज्ञही नाही आणि तर्कज्ञही नाही. जगणे समजण्यासाठी तसे असायची गरजही नाही, हेच तर इथे म्हणायचे आहे. समजण्याच्या शक्यतेतली ही ' समता ' जर खोटी धरली तर कुणालाच काही समजू शकत नाही, असे तर होईलच पण एकूणच मानवजातीचे जगणे म्हणजे कायमस्वरूपी वेड्यांचा बाजारच असणार, असेही गृहीत धरल्यासारखे होईल. ज्ञानेश्वर, तुकाराम यांनी त्यांच्या जगण्यातून आणि लेखनातून ही मूलभूत समताच सिद्ध केली, हे त्यांचे सर्वोच्च महत्त्वाचे कार्य आहे, यात शंका नाही. याच बाबतीतले, काही महत्त्वाचे मुद्दे खाली देत आहे : --

१. माणसाची शारीरिक अवस्था, मेंदूच्या उत्क्रांतीतला टप्पा, मेंदूच्या पेशी, रसायने, त्याची स्मृती, अनुभव, माहिती यांनी बुद्धी ही मर्यादित असते. ती कधीच परिपूर्ण वा अंतिम असू शकत नाही.

२. बुद्धी ही एकरेषीय आणि विश्लेषणात्मक पद्धतीनेच चालू शकत असल्यामुळे ती करोडो कारण-परिणामांचा, कोणत्याही घटनेचा वा वस्तुस्थितीचा एका क्षणात परिपूर्ण आवाका कधीच घेऊ शकत नाही.

३. माहितीने ओव्हरलोड झालेल्या जगात, कोणती माहिती योग्य निष्कर्षापर्यंत पोचण्यासाठी आवश्यक आहे, हे ठरवता येत नाही.

४. बुद्धिवाद्यांतच मतभेद होत असल्याने, बुद्धीने ' आदर्श ' वा ' सत्य ' सापडत नाही हे स्पष्ट होते.

५. बुद्धिवादात मनाचा वापर करण्याची सवयीची पद्धत गृहीत धरावी लागते. त्यामुळे, अलगतावाद, स्वार्थीपणा, महत्त्वाकांक्षा, वर्चस्वाची इच्छा, सुखोपभोगाची हाव, बेफिकिरी, अन्याय, विषमता, क्रूरपणा हे सर्वच गृहीत धरावे लागते. त्यामुळे, बुद्धिवाद म्हणजे निराशावाद असा सारांश निघतो आणि बुद्धिवाद मूल्यहीनही ठरतो.

६. बुद्धिवादाने एका एका गटाचा विचार करता येतो पण पूर्ण मानवजातीच्या हिताचा आवाका घेता येत नाही. त्यामुळे, वेगवेगळ्या गटांनी एकमेकांवर अन्याय करणे, एकमेकांचा छळ करणे, सदोदित विषमतेचीच निर्मिती करणे समर्थनीय ठरते.

७. थोडक्यात, मानवी श्रेयसाच्या दृष्टीने बुद्धिवाद कुचकामी ठरतो.

अलगतावादी मनाने समता आणणे किंवा हिंसक मनाने शांतता आणणे अशक्य आहे, असे इथे म्हणायचे आहे. हे पाहूनच काही लेखकांना मानवी जगण्यातल्या प्रचंड ॲब्सर्डिटीचे दर्शन घडवावे, असे वाटणे सहज शक्य आहे. जगात इतरत्र खूप बदल झाले आहेत, आता तथाकथित आधुनिकतावादाचा प्रभाव राहिलेला नाही. जग जवळ आलेले आहे असे आपण म्हणत असलो तरी उत्तर-आधुनिकतावादाचा वारा मराठीला स्पर्शू शकलेला नाही. इथे अजूनही आधुनिकता, बुद्धी, विवेक यांचीच चलती दिसते. सर्जक लेखनात ही आधुनिकता बरेच लेखक जुमानत नाहीत, असे असले तरी समीक्षक आणि विचारवंत यांची जमात इथल्या सांस्कृतिक प्रवाहाला मोकळेपणाने वाहू न देता, तुंबवत आहे, असे दिसते. गोपू म्हणतात की राजकीय सत्ता गमावलेल्या ब्राम्हण वर्गाने आपली अधिसत्ता निर्माण करण्यासाठी सांस्कृतिक क्षेत्र निवडले आणि मराठीतले पहिले नाटक लिहिले गेले, त्याचप्रमाणे, राजकीय क्षेत्रातून हकालपट्टी झालेल्या लोकांनी मराठीतले सांस्कृतिक क्षेत्र गेली काही वर्षे काबीज करून ठेवलेले आहे की काय, याचेही ऐतिहासिक विश्लेषण व्हायला

हरकत नसावी. त्यामुळे, सध्या तरी, समीक्षक / विचारवंत आणि सर्जक कलावंत यांतली दरी वाढत असल्याचे दिसत आहे. पण कुणी जागे होण्याची शक्यता नाही ! अधिसत्ता कोण सोडणार ? विवेकवादी असले तरी ?

मित्रांनो, माणसाच्या जगण्याचे आकलन बुद्धीने होऊ शकते यावर माझा विश्वासच नसल्याने फार बौद्धिक मेहनतीचे मला महत्त्व वाटत नाही, हे आता तुमच्या लक्षात आले असेलच. मधेच एक गंमत सांगतो. गोपूंचेच ' म्युझिक सिस्टम ' हे नाटक बघायला मी गेलो होतो. नाटक संपल्यावर सगळे पटापट पळून गेलेले मी पाहिले. पण मी मात्र एकटाच गोपूंचे अभिनंदन करायला आत गेलो. त्या वेळी, गोपू मला ओळखत असले तर, त्यांना प्रश्न पडला असणार की सगळे पळून गेले आणि हा एकटाच कसा काय आलाय अभिनंदनाला ? आता खुलासा करून टाकतो. विचारसरणीबिरणी या भानगडीत न पडता गोपू ' भाषा ' या विषयावर नाटक सादर करतायत, असे माझ्या लक्षात आले, म्हणून मी अभिनंदन केले ! हा प्रामाणिकपणाच होता हे कृपया लक्षात घ्या.

गोपूंची माझ्या वाचनात आलेली इतर नाटके म्हणजे, ' रस्ते ', उध्वस्त धर्मशाळा ', आणि ' शेवटचा दिस '. त्यांची बाकीची नाटके मला माहिती नाहीत. गोपूंनाही माझे एखाद दुसरे नाटक माहीत असावे. सगळयांचा सगळा आढावा घेणे शक्यही नसते. शिवाय एकूणातच आम्ही मराठी लेखक, एकमेकांची शून्य माहिती असूनही एकमेकांना प्रेमाने भेटतो, तो प्रश्न नाही. अभ्यास  नाही म्हणून खेद-खंत, समोर आलेल्या लेखकाचे काही वाचलेले नाही म्हणून खेद-खंत, असे करत बसल्यास त्यातच आयुष्य सरून जायचे ! तर ' रस्ते ' मला काही विशेष आवडले नाही. हिंसा जशी असते तसेच वेगवेगळे विचार / पंथ असतात, एवढेच पोचतेय असे वाटले, पण मी ते पुन्हा एकदा वाचणार आहे. ' उध्वस्त धर्मशाळा ' मधला नायक हिंदी पिक्चरच्या हीरोसारखा पाचपंचवीसजणांना सहज बौद्धिक लोळवतो, हे मस्त इंटरेस्टिंग आहे. तरीही तो शेवटी पराभूत व्हावा ही मानवी जगण्यातली ॲब्सर्डिटी म्हणावी का ? पण बाकी विचार करता, ज्यांची अधिसत्ता चालू आहे, ते कुठल्या का विचाराचे असेनात, त्यांनी ती टिकवण्यासाठी प्रयत्नशील असणे आणि आपल्याला ज्यांचा धोका वाटतो त्यांचा बंदोबस्त करणे, ही तर मनुष्यप्राण्यामध्ये पद्धतच आहे, त्याला काय करणार ? मग माणसाला अधिसत्ता टिकवायची एवढी मानसिक गरज का वाटते, असे खोलात जावे लागेल ! ' शेवटच दिस ' ही असेच चांगले नाटक वाटले. ही दोन्ही नाटके मला मानवी संबंधांचीच नाटके वाटली. खास मुद्दाम अशी विचारसरणीची काही मात्र वाटली नाही. त्यामुळे, राजकीय नाटक म्हणा की प्रणालीचे म्हणा, मला ही फक्त सामाजिक, ऐतिहासिक, पौराणिक अशा प्रकारची फक्त एक वर्गवारी वाटते. नाटकाचा कच्चा माल वा माहोल कोणता आहे, एवढेच त्यावरून कळते. सगळी चांगली नाटके ही मानवी संबंधांमधल्या गुंतागुंतीची, तिढ्यांची आणि पवित्र्यांचीच असतात, असे मला दिसते. त्यामुळे, राजकीय नाटक ही काहीतरी विशेष गोष्ट आहे, असे मला वाटत नाही. माहोल कोणताही असू दे, मानवी संबंध कसे पाहिले आहेत हेच कुठल्याही नाटकात महत्त्वाचे असते. आपल्याकडे महायुद्धांचा अनुभव नाही, त्यामुळे, आपली कला खुजीच राहणार, असे काहींना वाटते. कलेतल्या कच्च्या मालावर तिचे मूल्य ठरवायचे म्हटले तर उदाहरणार्थ चांगली कलाकृती ही फक्त दलित, कामगार वा शेतकरी यांच्याकडूनच येऊ शकते, असे होईल. त्याहून भारी कलाकृती या फक्त आफ्रिका खंडातूनच येणार असे होईल. कलाकृतीचा कच्चा माल, विषय, समस्या यांना मूल्यमापनात अतिमहत्त्वाचे स्थान देण्यामुळे लेखकाची चिंतनशीलता मरते आणि मूलभूत प्रश्नांची दखलच न घेणारी एक किरकोळ, उथळ संस्कृती तयार होते. त्यामुळे, राजकीय नाटक असणे-नसणे, हा मला फार महत्त्वाचा मुद्दा वाटत नाही. मानवी संबंधांच्या रचनेचे समग्र भान असण्याची लेखकाची इनसाईट खरे तर महत्त्वाची असते. आणि ती व्यक्त होण्यासाठी अमुकच माहोल आवश्यक असतो, असे काही नाही.

राजकीय नाटकाला विशेष महत्त्व देण्यामागे कदाचित, राजकीय परिवर्तनाने माणसाचे प्रश्न सुटणार आहेत, ही श्रद्धा असावी. पण, राजकीय प्रणाली कुठलीही असली तरी ती अंमलात आणणारे मन किती सडलेले, किती आत्मकेंद्री, किती हिंसक आहे यावरच त्या प्रणालीचे साधकबाधक फळ अवलंबून असते, हे विसरून चालत नाही. मनाचा वापर करायच्या पद्धतीत परिवर्तनाची शक्यता आहे का, असा प्रश्न विचारणे हे अध्यात्मिकतेच्या क्षेत्रात जाते, म्हणजेच ते बुद्धीच्या कार्यकक्षेबाहेर जाते, म्हणून वर्ज्य ठरते. ही अशी बंदिस्त पद्धत पाहता, हे असले परिवर्तनवादी हे ठार निराशावादी असतात असे मला दिसते. कारण मनाचा सवयीतला अलगतावाद त्यांना गृहीत धरावा लागतो. जगण्यातले मूलभूत प्रश्न न विचारता नुसतेच व्यवस्थेचे, मटेरिअलचे प्रश्न महत्त्वाचे मानून त्यांमागे आयुष्यभर कष्ट करत राहायचे आणि एकूणात जगण्याचा स्तर बकालच ठेवायचा, असा याचा अर्थ होतो. पण बुद्धिवादी लोकांना असे काहीतरी भ्रम बाळगणे भागच असते. हीच मानवी जगण्यातली ॲब्सर्डिटी असते. इथे हे सर्व जाणवून कुणी नाटक लिहील तर शक्य तर तो अनुल्लेखाने मारला जाईल किंवा त्याचा श्रीधर विश्वनाथ करण्याचा प्रयत्न होईल. परिवर्तनवादी असण्याचे महत्त्व अशा तपशीलांनी अधोरेखित केले जाते की तुम्ही डाव्या विचारसरणीचे असल्याशिवाय चांगले लेखक होऊच शकत नाही. वेडे आणि गुन्हेगारही चांगले लेखक होऊ शकतात हे दुर्लक्षिले जाते. सांस्कृतिक कृतींतून राजकीय क्षेत्रातली पोळी भाजून घेण्याचे प्रयत्न असे या घडामोडींना स्वरूप येते, ते त्यामुळेच.

गोपूंनी लोकशाहीत असणारे व्यक्तिवादाचे महत्त्व सांगितले आहे. व्यक्तिवादाची सुरुवात कधीही झालेली असो, अलगतावाद हजारो वर्षे जुना आहे. त्याचेच व्यक्तिवाद हे एक रूप आहे. समाजवादाचे महत्त्व हवे असेल तर व्यक्तिवादाचेही महत्त्व माजवावे लागते, ही एक गंमतच आहे. कारण अलगतावाद गृहीत धरल्याशिवाय बुद्धिप्राण्यवाद टिकत नाही. या जडवादी द्वंद्वात्मकतेतूनही ॲब्सर्डिटीचा जन्म होतो, असे मला दिसते. त्यामुळे, परिवर्तनवादी लेखकाने लिहिलेले चांगले नाटक हे ॲब्सर्ड नाटकच असेल, असे मला वाटते. अशा परिस्थितीत, गोपू जर का परिवर्तनवादी नाटककार असतील तर ते आणि मी मराठीतले राम और  शाम ठरू शकतो कारण इथली वास्तववादाची सक्ती मान्य करून मीही अशा एका अर्थाने ॲब्सर्ड नाट्यलेखक ठरू शकतो, असे मला वाटते. इथून, गोपूंनी दाखवलेला सत्य आणि कृतक हा भेद कोणत्या आयामात पोचेल त्याची कल्पना करावी. चांगले ‘ नाटक ‘ हे तथाकथित ‘ सत्य ‘ ही आभासी असल्याचे भान देऊ शकते, ते अशा नाटकांतून.

आता आपण एका वेगळ्या अंगानेही मानवी श्रेयसाकडे पाहू. ते अंग म्हणजे लैंगिक भावभावनांचे क्षेत्र. फ्रॉईडही म्हणून गेला की जगण्यातले हे पायाभूत महत्त्वाचे क्षेत्र आहे, आणि अलिकडच्या काळातले एक जीनियस ओशो रजनीशही म्हणाले की या क्षेत्राचे वाढत चाललेले विकृत रूप पाहता, पूर्ण मानवजात वेडी होण्याच्या मार्गावर आहे, हे निश्चित ! परिवर्तनवाद्यांना हा प्रश्न इतका महत्त्वाचा वाटतो की नाही, हे मला माहीत नाही. माझ्या डोक्यात अलिकडे असा एक प्रश्न आला की हल्ली सगळ्याच स्त्रिया सुंदर कशा काय दिसतात, की आपले वय वाढत चालल्यामुळे आपले डोके बिघडले आहे ? याचा खुलासा असा मिळाला की, माझ्या डोक्यात काही बिघाड नाही, एकूणात, सुंदर दिसण्याचे हे भानच स्त्रियांत वाढलेले आहे. निम्न आर्थिक गटातील स्त्रियांसह, भुवया कोरून घेणे आणि पोषाख यांबाबत सर्वच स्त्रियांची एकूणच सजगता वाढलेली आहे ! प्रश्न नुसता आकर्षण वाढण्याचा नाही. एक प्रश्न, इतर सगळे सोडून, सतत त्याच कृतीत वा विचारात राहण्याच्या इच्छेचा आणि दुसरा, सतत त्याच विचारात राहण्याचे होणारे घातक मनोशारीर परिणाम पाहता, हे वाईट आहे, हे टाळले पाहिजे, असे वाटण्याचाही आहे ! आणि या दोन टोकांतली कल्पनेपलिकडची विविधता ! हे एक

अतितीव्र  आणि घातक असे जडातले द्वंद्व आज सगळ्यांच्या जगण्यात आहे, हे नाकारणे हा निव्वळ ढोंगीपणा होईल. या द्वंद्वाला जर डाव्या विचारसरणीत स्थान नसेल तर ती विचारसरणी आज पूर्ण अप्रस्तुत झालेली आहे, असे समजायला हरकत नाही. हेही द्वंद्व राजकीय परिवर्तनाने जाईल, अशी मांडणी करत राहणे, हा एक मार्ग आहे ! एकूणात पाहता, हिंसा आहे, सेक्सचा प्रश्न आहे – यांपलिकडे तेंडुलकरही जाऊ शकत नाहीत आणि तथाकथित बुद्धिप्रामाण्यवादी – परिवर्तनवादीही जाऊ शकत नाहीत, हे लक्षात घ्यायला हवे. कारण मनाचा अलगतावाद गृहीत धरूनच वाटचाल करणारे असे हे सगळे आहेत. पण या क्षेत्रातल्या प्रश्नांमुळे मानवजात जर अधिकाधिक विकृत आणि वेडी होत गेली तर ती अधिकाधिक हिंसक आणि विध्वंसक होत जाईल आणि सर्व विचारसरण्या आणि धर्मवाद पायदळी तुडवेल, हे सांगायला कुणा मानसशास्त्रज्ञाची गरज नाही. जिंकून येण्यासाठी करावे लागणारे प्रयत्न आणि आघाडी सरकारे स्थापन करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या तडजोडी म्हणजे या लैंगिकतेच्या प्रश्नापुढे फारच किरकोळ बाबी ठरू शकतील ! माणसाचे मन विदीर्ण होत जाण्याची असंख्य कारणे असली तरी लैंगिकतेचे प्रश्न हे त्यांतले एक अतिमहत्त्वाचे कारण असेल, हे नक्की !

गोपू तुकारामाच्या ज्या ओळी अनेकदा उद्धृत करतात त्या ओळींकडे या विदीर्णतेच्या संदर्भातही पाहता येईल. “ तुका म्हणे नव्हे दिसतो मी तैसा । पुसणे ते पुसा पांडुरंगा ।। “ – या त्या ओळी. दिसायला मी जरी इतरांसारखाच अलगतावादी दिसत असलो तरी वस्तुतः मी तसा नाही, हा खरा या ओळींचा अर्थ आहे. विदीर्णता हा अधर्म असून एकात्मता – मनाची एकविधता हा धर्म आहे, असे तुकाराम अनेक ठिकाणी म्हणतो. तुकारामाची ही एकविधता एखाद्या बुद्धिवाद्याला ‘ शून्यवाद ‘ ही वाटू शकते. बुद्धीची मर्यादा ओळखणाऱ्या आकलनावरही अंतिम मत देणे, हे काम करायला मानवी बुद्धी मुळीच संकोचत नाही. मनाच्या विदीर्णतेचे सर्वसंहारक प्रश्न बुद्धीने सुटू शकत नाहीत, याकडे बुद्धी दुर्लक्ष करते, आणि तथाकथित ‘ हितकारक ‘ विचारसरण्या मांडत राहते !

गोपूंनी भाषेच्या ऱ्हासाचा एक मुद्दा मांडलेला आहे. ‘ उपयोगी असेल तेवढेच शिका ‘ यातला उपयुक्ततावाद आणि ‘ मजा / चैन करा ‘ यातला चंगळवाद यांनी माणसाच्या जगण्यात खूपच फरक पडत आहेत. नुसती भाषाच काय, काही ज्ञानशाखाही बंद होत चालल्या आहेत.  काही कॉलेजांत तत्त्वज्ञान विभाग बंदच करायची पाळी येते आहे. एका शास्त्रज्ञाचे असे म्हणणे वाचनात आले की माणसाचा average intelligence  ( सरासरी बुद्धिमत्ता ) कमी होत चाललेला आहे. निरनिराळ्या समाजगटांतली जेनेटिकली सशक्त मुले निवडून, त्यांना विशेष शिक्षण देऊन, ताब्यात असलेला ज्ञानप्रदेश टिकवण्याचे प्रयत्न केले पाहिजेत ! तुकाराम म्हणतो ते एकविध मन आकलन व्हायला कितीशी भाषा लागेल आणि भाषा लागेल का ? आणि असंख्य ज्ञानप्रदेशांचे बौद्धिक ज्ञान लागेल का ? – या प्रश्नांच्या उत्तरांतच हा गोंधळ आणि धुरळा खाली बसण्याची शक्यता आहे !

थोडक्यात बोलायचे झाल्यास मराठी नाटकाला समृद्ध वगैरे म्हणता येते, पण या समृद्धीतून व्यावसायिक नाटक वगळावे लागेल, हे लगेच लक्षात येते. सर्व तऱ्हेच्या वर्गीकरणांमधली नाटके आहेत, त्यांतले महत्त्वाचे म्हणजे अर्थातच कधीकधी हसू येणारी विनोदी नाटके आणि एकदाही हसू न येणारी विनोदी नाटके ! एकूणात, करमणुकीत घुटमळणे नुसते ! प्रेक्षकांच्या मानसिक रचनेला मुळीच धक्का लागता कामा नये, ही मुख्य अट. साधारण पटणारे एखादे नीतीतत्त्व विजयी झाले म्हणजे झाले ! नाटकांची संख्या खूप असल्याने मराठी माणसाला नाटकवेडा म्हणायची कौतुकमिश्रित पद्धत पडली. पण एकूणात एकरेषीय, बाळबोध कारभार सगळा ! दीडशेपेक्षा जास्त वर्षांत चारदोन तरी मोठ्या आवाक्याची नाटके आहेत का ? नाहीत. इथला जनरल प्रेक्षक अशी नाटके पाहील का, हीही शंकाच आहे. मग राहिले तथाकथित प्रायोगिक

नाटक. हेही नाटक अनुभवांचे वैविध्य आणि तांत्रिक प्रयोग यांहून जास्त फारसे काही करू शकलेले नाही. बाहेरचा जगण्याचा माहोल बदलला, अनुभवांच्या रचना बदलल्या की लगेच कालबाह्य होणारेच सगळे ! हे पाहूनच शासनाने नियम केलेला दिसतो की राज्य नाट्य स्पर्धेत नाटक नवीनच हवे ! नाही तरी पिढ्या न पिढ्या करावीत अशी नाटके आहेत कुठे ? अनुभवाच्या मर्यादा ओलांडणारे समग्रावधान, म्हणजे लेखकाच्या बौद्धिक मर्यादांनी सीमित न होणारे भान, अशा सर्जक अर्थाने दिशाहीन भान, हे असणारी नाटके आहेत का मराठीत आणि असली तर किती आहेत ? अशा आवाक्याची नाटके नाहीत, हा मुख्य दोष मला दिसतो. राजकीय नाटक नाही किंवा वैमानिकाच्या जीवनावरचे नाटक नाही किंवा अमुक समाजाच्या अन्यायग्रस्त जीवनाचे चित्रण करणारे नाटक नाही किंवा सध्याची एकूण सिस्टमच बदलण्याच्या संघर्षाचे नाटक नाही – असे त्या मानाने कमी महत्त्वाचे दोष तर हजारो असतील. मराठीतले इतर लेखनप्रकार सशक्त कलाकृती देताना दिसतात. नाटकच असे खुरटलेले का राहिले असेल ? नाटक हा फक्त एक नटूनथटून उपभोगायचा करमणुकीचा प्रकार आहे, असे समजण्याची सवय, हेच त्याचे कारण असावे.

----- ००० -----

सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ – परिसंवाद दिनांक – १८/१९-०३-१६.
नाट्यलेखन – मनोगत.

माझ्या जगण्याची सुरुवातच भयानक झाली. तिसऱ्या वर्षी डांग्या खोकला झाला आणि त्याचे रूपांतर कायमच्या दम्यात झाले. नुसते हालच हाल व्हायचे. जो जे सांगेल ते उपाय केले जायचे. अंगारे-धुपारे, भविष्य सांगणारे, साधुसंत, वगैरे. कुणीतरी मला यातून सोडवेल, असे आईवडिलांना वाटायचे. एकदा तर रामदास स्वामींचे शिष्य श्रीधर स्वामी यांच्याही पायावर मला घालून आणण्यात आले. त्यावेळी, ते मौनात होते, पण, ते काय म्हणताहेत हे त्यांचा एक शिष्य डिकोड करून सांगत असे. त्यांनी सांगितली म्हणून त्या काळात मी मारुतीची उपासनाही केली होती. हैदराबादला एक माणूस एका छोट्या जिवंत माशाच्या तोंडात औषध टाकून, तो मासा तसाच पेशंटला गिळायला देई – ते औषध तेव्हा खूप प्रसिद्ध होते. तो मासा गिळण्याचाही उपाय माझा झाला होता. एकदा कुणी सांगितले की याला माकडाचे उष्टे फुटाणे द्या खायला, लगेच बरा होईल. आईने फुटाणे आणून ठेवले आणि एक माकडवाला दिसताच त्याला बोलावले. तो ते काम करून देतो म्हणाला. सुमारे अर्धी मूठ फुटाणे त्या माकडाच्या तोंडात भरवून त्याने ते खायच्या आत त्याच्या तोंडातून काढून घेण्यात आले. माकड चिडले. ते काढून घेतलेले फुटाणे मी खातोय हे बघून ते माझ्यावर फिस्कारले. ते पाहून आईने उरलेले सगळे फुटाणे त्या माकडाला दिले आणि वर त्या माकडवाल्याला काही पैसे दिले. मग मात्र ते माकड खुश झाले, जाताना मला आशीर्वाद देऊन गेले. त्याने माझा दमा काही गेला नाही, पण, माझ्या लेखनाची तिथून सुरुवार झाली असा माझा अंदाज आहे. त्यानंतरच, मी शाळेत टिळकांवर लिहिलेल्या माझ्या निबंधाला पहिले बक्षीस मिळाले ! मी चौथी होईपर्यंत वडील कर्नाटकात विजापूरला शिक्षक होते. त्यानंतर मुंबईत, पार्ले टिळक विद्यालयात त्यांना नोकरी मिळाली, म्हणून आम्ही मुंबईला राहायला गेलो. बापरे ! मुंबईची हवा ! तिथून पुढे दहा वर्षे म्हणजे सदुसष्ट साली मी मुंबई सोडेपर्यंत, भयानक नरक-यातना भोगल्या ! माझी अवस्था पाहून पाहणाऱ्याला खूप वाईट वाटे. बालपण आणि किशोरपण असे पूर्ण करपूनच गेले ! ना सहल ना सण ना फारसे चविष्ट काही खाणे ना मनासारखे खेळणे. मी एकटेच अपत्य होतो. त्या वेळची माझी मनःस्थिती थोडक्यात सांगायची तर – एकाकीपणा, दुःख, अतितीव्र लैंगिक भावना, न्यूनगंड आणि स्वतःला सिद्ध करण्यासाठी खूप अभ्यास करून पहिला येण्याची जिद्द – अशी होती. जोडीला आपण कथा, कविता लिहाव्यात, हेही होते. वाचनालयातून सारखी पुस्तके बदलून आणून मी वाचत असे. काहीही कळले नाही तरी नववीत असल्यापासून मी ‘ सत्यकथा ’ रेटून वाचत असे. एकूणच सतत डोक्यात जीवनमरणाचेच प्रश्न असत. वडील जे. कृष्णमूर्तींची प्रवचने ऐकायला जे. जे. स्कूल ऑफ आर्टला आणि चर्चा ऐकायला खारेघाट हॉलला जात असत. अनेकदा ते मला बरोबर नेत. मला ते कळो न कळो जेकेंच्या दर्शनानेही काही चांगले घडू शकेल, असे त्यांना वाटे. कॉलेजात असताना एकदा एक महिनाभर लोणावळ्याच्या कैवल्यधाममध्ये राहिलो होतो. तिथे बरीच आधुनिक मशीन्स होती. त्यांच्या साहाय्याने सगळ्या चाचण्या घेऊन त्यांनी सांगितले की याच्या शरीरात कोणताच दोष नाहीय, याला होणारा त्रास मानसिक कारणांमुळे होतोय ! मी अक्षरशः वैतागून गेलो होतो, हे ऐकून. करायचे काय ? त्यातल्या त्यात बरे म्हणजे मी कॉलेजात गेल्यापासून ‘ सत्यकथे ’ त माझ्या कविता यायला सुरुवात झाली होती. त्यामुळे, मी थोडा खुश असायचो।
शाळेपासूनची आणखी एक आवड म्हणजे सारखे चित्रपट पाहणे. पाच आणे हे सर्वात स्वस्त तिकीट असे. बाकड्यांच्या अशा दोनच रांगा असत. तिकीट मिळावे म्हणून लौकर जाऊन रांगेत बसावे लागे. मी रांगेत जाऊन बसल्यावर मग

पहिल्या चालू शोचे मध्यांतर होई ! पुढे, बाहेर ऐकू येणारे त्या शोचे पार्शसंगीत ऐकत मी बसून असे ! कॉलेजात मला एक मुलगी फार आवडायची, पण मनात न्यूनगंड असे. त्यात घडले असे की मराठीच्या भिंत-मासिकात तिची एक कथा लागली. त्या कथेतला नायक सिगरेटचे झुरके मारत, बायकोला टाटा करूण कार चालवत गेला होता ! संपले ! सिगरेट शक्यच नव्हती ! मी तिच्याकडे पाहणेही बंद करून टाकले ! असे खूप आहे, पण, साधारण माझी घडण कशी झाली, हे कळावे म्हणून हे थोडक्यात सांगितले. जळत गेलेले जगणे आणि जगण्या-मरण्याचे प्रश्न ! सदुसष्ट साली म्हणजे माझ्या एकविसाव्या वर्षी मुंबई सोडल्यापासून आणि स्वतःच्या मनाची समज घेण्याच्या प्रक्रियेमुळे मी हळूहळू त्या दम्याच्या विकारातून बाहेर पडत गेलो. लोणावळावाले म्हणाले तसे असूही शकेल ते मानसिक ! बँकेत अठ्ठावीस वर्षे नोकरी करून ती पन्नासाव्या वर्षी सोडून दिली. दरम्यान लग्न, मुलेबाळे, वगैरे रूटीन घडत गेले.

आता लेखनाबद्दल बोलतो. सुरुवात कविता लेखनाने झाली. त्यामुळे भाषेचे बारकावे आणि तिचे बहुआयामित्व यांचे भान आले. पण, तो विषय सध्या सोडून नाट्यलेखनाबद्दलच बोलतो. कोणत्याही नाटकात करमणूक असावीच लागते. नाटकाने प्रेक्षकाचे लक्ष खिळवून ठेवत त्याला स्वतःच्या प्रक्रियेसोबत ठेवण्याचे कौशल्य बाळगावेच लागते. ही करमणूक वेगवेगळ्या प्रकारांची असू शकते. सर्वच प्रकार सर्वांनाच आवडतील असे नसते. उदाहरणार्थ, एक कामगार स्पर्धेतले नाटक मी पाहात होतो. विषय होता – घरच्यांचा विरोध डावलून एकाने मित्राला काही पैसे उधार दिलेले होते आणि ते त्याच्याकडून परत मिळत नव्हते. थोड्याच वेळात मला याचा कंटाळा यायला लागला, पण, तिथल्या बहुसंख्य प्रेक्षकांना ते खूप महत्त्वाचे आणि इंटरेस्टिंग वाटत होते. यात कुणी कुणाला कमीजास्त लेखण्याचा प्रश्न नसतो. तर ते असो. मला बोलायचे आहे ते करमणूकप्रधान नाटकाबद्दल. असे नाटक हे मुख्यतः पलायनवादी – रोजच्या ताणांतून काही काळ बाहेर काढणारे असावे लागते. ते पलायनवादी असते म्हणून ते हेटाळावे, असे मला वाटत नाही. एखाद्या वेळी माणसाची मनःस्थिती इतकी नाजूक बनते किंवा इतकी ताणमय बनते की जगण्यालाच धोका निर्माण होऊ शकतो. अशा वेळी अशी पलायनवादी नाट्यकृती त्याला त्या वेळेपुरते त्यातून बाहेर काढून तोल सावरण्याची संधी देऊ शकते. अशा नाटकांची उदाहरणे म्हणजे – ' ऑल दि बेस्ट ', ' मोरूची मावशी ', ' अश्रूंची झाली फुले '. नाटकांचा दुसरा प्रकार असतो, वास्तवाचे भान वाढवणारी नाटके. वास्तवाचे पुरेसे भान असणे ही नॉर्मल असण्याची अटच असते. पळून जाण्यापेक्षा जगण्याला सामोरे जाणे इथे अपेक्षित असते. निव्वळ करमणूक वा त्यासाठी लागणारा उथळपणा टाळून योग्य त्या गांभीर्याने इथे नाट्यद्रव्य हाताळलेले असते. ' शांतता कोर्ट चालू आहे ', ' साठेचं काय करायचं ', ' माझं घर ' ही अशा नाटकांची उदाहरणे म्हणता येतील. आणि नाटकांचा तिसरा प्रकार असतो – मूलभूत प्रश्नांचा वेध घेणारी नाटके. या प्रश्नांची ठाम बौद्धिक निराकरणे असत नाहीत. त्यांची समज, त्यांचे भान प्रत्येक वेळी नव्याने, ताजेपणानेच यावे लागते. दुःख का होते, जगण्याचा हेतू काय, मानवी संबंधांत सारखे संघर्ष का असतात, बरोबर कृती म्हणजे काय, मूल्य म्हणजे काय – या प्रश्नांचे आकलनस्वरूप भान देणाऱ्या नाट्यकृती यात येतात. मराठीत अशा नाटकांची उदाहरणे कमी आहेत. ' एक शून्य बाजीराव ', ' वाडा चिरेबंदी', ' सखाराम बाइंडर ' ही काही उदाहरणे आहेत. – हे वर्गीकरण सांगायचे कारण म्हणजे, माझे नाट्यलेखन हे मूलभूत प्रश्नांचा वेध घेण्यासाठीच असते, असे इथे म्हणायचे आहे. ते जमले वा न जमले यांबाबत अनेक मतांच्या शक्यता असल्या तरी. इथे एक वेगळी माहिती मांडावीशी वाटते – धर्म, अर्थ, काम, मोक्ष – या चारही पुरुषार्थांवर माझी अनुक्रमे – ' ढोलताशे ', ' इराक ', ' बुद्धिबळ आणि झब्बू ', आणि ' जणू काही वास्तव ' – ही नाटके आहेत. यांतली दोन म्हणजे धर्म आणि काम यांवरची नाटके अधिक गाजली, अधिक स्वीकारली गेली, हा भाग वेगळा. इथे काही एकांकिका व काही नाटके यांचे विषय देणे आता प्रस्तुत वाटते. प्रत्येक वेळी असे विषय ठरवून लेखन

होत नसले तरीही लेखनाची दिशा कशी होत जाते, हे पाहण्यासाठी असे तपशील देत आहे. हे सगळे बरोबरच आहे असा माझा दावा नाही।

<u>एकांकिका</u>

माझ्या सुरुवातीच्या दोन एकांकिका माझे प्राध्यापक असलेल्या शंकर वैद्य यांनी विजय तेंडुलकर यांना वाचायला दिल्या होत्या. त्या वाचल्यावर तेंडुलकर एवढेच म्हणाले होते की तुम्हाला सल्ला असा मी काहीही देणार नाही, फक्त भरपूर नाटके वाचा आणि पाहा, एवढेच. थिएटरमध्ये काय घडते याचे भान वाढवत जा, असे ते म्हणाले होते. मला त्यातून नक्कीच प्रोत्साहन मिळाले. खानोलकर तर माझे मित्रच होते. या दोघांच्या खुल्या प्रोत्साहनाचा इथे कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे मला आवश्यक वाटते. खानोलकर तर, माझ्या कविताही नाट्यमय असतात,असे म्हणत असत. मी इस्माईल युसुफ कॉलेजात असल्यामुळे, प्रा. शंकर वैद्यांच्या संपर्कात आलो आणि त्यांनी सुरुवातीच्या काळात माझ्याकडे लक्ष दिले आणि माझ्या वेगळेपणाची मला जाणीव दिली, याचा इथे उल्लेख केला पाहिजे. याच कॉलेजात पूर्वी मर्ढेकरही शिकवायला होते, हा त्या वेळी अर्थातच माझा अभिमान –मुद्दा होता. ( मला पुढे इंग्लिश हा विषय घ्यायचा होता आणि त्या कॉलेजात प्रा. होमाई जे. श्रॉफ या मुंबईतल्या प्रख्यात प्राध्यापिका, ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या एम. ए. , इंग्लिशच्या विभागप्रमुख होत्या. त्यांच्याकडून मला चॉसरचे ‘ कँटरबरी टेल्स ’ आणि शेक्सपियरचे ‘ मॅक्बेथ ’ शिकायला मिळाले, हे माझे भाग्यच म्हणायला हवे. )

‘ मेलेले ’ ही माझी पहिली एकांकिका ‘ सत्यकथे ’ त प्रसिद्ध झाली. पुढे तीत काही काटछाट, सुधारणा करून आता ‘ एकत्र ’ या नावाने ती माझ्या वेबसाईटवर आहे. सततच्या रूटीन जगण्याने येणारी अस्वस्थता हा त्या एकांकिकेचा विषय होता. माधव वाटवे या ग्रेट अभिनेत्याने मला साहित्य संघात यासाठी बोलावले होते की या एकांकिकेतला काही भाग प्रत्यक्ष रंगमंचावर कसा होईल ते मला करून दाखववावे ! त्याचा लाभ त्या वेळी मी काही घेऊ शकलो नाही. पुढे कालांतराने माधव वाटवे आणि आत्माराम भेंडे या महान जोडगोळीने माझ्या ‘ पोत्यातून गोत्यात ’ या पहिल्या व्यावसायिक नाटकात काम केले. ( प्रकाश बुद्धिसागरचे व्यावसायिक रंगभूमीवर दिग्दर्शक म्हणून पदार्पण याच नाटकाने झाले. पुढे तो फार्सिकल, विनोदी नाटकांचा किंग दिग्दर्शक झाला. )

त्यानंतर ‘ सत्यकथे ’ त आलेली माझी एकांकिका म्हणजे ‘ इतिहास ’. ही एकांकिका वाचून काही अनुभवी लोक म्हणाले की ही फक्त वाचायला चांगली आहे, हिचा प्रयोग होणार नाही. झाले उलटे ! विचारनाट्याला अनुकूल काळ आलेला होता, त्याला फक्त योग्य अभिव्यक्ती मिळायची गरज होती, हे या एकांकिकेने सिद्ध केले. त्या वर्षीच्या ‘ उन्मेष ’ स्पर्धेत ही एकांकिका नुसती गाजली असे नव्हे तर प्रेक्षकांच्या प्रथम पसंतीचे पारितोषिक तिने मिळवले. पुढे महाराष्ट्रभर अनेक स्पर्धांतून या एकांकिकेने अनेक पारितोषिके मिळवली. फक्त तीनच पुरुषपात्रांची ही एक गंभीर एकांकिका होती. ही एकांकिका, मानवी जगण्यासाठी काही आदर्श नमूना ( पॅटर्न ) सापडू शकतो का, ठरवून काही ‘ चांगली ’ स्थिती घडवता येते का, हा प्रश्न हाताळणारी होती. या एकांकिकेचे दृश्य रूप सर्वप्रथम ‘ पाहू ’ शकलेला म्हणून त्या वेळचा विद्यार्थी-दिग्दर्शक विनायक पडवळ याचा इथे उल्लेख करणे आवश्यक आहे. त्याने केलेल्या त्या प्रयोगामुळेच पुढे माझी वाट मोकळी होत गेली.

विनायक पडवळनेच पुढे सुरू केलेल्या ‘ भरतशास्त्र ‘ या त्रैमासिकात माझी ‘ नातं ‘ ही एकांकिका ( दीर्घांकच ) प्रसिद्ध झाली. आशयाची आणि यशाचीही विक्रमी उंची गाठणारी एकांकिका म्हणून ही सर्वमान्य झाली. दूरदर्शनने पूर्ण महाराष्ट्रात घेतलेल्या, ८५ संघांनी भाग घेतलेल्या स्पर्धेत ही एकांकिका पहिली आली. दिग्दर्शक होता प्रकाश बुद्धिसागर. कालांतराने योगेश सोमणच्या दिग्दर्शनासह ( आणि सोनाली कुलकर्णीच्या विशेष अभिनयासह ) सादर झालेल्या या एकांकिकेला पुरुषोत्तम करंडकही मिळाळा. एका सुराधाऱ्याला घाबरून नवरा पळाल्यानंतर त्याच्या पत्नीवर बलात्कार होतो. त्या घटनेनंतर ती दोघे घरी परततात, इथून ही एकांकिका सुरू होते. पति-पत्नी या नात्याची आणि एकूणच जगण्याची यात चिरफाड करून पाहिली जाते. अनेक प्रश्न, क्रिया-प्रतिक्रिया यांची गर्दी उसळते आणि “ तू पूर्वी होतास तसाच मला चालला असतास “ अशा विचित्र वळणावर ही एकांकिका येते. शेवटाला ट्रॅजिक म्हणावे की म्हणू नये, अशा अनपेक्षित बिंदूवर ती संपते.

‘ संसाराणूपेंडघार ‘ ही एकांकिका प्रथम आयएनटी स्पर्धेत प्रकाश बुद्धिसागरने सादर केली. त्या वेळी मी नोकरीनिमित्त अहमदनगर जिल्ह्यात वाळकी या गावी होतो. ही एकांकिका समजून घेण्यासाठी प्रकाश मुंबईहून वाळकीला आला होता. त्या स्पर्धेत या एकांकिकेला लेखनाचे पारितोषिक मिळाले, हे असले तरीही या एकांकिकेतला नाट्यलेखनातला एक विलक्षण प्रयोग एकूणात पूर्णतः दुर्लक्षिला गेला असेच म्हणावे लागेल. उक्ती आणि कृती यांतली सततची दरी आणि दूरी दाखवण्यासाठी या एकांकिकेत संवाद आणि कृती / अभिनय यांचा संबंधच तोडून टाकलेला होता. या तंत्रामुळे संवादांचे एक वेगळेच स्वातंत्र्य मला मिळाले.

‘ विरहवेदना ‘ अर्थात ‘ साक्ष मावळत्या सूर्याची ‘ ही एकांकिका पुरुषोत्तममध्ये प्रथम पुणे विद्यापीठातर्फे विद्यासागर अध्यापकच्या दिग्दर्शनाखाली सादर झाली. ही त्या वेळी सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिका ठरली. प्रेमासाठी जग धुडकावून लावणारे, कुणाचीही, कशाचीही पर्वा न करणारे प्रेमिक हे अनेक कलाकृतींचे विषय होण्याच्या पार्श्वभूमीवर इथे समजुतदार प्रेमिक आहेत ! आपल्या प्रेमामुळे दुःख, नाश यांची निर्मिती होणार असेल तर आपणच वेगळे होऊ, असे ठरवणारे हे ‘ विचारी ‘ प्रेमिक. ते एकदा शेवटचे भेटायचे ठरवतात, ती शेवटची भेट म्हणजे ही एकांकिका. आसक्ती, प्रेम, विचार, भावना या सगळ्याच प्रक्रियांचा धांडोळा ही एकांकिका घेते. प्रश्न चहूबाजूंनी ढवळून काढणारे संवाद आणि सूक्ष्म अर्थच्छटांचा बाज पाहता समीप रंगमंचावरून ही एकांकिका अधिक प्रखरपणे पोचू शकेल असे वाटते.

‘ सेक्स ‘ ही एक खूप गाजलेली आणि गाजत राहिलेली एकांकिका. मुंबईच्या आंतरबँक स्पर्धेत ही प्रकाश बुद्धिसागरने ‘ उत्सव ‘ या नावाने सादर केली. तिथे लेखनाचे पारितोषिक मिळाले. संवादांनी खिळवून ठेवत, उलटसुलट कलाटण्या घेत ही एकांकिका, मानसिक व्यग्रता हाच कसा एक प्रश्न बनतो ते दाखवते. पुढे या एकांकिकेचा दीर्घांक होऊन ‘ बुद्धिबळ आणि झब्बू ‘ या नावाने त्याचे प्रायोगिक रंगभूमीवर विक्रमी प्रयोग झाले. त्यानंतर, ‘ तुमचं आमचं सेम असतं ‘ या नावाने पूर्ण दोन अंकी नाटकाच्या रूपात ते व्यावसायिक रंगभूमीवरही झाले. त्याची डीव्हीडीही प्रकाशित झाली. तिन्हींचे दिग्दर्शक गिरीश पतके होते. त्यानंतर ‘ दिल चाहता है ‘ या नावाने ते हिंदीतही झाले. त्याच्या पहिल्या प्रयोगाची तिकीटविक्री तीन लाख होती ! पुढे चेतन दातारने ते दिल्लीच्या श्रीराम सेंटरसाठी ‘ आँखमिचौली ‘ या नावाने हिंदीतून बसवले, त्याचेही खूप प्रयोग झाले.

‘ बस ‘ ही माझी रंगायनसारख्या नामांकित संस्थेने सादर केलेली पहिली एकांकिका. बाळ कर्वे यांची ही रंगभूमीपदार्पणाची एकांकिका. दिग्दर्शक होते रमाकांत देशपांडे. याच्या पहिल्या प्रयोगाला, नामांकित व्हिलन होण्यापूर्वीचे अमरीश पुरी उपस्थित होते. ज्ञानेश्वर नाडकर्णी यांना तीन एकांकिकांमधली ही सर्वांत जास्त आवडल्याचे त्यांनी त्यांच्या ‘ टाइम्स ऑफ इंडिया ‘ तल्या परीक्षणात म्हटले होते. एकाकीपणाचे वेगवेगळ्या रूपांतले सातत्य हा विषय या एकांकिकेत हाताळलेला होता.

‘ स्थळ - दिवाणखाना ‘ ही एक एकपात्री एकांकिका आहे. विचारांचा आणि प्रश्नांचा गोंधळ आणि बाह्य परिस्थिती हताळण्याचे सततचे ताणमय प्रयत्न, हा या एकांकिकेच विषय होता. याची आणखी काही परिमाणे पाहणे शक्य असल्याचे लक्षत आल्याने ही एकांकिका वाढवून तिचा ‘ मन ‘ या नावाने केलेला दीर्घांक माझ्या वेबसाईटवर आहे. हे पूर्ण सादर करणाऱ्या अभिनेत्याला तिथल्या तिथे ‘ नटश्रेष्ठ ‘ हा किताब द्यायला हरकत नाही, असे मला वाटते.

‘ वेषांतर ‘ ही एकांकिका एकमेकांतले डावपेच, खोटेपणा आणि त्यांतून निर्माण झालेल्या गुंतागुंतीमुळे दिङ्मूढ अवस्था होणे, हा विषय हाताळणारी आहे. यात प्रतिमा बदलणे आहे. ही एकांकिका विनोदी पद्धतीने गंभीर विषय हाताळते. स्वतःच्या आणि दुसऱ्यांच्या प्रतिमा घट्ट करत जाणे कसे घडते हे ‘ ओळख परेड ‘ या एकांकिकेत आहे. सामुदायिक नेतृत्व ही संकल्पना चर्चेत असताना प्रत्यक्षात तिचे काय होते हे पाहणारी ‘ समुदाय ‘ नावाची एकांकिका लिहिली. तीत समुदाय नावाचे एक पात्र घेऊन निर्णयसत्ता शेवटी एकाकडेच एकवटते हे दाखवले होते. सामाजिक-राजकीय-वैचारिक क्षेत्रातला आक्रमकपणा आणि व्यक्तिगत जीवनातला आक्रमकपणा हा मूलतः एकच असतो, हा विषय ‘ स्टालिन ‘ ही एकांकिका हाताळते. मानवी प्रश्न सोडवण्याच्या अथक परिश्रमांचे काय होते, हा विषय ‘ समस्या सोडवण्याचा सराव ‘ या एकांकिकेत येतो. हाच विषय एका वेगळ्या आयामातून ‘ खडक ‘ या एकांकिकेतही येतो. ‘ रिलीफ ‘ ही थोडक्या कालावकाशात बरीच गुंतागुंत असलेला जीवनतुकडा दाखवते. पाच ते सात मिनिटांचाच असा हा प्रयोग, केल्यास, होईल. ‘ अस्तित्व ‘, ‘ जोडपी ‘, ‘ ऑफिस ‘, ‘ ट्रेलर ‘, ‘ सत्य ‘ याही असेच काही मानसिक प्रश्नांचे विषय हाताळणाऱ्या एकांकिका आहेत.

सगळे जगणे जर कारणपरिणाम मीमांसेत चालत असेल तर दुःखातून बाहेर पडणे अशक्यच आहे, असा याचा अर्थ होतो. कारण, स्वभाव, क्रियाप्रतिक्रियांची रचना हे सगळेच जर असे बद्ध असेल तर मग ‘ शहाणपण ‘ म्हणजे काय, ‘ स्वातंत्र्य ‘ म्हणजे काय हे प्रश्न विचारलेच जाऊ शकत नाहीत. परिस्थिती आणि मी, इतर माणसे आणि मी, दुसरी व्यक्ती आणि मी यांतल्या सगळ्या संघर्षावस्था अटळ धरून चालावे लागेल. माझ्या एकांकिकालेखनात अशा स्वरूपाच्या प्रश्नांना प्राधान्य असते. कारण कुठल्याही व्यक्तीच्या जगण्यातले हे महत्त्वाचे प्रश्न असतात. कुणालाही जगणे समजण्याची सुरुवात कुठल्यातरी अशा प्रश्नापासूनच शक्य आहे, असे मला दिसते. म्हणजे मग, एखादे तत्त्वज्ञान, एखादी प्रणाली मांडण्यासाठी मी लिहितो का ? तर नाही. ते मी स्पष्टपणे नाकारतो. कारण औपपत्तिक बौद्धिक कृतीपेक्षा क्रियाप्रतिक्रियांच्या जिवंत प्रक्रियेतून पाहणे हेच मला माझे कृतिक्षेत्र वाटते. मी तत्त्वज्ञ किंव प्रबंधकार नसून एक कलावंत आहे – नाट्यक्षेत्रातला लेखक आहे – ही माझी जाणीव सतत उपस्थित नसेल तर नाट्यक्षेत्रात लेखन करणे शक्य होणार नाही. विचारनाट्यही / चर्चानाट्यही इंटरेस्टिंग होणे हे या जाणीवेशिवाय शक्य नाही.

एखादा अनुभव चित्रित करणे, एखादा मूड तयार करणे, एखाद्या आदर्शाचे अथवा भूतकाळाचे उदात्तीकरण करणे, एखाद्या विचारसरणीचा प्रभाव वाढवणे, एखाद्या अन्यायाचे परिमार्जन कसे व्हायला हवे ते सांगणे किंवा चांगल्यावाईटाचे एक

उघड वा सुप्त द्वंद्व मांडत राहणे, अशा कारणांसाठी मी नाट्यलेखन केलेले नाही. जगण्याचे वेगवेगळ्या अंगांनी समग्र भान व्यक्त करणे या ' हेतू ' ने लिहिले, असे म्हणता येईल. माझे नाट्यलेखन म्हणजे मला जगताना जाणवलेले प्रश्न समजून घेण्याची प्रक्रिया आहे. या प्रश्नांचे स्वरूप मला तात्कालिक किंवा समकालीन असे जाणवत नसून वेगवेगळ्या प्रकारे मानवी जीवनातले त्यांचे सातत्य मला दिसते. अशा प्रकारचे लेखन करताना पैसा आणि प्रसिद्धी ही उद्दिष्टे असूच शकत नाहीत, त्याबद्दल वेगळे बोलायचे कारण नाही. आपल्या चरितार्थासाठी दुसरे काही दिवसभर करून मग आणि तरीही हे करू शकत असाल तर करा, असेच वातावरण असते. मी ते त्रागा न करता स्वीकारत आलेलो आहे.

इथे आता माझ्या दीर्घांक व नाटके यांच्या लेखनाकडे वळू. ' मानव ' आणि ' मरणाचे स्मरण असावे ' ही दोन सुरुवातीची अजिबातच न जमलेली नाटके. तशीच आणखी दोन न जमलेली नाटके म्हणजे ' पंतप्रधान येत आहेत ' आणि ' घटना घडतात '. पण ही नाटके ' अभिरुची ' त प्रसिद्ध झाली. पाचवे न जमलेले नाटक म्हणजे ' राज्य '. पण याचा प्रा. अरुण पाटील यांच्या दिग्दर्शनाखाली सांगली बँकेमार्फत राज्यनाट्यस्पर्धेत प्रयोग झाला. आणि सहावे न जमलेले नाटक म्हणजे पूर्वी केलेले काफ्काच्या ' ट्रायल ' चे नाट्यरूपांतर. ( अलिकडे पुन्हा हे नाट्यरूपांतर केले, ते माझ्या वेबसाईटवर आहे. ) ही सहाही नाटके बाद धरून त्यांना वेबसाईटवर घेतलेले नाही. लिहिण्यातल्या अपयशाने खचून न जाणे आणि चिवटपणा हे गुण मुळात अंगात असावेत किंवा निर्धारामुळे ते आले असावेत. त्याशिवाय पुढचे काम घडले नसते. एवढे झाल्यावर अर्थातच मी स्वतः ज्यांना न जमलेली नाटके असे समजत नाही आणि जी माझ्या वेबसाईटवर आहेत त्या नाटकांकडे जाऊ.

या एकूण नाट्यलेखनाच्या जमेच्या बाजू काय तर त्या अशा – धर्म ( ढोलताशे ), अर्थ ( इराक ), काम ( बुद्धिबळ आणि झब्बू ), आणि मोक्ष ( जणू काही वास्तव ) – अशा चार पुरुषार्थांवर नाटके; अलिकडच्या आंतरराष्ट्रीय संदर्भांसह लिहिलेले मराठीतले एकमेव नाटक ' इराक '; स्त्री-पुरुष संबंधांतले बारकावे आणि अंतःप्रवाह चित्रित करणारे मराठीतले विशेष नाटक ' बुद्धिबळ आणि झब्बू '; विचारनाट्य / चर्चानाट्य इतक्या भरपूर प्रमाणात आणि इंटरेस्टिंग पद्धतीने येणे / रुजणे; महाराष्ट्रभर अनेक संस्था, कॉलेजेस, बँका, कारखाने यांच्याकडून सादरीकरण; जवळजवळ सर्व नामवंत नाट्यसंस्थांकडून व अनेक नामवंतांच्या दिग्दर्शनाखाली सादरीकरण; आणि मुख्य म्हणजे, मानवी प्रश्नांच्या बाबतीतले मानवी बुद्धीचे अपयश अभिव्यक्त करणारी इतकी नाटके मराठीत प्रथमच. ( पुढेमागे कुणी समीक्षक आलाच जन्माला तर त्याच्या सोयीसाठी हे थोडे देऊन ठेवले आहे. वर्तमानपत्री परीक्षणांपलिकडे या नाट्यलेखनाकडे अजून तरी फारसे कुणाचे लक्ष गेलेले नाही. याला दोन कारणांच्या शक्यता संभवतात – एक म्हणजे हे सगळे फालतू असणे आणि दुसरे म्हणजे तथाकथित समीक्षक सगळे बुद्धिप्रामाण्यवादी असल्याने हे त्यांच्या आकलनकक्षेत न येणे. ) असो.

<u>नाटके</u>

पहिले जमलेले नाटक म्हणजे ' एक गगनभेदी किंचाळी '. हे नाटक माझा नट-दिग्दर्शक मित्र प्रसन्न जी. कुलकर्णी याने पाठपुरावा करून माझ्याकडून लिहून घेतले आणि अत्यंत कल्पक नेपथ्यासह सादर केले. या नाटकाच्या निमित्ताने एकत्र आलेल्या आम्ही मित्रांनीच कोल्हापुरातली प्रसिद्ध नाट्यसंस्था ' प्रत्यय ' स्थापन केली. आपण सगळे प्रतिमांच्या जगात जगतो, समजा बाहेरून आपली प्रतिमा बदलली गेली तर – असा नाटकाचा विषय होता. नीट रूटीन चालू असलेल्या घराकडे अचानक माणसे धावत येतात आणि त्या घरातल्या कर्त्या पुरुषाची किंचाळी ऐकू आल्याचे सांगतात, अशा

घटनेने हे नाटक सुरू होते. गंभीर विषय, वास्तव आणि कल्पना यांचे अजब मिश्रण आणि अत्यंत हास्यस्फोटक हाताळणी यांमुळे नुसते वाचनही धमाल व्हायचे, प्रयोगाचा तर प्रश्नच नाही. कै. अरुण पाटीलने जयसिंगपूरसारख्या लहान गावातून सादर केलेले हे नाटक अनागरी राज्यनाट्यस्पर्धेत राज्यात पहिले आले. त्यानंतर हे नाटक ' टेल्को कलासागर ' साठी अनिल खोपकरने प्रचंड नेपथ्यासह बसवले, तेही प्रयोग उत्तम होत. त्यानंतर पीडीए नेही हे नाटक दिलीप वेंगुर्लेकरांच्या दिग्दर्शनासह सादर केले – त्यात स्वतः वेंगुर्लेकर प्रमुख भूमिकाही करत असत.

' किंचाळी – ' ला जोडूनच त्याच ऊर्जेतून लगेच ' दिनकर पुरोहितचा खून ' हे नाटक लिहिले. आपण जे आहोत त्यापेक्षा वेगळे काहीतरी होण्याची प्रत्येकाची इच्छा, हा विषय. हे प्रकाश बुद्धिसागर या माझ्या मित्राने प्रथम राज्यनाट्यस्पर्धेत सादर केले आणि नंतर ' पोत्यातून गोत्यात ' या नावाने व्यावसायिक रंगभूमीवर. हेही वरवर विनोदी धाटणीचेच नाटक होते. नाटकभर खूप मजा येई. पण आपल्या प्रेक्षकांना शेवटी वास्तवदर्शी निराकरणच हवे असते, कल्पना / फँटसी म्हणून काही स्वीकारणे जमत नाही, या कारणाने त्याचे फार प्रयोग झाले नाहीत.

' नातं ' हा वास्तव हाताळणीतून ॲब्सर्डिटीकडे जाणारा एक वेगळा दीर्घांक आहे. आहे अशा दीर्घांकरूपात याचे बरेच प्रयोग योगेश सोमण आणि सोनाली कुलकर्णी यांनी केले. पिनड्रॉप सायलेन्स म्हणजे काय ते याच्या प्रत्येक प्रयोगात दिसत असे. आता याच्यापुढे काय घडू शकणार, अशा ठिकाणी सुरू होणारा हा दीर्घांक सुमारे ८० मिनिटे प्रेक्षकांना बसल्या जागी खिळवून ठेवत असे. असेही विषय, त्यांतले उत्खनन, संवाद हे मराठी प्रेक्षक स्वीकारतात या अनुभवाने माझी संवादलेखनातली भीतीच निघून गेली, असे म्हणायला हरकत नाही.

या निर्भयपणातूनच, पुढे ' नाणेफेक ' लिहिले गेले. यातले संवाद त्यांतल्या गुंतागुंतीसाठी मुद्दाम लक्षात घ्यावेत असे आहेत. हे नाटक ' आविष्कार ' साठी पं. सत्यदेव दुबे यांनी बसवले. हे बसवताना त्यांनीही मुख्य मेहनत कलाकारांकडून संवादफेक नीट होण्यावरच घेतली. संवाद हाच या नाटकाचा प्राण असताना आदल्या दिवशी रंगीत तालमीत नटनट्या संवाद विसरत होते, त्यामुळे मी फारच नाराज झालो होतो. पण प्रयोग मात्र बिनचूक झाला ! हे नाटक वाचल्यावर दुबेजींनी एकदोन प्रश्न विचारले होते, ते लक्षात घेऊन नाटकाचा काही भाग मी पुनर्लेखन करून त्यांना पाठवला. ते फारच खुश झाले. समजून चटकन पूर्णता आणण्याच्या माझ्याकडून घडलेल्या या कृतीचा त्यांनी पुढे अनेकदा उल्लेख केला. त्यानंतर हे नाटक पीडीए या पुण्यातल्या प्रतिस्ठित संस्थेने मंचित केले होते – त्याचे दिग्दर्शन मोहित टाकळकरने केले होते.

माझ्या नाट्यलेखनातली दिग्दर्शकांना आवडणारी एक विशेष बाब म्हणजे मी कंस आणि सूचना या अगदी कमी, गरजेपुरत्याच देतो. संवाद अर्थपूर्ण असतील तर सादरीकरणाचे नाट्यतंत्र सारखे लेखकाने देत बसण्याची आवश्यकता नाही, असे मी गृहीत धरतो. लिहिताना आशयाकडे -- त्याच्या सूक्ष्मातिसूक्ष्म अंगांकडे पूर्ण लक्ष देणे मला महत्त्वाचे वाटत असल्याने सारखे कंस लिहिण्याचा मला विक्षेप वाटतो.

पुण्यात आम्ही काही मित्रांनी जमून ' अवकाश कलामंच ' ही संस्था स्थापन केली. या संस्थेची पहिली निर्मिती होती माझे ' धागेदोरे ' हे नाटक. माणसाच्या जगण्यातल्या कृती या असंख्य प्रभावांनी युक्त तर असतातच पण इथे घडलेल्या कृतीचा इतरत्र कुठेही परिणाम घडू शकतो, हा आशय मांडणारे हे नाटक. आधी हे नाटक ' डाव्या डोळ्याखाली काळा तीळ ' या

नावाने लिहिलेले होते. प्रसन्न कुलकर्णी  यांनी ते कोल्हापुरात सादरही केले होते. पुण्यात आमच्या संस्थेमार्फत सादर करण्यापूर्वी अनेकांशी चर्चा करून त्याचे पुनर्लेखन केले. या नाटकाने मराठीला पहिला अँटिहीरो दिला असे मा. कृ. पारधी यांनी त्यांच्या परीक्षणात लिहिले होते.

आमच्या याच संस्थेने माझे ‘ समतोल ‘ हे नाटकही सादर केले. दोन्ही नाटके विद्यासागर अध्यापक या त्या वेळच्या एका विद्यार्थ्याने दिग्दर्शित केली होती. बसवण्याच्या प्रक्रियेत, चर्चांत मीही सहभागी होत असे. या नाटकात दोन विवाहित जोडपी असून दोन्ही स्त्रियांत काही घातक दोष आहेत, असे दोन्ही पतींना दिसते आहे. त्या दोघींच्या स्वभावांतले हे दोष गेले पाहिजेत, त्यांच्यांत सुधारणा झाली पाहिजे, अन्यथा नाश होऊ शकतो, अशा अवस्थेत दोघेही आहेत. त्या दोघांचे त्या दोघींना सुधारण्याचे प्रयत्न, हा या नाटकाचा विषय आहे. काही तणावाचे प्रसंग, काही विनोद असे कुठेही कसेही मिश्रण होत हे नाटक पुढे जाते. इकडे आमच्या संस्थेतर्फे होण्याच्या आगेमागेच रवींद्र लाख्यांनीही त्यांच्या ‘ मिती चार ‘ या संस्थेमार्फत ते मुंबईत सादर केले. दोन्ही प्रयोग चांगले होत. लाख्यांचे नेपथ्य फार कल्पक होते. त्यांचे मुंबईतले प्रयोग बऱ्यापैकी गाजले. अनेक पारितोषिकेही मिळाली.

‘ ढोलताशे ‘ हे माझे सर्वाधिक गाजलेले नाटक म्हणावे लागेल. ‘ आविष्कार ‘ सारखी संस्था आणि विजय केंकरे यांच्यासारखे दिग्दर्शक आणि अरुण काकडे यांच्या नेतृत्वाखालची उत्तम टीम लाभल्यामुळे आणि गणेशोत्सव हा संवेदनशील विषय असल्यामुळेही हे नाटक अनेक प्रेक्षकांप्रमाणेच नाटक, चित्रपट, कला, राजकरण अशा अनेक क्षेत्रांतल्या व्यक्तींनीही आवर्जून पाहिले. जयंतराव साळगावकर आणि नरेंद्र दाभोळकर अशा भिन्न विचारांच्या लोकांनी या नाटकाला सहकार्य दिले. हे नाटक धर्मविरोधी म्हणता येत नाही पण सामान्यतः ज्याला धर्म म्हटले जाते त्या सगळ्याच्या विरोधी आहे. वेळोवेळी तुकाराम, ज्ञानेश्वर काय म्हणाले हे येत गेल्यामुळे, या उत्सवाचा आणि धर्माचा काहीही संबंध नाही असे संवाद येऊनही, कुणाची भावना दुखावल्याची तक्रार आली नाही. धर्म, अध्यात्म हे आयुष्यभर माझे आस्थेचे विषय राहात आलेले आहेत. त्यामुळे हा विषय माझ्याकडून हाताळला जाणे भागच होते. या नाटकाला अनेक पारितोषिके मिळाली, याचे ८७ प्रयोग झाले आणि टीव्हीवरूनही याचे अनेकदा प्रक्षेपण झाले. नंतर, इप्टासह इतरही अनेक संस्थांनी या नाटकाचे सादरीकरण केले. अलिकडेच भद्रकाली या संस्थेतर्फे हे नाटक पुन्हा, आता व्यावसायिक रंगभूमीवर आले आहे. विजय केंकऱ्यांचेच निष्णात दिग्दर्शन आणि ललित प्रभाकरसह अनेक नामवंत कलाकारांचा अभिनय, ही याची खास वैशिष्ट्ये आहेत.

‘ निर्मिती ‘ हा दीर्घांक राजकीय डावपेचांची फँटसी असा होता. इंदिरा गांधींचा पाडाव आणि त्यांचे पुनरुत्थान ही त्याची ढोबळ पार्श्वभूमी होती. लिंगबदलामुळे होणारे नेतृत्वातले शक्तीबदल, या अंगाने लिहिलेले ते नाटक होते. त्याचा आजवर फक्त एकच प्रयोग झाला आणि तोही चांगला झाला नाही, म्हणजे प्रयोग झालाच नाही, हेच खरे. माझे हे एकच नाटक चोरून दुसऱ्याने आपल्या नावावर करणे घडले होते !

‘ सामसूम ‘ हे नाटक नीती आणि न्याय या दोन मूल्यांची टक्कर झाली तर काय, असा विषय हाताळते. मुळात मानवी जगण्यात अनेक मूल्ये असू शकतात का, की ती एकाच मूल्यात्मकतेची अनेकार्थता असते, हा नेहमीच मला महत्त्वाचा वाटणारा प्रश्न आहे. इकडचे वारली समजातले काही तपशील, काही बिहारच्या पूर्णिया जिल्ह्यातले तपशील असे एकत्र घेऊन तयार झालेला हा एक कल्पित प्लॉट होता. हे नाटक काही संस्थांनी सादर केले पण एखाददोन प्रयोग, असे. त्यानंतर

महाराष्ट्रातल्या दोन नामवंत व्यावसायिक संस्थांकडून ते वेळोवेळी स्वीकारले गेले. ' भीती चांदण्याची ' आणि ' प्रतिकार ' या नावांनी जाहिरातीही येऊन गेल्या. पण काही ना काही कारणांनी ते घडले नाही. नंतर तिसऱ्या एका नामवंत संस्थेने इंटरेस्ट दाखवले, पण त्यांना ते दुष्टाचा पाडाव आणि सज्जनांचा विजय, असे करून हवे होते. म्हणजे स्किल माझे आणि आशय त्यांचा, असे. याला अर्थातच मी नकार दिला, कारण माझ्या लेखनप्रक्रियेत ते बसणारे नव्हते. अलिकडे, पीडीए या पुण्यातल्या नामवंत संस्थेने हे नाटक रंगभूमीवर आणलेले असून त्याचे प्रयोग चालू आहेत. माझे मित्रवर्य दिलीप वेंगुर्लेकर यांचे उत्तम दिग्दर्शन आहे.

पूर्वी ' नरदेह ' नामक एक नाटक मी लिहिले होते. पुन्हा वाचल्यावर मला त्यात लेखकच सारखा काहीतरी बोध द्यायचा प्रयत्न करतोय असॆ वाटायला लागले. त्यामुळे मग त्या पूर्ण नाटकाचे पुनर्लेखन केले आणि त्याचे नवीन नामकरण ' सध्या तरी शेवट गोड ' असे केले. परिस्थितीच्या दबावातून निर्माण होणारे प्रश्न आणि ते सोडवण्याच्या प्रयत्नांतून घडणारे भरकटणे आणि वाढणारी गुंतागुंत हा या नाटकाचा विषय होता. याचा एक अनौपचारिक प्रयोग महाराष्ट्रीय कलोपासकतर्फे धनंजय गोळे यांच्या दिग्दर्शनाखाली झाला. त्यानंतर विजय वांकरांच्या ' ऍक्टिव्ह थिएटर्स ' ने हे नाटक भालचंद्र पानसे यांच्या दिग्दर्शनाखाली सादर केले. त्यांनी त्याचे अनेक ठिकाणी एकूण पंचवीस प्रयोग केले. प्रयोग, माझ्या मते, उत्तम होत, पण माझ्या काही मित्रांच्या मते माझे नाटक सादर करण्याची ही आशयसंगत पद्धत नव्हे. त्यांच्या मते ही पारंपरिक भावनाट्यासारखी ट्रीटमेंट झाली. मला मात्र नाटकाच्या आशयावर अन्याय होतोय असे काही वाटले नाही. या गोंधळावर मग मी काही उत्तर ठरवले नाही. अजूनही मला यावर ठामपणे काही म्हणता यॆईल असे वाटत नाही.

' जागचं हलायचं नाही ' या नावाने मुळात लिहिलेले आणि आता काही दुरुस्त्या करून ' गोळ्या काढलेलं पिस्तूल ' या नावाने फायनल केलेले हे नाटक. सुमारे ' ७० च्या आसपासच्या हिंदी पिक्चरची एक बनावट कथा असलेले पण खरे जगणे मांडणारे असे हे नाटक आहे. माझ्या मते हे चांगले लिहिलेले नाटक आहे. कुणी म्हणतात त्या वेळच्या पिक्चरस्टोरीशी आता नाळ जुळत नाही. मला हे कारण मुळीच पटत नाही. इतिहास, पुराण हे चालते, मग काळाचा कुठे प्रश्न येतो ? आशय प्रस्तुत असण्याचा खरा प्रश्न असतो. अलिकडेच झाले एकदाचॆ हॆ नाटक सादर. आमच्याच ' अवकाश कलामंच ' ने ते सादर केले. सुनील चौधरी यांचे चांगले दिग्दर्शन होते.

' जणू काही वास्तव ' हे एखाद्या लेखकाने त्याला दिसलेले पण निव्वळ वैचारिक नसलेले असे काही सत्य मांडण्याचे धाडस करणारे मराठीतले एकमेव नाटक असावे. ' आविष्कार ' साठी गिरीश पतके या दिग्दर्शकाने ते बसवले. संस्था आणि दिग्दर्शक या दोघांचेही ते धाडसच होते. इथल्या ' बांधिलकी ' च्या गदारोळात हे नाटक दडपले जाण्याचा धोका होताच. झालेही तसेच. कधी नव्हे ते या नाटकाच्या परीक्षणांवर प्रतिक्रिया देणारा लेख मी ' लोकसत्ते ' त लिहिला. ज्येष्ठ समीक्षक गंगाधर पाटील यांना ते नाटक आवडले असे त्यांनी सांगितले पण त्यांनी त्यावर कुठे लिहिले नाही. ही कारणे आणि त्या नाटकाचे नेपथ्य फार बोजड बनवले गेले होते, त्यामुळे ने-आणीला अवघड झाले होते, हेही एक कारण, असे सगळे घडून काही प्रयोगांतच ते नाटक थांबले.

' बुद्धिबळ आणि झब्बू ' हे नाटक मराठी प्रयोगिक रंगभूमीवर खूपच गाजले. याला पारितोषिकेही खूप मिळाली आणि याचे प्रयोगही खूप झाले. ' ढोलताशे ' प्रमाणेच नाट्यचित्रपट कलावंत, समीक्षक या सर्वांनी हे नाटक आवर्जून पाहिले. प्रसाद वनारसे आणि अतुल कुलकर्णी यांच्या पुढाकाराखाली चालणाऱ्या ' रंगवर्धन ' या योजनेमुळे महाराष्ट्रात अनेक

ठिकाणी या नाटकाचे प्रयोग झाले. प्रत्येक ठिकाणी नाटक संपल्यावर प्रेक्षक आणि सादरकर्ते यांच्यांत नाटकावर चर्चा घडवून आणणे हे ' रंगवर्धन ' चे वैशिष्ट्य होते. स्त्री-पुरुष संबंधांतले चोरटे प्रवाह असा विषय असूनही चर्चा खूप चांगल्या होत. विशेष म्हणजे स्त्रियाही चर्चेत मोकळेपणाने सहभागी होत. फक्त गोव्यातल्या एका प्रयोगानंतर सगळे प्रेक्षक गेल्यानंतर दोन स्त्रिया आम्हाला भेटून नाटक आवडल्याचे सांगून गेल्या. सगळ्यांसमोर त्यांना हे सांगता आले नव्हते. या नाटकाची अनेकांनी सुपरलेटिव्ह शब्दांत स्तुती केली. विजय तेंडुलकर तर याला आंतरराष्ट्रीय दर्जाचे मराठी नाटक म्हणाले. गिरीश पतके या माझ्या मित्राने दिग्दर्शित केलेले हे माझे पहिले नाटक होते. त्यानंतर त्याने माझी आणखी दोन नाटके दिग्दर्शित केली. इतके सगळे घडण्याचे मुख्य श्रेय अर्थातच राजेंद्र बडे यांच्या ' वलय ' या संस्थेला जाते. त्या सर्व टीमने या नाटकासाठी खूप कष्ट घेतले. माझ्या नाट्यलेखन प्रक्रियेतला हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला यात शंकाच नाही. पुढे हे नाटक ' तुमचं आमचं सेम असतं ' या नावाने व्यावसायिक रंगभूमीवरही आले. दीपक दामले या आमच्या मित्राचे परिश्रम यामागे होते. त्याची डीव्हीडीही निघालेली आहे. ' चोरपोलीस ' या नावाने कुमार सोहनी यांच्या दिग्दर्शनाखाली याची फिल्महीे केली होती, पण आता ती उपलब्ध नाही. त्यात नाटकातले सर्व मूळचे कलाकार होते.

' डावेदार ' हा दीर्घांक प्रथम ' आविष्कार ' तर्फे पुण्यातल्या सुदर्शन दीर्घांक स्पर्धेत गिरीश पतके यांच्या दिग्दर्शनाखाली सादर झाला. त्या स्पर्धेत त्याला लेखनासह अनेक पारितोषिके मिळाली. विचारसरणी आणि प्रत्यक्ष जगणे यांत दरी कशी पडते, हा याचा विषय होता. काहीजणांना वाटले की हे मुद्दाम साम्यवाद्यांविरुद्ध लिहिलेले नाटक आहे. राजन वेलणकरांनी हे नाटक पाहिलेले होते आणि त्यांना ते आवडले होते. त्यांच्या ' राजन क्रिएशन्स ' या संस्थेतर्फे ते नाटक व्यावसायिक रंगभूमीवर आणायचा धाडसी निर्णय त्यांनी घेतला. नाववाले अभिनेते म्हणून प्रदीप वेलणकरांना घेतले. व्यावसायिक करायचे तर नाव बदलायला हवे, असे ठरले. ' झालं गेलं विसरून जाऊ ' हे नाव मुक्रर झाले. प्रयोग उत्तम होत होते पण नामांकने मिळूनही कुठेही विशेष असे पारितोषिक मिळाले नाही. शेवटी, नावच चुकले बहुतेक, झालं गेलं होऊन गेलंय तर आता काय बघायचंय, असे प्रेक्षकांना वाटले असावे, अशी आम्ही समजूत करून घेतली. नाट्यलेखन प्रक्रियेत असे अनेक प्रकारचे अनपेक्षित धक्केही बसू शकतात, या आधीच असलेल्या अनुभवात आणि ज्ञानात, पुन्हा थोडी भर पडली !

' इराक ' हे नाटक ' आविष्कार ' साठी चेतन दातार आणि इरावती कर्णिक यांनी बसवले. प्रयोग सादर होईपर्यंत मधेमधे बदल होत राहिले. त्यामुळे थोडीफार एकसंधता हरवली असावी. नंतर मी, ते माझ्या दृष्टीने फायनल केलेले माझ्या वेबसाईटवर आहे. यातले बाकीचे संदर्भ वगळून फक्त आंतरराष्ट्रीय राजकारणातली पात्रे एवढाच माहोल घेऊनही एक ' सुधारित ' संहिता मी तयार केली. तीही वेबसाईटवर आहे. अलिकडच्या जागतिक राजकारणातली पात्रे असलेले, वास्तववादापासून थोडी वेगळी हाताळणी असलेले असे मराठीतले हे एकमेव नाटक आहे. याबाबतच्या कुतूहलापोटीच विजय तेंडुलकर आवर्जून याचा प्रयोग पाहायला आले होते. हे ' अर्थ ' या पुरुषार्थावरचे नाटक होते. कुणी म्हणाले, गोंधळ झाला; कुणी म्हणाले, फार सोपे झाले. काय ज्या चर्चा, मारामाऱ्या असतील त्या आधी करून नाटकाची संहिता आधी पुरेशी फायनल झालेली असली पाहिजे, असे मला वाटले.

' समतोल ' नंतर रवींद्र लाख्यांनी माझे ' प्रेमच म्हणू याला हवं तर – ' हे नाटक त्यांच्या ' मिती चार ' या संस्थेमार्फत सादर केले. मूल होऊ द्यायचे नाही या अटीवर प्रेमविवाह झाल्यानंतर कालांतराने मूल हवेच असे नवऱ्याला वाटायला लागले तर – हा प्रश्न या नाटकात आहे. घरात निघत जाणाऱ्या अनेक दुरुस्त्या आणि या नात्यातल्या दुरुस्त्या, असे मिक्स होत सगळे चालत राहते. आता असे वाटणे ही प्रतारणा की निसर्ग की प्रामाणिकपणा याचा धांडोळा घेत हे नाटक

पुढे जाते. या नाटकाला अनेक नामांकने मिळाली पण पारितोषिक काही मिळाले नाही. तरीही, या नाटकाला मिळालेले एक मोठे पारितोषिकच म्हणावे अशी गोष्ट म्हणजे याची एनएसडीच्या भारत रंगमहोत्सवासाठी झालेली निवड. तिथल्या चर्चेत आम्ही जे बोललो त्याने तिथले काही प्राध्यापक व इतर काहीजण प्रभावित झाले. त्या महोत्सवात आम्ही पाहिलेल्या काही नाटकांतली अतिरेकी प्रकाशयोजना पाहून, हे लोक नाट्यमाध्यमाचा विचका करताहेत, असे आम्हाला वाटले.

अलिकडे लाख्यांनीच ‘ मिती चार ‘ तर्फेच माझे ‘ वस्तू ‘ हे नाटक ‘ मिती-चार ‘ या त्यांच्या संस्थेतर्फे सादर केले.. तथाकथित सांस्कृतिक क्षेत्राचा पंचनामा करणारे हे नाटक आहे. काळाचा महिमा म्हणून, योग्य माणसे न मिळणे, आलेली सोडून जाणे, अशा प्रकारच्या अडचणी त्यांनाही आहेतच. तरीही, आपापले काम करत राहणारीही माणसे असतात, यावर त्यांचे काम चालू आहे. एका अगदी वेगळ्या नाटकाचा हा प्रयोग लाख्यांनी फारच छान बसवला होता.

‘ घोकंपट्टी ‘ हे नाटक ‘ आविष्कार ‘ साठी गिरीश पतके करतील, असे चित्र आहे. जगण्यातल्या आपापल्या प्रतिमेचे सातत्य वागवत राहणे, हा विषय नाट्यमय पद्धतीने इथे आला आहे. आता हे नाटक पीडीए तर्फेही अजित सातभाई यांच्या दिग्दर्शनासह येऊ घातले आहे.

‘ ट्रायल ‘ आणि ‘ मन ‘ यांचे प्रयोग झालेले नाहीत. पण, ‘ ट्रायल ‘ आता विजय केंकरे यांच्या अजेंड्यावर आहे.

माझ्या दृष्टीने कोणत्याही कलेची व्याख्या – ‘माया ‘ या ऐवजी ‘ कला ‘ हा शब्द घालून रामदसांच्या भाषेत सांगता येते –

> माया योगियांची माउली
> जेथील तेथे नेऊनि घाली
> कृपाळूपणे नाथिली
> आपण होय ।।

म्हणूनच माझ्या दृष्टीने कलाकृती ही शेवटी महत्त्वाची नसून त्यातले समग्रावधान हेच महत्त्वाचे असल्याने लेखक, अनुभव, कलाकृती हे काहीच महत्त्वाचे राहात नाही. यामुळेच, लेखकाची वा कलावंताची प्रसिद्धी वा प्रतिष्ठा कलेत महत्त्वाची राहू शकत नाही, असे मला वाटते.

हे विवेचन पाहता, साहजिकच इथे आध्यात्मिकतेचा विषय येणे भाग आहे. ‘ आध्यात्मिकता ‘ हा एक बदनाम झालेला शब्द आहे. अंधश्रद्धा, पूजाअर्चा, अभिषेक, कर्मकांड, तीर्थयात्रा आणि उत्सव म्हणजे अध्यात्म आणि या सगळ्यांतला ढोंगीपणा, लूट,अत्याचार आणि फसवणूक म्हणजे सुपर-अध्यात्म असे होऊन बसलेले आहे. चांगली कला आध्यात्मिक असते, असे मला निःशंकपणे दिसते तेव्हा तो शब्द मी वरील अर्थाने वापरत नाही.

<u>अध्यात्मिकता</u>

सुशिक्षित – अशिक्षित, श्रद्धावान - बुद्धिप्रामाण्यवादी, कम्युनिस्ट – मूलतत्त्ववादी, आस्तिक – नास्तिक, हिंसावादी – अहिंसावादी वगैरे सर्व तऱ्हांचे लोक हे मुळात अलगतावादी असतात. स्वतःला आयसोलेट करणे हा मानवजातीत शंभर टक्के पसरलेला विध्वंसक रोग दिसतो. ' प्रेमाने, बंधुभवाने राहू ' अशी वाक्ये वेडपट ठरतात ते त्यामुळेच. हे तर अध्यात्माशिवाय, बुद्धीनेही समजायला अडचण नसते. इथे एखाद्याला असा प्रश्न पडू शकतो की माणसाला अशा अलगतेशिवाय – आयसोलेशनशिवाय – जगणे शक्य आहे का ? – हा झाला आध्यात्मिक प्रश्न. कारण याला तथाकथित बौद्धिक, सुभाषितांची अशी उत्तरे चालत नाहीत. हा प्रश्न विचारायलाही बंदी करणारे, याची टर उडवणारे लोक अलगता, हिंसा, नाश गृहीत धरणारे निराशावादी, बेजबाबदार लोक असतात. प्रत्येक संबंध संघर्षमय का, सगळीकडे फूट का पडते, माणसाचे मन विदीर्ण का, सगळीकडे बेफिकिरी, छळ, क्रूरपणा, स्वार्थ, डावपेच, दडपशाही यांचे थैमान का चालू आहे, माणसाच्या बुद्धीचा या प्रश्नांवर उपयोग काय – असे प्रश्न पडणे म्हणजे अध्यात्माच्या क्षेत्रात प्रवेश करणे. अध्यात्म हे वेड्या, पळपुट्या लोकांचे क्षेत्र आहे असे समजणारे तथाकथित बुद्धिवादी लोकच खरे तर हे सगळे महत्त्वाचे प्रश्न टाळत असतात आणि आदर्शवादाच्या किंवा निराशावादाच्या पळवाटा शोधत असतात. बुद्धी, कल्पना, स्वप्न हे सगळे बाराच्या भावात जात असताना काहीच प्रश्न न पडणाऱ्या लोकांना एकूणात ' मृत ' का म्हणू नये ? अपमान, फसवणूक, अन्याय, मनाविरुद्ध घडणे, अपयश येणे अशा असंख्य जखमा मनात वागवतच जगायला पाहिजे का -- हा प्रश्न समजा आध्यात्मिक आहे, म्हणून विचारायचाच नाही ! फुकट मरायला कुणालाच कुणाची बंदी नाही ! पिढ्यांचे हिशोब आणि अभिमान इथे कुचकामी ठरतात. अशा हजारो पिढ्या आल्या आणि गेल्या ! तुकाराम म्हणतो तसे ' एकविध मन ' ( एकात्म मन -- integrated mind ) म्हणजे अध्यात्म आणि विदीर्ण मन म्हणजे अध्यात्माचा अभाव. थोडक्यात. अध्यात्म नको म्हणजे सवयीच्या विदीर्णतेच्या मार्गानेच जाऊ आणि याशिवाय दुसरे काही शक्य नाही, हे गृहीत धरू. सदगुण, दुर्गुण, आत्मरती, संयम -- हे सगळे मानवी विदीर्णतेच्या ढोंगी क्षेत्रातले शब्द आहेत. विदीर्ण मनाला अध्यात्माची टिंगल करावीच लागते, त्याशिवाय त्याचा आळस समर्थनीय ठरत नाही. अध्यात्म म्हणजे धंदेवाईक मराठी नाटकांतून मांडली जाणारी नैतिक चौकट नव्हे. अध्यात्म म्हणजे काहीतरी सपक, बुळबुळीत आणि निर्जीव काहीतरी असते, असे स्वतःला पटवत राहिले म्हणजे आपणच खरे या जीवनसंग्रामातले शूरवीर असे इतरांना दाखवताही येते. एकाच मानसिक पॅटर्नचे रटाळ, कंटाळवाणे आणि सदोदित वैतागलेले जगणे हे खरे तर अध्यात्माच्या अभावातले जगणे असते. काळज्या, भीती आणि हिंसा यांनी युक्त जगणे हे कोणती अस्मिता बाळगण्याजोगे आणि गौरवास्पद असते ?

जी गोष्ट मानवी मनाची पूर्ण रचनाच बदलणारी असेल, त्याची कार्यपद्धतीच बदलणारी असेल तीबद्दल त्याच जुन्या व्याख्येच्या भाषेत बोला असे म्हणण्यात काही अर्थ नाही. अमर्याद भानाची मर्यादित व्याख्या हे तथाकथित बुद्धिवादी मनच मागते ! बुद्धी हे आपल्या या एकूण विश्वातले सर्वस्व आहे, हे बुद्धीच गृहीत धरू इच्छिते !

विज्ञान, गणित, तंत्रज्ञान अशा बाबतींतला बुद्धीचा उपयोग निर्विवाद आहे. तो प्रश्नच नाही. मानवी संबंधांत बुद्धी जी वाट लावते, तो आहे प्रश्न. फूट, अविश्वास, संघर्ष, हिंसा यांचा गोंधळ आणि सर्व उतारे, आदर्श, मार्ग यांचे सततचे अपयश हीच आहे बुद्धीची या क्षेत्रातली कामगिरी. ही घाण, दुःख, पीडा बघून, या क्षेत्रातला बुद्धीचा वापर नुसता संशयास्पदच नव्हे तर घृणास्पद आहे, यात दुमत होण्याचे कारण नाही. समजा एका जोडप्यात घटस्फोटाची वेळ आलेली आहे, पत्नीला तिच्या पतीबरोबर राहणे शक्यच नाही. घटस्फोटाचा निर्णय घटस्फोट व्हायच्या आधीच घ्यावा लागणार हे तर स्पष्टच आहे. या वेळी जर पती म्हणाला की मीच आहे तुझा आधार, नंतर तू काय करणार, नंतरही प्रत्येक गोष्टीला तू माझी मंजुरी घ्यायला हवीस, तर पत्नी म्हणेल, यू आर रिजेक्टेड – गेट लॉस्ट नाऊ ! तसेच मानवी संबंधांच्या क्षेत्रातल्या बुद्धीचे आहे.

ती रिजेक्टच केली पाहिजे अशी अवस्था आहे. या क्षेत्रात कवडीची लायकी नसलेल्या, उलट वाताहात करणाऱ्या, दुःख, छळ, भीती, पीडा यांची पैदास करणाऱ्या बुद्धीकडून, तिला नाकारल्यावरही, तिची मान्यता घेण्याचे कलम कसे काय समर्थनीय ठरते ? अध्यात्माने असल्या भंगार बुद्धीच्या परीक्षेत पास व्हायची गरज काय ? नाकारल्या गेलेल्या गोष्टीला पुन्हा देव्हारा ? असली अंधश्रद्धा बुद्धीच्या निकषांत तरी बसते का ? मानवी संबंधांच्या क्षेत्रातल्या बुद्धीला लाथ घालून नाकारणे ही अध्यात्माची पहिली पायरी आहे. तसे करणे हे बुद्धीला पटवण्याची काळजी, हे निव्वळ वेडेपणातच जमा होईल. नाकारलेल्या गोष्टीच्या टेस्टला नंतरचेही सगळे उतरत गेले पाहिजे असे म्हणणे म्हणजे नुसते आहे तसे तडफडत मरा असे म्हणणे तर आहेच पण कदापीही या नरकाच्या बाहेरची शक्यताही कुणी शोधता कामा नये, अशी हुकुमशाही आज्ञाही आहे. असल्या आज्ञा न जुमानणारे निघतच राहतात !

विवेकवाद हा बुद्धीचाच भाग असल्याचा पेच यात मला दिसतो. असो. अध्यात्म म्हणजे ' एकविध मन ' हे तुकारामाच्या भाषेतले वर आधीच सांगितलेले इथे पुन्हा एकदा पाहण्याची आवश्यकता आहे.

पिरांदेल्लो, आयनेस्को, बेकेट हे नाटककार अशा प्रकारचे अध्यात्मिक लेखक आहेत असे मला वाटते. मराठीत चिं. त्र्यं. खानोलकर यांच्याकडे या बाबतीत निर्देश करता येईल.

वरील सर्व विवेचन करायचा हेतू हा की नेहमी विचारल्या जाणाऱ्या खालील सर्व  प्रश्नांना –
१. लेखक म्हणून तुम्ही ‘ भूमिका ‘ असण्याचे महत्त्व मानता का ?
२. सामाजिक, राजकीय, आर्थिक परिवर्तनासाठी तुम्ही लिहिता का ?
३. ‘ सामाजिक बांधिलकी ‘  हे साहित्य-मूल्य मानता का ?
४. ‘ विवेक ‘ हेच अंतिम मानवी मूल्य आहे असे तुम्हाला वाटते का ?
५. बुद्धिप्रामाण्यवाद हेच श्रेयस आहे हे तुम्हाला पटते का ?
६. विश्लेषणात्मक, एकरेषीय समज हीच फक्त शक्य आणि आदर्श, असे तुम्हाला वाटते का ?
-- माझे ‘ नाही ‘ हे एकच उत्तर आहे,

माझ्या नाटकातले अनुभव, पात्रे, जे काही घडते ते वा संवाद, स्वतंत्रपणे महत्त्वाचे नसतातच. त्या सर्वांतून व्यक्त होणारे एकूण भानच महत्त्वाचे आणि सर्वांच्या आयुष्यात प्रस्तुत असणारे असे असते. नाटक लिहिण्यापूर्वी माझी पूर्वतयारी अशी काही नसते.  ते कशाबद्दल आहे हे साधारण माहीत असते. बाकी सगळे ओघात, ताजेपणाने येत जाते. नाट्यलेखनाची माझी अट एकच असते – ते लिहिताना मला इंटरेस्टिंग वाटत राहिले पाहिजे. लिहिताना मलाच सुचलेल्या माझ्याच काही विनोदांना मी खळखळून हसून दिलखुलास दादही देत असतो !
--- ००० ---

दोन समकालीन नाटककार

सगळे समकालीन नाटककार असा व्यापक पट घेऊन उरकल्यासारखे लिहिण्यापेक्षा दोन प्रातिनिधिक नाटककार घेऊन, ते अभ्यासून, त्यांवर बोलावे, असे ठरवले. इथे समोर घेतलेले दोन नाटककार आहेत – मनस्विनी लता रवींद्र आणि धर्मकीर्ती सुमंत. या दोन्ही नाटककारांच्या नाटकांत ‘ आजच्या ‘ नाटकांची बरीच वैशिष्ट्ये उपस्थित असल्याचे दिसून येते. आजच्या तरुणतरुणींच्या जगण्याचा माहोल हे दोन्ही नाटककार हाताळतात. त्यातले प्रश्न, नाराजी, असमाधान, खरचटणे, ताण आणि दुःखे, हे या नाटकांचे विषय आहेत. सामान्यतः मराठी नाटक हे शब्दप्रधान असते तशीच यांचीही नाटके असून, त्यांना वाचनमूल्य आणि साहित्यमूल्यही आहे. धर्मकीर्तीच्या ‘ गेली एकवीस वर्षे ‘ या नाटकात एक वाक्य आहे – “ आधीच काही दिग्गजांनी ठरवलंय, शब्दप्रधान नाटक म्हणजे वाईट नाटक. “ पण हे दोन्ही नाटककार याला जुमानत नाहीत. आणखी एका ठिकाणचा त्याच नाटकातला हा संवाद पाहा – “ – इथं तुम्ही नाटकाचा क्राफ्ट ... अभिनय वगैरे बघायला येऊच नका ! तुम्ही एका तरुणाची व्यथा ऐकायला या ... “ प्रेक्षकांच्या मानसिक सवयी अबाधित ठेवून निव्वळ त्यांची करमणूक करण्यासाठी लिहिलेली ही नाटके नाहीत. ऊरबडवेपणा, हसवणे, रडवणे, पल्लेदार वाक्ये वा सुभाषिते, सुरुवात-मध्य-शेवट असलेले कथानक, सविस्तर स्वभावचित्रण, खूप नाट्यमय घटना – यांची काळजी करणारे हे दोन्ही नाटककार नाहीत. दोघेही या पिढीच्या जगण्याचे त्यांचे आकलन आपापल्या पद्धतीने अभिव्यक्त करणारे नाटककार आहेत. त्यामुळे, व्यावसायिक यश मिळवणे, हा त्यांचा हेतू नाही. आजच्या जगण्याच्या माहोलातून येणारी ही सर्जक अभिव्यक्ती आहे. आणि हेच त्यांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

आता ‘ आजचे ‘ किंवा ‘ समकालीन ‘ नाटक म्हणजे काय ? कोणत्याही काळात माणसांचे समूह एकाच वा सारख्याच वास्तवात जगत नसतात. मी एका खेड्यात असताना हे पाहिले होते की एसटीने दोन तासांवर असलेले जिल्ह्याचे ठिकाण तिथल्या अनेकांनी पाहिलेले नव्हते. ‘ अनुभव ‘ च्या मे ’१३ च्या अंकात मधू साबणे या पुण्यात राहणाऱ्या आपल्या मराठीतल्या कादंबरीकाराचा एक लेख आलेला आहे, त्याचे शीर्षक आहे – ‘ तर मी मुंबई पाहिलीच नाही ‘. पुण्यात राहात असून हा लेखक अजून एकदाही मुंबईला गेलेला नाही. मनांवरचे प्रभाव, जगण्याचे माहोल, कामाची क्षेत्रे इत्यादींमुळेही अनुभवप्रकार वेगवेगळे असू शकतात. त्यामुळे ‘ समकालीन ‘ असे एकच काही जगणे चालू असते, असे म्हणता येत नाही. तरीही जगण्याचा साचा, स्वरूप हे काळानुरूप बदलत असतात, हे नाकारता येत नाही. आधुनिक साधने आणि ‘ प्रगती ‘ यांचा लाभ होणारे, तसेच शहरी जीवन जगणारे या अर्थी इथे ‘ समकालीन ‘ म्हणता येईल. त्या अर्थाने, हे दोन्ही नाटककार आपल्यापुढे ‘ आजचे ‘ जगणे सादर करतात. वस्तूंचे आणि माहितीचे स्फोट, सुखसोयी आणि चैनीची वाढती-बदलती साधने, कपडे, खाणे यांतले वैविध्य आणि चोखंदळपणा, वाढते विशेषीकरण ( specialization ), स्पर्धा आणि एकूणच होत असलेले शहरीकरण यांमुळे जगण्याचा रागरंग बदललेला आहे. माणसामाणसांतल्या संबंधांची स्वरूपे बदललेली आहेत. ताण आणि सुखदुःखांची स्वरूपे बदललेली आहेत. त्या संदर्भात या दोन नाटककारांची नाटके पाहावी, अभ्यासावी, असा या लेखाचा हेतू आहे. त्यांच्या जोरकस आणि कसदार अभिव्यक्तीमुळे त्यांना आजचे महत्त्वाचे नाटककार म्हणून पाहणेही आवश्यक आहेच.

या लेखासाठी मनस्विनीची खालील तीन नाटके --

१. सिगारेटस

२. अलविदा

३. एकमेकांत

आणि धर्मकीर्तीची खालील तीन नाटके –

१. पाणी

२. चारू, आरो, इ.

३. गेली एकवीस वर्षे

अशी एकूण सहा नाटके विचारात घेतलेली आहेत. सुरुवातीला य नाटकांचा गोषवारा पाहू. या नाटकांचा आशय, यांत काय घडते यात केवळ नसून मुख्यतः ते घडतानाच्या संवादांत आहे, हे इथे नोंदवायला हवे. आधी मनस्विनीची नाटके –

मनस्विनीची नाटके --

१. सिगारेटस

नेहाला गौतम आवडतो पण तो प्रतिसाद देत नाही. आशिषला नेहा आवडते पण तिला तो आवडत नाही. मनीषला नंदिनी आवडते पण तिला तो आवडत नाही. नंतर गौतम-नेहा यांचे जवळ येणे घडते. गौतम तिला म्हणतो, “मी आवडतो तर आशिषशी अफेयर का केलंस ? “ त्याला ते अनैतिक वाटते. आशिष-नंदिनी ‘ सगळे ‘ ट्राय करून बघतात. नंदिनीला लग्न, जबाबदारी हे काही नको आहे. नेहा आशिषला सांगते की तिला गौतम आवडतो. आशिष चिडतो. तेव्हा नेहा म्हणते, “ तू तर नंदिनीत इन्व्हॉल्व्हही नव्हतास – तिनं सांगितलंय सगळं – “ इथे आशिष अवाक होतो, निघून जातो.

२. अलविदा

निशांत या पात्रावरून नाटक सुरू होते. प्रकाशकाका ( ओबीसी ) हे निशांतच्या बाबाचे मित्र असून निलूमावशी ( ब्राम्हण ) ही त्यांची पत्नी आहे. सई ही त्यांची मुलगी. समीर व तनिशा एकमेकांच्या प्रेमात असून शेवटी त्यांचे तुटते. प्रकाश-नीला यांचे पटत नाही – त्यांचा शेवटी घटस्फोट होतो. सई निशांतला पटकावू शकली नाही, याचे नीलाला दुःख होते. पूजा-निशांत यांचे प्रेम. नीला तिच्या कामासाठी शेवटी आफ्रिकेला जाते.

३. एकमेकांत

स्वप्नील हा एक अभिनेता आहे. पूर्वा-स्वप्नील यांच्यांत प्रेम आहे. ती दोघे एकत्र राहतात. प्रियांका स्वप्नीलशी फ्लर्ट करते. पूर्वा गणपती-वर्गणीवरून सोसायटीच्या सेक्रेटरीशी भांडते. ते तिथे भाड्याने राहात असतात. स्वप्नीलला पूर्वाचे वागणे आवडत नाही. पुढे ते वेगळे होतात. पूर्वा तिच्या घरी राहायला जाते. अमेय तिचा भाऊ आणि मेघना त्याची पत्नी. मेघना बरीचशी ट्रॅडिशनल. पुढे स्वप्नील आजारी असताना पूर्वा येते. पूर्वाचे बाबा आजारी असताना स्वप्नीलही तिकडे जातो. स्वप्नील-प्रियांका यांचे जमते आणि तुटते.

आता धर्मकीर्तीची नाटके –

१. पाणी

मुकुल हा एक क्रियाशील विचारवंत आणि पाणिनी हा ‘ अवलोकन ‘ चा संपादकीय सल्लागार -- आणि मुख्य म्हणजे आंदोलनाकडे एक कार्यकर्ता म्हणून पाहणारा. मुकुलच्या लेखनाला असणारे ग्लॅमर त्याने कार्यकर्त्यांना उत्साह देण्यासाठी वापरावे, त्यांना निराश करायला नव्हे, असे पाणिनीचे म्हणणे. ही चर्चा मुकुलच्या एका लेखाच्या संदर्भात चालू आहे. कार्यकर्त्यांना अंधारात ठेवणे आणि नेत्यांच्या चुकांवर शाल पांघरणे, हे करायला मुकुलचा नकार आहे. त्याने लेखातून, आमीरखानचा पाठिंबा आणि परदेशी फंडिंग हे मुद्दे काढावेत असे पाणिनीचे म्हणणे असते. मुकुल त्याला नकार देतो. पाणिनीच्या मते हा पस्तीस हजार कुटुंबे आणि दोन लाख लोकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न आहे, तो सिनिकली हँडल करू नये.

आमीरखान कोकाकोलाची जाहिरात करतो तर त्याचा पाठिंबा घेणे चूकच आहे, असे मुकुलचे म्हणणे. पाणिनीच्या मते मुकुलने त्याचे परखड विचारही आंदोलनाचे हित लक्षात घेऊन मांडावेत, तर मुकुलच्या मते, असे स्पष्ट, परखड विचार दिल्यानेच आंदोलनाला ताकद मिळेल. कार्यकर्त्यांना वैचारिक झटके हवेतच, असे मुकुलला वाटते. त्या दोघांत कोणताही समझोता न होताच नाटक संपते.

२. चारू, आरो, इ.

दीपक हे एक काल्पनिक पात्र आहे. चारू घरात आल्यावर ( आणि नंतरही अनेकदा ) त्याच्याशी फोनवर बोलतो. घर उकिरडा टाईप अस्ताव्यस्त असल्याचे पाहून वैतागतो. आरोचा फोन येतो. तिचे माधुर्य. ' आपण एकत्र का राहतो ? ' हा त्या दोघांतला प्रश्न, जो शेवटपर्यंत चालतो. चारूच्या पायाला लागलेले असून आरो त्यावर उपचार करते. नंतरच्या संभाषणात, नात्यातल्या एका बारशाच्या कार्यक्रमाला जाणे टाळले जाते. चारूच्या डोक्यात तोच प्रश्न. नाटकात या गंभीर प्रश्नाची लाईट हाताळणी. तिला ' त्रिदेव ' आवडतो, त्याला नाही. तिच्या मते, व्यक्तिगत समजुतींचे / आवडींचे प्रश्न हे जीवनमरणाचे प्रश्न करू नयेत. तिला ' सलाम नमस्ते ' बघायचाय. दुःखी काही नकोय. तिला चारूचा सारखा ॲनालिसिस कंटाळवाणा होतो. ' लिव्ह इन ' असून किती यशस्वी आहोत हे बाहेर दाखवणे आणि आतून पोखरलेले असणे – हे चारूला खटकतेय. आरो म्हणते, " तुझ्या रिलेशनशिपमध्ये दुसऱ्या व्यक्तीचा विचारच नसतो. " ' यशराज ' च्या फिल्म्स खोटारड्या, मेलोड्रॅमॅटिक असल्या तरी त्यांत सुधारणा होत असल्याचे ती सांगते. आपली एकमेकांना गरज आहे म्हणून आपण एकत्र राहतो – या रिलेशनशिपला नावे ठेवायची गरज नाही, असे ती म्हणते. अतिविचारामुळे कलाकृतीची निखळ मजा घेता येत नाही, असे ती म्हणते. त्याला पुन्हा पायाला लागते. ती पुन्हा सेवा करते. " आपण एकमेकांना आवडतो म्हणून एकत्र राहतो " – यावर शेवट होतो.

३. गेली एकवीस वर्षे

लिबरल आईवडिलांचा एकवीस वर्षांचा मुलगा म्हणजे तरुण. त्याची प्रेयसी चाफा. ' त्रास होतो म्हणजे नक्की काय होतं ? ' – हा त्याचा प्रश्न आहे. आईबाबा पुरोगामी. समाजवाद, स्त्रीवाद यांचे पुरस्कर्ते आणि प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात असणारे. तरुण स्वतः कोणत्याही विचारसरणीला बांधील नाही, पण याचा अर्थ त्याला प्रश्नच नाहीत, असा नाही, असे तो म्हणतो. रघू जेव्हा त्याला विचारतो, " तैयार हो इस डर के लिये ? " तेव्हा तरुण म्हणतो, " तैयार होने की क्या बात है सर ... वैसे भी यही तो लाईफ है । " ' कबड्डी कबड्डी ' च्या ऐवजी तो ' लेफ्ट लिबरल, लेफ्ट लिबरल ' – असे म्हणतो, पण आपले मन तसे आहे का, हे त्याला कळत नाही. नंतर चाफा त्याला नकार देते. रघू आव्हान देतो तेव्हा तरुण काहीच प्रतिकार करू शकत नाही. शिक्षण मधेच सोडतो. आपण अपयशी आहोत, असे तो म्हणतो. भीतीचा पगडा. सध्या असलेल्या सगळ्या गोष्टींचा नाश केला पाहिजे, असे त्याला वाटते. सर्वनाशातूनच निर्मिती शक्य होईल, असे तो म्हणतो. शेवटी तो मनोरुग्ण होतो. असंबद्ध बडबड करतो. नाटकाला दोन शेवट आहेत. पहिल्या शेवटात बॉंबहल्ल्यात चाफा मरते. नंतर तरुणाचे ॲरेंज्ड मॅरेज होते. गणपती मिरवणुकीत तो नाचत असताना नाटकाचा शेवट होतो. दुसऱ्या शेवटाप्रमाणे – बुद्ध, शून्य ... दीर्घ श्वास – या वेगळ्या गोष्टी येतात. फुटक्या मनाप्रमाणेच हे तुकड्यातुकड्यांचे, सलगता नसलेले नाटक.

मनस्विनीच्या नाटकांबद्दल तेंडुलकरांचा लेख इथे वाचायला मिळतो. तसेच, धर्मकीर्तीच्या नाटकांबद्दल मकरंद साठे आणि वैभव आबनावे यांचे लेख आहेत. त्यांबद्दलचे थोडे मुद्दे आधी पाहून मग पुढे जाऊ.

मनस्विनीच्या लेखनाचे ' बळ ' – महत्त्वाचे वैशिष्ट्य -- सांगताना तेंडुलकर म्हणतात, " भावनेत आजवर लपलेली जगण्यातली सत्ये ती बघता बघता वरची आवरणे अलग करून त्यांचे ' आतले ' रूप आपल्यासमोर निर्विकारपणे मांडून

ठेवते, रक्ताचा किंवा अश्रूचा एक थेंब न सांडता – अतिशय मोजक्या शब्दांत. एरवी कविता करणारी मनस्विनी तिच्या नाटकात एक शस्त्रक्रियातज्ञ आहे. "  तिचे नाटक बघताना त्यातली एकूणच अलिप्तता अंगावर येत राहते, असे तेंडुलकर म्हणतात. ( पारंपरिक नाट्यमयता नसलेले रोजचे जगणे नाटकातून मांडणे आणि ' धीटपणा ' ही वैशिष्ट्येही तेंडुलकर सांगतात. ) तथाकथित सभ्यतेची खूप बंधने पाळत खोटे खोटे बोलायचे नाकारणारी ही नाटककार आहे. ' निःसंकोचपणा ' हे तर या पिढीचेच वैशिष्ट्य आहे. पण तेंडुलकर म्हणतात ती ' अलिप्तता ', तो ' निर्विकारपणा ' कशातून येतोय, हे पाहायला हवे. मनस्विनीचे ' एकमेकांत ' हे नाटक पाहिल्यावर मी तिला एक ईमेल पाठवला होता, तो असा होता --

" काल तुझे नाटक ' एकमेकात ' पाहिले. उत्तर-आधुनिकतेची सर्व वैशिष्ट्ये या नाटकात आहेत. प्रत्येकाचेच बरोबर, आणि सत्य असे काही नसतेच – असे म्हणता म्हणता अराजक हेच सत्य, असे होते.

तुझी नाटके खूप लोकांनी पाहायला हवीत, म्हणजे, पटापट मते देण्याचे हे प्रश्न नाहीत, हे लक्षात येईल.

कालच्या प्रयोगाची सुरुवातच पडेल झाली आणि पूर्ण प्रयोगच एक पट्टी खालीच झाला, असे मला वाटले.

शुभकामना. "

अमुक बरोबर, तमुक चूक – हे ठरवण्याच्या कोणत्याच मापदंडांवर विश्वास राहिलेला नाही. कुणी कसे वागावे, कुणाला काय वाटावे, वर्तनावर कोणते निर्बंध असावेत – यांबाबतची कोणतीच बंदिस्त रचना इथे उपलब्ध नाही. त्यामुळे, इथे कुणाचीच बाजू घेतली जात नाही, अमुक चुकले, असे सुचवले जात नाही, अमुक एक भूमिका घेतली जात नाही – यांमुळे ती अलिप्तता येते. लेखिकेला मान्य असणारी एखादी नैतिक चौकट या लेखनामागे नाही. उलट, असे काहीच उपलब्ध नसण्यातून नकळत येणारा एक कडवटपणा आहे, असे म्हटले तरी चालेल. उपरे आदर्श आणि खोटी नैतिकता फेकून दिलेली ही दृष्टी आहे. जणू कसलेही आधारच नको असलेली दृष्टी. त्यामुळेच घटनांचे अंदाजही उडवून दिलेली दृष्टी.

' सिगारेटस ' मधला खालचा उपरोधिक संवाद पाहा --

गौतम – बघ, तुला काहीच नीट नाही करता येत. आपल्याला आपण करत असलेल्या प्रत्येक गोष्टीचे परिणाम माहीत असले पाहिजेत. म्हणजे मी इकडे हात केला की काय होईल – मी एखादा घास उचलतोय तर तो माझ्या तोंडात कसा जाणार आहे, हे मला कळलं पाहिजे.

किंवा –

नंदिनी -- ... पण मला आवडत नाही कोणी मला असं वाग, इतक्या वाजताच ये आणि विशेषतः माझ्या प्रोफेशनल कामात ढवळाढवळ केलेली..

किंवा ' अलविदा ' मधला हा संवाद –

सई – बाबा आता बदललाय – आता काय करायचं आणि हेच करायचंय असं स्वीकारून करतो सगळं. पूर्वीचा जग बदलायचा उत्साह नाही राहिलेला – पण त्या दरम्यान पूजा आणि निशांत यायचे घरी. गंमत हीच की त्यांचं जमलंय – मी हातचा चांगला मुलगा घालवला याचं दुःख झालंच असेल आईला ! आणि हो,नुकतंच मला कळलं की समीर आणि तनिशाचं तुटलं.

-- हे असे एका फटक्यात अनेक गोष्टी हाताळणे ! त्यात उद्गारचिन्हेही नाहीत !

याच प्रकारे तयार आदर्श आणि परंपरागत मूल्ये नाकारणे हे धर्मकीर्तीच्या नाटकांतही दिसते. त्याच्या ' मी आणि माझे लिखाण ' या लेखात तो म्हणतो, " एका बाजूला ' जगण्याचा वेग, करावयाची इच्छा असलेल्या  व व्यवस्थेच्या अटी पूर्ण करण्यासाठी गरजेच्या गोष्टी ' आणि ' नैतिकता ' दोन्हींचा ताळेबंद एका मूल्यव्यवस्थेत बसवण्याच्या फंदात न पडता मी

जगणं पुढे पुढे रेटत गेलो. “ आणखी एका ठिकाणी तो म्हणतो, “ माझ्या घरातून कामाच्या ठिकाणी जाताना मला जे एक लाख एकापेक्षा एक भडक आणि सक्ती करणारे अनुभव येतात त्यांच्याच प्रवाहात मी आहे ते सगळे मिळून जे बनतं तो मी आहे ते माझं लिखाण आहे असं म्हणावं लागेल. “ ( लेखात आहे तसे घेतले आहे, नसलेली विरामचिन्हे घालून अर्थ बदलल्याचा आरोप येऊ नये, म्हणून. ) थोडक्यात, हा एक मूल्यहीन गोंधळ आहे. बरोबर-चूक, भलेबुरे, हितकारक-अहितकारक – हे ठरवणे अशक्य असलेला chaos –अराजक आहे. ‘ इतिहास ‘ या विषयावरचे तरुण या पात्राचे, ‘ गेली एकवीस वर्षे ‘ या नाटकातले हे म्हणणे पाहा -- “ जैसे कि हिस्टरी को डिलीट करना चाहिये ... साला सब प्रॉब्लेम उसी में तो है । कोई एक चीज जो बीते हुए पलों की याद दे ... खत्म होनी चाहिए ... “

मकरंद साठे यांनी याच लेखकाच्या दुसऱ्या नाटकांच्या संदर्भात मांडलेले त्यांचे आकलन असे आहे – “ वैचारिकता न नाकारता, समाजभान, परिस्थितीभान आणि मुख्य म्हणजे काही किमान ऐतिहासिक भान ठेवून हा तरुण काही लिहू पाहात आहे. “ एका नाटकात हा तरुण याला इतके महत्त्व देईल आणि दुसऱ्या नाटकात हे सगळे धुडकावून लावेल, तर न जणो, तो नुसताच एक तंत्रकुशल लेखक ठरेल. पण हा तसा मुळीच नाही. हा एक गंभीर, सर्जनशील लेखक आहे. त्याच्या कमी वयाचे उल्लेख करून त्याला पॅट्रनाईज करायची मुळीच गरज नाही, असा हा एक परिपक्व लेखक आहे. ‘ बुद्धिवादविरोधा ‘ ची मकरंद साठे यांना ॲलर्जी असावी. तेंडुलकरांना, जणू ते आरोपी असल्याप्रमाणे, त्यांनी याचे जनक ठरवले आहे. याच्या जणू विरोधात, धर्मकीर्ती “ हा एक ‘ विचार ‘ करू पाहणारा आणि ‘ विचारप्रवृत्त करणारा ‘ लेखक आहे. “ – असे साठे म्हणतात. लेखकाचे विचार आणि त्याची प्रत्यक्ष नाटके पाहता, हे अर्थातच स्वतःच्या अपेक्षा या नाटकांवर आरोपित करणे आहे. कारण, चांगले म्हणायचे हे आधीच ठरलेले असावे. मुळात साठे म्हणतात त्याप्रमाणे ‘ पाणी ‘ हे प्रामुख्याने राजकीय नाटक आहे का ? माहोल चळवळीचा असला तरी, विचार आणि कृती यांतले अंतर हा या नाटकाचा विषय आहे. मानवी जगण्यातला हा अत्यंत महत्त्वाचा विषय असून कोणत्याही माहोलात तो अस्तित्वात असू शकतो. विचार आणि कृती यांतले द्वंद्व हा खरे तर या नाटकाचा विषय आहे. या प्रश्नाचे सर्वांगीण आकलन व्यक्त झाल्यावर नाटक संपते. यात लेखक कोणतीही ‘ भूमिका ‘ घेत नाही. बरोबर-चूक, योग्य-अयोग्य – अशी कोणतीही बाजू घेत नाही वा तसे काही सुचवतही नाही. या द्वंद्वाच्या प्रश्नाला अमुक एक बरोबर, असे उत्तर असू शकत नाही, हेच आकलन हे नाटक व्यक्त करते. पण, उत्तर-आधुनिकतेप्रमाणे मूळ नाटक असे काही नसतेच, त्याच्या प्रत्येक वाचकाने / प्रेक्षकाने काढलेल्या आपापल्या प्रती फक्त असतात. माझ्यासारख्याला एक वेळ असे म्हटलेले चालू शकेल कारण मला बुद्धीचे विशेष कौतुक नाही. पण साठ्यांना असे म्हटलेले चालेल का ? त्यांना उत्तर-आधुनिकतेत बसवले तर त्यांच्या आवडत्या बुद्धिवादाची वाट लागेल ! आणि तेंडुलकर बुद्धिवादविरोधाचे जनक होते ? तसे असते तर मराठी नाटक कुठच्या कुठे पोचले असते ! ‘ सखाराम बाइंडर ‘ सारखा एखादा अपवाद वगळता, साठ्यांचे हे विधान पटणारे नाही. बुद्धिवादाच्या ‘ कोत्या ‘ मर्यादेत वावरणाऱ्या कलाकृती कधीच
‘ मौल्यवान ‘ ( वा ‘ अक्षर ‘ ) निपजत नाहीत, हे इथे नमूद करावेसे वाटते. ‘ पाणी ‘ हे नाटक बुद्धीच्या, विचाराच्या मर्यादा व्यक्त करणारे नाटक असल्यानेच ते मराठीतले एक महत्त्वाचे / प्रगल्भ नाटक ठरते. धर्मकीर्ती वा मनस्विनी, त्यांची नाटके कुठल्याही भूमिकेत अडकवत नाहीत आणि त्यामुळेच हे दोघेही मराठी नाटक एका उंचीवर नेणारे लेखक ठरतात. ‘ गेली एकवीस वर्षे ‘ या धर्मकीर्तीच्या नाटकाबद्दल लिहिताना वैभव आबनावे काय म्हणतात ते पाहा – “ आत्मिक, भावनिक, सामाजिक, राजकीय अशा जगण्याच्या सर्व पातळ्यांना कवेत घेऊ बघणारा, कुठल्याही अभिनिवेशाशिवाय समग्रतेची आस लागलेला, असा हा पिपीलिका मार्ग. या मार्गाचे प्रतिध्वनी समकालीन मराठी लेखकांमध्ये प्रामुख्याने

मकरंद साठ्यांच्या लिखाणात आढळतात. या मार्गाची पुसटशी चाहूल धर्मकीर्तीच्या ‘ गेली एकवीस वर्षे ‘ मध्ये जाणवते. “ उलट, अशा
‘ समग्र ’ तेचा प्रतिध्वनी साठ्यांच्या नाटकांत मुळीच सापडत नसून धर्मकीर्तीच्या नाटकात त्याची ‘ पुसटशी चाहूल ‘ नव्हे तर ‘ स्पष्ट, स्वच्छ दर्शन ‘ घडते, असे म्हणायला हवे. आबनाव्यांना साठ्यांची खरे तर स्तुती करायची आहे, पण साठ्यांना ती निंदा वाटण्याचीच स्पष्ट शक्यता आहे. म्हणजे साठ्यांनी चुकीच्या कारणांनी धर्मकीर्तीच्या नाटकांना चांगले म्हणणे आणि आबनाव्यांनी चुकीच्या कारणांनी साठ्यांच्या नाटकांना चांगले म्हणणे, अशी इथे एक मजेदार फिट्टंफाट होऊन जाते !
( भूमिकावाल्यांना समग्रतेचा संताप असतो, हे लक्षात घ्या. )

आता मनस्विनी आणि धर्मकीर्ती यांच्या नाटकांतून काय काय व्यक्त होते, ते पाहू. उत्तर-आधुनिक म्हणजे काय आणि ही नाटके उत्तर-आधुनिक आहेत का, अशा चर्चेत न जाता, या नाटकांतून कोणत्या जाणिवा व्यक्त होतात ते पाहू. तयार आदर्श, पारंपरिक नैतिक मूल्ये, सार्वकालीन सत्ये – या गोष्टी ही नाटके नाकारतात. इतिहासाच्या विश्लेषणातून वा बुद्धीने वा स्वभावाने जगण्यातल्या प्रश्नांवर – संबंधांच्या प्रश्नांवर – उत्तरे सापडतात, यावर या नाटकांचा विश्वास नाही. जगणे सुसंगत नसून विसंगत आहे आणि विदीर्णतायुक्त आहे, ही या नाटकांची पायाभूत जाणीव दिसते. हे सगळे गृहीत धरून, जमेल तसे जगत जायचे, एवढेच शक्य आहे, अशी जाणीव इथे व्यक्त होते. ही एक प्रकारे बंदिस्ततेची, मर्यादायुक्ततेची आणि अगतिकतेची जाणीव आहे. त्यामुळे, सारांशरूपाने याला निराशावादही म्हणता येईल. इथे ‘ आधुनिक समीक्षा-सिद्धान्त ‘ या मालशे-जोशी यांच्या पुस्तकातले पृष्ठ १८२ वरचे उत्तर-संरचनावादाबाबतचे विवेचन, इथल्या जाणिवांच्या संदर्भात, पाहण्यासारखे आहे -- “ उत्तर-संरचनावाद हा मूलभूत तार्किकतेला, मूलभूत तत्त्वांनाच नष्ट करू पाहतो. सुसंगती, सलगता, विवेकाधिष्ठित वा तर्कनिष्ठ ज्ञान, यांच्या ऐवजी विसंगती, विलगता, विकेंद्रीकरण यांच्या साहाय्याने मानवी जीवनाचा, मनाचा, भाषेचा, संस्कृतीचा वेध घेऊ पाहणाऱ्या या विचारसरणी आहेत. मानवी जीवनात वा इतिहासात सकारात्मक क्रांती घडू शकते, यावर या विचारसरणीचा विश्वास नाही. मानवी जीवनाला, संस्कृतीला, इतिहासाला मिळणारी दिशा ही कोणत्याही सकारात्मक दृष्टिकोणातून पाहणे या विचारसरणीमध्ये शक्य नाही. अगदी टोकाला जाऊन मांडलेल्या या सापेक्षतावादी भूमिका मूल्यदृष्ट्या ‘ अराजकवादी ‘ आहेत, असे म्हणणे भाग आहे. “ -- अशा प्रकारच्या
‘ अराजकवादा ‘ चा अनुभव या दोन्ही नाटककारांच्या नाटकांतून येतो.

मनस्विनीची नाटके

मनस्विनीची तिन्ही नाटके स्त्री-पुरुष ( तरुण-तरुणी ) संबंध, त्यांतले प्रश्न आणि पेच – या क्षेत्रात फिरताना दिसतात. हे मध्यमवर्गाचे वा अतिश्रीमंत वर्गाचे प्रश्न आहेत, असे काही म्हणून हे सगळे फेटाळता येईल का ? काहीजणांना वाटते की मध्यमवर्गीय अनुभवक्षेत्रातून चांगली कलाकृती निर्माण होऊ शकत नाही. काही तथाकथित बुद्धिवादी असाही भ्रम पसरवायचा प्रयत्न करताना दिसतात की राजकीय नाटक वा राजकीय कादंबरी हीच श्रेष्ठ कलानिर्मिती असू शकते. कलाकृतीचे अनुभवक्षेत्र वा तीत हाताळलेले प्रत्यक्ष अनुभवद्रव्य कोणते आहे, यावर त्या कलाकृतीचे श्रेष्ठत्व अवलंबून असते का ? तसे असेल तर भारतातली सर्वोत्तम कलाकृती कोणत्या जनसमूहातून निर्माण होईल, हे सांगता आले पाहिजे. तसेच जगातली सर्वश्रेष्ठ, मौल्यवान कलाकृती कोणत्या देशातून निर्माण होईल, हेही सांगता आले पाहिजे. पौराणिक,

ऐतिहासिक, सामाजिक यांप्रमाणे ‘ राजकीय ‘ हे एका माहोलाचे निर्देशन असू शकते. ते मूल्य असू शकत नाही, हे लक्षात घ्यायला हवे.
मानवी संबंधांचा आवाका आणि त्यांच्या आकलनाची कुवत, झेप, गांभीर्य यांवरच कलाकृतीची मूल्यात्मता अवलंबून असते. आपल्याकडे महायुद्धात प्रत्यक्ष होरपळणे झाले नाही म्हणून आपल्या कलाकृती खुज्या राहतात, असे समजणे हे निव्वळ बावळटपणाचे आहे. थोडक्यात, अमुक एक छोटे अनुभवक्षेत्र हाताळले जाणे हे या नाटकांचे वैगुण्य ठरत नाही, हे आधी लक्षात घेतले पाहिजे.

मनस्विनीच्या नाटकांतल्या तरुण-तरुणींनी अर्थातच आपापल्या पालकांचे जगणे पाहिलेले आहे. ते त्यांना फालतू, निरर्थक, नाइलाजाचे वाटलेले असल्याने, त्यांच्या जगण्यात त्यांना तेच, तसेच नको आहे. जुने प्रश्न टाळणारे असे ते काही वेगळे जगू इच्छितात. तसे वेगळे त्यांचे प्रत्यक्ष जगणे चालूही आहे. जुन्या नीतीकल्पना यात निकालात निघत असल्याने हे
‘ धीट ‘ ही वाटू शकते. पण या नाटकांत धीटपणा हा सनसनाटीपणासाठी आलेला नाही. ती, त्या जगण्याच्या जुन्या साच्याला आलेली तीव्र प्रतिक्रिया आहे. ( या कारणासाठी ही नाटके मानसिक, सामाजिक दृष्ट्याही अभ्यसनीय ठरू शकतील. ) जुनी नीतीमूल्ये उराशी बाळगून जगणारे, ही नाटके पाहून स्तंभित होऊ शकतीलही, पण असाही एक प्रश्न विचारला पाहिजे की, अशा प्रकारचे ‘ नवे ‘ जगणे माहीत असलेले वा स्वतःच्या जगण्यात ते स्वीकारलेले जे कुणी असतील त्यांना ही नाटके काय देतील ? मुळात त्यांना काही देऊ शकतील तरी का ? याचे उत्तर नक्कीच होकारार्थी आहे. आपला जगण्याचा साचा, आपल्या मनाचे प्रोग्रामिंग, आपले विचार, कल्पना, आपली सुखे, चांगल्यावाईटाचे व न्यायाचे आदर्श – हे सगळे प्रत्येकाला बरोबर वाटणे आणि त्यामुळे अर्थातच दुसऱ्याचे चूक वाटणे, ही एक माणसाच्या जगण्यातली अटळ अशी ‘ अराजकी ‘ अवस्था आहे. या अवस्थेचा आणि तिच्या बिनतोड दिङ्मूढतेचा प्रत्यय ही नाटके देतात. या अर्थाने ती जगण्यातल्या एका मूलभूत प्रश्नाला भिडतात. जर कंडिशनिंग आणि बौद्धिक कृती यांतून निराकरणे येऊ शकत नसतील तर काय ? – हा तो प्रश्न. हेच या नाटकांचे महत्त्व आहे. प्रत्येक वेळी या प्रश्नाच्या संपृक्त अवस्थेचा अनुभव देऊन ही नाटके संपतात. त्याचे उत्तर देणे, निराकरणाची पद्धत सांगणे वा त्याबाबत ‘ भूमिका ‘ घेणे – असला उथळपणा ही नाटके करत नाहीत. कोणती तरी पारंपरिक वा वैचारिक मूल्ये महत्त्वाची असल्याचे डोक्यात ठेवून अनुभवांची मांडणी होणे वा त्या पार्श्वभूमीतूनच त्यातला उपरोधही अवतरणे, ही मराठी नाटकांची सवय पाहता, त्या परंपरेवर तर ही नाटके अधिकच लक्षवेधक ठरतात. कोणतीही ‘ भूमिका ‘ न घेता नाटक लिहिले जाणे, ही मराठीत क्वचित घडणारी घटना ( तेंडुलकरांनाही
‘ सखाराम बाइंडर ‘ इतके हे कुठे जमले का, ते पाहावे. ) इथे प्रकर्षाने घडताना दिसते. जगण्यातल्या मूलभूत प्रश्नांना सामोरे जाणे, हा नाटककाराचा जाणीवपूर्वक हेतू असो वा नसो, प्रेक्षकांना ही नाटके त्यासाठी उद्युक्त करतात, हेच अशा नाटकांचे अनन्यसाधारणत्व म्हणायला हवे. मनस्विनीची नाटकेही या वैशिष्ट्याने युक्त आहेत हे निश्चित.

आता मनस्विनीच्या नाटकांतले काही संवाद पाहू --
नेहा – नाही रे. उलट गंमत वाटतेय. थ्रिलिंग वगैरे. म्हणजे या आधी माझं जे अफेयर होतं ना ते तसं कुणी कुणाला स्पष्ट न सांगताच झालं. पण त्यामुळेच जास्त त्रास झाला. त्यापेक्षा हेच बरंय. कसं होतं ना, माझ्याकडूनच प्रेम दिसायचं, मला गरज आहे असं वाटायचं. अर्थात नंतर मग तो सोडता सोडे ना. ( सिगारेटस – पृ. ८. )

गौतम – हे बघ,  आशिष माझा मित्र आहे आणि तू त्याची प्रेयसी आहेस. मला स्वतःला असं वागणं बरोबर वाटत नाही आणि मला गिल्टमध्ये राहायला आवडणार नाही. बस ! त्यामुळे आपण थांबू. बाय, मी निघतो. ( नेहा नुसती त्याच्याकडे बघते आणि बघत राहते. ) – ( सिगारेटस – पृ. ३१. )
सई -- … अजून एक गंमत झाली. माझी आई नक्की दुःखी झाली असेल. असंच पाहिजे. मी परीक्षा झाल्या झाल्या बाबाकडे गेले – खूप मजा केली. बाबा आता बदललाय – आता काय करायचं आणि हेच करायचं असं स्वीकारून करतो सगळं. पूर्वीचा जग बदलण्याचा उत्साह नाही राहिलेला  पण त्या दरम्यान पूजा आणि निशांत यायचे घरी. गंमत हीच की त्यांचं जमलंय – मी हातचा चांगला मुलगा घालवला याचं दुःख झालं असेल आईला ! आणि हो, नुकतंच मला कळलं की समीर आणि तनिशाचं तुटलं. – ( अलविदा – पृ. ७४. )
पूर्वा -- … तू मला घरी बोलावतोस आणि हे सांगतोस की माझ्यामुळे तुझ्या आयुष्याची वाट लागली आहे … मला काहीच इमोशन्स नाहीत का रे ? की मला फक्त लॉजिकल गोष्टींवरच चिडायचा हक्क आहे ? ( तिला रडू आवरत नाही … ) मी …  – (  एकमेकांत – पृ. ४५. )
निरनिराळ्या दिशांनी जाणाऱ्या, निरनिराळे प्रभाव असलेल्या वस्तुस्थिती, परिस्थिती, मनाच्या कृती – हे सर्व जाताजाता सहज व्यक्त होण्याची किमया या अशा संवादांतून घडते, म्हणून यांना ‘ प्रगल्भ ‘ संवाद म्हणायचे. असे खूप संवाद या नाटकांत आहेत. जगण्यातली एक प्रकारची अटळता, ॲब्सर्डिटी, शोकात्मता आणि हास्यास्पदता – या सगळ्याचे भान ही नाटके व्यक्त करत जातात. मराठी नाटकात हे अपवादाने घडणारे आहे. हे या नाटकांचे वेगळेपण आहे.

धर्मकीर्तीची नाटके

मनस्विनीची नाटके तुलनेने सौम्यपणे आक्रमक तर धर्मकीर्तीची अधिक आक्रमकपणे आक्रमक आहेत, असे म्हणता येईल. धर्मकीर्तीच्या नाटकांचा वस्तु-ऐवज मनस्विनीपेक्षा अधिक विस्तृत आहे. अर्थात त्यामुळे मूल्यात्मक श्रेष्ठता कमीजास्त ठरते, असे नाही. या सत्यासाठीही ही तुलना करून पाहावी. दोघेही तोडीस तोड मौल्यवान नाटककार आहेत. मनस्विनी ही सहजच सखोल होत जाते तर धर्मकीर्ती जाणीवपूर्वक सखोल लिहितो, असे दिसते. धर्मकीर्तीची तिन्ही नाटके वेगवेगळ्या अनुभवक्षेत्रांची आणि वेगवेगळ्या शैलींतली आहेत. ‘ पाणी ‘ हे नाटक अधिक बौद्धिक, वैचारिक पद्धतीचे आहे, ‘ चारू, आरो, इ. ‘ हे स्त्री-पुरुष संबंधांबाबतचे असून गांभीर्य आणि विनोद यांची विचित्र भेसळ करणारे आहे, तर ‘ गेली एकवीस वर्षे ‘ हे विदीर्ण मनाची सतत जाणीव होत राहावी अशा तुटक्या-फुटक्या तंत्राने लिहिलेले एक वेगळेच नाटक आहे. या दोन्ही नाटककारांना जगण्यातले मूलभूत प्रश्न प्रकर्षाने जाणवलेले आहेत, यात शंकाच नाही. तसे नसते तर, मराठी नाटकाच्या भाबड्या-बावळट परंपरेत आणि मिसगाईडिंग ( ‘ वाम ‘ मार्गाला लावणाऱ्या ) समीक्षेच्या वातावरणात त्यांनी अशी नाटके लिहिलीच नसती. मराठी नाटकाच्या सांस्कृतिक पर्यावरणात ही दोन वेगळीच रोपे तरारून उगवलेली आहेत, याकडे नीट आणि पुरेसे लक्ष का दिले गेले नसावे, हे पाहायला हवे.

धर्मकीर्तीचे ‘ पाणी ‘ हे नाटक म्हणजे मराठीतला एक मास्टरपीसच आहे. ते राजकीय – एका आंदोलनाचा – माहोल हाताळत असल्याने त्याला ‘ राजकीय ‘ म्हणायला हरकत नाही, पण त्याच्या श्रेष्ठत्वाचे ते कारण नव्हे. विचार आणि कृती यांतले द्वंद्व हाताळणारे हे एक महत्त्वाचे नाटक आहे. प्रत्यक्ष विचार घडणे आणि त्याची अभिव्यक्ती होताना ‘ हेतू ‘ ठरवणे वा लक्षात घेणे आणि अमुक हेतू साध्य होतील वा न होतील यावर मतभेद असणे – हा एक अत्यंत जटिल आणि गंभीर विषय हे नाटक समर्थपणे हाताळते. ‘ समर्थपणे हाताळणे ‘ याचा अर्थ त्या प्रश्नाचे निराकरण सुचवणे वा  ‘ भूमिका ‘ घेणे वा एखाद्या बाजूला कलणे – असा मुळीच नाही. असले काहीच हे नाटक करत नाही. या प्रश्नाचे ‘ समग्र भान ‘ व्यक्त

करण्याचे काम फक्त हे नाटक करते. हा प्रश्न फक्त राजकीय क्षेत्रातला नसून एकूण माणसाच्या जगण्यातलाच आहे, याची जाणीव हे नाटक निश्चितच देते. याकडे दुर्लक्ष करून या नाटकाबद्दल लिहिणाऱ्या तथाकथित बुद्धिवादी ‘ विचारवंतांची ‘ आपमतलबी मखलाशी सहज उघडी पडावी, असे हे नाटक आहे. ( इथे ‘ उध्वस्त धर्मशाळा ‘ हे मराठीतले तथाकथित राजकीय नाटक आठवावे. नायकाची बाजू घेऊन लिहिल्यामुळे ते नाटक खुजे पडलेले आहे. त्या नायकाच्या विचारसरणीचे लोक सत्तेत असतात तिथे इतरांचे काय करतात ? – हा साधा प्रश्न विचारला की या नाटकाचा फुगा फुटतो. तथाकथित बुद्धिवाद्यांनी आणि डाव्या बांधिलकीवाल्यांनी फुगवून मोठे केलेले असे हे मराठीतले, खरे तर एक किरकोळ नाटक आहे. माणसाच्या जगण्याचे भान देण्यापेक्षा एका विचाराची तरफदारी करत बसणारे हे एक संकुचित नाटक आहे. त्यामुळे, सांस्कृतिक दृष्ट्या
‘ मौल्यवान ‘ ठरावे, असे या नाटकात काहीही नाही. मग नेमाड्यांसारखे, आशयाच्या अंगाने बोलायचे टाळणारे समीक्षक, यातल्या संवादभाषेची स्तुती करून वेळ मारून नेत असले तरी ! )

‘ चारू, आरो, इ. ‘ हे नाटक स्त्री-पुरुष संबंधांचा विषयच हाताळते पण एका वेगळ्या, अपवादात्मक पद्धतीने. गांभीर्य आणि हलकेफुलकेपणा यांचे अजब मिश्रण या हाताळणीत आहे. एकमेकांच्या विरुद्ध दिशांनी जाणाऱ्या डोक्यांनी शेवटी ‘ आपण एकमेकांना आवडतो ‘ इथे येणे, हे बौद्धिक कारणमीमांसेच्या पलीकडे जाणारे असे जगण्यातले अजब सत्य व्यक्त करणारे आहे. सर्व विसंगतींतून हे सत्य सापडणे, हे अत्यंत अर्थपूर्ण आणि निरर्थपूर्ण एकाच वेळी आहे.

‘ गेली एकवीस वर्षे ‘ हे धर्मकीर्तीचे नाटक तर मनाची विदीर्णता, नाटकाच्या तंत्रातून आणि संवादांतूनही व्यक्त करणारे मराठीतले एक अपवादात्मक नाटक आहे. या नाटकाच्या या महत्त्वाच्या क्षमतेसाठी याची कितपत दखल घेतली गेली ? इथे एक मुद्दा स्पष्ट केला पाहिजे. हे नाटक पाहिल्यावर माझे एक मित्र म्हणाले की हे इंडियाचे नाटक आहे, भारताचे नाही. विचाराची ही पद्धत चुकीची आहे. कोणत्याही माहोलातले नाटक, त्यात जर जगणे समजून घेणे असेल तर, दुसऱ्या कुणालाही ‘ प्रस्तुत ‘ च असते. माहोल कोणता आहे, याला महत्त्व नसून ‘ भान ‘ व्यक्त होण्याला महत्त्व असते. तसे नसेल तर जी ती कलाकृती फक्त तिच्या निर्मात्यालाच ‘ प्रस्तुत ‘ असते, असे म्हणावे लागेल.

आता धर्मकीर्तीच्या नाटकांतले काही संवाद पाहू –
पाणिनी -- ... मुक्या, माझं स्पष्ट म्हणणं आहे की हा लेख कंप्लीट अँटिऍक्टिव्हिटी आहे, सिनिक आहे, मागे घे ... रिराईट कर ... तुझा तो पर्यायी नेतृत्वाचा मुद्दा तसाच राहू दे ... पण हा फॉरेन फंडिंग, आमीरखान प्रकरण वगैरे कट कर ... परत दे. दोन दिवसांत छापून येईल ... आणि करेक्ट होईल. --- ( पाणी – पृ. ११. )
मुकुल – ... वेळेबरोबर माणसं बदलतात. एकानं दुसऱ्यासारखं असावं असं काही नसतं. – ( पाणी – पृ. १९. )
मुकुल – तुझी बाजू, आंदोलनाची परिस्थिती, विस्थापित, पर्यावरणाचे प्रश्न, तत्त्वाचा प्रश्न हे मला समजलेच नाहीत, असं तुला अजूनही वाटत असेल, तर माझा इलाज नाही. – ( पाणी – पृ. २७. )
चारू – हॅलो दीपक, ही कॉन्फ्लिक्टस असे वाऱ्यावर सोडून कसे देऊ शकते अरे ? आणि मेन म्हणजे वादात हरल्यावर हिला काहीच कसं वाटत नाही ? का हिला असं वाटत राहतं की ही जिंकली आहे वगैरे ? पण मग याचा अर्थ ही माठ आहे. – ( चारू, आरो, इ. – पृ. ४२. )
आरो – तुझ्या रिलेशनशिपमध्ये दुसऱ्या व्यक्तीचा विचारच नाहीए. – ( चारू, आरो, इ. – पृ. ४८. )
चारू -- ... आयुष्यात ना कुणाशीच न जुळणं हा अतिबुद्धीचा दुष्परिणाम आहे. – ( चारू, आरो, इ. – पृ. ५२. )

तरुण – पण डोक्यातले विचार आणि कचराडेपोत काहीच फरक नाही. तिथेही पाठ्यपुस्तकापासून कंडोमपर्यंत सगळ्याची मिसळण झालीय ... – ( गेली एकवीस वर्षे – पृ. ५. )

तरुण – आईवडील लिबरल असल्याने मीही काहीसा गोड, प्रेमळ, कनवाळू. सर्वसामान्य मुलींना माझा लुक आवडतो. – ( गेली एकवीस वर्षे – पृ. ६. )

तरुण -- ... मी दलित नाहीए, ना संघाचा, ना ऑर्थोडॉक्स ब्राम्हण, ना अपंग, ना गे, ना हिजडा, ना धड स्किझोफ्रेनिक, ना समाजवादी, ना मला पैशांचा प्रॉब्लेम आहे. ना मी पाच रुपयांत महिना काढलाय. ना मी लेफ्टी आहे, पण म्हणून मला प्रश्नच नाहीत असं नाही ना ? ... – ( गेली एकवीस वर्षे – पृ. १७. )

तरुण – ए ऐका ना, आपले विचार नाही पटत मान्य ... पण आपण डबा तर एकत्र खाऊ शकतो ना ... मी आज पावभाजी आणलीए. – ( गेली एकवीस वर्षे – पृ. २२. )

तरुण – असं सरळ बोलायला लागलो तर नाटक आणि भाषणात फरक काय ? घटना नको का घडायला ? आणि आधीच काही दिग्गजांनी ठरवलंय शब्दप्रधान नाटक म्हणजे वाईट नाटक. – ( गेली एकवीस वर्षे – पृ. ३०. )

तरुण – आय डोंट केअर ! हे बघ ! परत कोणी विचारलंच ना तर म्हणीन इथं तुम्ही नाटकाचा क्राफ्ट ... अभिनय वगैरे बघायला येऊच नका ! तुम्ही एका तरुणाची व्यथा ऐकायला या ... -- ( गेली एकवीस वर्षे – पृ. ३३. )

मेरिलीन मन्रो प्रसिद्धी आणि संपत्तीत लोळत होती तरीही तिला आत्महत्या करण्यासारखे प्रश्न पडले. गौतम बुद्धाला जे प्रश्न पडले ते त्याला पडायची काय गरज होती – असे म्हणता येणार नाही. हजार प्रकारे माणसाचे जगणे चालू असते. विषमता आणि गरिबी हे प्रश्न मिटेपर्यंत बाकी सगळे स्थगित ठेवावे, असे होऊ शकत नाही. भारतात आता मध्यमवर्गाचे प्रमाण वाढते आहे, याचा अर्थ इतक्या लोकांना पडणारे प्रश्न निरर्थक आहेत, असे होत नाही. प्रश्नांचे अग्रक्रम ठरवून, पहिले तीन प्रश्न सुटेपर्यंत कला, तत्त्वज्ञान हे बंद ठेवावे, असे म्हणणे वेडेपणाचे ठरेल. सांस्कृतिक कृती या इतर प्रश्न सुटण्याच्या प्रक्रियेलाही हातभार लावत असतात, हे दुर्लक्षिता येणार नाही. त्यामुळे, जगण्याच्या सगळ्या पद्धती, कृती -- ज्यांत जगणे समजून घेण्याची आच असेल -- त्या सर्व चालू राहणेच हितकारक आणि अटळही असते. सगळेच एकमेकावर परिणाम करत असते. संवेदनशीलतेने समजून घेण्याच्या प्रयत्नात जगणे हे अनेक स्तरांवरचे, अनेक प्रकारांचे असू शकते. त्यांतलाच हा एक प्रकार आहे – नकार ! धर्म, विचारसरणी, आदर्श, पारंपरिक नीतीकल्पना – या सगळयांबाबत भ्रमनिरास झाल्याची ही अवस्था आहे. बरोबर-चूक असे म्हणण्यात काही अर्थच राहू नये, जो तो आपापल्या पद्धतीने जगतो -- एवढेच दिसावे, यशापयशात तथ्यच राहू नये, अशी ही मनःस्थिती आहे. ही जगण्याच्या एका प्रक्रियेतली खरी, प्रामाणिक अवस्था आहे. इथे कुणी कुणाला शिकवण्याचा, वळण लावण्याचा वा सल्ला देण्याचा प्रश्न नाही. सगळ्याच मनःस्थिती बद्ध आणि मर्यादित असतात, तशीच हीही एक आहे. हीही नक्कीच एक त्रासदायक अवस्थाच आहे, सुखाची मुळीच नाही. पण हिचे निराकरण कशाने होणार ? भावनात्मकता, बुद्धी, विचार यांवर विश्वास राहिलेला नाही. अशी ही बंदिस्त, दिङमूढ अवस्था आहे. जगण्याचा हेतू काय, पाया कोणता – हेच न समजणे ! अशा नकाराची ही अवस्था असल्याने यातून ती पळवाटा शोधत नाही. त्यामुळे, या नकाराला मूलभूत प्रश्नाचे रूप येते आणि तो प्रत्येकालाच प्रस्तुत ठरतो. हे ‘ दिसणे ‘ म्हणजे या मूलभूत प्रश्नाच्या समावेशकतेचे भान येणे असते. असंख्य प्रश्नांनी युक्त असणाऱ्या जगण्यातली असंगतता आणि अर्थहीनता यांचेही हे भान असते. सर्वच मनःस्थिती सत्य असतात, या गृहीतकातल्या अराजकतेचीही, हे जाणीव होणे असते.

मनस्विनी आणि धर्मकीर्ती यांची नाटके ही नुसती करमणुकीची नाटके नाहीत. ती आताच्या पिढीत जगणाऱ्या व्यक्तींची , त्यांच्या जगण्याच्या प्रक्रियेची, प्रगल्भ अभिव्यक्ती आहे. अशा गांभीर्याने आणि प्रसंगी गंभीर गंमतीनेही जगण्याकडे पाहणे, हे नक्कीच माणसाला सवयीबाहेर काढणारे आहे. समजून घेण्याची सर्व साधने ही नुसती अपुरी आणि निरुपयोगीच नाहीत तर गोंधळ निर्माण करणारी आहेत, तर काय ? – या प्रश्नापर्यंत घेऊन जाणारे हे दोन्ही समकालीन नाटककार मराठीत अपवादात्मक महत्त्वाचे आहेत, हे निश्चित !

--- ००० ---

डावेदार

सार्त्र अमुक विचारसरणीचा होता का, त्याची बांधिलकी बदलत असे का, वगैरे विद्वत्तेची मला गरज  नाही. त्याला विचारसरणी या प्रकारातली गोची कळलेली होती, हे नक्की. त्याचे ‘ क्राईम पॅशनेल ‘ हे नाटक वाचले तर मी काय म्हणतोय ते लक्षात येईल. विचारसरणी एक – त्यातले जहाल आणि मवाळ गट – आणि त्यांचे आपापल्या विचारांशी ठाम असणे ! त्यामुळे निर्माण होणारे खुनाखुनीचे राजकारण ! अमुक खून करून येण्याची कामगिरी. आणि ती फत्ते होईपर्यंत कामगिरी सोपवणाऱ्यांचेच विचार बदललेले ! शेवटी सगळे येते मानवी संबंधांवर – स्त्री-पुरुष संबंधांवर ! नेमके खरे काय घडले, हे चेक करायचे आहे. खून केलेला असतो स्वतःची पत्नी त्या पुढच्याच्या मिठीत पाहून – पण खुनी म्हणतो, मी त्याचा मृत्यू, ते खरे कारण सांगून,  असा चीप नाही होऊ देणार – मी विचारसरणीसाठीच त्याला मारले ! हे ग्रेट आहे ! विचारसरणी उपरी असल्याचे आकलन देणारे आहे ! तर, ते माझे एक अत्यंत आवडते नाटक आहे.

जगण्याच्या ओघात मलाही काही गंभीर प्रश्न पडत गेले आणि ते समजून घेण्याची निकड निर्माण होत गेली. मी नाटके लिहिली ती व्यावसायिक यशासाठी, वा गाजण्यासाठी वा प्रेक्षकांना करमणूक हवीय फक्त – अशा विचारांनी नाही. मी नाटके लिहिली ती जगण्यातले प्रश्न समजून घेण्याच्या माझ्या प्रक्रियेला अभिव्यक्ती देण्यासाठी. एखादे कौशल्य कमवून ते गाजवून दाखवणे, हा माझ्या नाटकांचा हेतूच नव्हता. मला एखादी विचारसरणीही प्रमोट करायची नव्हती. माणसाच्या आयुष्यात वेडे व्हायचा क्षण का येतो आणि वेडे न होता जगता येऊ शकते का, असे माझे प्रश्न होते. मला हे स्पष्ट दिसत होते की मानवी जगण्यातले सगळे प्रश्न सामावून घेणारी विचारसरणी असूच शकत नाही. शिवाय तिच्यात फूट असते ! तिच्या नेमक्या अर्थांबद्दल मतभेदही असतात. त्यामुळे, आहे तेच रटाळ, छळमय जगणे, जरा बदल घडवून चालू ठेवणे,

याहून जास्त विचारसरणी काही करू शकत नाही. त्यामुळे, मी विचारसरणीची वा बांधिलकीची नाटके लिहिली नाहीत. ' डावेदार ' हे नाटक माझ्याकडून का, कसे लिहिले गेले, याची ही पार्श्वभूमी आहे.

विचारसरणीच्या अंगाने आणि बौद्धिक, तार्किक, विश्लेषणात्मक पद्धतीने माणसाच्या जगण्यावर मास्टरी सांगणारे कोण – तर साम्यवादी. म्हणून ते ! मी खूप अभ्यासू, विद्वान वगैरे नाही पण आजूबाजूचे भान जरूर बाळगतो. सुरुवातीला याचे नाव ' दावेदार ' असे होते. कल्याणच्या ' मिती चार ' च्या ग्रुपपुढे हे वाचून दाखवल्यावर माझे मित्र रवींद्र लाखे म्हणाले, " दावेदार नाही – डावेदार म्हणा – " हे मला तुरंत पटले ! तर ती डावी विचारसरणी बाळगणे आणि व्यक्तिगत जगणे यांतले घोटाळे मला दाखवायचे होते. असे काही प्रत्यक्ष उदाहरण माझ्या पाहण्यात होते का, तर नाही. विचारावर जगणारा माणूस आंतरविरोधातच जगतो, या माझ्या स्पष्ट आकलनातून मी हे नाटक लिहिले. नंतर मला असे काही लोक भेटले की, होय, हे खरे आहे, आहेच हा आंतरविरोध, असे म्हणणारे. हे नाटक आधी दीर्घांक स्वरूपात होते, नंतर ते दोन अंकी नाटक या स्वरूपात राजन वेलणकरांनी ' झालं गेलं विसरून जाऊ ' या नावाने व्यावसायिक रंगभूमीवरही आणले. त्याच्या २५ व्या प्रयोगाला डॉ. भालचंद्र मुणगेकर आणि कुमार केतकर होते. याची ठिकठिकाणी परीक्षणेही आली. यातले वास्तव मान्य करूनच काय ते बोलले गेले. काही मतभेद होणे अपेक्षित होतेच.

माझे मित्र गिरीश पतके यांनी माझी तीन नाटके दिग्दर्शित केली त्यांतले हे एक. त्यांचे उत्तम दिग्दर्शन आणि गिरीश साळवी, सीमा देशमुख, चेतन दातार, मयूरी नागवेकर आणि वीणा जामकर यांचा अत्युत्तम अभिनय यांसह या दीर्घांकाचा प्रयोग दिनांक २७ फेब्रुवारी २००५ रोजी ' आविष्कार ' ने पुण्यात सादर केला. हा प्रयोग महाराष्ट्र कल्चरल सेंटरच्या दीर्घांक स्पर्धेत झाला. पहिले पारितोषिक आणि लेखनाचेही पहिले पारितोषिक मिळाले. कमलाकर नाडकर्णी आणि प्रतिमा कुलकर्णी हे परीक्षक होते. या नाटकाला लेखन आणि सर्वोत्कृष्ट प्रायोगिक नाटक -- हे झी गौरव पुरस्कारही मिळाले. पुढे हे नाटक व्यावसायिक रंगभूमीवर आले. तेव्हा, गिरीश साळवी, प्रदीप वेलणकर, आभा वेलणकर आणि सीमा घोंगळे यांनी यातील भूमिका साकारल्या.

नाटकाचा गोषवारा असा आहे – भास्कर, त्याची बायको मेधा, हेमंत, त्याची बायको स्मिता हे साम्यवादी असून जुने मित्र आहेत. आता भास्करचा घटस्फोट झालेला असून त्याची मुले त्याच्या बायकोच्या बाजूने आहेत – कारणे म्हणजे, भास्करचे दारूचे व्यसन आणि लैंगिक बाबतीतला हावरटपणा – बाहेरही चालणारा. भास्करची, त्याच्याच विचारांच्या विरोधात, बऱ्यापैकी मालमत्ता आहे. ती आता तो स्वतःच्या मुलांना देऊ इच्छित नाही. पूर्वी हेमंत घरी नसताना तो त्यांच्या घरी राहिलेला असतो. त्या वेळी त्याचे आणि स्मिताचे संबंध आलेले असतात. स्मिताचा धाकटा हा त्या गुप्त संबंधांतून झालेला आहे असे स्मितानेच त्याला सांगितलेले असते. हे लक्षात घेऊन भास्करला त्याची मालमत्ता त्या धाकट्याच्या नावाने करायची आहे. तो धाकटा त्याचाच आहे का, याची डी एन ए चाचणीद्वारे त्याला खात्री करून घ्यायची आहे. त्यासाठी तो आलेला आहे. ते सगळे पुरोगामी असल्याने, समजून, एकमेकांच्या संमतीने आणि खुलेपणाने हा मार्ग अवलंबता यावा, असे त्याला वाटते. थोडक्यात म्हणजे, ते एका पुरोगाम्याचे प्रतिगामी म्हणता येईल, असे प्रपोजल आहे. यात हेमंत राहात असलेल्या भागातच राहात असलेल्या रोहिणी नामक मुलीचे – जी लिव्ह इन मध्ये राहात असते – एक उपकथानक आहे. भास्कर बोलताना " ते वेगळे, हे वेगळे – " असे म्हणतो !

शेवटापेक्षा इथे नाटकाची प्रक्रिया महत्त्वाची आहे. विचारांनी मानवी संबंधांतले प्रश्न हाताळण्यातली अटळ गोची व्यक्त करणारे हे नाटक आहे. विचारसरणीच्या अंगाने तुम्ही कितीही घासा किंवा आपटा, मानवी मने सडतच जातात, अधिकाधिक हिंसक होत जातात, गुंता वाढतच जातो, याचे भान हे नाटक देते. रशियन क्रांतीनंतर तिथे झालेले स्त्री-पुरुष संबंधांबाबतचे विचारमंथन, दृष्टिकोणात आणि वर्तनात झालेले बदल, बदलत गेलेले कायदे यांचेही उल्लेख या नाटकात येतात. स्त्रीला घरकाम आणि मुलांचे संगोपन यांतून मोकळीक मिळाल्याशिवाय तिचा विकास ती साधूच शकत नाही, हा त्यामागे विचार असतो. या प्रश्नाला विचारांनी देशपातळीवर भिडणेही कसे अपयशी होत राहते, ते त्यांतून व्यक्त होत राहते. विचारांमध्ये किती फाटे, आंतरविरोध असतात याचे हे भान असते. या पात्रांचे पुरोगामी असणे, तरीही एक चोरटा लपवलेला शरीरसंबंध असणे, वारस शोधणे, आदर्श परिस्थिती मनात ठेवून काही विचार असणे पण तशी परिस्थिती इथे मुळीच उपलब्ध नसणे – यांतले घोळ हे नाटक दाखवते.

आता या नाटकातले काही संवाद पाहा –
भास्कर – खरं तर उदारमतवादानं आणि पुरोगामी विचारानंच सगळे प्रश्न सोडवता आले पाहिजेत !
हेमंत – तसं तर क्रांती झाल्यावरही होत नाही !
--
भास्कर – आपण डावे असल्यामुळं या विषयावर बोलायची तरी हिंमत आहे आपल्यात ! पण एक लक्षात येतंय – वैचारिक पद्धतीनं फाटे खूप फुटतात आणि सगळ्यांची एक समजूत असं छान, स्मूथ काही होऊ शकत नाही –
हेमंत – ॲब्सर्डिटी रे !
भास्कर – थोडक्यात म्हणजे सत्य शोधायची गरज नाही !
हेमंत – करेक्ट !
--
मराठी नाटकात प्रेक्षकांना एक लिंक लागतेच. ही पात्रे -- यांचे असे झाले, मग असे झाले – अशी. बहुसंख्य प्रायोगिक म्हटली जाणारी नाटकेही हे बंधन स्वीकारताना दिसतात. मीही खऱ्या-खोट्या पद्धतीने बऱ्याचदा हे स्वीकारतो. कधी ते स्वीकारल्याचा आभासही तयार करतो. पण तपशीलांचीच चर्चा करणारे जास्त भेटतात. ते सगळे ठीक आहे, आता आशयाच्या गाभ्याकडे जा आणि त्याबद्दल बोला, असे म्हणायची वेळ येते. इतक्या क्रांत्या झाल्या, इतके विचारमंथन झाले पण कुठेच कुणालाही स्त्री-पुरुष संबंध कसे असावेत – त्यांत काही आदर्श असू शकतात का – यांबद्दल निर्विवाद निराकरण असे काही सापडू शकलेले नाही. याबाबत काही नाटक आले आहे, तर पाहू या, असे फार कमी घडते. विषय म्हटला तर सनसनाटी आहे – नाटक प्रेक्षकांना पकडून ठेवते – हे पाहूनच राजन वेलणकरांनी हे नाटक व्यावसायिक रंगभूमीवर आणले. ' झालं गेलं विसरून जाऊ ' या नावाने. मी ' डी एन ए ' हे नाव सुचवले होते. अपयश आल्यावर पश्चात बुद्धी अशी की ' झालं गेलं ' च ना – मग आता काय पाहायचे, असे प्रेक्षकांना वाटले असेल ! तसे असेलही, पण मुख्य म्हणजे मला असे वाटते की नाटकांची आशय-वैशिष्ट्ये ओळखून त्यांना प्रमोट करणारे समीक्षकच उपलब्ध नाहीत. मूल्य एकच – सामाजिक आंधिलकी ! ती किती प्रकारे, कशीकशी असू शकते याचेही भान नाही. नाटक हे वैचारिक क्षेत्रातच असते आणि त्यात एक नाट्यात्म विधान शोधायचे असते – हीच धारणा ! त्यामुळे, बरीच नाटके निष्कारण मातीत जाण्याचा धोका निर्माण होतो !

या निमित्ताने माझे एक नम्र म्हणणे सांगतो. मराठी रंगभूमी १७० वर्षांची आहे. या काळात सलग इतक्या एकांकिका आणि नाटके, जगण्यातल्या मूलभूत प्रश्नांवर ( तत्त्वज्ञानात्मक प्रश्नांवर ) प्रथमच लिहिली गेली आहेत – असे माझ्या नाट्यलेखनाकडे पाहिले गेलेले नाही. विचारांनी मानवी प्रश्नांचे निराकरण न होणे किंवा अनेक मूल्ये मानल्याने मूल्यसंघर्ष होणे – उदाहरणार्थ नीती विरुद्ध न्याय – असे प्रश्न नाट्यमाध्यमातून हाताळले जाणे – याकडे कुणाचेही लक्ष गेलेले नाही, ही माझी खंत आहे. पण फिकीर नाही.

--- ००० ---

ढोलताशे

‘ ढोलताशे ‘ हे मी लिहिलेल्या नाटकांपैकी सर्वाधिक गाजलेले नाटक. लिहून झाल्यावर हे नाटक काही दिग्दर्शकांना दाखवले होते पण त्यांना ते क्लिक झाले नव्हते. विजय केंकरे यांना मात्र हे नाटक वाचता क्षणी आवडले आणि ते दिग्दर्शित करायचे त्यांनी ठरवले. त्यांच्या बरोबर काही चर्चा झाल्या. त्यांनी सुचवल्यावरून दोन अधिक पात्रे नाटकात मी लिहून दिली. ‘ आविष्कार ‘ ने निर्मितीची जबाबदारी घेतली आणि टीम कामालाच लागली. चेतन दातार सूत्रधार आणि काकडेकाकांचे नेतृत्व अशी जोमदार योजना ठरली. अजित भुरे प्रमुख भूमिका करणार, हे ठरले. त्यांचा आवाज आणि उत्तम संवादफेक ही पुढे या नाटकाची खास वैशिष्ट्ये ठरली. सर्वच कलाकार तगडे होते. अदिती देशपांडे, विद्याधर जोशी,

रेखा बडे, हेमू अधिकारी काका, प्रेमा साखरदांडे, धनंजय गोरे, काकडेकाका आणि स्वतः विजय केंकरे ! नाटकाचे यश हे यात ठरलेलेच होते, फक्त ते घडणे बाकी होते. ते घडलेच ! या नाटकाचा पहिला प्रयोग ११ सप्टेंबर १९९९ रोजी झाला. पुढे ' आविष्कार ' ने या नाटकाचे ८७ प्रयोग केले. ( महाराष्ट्रात ' इप्टा ' सह इतरही काही संस्थांनी नंतर याचे आणाखीही प्रयोग केले. अमेरिकेतही एका संस्थेने हे नाटक सादर केले. ) सदर नाटक खरे तर प्रायोगिक रंगभूमीवर आलेले असूनही ' आविष्कार ' ने धूमधडाक्यात एखाद्या व्यावसायिक नाटकासारखे याचे प्रयोग केले. ( आता अजित भुरे, पुन्हा हे नाटक रंगभूमीवर आणण्याच्या मार्गात आहेत. ) सर्वच नियतकालिकांनी नाटक वाखाणले. विशेष म्हणजे या नाटकाला जयंतराव साळगावकर आणि नरेंद्र दाभोलकर या दोघांचेही सहकार्य लाभले. याच्या पन्नासाव्या प्रयोगाला बाबासाहेब पुरंदरे आणि सचिन पिळगावकर आले होते. " मी अनेक वर्षे सवयीने गणेशोत्सवात सहभागी होत आलो आहे पण या नाटकाने मला विचारात पाडले " -- अशा अर्थाचे बाबासाहेब बोलले. एका प्रयोगाला राज ठाकरे आले होते. नाटकातले काही भाग सोपे केले तर शिवसेनेच्या सगळ्या शाखांसाठी या नाटकाचे प्रयोग करू, अशी त्यांची ऑफर होती. मराठी नाट्यचित्रपट सृष्टीतल्या बहुसंख्य लेखक, दिग्दर्शक, कलाकार, तंत्रज्ञ यांनी हे नाटक आवर्जून पाहिले. मराठी प्रायोगिक नाटकांमधल्या काही निवडक नाटकांपैकी एक, असे या नाटकाचे स्थान निर्माण झाले. महाराष्ट्र फौंडेशनसह अनेक पुरस्कार या नाटकाला मिळाले. लोकवाङ्मय गृह व आविष्कार यांच्या संयुक्त विद्यमाने याचे पुस्तकही निघाले. पुढे मुंबई विद्यापीठाने हे नाटक मराठी एम. ए. ला अभ्यासाला लावले.

मूलतः सगळे नास्तिकच असतात. आस्तिक-नास्तिक हा भेद अत्यंत उथळ आणि निरर्थक असतो. सगळे आपापल्या मानसिक प्रोग्रामिंगमधूनच जगत असतात. मनाचा वापर एकसारखाच असतो. सुखदुःखे, क्रिया-प्रतिक्रिया यांच्या प्रक्रिया सारख्याच असतात. ' देव ' ही संकल्पना वैचारिक स्तरावर स्वीकारणे वा न स्वीकारणे, एवढाच फरक असतो. वेगवेगळ्या विचारसरण्या असणाऱ्या माणसांसारखाच तो एक वैचारिक पृष्ठस्तरीय फरक असतो. हिंसकपणा, अलगतावाद, अस्मितावाद, सुखवाद – हे सगळे सारखेच असते. सर्वांचीच मने विदीर्णच असतात – ताणतणावग्रस्तच असतात. या पार्श्वभूमीवर ' धर्म ' म्हणजे काय हे पाहायला हवे -- ही, हे नाटक लिहिण्यामागची प्रेरणा होती. या नाटकात एक संवाद आहे – "माणूस दुःखी होण्याची पद्धत जर जगभर एकच आहे तर त्यातून बाहेर पडण्याची शक्यता म्हणजे धर्म – एकच असला पाहिजे. अनेक धर्म कसे असतील ? आणि धर्मात गर्दीचं काय काम ? स्वतःला एकटं पाडण्याचं काम प्रत्येकानं स्वतः केलेलं आहे, तसंच तो एकटेपणा टाकणंही प्रत्येकाला स्वतःला करावं लागेल. गर्दी, प्रदर्शन, उन्मत्तपणा यांचा धर्माशी काहीही संबंध नाही. " धर्म म्हणजे काय, याबाबतच स्पष्टता येण्याची प्रक्रिया सुरू व्हायला हवी, हा एक या नाटकाचा हेतू होता. माझे स्वतःचे, मला स्वतःला पडलेले जगण्यातले प्रश्न समजून घेण्यासाठी निरनिराळे वाचन होत होते. त्यात अर्थात संतवाङ्मयही होते. या संदर्भात तुकारामाने थोडक्यात सांगितलेला धर्म हा सर्वव्यापी आणि अखिल मानवजातीला प्रस्तुत आहे, हे मला दिसत होते. त्याच्या सांगण्याप्रमाणे धर्म म्हणजे ' एकविध मन ' – एकात्म मन. फुटीर – विदीर्ण नसलेले मन म्हणजे धर्म. पूर्ण मानवजातीला प्रस्तुत असा हा धर्माचा अर्थ आहे. वाढत्या ताणतणावांच्या आणि असंख्य संघर्षांच्या आजच्या जगात तर हा अर्थ म्हणजे अंतिम शब्द वाटतो. जे. कृष्णमूर्तींही एकात्म मनाबद्दल – integrity of mind – या बद्दल अनेकदा बोललेले आहेत. याच नाटकात एका ठिकाणी असा संवाद आहे – " स्वतःच्या मनाची विदीर्णता टाकणं आणि एकविध – एकात्म होणं म्हणजेच धर्म – हे संतांनी वारंवार स्पष्ट केलेलं आहे. याचा अर्थच असा की आपण स्वतः बदलायची तयारी असल्याशिवाय आणि तशी तीव्र निकड वाटल्याशिवाय धर्माशी आपला संबंधच येऊ शकत नाही ! "

धर्माला आलेले सामूहिकतेचे, टोळीबाजीचे, सैन्यबाजीचे, हपापलेपणाचे उन्मादी स्वरूप यात टार्गेट करायचे होते. त्यामुळे, गणपती उत्सव समोर आला. मी बरीच वर्षे पुण्यात असल्यानेही असेल, इथला हा महाकाय अपवादात्मक उत्सव हाच नाटकाचा कच्चा माल असणार, हे ठरले. नायक नक्कीच या बाबतीत प्रश्न निर्माण करणारा असणार होता. कुठे असेल तो ? रंगमंचावर हे जग कसे येईल ? याचा विचार करता करता लक्ष्मी रोडवरचे वाडे, घरे समोर आली. अनंतचतुर्दशीला विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी ते कसे सगळे खचाखच भरलेले असते, ते लक्षात आले. आणि नायक सापडला ! तो म्हणेल, या गोष्टी खोट्या आहेत – इथून माझ्या घरातून त्यांना बंदी असेल. हे बंद राहील. इथून मिरवणूक पाहता येणार नाही. घर त्याचे असले तरी नातेवाईक, मित्र यांचा फोर्स असणार – तिथून मिरवणूक पाहण्यासाठी – आणि तो नाही म्हणेल. त्यातही, एक समझोता आहे – एक आड एक वर्ष त्याच्या म्हणण्याप्रमाणे चालेल. ही तडजोड त्याने मान्य केलेली आहे. पण संघर्षबिंदू हाच असेल. आता हा संघर्ष टोकावर कसा येईल ? तर एक व्याधीग्रस्त व्यक्ती असेल जिला तिथूनच पाहणे भाग आहे. तीही, निव्वळ यासाठीच परगावाहून आलेली ! त्यामुळे, सांधेदुखीने बेजार असलेली काकू आली. मग बाकीचे चित्र त्या मानाने सोपे होते. माणसे काही एकाच प्रश्नात जगत नसतात – प्रत्येकाचे प्रश्न, अग्रक्रम वेगवेगळे असतात. हे सगळे इतर पात्रांच्या मदतीने उभे होत गेले. आता एक महत्त्वाचा प्रश्न होता – नायक हा गॅलरीच्या दाराला लावलेल्या कुलुपाची किल्ली न देणे इतके ताणू शकेल का ? या बाबतीत तो सरळ म्हणून टाकतो की हे इथपर्यंत आणलेलेच आहे, तर पाहू ताणून जास्तीत जास्त – पाहू काय होतेय ते. हे नाटक आहे आणि आपण ही एक शक्यता अजमावून पाहतोय – असे !

धर्माबाबतच्या मूलभूत प्रश्नांबरोबरच धर्माचे उत्सवी, उन्मादी स्वरूप हाही या नाटकाचा एक महत्त्वाचा फोकस होता. हा उत्सवीपणा, सारखे खूप काही साजरे करण्याची गरज वाटणे, हा झपाट्याने पसरत जाणारा रोग असल्याचे दिसत होते. लोक म्हणतात की त्या प्रसंगाच्या निमित्ताने लोक एकत्र येतात, काहींना संघटन कौशल्याचे शिक्षण मिळते, उद्योगधंदे वाढतात, वगैरे. मला हे दिसत होते की प्रत्येक उत्सव – वा काहीही साजरे करणे – हे एक अस्मिता, उन्माद, अलगता आणि हिंसकपणा तयार करतेच करते. ती एक तात्पुरती नशा असते – तेवढा काळ इतर विवंचनांतून तथाकथित मुक्ती देणारी – पण त्या बदल्यात मानवी जगण्याचा प्रचंड मूल्यनाश वसूल करणारी. माणसाला अधिक मद्द, अधिक हिंसक करणारी. त्यामुळे, या बाबतीत कोणतीही समर्थने खोटीच दिसत होती. सर्व काही साजरे करण्याच्या वेडाबद्दल यातला नायक अक्षय एका ठिकाणी खूप तिडिकीने बोलतो.

मी स्वतः आस्तिक-नास्तिक या भेदापलिकडे, धर्म म्हणजे काय हे समजून घेणे, ही प्रत्येकाची महत्त्वाची गरज आहे, असे मानतो. मी धर्मविरोधी नाही. पण धर्माच्या नावाखाली संघटन म्हणजे धर्म मुळीच नव्हे, हे मला संत साहित्याच्या आकलनातून दिसते. त्यामुळे, या नाटकात संतसाहित्यातले दाखलेही येतात. याचा एक अद्भूत परिणाम असा झाला की बहुसंख्यांच्या आवडत्या गोष्टींना आव्हान देणारे असे हे नाटक असूनही, कुणीही दुखावले गेल्याची तक्रार केली नाही वा दंगा केला नाही.

नाटकाच्या प्रयोगात, खाली रस्त्यावर चाललेल्या विसर्जन मिरवणुकीचा आभास छान जागता ठेवलेला होता. संवादांच्या मधल्या जागा विजय केंकरे यांनी अत्यंत विचारपूर्वक आणि नाटक हलते आणि हसते-खेळते आणि मजेदार-गंभीर राहील अशा उत्तम भरल्या होत्या. पूर्ण टीम मिळून हे नाटक सळसळते करत असत. लेखकाच्या मनातले नाटक आणि प्रयोग यांत एका बाबतीत थोडा फरक होता. मी हे नाटक लिहिताना मुख्यतः माझ्यासमोर धर्म हा विषय होता. प्रयोगात हे नाटक

त्याच्या सामाजिक अंगाकडे अधिक झुकले. या उत्सवाचा उपद्रव, प्रदूषण आणि त्यातून निर्माण होणाऱ्या अस्मिता अधिक ठळक झाल्या. कदाचित त्यामुळेही नाटक अधिक गाजले असेल, हे मला मान्यच केले पाहिजे. पण माझा या गोष्टीला आक्षेप असा मुळीच नव्हता. विजय केंकरे यांना हा भाग अधिक अधोरेखित करावासा वाटला, असे वाटते. पण नाट्यसंहितेत लेखक म्हणून मी माझे डाव ठेवलेलेच असतात. ते संवादांत असतात. यातले सर्व संवाद उत्तम पोचत असल्याने मी समाधानी होतो. दिग्दर्शक आणि लेखक यांनी दिलखुलासपणे एकमेकांना आपापले डाव यशस्वी होऊ देण्याचे एक उदाहरण म्हणूनही या नाटकाकडे पाहता येईल.

या नाटकाच्या रंगीत तालमींना मी उपस्थित होतो. पहिली सलग तालीम पाहून मी अत्यंत नाराज झालो होतो. मलाच ते कंटाळवाणे वाटले होते ! माझ्या शेजारी दामू केंकरे काका बसले होते – त्यांनी माझी मनःस्थिती जाणली. माझ्या पाठीवर हात ठेवून ते म्हणाले, " काळजी करू नकोस – नाटक उत्तम होणार – आत्ताच्या तालमीत फक्त पेसचा ( गतीचा ) प्रॉब्लेम झाला होता. पुढची बघ तालीम ! " आणि खरेच, पुढची तालीम पाहून मी खुशच झालो ! गाण्यात तंबोरा जसा करेक्ट सुरात लागावा लागतो तशी नाटकाला गती करेक्ट असावी लागते, हे मला नवीनच समजले ! पुढे या नाटकाच्या सर्वच घटकांचे सूर उत्तम जुळून आले आणि अर्थपूर्ण प्रयोगांचा सिलसिला चालू राहिला . माझ्या नाट्यलेखन कृतीमुळे मला मिळालेले हे एक मोठे समाधान होते आणि आहे,

--- ००० ---

एफबी फ्रेंडसच्या मागणीवरून –
अभिरुची, कोल्हापूर साठी केलेले भाषण. ( १०-०३-१७. )

आजचे नाटक

( ४८ संहिता – १, २, ३ व एक उत्तेजनार्थ ) परीक्षक – प्रसन्न जी. कुलकर्णी आणि हिमांशू स्मार्त. )

प्रथम – अभिरुचीचे आभार – पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन ! – पुरस्कार न मिळालेल्यांना मी एक माहिती सांगतो – मी स्वत: सुरुवातीची चार नाटके फालतू लिहिली होती. माझी नाटके जेव्हा राज्य नाट्य स्पर्धेत येऊ लागली तेव्हाही त्यांना अनेकदा विन्मुख परतावे लागले. ज्याला लेखनाची आच आहे त्याने यशापयशावर आपले काम अवलंबून ठेवूच नये.

नुक्ताच ८ तारखेला महिला दिन पार पडला आणि आज आहे महान समाजकार्यकर्त्या सावित्रिबाई फुले यांची जयंती. बालविवाह, विधवा विवाह आणि स्त्री-शिक्षण या सामाजिक प्रश्नांच्या क्षेत्रात त्यांचे खूपच मोठे योगदान आहे. आज स्त्रिया शिकून आत्मविश्वासाने प्रगतिपथावर असणे याचे मोठे श्रेय त्यांनाच आहे. स्त्री-पुरुष समता ? जगभर या बाबतीत असमाधानच आहे. ओशो म्हणतात, ‘ समता ‘ नव्हे ‘ वेगळेपण जपणे ‘ हवे. मेंदू संशोधनाप्रमाणेही स्त्रीच्या आणि पुरुषाच्या मेंदूत, त्याच्या वापरपद्धतीत काही फरक आहेत. स्त्रीची गुणवैशिष्ट्ये आणि क्षमता वेगळ्या आहेत. हे जग पुरुषांनी घडवलेले आहे. स्त्रीच्या वेगळ्या गुणवैशिष्ट्यांना वाव मिळत जायला हवा. इथे एक छोटीशी कविता --

रंगीत वस्त्रांबरोबरच तिला
वस्तू आणि पद्धती
यांचे अप्रूप असते
तिला घटनांचे तपशील
साठवायला आवडतात
कधी कधी तर
अमुक वारले तो बुधवार होता
हेही ती सांगते
कुणाच्या आहेराचे पाकीट
कोणत्या रंगाचे होते
हे ती सांगते तेव्हा
जगच हाताशी असल्याचा
भास होतो

विचारांनी तिला
प्रत्येक गोष्ट निश्चित
करून घ्यायची असते

जसा तिच्या शरीराचा
कण अन कण तिच्या
आटोक्यात असतो

सुखे असोत की दुःखे
आत्ता घडल्यासारखी त्यांना
ती कधीही जागी करू शकते

आणि मी आहे गूढाचा साधक
आमच्या जोडीतून
मस्त छान सर्जक ठिणग्या उडतात

-- ही कोणत्याही कलेबाबतची कविता म्हणूनही पाहता येईल. ' अनुभव ' हे माहीत असणारे जग आणि नुसते बौद्धिक नसलेले एकात्म आकलन, ही गूढता.

इथे एक प्रश्न पडतो – स्त्रिया कविता, कथा, कादंबऱ्या लिहीत आल्या पण नाटककार फारशा झाल्या नाहीत. असे का झाले असावे, याचा शोध घेणे उद्बोधक होऊ शकेल. खरे तर जगण्यातले नाट्य समजण्यात आणि घडवण्यातही त्यांचा हातखंडा असतो – तरी, असे का झाले असावे ? त्यांनी लिहिलेली नाटके पाहणे हे समाजाला झेपणार नाही, असे तर नसेल ? मेघना पेठ्यांच्या कथा वाचणे, ' नातिचरामि ' वाचणे ठीक, पण, त्यांनी नाटक लिहिले तर ? – फार थोड्या आहेत नाटककार स्त्रिया – इरावती कर्णिक, मधुगंधा कुलकर्णी आणि मनस्विनी लता रवींद्र या तीन दिसतात. यातही सातत्य राखून असलेली आणि स्त्री म्हणून नव्हे तर आजच्या पिढीची महत्त्वाची नाटककार म्हणावी अशी म्हणजे मनस्विनी ही एकच आहे. ती आणि धर्मकीर्ती सुमंत या दोन आजच्या महत्त्वाच्या नाटककारांवर मी ' ललित ' च्या नाट्यविशेषांकात एक लेख लिहिला होता. तिच्या नाटकांबद्दल मी बोलणार आहेच. आज लिहिणारे अनेक नाटककार त्यांच्या आजच्या जगण्याच्या आकलनाला अत्यंत खरी आणि समर्थ अभिव्यक्ती देत आहेत. तेही थोडक्यात बोलेनच. आपला आजचा विषयच आहे –
' आजचे नाटक '. या संदर्भात, अलिकडेच कोल्हापुरात झालेल्या दोन नाटकांचा विचार केला पाहिजे. ' किंग लियर ' आणि ' नाटककाराच्या शोधात सहा पात्रे ' – ही दोन नाटके कधीची म्हणावीत ? कालची की आजची ? त्यांतला माहोल वा अनुभव विश्व आपले नाहीय, तरी ती आज का करावीशी वाटतात ? भावना वा घटना यांच्या अभिव्यक्तीमुळे ? त्यात खरे तर आता काही फारसे नावीन्यच राहिलेले नाहीय – माध्यमांमुळे आता रोज असंख्य घटना आपल्या मेंदूवर येऊन आदळताहेत ! खरे तर आजच्या नाटककारापुढे हा एक प्रश्नच आहे – नुसतेच काही व्यक्तिगत सुखदुःखांचे अनुभव वा सनसनाटी घटना रंगवण्यात आता काही अर्थच राहिलेला नाहीय. या परिस्थितीचा परिणाम म्हणूनही हल्ली अनेक कथाहीन नाटकांची निर्मिती होत असेल. बरे, त्या दोन नाटकांत कसला परिवर्तनवाद आहे म्हणावे, तर तेही नाही. पिरांदेल्लोप्रमाणेच बेकेट आणि आयनेस्कोही सामाजिक-राजकीय-आर्थिक परिवर्तनासाठी लिहिणारे नव्हते. ( आपल्याकडचे शेरेबाज, बेजबाबदार टीकाकार नेमाडे, कारणे वा विश्लेषण न देता, बेकेटसारख्या लेखकाला सहज ' दुय्यम ' लेखक म्हणतात, ते वेगळे ). पण, ही नाटके का महत्त्वाची आहेत याचे उत्तर मी देणार आहे.

आजचे एक महत्त्वाचे नाटककार जयंत पवार तुम्हाला माहीत असतील. ' अधांतर ', ' माझं घर ', ' टेंगशेच्या स्वप्नात ट्रेन ' ही त्यांची नाटके प्रसिद्ध आहेत. त्यांनी आजची एक वेगळीच अडचण मांडली होती. त्यांचे म्हणणे असे की आजचे वास्तव फार वेगाने बदलते आहे. लेखकाला त्याचे आकलन होऊन तो त्यावर नाटक लिहीपर्यंत ते वास्तव जुने – अप्रस्तुत होतेय ! ही तर महा-अवघड समस्या म्हणायला हवी – लिहिणेच अशक्य करणारी ! इथे एक प्रश्न विचारला पाहिजे की आजचे वास्तव म्हणजे काय ? आपण ज्याला उत्तर-आधुनिकतावाद म्हणतो तो ' सत्य ' ही कल्पना वा सर्वांना एकच काही जसेच्या तसे कळू शकणेच नाकारतो. ते आपल्याला आपल्या साध्या पद्धतीनेही कळू शकते. प्रत्येकाचा जगण्याचा माहोल, प्रभाव वेगवेगळे असतात. मेंदूतल्या रसायनांचे प्रमाणही वेगवेगळे असते. प्रोग्रॅमिंगच वेगवेगळे असते. मी नोकरीनिमित्त एका खेड्यात होतो तर तिथे, तिथून दोन तासांवर असलेले जिल्ह्याचे गावही न पाहिलेले काहीजण होते. तुम्हाला मधू साबणे हा मराठीतला एक उत्तम लेखक माहीत असेल. त्याची ' लीळा ' ही कादंबरी मला महत्त्वाची वाटते. गाओ झिंगझिआनच्या ' सोल माउंटन ' या पाचशे पानी कादंबरीचा त्याने केलेला अनुवाद हा मराठी अनुवाद वाङ्मयात लक्षणीय ठरावा असा आहे. तो आता पुण्यात निवृत्तीचे जीवन जगत आहे. त्याने अजून मुंबई पाहिलेली नाही. यावर त्याने ' अनुभव ' मासिकात एक लेखच लिहिला होता ! सारांश, प्रत्येकाला दिसणारे, अनुभवला येणारे वास्तव एकच नसते. आजच्या जगाचा काही एक कॉमन माहोल असला तरीही प्रत्येक लेखकाचे वास्तव वेगळे असते. अमुकच एक वास्तव सत्य, असे काही नसते. त्यामुळे, कुठले तरी वास्तव पकडायचे आहे, ही समस्याच मला खोटी वाटते. इथे, कॉमन वा सामान्य कारणांनी विचारांचे, समजुतींचे माहोल कसे बदलत जातात, ते थोडक्यात पाहायला हवे. असे केल्याने आजच्या मराठी नाटकाची नीट कल्पना येईल.

एक काळ हा ' धर्म ' नायक असण्याचा, तोच चालक असण्याचा होता. तोच सर्वज्ञ होता. सत्य, स्वच्छंदीपणा, रोमँटिसिझम यांचा तो काळ म्हणू. त्यानंतर आला आधुनिकतेचा काळ. औद्योगिक विकासाबरोबर, तंत्रज्ञान, शास्त्र, वैज्ञानिक दृष्टिकोण यांचा काळ आला. शहरीकरण वाढू लागले. त्यातून धर्मशक्तीचा ऱ्हास आणि मानवतावादी, मानवकेंद्री विचार वाढत गेले. तुकड्यांत उत्पादन, स्पेशलायझेशन. अंतर्विरोध, द्वंद्वात्मकता वाढली. Alienation म्हणजे परात्मता भाव वाढला. पण हे निराशावादाला पोचले नाही . मूल्यशोध नाकारला गेला नाही. विदीर्णतेची जाणीव आणि उपरोधही मूल्यस्थापनेचे प्रयत्न या स्वरूपात राहिले. सुमारे १९६० नंतर उत्तर-आधुनिकतेचा काळ सुरू झाला, असे मानण्यात येते. इथे विदीर्णतेच्या अनुभवातून अराजकतेच्या आणि मूल्यहीनतेच्या प्रत्ययात राहणे म्हणजेच जगणे, असे होते. वैश्विकता, सत्य, बुद्धिप्रामाण्य वा स्थैर्य हे सगळे निरर्थक होते. खोलीबिली काही नसते, सगळे उथळच असते, असे होते. नैतिक मूल्ये वा कलामूल्ये यांना मूलाधारच राहात नाही. निरर्थकतेचाच अनुभव येतो. वास्तव विस्कळित आणि दुरुस्तीच्या पलिकडेच आहे तर आता आहे त्याचाच गौरव करावा, असे होते. या अवस्था आपल्याकडेही अनुभवात आहेतच. त्यामुळे, सामाजिक बांधिलकी हे एकच मूल्य आणि परिवर्तनवाद हा एकच हेतू, असे राहू शकत नाही. हेच सगळे भाषेच्या अभ्यासाच्या अंगाने संरचनावाद आणि उत्तर-संरचनवाद या प्रकारे सापडत गेले. हे बुद्धीने आणि संशोधनानेच सापडत गेले. बुद्धीचा निर्भय वापर करत गेल्यामुळे दिसत गेले. बुद्धीनेही टोकापर्यंत जायची हिंमत हवी ! बुद्धीचे गाठोडे घेऊन एकाच भूमिकेवर ठाम बसून राहणाऱ्यांना हे कसे कळणार ? यानंतर आता उत्तर उत्तर-आधुनिकतेचा किंवा परा-आधुनिकतेचा काळ सुरू झाला आहे, म्हणतात. म्हणजे मेटॅमॉडर्निझम ! म्हणजे आधुनिक आणि उत्तर आधुनिक यांच्या समन्वयाचा काळ.

आपल्या आजच्या नाटकांमधून प्रामुख्याने उत्तर-आधुनिकतेची लक्षणे प्रतीत होतात. आजचे आपले नाटककार आहेत – हिमांशू स्मार्त, आशुतोष पोतदार, गणेश दिघे, अजित देशमुख, दत्ता पाटील, विद्यासागर अध्यापक, मनस्विनी लता रवींद्र, धर्मकीर्ती सुमंत, युगंधर देशपांडे, राहुल बनसोडे आणि संतोष गुजर ( ज्यांचे ' मऊ ' नावाचे नाटक फार चांगले आहे, असे ऐकून आहे. प्रदीप मुळ्ये यांचे दिग्दर्शन आहे. ) याचबरोबर, प्रणव सखदेव आणि सतीश तांबे यांच्या कथांची नाट्यरूपांतरेही सादर झालेली आहेत. शिवाय, पु. शि. रेग्यांच्या ' सावित्री ' या कादंबरीचे रवींद्र लाख्यांनी सादर केलेले नाट्यरूपांतरही लक्षणीय आहे. तसेच लाख्यांनीच दिग्दर्शित केलेले माझे ' मनाचे शोक ' हे नाटक, हेही, आपल्या परवानगीने, यात समाविष्ट करतोय. त्यानंतर, पुण्यात झालेल्या एन एस डी च्या ' भारंगम ' महोत्सवातल्या नाटकांबद्दल थोडक्यात बोलेन.

यांतल्या दत्ता पाटील या नाटककाराबद्दल एक विशेष सांगण्यासारखे निरीक्षण आहे. त्यांचे ' हंडाभर चांदण्या ' हे नाटक परिवर्तनवादी, ' गढीवरच्या पोरी ' हे उत्तर-आधुनिक तर ' स्ट्रॉबेरी ' हे एक साधे रंजनात्मक व्यावसायिक नाटक आहे. खूप उत्सुकता बाळगावी असा हा नाटककार आहे.

विद्यासागर अध्यापक हा त्याच्या कॉलेज जीवनात बराच काळ माझ्या संपर्कात होता. त्याने माझी ' समतोल ' आणि ' धागेदोरे ' ही दोन नाटके आणि ' ट्रेलर ', ' वेषांतर ' आणि ' साक्ष मावळत्या सूर्याची ' या एकांकिका दिग्दर्शित केल्या होत्या. ' अवकाश कलामंच ' ही संस्था स्थापन करणे, तालमींसाठी जागा मिळवण्यासाठी दोनतीन तास शिक्षण मंडळाच्या बाकावर संबंधित अधिकाऱ्याची वाट पाहात बसणे, अशी अनेक कामे आम्ही एकत्रितपणे केली. त्याची दोन व्यावसायिक नाटके अलिकडेच रंगभूमीवर आली. ' आधी बसू आणि मग बोलू ' आणि ' साखर खाल्लेला माणूस '. व्यावसायिक रंगभूमीवरची ही दोन वेगळ्या बाजाची नाटके आहेत. त्यांतला ॲब्सर्डिटीचा स्पर्श मस्त खुमारी आणणारा आहे.

याच प्रकारे, व्यावसायिक रंगभूमीवर, ' सुसाट ' हे एक अगदीच वेगळे, ॲब्सर्ड आणि मजेदार नाटक लिहिले गेले ते अजित तात्याबा देशमुख या लेखकाकडून. यात प्रत्यक्ष रेल्वे स्टेशन, गाडी येणेजाणे, तीतून पात्रे चढणे-उतरणे, हे सगळे होते. प्रियदर्शन जाधव आणि सुशील इनामदार यांचा उत्तम अभिनय होता.

गणेश दिघे या नाटककाराने कालिदसाच्या ' मेघदूत ' चे नाट्यरूपांतर करून ते ' अपूर्व मेघदूत ' या नावाने सादर केले. त्याचे अवघड दिग्दर्शन स्वागत थोरात यांनी केले आहे. यानंतर गणेशने आणखी एक नाटक लिहिले. यक्ष तिकडे विरह भोगत असताना इकडे यक्षिणीची काय अवस्था होती याबाबत कल्पना लढवून त्याने ' यक्षिणी विलाप ' नावाचे नृत्यमय नाटक रंगभूमीवर आणले आहे. अशा नाटकात, कसली भूमिका घेणे आणि कसला परिवर्तनवाद असणार ? हे तर मानवी जगण्याचे आणि अस्तित्वाचेही भान घेणे आहे. संपर्कात येणाऱ्या मनाला परिपक्व करणारे.

याच पद्धतीचे नृत्यमय असलेले असे ' सावित्री ' हे नाटक रवींद्र लाख्यांनी सादर केलेले आहे. कलाकृतीतले वास्तव दूरचे वा अपरिचित असले तरी त्या कलाप्रक्रियेतल्या उच्च अशा संवेदनशीलतेमुळे ते कसे आजही आणि सर्व वयोगटांतल्या प्रेक्षकांना प्रस्तुत वाटते, ते पाहण्यासारखे आहे. यालाच म्हणायचे अभिजातता. लाख्यांचे दिग्दर्शन आणि प्रिया जामकर यांचा अभिनय ही या नाटकाची खास वैशिष्ट्ये आह्वेत. आपले शेरेबहाद्दर समीक्षक नेमाडे हे ' सावित्री ' या कादंबरीला '

छापून छापून वाढवलेली ' कादंबरी म्हणाले होते. त्याकडे अर्थात दुर्लक्ष करणेच बरे. या कादंबरीत वा नाटकात ना आजच्या जगण्यातले अराजकी वास्तव आहे ना परिवर्तनवाद, तरीही आज ते भरभरून पाहिले जाते आहे. यावरून हेच दिसून येते की आजचे नाटक म्हणजे अमुक सालात, अमुक वयाच्या माणसाने लिहिलेले, अमुक वास्तवाचे नाटक, असे काही नसते.

मनस्विनीला तेंडुलकर ' एक धाडसी नाटककार ' म्हणाले. स्त्रियांना असे धाडसी असणे खूप कठीण असते. एका बाईनी त्यांची एक कविता एकदा मला दाखवली. ईश्वरचरणी लीन झाले, वगैरे. म्हटले, तुम्ही अशा खोट्या कविता का लिहिता, तर, त्यांचे उत्तर होते – खऱ्या कविता लिहिल्या तर मी यांची बदनामी करते, असे हे म्हणतात ! इथे विचार करून पाहा एखादी विवाहित स्त्री प्रेमकविता लिहू लागली तर ? त्या नवऱ्याबद्दलच आहेत याच्या खुणा तिला प्रत्येक कवितेत ठेवाव्या लागतील ! आणि तसे नसेल तर ? मग, तिला अवघड होईल ! आणि नवरा अगदी सहिष्णू असेल तर तिच्या दर कवितेगणिक तो खचत जाईल ! तेंडुलकर, मनस्विनीला, रक्ताचा एक थेंब न सांडता काम करणारी शस्त्रक्रियातज्ज्ञ म्हणतात. मनस्विनीच्या काय किंवा धर्मकीर्तीच्या काय नाटकांतून अमुकच बरोबर किंवा परंपरागत मूल्ये यांना नकार दिसतो. सुरुवात-मध्य-शेवट वाली गोष्ट वा सलग स्वभावचित्रण असे काही नसते. मूल्यात्मकतेच्या आणि नाट्यरचनेच्या सर्वच सवयीच्या पद्धती झुगारून दिलेल्या असतात. इथे गंमतीने एक विषय बोलायचा तर भारतातले पुरुष असा पुरता बंदोबस्त करण्याच्या प्रयत्नात असतात की त्यांच्या घरातली कोणतीही स्त्री कुणाचीही मैत्रीण असता कामा नये आणि तेच पुरुष त्यांचीच एक समस्या मांडताना म्हणतात की भारतातल्या पुरुषांना मैत्रिणी नसतात ! मनस्विनीची नाटके ते जग ओलांडणारी असतात. तिची नाटके मुख्यतः आजच्या तरुण पिढीचे अनुभवविश्व हाताळतात. प्रेम, प्रतारणा, फ्लर्टिंग, ब्रेकप, घटस्फोट यांच्या प्रक्रिया इथे दिसत राहतात. आताच्या पिढीच्या जगण्यातले हे नित्याचे प्रश्न आहेत. मनस्विनी ते अत्यंत निर्भीडपणे हाताळते. अशाच विषयावरच्या तिच्या एका नाटकाचे नाव आहे, ' सिगरेटस '.

धर्मकीर्तीचे ' पाणी ' हे नाटक माझ्या मते एक महत्त्वाचे नाटक आहे. एक कार्यकर्ता विचारवंत आणि एका मासिकाचा संपादकीय सल्लागार यांच्यांत घडणारा हा संवाद आहे. संपादकाचे म्हणणे असते की चळवळीतल्या दोषांबद्दल न लिहिता कार्यकर्त्यांना उत्साह वाटेल, असे लिहायला हवे. विचारवंताचे म्हणणे असते की वैचारिक झटके हितकारकच ठरतील ! विचारवंताच्या मते, आमीरखान कोका कोलाची जाहिरात करतो म्हणून त्याची मदत घेऊ नये आणि परदेशी फंडिंग घेऊ नये. या दीर्घांकात शशांक शेंडे आणि किरण यज्ञोपवित यांचा उत्तम अभिनय होता. या नाटकाला काहीजण राजकीय नाटक म्हणतात. आपल्याकडे काहीजण एक बावळट कल्पना जोपासतात की राजकीय म्हणजे काहीतरी ग्रेट असते. ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक तसा राजकीय हा फक्त एक माहोल असतो. नाटक हे मानवी संबंधांचेच असावे लागते, मग, माहोल कोणताही असो. धर्मकीर्तीचे हे नाटक ' विचार आणि कृती यांतले अंतर ' हा मानवी जगण्यातला एक महत्त्वाचा प्रश्न हाताळते. ते अमुकच बरोबर अशी भूमिका न घेता त्या प्रश्नाचे पूर्ण भान देऊन थांबते. त्यामुळे ते सर्वच माणसांना प्रस्तुत नाटक ठरते. याच प्रश्नावरचे, विचारवेध संमेलनाच्या अध्यक्षपदावरून व्यक्त झालेले, डॉ. आनंद तेलतुंबडे यांचे हे विचार बघा – " आज विचारवंत आणि कार्यकर्ता या दोन कंपूंमध्ये एक भयंकर दरी निर्माण झालेली आहे. कार्यकर्ता कंपू हा तथाकथित विचारवंतांपासून इतका दुरावला गेला आहे की त्याने विचार करणेच सोडून दिले आहे. त्याला याची धास्ती असते की विचार केल्याने आपण स्वतःच कदाचित ' विचारवंत ' बनू. म्हणून तो कोणत्याही विचाराशिवाय, परिणामाचासुद्धा विचार न करता, कृती करत असतो. दुसरीकडे विचारवंत आपल्या हस्तिदंती मनोऱ्यात बसून आधीच सुजलेला आपला अहंकार ( ego ) अधिकच फुगवीत, आपण विचार निर्माण करत आहोत अशी कल्पना

करत असतात. आपला ‘ थोर ‘ विचार, कृतीत न आणल्याबद्दल ते कार्यकर्त्यांना दूषणे देतात. त्यांना याची साधी जाणीवही होत नाही की जर तो विचार कार्यकर्त्यांना आकर्षित करत नसेल तर त्याच्यातच काहीतरी त्रुटी असणार. याप्रमाणे आज सर्वत्र वांझ विचार व दिशाहीन कृती अशी दुःखदायक परिस्थिती आहे. म्हणून ही परिस्थिती लवकरात लवकर बदलण्याची गरज आहे. “ आदर्श आणि कृती यांतले हे द्वंद्व एका समाजातले म्हणून जसे पाहता येईल तसेच एका व्यक्तीतले म्हणूनही पाहता येईल. नैतिकतेच्या कल्पनांबाबतही असे द्वंद्व पाहता येईल. ‘ परस्त्री मातेसमान ‘ हा बोलण्यातला आदर्श असला तरी प्रत्यक्ष जगणे तसे नसते. अमुक एका वयानंतर स्त्री-पुरुष आकर्षण संपले पाहिजे अशी समजूत बाळगली जाते, पण, मानसशास्त्राप्रमाणे मेंदूमृत होईपर्यंत ते आकर्षण जिवंत असते !

इथे, राजकीय म्हटल्या गेलेल्या ‘ उध्वस्त धर्मशाळा ‘ या नाटकाचे उदाहरण पाहावे. त्याच प्रश्नावर आर्थर मिलरचे ‘ द क्रुसिबल ‘ हे सत्तेबाबतच्या मानवी प्रश्नाबाबतचे चिंतनशील नाटक लिहिले गेलेले आहे. बाजू घेत लिहिल्याने ‘ उध्वस्त धर्मशाळा ‘ हे नाटक किरकोळ ठरते. नेमाडे, या नाटकाबद्दल बोलताना, त्याच्या भाषेची स्तुती करतात ! आशयाबद्दल बोलायची हिंमत न करणारे हे मराठीतले ‘ महान ‘ समीक्षक !

आपण जी उत्तर-आधुनिकतेची वैशिष्ठ्ये पाहिली ती आजच्या आपल्या सर्वच नाटककारांमध्ये दिसून येतात. मूल्यांचा अभाव, सत्य वा अमुकच बरोबर असे काही नसणे आणि जगणे व्यापून राहिलेली एकूणच विदीर्णता – बहुतेक सर्वच लेखकांचा हाच आशय असल्याचे दिसते. या लेखकांच्या नाटकांचे विषय काय आहेत, ते पाहू.

हिमांशू स्मार्त हा सध्याचा एक महत्त्वाचा चिंतनशील लेखक आहे. मी पाहिलेले त्याचे ‘ जत्रेतले जायंट व्हील ‘ हे, प्रवीण भोळे यांनी दिग्दर्शित केलेले नाटक अराजकाचा आशय एका वेगळ्याच प्रकारे अधोरेखित करणारे होते, असे आठवते.

युगंधर देशपांडे याची ओळीने तीन नाटके आहेत. ‘ अगदीच शून्य ‘, ‘ बैल मेलाय ‘ आणि ‘ ऍब्सोलूट ‘. यांचे दिग्दर्शक अनुक्रमे, रवींद्र लाखे ( वयावर काही नसते ), ललित प्रभाकर आणि मंदार देशपांडे आहेत. विषय आहेत – पहिल्याचा -- आदर्श विचारसरणी, स्पर्धा, व्यवहार आणि यश. दुसऱ्याचा – मॉडर्न ( आधुनिक ) होण्याचे प्रयत्न. आणि तिसऱ्याचा आहे – पूर्णत्वाचा शोध घेऊ न शकण्याचे प्रश्न. यांतले, इच्छित आणि प्रत्यक्ष यांतल्या अंतराचे सूत्र लक्षात घेण्यासारखे आहे. अशी नाटके पलायनवादी नसतात – ती प्रत्यक्ष जगण्याला सामोरी जाणारी असतात.

प्रणव सखदेवच्या कथेवर आधारित, अभिजित झुंजारराव याने दिग्दर्शित केलेले नाटक ‘ आय डी ‘ हे नाटक, आभासी ओळख, सत्य ओळख आणि एकूणच गोंधळ, असा विषय हाताळते.

-- ही सगळीच नाटके उत्तर-आधुनिक म्हणावीत अशी आहेत. ही प्रत्यक्ष जगण्यातून आलेली खरी अभिव्यक्ती आहे. यात परिवर्तनवादी म्हणावे असे एकही नाटक नाही. असे सगळे जिवंत कलाविष्कार नाकारणारी विचारसरणी आपण राबवत बसलो तर ते नक्कीच सांस्कृतिक नुकसानीचे ठरेल.

माझीही तीन नाटके अलिकडेच रंगभूमीवर आलेली आहेत. ‘ सामसूम ‘, ‘ दुरुस्त्या आणि देखभाल ‘, आणि ‘ मनाचे शोक ‘. माझे वय सत्तर आहे. मी आजच्या पिढीचे आयुष्य जगत नाहीय. मग, मी आजचा नाटककार आहे की नाही ? ही

नाटके सादर करणारी पिढी आजची आहे, प्रेक्षकही आजच्या पिढीचे आहेत. ' दुरुस्त्या आणि देखभाल ' च्या, ' रिनोव्हेशन ' या नावाने हिंदीत आलेल्या, मुंबईतल्या पृथ्वी थियेटर च्या प्रयोगाला मी गेलो होतो. तिथे सर्व जातीधर्मातल्या तरुण मुलामुलींचीच गर्दी होती. त्यांना ते नाटक खास त्यांचे वाटले आणि आवडले ! अशा गोष्टी लक्षात घेऊनच ' आजचे

नाटक ' याचा अर्थ लावला पाहिजे. ( सध्या पुण्याच्या पीडीए तर्फे माझ्या ' घोकंपट्टी ' या नाटकाच्या तालमी चालू आहेत. )

एखादे नाटक, ' आजचे नाटक ' ठरण्याचे काय असते रहस्य यावर शेवटी मी बोलणार आहेच.

जाता जाता, अलिकडेच पुण्यात झालेल्या भारंगम म्हणजे भारत रंग महोत्सवाबद्दल थोडे बोलणार आहे. हा एन एस डी चा महोत्सव राज्य शासनाच्या मदतीने प्रथमच पुण्यात होत होता. याला शून्य प्रसिद्धी दिली गेली होती. वस्तुतः अशा नाटकांचा बराच प्रेक्षक पुण्यात आहे, पण, पुण्याची लाज निघाली. सर्व नाटके कोणत्या ना कोणत्या कारणाने चांगली होती. यात झालेल्या आयनेस्कोच्या ' द लेसन ' या दीर्घांकाचा मराठीत रूपांतरित एक प्रयोग मी ६७ साली पाहिला होता. त्यानंतर पन्नास वर्षांनी त्याचा कोलकात्याच्या लोकांनी केलेला ' नीलिमा ' हा प्रयोग या महोत्सवात पाहिला ! यात काम करणारा गौतम हलधर हा नट ग्रेट होता. एवढी वर्षे जगभर हे नाटक का महत्त्वाचे वाटत असेल ? वास्तववादाच्या स्तरावर हे नाटक कुणाला ' आपले ' वाटू शकेल ? ( मुद्दाम गंमतीने बोलायचे झाल्यास, परिवर्तनवादी सत्तेने एकेक नवा कलावंत गिळंकृत करणे, अशा अंगानेही या नाटकाकडे पाहता येईल. )

याच महोत्सवात ' पुटेरी साडोंग ' हा एका मलेशियन अभिनेत्रीने सादर केलेला दीर्घांक पाहिला.

पुटेरी साडोंग

हा एकपात्री प्रयोग संपल्यावर आयोजक विदुषी म्हणाल्या, " टेरिफिक पर्फोर्मन्स ! " मलाही मनोमन तसेच वाटत होते ! लेखन, अभिनय आणि नृत्य यांतून ही कलाकृती साकारली होती साबेरा शेक या मलेशियन कलावतीने. अप्रतिम सौंदर्य ( म्हणजे उत्तानता नव्हे ) आणि सखोल परिपक्वता यांचा हा मनोज्ञ मिलाफ होता ! एका तासात मानवी जगण्यातल्या मूलभूत प्रश्नांना स्पर्श करणारा ! हे नाटक मला प्रचंड आवडले !

एका मलाय राणीच्या तिथल्या दंतकथेवर आधारित असे हे नाटक होते. थोडक्यात कथा म्हणजे, ती एक रूपगर्विता असते. ती प्राप्त व्हावी म्हणून आजूबाजूचे राजे मरत असतात. त्यांतल्याच एका सामर्थ्यवान राजाला नकार दिला जातो. तिचे तिच्या मामेभावावर प्रेम असते, त्याच्याशी तिचे लग्न होते. पण, नकाराने चिडलेला राजा तिच्या राज्यावर आक्रमण करतो. त्याच्या ताकदीला तोंड देण्याची तिच्या राज्याची क्षमता नसते. आपला प्रिय नवरा, देश आणि आपले लोक यांचा नाश होऊ नये म्हणून ती युद्धबंदी ( की युद्धकैदी ) व्हायचे ठरवते. नवऱ्याला सांगते की मी शुद्ध राहीन आणि परत येईन, तोवर तू वाट बघ. ती चेटूकविद्यापारंगत असते. कालांतराने ती त्या समर्थ जेत्या राजाला आजारी पाडते. त्याच्या सर्वांगातून दुर्गंधी येऊ लागते. तिथले हकीम-वैद्य हात टेकतात. उपाय त्या बंदिवान राणीकडेच आहे, हे शेवटी त्यांना कळते. तिला मुक्त करण्याच्या अटीवर ती त्याला बरा करते. या प्रकारात तीन वर्षे जातात. ती परत येऊन पाहते तर

तिच्या पतीने दुसऱ्या स्त्रीशी लग्न केलेले असते. ती संतापते. आणि त्याचा तिच्या हेयरपिनने खून करते. शेवटी बेपत्ता होते.

सगळे मानवी मनांचे खेळ ! यात भूमिका कसली घेणार डोंबलाची ? ! वस्तुतः ही कलावती स्त्रियांचे प्रश्न हाताळण्यासाठी प्रख्यात आहे. पण, ही कलाकृती स्त्रीप्रधान असूनही स्त्रीवाद आणि परिवर्तन हे हेतू ओलांडून समस्त मानवी जगण्यालाच प्रस्तुत होणारी आहे, असे वाटले ! यात असे कोण आहे की ज्या व्यक्तीने फार मोठा गुन्हा केला आहे, असे म्हणावे ? तिचा नकार समजुतदारपणे स्वीकारून त्या सामर्थ्यवान राजाने शहाणपणाने जगायला हवे होते, असे फार तर म्हणता येईल ! पण, सामान्यतः मानवी मन हे, हवे ते मिळवण्याच्याच प्रयत्नात असते, मग त्या प्रयत्नात कितीही नाश होवो !

एक स्त्री आणि एक पुरुष असे दोन जगविख्यात मलेशियन गायक-वादक साथीला होते !

शेक बाईचा, आदरणीय विद्या बाळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला ! दोघींनी एकमेकींना मिठीच मारली ! हा क्षण अत्यंत हृद्य वाटला !

स्त्रीचे सौंदर्य ही मानवी जगण्यातली एवढी प्रचंड समस्या का होते – हा प्रश्न मनात घोळत राहिला ! याला बुद्धिप्रामाण्यवादी निराकरण असू शकत नाही.

इथे एक मजेदार द्वंद्व ध्यानात घ्यायला हरकत नाही. बुद्धिप्रामाण्यवाद्यांना माणसाचे मन त्याच्या सर्व गुणावगुणांसह स्वीकार्य असते – सुखलोभ, महत्त्वाकांक्षा, वर्चस्वाची इच्छा – यांसह ! पण, तरीही ते, समता हवी, अन्याय नको – असे म्हणत असतात !

-- यात ना आजचे वास्तव आहे ना आजच्या जगण्यातले प्रश्न. तरीही, हे नाटक ‘ आजचे ‘ च असते, हे पाहायला हवे. याचप्रमाणे ऐतिहासिक, पौराणिक नाटकेही ‘ आजची ‘ असू शकतात.

सारांश रूपाने बोलायचे झाले तर, काही नाटके जन्मतःच मृत असतत, काही नाटके वास्तवाचा माहोल बदलला की मृत होतात, तर काही नाटके ही कायमच ‘ आजची नाटके ‘ असतात – मानवी जगण्याला कायमच प्रस्तुत असतात. आपले एक परिवर्तनवदी लेखक, माझे मित्र प्रेमानंद गज्वी म्हणतात की त्यांची नाटके जितकी लौकर कालबाह्य होतील तितका त्यांना आनंद होईल ! म्हणजे, अपेक्षित परिवर्तन झाल्यामुळे कालबाह्य होणे ! त्यांना स्वतःला लेखक म्हणून अमर होण्यात इंटरेस्ट नाही असेही त्यांना म्हणायचे असते. इथे आपण एक लक्षात घेतले पाहिजे की आयनेस्को वा बेकेट वा पिरांदेल्लोही स्वतः अमर होण्यासाठी लिहीत नसतात. जगण्याच्या आकलनाची त्यांची प्रक्रिया व्यक्त करण्यासाठी ते लिहीत असतात.

आता मला जे म्हणायचे आहे ते सांगतो. आधुनिकता, उत्तर-आधुनिकता, परा-आधुनिता या सगळ्या माणसाच्या जगण्याच्या बदलत्या माहोलाला येणाऱ्या त्याच्या प्रतिक्रिया आहेत. त्याचप्रमाणे, सामाजिक बांधिलकी आणि परिवर्तनवाद याही प्रतिक्रियाच असतात. पण, बरेचजण, परिवर्तनवाद ही एकच प्रतिक्रिया न्याय्य समजतात. तसे होऊ

शकत नाही. मानवी जगणे हे सगळे मिळून चालू असते. अपेक्षित परिवर्तन होणे घडेपर्यंत बाकी सगळे बंद ठेवले पाहिजे, असे होणार नाही, होऊ शकणारच नाही. मौल्यवान कलाकृती या प्रतिक्रियात्मक नसून चिंतनात्मक असतात, हे पाहिले जायला हवे. पण, याकडे दुर्लक्ष करून, विशेषतः डाव्या विचारसरणीच्या लोकांकडून इतर सर्व शक्यता नाकारल्या जातात. बक्षिसे देणे, पुस्तके अभ्यासाला लावणे, चर्चांचे व व्याख्यानांचे विषय ठरवणे, समीक्षात्मक लेखनातून उदोउदो करणे, अशा अनेक प्रकारांतून हे परिवर्तनवादाचे आग्रही बिंबवणे चालू असल्याचे दिसते. तो त्यांचा दोष म्हणता येत नाही. त्यांनी ते अंतिम मूल्य म्हणून मान्यच केलेले असते. हे मीच फक्त म्हणतोय, असे नाही. एलकुंचवरांनीही या प्रश्नाकडे लक्ष वेधलेले आहेच. सर्वच लेखकांनी, कलावंतांनी हे ब्रेनवॉशिंग – प्रभावबद्ध करणे -- स्वीकारावे का, हा प्रश्न आहे. चांगल्या मौल्यवान कलाकृती या पूर्ण मानवजातीसाठी प्रस्तुत असतात, असे मला दिसते. त्या फक्त एखाद्या समूहाच्या वा एखाद्या माहोलाच्या मर्यादेत काम करणाऱ्या नसतात. त्या माणसाच्या मूलभूत प्रश्नांचा चिंतनात्मक वेध घेणाऱ्या असतात. त्यांतून येणारी संवेदनशीलता आणि समज ही ‘ समता ‘ मूल्याला उजाळा देणारीच असते. अशा प्रश्नांचे आणि प्रक्रियांचे महत्त्व वाटणाऱ्या लेखकांना व्यावहारिक यशाचे आणि स्तुतीचे प्रलोभन सोडून द्यावे लागेल. स्वतःशी प्रामाणिक असण्यातूनच तर चांगल्या कलेच्या प्रक्रियेची सुरुवात होते.

एखाद्या ‘ भूमिके ‘ पेक्षा कलेच्या चिंतनशीलतेचे महत्त्व लक्षात येण्यासाठी खालील वाक्ये पाहावीत –

Wordsworth – poetry is spontaneous overflow of powerful feelings recollected in tranquility.
Pessoa – To have no opinion is to exist. To have every opinion is to be a poet.
Kafka – It is only because of their stupidity that they are able to be so sure of themselves.

या अंगाने लिहून गेलेले ‘ आजचे ‘ जगात बरेच आहेत – त्यांना वगळण्याचे प्रयत्न घातक ठरतील.

खरे ‘ आजचे नाटक ‘ हे अमुकच प्रश्नांचे वा अमुकच माहोलाचे असावे लागते, असे मुळीच नाही. ते सर्वच माणसांच्या जगण्याबद्दल आस्था बाळगणारे असावे लागते. माणसाला एकूणच जगण्याच्या प्रक्रियेबद्दल संवेदनशील करणारे – त्याबाबतचे भान देणारे असावे लागते. अशा ‘ आजच्या नाटकांचा ‘ मराठीत दुष्काळ आहे. तशा नाटकांसाठी वातावरण मोकळे राहो आणि लेखक पूर्ण कुवतीने त्यांच्या स्वतंत्र चिंतनशीलतेला महत्त्व देवोत, हीच सदिच्छा या निमित्ताने व्यक्त करतो. धन्यवाद !
--- ००० ---

मराठी चित्रपट

थर्ड बेल एंटरटेनमेंट आयोजित कलातीर्थ शब्दगौरव पुरस्कारांच्या,पुण्यात झालेल्या,वितरण समारंभात केलेले भाषण, दिनांक २८-०५-१७.

मंचावरील आणि प्रेक्षागृहातील मान्यवर आणि सर्व उपस्थित प्रेक्षक,
नमस्कार.

प्रथमतः मला इथे बोलावून ही पारितोषिके वितरण करण्याची संधी दिल्याबद्दल मी थर्ड बेल एंटरटेनमेंट चे आभार मानतो. आजच्या या शब्दगौरव मूर्तींत माझे काही मित्रही आहेत, याचा मला विशेष आनंद आहे.

कलेच्या क्षेत्रात, मनोरंजन क्षेत्र हे दुय्यम समजले जाते, पण, तेही अनेकदा एखाद्या नोबेल पारितोषिक विजेत्या कलाकृतीइतकेच मोलाचे काम करते. कधी कधी एखादा माणूस अस्वस्थतेच्या इतक्या टोकाच्या अवस्थेला जातो की त्याला काहीच सहन होईनासे होते, तो आत्महत्येच्या विचारांपर्यंत जातो. त्या विचारांचे सातत्य तोडायची गरज असते. ते काम मनोरंजनातून होते. अशा प्रकारे एखाद्याचा जीव वाचणे हे कोणत्याही पारितोषिकाइतकेच महत्त्वाचे समजायला हवे. तो जिवंत राहिला तरच पुढे अधिक संपन्न कला, संस्कृती यांची शक्यता असते. मनोरंजन हे मेहनत, सफाई यांमुळे कमीजास्त प्रभावी वाटत असले तरी मनोरंजनाच्या अनेक परी असतात. डोंबारी, गारुडी, सर्व लोक-कलावंत, हेही त्यांच्या त्यांच्या पद्धतीने मनोरंजन करतच असतात. त्यातही अमुकच खास महत्त्वाचे असे काही म्हणता येत नाही. एकदा मी कामगार कल्याण केंद्राच्या नाट्यस्पर्धेतले एक नाटक बघायला गेलो होतो. त्या नाटकाचा विषय असा होता की, घरातल्या कर्त्या माणसाने, त्याच्या पत्नीचा विरोध असूनही, त्याच्या एका मित्राला काही हजार रुपये उसने दिले होते आणि आता यांच्या गरजेच्या वेळी तो ते परत देण्याची टाळाटाळ करत होता. थोड्याच वेळात मला त्या नाटकाचा कंटाळा यायला लागला. पण, मी प्रेक्षागृहात पाहिले तर बऱ्याचजणांना त्या नाटकाने पकडलेले होते आणि ते सगळे आता काय होणार या काळजीयुक्त उत्सुकतेने व्यग्र होऊन ते नाटक पाहात होते. त्यांच्या दृष्टीने ते एक उत्तम आणि महत्त्वाचे नाटक होते. सारांश, मनोरंजनाचे हजार प्रकार असू शकतात आणि कुणालाही कमी लेखणे हे चुकीचे ठरू शकते. मनोरंजनामुळे मानसिक अस्वस्थतेच्या सातत्यातून माणूस बाहेर पडू शकतो, त्याचप्रमाणे त्याला एक विसावा म्हणूनही मनोरंजन काम करते. हे जरी खरे असले तरी सदोदितच माणसे आत्महत्येच्या विचारात नसतात. इथल्या काही तथाकथित विनोदी कलावंतांनी इथल्या मराठी लोकांना असे सांगितलेले आहे की रोजच्या व्यापतापांनी आणि दुःखे-काळज्यांनी ते दमले-भागलेले असतात – त्यांना डोक्याला ताप सहन होणार नाही – त्यांनी आयुष्यभर हलक्याफुलक्या

करमणुकीत पडून राहावे, हेच बरे ! हेही खरे नसते. जगात फक्त मराठी माणसालाच व्यापतापदुःखेकाळज्या असतात, असे काही नसते. त्यामुळे निव्वळ मनोरंजन-कलेचे अवास्तव महत्त्व माजवणेही बरोबर नसते.

मला बोलण्यासाठी १०-१५ मिनिटेच वेळ असल्याने मी काही मुद्यांवर थोडक्यात बोलणार आहे.

एकदा एक दिग्दर्शक आणि एक निर्माता वाळवंटातून चाललेले होते. दिग्दर्शकाला एका ठिकाणी एक पिशवी पडलेली दिसली. ती उचलून त्याने उघडून पाहिली असता त्यात एक बरेच पाणी असलेला पाण्याचा जार होता. हे खासच होते. आधी निर्मात्याला पाणी पिऊ द्यावे म्हणून तो जार त्याने त्या निर्मात्याकडे दिला आणि तो चालू लागला. काही क्षणांनी मागे वळून त्याने पाहिले तर निर्माता त्या जारचे झाकण उघडून त्यात लघवी करत होता ! दिग्दर्शक बिथरलाच ! " अरे, हे काय केलेस – सगळ्या पाण्याची तू नासाडी करून टाकलीस ! " तो निर्मात्याला म्हणाला. यावर निर्माता अधिकारवाणीने म्हणाला, " मी मुळीच पाण्याची नासाडी केलेली नाही – मी त्या पाण्यात फक्त सुधारणा केलेली आहे ! " हा दिग्दर्शकाच्या सर्जक-प्रक्रियेतला एक व्यावहारिक अडथळा म्हणायचा ! असे आणखीही काही मुद्दे असतात, त्यांबद्दल बोलायचे आहे.

अलिकडेच मी शाहरुख खानची एक मुलाखत ऐकली. तीत तो म्हणाला की ' मी स्वप्ने विकतो ! ' याला हिंदी सिनेमात एक मोठी परंपरा आहे. राजकपूरचा ' सपनोंका सौदागर ' आठवा. तेव्हा तोही तेच म्हणत होता. " सपनोंका सौदागर आया – ले लो ये सपने ले लो – तुमसे किस्मत खेल चुकी – अब तुम किस्मतसे खेलो ! " तिथूनच तर हेमा मालिनी ही भारताची ड्रीमगर्ल झाली ! पण, हिंदीसारखी भव्य स्वप्ने मराठीला विकता येतील का, हा एक मोठा प्रश्नच आहे ! शाहरुखने त्या मुलाखतीत आणखी काही मुद्दे मांडलेले आहेत. तो इथला एक बादशहा-स्टार असून एक यशस्वी निर्माताही आहे, त्यामुळे, त्याचे बोलणे मनोरंजन क्षेत्रातले महत्त्वाचे विचार म्हणूनच पाहायला हवे. त्याचे म्हणणे असे की – (१ ) यापुढे, ' बाहुबली ' प्रमाणे तंत्रज्ञानाचा वापर खूप वाढत जाईल. ( २ ) जागतिक चित्रपट आता सहज मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत जातील. ( ३ ) सगळीच चित्रपट निर्मिती भव्य असेल असे नाही – अनेक कलावंत, यापुढे, आपापल्या कल्पनांप्रमाणे खूप चित्रपट निर्मिती करतील. – एक व्यवसाय म्हणून या क्षेत्रातल्या सर्वांनाच ही आव्हाने असतील. मराठी चित्रपट व्यवसायाला तर ही अधिकच गंभीर आव्हाने ठरू शकतील. कारण मराठी प्रेक्षक या सर्व कारणांमुळे अधिकाधिक विखुरला जाऊ शकतो.

या बाबतीत मराठीवाल्यांनी काय विचार करायला हवा ? अर्थातच, आवाका वाढवून लक्ष्य-प्रेक्षक ( target audience ), फक्त मराठी न समजता, जागतिक समजायला हवा. जागतिक प्रेक्षक डोळ्यांपुढे ठेवून चित्रपट निर्मिती करायला हवी. सर्व अडचणी आणि साधन-त्रुटी लक्षात घेऊनही आशयकेंद्री चित्रपट हे मराठीचे वैशिष्ट्य ठरू शकते. मराठी चित्रपट दोन गोष्टींत वर्षानुवर्षे अडकून पडलेला आहे – बोधप्रदता आणि सामाजिक बांधिलकीच्या कल्पना. या गोष्टींतून बाहेर पडल्याशिवाय आवाका वाढणार नाही. सामाजिक प्रश्न, सामाजिक काम करणारे लोक, निरनिराळ्या प्रकारच्या आजारांनी ग्रस्त लोक – हे विषय फार दिसतात. रोगांमध्ये तर – कॅन्सर, स्मृतिभ्रंश, एडस, अंधत्व, मंदबुद्धी, छिन्नमनस्कता – हे सर्व कव्हर करून झालेले आहे ! ( ' कोशिश ' सारख्या सिनेमाला अजून वाव आहे ! ) अशा रोगांच्या तावडीतून मराठीने आता सुटायला हवे. बोधप्रदता हा तर एकूणच मराठी चित्रपट जगतालाच लागलेला रोग म्हणता येतो – त्यातूनही बाहेर पडायला हवे.

उत्तम, आशयकेंद्री चित्रपटाला खूप पैसा लागतो, असे काही नाही. रोगाशी संबंधितच एका सिनेमाचे उदाहरण द्यायचे झाल्यास मी ' यस्टरडे ' या चित्रपटाचे देईन. एडस झालेल्या एका आफ्रिकन कामगाराच्या कुटुंबाचे जगणे हा त्याचा विषय होता. त्यातली काही दृश्ये अजून माझ्या लक्षात आहेत. तो एक मानवी प्रश्नाची परिपक्व समज व्यक्त करणारा चित्रपट होता. दुसरे उदाहरण ' द अर्थ अँड ऍशेस ' या चित्रपटाचे देता येईल. खाणकामगार असलेल्या आपल्या मुलाकडे नातवासह भेटायला चाललेला एक म्हातारा – हा होता विषय. ' चिल्ड्रेन ऑफ हेवन ' तर आपल्याला माहीतच आहे. बुटांचा एकच जोड वापरणाऱ्या भाऊ आणि बहीण यांची तारांबळ दाखवणारा तो एक अजब सिनेमा होता. ' द फनी ओल्ड मॅन ' हा नव्वद मिनिटांचा चित्रपट, जो मी सुमारे पन्नास वर्षांपूर्वी पाहिला, माझ्या, बऱ्याचशा तपशीलांसह, अजून लक्षात आहे. तो चित्रपट मी पाहिला तेव्हा मी खूपच प्रभावित झालेलो होतो. चिं. त्र्यं. खानोलकरांची आणि माझी मैत्री होती. ते एकदा पुण्यात आलेले असताना मी तो पूर्ण चित्रपट त्यांना सांगितला. माझ्या नुसत्या सांगण्यावरून तेही इतके प्रभावित झाले की – ' कल्पना एका झेक चित्रपटावरून ' असा उल्लेख करून त्यांनी ' अज्ञात कबुतरे ' नावाची कादंबरीच लिहिली ! मराठीतला मला आवडलेला चित्रपट म्हणजे, ' चोरीचा मामला '. आता तर त्याला एक द्रष्टा चित्रपटही म्हणावे लागेल ! निळू फुले आणि एक गुरखा यांनी मिळून, एका चोरटा व्यापार करणाऱ्याच्या संपत्तीवर डल्ला मारलेला असतो. पण, हे असतात गरीब लोक. चैन करणार तरी कशी ? हजाराची नोट घेऊन एखाद्या दुकानात काही घ्यायला जावे तर सगळे संशयाने पाहतात ! – असा हा बिकट प्रॉब्लेम ! एकदा निळू फुल्यांना रस्त्यात तो गुरखा भेटतो. " काय रे, कुठे गेला
होतास ? " ते विचारतात. " स्टेशनवर तिकीट काढायला – " तो म्हणतो. " काय, कुठे गावाला चाललास काय ? " फुले विचारतात. तो म्हणतो, " छे छे – तिकीट काढायचे आणि द्यायचे टाकून – पैसे सुटे करून आणायचे ! " – रेल्वेचा असाच एक वेगळा उपयोग लोकांनी नोटाबंदीच्या काळात कसा केला होता, ते आठवा. त्या चित्रपटातली, निळू फुले आणि ललिता पवार यांची अभिनय-जुगलबंदी अविस्मरणीय होती. मी काही खूप चित्रपट पाहात नाही – मुद्दा मांडण्यापुरते आठवेल ते सांगतोय. मराठीतला ' टिंग्या ' हा चित्रपटही मला आवडला होता. सांगायचा सारांश हा की आशयकेंद्री चित्रपटनिर्मितीकडे वळणे हाच मराठीसाठी एक उत्तम मार्ग आहे.

नीतीअनीतीच्या कल्पना आणि अस्मितांचे अडथळे ओलांडून चित्रपट हा सर्व जातिधर्मविचारसरण्या असलेल्या सर्वच माणसांसाठी असायला हवा. तो कोणत्याही अनुभवाचे समग्र भान घेणारा असायला हवा. सर्वांच्या जगण्याला तो प्रस्तुत – relevant – असायला हवा. काहींना वाटते की आपल्याला महायुद्धांचे अनुभव नाहीत म्हणून आपली कला खुजी असते. काहीजण म्हणतात की मध्यमवर्गीय जीवन जगणारे कलावंत चांगली कलानिर्मिती करू शकत नाहीत कारण त्यांचे अनुभवक्षेत्र मर्यादित आणि रटाळ आणि किरटे असते. हे सर्व खोटे आहे. हे खरे असेल तर जगातली सर्वोत्कृष्ट कलानिर्मिती अमुक एका सर्वात वाईट जीवन जगणाऱ्या देशातूनच होईल, असे सांगता यायला हवे. अनुभवाचे मटेरियल कोणतेही असो, कलेत इनसाईट म्हणजे मर्मदृष्टी असणे महत्त्वाचे असते. मानवी संबंधांचे पूर्ण आंतर्बाह्य भान म्हणजे मर्मदृष्टी. या संदर्भात तारकोवस्की या महान दिग्दर्शकाची दोन वाक्ये सांगतो –

१. Relating a person to the whole world is the meaning of cinema. ( कोणत्याही माणसाचे पूर्ण जगाशी असणारे नाते पाहणे हाच सिनेमाचा अर्थ असतो. )

२. Art symbolises the meaning of our existence. -- कला म्हणजे आपल्या जगण्याच्या अर्थाची प्रतिमा असते.

-- हे सर्व लक्षात घेऊन, पचवून चित्रपट निर्मिती व्हायला हवी, तरच या असंख्य अडचणींमधून मार्ग निघत राहतील.

कला म्हणजे नुसते अनुभवकथन नव्हे. अगदी सत्य अनुभवाचे कथन म्हणजेही चांगली कला नव्हे. आणि आता तर माध्यमांमधून असंख्य घटनांचा रोज सर्वांवर भडिमार चालू असतो. त्यामुळे, नुसत्या अनुभवाचे काही अप्रूपही राहिलेले नाही. वर उल्लेखलेल्या समग्र भानातून कला आली तरच ती अर्थसंपन्न होईल. तशी, भानयुक्त कला हीच खरी सर्जक कला असेल.

अलिकडे जाणवणाऱ्या सादरीकरणाच्या एका प्रश्नाबद्दल बोलून थांबतो. माणसाच्या जगण्याला जो वेग आलेला आहे तोच कलेतही परावर्तित होतो आहे. आता सगळे खूप वेगवान असण्याची गरज आहे. अन्नू मलिक या संगीतकाराला एकदा विचारले गेले होते की हल्ली गाण्यातली मेलडी – गोडवा कुठे हरवलाय ? का जाणवत नाही ? तो म्हणाला की आता, सहा सहा महिने प्रेम फुलवत बसणे होतच नाही – झटपट मामला असतो ! गोडवा घोळवत बसायला वेळ कुठे असतो ? या बाबतीत दिग्दर्शक कासारवल्ली यांनी सांगितलेला विचार असा आहे की – प्रचंड वेगात पुढे जात राहण्याने कलेची हानी होते. मानवी संबंधांचे आणि जगण्याचे भान घेणे अशक्य होते. आशयाची खोली हरपते. – कलाप्रक्रियेतल्या अशा प्रश्नांवरही चित्रपट कलावंतांचे स्वतःचे चिंतन असायला हवे, तरच निर्मिती प्रक्रियेला नवनवे धुमारे फुटत जातील.

असे सखोल, आशयकेंद्री चित्रपट मराठीत निर्माण होवोत अशी सदिच्छा व्यक्त करून हे दोन शब्द संपवतो.
धन्यवाद !
--- ००० ---

थोडा वाढीव मजकूर --

घुसमटवून टाकणारा प्रकाश

‘ मराठी चित्रपट ‘ या माझ्या पोस्टमध्ये ‘ द अर्थ अँड ऍशेस ‘ या चित्रपटाचा उल्लेख केला तेव्हा त्यातले एक दृश्य मला आठवले. त्या चित्रपटाचा बराच भाग, कडक ऊन आणि वाळवंट असा आहे. एकदा जोराचा वारा सुटतो. वाळवंटातली वाळू उडू लागते. ऊन आणि वाळू ! वाळू इतकी उडते की एक वेळ अशी येते की दुसरे काहीही दिसेनासे होते – फक्त कडक उन्हातली प्रचंड वाळू ! काही क्षण पूर्ण पडद्यावर फक्त प्रकाश असतो – पण, तो आपल्याला घुसमटवून टाकत असतो ! तो प्रकाश म्हणजे अमर्याद वाळू असते !

ऐसा कुछ तो मराठीमे करो यार !

कदाचित असे काही खास, मराठी चित्रपटांत येऊनही गेले असेल – कुणाला असे काही आठवत असल्यास जरूर सांगावे.
--- ००० ---

## कवितेचे प्रयोजन आणि कविता ‘ कळणे ‘

अनेक कवी त्यांच्या कवितालेखनाचे अनेक वेगवेगळे हेतू सांगतात. आपण इथे त्या सर्वच गोष्टी सामावल्या जाव्यात अशा दृष्टीने पाहू. कवितांचे तीन प्रकार दिसतात – समोर एखादे साध्य असलेल्या कविता, सुखदुःख व्यक्त करणाऱ्या कविता आणि समग्र भान देणाऱ्या कविता. या तिन्ही प्रकरांतल्या चांगल्या कविता विचारात घेऊन खालील वर्णने वाचावीत --

साध्य

काही कविता विशिष्ट साध्यासाठी लिहिल्या जातात. साध्य हे वैचारिक असते. एकरेषीय असणे हे विचाराचे वैशिष्ट्य या कवितांची मर्यादा असते. या कविता माहितीरूप गद्य संपर्काच्या आसपास कार्यरत असतात. देशभक्ती, धार्मिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता, जाति-अंत, समता, सामाजिक-राजकीय परिवर्तन – असे काही साध्य या कवितांसमोर असते. या अर्थाने त्या उपयुक्ततावादी असतात. आदर्श-निष्ठेची भावनिकता असली तरी आशय ठरलेला असल्यामुळे त्या एकसुरी होतात. हा एकसुरीपणा त्यांच्या ध्वनिप्रक्रियेतही असतो. साध्यच महत्त्वाचे वाटत असल्याने त्यांना अशा या रटाळपणाची पर्वा नसते. मानवी जगण्यातल्या सखोल गुंतागुंतीच्या आशयाशी त्यांना काही देणेघेणे नसते. त्यामुळे, आशयघनता खूपच कमी असते. सखोल समावेशकतेच्या अभावामुळे आवाकाच तुटपुंजा असतो.

सुखदुःख

या प्रकारच्या कविता कवींचे व्यक्तिगत सुखदुःख व्यक्त करणाऱ्या असतात. त्यामुळे, भावनिकही असतात. यांत खूप वैविध्य असू शकते. अभिव्यक्तींचे, रचनांचेही अनेक प्रकार असतात. अलंकरणाच्या, चमत्कृतीच्या, प्रतिमा-प्रतीकांच्या शक्यताही खूप असतात. त्यामुळे, सामान्यतः ‘ साध्य ‘ प्रकारातील कवितांपेक्षा या कविता खूपच इंटरेस्टिंग असतात. आशयदृष्ट्याही अधिक समृद्ध असतात. यांचा वाचकवर्ग अधिक व्यापक आणि संमिश्र असू शकतो. या सर्वच माणसांना संबोधित करतात. पुनःप्रत्ययाचा आनंद, भावनांचे विरेचन, अनुभव-समृद्धी या गोष्टी अशा कवितांतून मिळतात. तरीही, व्यक्तिगततेच्या मर्यादेत त्यांची कृती चालत असल्याने, इथेही मानवी जगण्यातल्या सखोल, समावेशक आशयाचा अभावच असतो.

भान

या कविता सखोल, समावेशक भान देणाऱ्या असतात. त्यांना अमुक विचाराची वा अमुक भावनेची मर्यादा नसते. आवाका व्यापक असतो. एकरेषीयता नसते. सूचकतेचे प्रमाण खूप असते. ‘ सांगून संपणे ‘ नसल्याने आणि कवीच्या मतरूप आशय-मर्यादा नसल्याने नित्यनूतनता असते. वरील दोन्ही प्रकारांत असणारी प्रतिक्रियारूपता नसल्याने भावनिकता कमी असते. अनुभवात्मक कच्चा माल जरी कवीच्या जगण्यातून येत असला तरी कवीला त्यातल्या गुंतागुंतीचे समग्र भान घेणे महत्त्वाचे वाटत असते. कोणत्याही निष्कर्षाकडे पोचायचे नसते. या कविता क्षणोक्षणी जगण्याचे पूर्ण भान देत असल्याने आशय-समृद्ध असतात. शब्द, भाषा, रचना यांच्यांतल्या अनंत वैविध्याला इथे वाव असतो.

वरील तिन्हींमध्ये, तिसरा प्रकार माणसाला पराकोटीची संवेदनशीलता आणि परिपक्वता बहाल करणारा असतो. या अर्थाने हा प्रकार सर्वोच्च श्रेयस्कर आणि सांस्कृतिक दृष्ट्या मौल्यवान असतो. वरील तिन्ही प्रकारांतल्या सर्वच कविता, या ना त्या प्रकारात घट्ट बसणाऱ्या असतात, असे नाही. प्रकारांची थोडीफार सरमिसळ होऊ शकते. कवीला नकळतही ' वेगळे ' काही घडू शकते.

वरील विवेचनाच्या संदर्भात ' कविता कळणे ' म्हणजे काय ते पाहू.

कविता कळणे

' साध्य ' या प्रकारातल्या कविता ' दुर्बोध ' असून चालतच नाही. प्रबोधन करणे, न्यायाची परिस्थिती निर्माण करणे, अन्यायी समूहांबद्दल राग व्यक्त करणे, प्रखर आशावाद व्यक्त करणे – असे त्यांचे स्वरूप असते. अशा कवितांच्या कवींना, याव्यतिरिक्त कोणत्याही कारणासाठी कविता लिहिणे म्हणजे, आहे ती परिस्थिती टिकवण्याच्या विचाराचे असणे, आत्ममग्न असणे, दुःखी, अन्यायग्रस्त, गरीब लोकांबद्दल बेफिकीर असणे – असे वाटत असते. हे सर्व लक्षात घेता, या कवितांचा आशय बराचसा एकसारखा असतो. या कविता ' कळणे ' अवघड नसते.

' सुखदुःख ' या प्रकारातल्या कविता वरीलपेक्षा खूपच अधिक व्यामिश्र असू शकतात. अनुभवातली गुंतागुंत आणि भावनिक जंजाळ यांमुळे या कविता अधिक ' अर्थसमृद्ध ' असतात. प्रतिमांचा मुक्त वापर होत असल्याने या पहिल्या वाचनातच कळतील, असे नाही. कोणता मूड, कसले सुख वा दुःख, कशा प्रकारची प्रतिक्रिया अमुक एक कविता व्यक्त करतेय, याचा पहिल्या वाचनात अंदाज येऊ शकतो. नंतरच्या वाचनात अधिक खोलातले अर्थ उमगू शकतात. या कवितांत कलात्मकताही तुलनेने अधिक असते. अशा कवितेतले ध्वनी, त्यांची आवर्तने, प्रतिमांची अर्थसंपृक्तता, त्यांचे आंतरसंबंध, शब्दयोजना व रचना, त्यांचा क्रम, त्यांच्या साहचर्यातून निर्माण होणारी अर्थवलये – अशा सर्व गोष्टींमुळे या कविता, व्यक्तिगत सुखदुःख पोचवण्याबरोबरच कलात्मक आनंदही देतात. त्यामुळे, आशयातल्या दुःखाची तीव्रता कळूनही यांतल्या ओळींना ' वाहवा ' मिळू शकते.

' भान ' या प्रकारच्या कविता मुळात ' सवयीतल्या ' नसल्याने दोर्बोध असतातच. वैचारिकतेची एकरेषीयता वा भावनेची विशिष्टता यांच्या मर्यादा इथे नसतात. त्यामुळे अभिव्यक्ती खूपच मुक्त आणि स्वैर असू शकते. या कविताही कलात्मकतेची सर्व तंत्रे वापरतात. शब्द आणि प्रतिमा यांच्या खूपच मर्मभेदी रचना इथे असू शकतात. इथे कवीला त्याची मते वा भावना यांचे वा त्याच्या व्यक्तिगत प्रतिक्रियांचे प्रक्षेपण करणे महत्त्वाचे वाटत नाही. त्यामुळे, अशा कवितांचे आवाहन हे पूर्ण मानवजातीला असते. त्या सर्व माणसांना जगण्याचे अमर्याद असे समावेशक भान देणाऱ्या असल्याने वाचकाला परिपक्व करणाऱ्या असतात. या अर्थाने त्यांचे सांस्कृतिक मूल्य हे सार्वकालिक असते. आशय आणि अर्थसमृद्धत्ता या दृष्टीने अशा कविता मानवी जगण्यात सर्वोच्च सांस्कृतिक समृद्धता बहाल करणाऱ्या असतात.

चांगल्या कवितांचे कळणे हे व्यावहारिक माहितीच्या भाषेच्या स्तरावर वा निवेदनाच्या स्तरावर असू शकत नाही, हे एकूणातच लक्षात घ्यायला हवे. झाले, संपले, कळली कविता, असे होत नसते.

--- ००० ---

नूतनीकरणापूर्वीच्या वेबसाईटवरचा प्रारंभ मजकूर

प्रारंभ

(होमपेज)

माणसाच्या प्रश्नांची विभागाणी व्यवस्थेचे प्रश्न आणि मनाचे प्रश्न अशी करता येते. काहीजण असे मानतात की व्यवस्थेचे प्रश्नच अधिक महत्त्वाचे असतात आणि मनाच्या प्रश्नांची निर्मितीही व्यवस्थेच्या प्रश्नांतूनच होते. याउलट, काहींच्या मते मुळात सगळे मनाचेच प्रश्न असतात आणि व्यवस्थेच्या प्रश्नांच्या विकृतीही मनाच्या प्रश्नांतूनच तयार होतात. सामान्यत: सामाजिक, आर्थिक, राजकीय परिवर्तनासाठी चालणाऱ्या विवेकी कृती, चळवळी या प्रचाराच्या, प्रबोधनाच्या, आंदोलनाच्या आणि क्रांतीच्या कृती असतात. मनाच्या प्रश्नांच्या क्षेत्रातल्या समजुतदार कृती या प्रामुख्याने सांस्कृतिक कृती असतात. यात अर्थात थोडीफार सरमिसळ होऊ शकते. परिवर्तनाच्या क्षेत्रातल्या कृतींना विचारसरणी, बांधिलकी यांची गरज असते. याउलट, मनाच्या प्रश्नांच्या बाबतीत त्यांचा काडीमात्र उपयोग नसल्याचे दिसते. कोणतीही विचारसरणी, कोणताही धर्म वगैरे बाळगणाऱ्या आणि कोणत्याही व्यवस्थेतल्या लोकांचे मानसिक प्रश्न समान असतात. म्हणजे, याचा अर्थ, मनाचे पाताळयंत्रच निकडीने पाहायला हवे.

Home Page

Human problems can be divided into the problems of system and the psychological problems. Some people believe that the problems of system only are important and the psychological problems are just their by-products. As against this, some people believe that essentially all are the psychological problems only and the problematic aberrations in system are just their outward expressions. Generally, all rational activities, movements intended to bring about reformation in social, economic and political structures are actions of propaganda, enlightenment, agitation or revolution. The wise actions in the field of the psychological problems are mainly cultural in nature. Some mixture of the both is, of course, possible. The activities for reformation need ideology and commitment, but, they are found to be totally useless in the field of psychological problems. People belonging to any ideology, any religion and

placed in any type of system have the same psychological problems. That means, the intricacies of the psychological structure only need urgent attention.
--- ००० ---

नवीन मजकूर

<u>होम पेज ( प्रारंभ )</u>

लेखक म्हणून तुम्ही ‘ भूमिका ‘ असण्याचे महत्त्व मानता का, सामाजिक-राजकीय-आर्थिक परिवर्तनासाठी तुम्ही लिहिता का, ‘ विवेक ‘ हेच अंतिम मानवी मूल्य आहे असे तुम्हाला वाटते का आणि बुद्धिप्रामाण्यवाद हेच सर्वोच्च श्रेयस आहे, असे तुम्हाला वाटते का –
-- या सर्व प्रश्नांना माझे एकच उत्तर नाही असे आहे.
त्याचप्रमाणे,
आहे ते, आहे असेच चालू राहावे, असे तुमचे मत आहे का ?
याही प्रश्नाला माझे उत्तर नाही असेच आहे.

मानवी जगण्याचे प्रवाही, कृतिशील भान भाषेत व्यक्त होणे म्हणजे सर्जक लेखन.

Home Page

As a writer do you have any ideology, do you write for social-political-economic reformation, do you consider that conscience is the main value and do you claim that thinking is the only way of understanding –
-- I have to reply NO to all these questions.
Similarly , to the question --
Are you a supporter of status quo ?
I have to say NO to this also.

The expression of the stream of active awareness of human living is creative writing.
--- 000 ---

काव्यतत्त्व

अनुभव म्हणजे काय तर जगण्यातल्या घटितांना – घटनांना येणारा व्यक्तीचा प्रतिसाद वा प्रतिक्रिया. म्हणजेच, अनुभव हा प्रत्येक व्यक्तीच्या शारीर-मानसिक घडणीवर – प्रोग्रॅमिंगवर – कंडिशनिंगवर अवलंबून असतो. त्यामुळे, अनुभवाला सत्याचे मूल्य असू शकत नाही. काही प्रतिक्रिया आदर्श ठरवून जास्तीत जास्त व्यक्तींच्या तशाच प्रतिक्रिया याव्यात असा प्रयत्न करण्याला ब्रेनवॉशिंग म्हणजे मनाला ठराविक पद्धतीने सवयबद्ध करणे म्हटले जाते. ते कोणत्याही प्रकारे चांगले, आरोग्यपूर्ण वा हितकारक मानले जात नाही. मुळात, अमुक प्रतिक्रिया आदर्श असे ठरवणेच अशक्य असते. ज्या त्या व्यक्तीला वा ज्या त्या व्यक्तिसमूहाला स्वतःच्या प्रतिक्रिया बरोबर, समर्थनीय, न्यायाच्या आणि हितकारक वाटत असतात. हे सर्व पाहता, कलेत, कोणताही अनुभव जसाच्या तसा प्रामाणिकपणे अभिव्यक्त करणे, हे फारसे मौल्यवान असू शकत नाही.

जगातले अनेक कवी, लेखक यावर बोलून गेलेले आहेत. अनुभवाची ही मर्यादा आणि एकमेकांच्या विरोधात असण्याची अवस्था ओलांडण्याचे महत्त्व ओळखणारे बरेच होऊन गेले आहेत. ज्ञानेश्वरांनी ‘ परतत्त्वाचा स्पर्श ‘ सांगितला, तुकाराम म्हणाला की ‘ बोलविता धनी वेगळाचि ‘ किंवा ‘ परि त्या विश्वंभरे बोलविले ‘. असेच उद्गार फर्नांडो पेसोआ या विसाव्या शतकातल्या ‘ most profound ‘ ( अत्यंत सखोल ) समजल्या जाणाऱ्या कवीनेही काढलेले आहेत –

Rereading, I wonder: "Was that me?"
God knows, because he wrote it.

दुसऱ्या एका ठिकाणी तो म्हणतो –
If what I write has any value, it is not I who am
valuable.
The value is there, in my verses.
All this has nothing whatever to do with any will
of mine. ------- Pessoa.

साहित्यातल्या वा कलेतल्या कोणत्याच संकल्पनेची बिनचूक, समावेशक व्याख्या कधीच कुणाला करता आलेली नाही. त्याचे एक कारण, विविधतेला अंत नसतो हे एक आहे आणि दुसरे कारण, विदीर्णता ओलांडणारे भान हे एकात्म असते ( तुकारामाचे
‘ एकविध मन ‘ ), आणि बौद्धिक कृती ही फक्त तुटक, fragmented, विदीर्णतेचीच असू शकते – हे आहे. एकात्मतेचे अस्तित्व हे विदीर्णतेच्या भाषेत मांडून दाखवा, असे म्हणण्यात काहीच अर्थ नसतो. परंतु, बुद्धिप्रामाण्यवाद्यांचा तसा हट्टाग्रह असतो. त्यामुळे त्यांच्याकडून, कलेतल्या मूल्याच्या प्रश्नाला भिडणारी सर्जक कलाकृती निर्माणही होऊ शकत नाही आणि तशा मौल्यवान कलाकृती त्यांना ‘ समजू ‘ ही शकत नाहीत. ते त्यांच्या तर्क, बुद्धी यांच्या रटाळ, रद्दड आग्रहातच खुश राहू इच्छितात वा त्यातच डुंबत राहू इच्छितात. जगातले इतके मान्यताप्राप्त लेखक, कवी काय म्हणताहेत हे सगळेच ते हास्यास्पद ठरवून उडवून लावतात.

वर्डस्वर्थ ' recollected in tranquility ' ( शांततेत स्मरण केलेले ) म्हणून गेला. शांतता म्हणजे विदीर्णतेचा गोंधळ असू शकतो का ? सार्त्रने नथिंगनेस ( रिकामेपणा ) सांगितला. तुकारामानेही ' रिकामीक ' किंवा ' मागेपुढे अवघा दिसे रिता ठाव ' हे आणि एकविध – एकात्म मन एकच असल्याचे सांगितले. पण, सार्त्रच्या नथिंगनेसपुढे गुडघे टेकणारे आपले विद्वान तुकारामाला मात्र ' अध्यात्मिक ' म्हणून हसून सोडून देतात ! नथिंगनेस कळतो का बुद्धीने ? तो अध्यात्मिक नाही का ? काही शहाणे म्हणतात, सार्त्रच्या अस्तित्ववादाचा काळ आता संपला आहे – ती महायुद्धांना आलेली प्रतिक्रिया होती ! प्रतिक्रियेशिवाय काही कळतच नाही – ही अवस्था ! म्हणजे बुद्धाला ज्ञान झाले ते प्रेत, आजारी माणूस आणि वृद्ध यांच्यामुळे ! अरे वेड्या ती निमित्ते होती – ' त्यामुळे ' असे नाही म्हणता येत ! इथे जर भावनिक कारणांनी शिव्या खाण्याची वा लाथा बसण्याची शक्यता नसती तर ज्ञानेश्वर-तुकारामांचाही काळ संपला, असे म्हणायला हे लाजले नसते ! सांगायचा मुद्दा हा आहे की विदीर्णतेच्या – बुद्धीच्या – मर्यादा एका व्यक्तीत ओलांडल्या जाणे म्हणजे ते त्या पूर्ण मानवजातीच्या ओलांडल्या जाणे असते – ती शक्यता कधीच संपत नाही. मौल्यवान लिहिणे म्हणजे लेखकाचा तो अमर होण्याचा वा ' कीर्तिरूपे उरण्याचा ' प्रयत्न नसतो. प्रतिक्रियेच्या चक्रातून बाहेर पडण्याच्या मौल्यवान तत्त्वाचा तिथे स्पर्श असल्यामुळे ते लेखन सार्वकालिक आणि सर्व माणसांना प्रस्तुत होत असते.

प्रतिक्रियारूप जगणे आणि बुद्धीच्या एकरेषीय, तुकडेबाज मर्यादेत जगणे हेच अबाधित, अटळ आणि अंतिम असणार अशा निष्कर्षाने जगायचे म्हटले की धर्मातली वा घटनेतली सगळी आदर्श तत्त्वे ही फक्त शब्दरूपात उरतात आणि अर्थ म्हणून खलास होतात, हे डोळे उघडून पाहायला हवे. पेसोआ काय म्हणतो बघा –

"I believe in the World as in a daisy.
Because I see it. But I don't think about it
Because thinking is not understanding…"
— Fernando Pessoa,

टी. एस. एलियट काय म्हणतो, ते पाहा –

Poetry is not a turning loose of emotion, but an escape from emotion; it is not the expression of personality, but an escape from personality.

आणखी एकदा पेसोआचे तेच उद्धृत –

If what I write has any value, it is not I who am
valuable.
The value is there, in my verses.
All this has nothing whatever to do with any will
of mine. ------- Pessoa.

किंवा --

He knows there is no reason for anything to exist,
And he knows that to exist is to occupy a point.
What he doesn't know is that thought is not a point.
-- Pessoa

-- हे सगळे बुद्धीने कळणारे नाही. म्हणून फेटाळून लावायचे ?
सगळे बौद्धिकच असते असे समजून आपल्याकडे धरला जाणारा ‘ भूमिके ‘ चा, विशेषतः सामाजिक बांधिलकीचा आग्रह पाहता त्यावर गाओ झिंगझिआन काय म्हणतो, ते बघा –

What I want to say here is that literature can only be the voice of the individual and this has always been so. Once literature is contrived as the hymn of the nation, the flag of the race, the mouthpiece of a political party or the voice of a class or a group, it can be employed as a mighty and all-engulfing tool of propaganda. However, such literature loses what is inherent in literature, --- GAO.

यावर थोडक्यात म्हणजे एवढेच लिहिणे खूप झाले. मी जे ‘ काव्यतत्त्व ' म्हणतो ते इथे कसे मांडले आहे ते पाहा –

Poetic feeling does not derive simply from the expression of the emotions. Nevertheless, unbridled egotism, a form of infantilism, is difficult to avoid in the early stages of writing. Also, there are numerous levels of emotional expression and to reach higher levels requires cold detachment. Poetry is concealed in the distanced gaze. – GAO.

हा जो distanced gaze आहे ना, तेच काव्यतत्त्व ! अनेक मोठमोठ्या लेखक-कवींनी वेगवेगळ्या शब्दांत हे सांगितलेले आहे. यालाच मी अनेकदा ‘ समग्र भान ‘ तत्त्व म्हटलेले आहे. तसेच इथेही आहे --

Literature does not simply make a replica of reality but penetrates the surface layers and reaches deep into the inner workings of reality; it removes false illusions, looks down from great heights at ordinary happenings, and with a broad perspective reveals happenings in their entirety. – GAO.

म्हणूनच, माझ्या भाषेत न म्हणता बोदलेयरच्या भाषेत मी म्हणतो --

Always be a poet, even in prose. -- Charles Baudelaire
( नेहमीच कवी राहा – गद्यातही. )
--- 000 ---

साहित्य, कला आणि भूमिका

## -- चं. प्र. देशपांडे.

### विषय प्रवेश

सुरुवातीला, पीटर शेल्डालच्या मी अनुवादित केलेल्या काही ओळी –

माझे आयुष्य राहत आलेले आहे कंटाळवाणे
गोंधळलेले आणि कधीकधी अत्यंत घृणास्पद
आणि उद्रेकमय
परंतु मी कधीच काहीच उच्चारलेले नाही मुद्दाम,
अतिशय प्रामाणिकपणाशिवाय.

माझे स्वत:शीच असणारे मतभेद म्हणजे
असतात गैरसमज
एका बधिर आशावादाने पेललेले

बहुधा मी बाळगत नाही माझी मते
काही तासांहून अधिक काळ.

आता सार्त्रच्या ‘ क्राईम पॅशनेल ‘ या नाटकाचे उदाहरण देणे इथे योग्य होईल. हे नाटक मानवी जगण्यातल्या अनेक मूलभूत प्रश्नांचा वेध घेणारे आहे. तरीही, इथे आपल्या दृष्टीने, ‘ भूमिका ‘ या विषयाचा पूर्ण धांडोळा घेणारे नाटक म्हणूनही त्याच्याकडे पाहता येईल. ही एका काल्पनिक देशातल्या एका काल्पनिक क्रांतिकारक पक्षाची कथा आहे. या पक्षातला एक गट जहाल विचारांचा आहे आणि दुसरा मवाळ – समजुतदार – सबुरीच्या विचारांचा आहे. त्या मवाळ गटाचा नेता प्रसंगी प्रतिगाम्यांशी समझोता करून शासनात सहभागी व्हावे आणि संधी मिळेल तेव्हा आपले वर्चस्व वाढवावे, अशा

विचारांचा वा भूमिकेचा आहे. ते जहाल गटाला मुळीच पटणारे नाही. क्रांतीच्या प्रक्रियेत तो मवाळ नेता हा एक अडथळा आहे, असे त्यांना वाटते. त्यामुळे, त्या मवाळ नेत्याचा खून केला पाहिजे, अशा निर्णयाला ते येतात. ती जबाबदारी एका टायपिस्टवर सोपवली जाते. तो लगेच तयार होतो. तो म्हणजे त्याच्या वडिलांकडून अपमानित झालेला आणि त्याच्या पत्नीलाही खास काही न वाटणारा असा असतो. स्वतःला सिद्ध करायला ही संधी बरी आहे, हा त्याचा विचार असला तरी जहाल भूमिकेसाठीच तो तयार असल्याचेच दिसते. हे पूर्ण नाटक – त्यातला कण न कण -- वाचणे महत्त्वाचे आहे. सगळे सांगत बसत नाही, पण तो ठरलेल्या भूमिकेसाठी त्या मवाळ नेत्याचा खून नाही करू शकत. त्याची पत्नी जेव्हा त्या नेत्याच्या मिठीत त्याला दिसते तेव्हा मात्र त्यामुळे झालेल्या उद्रेकात तो गोळी झाडतो आणि त्याला ठार करतो. या कामगिरीनंतर तो इकडे परत येतो तोवर या आधीच्या जहाल गटाची भूमिका बदललेली असते ! मवाळपणाच योग्य, अशी आता त्यांची भूमिका झालेली असते ! आणि आता प्रश्न हा असतो की जहालपणाच्या भूमिकेतून त्या मवाळ नेत्याचा खून करून आलेला हा माणूस आता आपल्यांत समावला जाऊ शकेल का ? – हे सगळे कळल्यावर हा खुनी म्हणतो की मी त्याला भूमिकेसाठीच मारले ! आता मी तुम्हाला सोयीचा नसल्यामुळे तुम्ही मला मारलेत तरी मला त्याची पर्वा नाही ! आणि अशा रीतीने तो मृत्यूला सामोरा जातो ! भावनिक उद्रेक, भूमिकाबदल, नीती, तत्त्वे आणि व्यक्तिगत प्रश्न – या सगळ्यांचा पूर्ण आवाका घेणारे हे एक ग्रेट नाटक आहे. ‘ भूमिकेच्या ‘ संदर्भात यावर कसली टिप्पणी करणार ?

सार्त्रच्याच ‘ नो एक्झिट ‘ या नाटकात शेवटी, “ हेल इज अदर पीपल “ ( “ इतर माणसे हाच नरक आहे ! “ ) असा एक संवाद आहे. यात राजकीय भूमिका कोणती आहे ? प्रत्येक संबंधात संघर्ष असणे, हा जगण्याचा, म्हटले तर तत्त्वज्ञानाचा प्रश्न आहे. जगातली विषमता संपेपर्यंत हे प्रश्न पडताच कामा नयेत, असे म्हणता येईल ? सामान्यतः शोषिताचे जे मन असते तेच तसेच सर्व मानवजतीचे मन व्हायला हवे, असे म्हणता येईल ? ते शक्य तरी आहे का ? प्रत्येक मनाची वेगळी प्रभावयुक्तता असणे – ज्याला काही लोक भूमिका म्हणतात – ती वेगवेगळी – अलगतावादी – स्वकेंद्रित असणे अटळ आहे, हे समजून घ्यायला हवे. कदाचित हा वेगळेपणा हेच विषमतेचे कारणही असू शकते. म्हणूनच, या समजुतीतून येणारी मौल्यवान कला वा साहित्य हे त्या अलगतेने मर्यादित नसते, हेही समजून घ्यायला हवे. याच अर्थाने, मौल्यवान कला ही परिपक्वतेला – समतेला महत्त्व देणारी असते, असे म्हणता येईल. हे पुढे अधिक सविस्तरपणे येईलच.

इथे सार्त्रच्या ‘ फ्लाईज ‘ या नाटकाचे उदाहरणही पाहावे. माणसाची कृती कोणत्या अर्थाने स्वतंत्र असू शकते, त्या कृतीच्या परिणामांपासून माणूस अबाधित असू शकतो का, अशा प्रश्नांवरचे हे नाटक आहे. मराठीत असले नाटक, निव्वळ करमणूक हवी म्हणणारे आणि भूमिकेचे आग्रही असणारे, असे सर्वचजण नाकारतील. क्षणाक्षणाला माणसाला स्वतःचा शोध घ्यावा लागतो, हे दाखवणारे हे नाटक, एखाद्या स्थिर भूमिकेत कसे बसवणार ? या नाटकातले ओरिस्टेस सारखे ‘ स्वतंत्र ‘ पात्र निर्माण करणे हे अत्यंत अपवादात्मक घडणारे आहे ! जगण्याबाबतचे असे सखोल चिंतन घडतच राहणार – एखाद्या बौद्धिक भूमिकेसाठी ते नष्ट करायचा प्रयत्न कुणी करू नये, आणि केला तरी तो जुमानला जाणार नाही, हे लक्षात घ्यावे, हे बरे ! अशा, सांस्कृतिक समृद्धी देणाऱ्या कलाकृती नाकारणे हे आत्मघातकीपणाचे ठरेल.

## ‘ भूमिके ‘ ची भुणभुण आणि आत्मगौरवाचा रोग

९१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत देशमुख यांचे अध्यक्षीय भाषण आणि त्या निमित्ताने आजूबाजूचे काही, यांवर हा लेख आहे. या आढ्याक्षीय भाषणाबद्दल मी फेसबुकवर आधीच काय लिहिले होते ते

पाहा --
१७ डिसेंबर २०१७ --
लेखकांना परिस्थिती समजावून सांगणे आणि त्यांनी काय केले पाहिजे ते सांगणे – हाच या अध्यक्षांच्या भाषणाचा सारांश असणार आहे, असेच दिसते आहे !
२६ डिसेंबर २०१७ –
-- सध्याच्या नियोजित अध्यक्षांबद्दल तर माझी भविष्यवाणीच आहे की हे फक्त -- मराठीला अभिजात भाषेचा दर्जा, सीमावाद आणि लेखकांना परिस्थिती समजावून सांगून त्यांनी काय केले पाहिजे, हे सांगणे -- एवढेच बोलू शकतील ! साहित्यावर हे शून्य बोलतील !
-- ही भविष्यवाणी तंतोतंत खरी होणारच होती. याचे कारण म्हणजे हे अध्यक्ष, लेखकांच्या कानीकपाळी ‘ भूमिका घ्या ‘ असा धोशा लावणारे आहेत हे माहीत झालेले होते. ( मुळात लेखक हे आपापले अनुभव, चिंतन, आकलन यांतून तयार होत असतात – त्यांना शाळकरी मुले समजून कुणी त्यांचे असे सतत प्रबोधन करणे, हे अपमानास्पद आहे. ) त्यांचे खालील विचार वाचलेले होते –
“ सामान्य माणसाची कहाणी सांगण्यासाठी साहित्यिकाने लिहिले पाहिजे. व्यवस्थेतील वाईट प्रकारांवर भाष्य करण्याची तसेच उदात्त विचारांची पेरणी करण्याची संधी लेखकाला असते. व्यवस्थेतील वाईट प्रकारांमुळे आजच्या परिस्थितीत सामान्य माणूस जगण्यासाठी हतबल आहे. त्यासाठी लेखन करताना अभिव्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी होत असेल तर लेखकांनी आवाज उठवलाच पाहिजे. “ ( पुणे सकाळ पुरवणी पान २ दिनांक १६-१२-१७. )
सामान्यतः भूमिकावाले सगळेच हे नेहमीच म्हणत असतात. आताही अध्यक्षीय भाषणात ते काय म्हणताहेत ते पाहा --
“ लेखक-कवी जेव्हा माणसाच्या दुःख, वेदना, शोषणाची कहाणी सांगत असतो व त्याचा आवाज बनत असतो, तेव्हा त्याला ज्या व्यवस्थेमुळे हे दुःख होते त्यावर भाष्य तो करतो. खरा जातिवंत लेखक हा राजकीय लेखकच असतो, राजकीय भाष्यकारच असतो. “

इथे मी तेंडुलकरांची एक आठवण सांगू इच्छितो. मी कॉलेज विद्यार्थी असताना लिहिलेल्या माझ्या दोन एकांकिका वाचून ते म्हणाले होते की तू काय, कसे लिहावेस, हे मी तुला काहीच सांगणार नाही – ते तुझे तुझ्याकडे आहे -- खूप नाटके वाच आणि बघ, म्हणजे हे माध्यम तुला अधिकाधिक कळत जाईल. याउलट, हल्ली कुणीही उठावे आणि लेखकाची मानगुट धरून त्याला प्रबोधनाने हाणावे, अशी पद्धतच पडलीय. परवा तर औदुंबर संमेलनात राज ठाकऱ्यांनीही लेखकांवर हात साफ करून घेतला आणि लेखकांनी मराठीसाठी भूमिका घ्यावी, असे सांगितले. पण, त्यात एक बरे झाले – ‘ भूमिका ‘ हा शब्द ठराविक लोकांच्या तावडीतून मुक्त झाला !

आपले आणखी एक विद्वान डॉ. गणेश देवी काय म्हणाले तेही इथे देणे योग्य होईल – “ आपल्यातला प्रत्येकजण दाभोलकर, पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश व्हायला तयार नसेल तर आपल्यापैकी कुणीही साहित्यिक नाही. “ ( पुणे मटा संवाद पुरवणी ०७-०१-१८. ) कुणाचाही खून होणे निंद्यच आहे पण याचा अर्थ सर्व लेखकांनी तोच त्यांचाच आदर्श घ्यावा असे म्हणणे, हे वेडेपणाचे आहे. आता काही नवे लेखक तर आदर्श, मूल्य, सत्य – हे सर्वच नाकारणारेही असू शकतात. कुणी कुणाचे वर्ग घ्यावेत, असे इतके कुणी मूर्ख वा मातीचे गोळे नसतात.

प्रत्येक लेखक भूमिका घेतच असतो, असे या भूमिकावाल्यांचे म्हणणे असते. म्हणजेच, प्रत्येकाचे कंडिशनिंग – प्रभावयुक्तता म्हणजे भूमिका, असे यांना म्हणायचे असते. तरीही, हे ‘ भूमिका घ्या ‘ म्हणून धोशा का लावतात ? तर प्रत्यक्षात ते म्हणतील तीच भूमिका घ्या, असे त्यांना म्हणायचे असते. समाजवादी वा साम्यवादी भूमिका ! ‘ बुद्धिप्रामाण्यवाद आणि विवेक ‘ यांतून तेच फक्त योग्य असल्याची त्यांची खात्री असते. ( काँग्रेस वा भाजपा यांचा साहित्य, कला क्षेत्रात वर्चस्व स्थापण्याचा प्रयत्न नसतो – त्यांना त्यात रसही नसतो. ) याचा परिणाम असा होतो की गरीब, दलित, पीडित, शोषित यांचे अनुभवविश्वच फक्त साहित्यात असावे, असे ते म्हणू लागतात ! मध्यम वर्गीय वा उच्च वर्गीय लोकांचे कसले असणार अनुभव ? या प्रकारे ते देशातली ५० टक्के जनता साहित्यक्षेत्रातून बाहेरच काढतात ! आपण शोषितांचा आवाज आहोत – ही त्यांची आत्मगौरवाची एक नशाच बनते !

याच प्रकारच्या उथळ आत्मगौरवातून --
“ ग्रामीण साहित्य चळवळ म्हणजे प्रस्थापित साहित्याला आव्हान. “

-- डॉ. नागनाथ कोत्तापल्ले ( पुणे लोकसत्ता पुरवणी, ०१-१२-१७, पान ३ ) – असेही येते. यांना हे नाही कळत की अनुभव-द्रव्य कोणते आहे यावर साहित्याचे मूल्य नाही ठरत. आणि कोणतेही चांगले साहित्य हे कुणाला आव्हान देण्यासाठी जन्माला येत नाही ! ग्रामीण, दलित, शोषित यांचे अनुभवविश्व साहित्यात असणे हाच ते मूल्यात्मक निकष म्हणून प्रस्थापित करायचा प्रयत्न करतात. तसे अनुभवविश्व असलेले साहित्य आणि वेगळे अनुभवविश्व असलेले साहित्य यांच्यांत मग ते झुंजी लावत बसतात ! ( राजकीय माहोल असणारी कलाकृती श्रेष्ठ, असाही एक भ्रम अनेकदा दिसतो. राजकीय हा ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक – असा फक्त एक माहोल असतो, इतकेच ! )

या सर्वच भूमिकावाल्यांच्या असल्या आत्मगौरवी भ्रमिष्टपणाचा परिणाम असा होतो की शोषितबाह्य असणारे सर्वच साहित्य ते ‘ खऱ्या प्रश्नांपासून पळणारे, आत्ममग्न आणि भरल्या पोटीची करमणूक वा चैन ‘ समजतात ! ( हा यांचा आत्मगौरव अशा टोकाचा आहे की यांच्या विचारांतले काही दोष दाखवणे म्हणजे शोषितांविरुद्ध बोलणे, असे होईल की काय, अशी दहशतच वाटावी ! ) याच विषयावर फेसबुकवर चर्चा चालू असताना एकदा मी विचारले होते की एखाद्या कवीने समजा एखादी साधी, उत्कट प्रेमकविता लिहिली तर तुम्ही तिचे स्वागत कराल की तिला भरल्या पोटीची चैन म्हणाल ? – यावर काहीच उत्तर आले नाही ! कारण उघड आहे – हे साधे मानवी अनुभव नाकारायची लाज वा संकोच वाटणे ! इथे एक लक्षात घ्यायला हवे की हिंदी चित्रपटांतली हजारो प्रेमगीते आणि विरहगीते इथल्या कोट्यवधी लोकांच्या जगण्याचा भाग आहेत. शिवाय गझला, भजने, कव्वाल्या, लावण्या आणि भावगीते ! शास्त्रीय संगीत तर दफा ३०२ खालीच येईल !

इथे मी माझ्याच कवितांचे उदाहरण घेतो. एक तर मी एक मध्यमवर्गीय आहे, ते सोडा. तरीही – दादाइझम म्हणजे मराठीतली दादगिरी नव्हे. कोणत्याही गोष्टीवर श्रद्धा नसणे आणि खास योजनापूर्वकतेलाही महत्त्व नसणे म्हणजेच आपण न घडवता निसर्गात जसे काही घडते तसेच चान्स एलेमेंट म्हणजे आपल्या ताब्याबाहेरचे द्रव्य वा मटेरियल स्वीकारणे – ही याची वैशिष्ट्ये असतात. चित्रकला आणि साहित्य यांत या प्रकारची निर्मिती झालेली आहे. ऑटोमॅटिक किंवा स्वयंचलित कविता यातही ते ताबाबाह्य मटेरियल असतेच. सरियालिस्टिक म्हणजे अतिवास्तववादी कलेतही वेगळ्या प्रकारे ते असते. नेणिवेतल्या जगाला खुला वाव देण्यातून ते येते. आणि ऍब्सर्डिटी तर या सगळ्यांसह जणू बौद्धिकतेच्या मर्यादाच व्यक्त करत असते. मला हे चारही प्रकार महत्त्वाचे वाटतात. या सर्वांचा प्रभाव मी स्वीकारतो. म्हणजेच, माझ्या

स्वतःच्या जगण्यातून मला येणारे आकलन, अभिव्यक्तीचे वरील प्रकारचे मटेरियल स्वीकारते. याचा अर्थ कुठूनही कितीही कांदे, बटाटे, सफरचंदे मिसळून कशीही फेकत राहायचे, असे नव्हे. ( निकॅनोर पारा या कवीने लिहिली तशी गद्यसदृश अँटि पोएट्री म्हणजे न-कविता इथे वाचण्या आधीच फेटाळली जाऊ शकते ! ) मटेरियल हे माध्यम असते. आशय त्या सर्व मटेरियलमधून व्यक्त होत असतो. बऱ्याचदा माझ्या कवितांत मी संगती वा शिस्त लावत बसत नाही, पण, आशयाचा धागा असतोच. त्यासाठीच तर कविता लिहिल्या जातात. मला वाटते की या कविता मी खूप गंभीरपणाने लिहितो पण तरीही, भूमिकावाल्यांच्या लेखी ही सगळी भरल्या पोटीची चैनच ठरणार ! डॉ. देवी म्हणाले की कुणा लेखकाचा खून झाला तर दुःख व्हायलाच हवे – करेक्ट आहे ! या असल्या भूमिकावाल्या विचारसरणीमुळे लेखक-कवी म्हणून माझा वा माझ्यासारख्या अनेकांचा साहित्य क्षेत्रात खून होत असल्यानेही दुःख वाटणे योग्यच ठरेल !

यालाच जोडून विचार केला तर या भूमिकावाल्यांना आणखी काय काय चालणार नाही, हा प्रश्न समोर आला. तर उत्तर म्हणून एक मोठी यादीच समोर आली -- याच पद्धतीने, अति-वास्तववाद, अस्तित्ववाद, उत्तर-आधुनिकता, ॲब्सर्ड या सर्वच विभागांतले लेखन -- हे सगळे भूमिकावाल्यांच्या मते बेजबाबदारपणाचे आणि पळपुटे ठरेल, हे उघड आहे. आणखी काय काय त्याज्य ठरेल याचा विचार करता ही यादी समोर आली -- स्त्री-पुरुष प्रेम आणि त्यातून येणारे असूया, मत्सर, संशय, द्वेष, सूड, सुख-दुःख-वियोग, ( इतर प्रकारचे लैंगिक संबंध ), विनोद, सध्याच्या जगण्यातले विदीर्णतेचे प्रश्न, मानवी संबंधांतले गुंते आणि त्यांतल्या निरुत्तर करणाऱ्या अवस्था, प्रेम की कर्तव्य वा नीती की न्याय – असे होणारे मूल्यसंघर्ष, मनोविकारांचे प्रश्न, मूल्यहीन वाटणे, निराशा वाटणे, जगण्यातली निरर्थकता जाणवणे, तसेच, या गोंधळाशिवाय – या हिंसकपणाशिवाय जगणे शक्य आहे का, असे प्रश्न पडणे – असे सर्वच ‘ भरल्या पोटीची चैन ‘ च ठरणार ! थोडक्यात म्हणजे, कालिदास-शेक्सपियर-टागोर यांच्यापासून ते आजपर्यंतचे हजारो जगन्मान्य लेखकही याच सदरात येणार ! साध्या हलक्याफुलक्या करमणुकीचे तर नावच नको ! म्हणजे साहित्याचा ९० टक्के आशयही हद्दपार ! सामाजिक-राजकीय-आर्थिक परिवर्तन ही एकच भूमिका डोक्यात ठेवून साहित्य निर्मिती झाली पाहिजे, असे वाटणाऱ्यांचे हेच म्हणणे असते, हे लक्षात आले ! म्हणजे, साहित्याच्या प्रांतातून यांना सगळे मानवी जगणेच हद्दपार करायचे आहे, जाळून टाकायचे आहे, हेच यातून स्पष्ट होते. कला, साहित्यनिर्मिती आणि संस्कृती यांच्या क्षेत्राचे मानवी जीवनातले मूल्यात्मक स्थान लक्षात घेता, भूमिकावाल्यांच्या या अपेक्षा विकृत आणि रोगट आहेत, असेच म्हणावे लागेल. दुःखित, पीडित, वंचित असण्यातून येणारा एक त्रागा -- क्रोध तर याला कारणीभूत असेलच पण शिवाय यांना कलेतले काही कळतच नाही, हा एक गंभीर प्रश्नही याला कारणीभूत दिसतो. कळत नाही याचे कारण साहित्याच्या इतर सर्व प्रवाहांबाबत स्वागतशीलतेचा पूर्ण अभाव असणे, हेच असते. कशी का असे ना, प्रत्येकाला भाषा येत असतेच, त्यामुळे, साहित्यावर बरेच बोलले जात असावे. त्या मानाने, चित्रकला, शिल्पकला, संगीत या कलांत कोणकोणती ‘ भरल्या पोटीची चैन ‘ आहे, हे फारसे बोलले जात नाही. कदाचित त्या पूर्ण कलाच तशा असाव्यात !

हे भूमिकावाले म्हणतात तशी भूमिका सर्वच साहित्यिकांनी घेणे याचा अर्थ कलेचे सैनिकीकरण करणे ! अशा अभिव्यक्तीचे स्वरूप किरटे, खुजे आणि फारच मर्यादित असेल, हे स्पष्टच आहे. हे म्हणजे, अनेक सांस्कृतिक प्रवाहच नष्ट करणे होईल ! हे असे विचार म्हणजे कलेच्या बाबतीतले हिंसक, खुनी, तालिबानी विचार आहेत, असेच म्हणावे लागेल. हे चालवून घेणे कोणत्याही समाजाच्या हिताचे नाही. एखाद्या भूमिकेला जखडून घेऊन मौल्यवान साहित्य निर्माण होत नाही. एरवीच्या जगण्यात माणसे शिवाजी, राम, महंमद, आंबेडकर, ख्रिस्त यांच्याशी तसेच कम्युनिझमशी, हिंदुत्ववादाशी वगैरे समरूप होऊन जगत असतात. मूल्यात्मक कला ही अशी कुठे समरूप ( identify ) होत नसते. याच मूल्यात्मकतेची शक्यता

शाबूत ठेवायची असेल तर, कलेला बंधने असून चालणार नाहीत. कलेचे बिनशर्त स्वातंत्र्य अबाधित ठेवावे लागेल ! सांस्कृतिक क्षेत्रातले हे स्वातंत्र्य नष्ट करायचे प्रयत्न इथे गेली काही वर्षे भूमिकावाल्यांकडून चालू आहेत. त्यामुळे, खूप सांस्कृतिक नुकसानही झालेले आहे. आता हे दुर्लक्ष करण्यसारखे राहिलेले नाही, हे जे वाटते आहे ते निर्भयपणे व्यक्त करावे म्हणून हा लेख लिहिला आहे. निर्भयपणे व्यक्त व्हावे, हा त्यांचाही संदेश असतोच !

एझरा पाउंड सारख्या कवीला हे भूमिकावाले काय म्हणतील ? –
एक होता एझ्रा पाउंड
तो एक कवी होता
तो युद्धविरोधी होता –( छान, छान ! )
त्याने अमेरिका-इंग्लंडना विरोध केला
( वा, वा ! भांडवलशाहीला विरोध ! )
त्याने फॅसिस्टांना पाठिंबा दिला !
( शी, शी ! )
अमेरिकनांनी त्याला अटक केली
देशद्रोहाखाली ! ( बरोबर ! फॅसिस्टांना पाठिंबा वाईटच ! )
नंतर त्याला सोडले पण
वेड्यांच्या इस्पितळात ठेवले --
म्हणजे वेडाही असेल तो ! ( असणार ! )
आधुनिकतेचा तो उद्गाता होता
प्रतिमावाद त्यानेच आणला
कमीत कमी शब्द आणि बिनचूकपणा
हे त्याचे विशेष होते. ( पण, भूमिका खराबच ना ! )

( माणूस नीट नव्हता पण -- )
मी कशाला हवाय
मी नसतोच माझ्या कवितेत
असतात ती वेगवेगळी पात्रे
मी नीट पाहिलेली – तो म्हणे.
( पण, ती पात्रे शोषित होती का ? )

करा आता यावर त्याच्या कवितेचे मूल्यमापन !
हेमिंग्वे म्हणाला की साहित्यकला असेपर्यंत पाउंड असणारच
( पण हेमिंग्वेने आत्महत्या केली – जगणे झेपले नसावे त्याला ! बहुतेक ! )
भूमिकावाल्यांना कला, संस्कृती यांचे काही देणेघेणे नसते. त्यांना त्यांच्या भूमिकेची माणसे हवी असतात. स्वतःचे राजकीय वर्चस्व तयार करणे, हाच त्यांचा अजेंडा असतो. बिल्डर, व्यापारी, कारखानदार यांना ते त्यांची ही उदात्त

भूमिका शिकवायला जात नाहीत ! कलावंत हा सांस्कृतिक प्रभाव निर्माण करणारा असल्याने त्याची जबाबदारी जास्त आहे, अशी यावर ते मखलाशी करतात !

भूमिकांचे चोंबाळे – गच्चाघोळ – जांगडगुंता – मांजरसुंबा

पाउंडच्या या उदाहरणाबरोबरच, इथे आणखी काही उदाहरणे घेऊ. सार्त्र हा लेखनात अस्तित्ववादी होता – तिथे कम्युनिझम वगैरे काही नाही. पण, बाहेर तो कम्युनिस्ट होता. कम्युनिस्टगिरीत त्याची धरसोड होती. अनेक विचारवंत म्हणतात की अस्तित्ववाद आणि कम्युनिझम हे एकत्र असूच शकत नाहीत कारण ते विसंवादी आहेत. शिवाय, सार्त्र स्वतःला अराजकतावादी म्हणवून घेत असे, हेही इथे लक्षात घेण्यासारखे आहे. तो तसे का म्हणत असावा, ते सांगणार आहेच. झेने हा नाटककार गुन्हेगार होता – त्याला आजन्म कारावासाची शिक्षा होणार होती – तरीही, लेखक म्हणून असणाऱ्या त्याच्या मौलिकतेमुळे सार्त्र आणि पिकासो यांनी फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षांकडे रदबदली करून त्याला सोडवले होते. टागोरांनी मुसोलिनीला पाठिंबा दर्शवला होता, पण, त्यांच्या लेखनात त्याचा लवलेशही नाही. पाब्लो नेरुदा हा कम्युनिस्ट होता, पण तो प्रेमकवितांसाठी प्रसिद्ध आहे. " कविता ही एक शांततेची कृती असते " असे तो म्हणतो. सर्वच ऍब्सर्ड नाटककार हे अस्तित्ववादीही असतात, असे सामान्यतः म्हटले जाते, पण, आयनेस्को स्वतः अस्तित्ववादी असल्याचे नाकारत असे. आपल्याकडचे, मिरासदार हिंदुत्ववादी असूनही त्यांच्या लेखनात ते येत नाही. पं. सत्यदेव दुबेजी स्वतःला हिंदुत्ववादी म्हणवत असत, पण त्यांनी दिग्दर्शित केलेल्या नाट्यकृतींत ते काही नव्हते. नामदेव ढसाळांच्या बाबतीत असे म्हटले गेले आहे की एका प्रतिगामी पक्षात राहून त्यांच्या पुरोगामित्वाला अधिकच झळाळी येत गेली ! – सारांश म्हणून मला असे म्हणायचे आहे की कवीच्या वा लेखकाच्या मूल्यमापनाला साहित्यात स्थान नाही – असू नयेही -- साहित्यकृतीचा आशयच महत्त्वाचा ! बेरजेच्या राजकरणाचा साहित्यात काही उपयोग नाही.

समग्रतेचे भान घेणाऱ्या साहित्यात लेखक एखाद्या विचारसरणीला जखडलेला नसतो. तसे, सांस्कृतिक दृष्ट्या मौल्यवान साहित्य या लेखापुरते सोडून दिले तरी इतर असंख्य प्रकारचे साहित्य प्रवाह असतात. मानवी मन असंख्य अवस्थांतून जात असते. त्या प्रत्येक अवस्थेला ' भूमिका ' म्हणता येते. आपले ' भूमिका ' वाले अशा सर्व प्रवाहांबद्दल स्वागतशील वा संवेदनशील नसतात. त्यामुळे, त्यांना एकूणात साहित्यातले काही कळतच नाही. साहित्य क्षेत्रातले ते फक्त राजकीय कार्यकर्ते असतात. हे ओळखूनच, सदरचे अध्यक्ष साहित्यावर काहीही बोलू शकणार नाहीत, असे भाकित केले होते. या पार्श्वभूमीवर, आता असे म्हणता येईल – " अध्यक्षा, तू चुकलास – साहित्यातले काहीच कळत नसताना साहित्य संमेलनाचा अध्यक्ष  होऊन बसलास ! " साहित्याला वा साहित्यसंमेलनात राजकारण वर्ज्य का असावे, असे विचारले जाते. वर्ज्य काहीच नाही – पण, साहित्यसंमेलनात साहित्यही असावे, एवढी माफक अपेक्षाही ठेवू नये ?

काहींना वाटते की हा तो जुनाच जीवनवादी-कलावादी वाद चाललाय ! आदर्श-बोधप्रदता आणि करमणूकप्रधान रचना-सौंदर्य – अशा फुटकळ स्तरावरची ही चर्चा नाहीय. साहित्यातली सांस्कृतिकता म्हणजे काय, या मुळाकडे जाणारी ही चर्चा आहे. जगण्याचे पूर्ण भान आणि आवाका हेच मूल्य, अशी ही चर्चा आहे. अनुभव आणि कला यांच्या संयोगातून सांस्कृतिक सर्जकता निर्माण होणे म्हणजे काय, यावर आपण बोलत आहोत.

आपल्याला जे कळत नाही त्याची टवाळी वा हेटाळणी करायची पद्धत मराठीत काही विनोदी लेखक, नेमाडे आणि हे भूमिकावाले यांनी पाडलेली आहे. ही एक सांस्कृतिक हिंसाच म्हणावी लागेल. मी म्हणेन तेवढेच साहित्य, असे म्हणण्यात एक हुकुमशाही वृत्तीही आहे. हिंसा आणि हुकुमशाही हे दोन्ही आंबेडकरांना मान्य नव्हते. त्यांनी दिलेल्या आपल्या संविधानाचा पायाच, या गोष्टींना वाव मिळू नये, याची काळजी घेणारा आहे. आपण या संविधानाचा मान राखणे, हे सर्वांच्याच हिताचे आहे.

वरील मजकुरातला काही भाग ' लोकसत्ते ' त एक लेख म्हणून प्रसिद्ध झाला होता.
दि. २५ फेब्रुवारीला लोकसत्तेत आलेल्या माझ्या लेखावरची दि. २८ फेब्रुवारीला आलेली श्री. गणेश कनाटे यांची प्रतिक्रिया वाचली. तीवर माझे विचार –

१. बंदिस्त शासकीय विचारांमुळे निरनिराळ्या देशांतून पलायन करावे लागलेले लेखक आपल्याला माहीत आहेत. सैनिकीकरणाच्या हट्टाग्रही अपेक्षा अशा पद्धतीने राबवल्या जात असतातच. हेकट विचाराला सत्तेची जोड मिळाली की ते घडते आणि घडणार. शोषितांच्या अनुभवावर आधारित असेल तेच फक्त साहित्य, असे म्हणण्यात इतर सर्व साहित्य प्रकारांचे ' ठरवलेले ' भवितव्यही अध्याहृत असते. दाभोलकर, पानसरे, कलबुर्गी, लंकेश यांचे खून निंद्यच आहेत. पण, कुणी जर असे म्हणू लागले की सर्वच लेखकांनी त्यांना आदर्श मानून त्यांचे विचार आत्मसात करून तशाच बलिदानाला तयार व्हावे, अन्यथा ते साहित्यिकच नाहीत ( असे डॉ. गणेश देवी म्हणतात ), तर ते स्वीकारता येणार नाही. कुणालाही आदर्श, गुरू वा अधिकारी न मानणारे खूप लेखक असतात. कला हे लढाईचे माध्यम आहे, असे काहींना वाटतही असेल, पण, जगातले कित्येक मौल्यवान लेखक, ती एक शहाणपणाकडे, परिपक्वतेकडे, सजगतेकडे जाण्याची प्रक्रिया मानतात. कलात्मक सर्जकतेतून समजूत आणि सामंजस्य यांनी युक्त असे मानवी जगण्याचे भान येणे, हे महत्त्वाचे मानणारेही खूप लेखक आहेत. ते सगळे नाकारणाऱ्या आणि फक्त अमुक विचारांचेच आणि अमुक अनुभवांचेच असले पाहिजे साहित्य, अशा हट्टाग्रही निष्कर्षांची सक्ती करू पाहणाऱ्या भूमिकेला सैनिकीकरणाचे विचार, असेच म्हणावे लागेल.

२. मराठीत सततच ' भूमिका घ्या ' असा लेखकांच्या कानीकपाळी धोशा लावणाऱ्यांची काय असते मांडणी ? ' फक्त अ थांबेल ' असे म्हणण्याचा अर्थ ' बाकीच्यांनी घरी जा ' असाच होतो. हे भूमिकावाले सर्व साहित्य प्रवाहांची आस्थेने दखल घेतात का ? आणि ' कलेचा मृत्यू ' ! तसे तर ideology चा म्हणजे विचारसरणीचा ( म्हणजे भूमिकेचाच ) मृत्यू, इथेही माणूस पोचलेला आहे. भूमिकावाले यांतल्या कशाची दखल घेऊ इच्छितात ? या सर्व वैचारिक टप्प्यांसह आणि ते सर्व असूनही, कलानिर्मिती अखंड चालूच असते, हे एक सत्य आहे.

३. लेखक एक तर भूमिकावादी असतो किंवा व्यक्तिवादी, एक तर डावा असतो वा उजवा – असे विचार हे – साहित्य म्हणजे पूर्वनियोजित विचारांचा आविष्कार, या ' भूमिकावादी ' विचारसरणीतूनच येतात. वर्डस्वर्थचे ' शांततेतून पाहणे ' , गाओ झिंगझिआन या लेखकाने सांगितलेला distanced gaze – म्हणजे दुरून, तटस्थपणे पाहणे – हे समाजवादी वा व्यक्तिवादी, अशा द्वंद्वात बसवता येत नाही. आपल्या, लोकशाही असलेल्या देशात सर्वच कलाप्रवाहांना खुला वाव असायला हवा.

४. मी म्हणतो ते सोडून बाकी कुणी साहित्यिकच नाहीत, अशी उद्दाम, आक्रमक मांडणी करणाऱ्याला साहित्यातले काही कळत नाही, असे म्हणण्यात वावगे वा असभ्य काहीच नाही. ( तेही, वर्षानुवर्षे लेखन करणाऱ्या अनेकांना मूर्ख ठरवत असतातच ). त्यांच्या अध्यक्षीय भाषणात साहित्याबद्दल कोणती समज व्यक्त झालेली आहे ? ‘ पेरिले ते उगवते । बोलल्यासारिखे उत्तर येते । तरी कर्कश बोलावे ते । किंनिमित्त ।। ‘ हे महत्त्वाचे आहे.

असंख्य भूमिकांमुळे जगभर रणकंदन चालू आहे. कलेने आणि साहित्याने  तेच हिंसक काम जोमाने पुढे रेटत राहिले पाहिजे, असे म्हणण्यात सांस्कृतिक काय आहे ? की या प्रश्नाची अशी मांडणी होऊ शकेल – “ सांस्कृतिक कृती म्हणजे भूमिकांचे संघर्ष. जगात, माणसाच्या इतर अनेक कृतींतून जशी प्रचंड हिंसा निर्माण होते तसेच सांस्कृतिक कृतींतूनही घडणे अटळ आहे. याला फार तर माणसाची अटळ शोकात्मिका म्हणता येईल ! “ -- म्हणजेच, भूमिकावाद हा माणसाला एका अटळ अशा निराशावादाकडे नेतो का ? आणि या निराशावादात जगणे हेच सांस्कृतिक जगणे म्हणावे का ?

या प्रश्नावर तर आपण सर्वचजण गंभीरपणे विचार करू शकतो.

यानंतर, या प्रश्नाकडे एका वेगळ्याच आयामातून पाहायचे आहे. भूमिकांचा एक परिणाम निःसंशयपणे रणकंदन हाच असतो आणि असणार. ते एक अराजकच असणार. भूमिकाविहीनता म्हणजेही एक अराजकच नसेल का ?

## अराजक

हा विषय या सध्याच्या ‘ भूमिका घ्या ‘ या विषयाशी संबंधितच आहे, म्हणून त्यावर थोडे. सार्त्र स्वतःला अराजकतावादी म्हणत असे, तोही संदर्भ इथे मानायला हरकत नाही. साहित्यनिर्मितीची सुरुवात, सामान्यतः, ‘ माझी आई ‘, ‘ माझी शाळा ‘ अशा आवडत्या विषयांपासून होते. आपली आवडनिवड वा सुखदुःखे सांगत राहणे ही साहित्यलेखनातली सुरुवातीची बाब असते. हे आणि असे तर सगळेच करतात. या फक्त आपापल्या जगण्याला आलेल्या प्रतिक्रिया असतात. त्या शोषिताच्या असोत की मध्यमवर्गीयाच्या असोत की श्रीमंताच्या – त्या प्रतिक्रिया या त्या त्या व्यक्तीच्या मानसिक कंडिशनिंगमधूनच, म्हणजे, प्रभावयुक्ततेतूनच, येतात. या मर्यादा मान्य करणारे वा अटळ मानणारेच मग, शोषितांची दुःखे व्यक्त होणेच श्रेष्ठ वा साहित्यात फक्त तेच महत्त्वाचे, असे म्हणू लागतात. ‘ जगात विषमता असावी का ‘ असा प्रश्न विचारला तर, ‘ नसावी ‘ असेच उत्तर सगळे देतात. भ्रष्टाचार असावा का, युद्धे असावीत का – अशा प्रश्नांनाही सगळे नकारात्मक उत्तरेच देतात. पण, प्रत्यक्षात सगळे वेगळेच चालू असते ! माणसाच्या जगण्याची वाट लागायला सगळेच जबाबदार असतात कारण सगळेच प्रभावयुक्ततेच्या चक्रातूनच जगत असतात. सगळ्यात जास्त गरीब कोण, सगळ्यात जास्त शोषित कोण, त्याचेच दुःख व्यक्त होणे म्हणजे साहित्य, असे म्हणणे मान्य होण्यासारखे नाही. मग, जगात सर्वात जास्त गरिबी सीरिया आणि झिंबाब्वेत आहे – तर तिथूनच फक्त जगातल्या महत्त्वाच्या साहित्यकृती येतील, असे म्हणावे लागेल. आणि कॅनडा, ऑस्ट्रिया इथे गरिबीचे प्रमाण तुलनेने सर्वांत कमी आहे, तर तिथून चांगली साहित्यकृती येणे शक्यच नाही, असे म्हणावे लागेल. तसे होत नाही. साहित्यात आलेल्या अनुभव-द्रव्यावर त्याची श्रेष्ठता ठरत नाही. खरे तर भूमिकावाल्यांपुढे साहित्याची मौलिकता हा विषयच नसतो – सामाजिक-राजकीय परिवर्तन यासाठीच फक्त ते साहित्य-निर्मिती करत असतात. तेच साहित्य मौल्यवानही म्हटले पाहिजे, असा अजेंडा ते नंतर रेटू लागतात. म्हणजे,

स्वतःची सुखदुःखे केंद्रिभूत मानून जगण्याच्या माणसाच्या पद्धतीमुळेच असंख्य दुःखे तयार होतात आणि नंतर, अमुकच दुःखे महत्त्वाची मानावीत, असा ठराव पुढे येतो. थोडक्यात म्हणजे, माणसाची जगण्याची जी पद्धत, त्यातल्या आत्मकेंद्रितता आणि हिंसा यांनी युक्त, प्रचलित आहे, ती आहे तशीच चालू राहावी, अशी ही भूमिका असते. माणसाचे जगणे म्हणजे असंख्य प्रतिक्रियांचा अनियंत्रित गोंधळ म्हणजेच अराजकच असणार आणि हे अटळ आहे, असे मानणारे हे विचार असतात. असल्या अराजकतेतून मौल्यवान साहित्य निर्माण होत नाही. भूमिकावाले हे असल्या अराजकाचे पुरस्कर्ते असतात. ( इथे हेही नोंदायला हवे की, एखाद्या गुन्हेगाराकडून जशी मौल्यवान कलाकृती निर्माण होऊ शकते तशीच ती एखाद्या ‘ भूमिका ‘ वाल्याकडूनही निर्माण होऊ शकते. पण, कधी ? जेव्हा तो लेखक वा कलावंत मानवी संबंधांच्या गहन अरण्याचा आवाका घेतो तेव्हाच ! पण, सामान्यतः भूमिकावाले तसे घडू देत नाहीत. त्यांना राजकीय हेतूपुढे बाकी काही दिसत नाही ! )

साहित्यातल्या अराजकाचा आणखी एक वेगळा प्रकार असतो. कलात्मक भानाने संचालित अमर्याद वा अनियंत्रित वा दिशाहीन आशय – असे या अराजकाचे स्वरूप असते. प्रतिक्रिया व्यक्त करण्यापेक्षा यात प्रतिक्रियांच्या जगण्याचे भान व्यक्त केले जाते. हे ठरवून होते, असेही नाही. लिहिताना एखाद्या लेखकाचा आवाका अशा भानाचा होऊ शकतो, मग तो लेखक गुन्हेगार असो की हुकूमशाहीवादी असो. कारण तिथे व्यक्तिगत हेतू वा अमुक एका भूमिकेने आशयाला दिशा देणे, हे घडत नाही. जसे आपण ‘ क्राईम पॅशनेल ‘ मध्ये पाहिले, तसे. इथे बरोबर-चूक, न्याय-अन्याय यांचे निकाल देणे नसून पूर्ण जगण्याच्या यंत्रणेचे आकलन -- भान व्यक्त होत असते. ते मूल्यात्मक असते कारण ते परिपक्वता निर्माण करते – ते जगण्याच्या हिंसात्मकतेची जाण देणारे – समज देणारे असते. नुसत्याच प्रतिक्रिया देणे वा एखाद्या ठराविक वैचारिकतेला बढावा देणे यांसाठी ते लेखन नसते. मराठीतले अलिकडचे तसे लेखक म्हणून नावे सांगायची झाल्यास, राजन खान, सतीश तांबे, रंगनाथ पठारे यांची ‘ टोकदार सावलीचे वर्तमान ‘ ही कादंबरी किंवा मधू साबणेची ‘ लीळा ‘ ही कादंबरी – ही सांगता येतील. अशा साहित्यातले अनुभवद्रव्य हे त्या त्या लेखकाला माहीत असलेले वा पूर्णपणे त्याच्या कल्पनेतून आलेलेही असू शकते. पण ते अनुभवद्रव्य परावर्तित करणे वा स्वतःचे मानसिक प्रोग्रामिंग म्हणजे प्रभावयुक्तता परावर्तित करणे असे त्या लेखनाचे हेतू नसतात. असे लेखन कोणत्याही विभूतींशी, दैवतांशी, इतिहासाशी वा अस्मितांशी समरूप होऊन निर्माण होत नाही. अशा लेखनालाच अभिव्यक्तिस्वातंत्र्याचे लेखन म्हणता येते. इतर प्रकारचे प्रतिक्रियावादी लेखन हे हिंसेचे स्वातंत्र्य मागत असते, हे लक्षात घ्यायला हवे. स्वतःच्या प्रभावयुक्ततेच्या मर्यादा ओलांडणारे साहित्य हेच खऱ्या अर्थाने अभिव्यक्तिस्वातंत्र्य असलेले साहित्य म्हणता येते. ( स्वतःची प्रतिमा संभाळणे, ’ कोण काय म्हणेल ‘ याच्या विचाराने ब्रेक लागणे – असले स्वातंत्र्यावरचे स्वतःचेच निर्बंध इथे लक्षात घेतलेले नाहीत. )

वर उल्लेख केलेल्या ‘ दिशाहीन ‘ भानालाच मी काव्यतत्त्व म्हणतो. त्याबाबत थोडे --

## काव्यतत्त्व

अनुभव म्हणजे काय तर जगण्यातल्या घटितांना – घटनांना येणारा व्यक्तीचा प्रतिसाद वा प्रतिक्रिया. म्हणजेच, अनुभव हा प्रत्येक व्यक्तीच्या शारीर-मानसिक घडणीवर – प्रोग्रॅमिंगवर – कंडिशनिंगवर अवलंबून असतो. त्यामुळे, अनुभवाला सत्याचे मूल्य असू शकत नाही. काही प्रतिक्रिया आदर्श ठरवून जास्तीत जास्त व्यक्तींच्या तशाच प्रतिक्रिया याव्यात असा प्रयत्न करण्याला ब्रेनवॉशिंग म्हणजे मनाला ठराविक पद्धतीने सवयबद्ध करणे म्हटले जाते. ते कोणत्याही प्रकारे चांगले,

आरोग्यपूर्ण वा हितकारक मानले जात नाही. मुळात, अमुक प्रतिक्रिया आदर्श असे ठरवणेच अशक्य असते. ज्या त्या व्यक्तीला वा ज्या त्या व्यक्तिसमूहाला स्वतःच्या प्रतिक्रिया बरोबर, समर्थनीय, न्यायाच्या आणि हितकारक वाटत असतात. हे सर्व पाहता, कलेत, कोणताही अनुभव जसाच्या तसा प्रामाणिकपणे अभिव्यक्त करणे, हे फारसे मौल्यवान असू शकत नाही.

जगातले अनेक कवी, लेखक यावर बोलून गेलेले आहेत. अनुभवाची ही मर्यादा आणि एकमेकांच्या विरोधात असण्याची अवस्था ओलांडण्याचे महत्त्व ओळखणारे बरेच होऊन गेले आहेत. ज्ञानेश्वरांनी ‘ परतत्त्वाचा स्पर्श ‘ सांगितला, तुकाराम म्हणाला की ‘ बोलविता धनी वेगळाचि ‘ किंवा ‘ परि त्या विश्वंभरे बोलविले ‘. असेच उद्गार फर्नांडो पेसोआ या विसाव्या शतकातल्या ‘ most profound ‘ ( अत्यंत सखोल ) समजल्या जाणाऱ्या कवीनेही काढलेले आहेत –

Rereading, I wonder: "Was that me?"
God knows, because he wrote it.
दुसऱ्या एका ठिकाणी तो म्हणतो –
If what I write has any value, it is not I who am
valuable.
The value is there, in my verses.
All this has nothing whatever to do with any will
of mine. ------- Pessoa.

साहित्यातल्या वा कलेतल्या कोणत्याच संकल्पनेची बिनचूक, समावेशक व्याख्या कधीच कुणाला करता आलेली नाही. त्याचे एक कारण, विविधतेला अंत नसतो हे एक आहे आणि दुसरे कारण, विदीर्णता ओलांडणारे भान हे एकात्म असले तरी ( तुकारामाचे ‘ एकविध मन ‘ ) बौद्धिक कृती ही फक्त तुटक, fragmented, विदीर्णतेचीच असते – हे आहे. एकात्मतेचे अस्तित्व हे विदीर्णतेच्या भाषेत मांडून दाखवा, असे म्हणण्यात काहीच अर्थ नसतो. परंतु, बुद्धिप्रामाण्यवाद्यांचा तसा हट्टाग्रह असतो. त्यामुळे त्यांच्याकडून, कलेतल्या मूल्याच्या प्रश्नाला भिडणारी सर्जक कलाकृती निर्माणही होऊ शकत नाही आणि तशा मौल्यवान कलाकृती त्यांना ‘ समजू ‘ ही शकत नाहीत. ते त्यांच्या तर्क, बुद्धी यांच्या रटाळ, रद्दड आग्रहातच खुश राहू इच्छितात वा त्यातच डुंबत राहू इच्छितात. जगातले इतके मान्यताप्राप्त लेखक, कवी काय म्हणताहेत हे सगळेच ते हास्यास्पद ठरवून उडवून लावतात.

वर्डस्वर्थ ‘ recollected in tranquility ‘ ( शांततेत स्मरण केलेले ) म्हणून गेला. शांतता म्हणजे विदीर्णतेचा गोंधळ असू शकतो का ? सार्त्रने नथिंगनेस ( रिकामेपणा ) सांगितला. तुकारामानेही ‘ रिकामीक ‘ किंवा ‘ मागेपुढे अवघा दिसे रिता ठाव ‘ हे आणि एकविध – एकात्म मन एकच असल्याचे सांगितले. पण, सार्त्रच्या नथिंगनेसपुढे गुडघे टेकणारे आपले विद्वान तुकारामाला मात्र ‘ अध्यात्मिक ‘ म्हणून हसून सोडून देतात ! नथिंगनेस कळतो का बुद्धीने ? तो अध्यात्मिक नाही का ? काही शहाणे म्हणतात, सार्त्रच्या अस्तित्ववादाचा काळ आता संपला आहे – ती महायुद्धांना आलेली प्रतिक्रिया होती ! प्रतिक्रियेशिवाय काही कळतच नाही – ही अवस्था ! म्हणजे बुद्धाला ज्ञान झाले ते प्रेत, आजारी माणूस आणि वृद्ध यांच्यामुळे ! अरे वेड्या, ती निमित्ते होती – ‘ त्यामुळे ‘ असे नाही म्हणता येत ! इथे जर भावनिक कारणांनी शिव्या

खाण्याची वा लाथा बसण्याची शक्यता नसती तर ज्ञानेश्वर-तुकारामांचाही काळ संपला, असे म्हणायला हे लाजले नसते ! सांगायचा मुद्दा हा आहे की विदीर्णतेच्या – बुद्धीच्या – मर्यादा एका व्यक्तीत ओलांडल्या जाणे म्हणजे तशा त्या पूर्ण मानवजातीच्या ओलांडल्या जाणे असते – ती शक्यता कधीच संपत नाही. मौल्यवान लिहिणे म्हणजे लेखकाचा तो स्वतः अमर होण्याचा वा ‘ कीर्तिरूपे उरण्याचा ‘ प्रयत्न नसतो. प्रतिक्रियेच्या चक्रातून बाहेर पडण्याच्या मौल्यवान तत्त्वाचा तिथे स्पर्श असल्यामुळे ते लेखन सार्वकालिक आणि सर्व माणसांना प्रस्तुत होत असते.

प्रतिक्रियारूप जगणे आणि बुद्धीच्या एकरेषीय, तुकडेबाज मर्यादेत जगणे हेच अबाधित, अटळ आणि अंतिम असणार अशा निष्कर्षाने जगायचे म्हटले की धर्मातली वा राज्यघटनेतलीही सगळी आदर्श तत्त्वे ही फक्त शब्दरूपात उरतात आणि अर्थ म्हणून खलास होतात, हे डोळे उघडून पाहायला हवे. पेसोआ काय म्हणतो बघा –

“I believe in the World as in a daisy.
Because I see it. But I don’t think about it
Because thinking is not understanding…”
— Fernando Pessoa,

टी. एस. एलियट काय म्हणतो, ते पाहा –

Poetry is not a turning loose of emotion, but an escape from emotion; it is not the expression of personality, but an escape from personality.

किंवा --

He knows there is no reason for anything to exist,
And he knows that to exist is to occupy a point.
What he doesn't know is that thought is not a point.
-- Pessoa

-- हे सगळे बुद्धीने कळणारे नाही. म्हणून फेटाळून लावायचे ?
सगळे बौद्धिकच असते असे समजून आपल्याकडे धरला जाणारा ‘ भूमिके ‘ चा, विशेषतः सामाजिक बांधिलकीचा आग्रह पाहता त्यावर गाओ झिंगझिआन काय म्हणतो, ते बघा –

What I want to say here is that literature can only be the voice of the individual and this has always been so. Once literature is contrived as the hymn of the nation, the flag of the race, the mouthpiece of a political party or the voice of a class or a group, it can

be employed as a mighty and all-engulfing tool of propaganda. However, such literature loses what is inherent in literature, --- GAO.

यावर थोडक्यात म्हणजे एवढेच लिहिणे खूप झाले. मी जे ' काव्यतत्त्व ' म्हणतो ते इथे कसे मांडले आहे ते पाहा –

Poetic feeling does not derive simply from the expression of the emotions. Nevertheless, unbridled egotism, a form of infantilism, is difficult to avoid in the early stages of writing. Also, there are numerous levels of emotional expression and to reach higher levels requires cold detachment. Poetry is concealed in the distanced gaze. – GAO.

हा जो distanced gaze आहे ना, तेच काव्यतत्त्व ! अनेक मोठमोठ्या लेखक-कवींनी वेगवेगळ्या शब्दांत हे सांगितलेले आहे. यालाच मी अनेकदा ' समग्र भान ' तत्त्व म्हटलेले आहे. तसेच इथेही आहे --

Literature does not simply make a replica of reality but penetrates the surface layers and reaches deep into the inner workings of reality; it removes false illusions, looks down from great heights at ordinary happenings, and with a broad perspective reveals happenings in their entirety. – GAO.

म्हणूनच, माझ्या भाषेत न म्हणता बोदलेयरच्या भाषेत मी म्हणतो --

Always be a poet, even in prose. -- Charles Baudelaire
( नेहमीच कवी राहा – गद्यातही. )

इतके जगन्मान्य कवी-लेखक या विषयाकडे कसे पाहतात, हे विचारात घ्यायलाच हवे. ते सगळे गरिबी, शोषण यांच्या प्रश्नांबाबत निर्लज्जपणे बेफिकीर असतात, असे समजणे म्हणजे आत्ममग्न गधडेपणा ठरेल. इथे आणखी काही अवतरणे देतो आणि हा लेख संपवतो. ही सर्व अवतरणे, मानवी जगण्याबाबतचे गंभीर चिंतन व्यक्त करणारी आहेत. यांत राजकीय भूमिका शोधत बसणे म्हणजे निव्वळ व्यर्थ परिश्रम ठरतील. मनाचा हिंसकपणा जाऊ शकेल का, याबाबतच्या चिंतनात, उदाहरणार्थ, राजकीय वर्चस्वाचा काय संबंध असणार ?

काही अवतरणे ---

1. Pirandello's plays do not concern themselves with sosial reform, political evolution, or
religious inquiry. __ William Murray.

2. Philosophy must not be divorced from literature and art. __ Sartre.

3. Good art is impersonal. __ T. S. Eliot.

4. I am not quite sure whether I am dreaming or remembering, whether I have lived my

life or dreamed it. __ Ionesko.

5. Living is abnormal. __ Ionesko.

6. The source of my plays was a mood and not an ideology; an impulse, not a programme. __ Ionesko.

7. Becket gave expression to what he called " the issueless predicament of existence. "

8. We are impelled by our nature to seek understanding, but, reason, the only instrument we have with which to seek, it has proven a clumsy and a fragile tool. __ Becket.

9. I want neither to instruct nor to improve nor to keep people from getting bored. __ Becket.

१०. तर्का नाही ठाव / येथे रिघावया वाव // -- तुकाराम.

११. मजहून नष्ट आहे ऐसा कोण -- तुकाराम.

१२. मागें पुढें अवघें रितें / कळो येते अनुभवे // -- तुकाराम.

--- ००० ---

Mo -- 9371005773.

E-mail – champrade@gmail.com

# नाट्यलेखन – तंत्र आणि आशय
## -- चं. प्र. देशपांडे.

१ मी मुख्यतः एक नाट्यलेखक म्हणून बोलतोय. माझे अनुभव, विचार आणि निरीक्षणे यांवर आधारित. यात अर्थातच काही भाग औपपत्तिक वा तांत्रिकही असेल.

२ अनेक कला आहेत, साहित्यातही अनेक विभाग आहेत – आपण नाट्यलेखनच का निवडतोय, याचा काही विचार असावा. त्यातही, नाट्यलेखन हे व्यवसाय म्हणून करायचे आहे की सर्जक अभिव्यक्ती म्हणून, याचाही विचार हवा. या दोन्हींतली सरमिसळ गृहीत धरली तरीही ही निवड महत्त्वाची ठरते. सर्जक लेखनावर उपजीविका चालणे मराठीत फारसे शक्य दिसत नाही. उपजीविकेसाठी लेखन करताना स्वातंत्र्य गमावून बसण्याचा धोका असतोच. या बाबतीतल्या विचारांना स्पष्टता येण्यासाठी मी इथे नाटकांचे एक वर्गीकरण सुचवू इच्छितो. आपल्याला नाटकांची अशी वर्गीकरणे माहीत आहेत -- ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक, राजकीय, प्रायोगिक, व्यावसायिक, विनोदी, गंभीर, परिवर्तनवादी, स्थितीवादी, संगीत, गद्य, वगैरे. मी सुचवत असलेले वर्गीकरण असे आहे – (१) करमणूकप्रधान, (२) वास्तवाचे भान वाढवणारी आणि (३) मूलभूत प्रश्नांचा वेध घेणारी नाटके.

### करमणूकप्रधान नाटके

करमणुकीचे अगणित प्रकार शक्य असून प्रत्येक नाटकाला या ना त्या प्रकारे करमणूक करावीच लागते. कोणत्याही हेटाळणीशिवाय आणि निव्वळ वर्णनात्मक म्हणून बोलायचे झाल्यास करमणूकप्रधान नाटक हे मुख्यत: पलायनवादी असणे आवश्यक असते. पुष्कळदा एखादी चांगली पलायनवादी कृती माणसाला पुन्हा शक्ती प्राप्त करण्याची संधी देऊ शकते. या दृष्टीने कलेतल्या पलयनवादालाही मानवी जीवनात स्वत:चे असे एक अर्थपूर्ण स्थान असते. मनाच्या सततच्या दु:खरेषेतून बाहेर पडण्यास त्याची मदत होऊ शकते. दु:खामुळे कमकुवत होत जाण्याची प्रक्रिया थांबवून तोल सावरण्याची संधी त्यामुळे मिळू शकते. नाटकाच्या चाललेल्या प्रवाहात / घडामोडीत उत्साहाने सहभागी होत राहणे म्हणजे करमणूक असे थोडक्यात म्हणता येईल. डोक्याला फारसा ताप न होता किंवा फारसे विचलित न होता नाटकाच्या सुखदु:खप्रक्रियेत मग्न होणे म्हणजे ( निव्वळ ) करमणूक. हा एक प्रकारचा उपभोग असून यात रममाण होणे, अधीन होणे अपेक्षित असते. अशा प्रकारच्या मराठी नाटकांची काही उदाहरणे म्हणजे, ' ऑल दि बेस्ट ', ' एका लग्नाची गोष्ट ', ' मोरूची मावशी ', 'तो मी नव्हेच ', ' अश्रूंची झाली फुले ', साखर खाल्लेला माणूस ', इत्यादी.

### वास्तवाचे भान वाढवणारी नाटके

वास्तवापासून तुटले जाणे म्हणजे वेडे होणे. वास्तवाचे योग्य आणि पुरेसे भान असणे ही शहाणपणाची अटच आहे. वास्तव म्हणजे प्रत्यक्ष दिसणाऱ्या / जाणवणाऱ्या वस्तुस्थिती, घटना, मानसिक अवस्था, मूडस्, भ्रम, स्वप्ने,

त्यांचे लावलेले अर्थ, मते, अनेक प्रकारच्या प्रणाली आणि या प्रकारे मानवी भानाच्या कक्षेत येऊ शकणारे सर्व काही. अशा
प्रकारच्या कोणत्याही सत्यापासून पळून जाण्यापेक्षा त्याला सामोरे होणे इथे अभिप्रेत असते. निव्वळ करमणूक वा त्यासाठी
लागणारा उथळपणा टाळून योग्य त्या गांभीर्याने इथे नाट्यद्रव्य हाताळले जाते. ' शांतता ! कोर्ट चालू आहे ! ', 'साठेचं काय करायचं ? ', ' माझं घर ', ' सोक्षमोक्ष ', ' महापूर ', ' माकड ' -- ही या प्रकारच्या नाटकांची काही उदाहरणे होत.

मूलभूत प्रश्नांचा वेध घेणारी / समग्रावधानी नाटके

मानवी जीवनात काही प्रश्न मूलभूत स्वरूपाचे असून माणसाने हजारो वर्षे त्यांचा विचार केलेला आहे. या प्रश्नांची ठाम उत्तरे किंवा त्यांच्यावरची काही स्थितिशील निराकरणे असू शकत नाहीत आणि यातच त्यांची गूढता आणि सौंदर्य असते. प्रत्येक युगात आणि प्रत्येक क्षणाला त्यांची नव्याने -- ताजेपणाने समज यावी लागते, कारण, ती मानसिक सवयीत / स्मृतीत सामावणारी बाब नसते. म्हणूनच कधीही आलेली अशी समज ही कोणत्याही काळात प्रस्तुतच
असते. दु:ख का होते, जगण्याचा हेतू काय, मानवी मूल्य म्हणजे काय, बरोबर कृती कोणती, सगळे संबंध अर्धवट, अपुरे का असतात, हे सगळे मूलभूत प्रश्न असून मानवजातीने यांना युगानुयुगे तोंड दिलेले आहे. सार्त्र, पिरांदेल्लो, आयनेस्को, बेकेट यांनी वेगवेगळया प्रकारे असे प्रश्न त्यांच्या नाटकांतून हाताळले. मराठी नाटाकांत अशी उदाहरणे दुर्मीळ आहेत. खानोलकरांचे ' एक शून्य बाजीराव ' हे एक उदाहरण आहे. क्रिया-प्रतिक्रिया, प्रेम आणि मृत्यू, भीती आणि शांतता यांचा विलक्षण वेध या नाटकात घेतला जातो. ' वाडा चिरेबंदी ' हे एलकुंचवारांचे नाटक, आणखी एक उदाहरण म्हणता येईल. संबंधांची एक विलक्षण अटळ रचना कोणत्याही मतप्रदर्शनाच्या मर्यादा न घालता, समग्रपणे इथे व्यक्त होते. याचबरोबर, तेंडुलकरांचे ' सखाराम बाइंडर ' हेही या वर्गातले नाटक म्हणता येईल. या नाटकावर तेंडुलकरांच्या मर्यादांचा ताबा राहणे शक्य नव्हते. कारण सत्-असत्, राक्षसाचा जन्म, खरे-खोटे, चांगले-वाईट -- अशा तेंडुलकरांच्या परंपरागत आकलनाचा इथे प्रश्नच नव्हता. तेंडुलकरांची एकूण लेखन-कारकीर्द पाहता, कदाचित त्यातल्या सनसनाटीपणामुळे हा विषय त्यांना आकर्षक वाटला असावा, पण हे प्रकरण त्यांच्या द्वंद्वात्मक सवयीतले नव्हते हे त्यांच्या लक्षात आले नसावे. म्हणूनच हे एक
त्यांच्या लेखकीय मर्यादा ओलांडणारे नाटक त्यांच्याकडून लिहिले गेले असावे असे दिसते. जगण्यातल्या प्रश्नांचा एवढा परिपक्व वेध तेंडुलकरांनी क्वचितच घेतलेला आहे. हे नाटक मराठीतल्या ' व्यावसायिक ' विभागात यशस्वी होणे ( यातला खूप मोठा वाटा निळू फुले या महान नटाचाही आहे. ) हे मराठी रंगभूमीवरचे एक अद्वितीय शिखर आहे असे म्हणायला काहीच हरकत नाही. आणखी काही उदाहरणे म्हणून काही परदेशी नाट्यकृतींचे मराठी रंगभूमीवर सादर झालेले अनुवाद या वर्गात खास उल्लेख केले पाहिजेत असे आहेत. साहित्य संघाचे ' नाटककाराच्या शोधात सहा पात्रे ' आणि नाशिकच्या ग्रुपने सादर केलेले ' वेटिंग फॉर गोदो ' हे ते प्रयोग होत.
समग्रावधान म्हणजे काय, हे कळण्यसाठी इथे सार्त्रच्या ' क्राईम पॅशनेल ' या नाटकाचे उदाहरण देणे योग्य होईल. हे नाटक मानवी जगण्यातल्या अनेक मूलभूत प्रश्नांचा वेध घेणारे आहे. ही एका काल्पनिक देशातल्या एका काल्पनिक क्रांतिकारक पक्षाची कथा आहे. या पक्षातला एक गट जहाल विचारांचा आहे आणि दुसरा मवाळ – समजुतदार – सबुरीच्या विचारांचा आहे. त्या मवाळ गटाचा नेता प्रसंगी प्रतिगाम्यांशी समझोता करून शासनात सहभागी व्हावे आणि

संधी मिळेल तेव्हा आपले वर्चस्व वाढवावे, अशा विचारांचा वा भूमिकेचा आहे. ते जहाल गटाला मुळीच पटणारे नाही. क्रांतीच्या प्रक्रियेत तो मवाळ नेता हा एक अडथळा आहे, असे त्यांना वाटते. त्यामुळे, त्या मवाळ नेत्याचा खून केला पाहिजे, अशा निर्णयाला ते येतात. ती जबाबदारी एका टायपिस्टवर सोपवली जाते. तो लगेच तयार होतो. तो म्हणजे त्याच्या वडिलांकडून अपमानित झालेला आणि त्याच्या पत्नीलाही खास काही न वाटणारा असा असतो. स्वतःला सिद्ध करायला ही संधी बरी आहे, हा त्याचा विचार असला तरी जहाल भूमिकेसाठीच तो तयार असल्याचेच दिसते. हे पूर्ण नाटक – त्यातला कण न कण -- वाचणे महत्त्वाचे आहे. सगळे सांगत बसत नाही, पण तो ठरलेल्या भूमिकेसाठी त्या मवाळ नेत्याचा खून नाही करू शकत. त्याची पत्नी जेव्हा त्या नेत्याच्या मिठीत त्याला दिसते तेव्हा मात्र त्यामुळे झालेल्या उद्रेकात तो गोळी झाडतो आणि त्याला ठार करतो. या कामगिरीनंतर तो इकडे परत येतो तोवर या आधीच्या जहाल गटाची भूमिका बदललेली असते ! मवाळपणाच योग्य, अशी आता त्यांची भूमिका झालेली असते ! आणि आता प्रश्न हा असतो की जहालपणाच्या भूमिकेतून त्या मवाळ नेत्याचा खून करून आलेला हा माणूस आता आपल्यांत समावला जाऊ शकेल का ? – हे सगळे कळल्यावर हा खुनी म्हणतो की मी त्याला त्याच्या मवाळ भूमिकेसाठीच मारले ! आता मी तुम्हाला सोयीचा नसल्यामुळे तुम्ही मला मारलेत तरी मला त्याची पर्वा नाही ! आणि अशा रीतीने तो मृत्यूला सामोरा जातो ! भावनिक उद्रेक, भूमिकाबदल, नीती, तत्त्वे आणि व्यक्तिगत प्रश्न – या सगळ्यांचा पूर्ण आवाका घेणारे हे एक ग्रेट नाटक आहे.

आपण कशा प्रकारचे लेखन करू इच्छितोय, याचा विचार असावा. करमणूक सर्वच नाटकांत असावी लागते – प्रेक्षकांच्या अभिरुचीप्रमाणे ती वेगवेगळीही असते – तरीही, या तीन विभागांतले नाट्यलेखन आशयदृष्ट्या वेगवेगळे असते आणि त्यात लेखकाच्या स्वातंत्र्याचे प्रमाणही वेगवेगळे असते. स्वतःच्या जगण्यात नाट्यलेखक कशाला महत्त्व देतो, जगण्यातल्या प्रश्नांकडे तो कसा पाहतो, त्याचे कल, आवडी कशा आहेत, हे सगळे त्याच्या नाट्यलेखन निवडीत महत्त्वाचे ठरते. आपले स्वतःचे लेखन-क्षेत्र समजत-सापडत जाणे, हे महत्त्वाचे असते.

३ या प्रक्रियेत आणि नेहमीच नाटके, चित्रपट, इतर कला यांचा शक्य तेवढा संपर्क ठेवणे उपयोगाचे असते. यातून तंत्राचे आपले भान वाढत जाते आणि आपली शैलीही सापडत जाते.

४ वरील सर्व प्रक्रिया, तसेच भाषा, विचार, परिस्थिती, इत्यादींचे नाट्यलेखकांवर काही ना काही प्रभाव पडत असतात. ते प्रभाव वेगवेगळे असल्याने आणि कलही वेगवेगळे असल्याने नाट्यलेखकांत खूप वैविध्य दिसून येते. प्रत्येकाची तऱ्हा, शैली वेगवेगळी असते. शेक्सपियर, पिंटर, सार्त्र, आयनेस्को, बेकेट, पिरांदेल्लो, देवल, खाडिलकर, गडकरी, तेंडुलकर, खानोलकर, कानेटकर, आळेकर, एलकुंचवार – हे सर्वजण आपापल्या मार्गाने नाट्यलेखन करतात.

५ काही फरक हे काळामुळेही पडतात. रचनेच्या, भाषेच्या तऱ्हा बदलतात. उदाहरणार्थ, आता पाच अंकी नाटक कुणी लिहीत नाही किंवा खूप अलंकारिक वा पल्लेदार संवादही फारसे लिहिले जात नाहीत. व्यावहारिक प्रश्न विचारात घेऊन, कमी पात्रांची नाटकेही हल्ली जास्त दिसतात. अर्थात, यातल्या कोणत्या गोष्टी विचारात घ्यायच्या, हे सर्वस्वी लेखकाचे निर्णय असतात.

६ आधुनिकतावाद, उत्तर-आधुनिकतावाद – असे काळानुरूप काही दृष्टिकोणांचे फरकही सामान्यतः पडलेले दिसतात. काही जुन्या परंपरा नाकारणे, विज्ञानवाद मानणे यांबरोबरच आटोपशीरपणा, मेलोड्रामाला नकार – असेही फरक पडतात.

७ नाटकाच्या अनेक तांत्रिक बाबींत होणारी प्रगतीही नाट्यलेखनावर प्रभाव पाडते. उदाहरणार्थ नेपथ्य व प्रकाशयोजना. आता दृश्यांचे पडदे नसतात आणि प्रकाशयोजना अधिक आशयपूरक असते.

८ खोटा आदर्शवाद वा नैतिकतेच्या कल्पना यांच्या त्यागामुळेही फरक पडतात. रंगमंचावर तेंडुलकरांनी प्रथम डालडाचा डबा आणला, असे म्हणतात. रोजचे खरे जगणे नाटकात येऊ लागले.

९ सामान्यतः दिसणारा काळाचा आणखी एक फरक नोंदवायचा तर आताची नाटके तुलनेने अधिक गतिमान असतात.

१० हे सर्व लक्षात घेऊनही ढोबळ मानाने काही नाट्यतंत्र सांगता येते का, ते पाहू. पूर्वी ऍरिस्टॉटलने सांगितलेल्या, स्थळ, काळ आणि कृती यांच्या कल्पना आता कुणी पाळत नसले तरीही, काही बाबी बोलता येतील, असे वाटते. सर्वच नाट्यलेखकांना भान ठेवावे लागते असे तंत्राचे काही प्रकार पाहू –

(ए) सुरुवात – नाटक सुरू झाल्या झाल्या एकदम मुख्य विषयालाच हात घातला तर प्रेक्षकांच्या आकलनाच्या दृष्टीने ते चुकीचे ठरू शकते. तसेच करणे भाग असेल तर, ‘ सुरुवात चुकवू नका ‘, असे प्रेक्षकांना आधी सांगणे बरे असते. माझ्या, ‘ प्रेमच म्हणू – ‘ या नाटकात सुरुवातीला ३-४ मिनिटांचे एक दृश्य वाढवले होते – त्याचे उदाहरण.

(बी) पात्रे –किती असावीत याच्या विचाराबरोबरच अत्यावश्यक तेवढीच असावीत, हाही विचार हवा. स्वभावचित्रण हा आता एक विवाद्य विषय ठरेल. या विदीर्ण मनांच्या काळात सुसंगत स्वभावचित्रणाला बरेच लेखक महत्त्व देणार नाहीत. पात्रांबाबत आणखी विशेष लक्ष देण्याच्या बाबी म्हणजे त्यांचे आगमन-निर्गमन आणि चालू दृश्यात कोणती पात्रे उपस्थित आहेत, याचे भान ठेवणे. हे भान सुटल्यास एखाद्या पात्राला, आवश्यक असूनही संवाद दिलेच जात नाहीत. अशा अनवधानाच्या चुकांमुळे एखादे पात्र कमकुवत पडू शकते. पात्रांच्या क्रिया-प्रतिक्रिया हेच तर नाटकातले मुख्य वेधून घेणारे द्रव्य असते. त्याकडे नीट लक्ष हवे. परंतु, नाटकाच्या आशयागणिक हे सर्वच वेगवेगळे असू शकते. उदाहरणार्थ ऍब्सर्ड वा असंगत नाटकांमध्ये सखोल पात्रचित्रणापेक्षा जगण्यातल्या फुटकळपणाला – निरर्थकतेला अधिक महत्त्व दिलेले असते. आणखी एक म्हणजे, पुढील दृश्यात पात्रे वेगळया कपड्यांत येणार असली तर त्यांना कपडे बदलायला वेळ मिळेल, असे लेखनही सोय पाहणारे असावे. माझ्या ‘ नाणेफेक ‘ या नाटकात दुबेजींनी सर्व पात्रांना नाटकभर त्यांच्या त्यांच्या एकाच पोषाखात ठेवले होते.

(सी) दृश्ये – सारखे दृश्यबदल वा छोटी छोटी दृश्ये नसावीत. त्याने प्रेक्षक डिस्टर्ब होतात आणि चाललेले दृश्य आकलन होणे अवघड जाते. पण, हा नियम पं सत्यदेव दुबे यांनी, त्यांनीच लिहिलेल्या आणि दिग्दर्शित केलेल्या ‘ ब्रम्हा विष्णू महेश ‘ या नाटकात सहज मोडला होता. पहिले दृश्य संपण्यापूर्वीच पुढील दृश्याचे पात्र वा पात्रे येऊन मंचावर उभी राहात. अंधार-उजेड केलाच जात नसे. हल्ली, विशेषतः प्रायोगिक नाटकांतून कोणत्याही स्थळकाळातली दृश्ये सलग एकत्र घेतली जातात. नाट्यलेखनात कोणतेही नियम हे सदासर्वकाळ कडकपणे लागू नसतात, हाच याचा अर्थ. अनावश्यक भरताड घेऊन दृश्य कंटाळवाणे होऊ नये, याची काळजी घ्यावी. नाटकात एक मिनिटही कंटाळवाणे येणे धोक्याचे असते. प्रेक्षकाचे लक्ष विचलित होऊ शकते. हे अर्थात फक्त लेखनामुळेच घडते, असे नाही – नाटकाची योग्य गती नसल्यामुळे वा रटाळ अभिनयामुळेही हे होऊ शकते. अंकाचा शेवट नाट्यमय आणि उत्सुकता निर्माण करणारा असावा. यासाठी काही भडक नाट्यमयता लागते, असे नाही. नाटकाच्या आशयाची सर्व अंतर्गत वलये जाणवतील, असा नाटकाचा शेवट असावा. तो कृत्रिम, घटनात्मक असायला हवा, असे नाही. तो अंगावर यायला हवा किंवा गुंगी निर्माण करणारा वा सुन्न करणाराच असायला हवा, असेही नाही. प्रत्येक नाटकाच्या प्रकृतीप्रमाणे तो वेगवेगळा असू शकेल. नाटकाने काही संदेश वा बोध दिला पाहिजे, असे नाही. जगण्यातल्या गुंतागुंतीचे – आशयाचे समग्र भान येणे महत्त्वाचे. ते जिथे पूर्ण होईल तिथे नाटक थांबावे. थोडक्यात म्हणजे नाटकात बदल, प्रगती, प्रक्रिया जाणवणे महत्त्वाचे.

(डी) नाटकाचा आराखडा – काही नाटककारांकडे, लिहायला सुरुवात करण्यापूर्वीच त्या नाटकाचा पक्का आराखडा तयार असतो. प्रत्येक अंकात काय काय घडणार हे दृश्यांसह आखलेले असते. हे इतके बांधलेले असते की दारव्हेकरांसारखा

नाटककार आधी तिसरा अंक, मग दुसरा आणि शेवटी पहिला अंक असे नाट्यलेखन करू शकत असे. असे करावे की नाही, हा ज्या त्या लेखकाचा प्रश्न आहे. माझे म्हणाल तर, पुढल्या पानावर काय होणार, हेही मला माहीत नसते.

(ई) नाट्यमयता – नाट्यमयतेची व्याख्या अवघड आहे कारण निरनिराळ्या प्रकारच्या नाटकांत ती वेगवेगळी असते आणि या बाबतीत प्रेक्षकांच्या अपेक्षाही वेगवेगळ्या असतात. ॲब्सर्ड नाटकातली नाट्यमयता एखाद्या करमणूकप्रधान नाटकाच्या प्रेक्षकाला नुसती सपकच नाही तर कंटाळवाणीही वाटू शकते. सामान्यतः समोर चाललेल्या नाटकात प्रेक्षकाचे इंटरेस्ट टिकून राहणे म्हणजे नाट्यमयता, असे ढोबळपणे म्हणता येईल. रंगमंचावरची प्रत्येक हालचाल, घटना, संवाद हे महत्त्वाचे वाटायला हवेत. उत्सुकता टिकायला हवी आणि नंतर ती योग्य होती असे वाटायला हवे. विजया मेहतांनी एक त्रिसूत्री सांगितलेली आहे – ती याचा अर्थ स्पष्ट करणारी आहे --

see नव्हे तर look

hear नव्हे तर listen आणि

speak नव्हे तर talk.

म्हणजेच प्रत्येक गोष्ट विशेष – महत्त्वाची असणे आणि लेखनात याचे भान असणे.

(एफ) निवेदन – नाटकात काही वेळा घटनांचे वा भूतकाळाचे निवेदन येते. त्याचा उपस्थित पात्रांवर काही परिणाम होताना दिसला तर ते नाट्यमय होते. अन्यथा तो मजकूरच नाट्यमय हवा. पण, निवेदन फार ताणू नये. ' चौऱ्याहत्तर पावसाळ्यांचा जमाखर्च ' किंवा ' मसाज ' या तेंडुलकरांच्या कथांवरचे एकपात्री नाट्यप्रयोग याचे एक वेगळेच भान देणारे होते. माझा एक ' मन ' नावाचा दीर्घांकही या बाबतीत जरूर पाहावा.

(जी) भाषा आणि संवाद – पात्रानुरूप भाषा असावी. त्यासाठी, निरीक्षण आणि लक्षपूर्वक ऐकणे खूप उपयोगी असते. आता पल्लेदार संवाद फारसे कुणी लिहीत नाही. ओघवते, तडक बोलण्याचा फील देणारे संवाद परिणामकारक ठरतात. यासाठी, एकूणच माणसांच्या जगण्यात आणि त्यांच्या व्यक्त होण्याच्या पद्धतींत इंटरेस्ट असणे आवश्यक आहे. नाट्यलेखकाने कवितांचे वाचन ठेवणेही महत्त्वाचे आहे. त्यामुळे, नकळतही भाषेच्या अनेक शक्यता समजत जातात – त्यामुळे, संवादांना वेगळी धार येऊ शकते. संवाद या नाटकातल्या कृतीही असतात. हे समजून काही लेखक हालचालींबाबतही खूप रंगसूचना देतात. उदाहरणार्थ, तेंडुलकर. खरे तर त्या अत्यावश्यक तेवढ्याच असाव्यात. एक तर त्या सगळ्या पाळल्या जात नाहीत आणि बऱ्याच दिग्दर्शकांना असे रंगसूचनांनी बांधून घ्यायला आवडतही नाही.

(एच) तंत्रभान – नाटककाराला नाटकाच्या इतर तांत्रिक अंगांचे फार सखोल ज्ञान असायची गरज नसते. नाहीतरी ते विशेष कौशल्याचे विभाग असतात. त्यामुळे त्यासाठी वेगळी सर्जकताही लागते. त्यांबाबत थोडे जुजबी भान असले तरी नाटककाराचे काम भागू शकते.

(आय) वाचन – नाटक लिहून झाल्यावर ते काही श्रोत्यांसमोर वाचावे. ऐकणाऱ्यांना एखादी गोष्ट नीट स्पष्ट होत नसेल तर लेखनात योग्य ती दुरुस्ती, बदल वा काही अधिक लिहिणे – हे करावे. काही वेळा एखाद्या भागाचे वा पूर्ण नाटकाचेही पुनर्लेखन करायची गरज पडू शकते – त्याची तयारी ठेवावी. क्वचित प्रसंगी, पुन्हा वाचल्यावर, खुद्द नाटककारालाच ते समाधानकारक वाटत नाही. अशा वेळी न कंटाळता योग्य त्या मेहनतीची तयारी असायला हवी.

(जे) पूर्णता – सर्वानुमते नाटक सर्वांगपरिपूर्ण कधी होत नसते. एका मर्यादेनंतर त्याची चिंता करू नये. मतभेदांची शक्यता नेहमीच असते, हे समजून, नाराज न होता पुढे जावे.

(के) लेखक आणि नाट्यमंचन – प्रत्यक्ष तालमीच्या प्रक्रियेत लेखकाने आवश्यक तिथे सहकार्य द्यावे. माझा शब्द अंतिम, असे हटून बसू नये. शक्य तर दोनतीन तालमी पाहाव्यात – वाटल्यास काही सुचवावे. नाटक ही समूहाची कला असून प्रत्येक संबंधिताच्या योगदानामुळेच नाटक समृद्ध होते, हे लक्षात ठेवावे. मंचन प्रक्रियेत फार हस्तक्षेप करू नये. आपण

कल्पना केलेले तेच तसेच – असा प्रयोग सहसा होत नसतो. सगळे मिळून नाटकाचा आशय सशक्तपणे पोचणे, हेच महत्त्वाचे समजावे.

११ इतर –

आता काही सुटे मुद्दे सांगतोय.

आपल्या बहुसंख्य प्रेक्षकांना वास्तववादच लागतो – म्हणजे हे असे झाले, मग असे झाले, म्हणून असे झाले. थोडक्यात म्हणजे सलगता असलेली गोष्ट लागते. स्थळ, काळ, घटना, पात्रे यांची गोष्टरूप संगती लागते. अलिकडे काही लेखक ही अपेक्षा मोडताना दिसतात. उदाहरणार्थ ' माकड ' हे व्यावसायिकवरचे नाटक. प्रायोगिक विभागात, आळेकरांचे ' महापूर ' किंवा संतोष गुजर यांचे ' मऊ ' ही अतिवास्तववादी नाटके या मर्यादा नाकारताना दिसतात.

एकदा नाटक लोकांपुढे सादर झाल्यावर त्यावर कशाही प्रतिक्रिया, मतमतांतरे वा शेरेताशेरे येऊ शकतात. त्याची तयारी ठेवावी.

काहींच्या भावना दुखावण्याची शक्यता असलेले काही विषय असतात. त्याबाबत योग्य ती सावधगिरी बाळगावी.

काही विषय मांडल्यास लेखकाची स्वतःची सामाजिक प्रतिमा बदलू वा बिघडू शकते – याबाबत स्वतःचे चिंतन व आकलन असले पाहिजे.

यशाने हुरळून जाणे वा अपयशाने निराश होणे हे दोन्ही पुढील लेखनाला घातक ठरू शकते.

नाटकाची आर्थिक व व्यावहारिक गणिते लेखकाने लक्षात घ्यावीत की घेऊ नयेत, हे ज्या त्या लेखकाच्या दृष्टिकोणावर अवलंबून असते.

नाटकात ' वेगळे ' वा ' नवे ' म्हणजे काय असते – प्रेक्षकांना काही ' मिळणे ' म्हणजे काय – हे विचारात असावे.

आता, काही मराठी नाटककार स्वतःच्या नाट्यलेखनाबद्दल काय म्हणतात ते पाहू –

शफाअत खान – ( ' नाटक ' त्रैमासिक, फेब्रुआरी, २००० )

माझ्या नाटकात ( संवादात, मांडणीत ) तिरकसपणा असतो. तो का हे मला सांगता येणार नाही. ती एक जीवनदृष्टी असावी. सगळ्या घटनांकडे, प्रसंगांकडे मी असाच एका अंतरावरून त्रयस्थपणे बघत असतो. ह्या शैलीमुळे प्रत्यक्षापलिकडे जाऊन काही गोष्टी सुचवता येतात असं मला वाटतं. ह्या तिरकसपणामुळे एक दूरीभाव निर्माण करता येतो. प्रेक्षकांना एक वेगळी नजर देता येते. त्याच्याच भयंकर जगण्याकडे, भयंकर वास्तवाकडे तो ह्या नजरेनं बघतो. तो हसतो आणि धास्तावतोही.

--

मी नाटकातून ब्लॅक कॉमेडीचा वापर करतो. मुळातच सगळ्या संकल्पनांचा पुनर्विचार करावा, साऱ्या गोष्टींची पुन्हा एकदा अत्यंत कठोर तपासणी करावी, मुळापासून साऱ्या गोष्टी उलट्यापालट्या करून बघाव्या, अत्यंत त्रयस्थपणे साऱ्या नात्यांचा नव्यानं हिशोब मांडावा, आपल्या मुळांचा, इतिहासाचा, परंपरेचा खरेपणा, सच्चेपणा तपासून बघावा, अशा वाटण्यात या ब्लॅक कॉमेडीचा जन्म झालेला आहे. हा विनोद मुळावरच घाव घालतो. साऱ्या श्रद्धा-समजुतींना सुरुंग लावतो. ब्लॅक कॉमेडी आणि तिरकसपणा हे एकमेकांशी संबंधित आहेत.

--

वास्तवाला भिडायचं नाकारणारी पलायनवादी रंगभूमी काहीही प्रगती करू शकणार नाही. हे आव्हान स्वतःला बंडखोर म्हणवून घेणाऱ्या प्रायोगिकवाल्यांनीच स्वीकारायला हवं. रंजनप्रधान व्यावसायिक रंगभूमीला हे भयंकर वास्तव उभं करणं परवडणार नाही.

-- ० –

राजीव नाईक -- ( ' नाटक ' त्रैमासिक, जून २००० )

प्रत्येक लेखकाला असं वाटलेलं असतं की त्याला काहीतरी सापडलेलं आहे, जे लोकांना सापडलेलं नाही आहे. हे मात्र नक्कीच असणार. कारण जर का ते लोकांना ठाऊकच आहे तर काय म्हणून मी त्यांना ते सांगणार आहे ? तर काहीतरी बारीकसं का होई ना सत्य मला सापडलेलं आहे की जे कदाचित नसेल तुम्हाला सापडलेलं किंवा प्रकर्षानं तुमचं लक्ष नसेल गेलं त्याच्याकडे, किंवा एखादा बारका कंगोरा मला सापडलाय त्याच्यात आणखीन एक परी मला दिसली, तर मी का नाही ती तुम्हाला दाखवून द्यायची ?

-- ० –

चं. प्र. देशपांडे – ( ' नाटक ' त्रैमासिक, सप्टेंबर २००० )

चांगल्या नाटकाची , कुठल्याही नाटककाराची एक अध्याहृत व्याख्या असणारच. त्या दिशेनेच त्याचे प्रयत्न असणार. हे संहितेत जमणं, न जमणं आणि पुढे अंमलात येणं न येणं, हेही प्रश्न आहेतच. माझ्या आकलनाप्रमाणे चांगलं नाटक ते की जे जगण्याच्या कुठल्यातरी तुकड्याच्या निमित्तानं एकूण संबंधांचं आणि जगण्यातल्या प्रश्नांच्या रचनांचं भान देत जातं. हे जगण्यातल्या एका अटळतेचं भान असतं तसंच ' अमर्यादते ' ची अपेक्षा निर्माण करणारंही असतं. …. सगळ्या गोष्टी गृहीत न धरणं, प्रश्न आहेत असं जाणवणं, सवयीचं जगणंही चॅलेंज होऊ शकतं इतपत समज असणं, अशा ' जिवंत ' लोकांसाठीच असतं चांगलं नाटक ….. चांगलं नाटक म्हणजे जगणं समजण्याची इंटरेस्टिंग प्रक्रिया असलं पाहिजे. ज्या प्रक्रियेमुळे माणसाच्या जगण्यात दुःखाची निर्मिती होत राहते तीच प्रक्रिया बळकट करणारं नसतं चांगलं नाटक. चांगलं नाटक हे असल्या सवयीच्या प्रक्रियेला आव्हान देणारं असतं.

-- ० --

विजय तेंडुलकर – ( ' नाटक ' त्रैमासिक, फेब्रुवारी २००१ )

नाटक म्हणजे निव्वळ वास्तव नव्हे तर मला भावलेले आणि मी रचलेले वास्तव. आणि ते मी दाखवतो ते ' हे वास्तव बघा ' एवढ्यापुरते नसते. ह्यातून मी अधिक काही सुचवीत असतो. इतरांना भावणारे वास्तव त्यांचे असते. माझे वास्तव त्यांना जाणून देण्याची जबाबदारी माझ्यावर असते.

--

हिंसेची प्रवृत्ती अलग नाही. ती मनुष्य-स्वभावाच्या इतर प्रवृत्तींत आणि जगण्याच्या मूलभूत गरजांत पक्की गुंतलेली आहे. तसेच तिला अमानुष म्हणायची पद्धत आहे, पण ती मला मानुष वाटते. म्हणून तिचा विचार मी समजुतीने आणि आत्मीयतेने करतो. तिच्या विरुद्ध किंवा बाजूने असणे मला जमत नाही. ती आहे आणि बहुधा राहणार तर विशेषणात न सापडता तिच्याकडे पाहायला जमले पाहिजे.

--

( सा. सकाळ दिवाळी ऑक्टोबर २००० )

लिहिण्याकरता जगणे, हा जो प्रकार आहे तो मला मान्य नाही. महत्त्वाचं जगणंच. लिहिणं म्हणजे रोज सकाळी उठून शंभर सूर्यनमस्कार घालणं नव्हे. त्याला काही अर्थ नाही. लेखन म्हणजे निव्वळ एक्स्प्रेशन नव्हे. तुम्ही चांगलं जगल्याशिवाय, मजा केल्याशिवाय त्याचं एक्स्प्रेशन येणार कुठून ?

--

यशाच्या बाबतीत मी अगदी प्रामाणिकपणे सांगतो, की काहीतरी डोक्यात आलं की मी ते करून बघतो. मला पुढं काय होणार हे माहीत नसतं. ' घाशीराम ' चं पुढं काय होईल, हे मला माहीत नव्हतं. ' सखाराम ' चंही नव्हतं.

-- ० –

महेश एलकुंचवार – ( नाटककार महेश एलकुंचवार – डॉ. कमलेश )

आता केवळ विसाव्या शतकातच नाही, तर स्वत्वाच्या आणि आत्मजागृतीच्या शोधात माणूस कायमच होता. आत्मशोध हा मानवी जीवनाचा मूलभूत असा भाग आहे. सगळ्यांच्या जीवनाचा तसा राहात नसेल पण केव्हा ना केव्हा माणसाच्या आयुष्यात अशी वेळ येते, की तो शोधायला लागतो, की मी इथे का आहे ? काय करतोय ? कशासाठी करतोय ? या प्रश्नांपासून कुठल्याही लेखकाला पळता येत नाही. अखेर सगळी नाटकं काय किंवा सगळं साहित्य काय, हे तिथेच त्या मूव्हमेंटलाच येतं, असं मला वाटतं.

--

कुठल्याही धर्मानं वा राजकीय मतप्रणालीनं गेल्या पाच ते सात हजार वर्षांत माणसाचे प्रश्न कधीही सोडवलेले नाहीत.

--

संपूर्ण जीवन जे छत्रीसारखं या सगळ्यांना आपल्या सावलीखाली घेतं, ते समजून घ्यावं, असं मला वाटतं.

--

तेव्हा एकच मार्ग आहे, तो म्हणजे जीवन शांतपणे समजून घेणं. आता हा विचार कुणाला पराभूत वाटेल किंवा भारतीय वाटेल – ( ठेविले अनंते तैसेचि राहावे ) तर तसं नाही. जीवन समजून घेणं हा शहाण्या माणसांसमोर एक पर्याय असतो. अनेक प्रकारचे अन्याय होत असतात, ते व्यक्ती म्हणून आपण दूरही करायला पाहिजेत. परंतु लिहिताना माझी बांधिलकी जीवनाशी आहे. जीवनाहून मोठं काही नाही.

-- ० –

आता मी माझ्या नाट्यलेखनाबाबतही बोलायला हवे, असे वाटते. मी इथे एक नाट्यलेखक म्हणूनच तर बोलत आहे. त्यामुळे, इथे माझ्या काही एकांकिका व काही नाटके यांचे विषय देणे आता प्रस्तुत वाटते. प्रत्येक वेळी असे विषय ठरवून लेखन होत नसले तरीही लेखनाची दिशा कशी होत जाते, हे पाहण्यासाठी असे तपशील देत आहे. हे सगळे बरोबरच आहे असा माझा दावा नाही।

एकांकिका

माझ्या सुरुवातीच्या दोन एकांकिका, माझे प्राध्यापक असलेल्या शंकर वैद्य यांनी विजय तेंडुलकर यांना वाचायला दिल्या होत्या. त्या वाचल्यावर तेंडुलकर एवढेच म्हणाले होते की तुला सल्ला असा मी काहीही देणार नाही, फक्त भरपूर नाटके वाच आणि पाहा, एवढेच. थिएटरमध्ये काय घडते याचे भान वाढवत जा, असे ते म्हणाले होते. मला त्यातून नक्कीच

प्रोत्साहन मिळाले. खानोलकर तर माझे मित्रच होते. या दोघांच्या खुल्या प्रोत्साहनाचा इथे कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे मला आवश्यक वाटते. खानोलकर तर, माझ्या कविताही नाट्यमय असतात,असे म्हणत असत. मी इस्माईल युसुफ कॉलेजात असल्यामुळे, प्रा. शंकर वैद्यांच्या संपर्कात आलो आणि त्यांनी सुरुवातीच्या काळात माझ्याकडे लक्ष दिले आणि माझ्या वेगळेपणाची मला जाणीव दिली, याचा इथे उल्लेख केला पाहिजे. याच कॉलेजात पूर्वी मर्ढेकरही शिकवायला होते, हा त्या वेळी अर्थातच माझा अभिमान –मुद्दा होता. ( मला पुढे इंग्लिश हा विषय घ्यायचा होता आणि त्या कॉलेजात प्रा. होमाई जे. श्रॉफ या मुंबईतल्या प्रख्यात प्राध्यापिका, ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या एम. ए. , इंग्लिशच्या विभागप्रमुख होत्या. त्यांच्याकडून मला चॉसरचे ‘ कँटरबरी टेल्स ’ आणि शेक्सपियरचे ‘ मॅक्बेथ ’ शिकायला मिळाले, हे माझे भाग्यच म्हणायला हवे. )

‘ मेलेले ’ ही माझी पहिली एकांकिका ‘ सत्यकथे ’ त प्रसिद्ध झाली. पुढे तीत काही काटछाट, सुधारणा करून आता ‘ एकत्र ’ या नावाने ती माझ्या वेबसाईटवर आहे. सततच्या रूटीन जगण्याने येणारी अस्वस्थता हा त्या एकांकिकेचा विषय होता. माधव वाटवे या ग्रेट अभिनेत्याने मला साहित्य संघात यासाठी बोलावले होते की या एकांकिकेतला काही भाग प्रत्यक्ष रंगमंचावर कसा होईल ते मला करून दाखवावे ! त्याचा लाभ त्या वेळी मी काही घेऊ शकलो नाही. पुढे कालांतराने माधव वाटवे आणि आत्माराम भेंडे या महान जोडगोळीने माझ्या ‘ पोत्यातून गोत्यात ’ या पहिल्या व्यावसायिक नाटकात काम केले. ( प्रकाश बुद्धिसागरचे व्यावसायिक रंगभूमीवर दिग्दर्शक म्हणून पदार्पण याच नाटकाने झाले. पुढे तो फार्सिकल, विनोदी नाटकांचा किंग दिग्दर्शक झाला. )

त्यानंतर ‘ सत्यकथे ’ त आलेली माझी एकांकिका म्हणजे ‘ इतिहास ’. ही एकांकिका वाचून काही अनुभवी लोक म्हणाले की ही फक्त वाचायला चांगली आहे, हिचा प्रयोग होणार नाही. झाले उलटे ! विचारनाट्याला अनुकूल काळ आलेला होता, त्याला फक्त योग्य अभिव्यक्ती मिळायची गरज होती, हे या एकांकिकेने सिद्ध केले. त्या वर्षीच्या ‘ उन्मेष ’ स्पर्धेत ही एकांकिका नुसती गाजली असे नव्हे तर प्रेक्षकांच्या प्रथम पसंतीचे पारितोषिक तिने मिळवले. पुढे महाराष्ट्रभर अनेक स्पर्धांतून या एकांकिकेने अनेक पारितोषिके मिळवली. फक्त तीनच पुरुषपात्रांची ही एक गंभीर एकांकिका होती. ही एकांकिका, मानवी जगण्यासाठी काही आदर्श नमूना ( पॅटर्न ) सापडू शकतो का, ठरवून काही ‘ चांगली ’ स्थिती घडवता येते का, हा प्रश्न हाताळणारी होती. या एकांकिकेचे दृश्य रूप सर्वप्रथम ‘ पाहू ’ शकलेला म्हणून त्या वेळचा विद्यार्थी-दिग्दर्शक विनायक पडवळ याचा इथे उल्लेख करणे आवश्यक आहे. त्याने केलेल्या त्या प्रयोगामुळेच पुढे माझी वाट मोकळी होत गेली.

विनायक पडवळनेच पुढे सुरू केलेल्या ‘ भरतशास्त्र ’ या त्रैमासिकात माझी ‘ नातं ’ ही एकांकिका ( दीर्घांकच ) प्रसिद्ध झाली. आशयाची सखोलता आणि यशाची विक्रमी उंची गाठणारी एकांकिका म्हणून ही सर्वत्र गाजली. दूरदर्शनने पूर्ण महाराष्ट्रात घेतलेल्या, ८५ संघांनी भाग घेतलेल्या स्पर्धेत ही एकांकिका पहिली आली. दिग्दर्शक होता प्रकाश बुद्धिसागर. कालांतराने योगेश सोमणच्या दिग्दर्शनासह आणि सोनाली कुलकर्णीच्या विशेष अभिनयासह, सादर झालेल्या या एकांकिकेला पुरुषोत्तम करंडकही मिळाला. एका सुराधाऱ्याला घाबरून नवरा पळाल्यानंतर त्याच्या पत्नीवर बलात्कार होतो. त्या घटनेनंतर ती दोघे घरी परततात, इथून ही एकांकिका सुरू होते. पति-पत्नी या नात्याची आणि एकूणच जगण्याची यात चिरफाड करून पाहिली जाते. अनेक प्रश्न, क्रिया-प्रतिक्रिया यांची गर्दी उसळते आणि “ तू पूर्वी होतास

तसाच मला चालला असतास " अशा विचित्र वळणावर ही एकांकिका येते. शेवटाला ट्रॅजिक म्हणावे की म्हणू नये, अशा अनपेक्षित बिंदूवर ती संपते.

' संसाराणूपेंडघार ' ही एकांकिका प्रथम आयएनटी स्पर्धेत प्रकाश बुद्धिसागरने सादर केली. त्या वेळी मी नोकरीनिमित्त अहमदनगर जिल्ह्यात वाळकी या गावी होतो. ही एकांकिका समजून घेण्यासाठी प्रकाश मुंबईहून वाळकीला आला होता. त्या स्पर्धेत या एकांकिकेला लेखनाचे पारितोषिक मिळाले, हे असले तरीही या एकांकिकेतला नाट्यलेखनातला एक विलक्षण प्रयोग एकूणात पूर्णतः दुर्लक्षिला गेला, असेच म्हणावे लागेल. उक्ती आणि कृती यांतली सततची दरी आणि दूरी दाखवण्यासाठी या एकांकिकेत संवाद आणि कृती / अभिनय यांचा संबंधच तोडून टाकलेला होता. या तंत्रामुळे संवादांचे एक वेगळेच स्वातंत्र्य मला मिळाले.

' विरहवेदना ' अर्थात ' साक्ष मावळत्या सूर्याची ' ही एकांकिका पुरुषोत्तममध्ये प्रथम पुणे विद्यापीठातर्फे विद्यासागर अध्यापकच्या दिग्दर्शनाखाली सादर झाली. ही त्या वेळी सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिका ठरली. प्रेमासाठी जग धुडकावून लावणारे, कुणाचीही, कशाचीही पर्वा न करणारे प्रेमिक हे अनेक कलाकृतींचे विषय होण्याच्या पार्श्वभूमीवर इथे समजुतदार प्रेमिक आहेत ! आपल्या प्रेमामुळे दुःख, नाश यांची निर्मिती होणार असेल तर आपणच वेगळे होऊ, असे ठरवणारे हे ' विचारी ' प्रेमिक. ते एकदा शेवटचे भेटायचे ठरवतात, ती शेवटची भेट म्हणजे ही एकांकिका. आसक्ती, प्रेम, विचार, भावना या सगळ्याच प्रक्रियांचा धांडोळा ही एकांकिका घेते. प्रश्न चहूबाजूंनी ढवळून काढणारे संवाद आणि सूक्ष्म अर्थच्छटांचा बाज पाहता समीप रंगमंचावरून ही एकांकिका अधिक प्रखरपणे पोचू शकेल असे वाटते.

' सेक्स ' ही एक खूप गाजलेली आणि गाजत राहिलेली एकांकिका. मुंबईच्या आंतरबँक स्पर्धेत ही प्रकाश बुद्धिसागरने ' उत्सव ' या नावाने सादर केली. तिथे लेखनाचे पारितोषिक मिळाले. संवादांनी खिळवून ठेवत, उलटसुलट कलाटण्या घेत ही एकांकिका, मानसिक व्यग्रता हाच कसा एक प्रश्न बनतो ते दाखवते. पुढे या एकांकिकेचा दीर्घांक होऊन ' बुद्धिबळ आणि झब्बू ' या नावाने त्याचे प्रायोगिक रंगभूमीवर विक्रमी प्रयोग झाले. त्यानंतर, ' तुमचं आमचं सेम असतं ' या नावाने पूर्ण दोन अंकी नाटकाच्या रूपात ते व्यावसायिक रंगभूमीवरही झाले. त्याची डीव्हीडीही प्रकाशित झाली. तिन्हींचे दिग्दर्शक गिरीश पतके होते. त्यानंतर ' दिल चाहता है ' या नावाने ते हिंदीतही झाले. त्याच्या पहिल्या प्रयोगाची तिकीटविक्री तीन लाख होती ! पुढे चेतन दातारने ते दिल्लीच्या श्रीराम सेंटरसाठी ' आँखमिचौली ' या नावाने हिंदीतून बसवले, त्याचेही खूप प्रयोग झाले.

' बस ' ही माझी रंगायनसारख्या नामांकित संस्थेने सादर केलेली पहिली एकांकिका. बाळ कर्वे यांची ही रंगभूमीपदार्पणाची एकांकिका. दिग्दर्शक होते रमाकांत देशपांडे. याच्या पहिल्या प्रयोगाला, नामांकित व्हिलन होण्यापूर्वीचे अमरीश पुरी उपस्थित होते. ज्ञानेश्वर नाडकर्णी यांना तीन एकांकिकांमधली ही सर्वात जास्त आवडल्याचे त्यांनी त्यांच्या ' टाइम्स ऑफ इंडिया ' तल्या परीक्षणात म्हटले होते. एकाकीपणाचे वेगवेगळ्या रूपांतले सातत्य हा विषय या एकांकिकेत हाताळलेला होता.

' स्थळ - दिवाणखाना ' ही एक एकपात्री एकांकिका आहे. विचारांचा आणि प्रश्नांचा गोंधळ आणि बाह्य परिस्थिती हताळण्याचे सततचे ताणमय प्रयत्न, हा या एकांकिकेच विषय होता. याची आणखी काही परिमाणे पाहणे शक्य असल्याचे

लक्षत आल्याने ही एकांकिका वाढवून तिचा ‘ मन ‘ या नावाने केलेला दीर्घांक माझ्या वेबसाईटवर आहे. हे पूर्ण सादर करणाऱ्या अभिनेत्याला तिथल्या तिथे ‘ नटश्रेष्ठ ‘ हा किताब द्यायला हरकत नाही, असे मला वाटते.

‘ वेषांतर ‘ ही एकांकिका एकमेकांतले डावपेच, खोटेपणा आणि त्यांतून निर्माण झालेल्या गुंतागुंतीमुळे दिङ्मूढ अवस्था होणे, हा विषय हाताळणारी आहे. यात प्रतिमा बदलणे आहे. ही एकांकिका विनोदी पद्धतीने गंभीर विषय हाताळते. स्वतःच्या आणि दुसऱ्यांच्या प्रतिमा घट्ट करत जाणे कसे घडते हे ‘ ओळख परेड ‘ या एकांकिकेत आहे. सामुदायिक नेतृत्व ही संकल्पना चर्चेत असताना प्रत्यक्षात तिचे काय होते हे पाहणारी ‘ समुदाय ‘ नावाची एकांकिका लिहिली. तीत समुदाय नावाचे एक पात्र घेऊन निर्णयसत्ता शेवटी एकाकडेच एकवटते हे दाखवले होते. सामाजिक-राजकीय-वैचारिक क्षेत्रातला आक्रमकपणा आणि व्यक्तिगत जीवनातला आक्रमकपणा हा मूलतः एकच असतो, हा विषय ‘ स्टालिन ‘ ही एकांकिका हाताळते. मानवी प्रश्न सोडवण्याच्या अथक परिश्रमांचे काय होते, हा विषय ‘ समस्या सोडवण्याचा सराव ‘ या एकांकिकेत येतो. हाच विषय एका वेगळ्या आयामातून ‘ खडक ‘ या एकांकिकेतही येतो.  ‘ रिलीफ ‘ ही थोडक्या कालावकाशात बरीच गुंतागुंत असलेला जीवनतुकडा दाखवते. सादरीकरणात फक्त पाच ते सात मिनिटांचाच असा हा प्रयोग होईल. ‘ अस्तित्व ‘, ‘ जोडपी ‘, ‘ ऑफिस ‘, ‘ ट्रेलर ‘, ‘ सत्य ‘ याही असेच काही मानसिक प्रश्नांचे विषय हाताळणाऱ्या एकांकिका आहेत.

सगळे जगणे जर कारणपरिणाम मीमांसेत चालत असेल तर दुःखातून बाहेर पडणे अशक्यच आहे, असा याचा अर्थ होतो. कारण, स्वभाव, क्रियाप्रतिक्रियांची रचना हे सगळेच जर असे बद्ध असेल तर मग ‘ शहाणपण ‘ म्हणजे काय, ‘ स्वातंत्र्य ‘ म्हणजे काय हे प्रश्न विचारलेच जाऊ शकत नाहीत. परिस्थिती आणि मी, इतर माणसे आणि मी, दुसरी व्यक्ती आणि मी यांतल्या सगळ्या संघर्षावस्था अटळ धरून चालावे लागेल. माझ्या एकांकिकालेखनात अशा स्वरूपाच्या प्रश्नांना प्राधान्य असते. कारण कुठल्याही व्यक्तीच्या जगण्यातले हे महत्त्वाचे प्रश्न असतात. कुणालाही जगणे समजण्याची सुरुवात कुठल्यातरी अशा प्रश्नापासूनच शक्य आहे, असे मला दिसते. म्हणजे मग, एखादे तत्त्वज्ञान, एखादी प्रणाली मांडण्यासाठी मी लिहितो का ? तर नाही. ते मी स्पष्टपणे नाकारतो. कारण औपपत्तिक बौद्धिक कृतीपेक्षा क्रियाप्रतिक्रियांच्या जिवंत प्रक्रियेतून पाहणे हेच मला माझे कृतिक्षेत्र वाटते. मी तत्त्वज्ञ किंव प्रबंधकार नसून एक कलावंत आहे – नाट्यक्षेत्रातला लेखक आहे – ही माझी जाणीव सतत उपस्थित नसेल तर नाट्यक्षेत्रात लेखन करणे शक्य होणार नाही. विचारनाट्यही / चर्चानाट्यही इंटरेस्टिंग होणे हे या जाणीवेशिवाय शक्य नाही.

एखादा अनुभव चित्रित करणे, एखादा मूड तयार करणे, एखाद्या आदर्शाचे अथवा भूतकाळाचे उदात्तीकरण करणे, एखाद्या विचारसरणीचा प्रभाव वाढवणे, एखाद्या अन्यायाचे परिमार्जन कसे व्हायला हवे ते सांगणे किंवा चांगल्यावाईटाचे एक उघड वा सुप्त द्वंद्व मांडत राहणे, अशा कारणांसाठी मी नाट्यलेखन केलेले नाही. जगण्याचे वेगवेगळ्या अंगांनी समग्र भान व्यक्त करणे या ‘ हेतू ‘ ने लिहिले, असे म्हणता येईल. माझे नाट्यलेखन म्हणजे मला जगताना जाणवलेले प्रश्न समजून घेण्याची प्रक्रिया आहे. या प्रश्नांचे स्वरूप मला तात्कालिक किंवा समकालीन असे जाणवत नसून वेगवेगळ्या प्रकारे मानवी जीवनातले त्यांचे सातत्य मला दिसते. अशा प्रकारचे लेखन करताना पैसा आणि प्रसिद्धी ही उद्दिष्टे असूच शकत नाहीत, त्याबद्दल वेगळे बोलायचे कारण नाही. आपल्या चरितार्थासाठी दुसरे काही दिवसभर करून मग आणि तरीही हे करू शकत असाल तर करा, असेच वातावरण असते. मी ते त्रागा न करता स्वीकारत आलेलो आहे.

इथे आता माझ्या दीर्घांक व नाटके यांच्या लेखनाकडे वळू. ' मानव ' आणि ' मरणाचे स्मरण असावे ' ही दोन सुरुवातीची अजिबातच न जमलेली नाटके. तशीच आणखी दोन न जमलेली नाटके म्हणजे ' पंतप्रधान येत आहेत ' आणि ' घटना घडतात '. पण ही नाटके ' अभिरुची ' त प्रसिद्ध झाली. पाचवे न जमलेले नाटक म्हणजे ' राज्य '. पण याचा प्रा. अरुण पाटील यांच्या दिग्दर्शनाखाली सांगली बँकेमार्फत राज्यनाट्यस्पर्धेत प्रयोग झाला. आणि सहावे न जमलेले नाटक म्हणजे पूर्वी केलेले काफ्काच्या ' ट्रायल ' चे नाट्यरूपांतर. ( अलिकडे पुन्हा हे नाट्यरूपांतर केले, ते माझ्या वेबसाईटवर आहे. ) ही सहाही नाटके बाद धरून त्यांना वेबसाईटवर घेतलेले नाही. लिहिण्यातल्या अपयशाने खचून न जाणे आणि चिवटपणा हे गुण मुळात अंगात असावेत किंवा निर्धारामुळे ते आले असावेत. त्याशिवाय पुढचे काम घडले नसते. एवढे झाल्यावर अर्थातच मी स्वतः ज्यांना न जमलेली नाटके असे समजत नाही आणि जी माझ्या वेबसाईटवर आहेत त्या नाटकांकडे जाऊ.

या एकूण नाट्यलेखनाच्या जमेच्या बाजू काय तर त्या अशा – धर्म ( ढोलताशे ), अर्थ ( इराक ), काम ( बुद्धिबळ आणि झब्बू ), आणि मोक्ष ( जणू काही वास्तव ) – अशा चार पुरुषार्थांवर नाटके; अलिकडच्या आंतरराष्ट्रीय संदर्भासह लिहिलेले मराठीतले एकमेव नाटक ' इराक '; स्त्री-पुरुष संबंधांतले बारकावे आणि अंतःप्रवाह चित्रित करणारे मराठीतले विशेष नाटक ' बुद्धिबळ आणि झब्बू '; विचारनाट्य / चर्चानाट्य इतक्या भरपूर प्रमाणात आणि इंटरेस्टिंग पद्धतीने येणे / रुजणे; महाराष्ट्रभर अनेक संस्था, कॉलेजेस, बँका, कारखाने यांच्याकडून सादरीकरण; जवळजवळ सर्व नामवंत नाट्यसंस्थांकडून व अनेक नामवंतांच्या दिग्दर्शनाखाली सादरीकरण; आणि मुख्य म्हणजे, मानवी प्रश्नांच्या बाबतीतले मानवी बुद्धीचे अपयश अभिव्यक्त करणारी इतकी नाटके मराठीत प्रथमच. ( पुढेमागे कुणी खुल्या दिलाचा नाट्यसमीक्षक आलाच जन्माला तर त्याच्या सोयीसाठी हे थोडे देऊन ठेवले आहे. वर्तमानपत्री परीक्षणांपलिकडे या माझ्या नाट्यलेखनाकडे अजून तरी फारसे कुणाचे लक्ष गेलेले नाही. याला दोन कारणांच्या शक्यता संभवतात – एक म्हणजे हे सगळे फालतू असणे आणि दुसरे म्हणजे तथाकथित समीक्षक सगळे बुद्धिप्रामाण्यवादी असल्याने हे त्यांच्या आकलनकक्षेत न येणे. ) असो.

नाटके

पहिले जमलेले नाटक म्हणजे ' एक गगनभेदी किंचाळी '. हे नाटक माझा नट-दिग्दर्शक मित्र प्रसन्न जी. कुलकर्णी याने पाठपुरावा करून माझ्याकडून लिहून घेतले आणि अत्यंत कल्पक नेपथ्यासह सादर केले. या नाटकाच्या निमित्ताने एकत्र आलेल्या आम्ही मित्रांनीच कोल्हापुरातली ' प्रत्यय ' ही प्रसिद्ध नाट्यसंस्था स्थापन केली. आपण सगळे प्रतिमांच्या जगात जगतो, समजा बाहेरून आपली प्रतिमा बदलली गेली तर – असा नाटकाचा विषय होता. नीट रूटीन चालू असलेल्या घराकडे अचानक माणसे धावत येतात आणि त्या घरातल्या कर्त्या पुरुषाची किंचाळी ऐकू आल्याचे सांगतात, अशा घटनेने हे नाटक सुरू होते. गंभीर विषय, वास्तव आणि कल्पना यांचे अजब मिश्रण आणि अत्यंत हास्यस्फोटक हाताळणी, यांमुळे नुसते वाचनही धमाल व्हायचे, प्रयोगाचा तर प्रश्नच नाही. कै. अरुण पाटीलने जयसिंगपूरसारख्या लहान गावातून सादर केलेले हे नाटक अनागरी राज्यनाट्यस्पर्धेत राज्यात पहिले आले. त्यानंतर हे नाटक ' टेल्को कलासागर ' साठी अनिल खोपकरने प्रचंड नेपथ्यासह बसवले, तेही प्रयोग उत्तम होत. त्यानंतर पीडीए नेही हे नाटक दिलीप वेंगुर्लेकरांच्या दिग्दर्शनासह सादर केले – त्यात स्वतः वेंगुर्लेकर प्रमुख भूमिकाही करत असत.

‘ किंचाळी – ‘ ला जोडूनच त्याच ऊर्जेतून लगेच ‘ दिनकर पुरोहितचा खून ‘ हे नाटक लिहिले. आपण जे आहोत त्यापेक्षा वेगळे काहीतरी होण्याची प्रत्येकाची इच्छा, हा विषय. हे प्रकाश बुद्धिसागर या माझ्या मित्राने प्रथम राज्यनाट्यस्पर्धेत सादर केले आणि नंतर ‘ पोत्यातून गोत्यात ‘ या नावाने व्यावसायिक रंगभूमीवर. हेही वरवर विनोदी धाटणीचेच नाटक होते. नाटकभर खूप मजा येई. पण आपल्या प्रेक्षकांना शेवटी वास्तवदर्शी निराकरणच हवे असते. कल्पना / फँटसी म्हणून काही स्वीकारणे जमत नाही, या कारणाने त्याचे फार प्रयोग झाले नाहीत.

‘ नातं ‘ हा वास्तव हाताळणीतून ॲब्सर्डिटीकडे जाणारा एक वेगळा दीर्घांक आहे. आहे अशा दीर्घांकरूपात याचे बरेच प्रयोग योगेश सोमण आणि सोनाली कुलकर्णी यांनी केले. पिनड्रॉप सायलेन्स म्हणजे काय ते याच्या प्रत्येक प्रयोगात दिसत असे. आता याच्यापुढे काय घडू शकणार, अशा ठिकाणी सुरू होणारा हा दीर्घांक सुमारे ८० मिनिटे प्रेक्षकांना बसल्या जागी खिळवून ठेवत असे. असेही विषय, त्यांतले उत्खनन, संवाद हे मराठी प्रेक्षक स्वीकारतात या अनुभवाने माझी संवादलेखनातली भीतीच निघून गेली, असे म्हणायला हरकत नाही.

या निर्भयपणातूनच, पुढे ‘ नाणेफेक ‘ लिहिले गेले. यातले संवाद त्यांतल्या गुंतागुंतीसाठी मुद्दाम लक्षात घ्यावेत असे आहेत. हे नाटक ‘ आविष्कार ‘ साठी पं. सत्यदेव दुबे यांनी बसवले. हे बसवताना त्यांनीही मुख्य मेहनत कलाकारांकडून संवादफेक नीट होण्यावरच घेतली. संवाद हाच या नाटकाचा प्राण असताना आदल्या दिवशी रंगीत तालमीत नटनट्या संवाद विसरत होते, त्यामुळे मी फारच नाराज झालो होतो. पण प्रयोग मात्र बिनचूक झाला ! हे नाटक वाचल्यावर दुबेजींनी एकदोन प्रश्न विचारले होते, ते लक्षात घेऊन नाटकाचा काही भाग मी पुनर्लेखन करून त्यांना पाठवला. ते फारच खुश झाले. समजून चटकन पूर्णता आणण्याच्या माझ्याकडून घडलेल्या या कृतीचा त्यांनी पुढे अनेकदा उल्लेख केला. त्यानंतर हे नाटक पीडीए या पुण्यातल्या प्रतिस्ठित संस्थेने मंचित केले होते – त्याचे दिग्दर्शन मोहित टाकळकरने केले होते.

माझ्या नाट्यलेखनातली दिग्दर्शकांना आवडणारी एक विशेष बाब म्हणजे मी कंस आणि सूचना या अगदी कमी, गरजेपुरत्याच देतो. संवाद अर्थपूर्ण असतील तर सादरीकरणाचे नाट्यतंत्र सारखे लेखकाने देत बसण्याची आवश्यकता नाही, असे मी गृहीत धरतो. लिहिताना आशयाकडे -- त्याच्या सूक्ष्मातिसूक्ष्म अंगांकडे पूर्ण लक्ष देणे हेच मला महत्त्वाचे वाटत असल्याने सारखे कंस लिहिण्याचा मला विक्षेप वाटतो.

पुण्यात आम्ही काही मित्रांनी जमून ‘ अवकाश कलामंच ‘ ही संस्था स्थापन केली. या संस्थेची पहिली निर्मिती होती माझे ‘ धागेदोरे ‘ हे नाटक. माणसाच्या जगण्यातल्या कृती या असंख्य प्रभावांनी युक्त तर असतातच पण इथे घडलेल्या कृतीचा इतरत्र कुठेही परिणाम घडू शकतो, हा आशय मांडणारे हे नाटक. आधी हे नाटक ‘ डाव्या डोळ्याखाली काळा तीळ ‘ या नावाने लिहिलेले होते. प्रसन्न कुलकर्णी यांनी ते कोल्हापुरात सादरही केले होते. पुण्यात आमच्या संस्थेमार्फत सादर करण्यापूर्वी अनेकांशी चर्चा करून त्याचे मी पुनर्लेखन केले. या नाटकाने मराठीला पहिला अँटिहीरो दिला असे मा. कृ. पारधी यांनी त्यांच्या परीक्षणात लिहिले होते.

आमच्या याच संस्थेने माझे ‘ समतोल ‘ हे नाटकही सादर केले. दोन्ही नाटके विद्यासागर अध्यापक या त्या वेळच्या एका विद्यार्थ्याने दिग्दर्शित केली होती. बसवण्याच्या प्रक्रियेत, चर्चांत मीही सहभागी होत असे. या नाटकात दोन विवाहित

जोडपी असून दोन्ही स्त्रियांत काही घातक दोष आहेत, असे दोन्ही पतींना दिसते आहे. त्या दोघींच्या स्वभावांतले हे दोष गेले पाहिजेत, त्यांच्यांत सुधारणा झाली पाहिजे, अन्यथा नाश होऊ शकतो, अशा अवस्थेत दोघेही आहेत. त्या दोघांचे त्या दोघींना सुधारण्याचे प्रयत्न, हा या नाटकाचा विषय आहे. काही तणावाचे प्रसंग, काही विनोद असे कुठेही कसेही मिश्रण होत हे नाटक पुढे जाते. इकडे आमच्या संस्थेतर्फे होण्याच्या आगेमागेच रवींद्र लाख्यांनीही त्यांच्या ' मिती चार ' या संस्थेमार्फत ते मुंबईत सादर केले. दोन्ही प्रयोग चांगले होत. लाख्यांचे नेपथ्य फार कल्पक होते. त्यांचे मुंबईतले प्रयोग बरेच गाजले. अनेक पारितोषिकेही मिळाली.

' ढोलताशे ' हे माझे सर्वाधिक गाजलेले नाटक म्हणावे लागेल. ' आविष्कार ' सारखी मातबर संस्था आणि विजय केंकरे यांच्यासारखे निष्णात दिग्दर्शक आणि अरुण काकडे यांच्या अनुभवी नेतृत्वाखालची उत्तम टीम लाभल्यामुळे आणि गणेशोत्सव हा संवेदनशील विषय असल्यामुळेही हे नाटक अनेक प्रेक्षकांप्रमाणेच नाटक, चित्रपट, कला, राजकरण अशा अनेक क्षेत्रांतल्या व्यक्तींनीही आवर्जून पाहिले. जयंतराव साळगावकर आणि नरेंद्र दाभोलकर अशा भिन्न विचारांच्या लोकांनी या नाटकाला सहकार्य दिले. हे नाटक धर्मविरोधी म्हणता येत नाही पण सामान्यतः ज्याला धर्म म्हटले जाते त्या सगळ्याच्या विरोधी आहे. वेळोवेळी तुकाराम, ज्ञानेश्वर काय म्हणाले हे येत गेल्यामुळे, या उत्सवाचा आणि धर्माचा काहीही संबंध नाही, असे संवाद येऊनही, कुणाच्या भावना दुखावल्याची तक्रार आली नाही. धर्म, अध्यात्म हे आयुष्यभर माझे आस्थेचे विषय राहात आलेले आहेत. त्यामुळे हा विषय माझ्याकडून हाताळला जाणे भागच होते. या नाटकाला अनेक पारितोषिके मिळाली, याचे ८७ प्रयोग झाले आणि टीव्हीवरूनही याचे अनेकदा प्रक्षेपण झाले. नंतर, इप्टासह इतरही अनेक संस्थांनी या नाटकाचे सादरीकरण केले. अलिकडेच भद्रकाली या संस्थेतर्फे हे नाटक पुन्हा, आता व्यावसायिक रंगभूमीवर आले होते. विजय केंकऱ्यांचेच दिग्दर्शन आणि ललित प्रभाकरसह अनेक नामवंत कलाकारांचा अभिनय, ही याची खास वैशिष्ट्ये होती. हे नाटक कानडीत अनुवादित होऊन मोहित टाकळकरच्या दिग्दर्शनाखाली कर्नाटकातही त्याचे बरेच प्रयोग झाले आहेत.

' निर्मिती ' हा दीर्घांक राजकीय डावपेचांची फँटसी असा होता. इंदिरा गांधींचा पाडाव आणि त्यांचे पुनरुत्थान ही त्याची ढोबळ पार्श्वभूमी होती. लिंगबदलामुळे होणारे नेतृत्वातले शक्तीबदल, या अंगाने लिहिलेले ते नाटक होते. त्याचा आजवर फक्त एकच प्रयोग झाला आणि तोही चांगला झाला नाही, म्हणजे प्रयोग झालाच नाही, हेच खरे. माझे हे एकच नाटक चोरून दुसऱ्याने आपल्या नावावर करणे घडले होते ! विनायक पडवळच्या ते लक्षात आल्याने, त्या संबंधित व्यक्तीस त्याने प्रचंड भोसडले होते.

' सामसूम ' हे नाटक नीती आणि न्याय या दोन मूल्यांची टक्कर झाली तर काय, असा विषय हाताळते. मुळात मानवी जगण्यात अनेक मूल्ये असू शकतात का, की ती एकाच मूल्यात्मकतेची अनेकार्थता असते, हा नेहमीच मला महत्त्वाचा वाटणारा प्रश्न आहे. इकडचे वारली समजातले काही तपशील, काही बिहारच्या पूर्णिया जिल्ह्यातले तपशील असे एकत्र घेऊन तयार झालेला हा एक कल्पित प्लॉट होता. हे नाटक काही संस्थांनी सादर केले पण एखाददोन प्रयोग, असे. त्यानंतर महाराष्ट्रातल्या दोन नामवंत व्यावसायिक संस्थांकडून ते वेळोवेळी स्वीकारले गेले. ' भीती चांदण्याची ' आणि ' प्रतिकार ' या नावांनी जाहिरातीही येऊन गेल्या. पण काही ना काही कारणांनी ते घडले नाही. नंतर तिसऱ्या एका नामवंत संस्थेने इंटरेस्ट दाखवले, पण त्यांना ते दुष्टाचा पाडाव आणि सज्जनांचा विजय, असे करून हवे होते. म्हणजे स्किल माझे आणि आशय त्यांचा, असे. याला अर्थातच मी नकार दिला, कारण माझ्या लेखनप्रक्रियेत ते बसणारे नव्हते. अलिकडे, पीडीए या

पुण्यातल्या नामवंत संस्थेने हे नाटक रंगभूमीवर आणलेले असून त्याचे प्रयोग चालू आहेत. त्या नाटकाला माझे मित्रवर्य दिलीप वेंगुर्लेकर यांचे उत्तम दिग्दर्शन लाभलेले आहे.

पूर्वी ‘ नरदेह ‘ नामक एक नाटक मी लिहिले होते. पुन्हा वाचल्यावर मला त्यात लेखकच सारखा काहीतरी बोध द्यायचा प्रयत्न करतोय असे वाटायला लागले. त्यामुळे मग त्या पूर्ण नाटकाचे पुनर्लेखन केले आणि त्याचे नवीन नामकरण ‘ सध्या तरी शेवट गोड ‘ असे केले. परिस्थितीच्या दबावातून निर्माण होणारे प्रश्न आणि ते सोडवण्याच्या प्रयत्नांतून घडणारे भरकटणे आणि वाढणारी गुंतागुंत हा या नाटकाचा विषय होता. याचा एक अनौपचारिक प्रयोग महाराष्ट्रीय कलोपासकतर्फे धनंजय गोळे यांच्या दिग्दर्शनाखाली झाला. त्यानंतर विजय वांकरांच्या ‘ ऍक्टिव्ह थिएटर्स ‘ ने हे नाटक भालचंद्र पानसे यांच्या दिग्दर्शनाखाली सादर केले. त्यांनी त्याचे अनेक ठिकाणी एकूण पंचवीस प्रयोग केले. प्रयोग, माझ्या मते, उत्तम होत, पण माझ्या काही मित्रांच्या मते माझे नाटक सादर करण्याची ही आशयसंगत पद्धत नव्हे. त्यांच्या मते ही पारंपरिक भावनाट्यासारखी ट्रीटमेंट झाली. मला मात्र नाटकाच्या आशयावर अन्याय होतो आहे, असे काही वाटले नाही. या गोंधळावर मग मी काही उत्तर ठरवले नाही. अजूनही मला यावर ठामपणे काही म्हणता येईल असे वाटत नाही.

‘ जागचं हलायचं नाही ‘ या नावाने मुळात लिहिलेले आणि आता काही दुरुस्त्या करून ‘ गोळ्या काढलेलं पिस्तूल ‘ या नावाने फायनल केलेले हे नाटक. सुमारे ‘ ७० च्या आसपासच्या हिंदी पिक्चरची एक बनावट कथा असलेले पण खरे जगणे मांडणारे असे हे नाटक आहे. माझ्या मते हे चांगले लिहिलेले नाटक आहे. कुणी म्हणतात त्या वेळच्या पिक्चरस्टोरीशी आता नाळ जुळत नाही. मला हे कारण मुळीच पटत नाही. इतिहास, पुराण हे चालते, मग काळाचा कुठे प्रश्न येतो ? आशय प्रस्तुत असण्याचा खरा प्रश्न असतो. अलिकडेच झाले एकदाचे हे नाटक सादर. आमच्याच ‘ अवकाश कलामंच ‘ ने ते सादर केले. सुनील चौधरी यांचे चांगले दिग्दर्शन होते.

‘ जणू काही वास्तव ‘ हे एखाद्या लेखकाने त्याला दिसलेले पण निव्वळ वैचारिक नसलेले असे काही सत्य मांडण्याचे धाडस करणारे मराठीतले एकमेव नाटक असावे. ‘ आविष्कार ‘ साठी गिरीश पतके या दिग्दर्शकाने ते बसवले. संस्था आणि दिग्दर्शक या दोघांचेही ते धाडसच होते. इथल्या ‘ बांधिलकी ‘ च्या गदारोळात हे नाटक दडपले जाण्याचा धोका होताच. झालेही तसेच. कधी नव्हे ते या नाटकाच्या परीक्षणांवर प्रतिक्रिया देणारा लेख मी ‘ लोकसत्ते ‘ त लिहिला. ज्येष्ठ समीक्षक गंगाधर पाटील यांना ते नाटक आवडले असे त्यांनी सांगितले पण त्यांनी त्यावर कुठे लिहिले नाही. ही कारणे आणि त्या नाटकाचे नेपथ्य फारच बोजड बनवले गेले होते, त्यामुळे ते ने-आणीला अवघड झाले होते, हेही एक कारण, असे सगळे घडून काही प्रयोगांतच ते नाटक थांबले.

‘ बुद्धिबळ आणि झब्बू ‘ हे नाटक मराठी प्रयोगिक रंगभूमीवर खूपच गाजले. याला पारितोषिकेही खूप मिळाली आणि याचे प्रयोगही खूप झाले. ‘ ढोलताशे ‘ प्रमाणेच नाट्यचित्रपट कलावंत, समीक्षक या सर्वांनी हे नाटक आवर्जून पाहिले. प्रसाद वनारसे आणि अतुल कुलकर्णी यांच्या पुढाकाराखाली चालणाऱ्या ‘ रंगवर्धन ‘ या योजनेमुळे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी या नाटकाचे प्रयोग झाले. प्रत्येक ठिकाणी नाटक संपल्यावर प्रेक्षक आणि सादरकर्ते यांच्यांत नाटकावर चर्चा घडवून आणणे हे ‘ रंगवर्धन ‘ चे वैशिष्ट्य होते. स्त्री-पुरुष संबंधांतले चोरटे प्रवाह असा विषय असूनही चर्चा खूप चांगल्या होत. विशेष म्हणजे स्त्रियाही चर्चेत मोकळेपणाने सहभागी होत. गोव्यातल्या एका प्रयोगानंतर मात्र सगळे प्रेक्षक निघून गेल्यानंतर दोन स्त्रिया आम्हाला भेटून नाटक आवडल्याचे सांगून गेल्या. सगळ्यांसमोर त्यांना हे सांगता आले नव्हते. या

नाटकाची अनेकांनी सुपरलेटिव्ह शब्दांत स्तुती केली. विजय तेंडुलकर तर याला आंतरराष्ट्रीय दर्जाचे मराठी नाटक म्हणाले. गिरीश पतके या माझ्या मित्राने दिग्दर्शित केलेले हे माझे पहिले नाटक होते. त्यानंतर त्याने माझी आणखी दोन नाटके दिग्दर्शित केली. इतके सगळे घडण्याचे मुख्य श्रेय अर्थातच राजेंद्र बडे यांच्या ' वलय ' या संस्थेला जाते. त्या सर्व टीमने या नाटकासाठी खूप कष्ट घेतले. माझ्या नाट्यलेखन प्रक्रियेतला हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला यात शंकाच नाही. पुढे हे नाटक ' तुमचं आमचं सेम असतं ' या नावाने व्यावसायिक रंगभूमीवरही आले. दीपक दामले या आमच्या मित्राचे परिश्रम यामागे होते. त्याची डीव्हीडीही निघालेली आहे. ' चोरपोलीस ' या नावाने कुमार सोहनी यांच्या दिग्दर्शनाखाली याची फिल्मही केली होती, पण आता ती उपलब्ध नाही. त्यात नाटकातले सर्व मूळचे कलाकार होते.

' डावेदार ' हा दीर्घांक प्रथम ' आविष्कार ' तर्फे पुण्यातल्या सुदर्शन दीर्घांक स्पर्धेत गिरीश पतके यांच्या दिग्दर्शनाखाली सादर झाला. त्या स्पर्धेत त्याला लेखनासह अनेक पारितोषिके मिळाली. विचारसरणी आणि प्रत्यक्ष जगणे यांत दरी कशी पडते, हा याचा विषय होता. काहीजणांना वाटले की हे मुद्दाम साम्यवाद्यांविरुद्ध लिहिलेले नाटक आहे. राजन वेलणकरांनी हे नाटक पाहिलेले होते आणि त्यांना ते आवडले होते. त्यांच्या ' राजन क्रिएशन्स ' या संस्थेतर्फे ते नाटक व्यावसायिक रंगभूमीवर आणायचा धाडसी निर्णय त्यांनी घेतला. नाववाले अभिनेते म्हणून प्रदीप वेलणकरांना घेतले. व्यावसायिक करायचे तर नाव बदलायला हवे, असे ठरले. ' झालं गेलं विसरून जाऊ ' हे नाव मुक्रर झाले. प्रयोग उत्तम होत होते पण नामांकने मिळूनही कुठेही विशेष असे पारितोषिक मिळाले नाही. शेवटी, नावच चुकले बहुतेक, झालं गेलं होऊन गेलंय तर आता काय बघायचंय, असे प्रेक्षकांना वाटले असावे, अशी आम्ही समजूत करून घेतली. नाट्यलेखन प्रक्रियेत असे अनेक प्रकारचे अनपेक्षित धक्केही बसू शकतात, या आधीच असलेल्या अनुभवात आणि ज्ञानात, पुन्हा थोडी भर पडली !

' इराक ' हे नाटक ' आविष्कार ' साठी चेतन दातार आणि इरावती कर्णिक यांनी बसवले. प्रयोग सादर होईपर्यंत मधेमधे बदल होत राहिले. त्यामुळे थोडीफार एकसंधता हरवली असावी. नंतर मी, ते माझ्या दृष्टीने फायनल केलेले, माझ्या वेबसाईटवर आहे. यातले बाकीचे संदर्भ वगळून फक्त आंतरराष्ट्रीय राजकारणातली पात्रे एवढाच माहोल घेऊनही एक सुधारित संहिता मी तयार केली. तीही वेबसाईटवर आहे. अलिकडच्या जागतिक राजकारणातली पात्रे असलेले, वास्तववादापासून थोडी वेगळी हाताळणी असलेले, असे मराठीतले हे एकमेव नाटक आहे. याबाबतच्या कुतूहलापोटीच विजय तेंडुलकर आवर्जून याचा प्रयोग पाहायला आले होते. हे ' अर्थ ' या पुरुषार्थावरचे नाटक होते. कुणी म्हणाले, गोंधळ झाला, कुणी म्हणाले, फार सोपे झाले. काय ज्या चर्चा, मारामाऱ्या असतील त्या आधी करून नाटकाची संहिता आधी पुरेशी फायनल झालेली असली पाहिजे, असे मला वाटले.

' समतोल ' नंतर रवींद्र लाख्यांनी माझे ' प्रेमच म्हणू याला हवं तर – ' हे नाटक त्यांच्या ' मिती चार ' या संस्थेमार्फत सादर केले. मूल होऊ द्यायचे नाही या अटीवर प्रेमविवाह झाल्यानंतर कालांतराने मूल हवेच असे नवऱ्याला वाटायला लागले तर – हा प्रश्न या नाटकात आहे. घरात निघत जाणाऱ्या अनेक दुरुस्त्या आणि या नात्यातल्या दुरुस्त्या, असे मिक्स होत सगळे चालत राहते. आता असे वाटणे ही प्रतारणा की निसर्ग की प्रामाणिकपणा याचा धांडोळा घेत हे नाटक पुढे जाते. या नाटकाला अनेक नामांकने मिळाली पण पारितोषिक काही मिळाले नाही. तरीही, या नाटकाला मिळालेले एक मोठे पारितोषिकच म्हणावे अशी गोष्ट म्हणजे याची एनएसडीच्या भारत रंगमहोत्सवासाठी झालेली निवड. तिथल्या चर्चेत आम्ही जे बोललो त्याने तिथले काही प्राध्यापक व इतर काहीजण प्रभावित झाले. नंतर हे नाटक ' रिनोव्हेशन ' या

नावाने हिंदीतही सादर झाले. ( भारंगम महोत्सवात आम्ही पाहिलेल्या काही नाटकांतली अतिरेकी प्रकाशयोजना पाहून, हे लोक नाट्यमाध्यमाचा विचका करताहेत, असे आम्हाला वाटले. )

अलिकडे लाख्यांनीच ' मिती चार ' तर्फेच माझे ' वस्तू ' हे नाटक ' मिती-चार ' या त्यांच्या संस्थेतर्फे सादर केले.. तथाकथित सांस्कृतिक क्षेत्राचा पंचनामा करणारे हे नाटक आहे. काळाचा महिमा म्हणून, योग्य माणसे न मिळणे, आलेली सोडून जाणे, अशा प्रकारच्या अडचणी त्यांनाही आहेतच. तरीही, आपापले काम करत राहणारीही माणसे असतात, यावर त्यांचे काम चालू आहे. एका अगदी वेगळ्या नाटकाचा हा प्रयोग लाख्यांनी फारच छान बसवला होता.

' घोकंपट्टी ' हे नाटक अलिकडेच, पुण्यातल्या पीडीए या संस्थेतर्फे ' जिंदगी ख्वाब है ' या नावाने आलेले असून त्याच नावाने त्याचे हिंदीतही प्रयोग सुरू झालेले आहेत. जगण्यातल्या आपापल्या प्रतिमेचे सातत्य वागवत राहणे, हा विषय नाट्यमय पद्धतीने इथे आला आहे. दोन्ही प्रयोगांना अजित सातभाई यांचे दिग्दर्शन आहे.

' मन ' या नाटकाचा, ' मनाचे शोक ' या नावाने, लाख्यांच्या दिग्दर्शनाखाली ' मिती-चार ' ने एकच प्रयोग केला. आणि आनंद म्हणजे, ' ट्रायल ' आता विजय केंकरे यांच्या अजेंड्यावर आहे.

माझ्या दृष्टीने कोणत्याही कलेची व्याख्या – 'माया ' या ऐवजी ' कला ' हा शब्द घालून रामदसांच्या भाषेत सांगता येते –

> माया योगियांची माउली
> जेथील तेथे नेऊनि घाली
> कृपाळूपणे नाथिली
> आपण होय ।।

म्हणूनच माझ्या दृष्टीने कलाकृती ही शेवटी महत्त्वाची नसून त्यातले समग्रावधान हेच महत्त्वाचे असल्याने लेखक, अनुभव, कलाकृती हे काहीच महत्त्वाचे राहात नाही. यामुळेच, लेखकाची वा कलावंताची प्रसिद्धी वा प्रतिष्ठा कलेत महत्त्वाची राहू शकत नाही, असे मला वाटते.

हे विवेचन पाहता, साहजिकच इथे आध्यात्मिकतेचा विषय येणे भाग आहे. ' आध्यात्मिकता ' हा एक बदनाम झालेला शब्द आहे. अंधश्रद्धा, पूजाअर्चा, अभिषेक, कर्मकांड, तीर्थयात्रा आणि उत्सव म्हणजे अध्यात्म आणि या सगळ्यांतला ढोंगीपणा, लूट,अत्याचार आणि फसवणूक म्हणजे सुपर-अध्यात्म असे होऊन बसलेले आहे. चांगली कला आध्यात्मिक असते, असे मला निःशंकपणे दिसते तेव्हा तो शब्द मी वरील अर्थाने वापरत नाही.

आध्यात्मिकता

सुशिक्षित – अशिक्षित, श्रद्धावान - बुद्धिप्रामाण्यवादी, कम्युनिस्ट – मूलतत्त्ववादी, आस्तिक – नास्तिक, हिंसावादी – अहिंसावादी वगैरे सर्व तऱ्हांचे लोक हे मुळात अलगतावादी असतात. स्वतःला आयसोलेट करणे हा मानवजातीत शंभर

टक्के पसरलेला विध्वंसक रोग दिसतो. ‘ प्रेमाने, बंधुभावाने राहू ‘ अशी वाक्ये वेडपट ठरतात, ते त्यामुळेच. हे तर अध्यात्माशिवाय, बुद्धीनेही समजायला अडचण नसते. इथे एखाद्याला असा प्रश्न पडू शकतो की माणसाला अशा अलगतेशिवाय – आयसोलेशनशिवाय – जगणे शक्य आहे का ? – हा झाला आध्यात्मिक प्रश्न. कारण याला तथाकथित बौद्धिक, सुभाषितांची अशी उत्तरे चालत नाहीत. हा प्रश्न विचारायलाही बंदी करणारे, याची टर उडवणारे लोक अलगता, हिंसा, नाश हे सर्व गृहीत धरणारे असे निराशावादी, बेजबाबदार लोक असतात. प्रत्येक संबंध संघर्षमय का, सगळीकडे फूट का पडते, माणसाचे मन विदीर्ण का, सगळीकडे बेफिकिरी, छळ, क्रूरपणा, स्वार्थ, डावपेच, दडपशाही यांचे थैमान का चालू आहे, माणसाच्या बुद्धीचा या प्रश्नांवर उपयोग काय – असे प्रश्न पडणे म्हणजे अध्यात्माच्या क्षेत्रात प्रवेश करणे. अध्यात्म हे वेड्या, पळपुट्या लोकांचे क्षेत्र आहे असे समजणारे तथाकथित बुद्धिवादी लोकच खरे तर हे सगळे महत्त्वाचे प्रश्न टाळत असतात आणि आदर्शवादाच्या किंवा निराशावादाच्या पळवाटा शोधत असतात. बुद्धी, कल्पना, स्वप्न हे सगळे बाराच्या भावात जात असताना काहीच प्रश्न न पडणाऱ्या लोकांना एकूणात ' मृत ' का म्हणू नये ?

अपमान, फसवणूक, अन्याय, मनाविरुद्ध घडणे, अपयश येणे अशा असंख्य जखमा मनात वागवतच जगायला पाहिजे का -- हा प्रश्न समजा आध्यात्मिक आहे, म्हणून विचारायचाच नाही ! फुकट मरायला कुणालाच कुणाची बंदी नाही ! पिढ्यांचे हिशोब आणि अभिमान इथे कुचकामी ठरतात. अशा हजारो पिढ्या आल्या आणि गेल्या !

तुकाराम म्हणतो तसे ' एकविध मन ' ( एकात्म मन -- integrated mind ) म्हणजे अध्यात्म आणि विदीर्ण मन म्हणजे अध्यात्माचा अभाव. थोडक्यात. अध्यात्म नको म्हणजे सवयीच्या विदीर्णतेच्या मार्गानेच जाऊ आणि याशिवाय दुसरे काही शक्य नाही, हे गृहीत धरू.

सदगुण, दुर्गुण, आत्मरती, संयम -- हे सगळे मानवी विदीर्णतेच्या ढोंगी क्षेत्रातले शब्द आहेत. विदीर्ण मनाला अध्यात्माची टिंगल करावीच लागते, त्याशिवाय त्याचा आळस समर्थनीय ठरत नाही. अध्यात्म म्हणजे धंदेवाईक मराठी नाटकांतून मांडली जाणारी नैतिक चौकट नव्हे. अध्यात्म म्हणजे काहीतरी सपक, बुळबुळीत आणि निर्जीव काहीतरी असते, असे स्वतःला पटवत राहिले म्हणजे आपणच खरे या जीवनसंग्रामातले शूरवीर असे इतरांना दाखवताही येते. एकाच मानसिक पॅटर्नचे रटाळ, कंटाळवाणे आणि सदोदित वैतागलेले जगणे हे खरे तर अध्यात्माच्या अभावातले जगणे असते. काळज्या, भीती आणि हिंसा यांनी युक्त जगणे हे कोणती अस्मिता बाळगण्याजोगे आणि गौरवास्पद असते ?

जी गोष्ट मानवी मनाची पूर्ण रचनाच बदलणारी असेल, त्याची कार्यपद्धतीच बदलणारी असेल तीबद्दल त्याच जुन्या व्याख्येच्या भाषेत बोला असे म्हणण्यात काही अर्थ नाही. अमर्याद भानाची मर्यादित व्याख्या हे तथाकथित बुद्धिवादी मनच मागते ! बुद्धी हे आपल्या या एकूण विश्वातले सर्वस्व आहे, हे बुद्धीच गृहीत धरू इच्छिते !

विज्ञान, गणित, तंत्रज्ञान अशा बाबतींतला बुद्धीचा उपयोग निर्विवाद आहे. तो प्रश्नच नाही. मानवी संबंधांत बुद्धी जी वाट लावते, तो आहे प्रश्न. फूट, अविश्वास, संघर्ष, हिंसा यांचा गोंधळ आणि सर्व उतारे, आदर्श, मार्ग यांचे सततचे अपयश हीच आहे बुद्धीची या क्षेत्रातली कामगिरी. ही घाण, दुःख, पीडा बघून, या क्षेत्रातला बुद्धीचा वापर नुसता संशयास्पदच नव्हे तर घृणास्पद आहे, यात दुमत होण्याचे कारण नाही. समजा एका जोडप्यात घटस्फोटाची वेळ आलेली आहे, पत्नीला तिच्या पतीबरोबर राहणे शक्यच नाही. घटस्फोटाचा निर्णय घटस्फोट व्हायच्या आधीच घ्यावा लागणार, हे तर स्पष्टच आहे. या वेळी जर पती म्हणाला की मीच आहे तुझा आधार, नंतर तू काय करणार, नंतरही प्रत्येक गोष्टीला तू माझी मंजुरी घ्यायला हवीस, तर पत्नी म्हणेल, यू आर रिजेक्टेड – गेट लॉस्ट नाऊ ! तसेच मानवी संबंधांच्या क्षेत्रातल्या बुद्धीचे आहे. ती रिजेक्टच केली पाहिजे अशी अवस्था आहे. या क्षेत्रात कवडीची लायकी नसलेल्या, उलट वाताहात करणाऱ्या, दुःख, छळ, भीती, पीडा यांची पैदास करणाऱ्या बुद्धीकडून, तिला नाकारल्यावरही, तिची मान्यता घेण्याचे कलम कसे काय समर्थनीय ठरते ? अध्यात्माने असल्या भंगार बुद्धीच्या परीक्षेत पास व्हायची गरज काय ? नाकारल्या गेलेल्या गोष्टीला

पुन्हा देव्हारा ? असली अंधश्रद्धा बुद्धीच्या निकषांत तरी बसते का ? मानवी संबंधांच्या क्षेत्रातल्या बुद्धीला लाथ घालून नाकारणे ही अध्यात्माची पहिली पायरी आहे. तसे करणे हे बुद्धीला पटवण्याची काळजी, हे निव्वळ वेडेपणातच जमा होईल. नाकारलेल्या गोष्टीच्या टेस्टला नंतरचेही सगळे उतरत गेले पाहिजे असे म्हणणे म्हणजे नुसते आहे तसे तडफडत मरा असे म्हणणे तर आहेच पण कदापीही या नरकाच्या बाहेरची शक्यताही कुणी शोधता कामा नये, अशी हुकुमशाही आज्ञाही आहे. असल्या आज्ञा न जुमानणारे निघतच राहतात !

विवेकवाद हा बुद्धीचाच भाग असल्याचा पेच यात मला दिसतो. असो. अध्यात्म म्हणजे ' एकविध मन ' हे तुकारामाच्या भाषेतले वर आधीच सांगितलेले इथे पुन्हा एकदा पाहण्याची आवश्यकता आहे.

पिरांदेल्लो, आयनेस्को, बेकेट हे नाटककार अशा प्रकारचे अध्यात्मिक लेखक आहेत असे मला वाटते. मराठीत चिं. त्र्यं. खानोलकर यांच्याकडे या बाबतीत निर्देश करता येईल.

वरील सर्व विवेचन करायचा हेतू हा की नेहमी विचारल्या जाणाऱ्या खालील सर्व  प्रश्नांना –

१. लेखक म्हणून तुम्ही ‘ भूमिका ‘ असण्याचे महत्त्व मानता का ?

२. सामाजिक, राजकीय, आर्थिक परिवर्तनासाठी तुम्ही लिहिता का ?

३. ‘ सामाजिक बांधिलकी ‘  हे साहित्य-मूल्य मानता का ?

४. ‘ विवेक ‘ हेच अंतिम मानवी मूल्य आहे असे तुम्हाला वाटते का ?

५. बुद्धिप्रामाण्यवाद हेच श्रेयस आहे हे तुम्हाला पटते का ?

६. विश्लेषणात्मक, एकरेषीय समज हीच फक्त शक्य आणि आदर्श, असे तुम्हाला वाटते का ?

-- माझे ‘ नाही ‘ हे एकच उत्तर आहे,

माझ्या नाटकातले अनुभव, पात्रे, जे काही घडते ते वा संवाद, स्वतंत्रपणे महत्त्वाचे नसतातच. त्या सर्वांतून व्यक्त होणारे एकूण भानच महत्त्वाचे आणि सर्वांच्या आयुष्यात प्रस्तुत असणारे असे असते. नाटक लिहिण्यापूर्वी माझी पूर्वतयारी अशी काही नसते.  ते कशाबद्दल आहे हे साधारण माहीत असते. बाकी सगळे ओघात, ताजेपणाने येत जाते. नाट्यलेखनाची माझी अट एकच असते – ते लिहिताना मला इंटरेस्टिंग वाटत राहिले पाहिजे. लिहिताना मलाच सुचलेल्या माझ्याच काही विनोदांना मी खळखळून हसून दिलखुलास दादही देत असतो !

इथे नमून्यादाखल जाताजाता दिसतील तसे ( at random ) घेतलेले एकांकिका आणि नाटकांतले काही संवाद देणे हे संवादांची व विषय हाताळणीची कल्पना येण्यासाठी उपयुक्त ठरेल असे वाटते --

एकांकिका

यंत्रात डोकं ठेवलं की एकेका वेळी एकेका विषयाचा प्रगाढ पंडित करता येईल प्रत्येकाला. सगळी मानवजात प्रचंड ज्ञानी होऊन जाईल. मानवाचं अस्तित्व प्रचंड होईल. सबंध जग महाप्रचंड होऊन जाईल. ( अस्तित्व )

कारण, कुठल्याही गोष्टीची सुरुवात वा शेवट यांच्या अर्थापेक्षा मधल्या भागाला काही अर्थ आहे काय, हे पाहणं खरं महत्त्वाचं आहे. ( बस )

आपण डावे असल्यामुळं या विषयावर बोलायची तरी हिंमत आहे आपल्यात ! पण एक लक्षात येतंय – वैचारिक पद्धतीनं फाटे खूप फुटतात आणि सगळ्यांची एक समजूत असं छान, स्मूथ काही होऊ शकत नाही ! ( डावे )

असंच्या असं तर हे टिकणार नाही म्हणा – बदल होईलच – ( दंगल )

म्हणजे च्यायला जगण्याच्या पद्धती दोनच दिसतात – एक म्हणजे प्रश्न पडू देत जगणं आणि दुसरी म्हणजे प्रश्न दडपत जगणं ! – यांतली चांगली कुठली ? ... ( एकत्र )

चुकीचा परिणाम म्हणून निघणाऱ्या गोष्टी बरोबर नसतात. माणसातून जसा माणूसच जन्माला येतो, तशीच चुकीतून फक्त चूकच जन्माला येऊ शकते. ( इतिहास )

कल्पनेच्या राज्यातही मन तेच राहतं. का करतो मी कल्पना ? मला काय हवंय ? मी आहे असा राह्यला नकोय का मला ? मुळापासून बदलायचंय मला ? की प्रवाही व्हायचंय ? की नाहीसंच व्हायचंय ? मी एवढा घट्ट आणि स्थिर कसा ? असह्य ? जणू काही मला माझ्यातून सुटायचं आहे असं समजत नुसतंच सुख मिळवणं चाललंय का हे ? माझ्या खोटेपणाचं मूळ मला खरंच पाह्यचं आहे का ? की माझा खोटेपणा विसरण्यासाठी मला साध्या, सरळ गोष्टींना विकृत करायचंय ? फुटक्या भिंगातून दिसणाऱ्या दृश्यासारखं ? म्हणजे मी स्वतःच एक फुटकं भिंग ? ... की मी आहे असाच खरा आहे असं समजावं ? ... आणि तरीही मग – मला काय हवंय ? ( जोडपी )

एखाद्याला जर ल्याह्यचं नसेल तर त्याच्या व्यक्तिमत्वाच्या आतूनही आणि बाहेरूनही त्याला ते स्वातंत्र्य मिळण्याची मोकळीक आपल्या शासनानं करून द्यावी, एवढीच माझी विनंती आहे. ( खडक )

किंवा आपल्यात फूट पाडण्यासाठीही असेल ! किंवा नुसतीच जरा टेन्शन्स वाढवून आता तो आपल्या सगळ्यांचा हितकर्ता आहे असं दाखवून त्याचा होल्ड वाढवायचा असेल त्याला ! ( ऑफीस )

पण मग मी जगतो म्हणजे काय ? मला दुःख होतं म्हणजे काय होतं ? माझ्या भूतकाळामुळं कमकुवत झालेली ही मनःस्थिती घेऊनच मला उरलेलं आयुष्य जगावं लागणार का – असे प्रश्न मला पडत गेले – ( ओळख परेड )

लोक काहीही बोलतात. उदाहरणार्थ आपणही. ( रिलीफ )

वागताना मनात डावपेच नसणं आणि प्रामाणिकपणा असणं म्हणजे निष्ठा खरी असणं एवढाच अर्थ होतोय. पण अशी निष्ठासुद्धा बरोबर किंवा चूक असू शकेल. अशा निष्ठेचेसुद्धा चांगले किंवा वाईट परिणाम होऊ शकतील. ( समुदाय )

तसं म्हटलं तर आमचा प्रेमविवाह होता पण आता ही म्हणतेय की गाडी कधीच लेट येणं शक्य नाही. ( संसाराणूपेंडघार )

समस्या सोडवण्याच्या सरावात राहणं हा माणसाच्या मनाचा एक असाध्य रोग वाटतो मला. ( समस्या सोडवण्याचा सराव )

कुणी म्हणतंय, चरणवीरांनी सेनापतींवर ठरवून वार केला ... ( सत्य )

एखादवेळी होऊही शकतो अपघात, पण अपघातच होईल असं गृहीत धरून वागू नये असं मला वाटतं ... ( सेक्स )

... आता तर गोंधळ इतका वाढलाय की काहीच करू नये ... नुसतं शांत बसावं ... नुसतंच ... पण आत्मविश्वासच असा घट्ट ... की हे होत नाही ... विचार चालूच राहतो ... विचार चालूच राहतो. ( स्टालिन )

काय असेल ते थोडक्यात बोल ! चटकन निर्णय सांग ! झटकन काम पूर्ण कर ! याचा अर्थ असा नाही की तुझ्या अंतःस्फूर्तीला वाव दिलाय ! नो ! सगळं पायरीपायरीनंच हवंय, पण वेगात ! ( स्थळ – दिवाणखाना )

ते म्हणाले की म्हणजे कुठलंही उत्तर स्वीकारलं तरी तुम्ही सुखी होऊ शकाल, पण सुखी होण्याच्या अंदाजानं आणि हेतूनं उत्तर स्वीकारता कामा नये. ते म्हणाले की सगळी उत्तरं बिनमहत्त्वाची असतात. ( ट्रेलर )

मला तर वाटतं की कापड तिला आवडायचा प्रश्न नसेलच. मुद्दाम माझा इन्सल्ट करायचा हाच तिचा उद्देश असणार आहे. ( वेषांतर )

विचारांनी वाटोळं होतं. विचारांनी तोंड नाही देता येत आयुष्यातल्या एखाद्या महत्त्वाच्या प्रश्नाला. ( विरहवेदना )

नाटके

माझ्या एकूण लक्षात आलेलं एक सांगतो – जगणं म्हणजे मनाचं खरचटत व्यग्र असणं – मग विषय कुठलाही असो – अमुक घडावं, अमुक टिकावं, तमुक संपावं आणि ढमुक घडू नये – या चार प्रकारांत हे खरचटणं सतत चालू असतं – आणि पाचवं म्हणजे हे खरचटणं थांबेल की काय ही या चारही प्रकारांत कॉमन असणारी भीती ! बस ! जगण्याचा सारांश हा एवढाच ! ( बुद्धिबळ आणि झब्बू )

म्हणजे विचारांच्या घटना तुला सपक वाटतात – मला त्या भयंकर प्रक्षोभक वाटतात – ( समतोल )

आपण जे विचार बाळगले ते बाळगण्यात आपण प्रामाणिक होतो आणि आपण त्याहून वेगळं वागलो याचा अर्थ तो विचारांतला प्रामाणिकपणा खोटा होता असं नाही – हे सत्य अबाधित राहण्याची गरज आपल्याला सगळ्यांनाच आहे ! ( डावेदार )

या दोन घटनांना कारणीभूत झालीय प्रिया – असंच म्हणावं लागेल ... पण तिला ते माहीत नही ... तिला ते माहीत होताही कामा नये ... तिची काळजी घ्यावी लागेल ... ( धागेदोरे )

आणि मन सारखं असं उत्सवात गुंतवल्यामुळं आणि अशा प्रकारे मनाला उत्सवाचं प्रदूषण झाल्यामुळं आयुष्याची काय हानी होते हे कसं कळत नही ? मनं अतिरेकी व्हायचं कारण आहे हे एक ! ( ढोलताशे )

आता प्रश्न विचराण्याची माझी शक्ती संपुष्टात येतीय ! ( दिनकर पुरोहितचा खून )

आनंदराव तुम्ही किंचाळी फोडतो म्हणताय – पण कशासाठी ? ( एक गगनभेदी किंचाळी )

तुम्ही याल तेव्हा कायदा तुम्हाला स्वीकारतो आणि जाल तेव्हा तो तुम्हाला सोडून देतो. ( ट्रायल )

नुसतंच आपल्याला अमुक एक बरोबर वाटतंय म्हणून तसं वागायला आपण काही बेजबाबदार लोक नाही ! ( इराक )

हे लक्षात यायची पूर्व अट एकच आहे – स्वतःला क्षुद्र, सामान्य, वाईट समजून सुरुवात न करणं ! ( जणू काही वास्तव )

मी नाही म्हणालो तर त्याचा त्यांना राग येणार नाही असं मात्र नाही. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे नसलेल्या विचारस्वातंत्र्याचा त्यांना राग येणारच ! ( मन )

पहिल्यांदा पराभव स्वीकारायचा मार्ग हाताळून बघ, नाही तर दुसरा अतिरेकीपणाचा आहेच ! आधीच अतिरेकीपणा केलास तर मग पराभवाचा मार्ग गमावून बसशील. पराभवाचं अंगवळणी पडलं तर जमून जाईल. अतिरेकीपणा करावा लागणार नाही. ( नाणेफेक )

त्यापेक्षा तू मला पहिल्यांदा होतास तसा चालला असतास ... ( नातं )

मला करता येण्यासारखं काहीच नव्हतं. खचून जाणं आणि पराभवाचं प्रदर्शन करणं हा एकच डाव माझ्या हातात होता. ( निर्मिती )

लग्न झाल्यावर कालांतरानं एखाद्याला काही आजार होऊ शकतो – अपघात होऊ शकतो – एनिथिंग अनएक्स्पेक्टेड कॅन हॅपन – तसंच आहे हे – तुझी मनःस्थिती बदलणं – तुझ्या अपेक्षा, तुझे प्रश्न बदलणं – ( प्रेमच म्हणू याला हवं तर ... )

तुझ्या इच्छेप्रमाणे तुला हवं ते दुःख तुला मिळालंय – आता मनातल्या मनात ते आनंदानं साजरं करायला हरकत नाही – ( सध्या तरी शेवट गोड )

मुकुट, हे आमचं दुसरं आयुष्य आहे – तुम्ही आता निष्कारण पझेसिव्ह किंवा मत्सरी नका होऊ – ( घोकंपट्टी )

त्याच्याकडनं तसा काही धोकाही नाही किंवा तो फारसा काही विचारही करू शकणार नाही. पण त्या चांगल्या माणसाच्या डोक्यात आपल्याबद्दलही काही शंका राह्यला नको ना ! ( सामसूम )
कुठल्याही स्टोरीत अचानक, अनपेक्षित काही घडू शकतं. पण एखाद्या व्यक्तीनं स्वभाव बदलून घेणं धोकादायक आहे. हे असं चालत नाही. ठराविक स्वभावाच्या व्यक्ती असल्या म्हणजे स्टोरी पूर्ण होते. ( गोळ्या काढलेलं पिस्तूल )
तुमच्या वर्णनात थोडी अपूर्णता राहिलीय ! मनाच्या काही आवडत्या हालचाली वारंवार होत राहण्याची आवड ! – हे राहिलं होतं ! त्या मिळू शकतात कलेतून ! संगीतातून, कवितेतून, नाटकातून ! हे फार महत्त्वाचं आहे ! ( वस्तू )

शेवटी विचारार्थ ही काही अवतरणे ---

1. Pirandello's plays do not concern themselves with sosial reform, political evolution, or religious inquiry. __ William Murray.
2. Philosophy must not be divorced from literature and art. __ Sartre.
3. Good art is impersonal. __ T. S. Eliot.
4. I am not quite sure whether I am dreaming or remembering, whether I have lived my life or dreamed it. __ Ionesko.
5. Living is abnormal. __ Ionesko.
6. The source of my plays was a mood and not an ideology; an impulse, not a programme. __ Ionesko.
7. Becket gave expression to what he called " the issueless predicament of existence. "
8. We are impelled by our nature to seek understanding, but, reason, the only instrument we have with which to seek, it has proven a clumsy and a fragile tool. __ Becket.
9. I want neither to instruct nor to improve nor to keep people from getting bored. __ Becket.
१०. तर्का नाही ठाव / येथे रिघावया वाव // -- तुकाराम.
११. मजहून नष्ट आहे ऐसा कोण -- तुकाराम.
१२. मागें पुढें अवघें रितें / कळो येते अनुभवे // -- तुकाराम.
--- 000 ---
champrade@gmail.com -- वेबसाईट – www.champralekhan.com फोन – ९३७१००५७७३.

## लेखकाचा मृत्यू

रोले बार्थस नामक एका विचारवंताने १९६८ सालीच एक जागतिक महत्त्वाचा उद्योग करून ठेवला ! ' लेखकाचा मृत्यू ' झाल्याचे त्याने जाहीर केले ! कोणत्याही साहित्यकृतीच्या बाबतीत मुळात ती लेखकाने का, कशासाठी लिहिली, त्याच्या मनात काय होते, हे कदापि कळणे शक्य नाही, असे त्याचे म्हणणे होते. शिवाय शब्दांच्या आणि भाषेच्या अर्थांची अस्थिरता, हाही एक मुद्दा होता -- भाषेला अमुकच असे कायमचे स्थिर अर्थ नसणे, हाही एक सत्य अडथळा होता. आणि प्रत्येक वाचकाचे वेगवेगळे प्रभावित मन -- कंडिशनिंग -- यामुळेही सगळ्यांना एकच अर्थ पोचणे शक्यच नाही, असे त्याने मांडले. वाचक वाचतो तेव्हा ती ती साहित्यकृती त्या त्या वेळेपुरतीच निर्माण होते, असे त्याचे म्हणणे ! यामुळे, एकूणच साहित्यव्यवहार वाचककेंद्री झाला ! ( अजूनही लेखकांना कोणत्या आधारावर नोबेल पारितोषिक दिले जाते, कोण जाणे ! )

शिवाय समीक्षाप्रणालींची आणि पद्धतींची संख्याही वारेमाप वाढत होतीच -- घाट, तत्त्वज्ञान, चरित्रात्मक, ऐतिहासिक, मानसिक, सामाजिक, परिवर्तनवादी, साम्यवादी, स्त्रीवादी, मूलगुणवादी, समसंभोगवादी, अमुकतमुक वर्णवादी, वगैरे ! एकाच कलाकृतीची अशी असंख्य मूल्यमापने ! सारांश, लेखकही मेला आणि समीक्षकही मेला ! फक्त वाचक राहिला !

मला एक प्रश्न पडतो की जशी साहित्यकृतीची विरचना ( त्या साहित्यकृतीतल्या कोणत्या कल्पना, धारणा कशा निर्माण झाल्या, कुणाच्या सत्तेच्या काळात वा कुणाच्या वर्चस्वाखाली तयार झाल्या -- हे चिकित्सकपणे पाहात जाणे -- ) होऊ शकते तशीच वाचकाचीही का होऊ नये ? याचे कारण एक साहित्यकृती विरचनेला उपलब्ध असते तसा एकच वाचक घेऊन उपयोग काय ? पण, एक तार्किक शक्यता म्हणून तरी हे मान्य होऊ शकतेच ! म्हणजे वाचकही मरण पावेल !

सारांश, साहित्य-व्यवहार ही एक अस्तित्वातच नसलेली भ्रामक बाब आहे ! आणि आपण भांडत बसलोय ' कोणती साहित्यकृती श्रेष्ठ ' यावर !

--- ००० ---

नाटकाचा आशय आणि तंत्र

कलेत आपण नृत्य, शिल्प, चित्रकला, साहित्य असे विभाग पाहतो. लिखित संहितांत म्हणजे साहित्यात आपण कादंबरी, कथा, कविता, नाटक असे प्रकार पाहतो. त्यातही, साहित्यात पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक वा राजकीय असे विभाग पाहतो. इथे मला आणखी एक विभागणी सुचवायची आहे. ही विभागणी कडेकोट कप्प्यांसारखी बंदिस्त नसेलही, पण, ती अस्तित्वात असते. ही विभागणी आशयाच्या बाबतीत असते. आपण इथे नाटकाबद्दल बोलणार आहोत म्हणून त्या अंगाने बोलू. (१) ‘ डोक्याला ताप नको ‘ टाईप – प्रेक्षकांच्या मानसिक सवयींना विचलित न करणारा आशय – याला ‘ सपाट ‘ आशय म्हणू. (२) प्रेक्षकांच्या मानसिक सवयी विचलित करणारा आशय – याला ‘ सर्जक ‘ आशय म्हणू.

सामान्यतः व्यावसायिक वा आर्थिक नफ्याची अपेक्षा करणारे नाटक हे सपाट आशयाचे असावे लागते. तसे ते नसेल तर ते सपाट आशयाचे करून घ्यावे लागते. याउलट सर्जक नाटक हे आर्थिक फायद्यासाठी केले जात नाही. किंबहुना तोटा झाला तरी चालेल, असा हा प्रकार असतो. इथे एक मुद्दा लक्षात घ्यायला हवा की नाटक ही एकमेव अशी

सादरीकरण कला आहे की जी कमीत कमी खर्चात प्रेक्षकांसमोर आणता येते. ‘ एक नट आणि एक प्रेक्षक असला की नाटक सादर होऊ शकते ‘, ‘ नाटकाचा सिनेमा होऊ नये ‘, ‘ नाटकाच्या नेपथ्याला टाळी पडली तर नाटक फसले, असे समजा ‘ – अशा प्रकारची वाक्ये सर्जक नाटक विभागात बोलली जातात. याउलट व्यावसायिक नाटक गर्दीसाठीच असणारे, गर्दीला खुश करणे हाच हेतू असलेले आणि करमणूकप्रधान असावे लागते.

सपाट आशयाच्या नाटकात सादरीकरणातली जादूच महत्त्वाची असते. अभिनयासाठी स्टार्स असणे, नेपथ्यात विमानतळ वा स्वयंपाकघरातल्या सिंकच्या नळाला पाणी येणे, प्रकाशयोजनेच्या करामती, भरपूर पात्रे, वेषभूषा, प्रभावी संगीत – हे असे सर्व लागते. यासाठी गुंतवणूकही बरीच लागते. नफा मिळवणे हाच हेतू असल्याने, इथे ती गणिते खेळलीही जातात. हे सर्व सर्जक आशयाच्या नाटकात जमणे फारच अवघड असते. इथे एक तर अपेक्षित प्रेक्षकसंख्या कमी असते. मराठीत तर ‘ डोक्याला ताप नको ‘ हे एकूणच प्रेक्षकांचे आद्यतत्त्व असते. इथे नफा तर जाऊच द्या तोटा होण्याचीच तयारी ठेवावी लागते. सर्जक नाटकांसाठी ही एक मर्यादा असते, असेही म्हणता येत नाही. उलट तंत्राचा बडेजाव सर्जक नाटकाला मारकच ठरण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे, इथे सूचकतेचे आणि अर्थपूर्ण कल्पकतेचे महत्त्व वाढते. ‘ एक शून्य बाजीराव ‘ या नाटकात फिरता रंगमंच घेऊन नाटकातल्या नाटकाचे थियेटर दाखवण्यापेक्षा कल्पक नेपथ्याने अपेक्षित परिणाम साधले जातात. रवी लाख्यांनी माझे ‘ समतोल ‘ हे नाटक बसवले तेव्हा, मध्यमवर्गीय घराचे पूर्ण नेपथ्य न मांडता एका छोट्या पडद्यावर पंखा, फ्रिज, कपाट, टेबल-खुर्ची अशी चित्रे काढून घेतली होती ! तो पडदा हेच नेपथ्य होते ! अशी अनेक उदाहरणे सांगता येतील.

उत्तम, सखोल अभिव्यक्तीच्या गाण्यात तबलजीने वा इतर वादकांनी जास्त करामती करायच्या नसतात. पूरक म्हणून त्यांचे काम महत्वासाचे असले तरीही. काल फेसबुकवर ‘ नाटकातली भव्यता ‘ या विषयावर आपण एक चर्चा करत होतो. त्या संदर्भात, त्याबाबतचे माझे हे आकलन इथे थोडक्यात मांडले आहे.

( व्यावसायिक नाटकाला तरी अचानक कोटीकोटीची गुंतवणूक शक्य आहे का ? ‘ तुझा धंदा किती, तू बोलतोस किती ‘ असेच ते होणार ! आजाराने जर्जर झालेल्या माणसाला सांगावे की ‘ तू रोज दहा किलोमीटर पळायला सुरुवात कर – बघ कसा टुणटुणीत होशील ‘ – तसे हे होणार ! )

--- ००० ---

## अमूर्त कविता

नेटवर या विषयाचा धांडोळा घेतला. याचा परिपूर्ण अर्थ सांगता येत नाही, असे म्हटले गेलेले दिसले. शब्दांच्या ध्वनिरचनेसाठी निर्माण होणारी कविता, असाही एका ठिकाणी अर्थ दिसला, पण तो अर्थ खूपच उथळ वाटला. इंद्रियगम्य प्रतिमा नसणारी कविता म्हणजे, ' प्रेम ', ' स्वातंत्र्य ' अशा शब्दांची कविता म्हणजे अमूर्त कविता, असेही एका ठिकाणी म्हटलेले दिसले -- तेही फारसे पटले नाही. त्यामुळे, आपल्या आकलनातून आपणच मांडणी करावी, असे ठरवले. अमूर्त कविता ही वास्तवातल्या वस्तू, माणसे, दृश्ये वा अनुभव यांचे प्रतिनिधित्व करत नाही, हा यातला एक महत्त्वाचा मुद्दा दिसला. ही कविता ‘ ओळखीची ‘ नसते, असे म्हणता येईल.

आपले असणे आणि ज्ञान हे आपल्या भाषेने मर्यादित असते, हे एका अर्थाने बरोबरच आहे. माणूस हा फक्त त्याच्या प्रभावयुक्ततेतच असू वा जगू शकतो, असे गृहीत धरले तर ते बरोबर आहे. पण, हे मान्य करणे म्हणजे वर्चस्वाची इच्छा, हिंसा, अन्याय आणि विषमता मान्य करणे ठरते. हे गृहीतक नाकारून मानवी जगणे समजून घेण्याचा एक प्रवाहही सतत चालूच असतो, हे लक्षात घ्यायला हवे.

अस्पष्टपणे वा स्पष्टपणे जाणवलेला आशय व्यक्त करण्यासाठी शब्दार्थांचे वा प्रतिमांचे माध्यम वापरणे, याला मूर्त कवितेची प्रक्रिया असे म्हणता येईल. अमूर्त कवितेची प्रक्रिया उलट असते. ती शब्दार्थांच्या आणि प्रतिमांच्या अनिर्बंध साहचर्यातून आशयाची निर्मिती करते. यात अपघाताचे तत्त्व, संज्ञाप्रवाह आणि कल्पनाशक्ती यांचा वापर अधिक महत्त्वाचा ठरतो. यात वास्तवाची सवयीची ‘ शिस्त ‘ हमखास दुर्लक्षिलेली असते. कोणत्याही बौद्धिक संगतीचा मार्ग इथे त्यागलेला असतो. इथे एक मुद्दा लक्षात घ्यायला हवा की बुद्धी ही आधी काही असण्यातून म्हणजे भूतकाळावर आधारितच काम करते – त्याचप्रमाणे, मानवी कल्पनाशक्तीही पूर्वज्ञानावर आधारितच काम करते. हे जग कधीतरी निर्माण झाले असेल तर ते
‘ काहीच नसण्यातून ‘ कल्पिलेले आहे, असे म्हणावे लागते आणि मानवी बुद्धीच्या वा कल्पनेच्याही दृष्टीने तो कायमचा चमत्कारच समजावा लागणार.

मग, अमूर्त कवितेत शब्दार्थांच्या आणि प्रतिमांच्या साहचर्यातून कल्पनेच्या मदतीने घडणारा आशय कसा असतो ? इथे दोन उत्तरे संभवतात. एक म्हणजे, तो आशय ज्ञातातलाच असतो पण तो खूपच अनपेक्षित अशा नावीन्यपूर्णतेने समोर येतो. आणि दुसरे म्हणजे तो आशय भाषेच्या मर्यादा ओलांडणाऱ्या अज्ञाताला भिडणारा वा स्पर्श करणारा असतो. यात एक मान्यच करावे लागते की अभिव्यक्तीच्या अनंत, नावीन्यपूर्ण शक्यतांचा प्रदेश इथे खुला होतो.( अमूर्ततेचे तत्त्व हे अतिवास्तववादी कविता, दादावादी कविता, व्यस्त कविता, न-कविता अशा अनेक काव्यप्रकारांत अस्तित्वात असते, हे इथे लक्षात घ्यावे. )

नेहमीच्या अभिव्यक्तिप्रक्रियेतही सर्जकतेच्या असंख्य शक्यता असतातच, तरीही, या वेगळ्या सर्जक प्रक्रियेमुळे निर्मितीच्या शक्यतांना एक वेगळा ताजेपणा, नावीन्य आणि भरपूरपणा प्राप्त होऊ शकतो.

--- ००० ---

नवीन कवींसाठी --

१. पद्यता वा गेयता ही आवडीने सहज येत असेल तर ठीक, अन्यथा, त्याची काळजी करू नये.

२. एखादी कल्पना सुचल्यावर तीच कल्पना पुन्हा पुन्हा राबवणारी वा त्या कल्पनेला धरून मालगाडीसारखी यादीची कडवी नसावीत.

३. जे अनेकांना जाणवते वा अनेकदा व्यक्तही झालेले आहे तेच आपण पुन्हा लिहिणार असू तर त्यात कुठेतरी एका ओळीत तरी आपली काही खासियत असायला हवी.

४.एकूण कविता ' हटके ' लिहिली जात असेल तर उत्तमच.

५. कविता लिहिताना कोण काय म्हणेल ( उदा० एवढी छान बायको असून प्रेमकविता लिहितोय ! ) याची चिंता करू नये.

६. आशयाचे नावीन्य हे, जगणे समजून घेण्याच्या आपल्या चिंतन-प्रक्रियेतून येते -- ते असेल तर कशीही येऊ दे कविता -- मग ती न-कविता का असे ना.

७.मराठीत नव्याचे वा काही वेगळे असण्याचे स्वागत वेळेत होत नाही -- त्याबाबत बेफिकीर असावे -- अन्यथा चांगली कविता अशक्यच होईल.

८. मराठीतल्या वा इतर कोणत्याही, जमेल त्या भाषेतल्या कविता भरपूर वाचाव्यात.

९. जगण्यातल्या प्रश्नांना सामोरे जावे -- त्यांपासून पळू नये.

१०. कविता म्हणजे फक्त व्यक्तिगत अनुभवाची प्रतिक्रिया-अभिव्यक्ती नसते -- हे समजून घ्यावे.

११. वाचकांच्या, समीक्षकांच्या वा पारितोषिके देणाऱ्यांच्या धारणांना बळी पडून कविता लिहू नये.

--- ००० ---

साहित्यनिर्मिती कोणासाठी ?

सर्व कलांबद्दल बोलावे असा अनुभव वा ठसेही ( इंप्रेशन्स ) नाहीत, त्यामुळे फक्त साहित्याबद्दल बोलतोय. त्यातही, हा अमुक ठिकाणी असे म्हणाला, तो तमुक ठिकाणी तसे म्हणाला, अशा नोंदी मी ठेवत नसल्याने, सध्या हवेत अस्तित्वात असलेले – जाणवणारे प्रश्न, या स्वरूपात बोलत आहे. साहित्यनिर्मिती म्हणजे ललित साहित्यनिर्मिती एवढ्या मर्यादेतच बोलत आहे. कविता, कथा, कादंबरी, नाटक – हे साहित्य.

आपल्या वाचकांची करमणूक करावी, त्यातून प्रसिद्धी, पैसा व इतर आनुषंगिक फायदे मिळवावेत आणि आपली साहित्य-कारकीर्द सुखाची करावी, हे ज्यांचे ठरलेले असते त्यांना ‘ कोणासाठी ‘ हा विशेष प्रश्न नसतो. आपला नेमवर्ग ( टार्गेट रीडर/ ऑडियन्स ) आणि माध्यम ठरवले की त्यांचे काम विकासमार्गावर जात राहू शकते. मग कुणाला पडतो हा प्रश्न ? तर, एक म्हणजे ज्यांना वैचारिक वा भावनिक अशा काही आदर्शांचे साचे संक्रमित करायचे आहेत त्यांना आणि असा कोणताही साचा न ठरवता, जगणे समजून घेण्याची खुली प्रक्रियाच ज्यांना व्यक्त करायची आहे, त्यांना. आदर्शवाल्यांचा हा प्रश्न द्विविध असतो – एक तर आदर्श सारखे धुळीला मिळत असलेले दिसत असतात आणि दुसरे म्हणजे, वेगाने बदलत्या वास्तवाचे आकलनच पुरेसे होऊ शकत नसते. विचार, भावना, अनुभव यांतले गोंधळ आणि तेच,

तसेच गोंधळ वाचकांतही असल्यामुळे नेमवाचक ठरवताच न येणे – या स्वरूपात हा प्रश्न असतो. जगण्याची आकलन-प्रक्रिया ‘ पाहात ‘ जावे, असे वाटणाऱ्यांना असे दिसते की यात कुणालाच स्वारस्य वा इंटरेस्ट नाहीय. अशा प्रकारे हे सगळेच ‘ सर्जक ‘ लेखक वाचकांविना आपण पोरके आहोत अशा भावनेत जगत / लिहीत राहतात. ( काहीजण लिहिणे बंदही करत असतील. )

मी लेखक म्हणून याकडे कसा पाहतो, ते सांगतो. मुळात मी कुणासाठीतरी लिहितो आहे, ही कल्पनाच मी स्वीकारत नाही. कोणत्याही गटातल्या कोणत्याही वाचकाला याचे कधीही निमंत्रण पोचू शकते, असे मी समजतो. सध्या हे कुणालाच नको आहे, असे दिसते, हेही स्वीकारतो. ( शिवाय, आपण अभिव्यक्तीच्या काही वेगळ्या मार्गांनी जाणे आणि ते सवयीचे नसल्याने ते हेटाळले वा फेटाळणे जाणे, या शक्यताही असतातच. ) मुख्य म्हणजे पूर्ण मानवजातीचा मेंदू एकच असून त्याचा मी एक भाग आहे, असे मी याकडे पाहतो. जरा लहान स्वरूपात, एकूण मराठी माणसाच्या मेंदूचा मी एक भाग आहे, असे. त्यामुळे, मी लिहिणे आणि कुणासाठीतरी लिहिणे, असे याचे स्वरूप राहात नाही. एकाच मेंदूत चालणाऱ्या अनेक क्रिया असतात – त्यांतली माझी एक असते. मी लिहितो ते कोणत्याही कारणासाठी ‘ उपयोगी ‘ नसल्याने त्याला प्रतिसाद कसा, कितपत मिळतो, या बाबतीत मी बराचसा शांत राहू शकतो. आजच्या काळाच्या संदर्भात याचा एक परिणाम असाही दिसू शकतो की मार्केटिंग आणि प्रमोशन हे उद्योग मी फारसे करत नाही.

पण, एकूणात, ‘ साहित्यनिर्मिती कोणासाठी ‘ हा प्रश्न अत्यंत तीव्रतेने हवेत असल्याचे जाणवते. यावर थोडीफार वैचारिक घुसळण व्हावी म्हणून ही पोस्ट देत आहे.

--- ००० ---

## शहाणीसुरती माणसे

एका चर्चेत सतीश तांबे, हेमंत कर्णिक आणि मी बोलत होतो. तिथे, ‘ काही शहाणीसुरती माणसे अमुक असे का करतात ‘ असा काही भाग आला. मी विचार केला की ती शहाणीसुरती माणसे कोण असतील ती असोत, आपण आपले काय असेल ते बोलून टाकावे. म्हणून ही पोस्ट.

कशाचाही माझा सखोल अभ्यास आहे असे मी म्हणू शकत नाही. तरीही, काही मते त्या त्या वेळी स्वीकारावी लागतातच. एक माझे ठरलेले असते – ज्या प्रकारच्या लोकांनी साहित्य आणि कला यांत कलावंताने वा साहित्यिकाने राजकीय भूमिकेतूनच त्याची अभिव्यक्ती केली पाहिजे असे म्हटले, त्या प्रकारच्या लोकांना नो पाठिंबा. कारण ते प्रचंड सांस्कृतिक नुकसान करत असतात. बाकीच्या पक्षांच्या लोकांना कलेतले फारसे काही कळतही नाही आणि तिथे वर्चस्व आणण्याचे त्यांचे फारसे प्रयत्नही दिसत नाहीत. तसे सगळे भारतातले कायदामान्य पक्ष वेळोवेळी माझा पाठिंबा म्हणजे मत मिळवू शकतात. उदाहरणार्थ, आणीबाणीचा प्रकार होऊनही मला त्या वेळी व त्या काळात इंदिरा गांधींचे पटत होते. त्या वेळी सर्व तत्त्वशील आणि शहाणीसुरती माणसे संघासह त्यांच्या विरोधात एकत्र होती, याकडे दुर्लक्षच करावे लागेल ! त्यामुळे, अनेकांच्या तज्ञ आकलनात मुळात मी शहाण्यासुरत्यांत जमा असण्याची शक्यताच नाही. एकमेकांना निष्कर्ष, निकाल, शिक्के यांत बसवणेच मला पटत नाही. माणसांना मते आणि आकलन बदलण्याचे स्वातंत्र्य असायला हवे. पण, काही शहाण्यासुरत्यांच्या ‘ निर्दोष ‘ आकलनाप्रमाणे समजा माझ्यावर काही शिक्के बसले तर त्याला मी काही करू शकत

नाही. सर्वच राजकारणी मानवी जगण्याचे नुकसानच करत असतात कारण ते सतत वर्चस्व आणि डावपेच यांचेच वातावरण धगधगते ठेवत असतात. त्याच भुक्कड वातावरणात ते असंख्य मने गुंतवून ठेवतात. काही शहाणेसुरते म्हटले जाणारे लोकही ते वातावरण भडकवत असतात ! त्यामुळे, शहाणेसुरते म्हणजे कोण, हे ठरवणेच अवघड दिसते ! एक बाजू घेऊन सतत त्या बाजूच्या वर्चस्वाच्या व्यग्रतेत राहणे म्हणजे शहाणेसुरतेपणा असे मी मानत नाही. जे तसे मानतात त्यांना मी काही सांगायलाही जात नाही. मी जेव्हा साहित्यातली ' भूमिका ' या विषयावर लेख लिहिला तेव्हा काहीजण म्हणाले की याचा बीजेपीला लाभ होऊ शकतो ! त्याला मी काय करणार ? राजकारणाच्या फडतूस ( आणि तत्त्वशून्यही ) भूमिकांसाठी मी माझे मूळ आकलन बदलू की काय ? या आधी मी ' मत ' या शीर्षकाची एक पोस्ट दिली होती – तीही इथे प्रस्तुत आहे. त्वरित संदर्भासाठी ती इथे देत आहे –

" मत

१. एकाच विचारसरणीशी एकनिष्ठ असणारे लोकही वेळोवेळी हव्या तशा तडजोडी करताना व मुरडी स्वीकारताना दिसतात.

२. ' अधिक वाईट ' शत्रू ठरवून, एकमेकांचे ' कमी वाईट ' शत्रू एकत्र येताना दिसतात.

३. एकाच विचारसरणीत कट्टरपणे रुतून बसलेले लोक माणसाचे सांस्कृतिक नुकसान करतात यात शंकाच नाही.

४. माणूस बदलण्याची शक्यता कोणत्याही राजकीय विचारात असू शकत नाही.

५. माणूस बदलण्याची शक्यता फक्त कला वा सांस्कृतिक कृतीतच असू शकते.

६. चांगल्या वातावरणासाठी समाजात स्वतःची मते बदलू शकणारी खुली माणसे असावीत.

७. मत ही एक उपरी गोष्ट आहे आणि असावी, असे माझे आकलन असल्याने मी एखाद्या विचारसरणीला वाहून घेत नाही.

मी एखादी बाजू घेऊन हिरीरीने इथे काही लिहीत नसल्यामुळे, माझ्या मतांचे काय, असा काहींना प्रश्न पडतो, असे कळल्याने हे लिहिले आहे. या बाबतीतले माझे आकलन अनेक लेखांतूनही मी यापूर्वी सविस्तर मांडलेले आहे. ते न आवडणारे काही लोक असणारच. पण, आपण सर्वजण, विचार व मत व आकलन यांच्या स्वातंत्र्याचे भोक्ते आहोत, हा भरोसा मी बाळगतो ! "

शहाणेसुरतेपणाची माझी कल्पना या पोस्टमध्ये आहे. पण, सर्वांनी माझ्या त्या कल्पनेत बसावे याचा आटापिटा मी करत नाही. माझे मित्र माझ्या मताचे वा आकलनाचे असले पाहिजेत असा माझा आग्रह नसतो. याचाच अर्थ, माझ्या सर्व मित्रांच्या ' शहाणीसुरती माणसे ' या विषयावरील विचारांत फिट बसणे मलाही जमत नाही. स्वातंत्र्याला महत्त्व देणाऱ्या मित्रांमध्ये अशा आग्रहाला मुळीच महत्त्व असू नये, असे माझे ' शहाणपण ' मला सांगते. याकडे डोळेझाक करता आली नाही तरी दुर्लक्ष करावे, अशी विनंती मी करू शकतो ! ' डोळेझाक ' म्हणजे मूकसंमती आणि ' दुर्लक्ष ' म्हणजे संमतीशिवाय लक्ष न देणे, असा हेमंत कर्णिकांचा अर्थ इथे गृहीत धरलेला आहे. माझे मत म्हणजे सोने आणि इतर सर्व मते म्हणजे माती किंवा लोकांनी माझ्या मताप्रमाणे कौल दिला तरच जनता शहाणीसुरती अन्यथा ती मूर्ख – अशी लोकशाहीविरोधी मते मी बाळगत नाही. संविधानाचे महत्त्व मानणाऱ्या कुणीच ती तशी बाळगू नयेत.

आता या मजकूरातल्या कुठल्यातरी विसंगती काढून ही चर्चा कृपया लांबवत बसू नये, कारण, विसंगतीशिवाय माणूस असूच शकत नाही. तसा माणूस म्हणजे एक तर अतिरेकी असू शकेल वा प्रेत !

त्यामुळे, ‘ बापमाणूस ‘ मालिकेतला संवाद – “ इषय संपला ! “

--- ००० ---

सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ – परिसंवाद – दिनांक – १५ फेब्रुवारी २०१९.

मराठी नाटकांमधील मिथकसृष्टी

## -- चं. प्र. देशपांडे.

मिथक म्हणजे एक गोष्ट. संस्कृतीत वा परंपरेत मुरलेली. लोकांच्या जगण्याचा भाग असलेली. धार्मिक कथा, पुराणे, लोककथा, दंतकथा अशा स्वरूपांत या कथा प्रत्येक पुढच्या पिढीकडे जात असतात. या कथा मुख्यतः जगण्याला, निसर्गाला अर्थ देण्याचा प्रयत्न करणाऱ्या असतात. निसर्गातल्या घटनांना वरुण, अग्नी, काम अशी देवांची रूपे देणाऱ्या असतात. जगण्यातल्या अमूर्त सत्यांना त्या मूर्त स्वरूप देणाऱ्या असतात. त्या खऱ्या वा खोट्या नसतात – त्या फक्त असतात. त्यांमध्ये कल्पनेचा खूप खेळ असतो. त्या गोष्टी त्या त्या काळातल्या काल्पनिका ( फँटसी ) असतात पण कालौघात त्यांची मिथके होतात. पिकासो म्हणतो की राजकारणी लोक वास्तविकतेचा उपयोग खोटे बोलण्यासाठी करतात तर कलावंत खोट्याचा म्हणजे काल्पनिकतेचा उपयोग सत्य सांगण्यासाठी करतात. मिथके म्हणजे माणसाला त्या त्या काळात सापडलेली अशी सत्ये असतात. ती खूप तपशीलबद्ध वा कालबद्ध नसतात. त्यांच्यांत असणारी जगणे समजून घेण्याची प्रक्रिया ही पूर्ण मानवी जगण्याचा आवाका घेणारी असते. त्यामुळे त्या कथा सर्व काळ सर्व माणसांच्या जगण्यात प्रस्तुत असतात. हे लक्षात घेता, मिथके फक्त जुन्या, कित्येक वर्षांपूर्वीच्याच काळात तयार झालेली असतात का, असा प्रश्न येतो. मिथकांचा एकूण व्यापक अर्थ लक्षात घेतला तर आजही थोड्याफार प्रमाणात, काळानुरूप वेगळ्या स्वरूपात मिथके तयार होत असतात, असे आपण म्हणू शकतो. उदाहरणार्थ काफ्काची ‘ ट्रायल ‘ ही कादंबरी आजची मिथक आहे, असे म्हणता येते. मिथकांमधले वास्तव गृहीत धरलेले – मानलेले असते – ते वास्तववादी असायची गरज नसते. ‘ ट्रायल ‘ वाचताना ‘ असे कुठे असते का ‘ असे आपण विचारत नाही. मिथकामध्ये मानणे, विश्वास ठेवणे, श्रद्धा या गोष्टींचे महत्त्व असते. मिथके ही माणसाची सांस्कृतिक स्वीकृती असते. तो जगण्याच्या मूल्याचा शोध असतो. मिथकाला एक साधे करमणुकीचे अंग असते, तसेच त्यात काही तत्त्वविचार वा धर्मविचारही असू शकतो. ते मानवी अनुभवाचे आणि चिंतनशीलतेचे स्फटिकीकरण असते. सामान्यतः मिथके ही इतिहास वा काल्पनिका यांहून वेगळी मानली जातात. परंतु, या बाबतीत जरा अधिक व्यापक दृष्टिकोण स्वीकारून आजच्या काळात निर्माण होणाऱ्या व्यापक आणि समावेशक आवाक्याच्या काल्पनिकांना मिथकांचाही दर्जा द्यायला हरकत नसावी, असे वाटते. या दृष्टीने मराठीत सादर झालेली, ‘ वेटिंग फॉर गोदो ‘, ‘ नाटककाराच्या शोधात सहा पात्रे ‘ ही नाटके मिथकेच समजावीत, असे मला वाटते.

नुसत्या पौराणिक कथा म्हणजे मिथके नव्हेत. मराठीत मिथकाधारित नाटके नाहीतच, असे म्हणावे लागते. पौराणिक कथेचा टेकू घेऊन एक भरजरी करमणूक संगीतमय पद्धतीने देणे, असे मराठीत बरेच घडलेले आहे. परंतु, मिथकाची खोली वा आवाका घेणे हा त्यांचा उद्देशच नव्हता. एकूणच मराठी नाट्यलेखन तत्त्वज्ञानाच्या जाणिवेतून फारसे झालेलेच नाही. मराठी नाटक हे प्रामुख्याने करमणूक, भावभावनांचे हेलकावे, देवादिकांचे वा इतिहासाचे उदात्तीकरण, इतिहासाच्या

अस्मितांत डुंबणे, अनुभवकथन वा सामाजिक समस्यांचे भान देणे, अशा उद्दिष्टांनीच झालेले आहे. तेंडुलकरांचे ‘ सखाराम बाइंडर ’ वा एलकुंचवारांचे ‘ वाडा चिरेबंदी ’ अशी क्वचित काही नाटके जगण्याचे समावेशक भान घेणारी असली तरी जाणीवपूर्वक तात्त्विक वा अध्यात्मिक प्रश्नांचा आवाका घ्यावा असे इथल्या नाटककारांना फारसे वाटलेले नाही. मिथकाधारित नाटके इथे खूपच कमी असण्याचे ते एक कारण असू शकते. मला आठवणारी मराठीत सादर झालेली महत्त्वाची मिथकाधारित नाटके म्हणजे गिरीश कार्नाडांच्या मूळ कानडी नाटकांचे अनुवाद, ‘ हयवदन ’ आणि ‘ नागमंडल ’ ही आहेत.

‘ हयवदन ’ हे नाटक ११ व्या शतकातल्या कथासरित्सागर मधल्या एका कथेवर आधारित आहे. हे नाटक मराठीत राज्य नाट्यस्पर्धेत प्रथम १९७२ साली सादर झाले. अनुवाद चिं. त्र्यं. खानोलकर यांचा होता. यातले एक पात्र घोड्याचे मुंडके आणि माणसाचा देह, असे असते. त्याला पूर्ण पुरुष व्हायचे असते. देह, मन आणि जगण्यातली पूर्णता, हे गहन विषय, हे नाटक हाताळते. पद्मिनी ही एक सुंदर स्त्री, तिचा कवी पती देवदत्त आणि त्याचा पैलवान मित्र कपिल यांची ही कथा आहे. कवी असणे हीही एक आकर्षक बाब आहे आणि बलवान बांधेसूद देह असणे हीही. पण या दोन्ही गोष्टी एका ठिकाणी उपलब्ध नाहीत. पद्मिनीला ती दोन्ही गुणवैशिष्ट्ये हवी आहेत ! ( असाच विषय आपण ‘ चारचौघी ’ या नाटकातही नंतर पाहिला होता. ) पूर्ण कथा सांगत बसत नाही, पण, घडते असे की देवीच्या देवळात देवदत्त आणि कपिल यांची मुंडकी बदलली जातात. आता प्रश्न असा येतो की पद्मिनीचा पती कोणता ? मस्तकच महत्त्वाचे ठरते. बलवान शरीरावर कवीचे मस्तक हा पती ठरतो. यात पुन्हा असे घडते की कालांतराने दोन्ही शरीरे त्यांच्यावरच्या मस्तकांनुरूप पूर्वीच्या आकारांप्रमाणेच आकार धारण करतात ! म्हणजे आपण ज्याला कंडिशनिंग किंवा प्रभावयुक्तता म्हणतो, तीच घडवते आपले आयुष्य. पण, एकूणात, पूर्णतेच्या शोधात तिघांचाही मृत्यू होतो – पूर्णता काही अस्तित्वात येत नाही ! प्रभावयुक्ततेच्या, मनाच्या वा देहाच्या स्तरावर पूर्णता नाही सापडू शकत – हे गहन सत्य ही कथा सांगते. मन, आवडीनिवडी, अनुभव हे सर्व नेहमी अपूर्णच असणार याचे भान हे नाटक देते.

याच नाटकाच्या संदर्भात, अलिकडेच झालेल्या एका संशोधनाचा उल्लेख करणे इंटरेस्टिंग ठरेल. ०१ डिसेंबर २०१९ च्या ईसकाळमध्ये प्रदीपकुमार माने यांचा ‘ आइन्स्टाईन जेव्हा तुमच्यात अवतरतो – ’ या नावाचा एक लेख आहे. कृत्रिम उपकरणांच्या साहाय्याने आपण आइन्स्टाईनचा चेहरा धारण करू शकतो आणि त्या आभासी वास्तवाशी समरूप होऊ शकतो – हे सांगून ते संशोधन पुढे असे म्हणते की या प्रक्रियेने आइन्स्टाईनची काही गुणवैशिष्ट्ये, आपली बौद्धिक वाढ करत, आपल्यात येऊ शकतात ! चेहऱ्यावरून प्रभावयुक्ततेत आणि त्यातून गुणवैशिष्ट्यांत असा हा प्रवास दिसतो ! यातून आणखीही एक बाब आपल्याला जाणवू शकते – आपल्या असण्याचे सत्य म्हणजे प्रभावयुक्तता – तीही बदलता येणारी ! म्हणजे आपण फक्त एक प्रभावांचा गठ्ठा ? ‘ हयवदन ’ हे नाटक अशा प्रकारचे अनेक प्रश्न आपल्या समोर आणते आणि आपल्याला चिंतनशील करते. मोठी, मौल्यवान कलाकृती ही ऐकून, पाहून वा वाचून संपत नाही. ती आपल्यांत आकलनाची प्रक्रिया अमर्यादपणे चालू ठेवते, ते असे.

गिरीश कार्नाडांचेच ‘ नागमंडल ’ हे नाटक पतिपत्नी या नात्यातल्या एकनिष्ठतेचा प्रश्न हाताळते. एक बाहेरख्याली पती आणि त्याची एकनिष्ठ पत्नी यांच्यांतल्या नात्यावर हे नाटक आहे. पती कसाही असला तरी त्याची मर्जी आपण मिळवली पाहिजे या विवंचनेतली पत्नी अशी यातली सुरुवातीची परिस्थिती आहे. शेजारची एक जादूटोणा करणारी म्हातारी तिला एक मार्ग सांगते. तिने दिलेली अभिमंत्रित पावडर दुधात मिसळून पतीला पाजायची की तो आपोआप तिच्याकडे आकर्षित

होऊन तिच्याशी प्रेमाने वागू लागेल, असे ती सांगते. ती तयार होते, पण ते दूध खराब झाल्याने ती ते टाकून देते, तर ते नेमके एका नागाच्या वारुळावर पडते. त्यातला नाग ते दूध पितो आणि परिणामतः तिच्यावर अनुरक्त होतो ! रात्री तिचा पती घरी नसताना तो नाग त्याच्या रूपात तिला भेटू लागतो. तिच्या लेखी, दिवसा मारहाण करणारा पती रात्री मनसोक्त प्रेमाने वागू लागतो ! यातून ती गर्भवती होणे, पती संतप्त होणे, पावित्र्य सिद्ध करण्यासाठी, पंचायतीने दिलेल्या शिक्षेप्रमाणे तिला नागाच्या वारुळात हात घालावा लागणे, वगैरे घडत जाते. शेवटी पती शहाणा होतो ! ' स्त्रीजन्मा ही तुझी कहाणी ' या पद्धतीने स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाबद्दल तर हे नाटक जागृत करतेच, पण त्याहूनही अधिक म्हणजे, एकच माणूस वेगवेगळ्या व्यक्तिमत्वांनी नात्यात येत असेल तर खरा कोणता समजावा, की ते दोन्ही सारखेच खरे समजावेत – असाही एक प्रश्न समोर आणते ! यामुळे, व्यक्तिमत्व ही गोष्टच एक उपरी, खोटी, तात्पुरती गोष्ट का समजू नये, असेही विचार मनात आणते. व्यक्तिमत्व म्हणजे प्रभावयुक्तता हे लक्षात घेतले तर व्यक्तिमत्वाच्या कृत्रिमतेचेच नव्हे तर नगण्यतेचेही भान हे नाटक देते. जगण्याबाबतच्या आपल्या सवयीच्या ज्ञानाला आव्हान देत ते आपल्याला चिंतनशील करते.

इथे, मी न लिहिलेल्या, पण लिहायला हवे होते अशा एका नाटकाचे उदाहरण देतो. ते नाटक गौतम ऋषी आणि अहिल्या या दोन पात्रांचे झाले असते. ब्रम्हदेवाने अहिल्येला त्याच्या सर्जक सामर्थ्याने जन्माला घातले. ती एक अति-सुंदर स्त्री झाली. सहजिकच अनेक पुरुषांना ती हवीशी वाटू लागली. अगदी देवांचा राजा इंद्र यालाही ! त्या विवाहासाठी एक अट ठेवण्यात आली – ती म्हणजे, सर्वात आधी त्रैलोक्य-प्रदक्षिणा जो करेल त्याला ती मिळेल. साहजिकच इंद्रदेवाने ती प्रदक्षिणा सर्वात आधी पूर्ण केली. त्यामुळे, त्याच्याशी तिच्या विवाहाचे पक्के होणार एवढ्यात नारदमुनी तिथे येतात आणि म्हणतात की इंद्राच्या आधी गौतम ऋषींनी ती प्रदक्षिणा पूर्ण केलेली आहे. ते गायीची पूजा करून तिला प्रदक्षिणा घालत असतानाच त्या गायीने एका वासराला जन्म दिलेला असतो ! ही घटना म्हणजे त्रैलोक्यप्रदक्षिणा पूर्ण करणेच असते ! नारदमुनींनी सांगितलेल्या या सत्यामुळे अहिल्येचा विवाह त्या वयस्कर असणाऱ्या गौतम ऋषींबरोबर होतो ! पण, इंद्रालाही अहिल्या हवीच असते. गौतम ऋषी नसताना त्यांचे रूप घेऊन तो अहिल्येकडे येतो आणि तिच्याशी संबंध करतो ! म्हणजे,
' नागमंडल ' प्रमाणेच दुसऱ्याने पतीच्या रूपात येणे ! हे गौतम ऋषींच्या लक्षात आल्यावर ते तिला शाप देतात की ती शिळा होऊन पडेल. आणि मग उःशाप म्हणून रामाचा पदस्पर्श होईल तेव्हा ती यातून मुक्त होईल, असे सांगतात. यात एक असेही अध्याहृत आहे की अहिल्येने समजूनउमजून इंद्राशी संग केलेला आहे. तिची शिळा होणे याचा अर्थ ती अपराध-भावनेत वा पश्चात्ताप-भावनेत बद्ध होणे ! रामाचा पदस्पर्श म्हणजे ' मंदिर वहीं बनायेंगे ' मधला राम नव्हे. हा राम म्हणजे स्वतःच्या प्रभावयुक्ततेचे पूर्ण भान येऊन त्यातून मुक्त होणे ! हे जे मी सुचवतो आहे तोच प्रकार सार्त्रच्या ' फ्लाईज ' या मिथक नाटकात दिसून येईल. बहीण-भाऊ दोघे मिळून आईच्या खुनाचे प्लॅनिंग करतात – प्रत्यक्ष तलवार भाऊ भोसकतो – आणि तरीही, बहीण पश्चात्तापदग्ध होते – भाऊ या घटनेच्या प्रभावातून मुक्त राहतो. त्याच्याबद्दल नाटकात एक असे वाक्य आहे की " तो स्वतंत्र तर आहेच पण तो स्वतंत्र आहे हे तो जाणूनही आहे ! "

नागमंडल आणि अहिल्या यांच्या मिथकांत, पतीच दोन रूपांत येणे जसे घडते तसेच एका आधुनिक नाटकातही घडते. ते नाटक आहे, हॅरॉल्ड पिंटरचे ' दि लव्हर '. हे नाटक प्रकाश बुद्धिसागरने स्वतःच अनुवाद करून मराठीत सादर केले होते. मूळ नाटकाचे नाव ' दि लव्हर ' प्रकाशने शाब्दिक कोटीची अफलातून सिक्सर मारत मराठी नाटकाचे नाव ठेवले होते ' दिलवर ' ! या नाटकात पती घरातून बाहेर जातो आणि तोच थोड्या वेळाने त्या पत्नीचा प्रेमिक म्हणून येतो आणि असा तो आल्यावर तीही त्याची बाहेरची प्रेयसी बनते – अशा कल्पनेचे ते नाटक आहे ! हे एक मानीव व्यभिचाराचे बहाणा

नाटक आहे. इथेही नात्यातले वैविध्य, पूर्णता, सत्य यांचे प्रश्न हे नाटक हाताळते. सांगायचा हेतू हा की मिथकांमधून हाताळले जाणारे प्रश्न सार्वकालिक आणि वैश्विक असतात. ते वेगवेगळ्या रूपांत पुन्हा पुन्हा व्यक्त होत राहतात.

मिथकांमध्ये बऱ्याचदा व्यक्तिमत्वाचे, प्रभावयुक्ततेचे, प्रतिमांचे प्रश्न हाताळलेले असतात. या प्रश्नांना तत्त्वज्ञानाची सखोलता असते. अशा प्रश्नांचे अस्तित्व हे या ना त्या रूपात सार्वकालिक असते. उदाहरणार्थ माझे एक नाटक माणसाच्या प्रतिमेचा प्रश्न हाताळणारे आहे. त्याचे नाव ' एक गगनभेदी किंचाळी ' असे आहे. एका चाळीतल्या एका मध्यमवर्गीय घरातला कर्ता माणूस निवृत्त व्हायला आलेला आहे. त्याच्या घरात साधे रूटीन सुरू असताना बाहेरून अनेक लोक ' काय झाले, काय झाले ' म्हणत धावत येतात. लोकांचे म्हणणे असते की त्या घरातून त्यांना किंचाळी ऐकू आली ! शेवटी ती किंचाळी त्या कर्त्या पुरुषाचीच होती असे आरोपित होते ! म्हणजे, त्याला वाटणारी स्वतःची प्रतिमा आणि ही अशी बाहेरून आरोपित होणारी प्रतिमा – असा हा संघर्ष सुरू होतो ! शेवटी, पराभूत होऊन लोकांच्या अपेक्षेप्रमाणे तो किंचाळी फोडायला तयार होतो ! सांगायचा हेतू हा की माणसाच्या जगण्यात काही मूलभूत प्रश्न असतात आणि प्रत्येक काळात ते या ना त्या रूपात समोर येत असतात. काही कलाकृती आणि मिथके यांच्यांत साम्ये सापडतात याचे कारण तेच आहे.

असेच आणखी एक उदाहरण मी इथे देऊ इच्छितो. रामायणात, रावणाने सीतेला पळवणे आणि नंतरचे महायुद्ध वगैरे आहे. पण, याचे बीज शोधत गेले तर कशात आहे ? मंथरा या कैकेयीच्या दासीने कैकेयीच्या मनात स्वार्थ जागवणे आणि भरताला राजा करून रामाला वनवासात पाठवायची व्यवस्था करणे, यात ते बीज आहे. किंवा कैकेयीने तिला मिळालेले वर स्थगित ठेवण्यात आहे, असेही म्हणता येईल. असे पाहात गेल्यास कोणत्याही गोष्टीबाबत अमुकचे तमुक कारण असे सांगताच येऊ नये, असे होते. माझे ' धागेदोरे ' हे नाटक असेच आहे. नाटकभर चाललेय काय आणि शेवटी ते एका मुलाच्या आत्महत्येला कारणीभूत होते काय – कुठेही घडणाऱ्या कोणत्याही गोष्टीचे परिणाम कुठेही, कसेही होणे ! असे पाहता, घडणारे सगळेच एकमेकांवर परिणाम करणारे असणे !

इथे, करमणुकीच्या क्षेत्रात गाजलेल्या एका मिथक नाटकाचे उदाहरणही देता येईल. ते नाटक म्हणजे वगनाट्य आहे, ' गाढवाचं लग्न ' हे नाटक हरिभाऊ वडगावकर यांनी लिहिलेले असून ते दादू इंदुरीकर आणि प्रभा शिवणेकर सादर करत असत. या नाटकाला राष्ट्रपतिपदकही मिळाले होते ! राजा असो वा रंक, नियतीचे जे लिखित आहे ते कुणालाच टळत नाही. एकदा सटवी टाक टाकून गेली की त्यानुसारच होणार हे निश्चित असते -- देवादिकसुद्धा त्यातून सुटलेले नाहीत, हे दाखवणारे नाटक म्हणजे ' गाढवाचं लग्न '

सावळा कुंभार नावाच्या एका अतिशय हुशार कुंभाराची ही कथा आहे. त्याची बायको गंगी आणि तो सुखात संसार करत असतात. परंतु, रानात गाढवे चरायला नेलेली असताना एक गाढव आपणहून त्यांच्यांत येते. सावळा कुंभारही ते गाढव ठेवून घेतो. परंतु, मध्यरात्री गोठ्यातून माणसासारखा आवाज येऊ लागतो. सावळा कुंभार भीतभीत तिथे जातो तर गाढवच मनुष्यवाणीने बोलत असते. सुरुवातीला त्याला यात भुताटकी वगैरे वाटते. नंतर ते गाढव सावळा कुंभाराला सांगते की राजाने त्याच्या कन्येच्या विवाहासाठी जो पैंजेचा विडा ठेवलाय तो उचलून घेऊन ये. सावळा त्याच्यावर विश्वास ठेवून पैजेचा विडा उचलायला जातो. तिथे प्रधान व राजा त्याची बरीच चेष्टा करतात. मात्र, सावळा कुंभार हुशार असतो. तो राजाकडून एक कागद लिहून आणतो आणि पैजेचा विडा उचलून घेऊन येतो. एका रात्रीत सात तळांची तांब्यापितळेची माडी जो कुणी बांधेल त्याच्याशीच राजकन्या लग्न करेल आणि इतर सर्व पुरुष तिला वडिलांसमान

असतील, अशी ही पैज असते. सावळा गाढवाला ही गोष्ट सांगतो. त्याप्रमाणे गाढव गावाबाहेर माडी उभी करून देते. आता विवाहाचा प्रसंग येतो. राजाला गाढव जावई मान्य नसतो, पण, सावळाने कागद लिहून घेतलेला असतो, त्यामुळे, त्याला लग्न लावून देणे भाग पडते. राजकन्येने विवाहाची माळ गळ्यात टाकताच गाढवाचे रूपांतर एका सुंदर राजकुमारात होते. ते गाढव म्हणजे पूर्वी सुरोचन नावाचा एक गंधर्व असते. इंद्राच्या दरबारात त्याने इंद्राचा काही उपमर्द केल्याने त्याला शाप म्हणून गाढवाचा जन्म व उशा:प मिळालेला असतो. त्या उःशापानुसार त्याचे राजकुमारात रूपांतर होते व ती दोघे पतिपत्नी पुढे सुखात राहतात. अशी ही कथा आहे. हे नाटक तुडुंब करमणूक करणारे असले तरीही, कधीतरी कुठेतरी घडलेल्या घटनेच्या परिणामात भलत्याच काळातला सावळ्या गुंतला जाणे, हे सर्व मानवी जगण्याचे स्थलकालनिरपेक्ष एकत्र असणे सुचवणारे आहे.

आता एका आधुनिक मिथक नाटकाचे उदाहरण घेणे इथे योग्य वाटते. मिथक म्हणजे काही शे वर्षांपूर्वीच तयार झालेले असायला हवे, असे नाही. आयनेस्को या नाटककाराने आधुनिक काळात तयार केलेल्या एका मिथकाविषयी मी बोलतो आहे. ते त्याचे नाटक म्हणजे, ‘ ऱ्हिनोसेरस ‘. हे नाटक मराठीत, पुण्यातल्या पीडीए या संस्थेने, ‘ गेंडा ‘ या नावाने सादर केले होते. सर्वच माणसांचे हळूहळू गेंड्यांत रूपांतर होत जाते, अशी या नाटकातली कल्पना होती. शेवटी, त्या नाटकाचा नायक हा गेंडा व्हायला नकार देणारा एकटा उरतो, असे आधुनिक काळातले एक विदारक सत्य या नाटकाने मांडलेले आहे. एकूणच कोणत्या ना कोणत्या स्वीकृत दबावाखाली स्वतःचे जगणे गमावले जाणे, हा आजच्या काळातला एक गंभीर प्रश्न या नाटकाने हाताळला. विशेष म्हणजे, हे नाटक मराठीत सादर झाले तेव्हा ते मुळीच परके वाटले नाही !

याच पद्धतीने, काफ्काच्या ‘ ट्रायल ‘ या कादंबरीलाही आजच्या काळात एक मिथकत्व प्राप्त झालेले आहे. अपराध नेमका काय आहे हे न समजताच अटकेतले जीवन जगावे लागण्याची ही एक सखोल काल्पनिका आहे. तिचे मराठी नाट्यरूपांतर ‘ ट्रायल ‘ याच नावाने मी केलेले आहे. परंतु, अद्याप ते रंगभूमीवर आलेले नाही.

आता थोडक्यात अशा मिथक नाटकांची वैशिष्ट्ये पाहू. अशा नाटकांत व्यक्तिचित्रण वा स्वभावचित्रण फारसे वैशिष्ट्यपूर्ण वा सखोल नसते. कथा वास्तवदर्शी नसल्याने त्या त्या काळाचे तपशीलही फारसे ठळक नसतात. या नाटकांत कल्पनेचा खेळ खूप असतो पण ‘ पटण्या न पटण्या ‘ चा प्रश्न नसतो. मुख्य म्हणजे यात मानवी परिपक्वतेचे दर्शन घडत असते. ही नाटके चिंतनप्रवृत्त करणारी असतात. जगण्याच्या सवयीत किंवा सवयीच्या जगण्यात लक्षात न आलेल्या, मानवी जगण्यातल्या महत्त्वाच्या प्रश्नांकडे ही नाटके लक्ष वेधतात. मानवी संबंधांचे स्वरूप, नियती, दुःख, नीती-अनीती, निष्ठा आणि प्रतारणा अशा अनेक मूलभूत प्रश्नांचा वेध ही नाटके घेतात. फारसा मानसिक ताणतणाव निर्माण न करता मानवी जगण्याच्या समग्रतेचे भान ही नाटके देतात.

देशात मराठी नाट्यसृष्टी खूप बहरलेली मानली जाते. पण हा बहर प्रामुख्याने करमणुकीच्या क्षेत्रातलाच आहे, हे मान्य करावे लागते. मराठीतले एकूण कलाक्षेत्र, पृष्ठस्पर्शी वास्तववाद, एकेका समस्येचा अनुभव आणि हा ना तो मूड – अस्वस्थता वा खिन्नता तयार करणे यातच इतिकर्तव्यता मानणारे आहे. तात्त्विक म्हणाव्यात अशा मूलभूत प्रश्नांचा आवाका घेणे इथे अपेक्षितच नाही. मानवी जगण्याच्या रचनेचे भान यावे, ‘ काही समजण्याचा आनंद मिळावा ‘ असे फारसे इथे घडत नाही. मिथकाधारित नाटकांचा विचार करताना, त्यांच्या अभावामुळे, हे प्रकर्षाने ध्यानात येते.
--- ००० ---

champrade@gmail.com
Mo – 9371005773.
वेबसाईट – www.champralekhan.com

एक समीक्षामूल्य

व्यक्तिगत मूड, विचार, भावना, प्रतिक्रिया, अनुभव – यांचे प्रक्षेपण करणाऱ्या कवितेला निष्कर्षाची कविता म्हणता येईल. तशा कवितेची सुरुवात निष्कर्षातून होते आणि शेवटही निष्कर्षात होतो. नाटकात ज्याप्रमाणे नाट्यात्म विधानाचे काहींना महत्त्व वाटते तसेच हे काव्यात्म विधान असते. याच्या अभिव्यक्तीत कौशल्य, काही चमकदारपणा, काही गंमत असू शकते, पण, माहीत नसणाऱ्या आशयाला सामोरे जाण्याची सर्जकता नसते. मराठीत अशी असर्जक कविताच उदंड लिहिली गेलेली आहे. तुकारामानंतर सर्जकतायुक्त कविता लिहिणारे कोण कवी, असा विचार करता ही नावे समोर येतात – आरती प्रभू, दिलीप चित्रे, गुरुनाथ धुरी, रवींद्र लाखे आणि रामचंद्र कदम. यांच्या कविता अनपेक्षित आशयाला ओपन – खुल्या राहात असल्याने खूप महत्त्वाच्या वाटतात. या अंगाने कवितेकडे फारसे पाहिले गेलेले नाहीय असे वाटल्याने विचारार्थ ही पोस्ट दिलेली आहे. या सर्व कवींचा पुन्हा एकदा अभ्यास करून काही सिद्ध करत बसायचा माझा विचार नाही. ' माहीत नसणारा आशय ' हे एक समीक्षामूल्य समजायला हवे, असे मला वाटते.
--- 000 ---

## संकेतस्थळ

राहिलेल्या काही फाइल्सचे संपादन पूर्ण करून ( या पोस्टसह ) माझ्या संकेतस्थळावर सर्व अद्ययावत मजकूर देण्याचे काम आज पूर्ण होतेय ! आता, हे राहिलेय, ते राहिलेय, असे काही नाही. मनाला एक रिलीफ आला आहे. नोकरीनिमित्त मी बाहेर फिरत होतो आणि वेळोवेळी पुस्तके निघावीत याचे प्रयत्नही माझ्याकडून झाले नाहीत. यातूनच मग, लेखनाची सीडी प्रकाशित करावी, असा विचार आला. तेही करून झाले. पुढे मग हे संकेतस्थळ करायचे सुचले आणि सुरुवातीपासूनच्या काही वर्षांच्या परिश्रमांनंतर त्याची पूर्तता झाली. मराठीतले हे असे, एखाद्या लेखकाचे सर्व लेखन मोफत उपलब्ध करून देणारे पहिले संकेतस्थळ होते आणि आहे ! कदाचित एकूणात भारतातलेच हे असे पहिलेच काम असण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र शासनाने २०१० साली राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात घेतलेल्या मराठी संकेतस्थळ स्पर्धेत या संकेतस्थळाला एक पारितोषिक मिळाले होते. बाकीचे म्हणाल तर, मराठी साहित्य संमेलने तर सोडाच, पण, मराठी ई-साहित्य संमेलनांनीही कधी या कामाची दखल घेतली नाही. मध्यंतरी, प्रा. आशुतोष पोतदार यांना ई-साहित्य या विषयावर काही व्याख्यान द्यायचे होते तेव्हा त्यांनी याची माहिती घेतली होती. सुमारे बारा देशांतून वर्षाला सरासरी ४००० वेळा हे संकेतस्थळ पाहिले जाते, हे तेव्हा स्पष्ट झाले होते !

हे काम असे बेदखल का राहिले असावे याचा मुख्य दोष सदर लेखकावरच येऊ शकतो – म्हणजे मीच याला प्रसिद्धी देण्यात कमी पडलो. ते अर्थातच मला मान्यच आहे. दुसरे कारण असे असू शकते की यातले साहित्यच मुळात दर्जाहीन आणि फडतूस आहे. या एकूण साहित्याच्या मूल्यमापनाचे प्रयत्नही झालेले नसल्याने, ही शक्यता विचारात घ्यावी लागणारच. ( मला स्वतःला, हे काय आहे आणि याचे मूल्य काय आहे, याची स्पष्ट कल्पना असली तरी. ) परंतु, मधे मधे काही पारितोषिके मिळणे, कुठे चर्चेला बोलावले जाणे, असेही घडत गेल्याचे लक्षात घेता, हे अगदीच टाकाऊ नसावे, असे म्हणायला जागा आहे. आणि ते काहीही असले तरी, पोटापाण्याचे काम आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या संभाळत केलेल्या या बऱ्यापैकी ‘ भरपूर ‘ कामाचे हे अद्वितीय संकेतस्थळ आहे, हे तर निर्विवाद आहे ! हे बेदखल राहण्याची कोणती असू शकतील कारणे याची चिकित्सा पुढे कधी झाली तर होईल – खरे तर तीही न होण्याची शक्यताच जास्त दिसतेय !

कुणी दखल घेणे वा वाहवा करणे यांवर अवलंबून न राहता मी काम करत आलेलो आहे आणि बहुतेक करत राहीन. या अद्ययावतीकरणामुळे आता काही राहिलेले वाचन आणि लेखन करत राहता येईल, या विचाराने मी खुश आहे !

--- ००० ---

## ‘ कवितानिरूपणे ‘ – सुधीर रसाळ, ‘ इराणी ‘ – अरुण कोलटकर, अतिवास्तववाद, वगैरे.

-- चं. प्र. देशपांडे.

कवितेचे स्वरूप, तिची निर्मितिप्रक्रिया, तिची अर्थवत्ता, तिची संपर्कप्रक्रिया आणि तिच्या असंख्य शक्यता – यांबद्दल थोडी जरी उत्सुकता असेल, कवितेचे माणसाच्या जगण्यातले महत्त्व समजावे असे वाटत असेल तर सुधीर रसाळांचे ‘ कवितानिरूपणे ‘ हे पुस्तक वाचलेच पाहिजे. कवितेच्या ‘ संहितासमीक्षा ‘ मराठीत खूपच कमी आहेत, याबाबतची खंत रसाळांनी व्यक्त केलेली आहेच. तर अशा संहितासमीक्षा अत्यंत विचक्षणपणे देणारे हे पुस्तक आहे. भाषेच्या, कवितेच्या अभ्यासकांना, खुद्द कवींना आणि अर्थातच वाचकांना कवितेबाबत अधिक सजग करू शकेल, असे हे पुस्तक आहे.

या पुस्तकात रसाळांनी दिलेल्या संहितासमीक्षात्मक लेखांत एक लेख अरुण कोलटकरांच्या ‘ इराणी ‘ या कवितेवरही आहे. या कवितेची रचना, तिचे तंत्र, तिच्यातून निर्माण होणारी अर्थवलये यांबद्दल रसाळांनी छान आणि सविस्तर लिहिलेले आहे. या कवितेकडे पाहण्याची ही एक दृष्टी असू शकतेच, पण, मला जरा वेगळे काही जाणवले. मला ही कविता अतिवास्तववादी शैलीतली वाटते. तिच्यातल्या प्रतिमा आणि तिचे एकूणच असणे याचे सर्व अर्थ वास्तवकेंद्रित वा वास्तवानुगामी लावावेत का, असा मला प्रश्न पडला. अतिवास्तववादी कवितेकडे अधिक व्यापक अशा तात्त्विक / आध्यात्मिक अंगानेही पाहिले जायला हवे, असे जाणवले. त्यामुळे, मला ही कविता कशी दिसते / जाणवते हे लिहावे, असे ठरवले. त्या विचारानेच हा एक छोटासा प्रयत्न करत आहे. या कवितेवर लिहिण्यापूर्वी अतिवास्तववादावर थोडे लिहायला हवे.

अतिवास्तववाद

अतिवास्तववाद हा तर्क आणि बुद्धिप्रमाण्यवाद फेटाळून लावतो, हे लक्षात घेतले पाहिजे. असे का घडते, तर आकलन-प्रक्रिया आणि अभिव्यक्तिप्रक्रिया यांच्यावरचा जागृत मनाचा ताबा सोडून देणे, हे याचे प्रमुख वैशिष्ट्य असते. जागृत मन हे सदोदित आपापल्या कुवतीप्रमाणे तर्काच्या वा बुद्धीच्या प्रभावाखालीच काम करते. अर्धजागृत वा सुप्त मन हा माणसाच्या जगण्याचा एक प्रचंड भाग असतो. यात हजारो वर्षे विकसित होत आलेल्या प्रेरणांपासून आनुवंशिक प्रभाव, भ्रम, स्वप्ने, आठवणी असे खूप काही असते. अतिवास्तववाद असे मानतो की फक्त जागृत मनानेच नव्हे तर पूर्ण मनाने जगण्याकडे पाहायला हवे. यासाठी अर्थातच जाणीवपूर्वक असणाऱ्या तर्काचा ताबा सोडावा लागतो. ताबा सोडणे म्हणजे हवे तसे शब्द भिरकावणे नव्हे. ' पूर्ण मनाची ' ही प्रक्रियाही त्या त्या मनाच्या प्रगल्भतेवर आणि गांभीर्यावरच अवलंबून असते. कोणत्याही सर्जक कलेत कल्पनेचा असा स्वैर वापर काही ना काही प्रमाणात होत असतोच, पण, अतिवास्तववाद ते पायाभूत तत्त्वज्ञान म्हणूनच स्वीकारतो. याबाबत पुढील वाक्य विचारात घ्यावे असे आहे – Breton conceived of Surrealism as a revolution of the mind that would fundamentally transform everyday experience. Surrealism was less interested in the irrational for its own sake, than in reconciling the contradictory states of dream and reality into a more potent form of reality – a kind of surrealist consciousness. सारांश, मनाच्या पूर्ण असण्याला वाव देणारी ही प्रक्रिया आहे.

इथे, अतिवास्तववादी कवितेची वैशिष्ट्ये काय असतात ते थोडक्यात पाहू. इथे मनाच्या पूर्णतेचे महत्त्व असते याचा अर्थ जागृत मन वगळले जाते, असे नाही. फक्त इथे जागृत मनाची शिस्त, सलगता आणि सुसंगत आकलन यांचा अभाव असतो. यामुळे हे जग केवळ जागृत मनाला परके आणि चकित करणारे असते. यातून एक परात्मभाव, उपरोध आणि काहीसा बोचरा विनोदही निर्माण होतो. या सगळ्यात निरर्थकता हा एक स्थायी भाव असतो. योजना, विचारसरणी, आदर्श यांना इथे स्थान नसते. नैतिकता आणि सौंदर्यकल्पना यांची इथे फिकीर बाळगली जात नाही. या अभिव्यक्तीत अनपेक्षितता, योगायोग आणि अनिश्चितता भरपूर असते. जागृत मनाच्या उचापतींनीच हे जग घाणेरडे झालेले आहे, अशी जाणीव यात असते. त्यामुळे, जागृत मनाचे उपाय व निराकरणे इथे मान्य नसतात. या अशा स्वैर गांभीर्यातून ही अभिव्यक्ती येत असल्याने असंबद्धता, शब्दांचे व प्रतिमांचे विचित्र साहचर्य, अतार्किक मांडणी यांच्या रेलचेलीसह भाषेचा सढळ वापर असतो. एकेका कल्पनेचे एकेक कडवे, अशी शिस्त नसते. कडवी, वाक्ये एकमेकांत मिसळत राहतात. याला psychic automatism म्हणजे मानसिक स्वयंचलितता असेही म्हटले जाते. बऱ्याच वेळी कवितेचा विषय हा फक्त निमित्तमात्र असतो आणि त्यातून अनपेक्षित आकलनाचे भांडार व्यक्त होत राहते. जगताना जाणवलेल्या असंख्य गोष्टी कवीच्या प्रगल्भतेतून त्या त्या वेळी रूप घेत राहतात. अमुक अर्थाचे पाहणे, असे याचे स्वरूप नसून अनियोजित पाहणे असे हे स्वरूप असते. धर्म, जादू, गूढ, मादकता, बधीरता या सगळ्यांनी युक्त अशी ही अनिश्चिततेची नदी वाहत असते. Sur म्हणजे सरपास करणे – पलिकडे जाणे. Surreal म्हणजे सवयीच्या सत्यापलिकडे जाणे. तर्क आणि उपयुक्तता यांच्या मर्यादा ओलांडून ' पाहणे '.

अतिवास्तववादाची ही थोडक्यात ओळख करून घेतल्यावर आता अरुण कोलटकरांच्या ' इराणी ' या कवितेकडे जाऊ --

इराणी

इराणचा चकणा शहा पाहतो तडकलेल्या व सस्मित
काचेआड केकला चढणारी क्रमिक बुरशी.
क्वचित् विचलित करते त्याचे लक्ष सुशिक्षित
बेकाराला राखी बांधताना अकृत्रिम माशी.

चित्रातील वनराजीच्या कुशाग्र निर्जीवतेस व्यग्र
करीत नाही वारा; अन् सरळ सरोवराचे विपर्यास
वाकडा हंस. सुईसारखा सीधा मार्ग
अग्रावर तोलतो राखीव बंगल्याचा रेखीव आभास.

अशा निसर्गचित्रांची होते ग्लासात अविद्राव्य तारांबळ
घोटागणिक परिच्छेद पाण्याचा लांबताना तृषार्तासमक्ष.
जिज्ञासूंचे वेधू इच्छिते चहाचे विचक्षण वर्तुळ
विचारप्रवर्तक टेबलाच्या महत्त्वाच्या भागाकडे लक्ष.

खुर्चीखालील अंधारांना निमित्त झालेले मांजर,
गतप्रभ दुश्चिन्ह, सांभाळते दुटप्पी झोपेत दोन
सापत्न स्वप्नप्रपंच. दिशांची अफरातफर
करून बिलोरी मंत्रिमंडळ पिकवते अप्रच्छन्न प्रतिबोंब.

सिगारेट पेटवून बेकार ठेवतो जळणारी काडी
चहाच्या वर्तुळात जी उठून बसते विझताना जरा.
अगत्यशील जशी लाश बर्फाच्या लादीवर उघडी
समशीतोष्ण कोणी आलासे वाटताच सगा सोयरा.

( अरुण कोलटकरांची कविता – प्रास प्रकाशन, मुंबई १९७७. )

मूळ पुस्तकातल्या कवितेत ‘ हंस ‘ या शब्दानंतर पूर्णविराम आहे, पण, रसाळांच्या पुस्तकात स्वल्पविराम आहे. त्याचप्रमाणे, मूळ पुस्तकात ‘ तोलतो ‘ या शब्दानंतर पूर्णविराम आहे, पण, रसाळांच्या पुस्तकात तो वगळलेला आहे. तो वगळणेच बरोबर असावे. खरे तर सरमिसळ व्हावीच आणि गोंधळ – chaos – निर्माण व्हावाच या ‘ सत्यगामी ‘ हेतूने अतिवास्तववादी कविता विरामचिन्हांचा कमीत कमी वापर करते. त्यामुळे, हे थोडे लाईटली घेऊन पुढे जाऊ.

नावावरून आणि कवितेतल्या एकूण वर्णनावरून ही कविता इराणी हॉटेलावर आहे, असे दिसते. की ती कवितेतल्या बेकार माणसाची मनस्थिती व्यक्त करणारी आहे ? की या हॉटेलच्या निमित्ताने ती कवीची स्वतःचीच मनस्थिती व्यक्त करते आहे ? समजा तो बेकार माणूस. तर त्याची मनस्थिती जी नेहमीच्या रूटीन भाषेत सांगता येईल, तिच्यासाठी ही अशी मास्टरीयुक्त कविता कशाला ? आपण कविता वाचता वाचता समजून घेत जाऊ.

कवितेच्या पहिल्या वाचनात एक महत्त्वाची घटना घडते – ती म्हणजे तो बुरशी लागून नष्ट होत चाललेला केक. तो वाचवावा किंवा फेकून द्यावा असे काही घडणे अशक्य झालेला. ( कारण हा केक मानसिक काळाचा – स्वप्नातला आहे – सत्यातला नाही. ) हे स्वप्नसदृश सुप्त मनाचे ताबाहीन नष्ट होत जाणे आहे. साल्वदोर डालीच्या ‘ पर्सिस्टन्स ऑफ मेमरी ‘ – ‘ स्मृतीचे सातत्य ‘ -- या चित्रात जशा एका पालथ्या पडलेल्या पॉकेट वॉचला मुंग्या लागलेल्या आहेत ! तिथेही एक प्रकारे अशीच मानसिक काळाच्या नाशाची जाणीव व्यक्त होते. ही कविताही स्वप्न आणि जागृत मनाचे सत्य यांचे बेमालूम मिश्रण आहे. या कवितेत विकृती आणि नाश हे अनेक गोष्टींतून व्यक्त होताहेत – इराणी चकणा असणे, काच तडकलेली असणे, केकला बुरशी, निर्जीवता, वाकडा हंस, अंधार, गतप्रभ मांजर, अफरातफर, विझणे, लाश. जिवंतपणाची लक्षणे म्हणजे बुरशी, मांजर, बेकार आणि पेटलेली सिगरेट. या अशा खगदृष्टी दृश्यानंतर आता ओळीने कविता पाहू.

हे एक इराणी हॉटेल आहे. नुसता चहा पीतही कितीही वेळ तुम्ही इथे बसू शकता. सध्या इथे एक बेकार बसलेला आहे. म्हणजे त्याचा बुद्धिवाला काळही वाया चाललेला आहे आणि मानसिकही. काउंटरवरच्या इराण्यालाच कवी शहा म्हणत असावा. या दरिद्री हॉटेलच्या मालकाचे ते हास्यास्पद उदात्तीकरण आहे. शिवाय तो चकणा आहे. तो कुठे, काय पाहतोय ते कळू शकत नाही. ते अनिश्चित आहे. त्याला कशातच फारसे इंटरेस्ट नाही हे स्पष्ट आहे. काचेला तडा गेलाय तर जाऊ दे, केकला बुरशी लागलीय तर लागू दे – असा प्रकार. विशेष म्हणजे काचेचा तो तडा स्मितहास्यासारखा दिसतोय ! सगळे सुखदुःख समे कृत्वा जणू ! पुढे असे म्हटलेय की सुशिक्षित बेकाराला राखी बांधणारी ‘ अकृत्रिम ‘ माशी त्याचे लक्ष क्वचितच विचलित करते ! मुळात तो एक बेकार आणि त्याच्याकाडून जणू रक्षणाची अपेक्षा करत एक क्षुद्र माशी त्याला राखी बांधणार ! काय लक्ष द्यायचे त्यात ? चालू दे ! पण, माशी ‘ अकृत्रिम ‘ का ? कारण मनाचे सगळे हेतूपूर्वक आणि म्हणून कृत्रिम आहे ! ती माशी एक वेळ उत्साही, बरी म्हणावी अशी मनाची अवस्था आहे ! इथे आता हळूहळू लक्षात येऊ लागते की ही कविता नुसतेच या हॉटेलबद्दल वा त्या बेकाराबद्दल बोलत नसून पूर्ण मानवी जगण्याबद्दलच बोलत आहे. पुढे बघा – चित्रातील वनराजी ‘ कुशाग्र ‘ आहे – धारदार आहे पण, ती चित्रातली आहे. ती कोणत्याही वाऱ्याने व्यग्र होत नाही – ती नुसतीच सुंदर पण निर्जीव आहे. तिला वाराही व्यग्र करत नाही वा सरळ सरोवराचे जणू विपर्यास असलेला वाकडा हंसही नाही व्यग्र करू शकत. हे एक जणू एखाद्या कल्पित आदर्शाचे चित्र आहे. पण, हंस मात्र वाकडा का ? तर ते जिवंत असण्याचे मानसिक चित्र आहे आणि जे जे मानसिक ते ते सगळे विकृत, नष्ट होत चाललेले, वाकडे आहे ! आता पुढे बघा – सुईसारखा – धारदार – सीधा मार्ग तोलतो राखीव बंगल्याचा रेखीव आभास ! इथे मात्र या आदर्शाला स्पष्टपणे ‘ आभास ‘ म्हणून ओळखले जाते !

अशा निसर्गचित्रांची अविद्राव्य तारांबळ का होते ? ती तुकड्यातुकड्यांची आहेत – एकजीव होऊ शकणारी नाहीत – मनाचे असणेच असे तुकड्यांचे आणि विदीर्ण आहे ! तृषार्ताला ते सगळे सत्यात हवे आहे पण, ते शक्य नाही. चहाच्या ग्लासाच्या गोल डागाला पुढे ‘ विचक्षण ‘ म्हटलेय ! हा निव्वळ उपरोध आहे ! कसले इयाटाचे विचक्षण – असे खरे तर ते आहे ! तार्किक, बुद्धिप्रधान जगण्याची ही चेष्टा आहे ! आता पुढे येतो उल्लेख खुर्चीखालील अंधारांचा ! अंधाराचे

अनेकवचन ! विचार, अनुभव यांचे तुकडे हा जगण्याचा पाया – ते सगळे अंधार ! आणि या अंधारांना निमित्त काय होते तर गतप्रभ दुश्चिन्ह असणारे मांजर ! हे अर्थातच विचार आणि अनुभव यांवर ताबा ठेवणारे मनाचे केंद्र आहे. त्याचे तेज मुळातल्याच विकृतीमुळे गेलेले असून या सगळ्या शांत नासाडीचे तेच आहे मूळ दुश्चिन्ह ! दोन सापत्न स्वप्नप्रपंच म्हणजे जागृत आणि सुप्त अशा अवस्थांतले जगणे ! चांगल्यावाईटाचे मिश्रण अशी बिलोरी अफरातफर, मंत्रिमंडळ, बॉंब, प्रतिबॉंब – हा सततचा गोंधळ ! हे काही त्या हॉटेलातले नाही – मनाच्या अवस्थेला धरूनच आहे. शेवटच्या कडव्यात पुन्हा त्या चहाच्या वर्तुळाचा उल्लेख येतो – ते विचक्षण वर्तुळ ! त्यात टाकलेली जळती काडी विझताना थोडी गोलाकार वळते जणू कुणी सगासोयरा आलाय, आदरातिथ्य करायला हवेय ! हीही एक सवय – जणू मेल्यावरही जागी होणारी – हास्यास्पद ! वस्तुतः कुणी नाहीच आहे सगासोयरा – सगळे संबंध तुटलेले वा बिघडलेले आहेत !

वाचत वाचत आणखी खूप बारकावे जाणवत जाऊ शकतात. या कवितेचे प्रतिमायुक्त रूप विकृतींनी भरलेले आहे. अनपेक्षितता, उपरोध आणि विनोदही यांनी भरलेले आहे. हा काही कवीचा एखादा व्यक्तिगत मूड नाही. हे पूर्ण मनाने पूर्ण मनाला पाहणे आहे. कवीला याचे सुखदुःख नाही पण मानवी जगण्याची शोकात्मता पूर्णपणे समजून घेण्याची यात आच आहे. त्यामुळे ही कविता अध्यात्माच्या / तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात जाते. हीच मानवी परिपक्वतेची प्रक्रिया – हीच सांस्कृतिक प्रक्रिया. ‘ इराण्याच्या हॉटेलातले दृश्य पाहून ‘ अशी ही नुसतीच एक प्रतिक्रिया नाही. यात व्यक्तिगत रागलोभ, कुणाला दूषणे देणेही नाही. माणसाच्या जगण्याच्या पद्धतीतून काय घडतेय याचे हे भान घेणे आहे. सोडवायला घेतलेली ही अनेकांपैकी एखादी समस्या नाही. ‘ विचक्षण ‘ विचारातून येणारे एखादे भाष्य वा निराकरणही यात येत नाही. कारण अर्थातच ते शक्य नाही, हे समजलेले आहे.

माणसाच्या शोकात्म अवस्थेचे भान येणे, समज येणे हीच पहिली पायरी आणि हेच तातडीचे – या प्रगल्भ चिंतनातून आलेली ही कविता आहे. त्यामुळेच, मराठीतली ही एक महत्त्वाची सांस्कृतिक घटना ठरते ! एखाद्या आदर्शाला वा निष्कर्षाला गृहीत धरून निर्माण होणाऱ्या कविता हिच्यापुढे खुज्या ठरतात.

--- ००० ---

Champralekhan
champralekhan.com
फेसबुक मजकूर संकेतस्थळावर

माझा सर्व फेसबुक मजकूर मी वर्षनिहाय सेव्ह करून ठेवलेला होता. आता तो माझ्या www.champralekhan.com या संकेतस्थळावर घ्यायचा होता. माझ्या पोस्ट घेणे सोपे होते. सटरफटर पोस्ट सोडून बाकीच्या घेतल्या. प्रश्न कॉमेंटसचा होता. माझ्या काही कॉमेंटस माझ्याच पोस्टींवरच्या चर्चेतल्या होत्या तर काही इतर फ्रेंडसच्या पोस्टींवरच्या व कॉमेंटसवरच्या होत्या. इतरांच्या पोस्टी वा कॉमेंटस त्यांच्या अनुमतीशिवाय मी माझ्या संकेतस्थळावर कशा घेणार ? तो गुंताडा सोडूनच द्यायचे ठरवले. फक्त माझ्याच निवडक, संपादित कॉमेंटस घेतल्या. आता पोस्टस आणि कॉमेंटस यांना मराठी नावे द्यायची होती. पोस्टसाठी -- what is on your mind -- असे इथे येते, त्यावरून ' मनोगते ' हे नाव दिले. आता प्रश्न होता कॉमेंटसना काय म्हणावे ? ' शेरे ' ? मी कुणाच्याही बोलण्यावर शेरेबाजी करतो, असे तर नाही होणार ? बरे, ' टिप्पणी ' ? तेही पटे ना. काही कॉमेंटस मोठ्याही असतात. माझा नम्रपणा

आणि सभ्यपणा न बिघडवणारा शब्द हवा होता. या सर्व विचारांती ' भाष्ये ' हा शब्द निवडला. आता यावरही, सहजच, ' आले मोठे भाष्य करणारे ' अशी उत्साही टिंगल शक्य आहेच ! पण, ते स्वीकारायचे ठरवले. जेकेंच्या कॉमेंटरीजनाही भाष्येच तर म्हटले गेले. तो शब्द मला सौम्य, सभ्य वाटला. म्हणून ' भाष्ये ' हेच नक्की केले. आपण काहीही केले तरी बोचकारणे, खरवडणे, चेष्टा करणे हे सगळे कधीही शक्य असणारच ! समाजासमोर आपले काम ठेवणाऱ्याने त्याला बिचकून कसे चालेल ?

--- ००० ---

## कार्नाड आणि आनुषंगिक प्रश्न

असणे म्हणजे काय, शरीर आणि मन यांचा संबंध काय, व्यक्तिमत्व म्हणजे काय, स्वातंत्र्य म्हणजे काय, नियती म्हणजे काय, मानवी संबंध म्हणजे काय -- अशा अनेक मूलभूत प्रश्नांचा मर्मभेदी वेध घेते कार्नाडांचे ' हयवदन ' हे नाटक. त्यांच्यावरच्या डॉक्युमेंटरीच्या शेवटी त्यांनी जगण्यातल्या ऍब्सर्डिटीचा उल्लेख केलेला आहे -- तीही जाणीव त्यांना असणारच. हे सगळे प्रश्न एखाद्या पुरोगामी माणसाच्या विचारविश्वात कितपत महत्त्वाचे असतात, कोण जाणे. पण, लेखक म्हणून निश्चितच कार्नाडांनी हे प्रश्न सखोलतेने हाताळलेले आहेत. आपण माणसाच्या एकूण वागण्यावरून, कृतींवरून त्या माणसाचे मूल्यमापन करण्यात फार इंटरेस्ट घेतो आणि त्याच्या कलेकडे दुर्लक्ष करतो, असे तर होत नाही ? आणि दुसरा प्रश्न असा की माणसाचे सामाजिक-राजकीय व्यक्तिमत्व आणि तो लेखक असल्यास लेखक, ही दोन वेगळीच अस्तित्वे असू शकतात का ? हे माझ्या मनात आलेले प्रश्न इथे विचारार्थ दिले आहेत. याने कुणाचे रागलोभ जागे होणार नाहीत ही अपेक्षा.

--- ००० ---

## पुन्हा कार्नाड

आजच्या लोकसत्तेच्या लोकरंग पुरवणीत गिरीश कार्नाडांचा एक लेख छापलेला आहे. तो बराचसा माहितीने भरलेला आहे. तेंडुलकरांचा आणि त्यांचा वाद झाल्याचे ते सांगतात पण त्याचा विषय काय होता बाबा, हे काहीच सांगत नाहीत.

एक जरा विचारात पाडणारे आहे. अल्काझींनी काही नव्याच नाटकांचे जग त्यांना दाखवले, हे सांगून पुढे ते लिहितात, " सामाजिक समस्यांचा वेध घेणारी ती नाटकं नव्हती. इथे होतं अस्तित्ववादी जग, शोकात्म द्रष्टेपण असलेलं, मानवी जबाबदारीचं प्रखर विश्लेषण करणारं आणि अस्वस्थतेची भावना निर्माण करणारं. " म्हणजे ते काय सुचवताहेत ? सामाजिक समस्यांचे आणि अस्तित्ववादी अशी दोन वेगवेगळी जगे असतात का ? की त्या त्या लेखकाला त्या त्या वेळी त्या दोन जगांतले कोणतेही महत्त्वाचे वाटू शकते ? लेखकाने ठरवून यांपैकी एखाद्या जगावर कौशल्ययुक्त प्रभुत्व प्राप्त करावे, असे तर ते म्हणत नसणार. आणि समजा ही अशी दोन्ही जगे त्यांना महत्त्वाची वाटत होती, तर त्यांचा संबंध त्यांना कसा दिसत होता ? -- यावर त्यांनी कुठे काही लिहिले आहे का, ते मला माहीत नाही. याबाबत कुणाला काही माहिती असल्यास यावर जरूर प्रकाश टाकावा, कारण, कला-साहित्य क्षेत्रातला हा एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे.

--- ००० ---

## जुने जाऊ द्या

जे छापलेय, सहज उपलब्ध आहे, त्याच्यातही कुणाला फारसा रस नाही हे अनुभवत असताना, अक्षरे, मुळात फालतू असलेली आणि आता मला स्वतःलाही वाचवत नाहीत अशी, कुणी प्राणपणाने वाचेल आणि ' आयला, काय ग्रेट ! ' असे म्हणत ज्ञानपीठ पदाला पोचवेल, असा नशिबावर हवाला ठेवण्याइतका भाबडेपणा असलेला लेखक मी नाही. ' मानव ', ' राज्य ', ' टिपऱ्या ', ' मरणाचे स्मरण असावे ', ' चित्र ' -- अशी काही अर्धवट वा पूर्ण लिहिलेली नाटके अत्यंत निर्दयपणे फाडून कचऱ्यात टाकली. त्या वेळी झेरॉक्स वगैरे प्रकार नव्हता तर पूर्ण नाटके दोनदोनदा लिहिली जात -- तसेही काही होते. तसले सगळे ओझे हलके करून टाकले. शेवटी वाचकांपुढे काय ठेवायचे, हे लेखकच ठरवणार. परदेशातले असे काही वाचनात येते की कित्येक वर्षांनंतर कुणी मित्राने वा अभ्यासकाने धुंडाळून एखाद्या लेखकाचे लेखन प्रसिद्ध केले आणि ते क्रांतिकारी ठरले ! मुळात मी तितके स्वतःचेच लेखन न कळणारा लेखक नाही आणि इथे कोण कशाला इतके खुळचट इंटरेस्ट घेईल ? ज्यालात्याला आपली उपजीविका आणि व्यापताप हेच भरपूर होतेय. आणि आपल्यालाच फालतू वाटणारे आपले लेखन ' लकीली ' ग्रेट ठरेल, अशी स्वप्ने पाहण्याचा मूर्खपणा मी करणार नाही. पण, एक केले -- मी शाळेत असताना, मुंबईतल्या ' प्रजामित्र ' या एका साध्याशा दैनिकात माझे अगदी सुरुवातीला जे छाप्यात आले ते मात्र ठेवले ! तेही खूप जीर्ण झालेले आहे. सेकंड राउंडमध्ये त्याचाही नंबर लागू शकेल !

अत्यंत काळजीपूर्वक मी माझे सर्व लेखन माझ्या संकेतस्थळावर घेतलेले आहे -- त्यामुळे, नो चिंता ! या झालेल्या कामामुळे छान वाटतेय !

--- ००० ---

## मुख्य प्रश्न

माझ्यासारखा लेखक ज्याचे सर्वच लेखन संकेतस्थळावर आहे आणि पुस्तकरूपात फारच कमी आहे, त्याच्यापुढे काही प्रश्न असतात. उदाहरणार्थ, संहितांमध्ये होणारे बदल तडक संगणकावरच होत असतात -- अशा लेखकाने, मूळ लेखन हस्तलिखित स्वरूपात असेल तर ते उपलब्ध ठेवावे का ? याला माझे उत्तर नकारार्थी आहे. मुळात कोण ते पाहणार आहे तौलनिकपणे, एवढे दर्जेदार आहे का लेखन मराठीत आणि इतके विचक्षण अभ्यासक असणार आहेत का इथे, वगैरे प्रश्न जाऊ द्या. ( जनुकीय समीक्षेत म्हणजे genetic criticism मध्ये लेखकाच्या पूर्ण लेखनप्रक्रियेची, त्याच्या टिपणांची, त्याने केलेल्या बदलांची वगैरे दखल घ्यायची असते. इथे बोंबलायला, आहे त्या अंतिम मसुद्याचीही दखल घेतली जाण्याची शक्यता नाही ! त्यात, मराठी भाषेच्याच जीवनमानाचीही गंभीर चर्चा चालू असतेच ! ) माझ्यासारख्याचा मुख्य प्रश्न मला वेगळाच दिसतो. समजा, आणखी एकदोन पिढ्या माझे संकेतस्थळ चालू ठेवले जाईल -- त्यानंतर समजा ते बंद झाले तर हे सर्व लेखन नष्टच होईल, हा आहे तो प्रश्न. त्यासाठी आता पुस्तके काढण्याची धडपड, ते मुद्रितशोधन, प्रती सप्रेम भेट पाठवत राहणे, वगैरे उपद्व्याप मी करणे शक्य नाही. आणि ज्यांची आहेत पुस्तके त्यांचीही ती सर्व एका ठिकाणी मिळतीलच, असे कुठे आहे ?

तर याचे मला सुचणारे उत्तर असे आहे की होऊ दे ना नष्ट जेव्हा व्हायचे तेव्हा. ते नष्ट होणे कोण थांबवू शकणार आहे ? आणि कलेच्या क्षेत्रात, लेखक वा पुस्तके जिवंत राहण्याचे काय महत्त्व आहे ? त्या लेखन-वाचनातून सर्जक काही घडत असेल तर मराठीतली सांस्कृतिक प्रक्रिया आपोआप ती बाब जिवंत ठेवेल. लेखकाने त्याची काळजी मुळीच करू नये.

यात आणखीही प्रश्न-उपप्रश्न असतील. पण मी तरी त्यांत फार वेळ घालवत बसणार नाही.

--- ००० ---

## साहित्य संमेलनाबाबत काही मौलिक सूचना

साहित्य संमेलनाशी माझा ना काही संबंध ना काही देणेघेणे, त्यामुळे, या विषयावर मी माझे अभिव्यक्तिस्वातंत्र्य खुलेपणाने वापरू शकतो. आपले काही हितसंबंध, आवडीनिवडी वा वैचारिक आग्रह अडकलेले असतील तर अडचण येऊ शकते. तसे माझे होत नाही. अशाच खुलेपणातून काही सूचना कराव्याशा वाटतात. यात मुख्य प्रॉब्लेम वा संघर्ष कोणता असतो तर विद्रोही असणे वा बिगरविद्रोही असणे किंवा पुरोगामी वा प्रतिगामी असणे. राज्याचे लाखो रुपये वा कोट्यवधी रुपये खर्चून साजऱ्या होणाऱ्या या उत्सवाचा विरस होऊ नये, असे अनेकांना वाटू शकते. सर्व जनतेने एकोप्याने, आनंदाने हा उत्सव साजरा करावा, अशीच खरे तर सर्वांची इच्छा असणार. हे असे भेदभाव वा द्वंद्व वा संघर्ष कशामुळे उभे राहतात, हे समजून घ्यायला हवे. याचे मूळ हे सर्व कलात्मक वा ललित म्हटल्या जाणाऱ्या साहित्यात असल्याचे दिसून येते. कविता, कथा, कादंबरी, चरित्रे, प्रवासवर्णने, ललित लेख – असल्या लेखनातच या संघर्षाची बीजे असतात. याबाबतच्या चर्चा वा भांडणे करायला इतर खूप व्यासपीठे वा माध्यमे उपलब्ध आहेत. अशा या आधुनिक जगात तिथेच, त्याच ठिकाणी सर्वांनी डोकी आपटत बसणे टाळता येईल का, याचा विचार करायला हवा. यासाठी सुचणारा तातडीचा उपाय म्हणजे तसे ते जे कलात्मक वा ललित साहित्य म्हटले जाते ते या संमेलनातून हद्दपारच करावे. ( संघर्ष टाळणे हे उद्दिष्ट मान्य असेल तर इतर असंख्य विषयांपैकी राजकारण हा विषयही टाळावा लागेल. ) साहित्यात वर्ज्य नसलेले इतर असंख्य विषय आहेत – जसे की – पर्यावरण, आरोग्य, शिक्षण, मराठी लोकांच्या लैंगिक कल्पना, मराठी लोकांचे वैवाहिक प्रश्न, पालक-बालक संबंधांचे बदलते स्वरूप, मराठी लोकांतले नैराश्य – असे खूप विषय आहेत. हे सगळे विषय साहित्याशी संबंधित नाहीत असे कोण म्हणेल ? अशा निर्विवाद विषयांवर ही संमेलने घ्यावीत. त्यामुळे, मराठी लोकांत अध्यक्षपदाच्या संधी अधिक विस्तारित समूहाला मिळतील. आणि एवढा खर्च करून मारामाऱ्या करायच्या परंपरेच्या जोखडातून सर्वांना मोकळे होता येईल.

हे असे केल्याने आणखी एक प्रश्न आपोआप सुटून जाईल. कदाचित त्या कलात्मक-ललित साहित्यावर समावेशक सहानुभूतीने बोलणारे लोक उपलब्धच नसावेत, असे दिसते आहे. सगळे वाङ्मयप्रकार तर सोडूनच द्या, त्यातल्या एका प्रकारावरही जुन्यानव्याचा -- नुसत्या नव्याचाही – आवाका घेणारा अभ्यासक मिळणे अवघड जाते आहे. सगळे अभ्यासक विद्रोही वा बिगरविद्रोही यांत विभागले गेलेले आहेत. ते लोक या योजनेत आपोआप टाळले जातील. आणि समावेशक अभ्यासक मिळण्याचा प्रश्नही आपोआप सुटून जाईल.

नमून्यादखल एवढ्या सूचना बास वाटतात. एकदा हा मार्ग पटला की सर्वांची कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलता यावर काम करू शकेल. हे आपले एक साधे, विनाहेतू, पण सदभिरुचीने सुचवले आहे. यात अनेक अडवेतिडवे मुद्दे निघू शकतील, वाद होऊ शकतील याची मला कल्पना आहे. तरीही मित्रांशी बोलायचेच नाही असे करणेही योग्य होणार नाही. आणि या मार्गानेही थोडे अभिव्यक्तिस्वातंत्र्य कुणी वापरले तर त्यालाही आपले मराठी बांधव सहिष्णुतेचा लाभ देतीलच यावर मी शंका का बाळगवी ?

ताजा कलम – संमेलनापूर्वी होणाऱ्या दिंडीच्या पालखीत पुस्तके कोणती असावीत हे पक्केच करून टाकावे – ज्ञानेश्वर, तुकाराम, फुले, आंबेडकर यांचे साहित्य आणि भारताची राज्यघटना एवढेच त्यात घ्यावे. सोबत, हातात एक बोर्ड धरलेला माणूस असावा. त्या बोर्डावर असे लिहिलेले असावे – “ यात ज्ञानेश्वर व तुकाराम यांचा समावेश हा त्यांच्या साहित्यबाह्य आणि अध्यात्मबाह्य अशा सामाजिक कामासाठीच फक्त करण्यात आलेला आहे. “

--- ००० ---

## साहित्यबाह्य

एक सुरुवात म्हणून टी. एस. एलियट यांचे हे वाक्य घेऊ --

“ The ‘ greatness ‘ of literature cannot be determined solely by literary standards; though we must remember that whether it is literature or not can be determined only by literary standards. “ ( ‘ Religion and Literature ‘ -- Selected Prose – T. S. Eliot – John Heyward – Penguin books – Faber & Faber – Page 32. ) याचा अनुवाद म्हणजे “ साहित्याचे ‘ श्रेष्ठत्व ‘ हे फक्त साहित्याच्या मानकांनी ठरवता येत नाही; पण आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की ते साहित्य आहे की नाही, हे फक्त साहित्याच्या मानकांनीच ठरवता येते. “ म्हणजेच अमुक एक साहित्य हे ‘ श्रेष्ठ ‘ आहे की नाही हे ठरवायला ‘ साहित्यबाह्य ‘ काही तत्त्व वा तत्त्वे लागतात. एलियटांची मते समजून घेणे वा त्यांवर मते देणे हा इथे हेतू नाही. आपल्या मराठीतल्या सध्याच्या एका चालू विषयाबद्दल बोलण्यासाठी हे घेतले आहे.

काल पुण्यात, आपल्या यंदाच्या साहित्य संमेलनाचे नवनिर्वाचित अध्यक्ष फादर फ्रन्सिस दिब्रिटो यांचा सत्कार झाला. त्या वेळी, “ मराठी विचारविश्व डबक्यासारखे राहावे, असे अनेकांना वाटते. दिब्रिटो यांच्या निवडीने डबके फुटून, प्रवाह खळाळता झाला आहे. नदीत दगड, धोंडे येतात. नदी त्यांना पोटात घेते, “ अशी टपली डॉ. कसबे ( डॉ. रावसाहेब कसबे ) यांनी मारली. “ वर्तमानाचे आकलन झालेला माणूस भूमिका घेतो. मराठी साहित्यिक भूमिका घेत नाहीत; पण फादर भूमिका घेतात, “ अशी टिप्पणी त्यांनी केली. याच प्रसंगी दिब्रिटो म्हणाले की, “ माझ्यावर हल्ल्याची चिंता नाही. आर्थिक घसरणीची चिंता आहे. खऱ्या प्रश्नांना भिडू दिले जात नाही. “ ( आधार – पुणे मटा पान ७ – आज दिनांक २७ सप्टेंबर २०१९. )

‘ भूमिका ‘ या विषयावर बऱ्याचदा माझे अकलेचे तारे तोडून झालेले आहेत आणि त्यावर एक मोठा लेखही मी लिहिला होता. त्यामुळे, त्यावर पुन्हा इथे लिहिण्याचा विचार नाही. प्रवाहाचे डबके कधी होते आणि तो मोकळा कधी राहतो, यावरही त्या लेखात बोलून झालेले आहे. इथे मला एका वेगळ्याच विषयाकडे लक्ष वेधायचे आहे.

आर्थिक घसरण हा खरा प्रश्न असून त्यावर बोलू दिले जात नाही, असे दिब्रिटो म्हणतात. प्रत्यक्षात तर डॉ. मनमोहन सिंग यांच्यापासून ते छोट्यामोठ्या विचारवंतापर्यंतच काय, वाचकांच्या पत्रव्यवहारापर्यंत अनेकजण अनेक माध्यमांतूनही यावर बोलताना दिसतात. यावर कुणीही कुणाला रोखलेले दिसत नाही. पण, हाही इथे महत्त्वाचा मुद्दा नाही.

साहित्याची साहित्यबाह्य मूल्य वापरून ठरणारी मौलिकता यावर इथे बोलायचे आहे. ‘ भूमिका ‘ म्हणजे डावी भूमिका – विद्रोही, परिवर्तनवादी भूमिका, हे काही स्पष्ट करायची गरज नाही. साहित्य वा कलेच्या क्षेत्रात भूमिकेचा गौरव करताना कुणी हिंदुत्ववादी भूमिका गृहीत धरत नाही. किंवा एखादी जातीय भूमिकाही गृहीत धरत नाही. तर, एलियट म्हणतात त्याप्रमाणे, भूमिका हे एक साहित्यबाह्य मूल्य मानता येते. आणि फादर दिब्रिटो हे अशी भूमिका घेणारे आहेत समजा. इथे प्रश्न असा येतो की ख्रिश्चन धर्माबाबत असलेली त्यांची कट्टर अस्मिता आणि ही भूमिका हे एकत्र असू शकतात का ? मग, त्याचप्रमाणे हिंदुत्ववादी असून भूमिकावाला असू शकतो का ? माझ्या आकलनाप्रमाणे कोणत्याही धर्माच्या अस्मितेची भूमिका ही वैचारिकच असते. मग, समजा डावी भूमिका विरुद्ध हिंदुत्ववादी भूमिका असा जर एक विरोध कल्पिला तर त्यांच्यांतले बरोबर-चूक कसे ठरवणार ? ते ठरवायला एखादे भूमिकाबाह्य मूल्य लागेल का ? की लोकशाही पद्धतीने संख्याबळावर ते ठरवायचे ? आणि साहित्यात, एक धार्मिक अस्मिता आणि दुसरी एक धार्मिक अस्मिता अशा गोष्टी समोर आल्या तर ? डावी धार्मिक अस्मिता असे काही असते का ?

मी काही एखादा अभ्यासू वा तज्ञ तत्त्वज्ञ नाही. वेगळ्याच क्षेत्रातली नोकरी आणि सामान्य माणसाचे दैनंदिन व्याप संभाळत साहित्य आणि कलेच्या क्षेत्रात काही काम करत आलेलो आहे. माझ्या आकलनाप्रमाणे मी अनेकदा हे मांडलेले आहे की अमुक एक वैचारिक भूमिका पायाभूत असणारे साहित्य हे संकुचित असते – ते सर्व मानवजातीचे नसते. व्यक्तिगत वा वैचारिक साच्याशिवाय जगण्याचे भान घेणारे आणि व्यक्त करणारे साहित्यच श्रेष्ठ असते. याचबरोबर, सर्वच प्रकारच्या साहित्यिक अभिव्यक्तींना पूर्ण स्वातंत्र्य असायला हवे आणि असंख्य कारणांनी असंख्य प्रकारच्या अभिव्यक्ती शक्य असतात, हेही मान्य करायला हवे.

मुख्य मुद्दा हा आहे की बऱ्याचदा असे दिसते की कवितेपेक्षा आधी कवीचे वा तसेच साहित्यिक या व्यक्तीचेच मूल्यमापन करायचे ! त्याची आणि आपली भूमिका जुळली की तो श्रेष्ठ ! साहित्यिकाचे व्यक्ती म्हणून, त्याच्या विचारांवरून मूल्यमापन करून ते मूल्यमापन त्याच्या साहित्यकृतीचेही आहे, असे गृहीत धरणे, ही पद्धतच चुकीची आणि घातक आहे. असे जर करायचे असेल तर साहित्याची गरजच काय, असे विचारता येते. हे लक्षात घेतले तर संमेलनाचा अध्यक्ष व्यक्तिगत स्तरावर कोणत्या विचारांनी वा आंतरविरोधांनी युक्त आहे हे न पाहता तो त्याच्या साहित्य-कर्तृत्वावर योग्य ठरू शकेल. तसे नसेल पटत तर मग लोकशाही पद्धतीने शक्तिप्रदर्शनाचा धोका नक्कीच संभवतो. या गोष्टीकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास आपले सांस्कृतिक वातावरण अधिकाधिक वाईट आणि असहिष्णुतेचे होत जाईल, असे वाटते.

साहित्यसंमेलनाचा आणि माझा काहीच संबंध नाही. पण, एक लेखक म्हणून निव्वळ मराठीच्या प्रेमाने मला माझे अभिव्यक्तिस्वातंत्र्य वापरावेसे वाटले. माझे बोलणे हे कोणत्याही वैचारिक भूमिकेचे नाही हे मराठी ‘ सारस्वतांच्या ‘ लक्षात येवो हीच ‘ प्रभुचरणी ‘ प्रार्थना !

--- ००० ---

रंगसंवाद

चं.प्र.देशपांडे यांची मुलाखत
मुलाखतकार : अभिराम भडकमकर

अभिराम भडकमकर :
नमस्कार.

चं. प्र. देशपांडे :
नमस्कार.

अभिराम भडकमकर :
मराठी व्हाटसॲप ग्रुपचा 2019 चा जीवनगौरव पुरस्कार आपल्याला बहाल करण्यात आला, त्याबद्दल सगळ्यात पहिल्यांदा थिएटर क्लॅप्स. आपली मराठी नाट्यसृष्टी मध्ये खूप वेगळ्या वाटेने जाणारे, अनवट वाटा चोखाळणारे नाटककार म्हणून ओळख आहे. आपण अनेकदा या सगळ्या संदर्भामध्ये व्यक्तही झालेला आहात. वेगवेगळ्या लिखाणांमधून, सोशल मिडीया मधून व्यक्त होतात. या सगळ्या गोष्टींचा विचार करता, अत्यंत कुतूहल असं मनामध्ये आहे की नेमकं आपल्या लिखाणापाठीमागचं प्रयोजन काय ? म्हणजे हे प्रयोजन तुम्हाला लिहिता लिहिता सापडत गेलं की अत्यंत विचारपूर्वक आणि या सगळ्या गोष्टींमध्ये मला काहीतरी करायचंय, म्हणाचंय म्हणून तुम्ही या सगळ्या प्रकियेमध्ये आलात?

चं. प्र. देशपांडे :
आता या प्रश्नाचं उत्तर देताना आज मी असं म्हणतो, सुरूवातीला हे नव्हतं, की तुकारामाच्याच काही ओळी आहेत -- "कोण्या कारणे हे झालेसे निर्माण । देवाचे कारण देव जाणे ॥" म्हणजे हेतू आख्ख्या विश्वालाच नाहीय, पूर्ण विश्वालाच काही हेतू नाहीय. हेतू हा प्रकार माणसाच्या बुद्धीनं निर्माण केला. माणसाच्या बुद्धीमुळं, बुद्धीचे काही उपयोग आहेत, पण मानवी संबंधांमध्ये बुद्धीचा अत्यंत वाईट परिणाम आहे. सगळे मानवी संबंध संघर्षमय करणं, हिंसा माजवणं, दुफळी माजवणं आणि कुठलाही मानवी प्रश्न, समस्या सुटू न देणं ही बुद्धीची कामं. त्यामुळं लिहिण्याचं प्रयोजन काय ? याचं उत्तर बौद्धिक द्यावं लागतं आणि मुळात मानवी संबंधांमध्ये आणि जगण्याच्या सगळ्याच प्रकियेमध्ये बुद्धीच्या मर्यादा दाखवून देणं हेच माझं काम आहे. त्यामुळं बौद्धिक प्रयोजनानं मी लिहीत नाही. हे आता मी म्हणतो. सुरुवातीच्या काळामध्ये, मला लहानपणी दम्याचा प्रचंड त्रास होता. म्हणजे जीवन -मरणाच्या अवस्था अनेकदा येत असत. तर त्यातून मला असे प्रश्न पडत गेले की, असंच जगायचं का आपण ? बाकी सगळी माणसं , मुलं छान जगतायत आणि

माझं जगणं असं का ? या प्रश्नांतून निरनिराळे तत्त्वज्ञ वाचणं, जे. कृष्णमूर्ती वाचणं, रमण महर्षी वाचणं तर असे प्रकार सुरू झाले. कारण मला जगण्याबद्दलचेच प्रश्न लहानपणापासून पडायचे. आता प्रश्न असा आहे की बौद्धिक प्रयोजन नाही, मग मी करतो काय लेखनामध्ये ? तर त्यावेळी मला माझ्या प्रश्नांमुळे येणारा एकाकीपणा व्यक्त करणं किंवा त्या प्रश्नांचं काय स्वरूप आहे हे समजून घ्यायचा प्रयत्न करणं, ही सुरुवातीची उद्दिष्टं असू शकतील. परंतु नंतरच्या काळामध्ये जसजसं मला आपलंच मानसिक स्ट्रक्चर काहीतरी गोंधळाचं आहे असं कळायला लागलं, एका ठिकाणी माझ्या पूर्ण तपासण्या झाल्या आणि त्यांनी सांगितलं याच्यात शारीरिक दोष काहीही नाहीयत, हे सगळं मानसिक आहे. हा जो त्रास होतो हा मानसिक आहे. मला चीड आली त्यावेळी. मी, मला एवढं प्रचंड पेन होतंय, सगळा त्रास होतोय आणि हा मानसिक म्हणून मोकळा होतो माणूस ! त्यावेळी होतो मुंबईत. एकतर मुंबईची हवा अयोग्य होती. मुबंई सोडल्यानंतर आणि स्वतःचे  मानसिक गोंधळ समजायला लागल्यानंतर तो आजार माझा गेला. बरा झाला. आता मी कलेची व्याख्याच अशी करतो -- " माया योगियांची माउली। जेथील तेथे नेऊनी घाली। कृपाळूपणे नाथिली आपण होय।।" म्हणजे काय ? आपण ज्याला माया म्हणतो ती योगियांची माता आहे. योगी म्हणजे कोण ? माझ्या मते ज्याला ज्याला जगणं समजून घ्यायचं आहे ते सगळे योगी. तर जगणं समजून घ्यायला पाहिजे अशी गरज कोण निर्माण करतं ? तर माया निर्माण करते. माया म्हणजे माझं कन्डिशनिंग. मला कसं वाटतं, माझे अनुभव कसे आहेत, हे, त्यातून मी बघतो जगाकडे. तसं तुझं नसतं. आणखी कोणाचं नसतं. त्यामुळं आजचं वास्तव म्हणतात ही कल्पना खोटी आहे. आजचं वास्तव असं काही नसतं. प्रत्येकाचं वास्तव वेगळं असतं. तर माया योगियांची माउली. ती प्रश्न निर्माण करते आणि तुम्ही या बौद्धिक गोंधळात अडकलेले आहात याची जाणीव करून देते. त्या शोधातनं ती तुम्हाला जेथील तेथे नेऊनी घाली, म्हणजे या गोंधळातनं बाहेर पडण्याचा मार्ग सापडेपर्यंत माया तुमच्या बरोबर असते. कृपाळूपणे नाथिली आपण होय, म्हणजे तुम्हाला एकदा ते कळलं की, हा काय गोंधळ आहे की माया निघून जाते. तुमची साथ सोडून देते. माझ्या मते कलेची व्याख्या तीच आहे. मायाच्या ऐवजी कला हा शब्द तिथं पाहिजे. कला ही जगणं समजून घेण्याची प्रक्रिया आहे. तर माझी जी प्रक्रिया आहे, असेल ती मी व्यक्त करतो. त्या प्रक्रियेचा वाचकाशी वा प्रेक्षकाशी संपर्क झाला की माझ्या कलेचे काम संपते. ती कला मग वाचकाने डोक्यात बाळगायची नसते. जगणं समजून घेण्याची प्रक्रिया व्यक्त करणं. माझं म्हणणं असं असतं की माझा अनुभव, समजा मला दुःखाचा अनुभव आहे. मी आजारी होतो. तेव्हाचं माझं दुःख. ते मी तुमच्या डोक्यात घातलं, ते मी व्यक्त केलं आणि ते दुःख तुम्हाला पोचवलं. हे मी काय करतोय ? कशाला तुमच्या डोक्यात घालायचं ते दुःख ? असा मला प्रश्न पडतो. कलेच्या बाबतीत व्यक्तिगत सुख-दुःखं व्यक्त करणं आणि ती दुसऱ्यांच्या डोक्यांत घालणं हे मला कलेचा फार खालच्या दर्जाचा प्रकार वाटतो. तसं नाही. तशी कला सगळ्यांच्या जगण्यामध्ये प्रस्तुत पण होत नाही. म्हणजे मी समजा अगदी धारावीच्या झोपडपट्टीत राहणारा माणूस आहे. त्यामुळं माझे अनुभव काहीतरी मौल्यवान आहेत असा गौरव करण्याची पद्धत आहे. तर तसं काही नाही. ते अनुभव समजा तिसर्या माणसाला आलेले नाहीयत. ते अनुभव त्याने वाचले. तो म्हणेल, अरे वा ! किती वाईट आहे. काय आहे, वगैरे ठीक आहे. परंतु त्याच्या आयुष्यामध्ये ती कला शेवटी प्रस्तुत होत नाही. ती बाहेर राहते. तो त्याच्या आहे त्याच कंडिशनिंग मध्ये, आहे त्या त्याच्या प्रोग्रॅमिंग मध्ये राहतो. त्यातनं हा गरिबीचा अनुभव, दाहकतेचा अनुभव तो रिसीव करतो आणि त्याच्यावर काहीतरी प्रतिक्रिया देतो आणि गप्प बसतो. त्या दाहकतेमुळे बदलणं वा न बदलणंही त्याच्या त्या कंडिशनिंगवरच ठरतं. माझ्या मते अनुभव कुठलाही असो तो समजण्याची जी प्रक्रिया आहे ती सगळ्याच अनुभवांना लागू असते. मग तो अनुभव मध्यमवर्गीयाचा असो, श्रीमंताचा असो, कोणाचाही असो. अनुभव शोषिताचा असणं हेच काहीतरी भारी आणि मौल्यवान असतं, असं गौरवात्मक बोलायची पद्धत आहे. ती फसवी आहे. तर ती प्रक्रिया जी आहे -- आकलनाची प्रक्रिया -- ती सगळ्यांच्या आयुष्यात प्रस्तुत असते. अशा प्रकारच्या कलाकृती मला महत्त्वाच्या वाटतात. आणि तशा

कलाकृतींची निर्मिती होत राहावी असं वाटतं. आणि माझी ती प्रक्रिया चालू आहे. सुदैवाने थोडीफार भाषा अवगत आहे. तर ती प्रक्रिया मला मौल्यवान वाटते आणि असं वाटतं की इतरांशीही ते बोलावं. कारण आपल्यासारख्याच गोंधळात इतरत्रही बरंचसं सगळं चाललेलं दिसतं. तर ही प्रक्रिया, आपल्याला जी दिसतेय, ती आपण व्यक्त करावी. हेतू म्हटला तर हा म्हणता येईल.

अभिराम भडकमकर:

दोन गोष्टी आहेत. एकतर या सगळ्यातून अलीकडच्या काळामध्ये तुम्ही एका निरर्थकतेचा शोध घेताय म्हणा किंवा निरर्थकतेकडे वळत चाललेला आहात असा एक प्रवास झालेला दिसतो आणि दुसरी गोष्ट अशी की तुम्ही आता म्हणालात की, कला ही जगणं समजून घेण्यासाठी आहे. कलेतनं जगणं समजून घेतल्यानंतर पुढे काय ? म्हणजे त्याचा काही समाजाला आकार देण्यासाठी उपयोग होतो किंवा त्याच्यानंतरची पुढची पायरी काय असू शकते -- हे जगणं समजून घेतल्यानंतर ?

चं. प्र. देशपांडे :

पहिली गोष्ट म्हणजे एखादा कोर्स पूर्ण केल्याप्रमाणे जगणं घेतलं समजून असं होत नाही – ती सततची जिवंत प्रक्रिया असते. आणि उपयुक्तता प्रत्येक गोष्टीची पाहणं, हे मी मघाशी जे म्हटलं, बौद्धिक -- हे माणसाच्या बुद्धीचा दुर्गुण आहे. माझ्या मते सर्वोत्कृष्ट कला ही अत्यंत निरुपयोगी असली पाहिजे. चांगली कविता जी आहे , दर्जेदार, मौल्यवान कविता ही निरुपयोगी असली पाहिजे म्हणजे असते. आपल्याकडं गेल्या काही वर्षांमध्ये कलेचा उपयोग करण्याकडे कल खूप आहे. साम्यवादी लोकांचं एक तत्त्व होतं की, कला ही क्रांतीचं हत्यार आहे. म्हणजे हिंसकपणे, विद्रोहीपणे, ॲटॅकिंग पद्धतीने अशी कला वापरायची. हे त्यांचं होत. हा कलेचा उपयोग करणं आहे. सामाजिक वा राजकीय परिवर्तनवाद हेही कलेचा उपयोग करणंच आहे. कलेचा असा उपयोग सुरू झाला की नक्कीच कलेचं मुख्य कार्य उणावतं. मुख्य कार्य म्हणजे मानवी जगण्याला परिपक्वतेचा स्पर्श देत राहणं.

अभिराम भडकमकर :

आपल्याकडे ते ज्ञान आणि मनोरंजनाच साधन अशा पद्धतीने आलं.

चं. प्र. देशपांडे :

अशा पद्धतीन आलं. लोक काय म्हणतात की आता तुम्ही हे वेगळं बोलताय किंवा या विद्रोहीपणाच्या मर्यादा सांगताय किंवा हे करता याचा अर्थ तुम्ही पण जुना कलावाद आणि जीवनवाद वगैरे जे होतं तेच पुन्हा सुरू झालं का ? तर माझ्या मते तो जो जीवनवाद किंवा बोधप्रदता, काहीतरी तत्त्व सांगायचं, काहीतरी आदर्श निर्माण करायचे अशा प्रकारचा जीवनवाद हा मला मान्य नाही. नुसता कलावाद याच्यात काही तथ्यच नाही. गरज सगळ्या गोष्टींची असते. नुसती करमणूक करणारं नाटकसुद्धा असतं. काही वेळेला माणूस अशा मानसिक अवस्थेत जातो की त्याला काहीच सहन होत नाही. समजा मला जुनी गाणी ऐकायची आवड आहे तर ती गाणी लावलेली मला सहन होत नाहीत. समजा मला तुकारामाची गाथा वाचणं आवडतं तर मला एक अभंग वाचणंही सहन होत नाही. डोकं बिथरायला लागतं. तर अशा वेळी जर करमणुकीच्या चांगल्या कलेनं, विनोदी नाटकांनी मला त्या सिच्युएशनमधनं, परिस्थितीतनं बाहेर नाही काढलं तर ती बिघडलेली रेकॉर्ड तिथंच फिरत राहते आणि जास्त जास्त हानी करत राहते. त्यामुळं त्या परिस्थितीतनं माणसाला बाहेर

काढणं हे महत्त्वाचं, अत्यंत महत्त्वाचं काम आहे. पण याचा अर्थ सारखी करमणूक करत बसणार का ? रोज उठसूट आपला करमणुकीला जातोय. हे माझ्या मते ते व्यसन होतं आणि त्या माणसाला एक कमकुवतपणा देणारी ही गोष्ट आहे. जगण्याला सामोरं जाण्यातली त्याची शक्ती घटत जाते. तर नुसती करमणूक नाही. ती समजून घेण्याची पद्धत पाहिजे. आता आपल्याकडं बर्याच प्रकारे लोकांना, मराठी माणसाला विशेषतः असं पटवून दिलेलं आहे की तुला दैनंदिन व्यापताप खूप आहेत, तुला सुख-दुःखं खूप आहेत, तू थकलेला असतोस. तू संध्याकाळी एखादी सीरियल बघ, जेवण कर आणि झोप. पुन्हा सकाळी कामाला जा. आणि हे बहुसंख्य मराठी माणसांना पटलेलं आहे. जणू जगात फक्त मराठी माणसालाच व्यापताप आहेत ! त्यामुळं आज तुम्ही प्रायोगिक नाटकांचा उत्सव करता. प्रयोगिक नाटक म्हणजे माझ्या मते सवयीतनं बाहेर पडायची हिमंत करणार नाटक. सवयी कुठल्या ? तर माझं मानसिक स्ट्रक्चर आहे. मला अशी सुख-दुःखं पाहिजेत. आणि हे झालं की मला थोडी करमणूक पाहिजे, थोडं असं पाहिजे. मला जिभेच्या चवीच्या गोष्टी पाहिजेत. मला बघायला सुंदर स्त्रिया पाहिजेत. या सगळ्या सवयी. तर या सगळ्या सवयींमध्ये मन आहे. याच मनाचं कोडकौतुक करत बसणं. सांस्कृतिक पण काही सवयी असतात, काही नीतिमत्तेच्या सवयी असतात. परंपर असतात. की असं असं वागण चांगलं. उदाहरणार्थ एक पत्नीव्रत चांगलं. उदाहरणार्थ विवाहबाह्य संबंध वाईट, हे सगळं मान्य असतं. नाटकाचा शेवट असा झाला पाहिजे की जे मान्य आहे. तेच परत सांगायचं. मनमोहन देसाई एका मुलाखतीत म्हणाले होते की, " आलेल्या प्रेक्षकाला फसवायचं नाही. त्याला जे पाहिजे ते द्यायचं. त्याला पाहिजे ना की नायकानं शेवटी खलनायकाला बुकलून काढलं पाहिजे. तर ते दाखवायलाच हवं." तर या पद्धतीचं जे आहे कलेचं क्षेत्र, त्याला प्रायोगिक नाही म्हणता येत. करमणुकीच्या क्षेत्राची एक गोष्ट मान्य परंतु इतर जी जगातली नाटकं आपण पाहतो वा वाचतो, पिरँन्देलोचं नाटक घ्या, ' वेंटीग फॉर गोदो ' नाटक घ्या. हे काय करतं, हे करमणूक नाही दाखवत. जगण्याचा आवाकाच देतं. आपल्याकडे दुसरी एक अशी पद्धत हल्ली निघालीय की नाट्यात्म विधान. हे पण या बौद्धिक लोकांनी काढलेलं आहे. सगळं बौद्धिक गोळी करायची. प्रत्येक गोष्टीची. म्हणजे आपल्याला समजलं अशी ही कल्पना. तुम्ही ' वेटींग फॉर गोदो ' चं नाट्यात्म विधान कसलं करणार ? ' सिक्स कॅरॅक्टर्स इन सर्च ऑफ ऍन ऑथर ' हे जे नाटक आहे, त्याचं एक नाट्यात्म विधान नसतं. तो संबंध आवाका असतो. सबंध जगणं समजून घेण्याची ती एक प्रक्रिया असते आणि टोटल अवेयरनेस असतो. एक घटना घडते तेव्हा त्याच्या कारणांमध्ये हजारो गोष्टी असतात. त्यामुळं माझं जे एक नाटक आहे त्याचं मी उदाहरण जाता जाता देतो की, एक संघर्ष चाललाय एका कारखान्यामध्ये कामगारांचा आणि मॅनेजमेंटचा. तो संघर्ष सबंध नाटकभर चालतो आणि दुसर्या अंकाच्या शेवटच्या अर्ध्या भागात याचा परिणाम भलतीकडेच काय झाला हे ते नाटक दाखवतं. मला काय म्हणाचंय की, आपण सगळे जे जगतो ते सगळे एकमेकांवर परिणाम करत असतो. आपण सुटंसुटं जगतच नाही. सगळी मानवजात, सगळं विश्व एकत्रच जगतं. एकास एक अशी कारण-परिणाम मीमांसा ही फारच ढोबळ असते. तर ते एकत्र जगणं जे आहे, आता ते एकत्र आहे म्हटल्यावर बाहेरनं बघायला कुणी नाहीय. त्यामुळे निरर्थकतेचा तुझा जो प्रश्न आहे याला अर्थ द्यायचा म्हजे काय ? अर्थ काय ? काहीतरी बौद्धिक अर्थ सांगणं संपूनच जातं.

अभिराम भडकमकर :
नाही -- तो एकच असू शकतो --

चं.प्र.देशपांडे:

काहीच नाही असू शकत. जर सगळं एक आहे तर बाहेर पडून मी त्याला बौद्धिक अर्थ -- अर्थ आपल्याला पाहिजे असतो तो बौद्धिक अर्थ पाहिजे असतो आणि बौद्धिक अर्थाचं हे नाहीच आहे. मी सुरुवातीलाच बोललो,

तुकारामाच्या चार ओळी सांगितल्या. त्याच्यात पण जर संबंध विश्वालाच जर बौद्धिक अर्थ नाहीय, तर माणसाच्या जगण्याला बौद्धिक अर्थ कुठला असणार आहे, असं. लोक म्हणतात काहीतरी आदर्श पाहिजे, कुठल्यातली विचारसरणीला तुम्ही जोडलेलं असलं पाहिजे. ते म्हणजे मानसिक सवयी झाल्या. ते ते आयडेंटिफाय केल्यामुळं आपण जिवंत असण्याची खात्री पटत राहते. आहे अजून आहे. कोणाचा तरी द्वेष करत राहा म्हणजे मी आहे. द्वेष हे देखील माझ्या असण्याचं एक साधन झालेलं आहे. तर हे सगळं जर खोटं आहे असं दिसायला लागलं तर ते खोटं आहे हे दिसणं जे आहे त्यातून काय निर्माण होतं ? सार्त्रचा नथिंगनेस. लोक काय म्हणतात, संपला तो. नथिंगनेस संपला. तुकारामाचे अभंग आहेत -- ‘ रिकामीक. ’ ‘ मागे पुढे अवघा दिसे रिता ठाव ’. सार्त्र जन्माला यायच्या आधी सगळं लिहून ठेवलेलं आहे. तेच आहे नथिंगनेस. जे कृष्णमूर्ती त्याला एम्पटीनेस म्हणतात. तर ही जी आहे ती मृत गोष्ट नाही -- ती जिवंत असण्याची, जगण्याची प्रक्रिया आहे. आणि त्यातले हे बौद्धिक गोंधळ टाळून जगणं आहे. याचा बौद्धिक अर्थ निर्माण होणार नाही, अशा अर्थी ही निरर्थकता.

अभिराम भडकमकर :

जगणं समजून घेण्याची नाटककाराची स्वतःची एक प्रक्रिया आहे आणि त्या सगळ्या प्रक्रियांमध्ये तो मश्गूल असणं आणि या सगळ्या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. गेले काही वर्षं आपल्याकडे तसा एक आग्रह निर्माण व्हायला लागलाय की समाजातल्या विद्वानांनी, विचारवंतांनी या सगळ्याला काही अर्थ दिला पाहिजे , एक दिशा दिली पाहिजे, त्यांची त्याच्यात एक भूमिका असली पाहिजे. मग या सगळ्या गोष्टींचं एकमेकांशी कसं जुळणार....?

चं.प्र.देशपांडे :

गेली काही वर्षं हे खरं आहे की आपल्याकडं सामाजिक बांधिलकी आणि भूमिका घेणं या गोष्टींचं प्रचंड महत्त्व माजवण्यात आलं आणि ते असं माजवण्यात आलं -- बुद्धीनंच. गरिबी जायला पाहिजे का नको ? हो जायला पाहिजे. विषमता जायला पाहिजे का नको ? जायला पाहिजे. कोण म्हणेल जायला नको ? म्हणजे आम्ही म्हणतोय ते बरोबर याची ही पूर्वतयारी झाली. हे जायला पाहिजे ना मग आमच्या विचारसरणीचेच व्हा. असा त्याचा अर्थ असतो. परंतु माझ्या मते कलेचा उपयोग हा असा एका कामासाठी करणं, हा एक प्रकार झाला. मी असं म्हणत नाही की सामाजिक बांधिलकीचं काही यायला नको पण दुसऱ्याही हजार प्रकारची कला असते, ती यायला पाहिजे. सगळ्याला वाव ठेवला पाहिजे. इथं काय करण्यात आलं की, मध्यमवर्गीय काय लिहणारायत ? जो सुखात जगतो तो काय लिहणाराय ? मुळात कुणी सुखात जगत असतो का, हा भागच वेगळा. ही भरल्यापोटीची करमणूक आहे. भरल्या पोटीची करमणूक ? खानोलकरांचं ' एक शून्य बाजीराव ' हे नाटक भरल्या पोटीची करमणूक ? ‘ वाडा चिरेबंदी ‘ हे नाटक भरल्या पोटीची करमणूक आहे का ? अशा जगातल्या कित्येक गोष्टी आहेत. प्रेम कविता एखादी चांगली किंवा गालिबच्या कविता ही काय भरल्या पोटीची करमणूक आहे ? मूर्खपणा आहे, असं म्हणणं. गधडेपणा आहे. तुम्हाला एकाच प्रकारची कला कळते. तुम्हाला कलेचा उपयोग सामाजिक कामासाठी करायचाय, राजकीय कामासाठी करायचाय. ते म्हणतात राजकीय भूमिका घ्या. राजकीय भूमिका घेतलीच पाहिजे असं कलाकारावर कुणी बंधन घालू शकत नाही. मी म्हणतोय जर ही जगणं समजून घेण्याची प्रक्रिया असेल तर ती बौद्धिक कुठल्या साच्यानं बंद केलेली किंवा मर्यादित केलेली असली पाहिजे, असा याचा अर्थ होतो. ती साच्यांनी मर्यादित असणार नाही. सार्त्रचं ' क्राईम पॅशनेल ' सारखं नाटक आहे. त्याच्यामध्ये आपण काय सांगणार, त्याचं नाट्यात्म विधान किंवा त्याची भूमिका काय सांगणार ? सबंध जगणं समजून घेणारं नाटक आहे ते. सबंध आवाका तुम्हाला येतो. एक भान येतं – अवेयरनेस येतो. तीच परिपक्वता. आणि मानवी जगण्यातलं तेच मूल्य आहे. ' फ्लाईज '

सारखं नाटक तुम्हाला सगळं समोर आणतं, की मी केलेल्या कृतीच्या परिणामातच मी मेलं पाहिजे का, की मी त्यातनं मोकळा राहू शकतो ? अशा प्रकारचे अत्यंत महत्त्वाचे प्रश्न माणसाच्या जगण्यात आहेत. गौतमबुद्धाला काय पडलं होतं ? मस्त राजा होता, प्रिन्स होता. दुःख पाहिलं आणि दुःख म्हणजे काय ? याचा शोध घेतला पाहिजे असं त्याला वाटलं. तसं अनेक कलावंतांना होऊ शकतं. या जगण्यातल्या ज्या समस्या आहेत त्या फक्त आर्थिक आणि राजकीय वाटत नाहीत. या प्रत्येक रिलेशनशिप मध्ये, आता मधे मी एक लेख वाचला की लग्न होण्यापूर्वी तीन ब्रेकअप होणं नॉर्मल समजायचं म्हणे यापुढे ! हा जो प्रकार आहे तो काळाचा माहिमाही असेल, परंतु अशा प्रकारचे संघर्ष प्रत्येक रिलेशनशिप मध्ये आहेत. सर्व नवराबायको, मुलं- पालक असो, संस्थांमध्ये असो, पुढारी आणि त्यांचे फॉलोअर्स असोत. सगळीकडं सारखे संघर्ष आणि सारखी फूट पडणं. हे का होतं असा प्रश्न कलावंताला पडता कामा नये, हे तुम्ही कोण सांगणार ? पडतो. माझ्या आणि इतरही प्रत्येक रिलेशनमध्ये सर्वच संबंधांमध्ये संघर्ष का ? मला स्वस्थता का नाही ? मला सगळं निरर्थक का वाटतं ? मला सगळं मूल्यहीन का वाटतं ? कुठलीच गोष्ट मला सत्य वाटत नाही. हा जे बोलतो ते पण मला खोटं वाटतं, बीजेपीवाला बोलतो तेही खोटं वाटतं, काँग्रेसवाला बोलतो तेही खोटं वाटतं. माझं कशानंच समाधान होत नाही. इथं काहीच चांगलं होणार नाही अशी समजा माझी निराश अवस्था झाली. तर ही खरी समस्या आहे. ती राजकीय नाही. पण मग आता ते म्हणतील राजकीयमुळंच तयार झाली ती समस्या. अशी प्रत्येक गोष्टीला तुम्ही राजकीय कारणं सांगू शकत नाही. माणसाच्या जगण्यामध्ये हजारो समस्या आहेत आणि त्या सगळ्या समस्या एकमेकांत गुंतलेल्या आहेत आणि प्रत्येक गोष्ट हजारो कारणांनी आणि प्रभावांनी युक्त आहे. आणि त्यामुळं, ही समस्या, याचं हे उत्तर, आता ही समस्या, याचं ते उत्तर, असं चालणार नाही म्हणजे होऊच नाही शकणार. असं असूच नाही शकत. एकेक समस्या पाहणं आणि सर्वच समस्यांचं काही मूळ असेल का हा प्रश्न पडणं यांत फरक आहे.

अभिराम भडकमकर :

पण आता एक शेवटचा मुद्दा आहे की समाजामध्ये म्हणा किंवा एखाद्या विषयामध्ये अशा संबंधांचे प्रसंग येतात. ज्यावेळी जसा आणीबाणीसारखा प्रसंग किंवा वेगवेगळ्या प्रकारचं, त्याच्यामध्ये कलावंतांनी काही करावं, त्याच्यामध्ये काहीतरी भूमिका बजावावी अशी एक समाजाची अपेक्षा असते तर त्या बाबतीमध्ये आपलं काय...?

चं. प्र. देशपांडे :

अपेक्षा हा तू खूप सौम्य शब्द वापरलास. सक्ती असते असं मी म्हणेन. विशेषतः सांस्कृतिक क्षेत्रात काम करणारे म्हणजे सांस्कृतिक नेतृत्व आपण करतोय अशा भ्रमात असलेले खूप लोक आहेत. त्यांची इतर लेखकांना, कवींना, चित्रकारांना, सगळ्यांना नैतिक सक्ती असते. हे केलंच पाहिजे नाहीतर तुम्ही बाह्य आहात, अलिप्त आहात, लोकांबद्दल बेफिकीर आहात. आता समजा एझ्रा पांउडने फॅसिस्ट लोकांना पाठिंबा दिला होता तर एझ्रा पाउंडची कविता टाकून द्यायची ? पंडित सत्यदेव दुबे स्वतःला हिंदुत्ववादी म्हणत होते, मग त्यांची नाटकं नाही बघायची का ? हा गाढवपणा आहे. असं काही नाही. काय केलं पाहिजे हे कुणी कोणाला सांगायचं नाही. तुम्ही सुचवा, मत मांडा पण लेखकांनी हेच केलं पाहिजे असं नाही म्हणता येणार. आणि तुम्ही लेखकाचं मूल्यमापन नका करत बसू. मधे एक विद्वान म्हणत होते, ते पानसरे, कलबुर्गी, लंकेश, दाभोळकर, यांचे जे खून झाले तसंच कलावंतांना व्हायला पाहिजे. त्यांचे खून झाले हे वाईट झालं, अत्यंत निंद्य गोष्ट. हेसुद्धा मी मघाशी म्हणालो बौद्धिक संघर्षाचे प्रकार त्यातूनच होतंय. हा बुद्धिप्रामाण्यावाद हा मोठा प्रॉब्लेम आहे. तर ते ठीक आहे. त्याबद्दल माझं काहीच म्हणणं नाही. परंतु याचा अर्थ मी त्यांची मनस्थिती माझी करून घ्यायची आणि मी तसं जगलं पाहिजे, नाहीतर मी लिहूच नये, मी लेखकच नाहीय, असं जर कुणी म्हणायला

लागलं तर ते मी फेटाळून लावतो. मला ते मान्य नाही. माझ्या दृष्टीनं मी मघाशी सांगितलं ती जगण्याची प्रोसेस समजून घेत राहणं, माझी बुद्धी, माझ्या अपेक्षा असं हे सगळं कसं गोंधळ निर्माण करतंय, दुसऱ्यांच्या आणि माझ्या रिलेशनशिप मध्ये काय घडतयं हे पाहत आणि सभजून घेत जगणं याला मी महत्त्व देतो. त्यामुळं मी भूमिका घेत प्रत्येक वेळी राजकीय काम करेन असं नाही आणि हे जे म्हणतात की राजकीय परिस्थितीमुळं हे निर्माण होतं. उलटं आहे. माणसाच्या मनस्थितीचे जे प्रॉब्लेम आहेत त्याच्यामुळं हे राजकीय आणि विषमतेचे प्रॉब्लेम तयार होतात. हे पाहिलं पाहिजे. तर हे काय करतात ? म्हणजे घोड्यापुढं टांगा बांधतात. त्याना ते एक एक समस्या सोडवण्यात इंटरेस्ट असतो. पण कलावंताला या समस्या निर्माण होण्याचं मुलभूत स्ट्रक्चरच काय आहे हा इंट्रेस्ट असू शकतो. त्यावर माझं स्पष्ट मत असं आहे की, सांस्कृतिक नेतृत्व कुणी घेऊ नये, कुणी कुणाचा गुरू नाहीय. तुम्हाला कुणी कसली ऑथॉरिटी दिलेली नाही. तुम्ही अधिकारवाणीचे कुणी महापुरुष जन्मलेले आहात असं काही नाहीय. कलेचा आवाका हा फार प्रचंड असतो. एक काम तुम्हाला करावंसं वाटतं तर ते करा. त्यानंतर समाजकार्य करावसं वाटतं, तेही करा. राजकीय भूमिका घेऊन तुम्हाला निवडणुकीला उभं राहयचंय तर तुम्ही उभे रहा. परंतु प्रत्येक कलावंतानं हे केलं पाहिजे हा दबाव तुम्ही करायला लागलात तर माझं स्पष्ट मत आहे की कलावंतांनी आपल्या आपल्या आकलनाशी प्रामाणिक राहिलं पाहिजे. आता कोण प्रामाणिक राहणार नाही ? ज्याला माझ्या लेखनाला रेकग्निशन पाहिजे. समजा आता बक्षीसं देण्याच्या ज्या समित्या आहेत, अभ्यासाला पुस्तकं कोणती लावायची, सेमिनार कुठले घ्यायचे हे ठरवणारी समजा विशिष्ट विचारसरणीची माणसं आहेत. मला रेकग्निशन , माझ्या लेखनाला रेकग्निशन मिळणार तर यांच्याकडनंच मिळणार आहे. तर लेखनाला पावती मिळणं याला ज्याला महत्त्व द्यायचंय असे काही लेखक असतात ते या ट्रॅपमध्ये पडणार, ते या जाळ्यात पडत राहतील. परंतु जे लेखक असं करणार नाहीत ते कभी दर्जाचे लेखक किंवा त्यांना समाजाच्या दुःखांबद्दल काही काळजीच नाही असं म्हणणं हा मूर्खपणा आहे. लेखकाला, कुठलाही लेखक असा नसतो, जरा बर्यापैकी असला म्हणजे , लोकांना तडफडू दे, गरिबी राहू दे, विषमता राहू दे असं म्हणणारा कुठलाही लेखक नसतो. परंतु तुम्ही वातावरण असं ठेवलं पाहिजे संस्कृतीत. की लेखकाला त्याच्या त्याच्या आकलनाशी प्रामाणिक राहून आत्मनिष्ठेनं असं लिहिता आलं पाहिजे. तुम्ही त्याला, त्याच्यामध्ये अपराधी भाव जागा करता कामा नये. तू हे जर केलं नाहीस, तू या मोर्चात सामील झाला नाहीस, तू या पत्रकावर सही केली नाहीस, तर याचा अर्थ तुला समाजाच्या दुःखाची फिकीर नाही. तुला ही हुकूमशाही येतेय त्याची काळजी नाही. तू लोकांनी मरावं या वृत्तीचा माणूस आहेस. तू काय लिहिणार ? हा जो दबाव आहे तो खोटा आहे, नुसता खोटा नाही, हिसंक आहे आणि हुकूमशाहीचा आहे. असहिष्णुतेचा आहे. असा दबाव कुणी कुणावर निर्माण करू नये. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे कलावंत आणि लेखकच असा दबाव दुसऱ्या कलावंताच्यांवर आणि लेखकांच्यावर तयार करतात. ही अत्यंत वाईट गोष्ट आहे असं माझं मत आहे.

अभिराम भडकमकर :

खरंच मनापासून धन्यवाद. खरंच खूप वेगळ्या पद्धतीची मांडणी आणि खूप व्यापक मांडणी आहे. हे सगळं समजून घेण्यासाठी हा वेळ खरं तर कमी आहे आणि ज्या पद्धतीनं आज जो सगळा रेटा वाढतोय त्यामध्ये अशा पद्धतीचा सूर लावणं आणि तो खूप महत्त्वाचा आहे, खूप व्यापक आहे आणि या सगळ्या चर्चेबद्दल अत्यंत मनापासून आपला आभारी आहे आणि आमच्या मराठी नाटक व्हाटस्ॲप ग्रुपचा पुरस्कार तुम्ही स्वीकारलात. हा जीवनगौरव असला तरी तो स्वल्पविराम आहे याची आम्हाला जाणीव आहे. त्यामुळे अत्यंत मनापासून धन्यवाद आणि आपल्या पुढच्या सगळ्या रंगसेवेसाठी मनापासून शुभेच्छा..

चं.प्र.देशपांडेः

धन्यवाद !

वरील मुलाखतीची लिंक –

https://www.youtube.com/watch?v=yo3AX9m1hes&fbclid=IwAR2Yx-S8VaDturD8oihzipdy3ZTXbH74L5j9jUAhFimDkgSBAYzf4zmNmOU

मुलाखतीत बोलताना कुठे कुठे काही वाचल्याचे मनात असतेच. ते काय, कसे होते हे लक्षात यावे म्हणून --

उत्तम कांबळे यांच्या लेखाची लिंक –

https://lekhsangrah.wordpress.com/tag/%E0%A4%AD%E0%A5%82%E0%A4%AE%E0%A4%BF%E0%A4%95%E0%A4%BE/

" वेगवेगळ्या प्रकारच्या विषमतेवर उभ्या असलेल्या समाजात अनेक वेळा माणूस जसा चेहरा हरवून बसतो, तसा व्यवस्था त्याचा चेहरा हिरावूनही घेते. वरची चामडी तर फाडून काढतेच; शिवाय तिच्या मागं लपलेल्या चामड्याचे सर्व पदरही फाडून, कुरतडून काढते. त्याचा इतिहास, भूगोल नाकारते. वर्तमान आणि भविष्य नाकारते. असे बिनचेहऱ्याचे किंवा व्यवस्थेच्या जबड्यात आपला चेहरा गमावून बसलेले कोट्यवधी लोक जगात आहेत. " -- उत्तम कांबळे.

-- व्यवस्था म्हणजे काय ? ती काही एखाद्या वस्तूसारखी वा पावसासारखी आकाशातून पडत नाही. आपले सर्वांचे एकमेकांवरचे प्रभाव, सर्वांचे स्वार्थ, वर्चस्वाची इच्छा, सुखेच्छा, तृष्णा – हे सगळे म्हणजे व्यवस्था. या सगळ्यातूनच व्यवस्थेचे घडणे चालू असते. मनाचा वापर करण्याची सर्वसामान्य आणि सर्वमान्य पद्धत म्हणजे व्यवस्था. आपण स्वतःच असतो व्यवस्था. म्हणूनच तर बुद्धाने स्वतःत बदल करण्याला महत्त्व दिले.

" सामान्य माणसाची कहाणी सांगण्यासाठी साहित्यिकाने लिहिले पाहिजे. व्यवस्थेतील वाईट प्रकारांवर भाष्य करण्याची तसेच उदात्त विचारांची पेरणी करण्याची संधी लेखकाला असते. व्यवस्थेतील वाईट प्रकारांमुळे आजच्या परिस्थितीत सामान्य माणूस जगण्यासाठी हतबल आहे. त्यासाठी लेखन करताना अभिव्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी होत असेल तर लेखकांनी आवाज उठवलाच पाहिजे. " -- लक्ष्मीकांत देशमुख ( पुणे सकाळ पुरवणी पान २ दिनांक १६-१२-१७. )

" लेखक-कवी जेव्हा माणसाच्या दुःख, वेदना, शोषणाची कहाणी सांगत असतो व त्याचा आवाज बनत असतो, तेव्हा त्याला ज्या व्यवस्थेमुळे हे दुःख होते त्यावर भाष्य तो करतो. खरा जातिवंत लेखक हा राजकीय लेखकच असतो, राजकीय भाष्यकारच असतो. " लक्ष्मीकांत देशमुख यांचे अध्यक्षीय भाषण.

-- देशमुखांच्या वरील वाक्यांमध्येही व्यवस्था ही कुणी बाहेर उपलब्ध असणारी खलस्थिती असल्याचे म्हटले आहे. शिवाय, लेखकाने काय केले पाहिजे हे सांगणे आणि जातिवंत लेखक म्हणजे काय हे सांगणे आहेच. वरील मुलाखतीत म्हटल्याप्रमाणे आवाका घेणे, भान घेणे, अवेयरनेसकडे जाणे यालाच मूल्यनिर्मिती समजणारे काही लेखक असू शकतात याकडे देशमुखांनी पूर्ण दुर्लक्ष केलेले आहे. लेखक म्हणून इतरांना ते प्रवेशच नाकारत आहेत. ही अत्यंत हेकट, हट्टी आणि संकुचित भूमिका आहे. उदात्त विचारांची पेरणी, बोधप्रदता, असे असणे त्यांना महत्त्वाचे वाटते.

यालाच जोडून आपले आणखी एक विद्वान डॉ. गणेश देवी काय म्हणाले तेही इथे देणे योग्य होईल – “ आपल्यातला प्रत्येकजण दाभोलकर, पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश व्हायला तयार नसेल तर आपल्यापैकी कुणीही साहित्यिक नाही. “ ( पुणे मटा संवाद पुरवणी ०७-०१-१८. ) -- कुणाचाही खून होणे निंद्यच आहे पण याचा अर्थ सर्व लेखकांनी तोच त्यांचाच आदर्श घ्यावा असे म्हणणे, हे वेडेपणाचे आहे. आता काही नवे लेखक तर आदर्श, मूल्य, सत्य – हे सर्वच नाकारणारेही असू शकतात. कुणी कुणाचे वर्ग घ्यावेत, असे इतके कुणी मूर्ख वा मातीचे गोळे नसतात. प्रत्येक लेखक हा त्याच्या त्याच्या चिंतनशीलतेतून घडत असतो. त्याला ते स्वातंत्र्य ठेवलेच पाहिजे.

याच प्रकारच्या उथळ आत्मगौरवातून  हे एक पाहा --
“ ग्रामीण साहित्य चळवळ म्हणजे प्रस्थापित साहित्याला आव्हान. “
-- डॉ. नागनाथ कोत्तापल्ले ( पुणे लोकसत्ता पुरवणी, ०१-१२-१७, पान ३ ) .
-- साहित्य हे काही राजकीय मारामाऱ्यांचे अस्मिताक्षेत्र नव्हे. दुसरे म्हणजे, साहित्यकृतीतला अनुभव ग्रामीण आहे की शहरी आहे, गरीबीतला आहे की मध्यमवर्गीय आहे की श्रीमंत वर्गीय आहे यावर त्या साहित्यकृतीचे श्रेष्ठत्व अवलंबून नसते, ही प्राथमिक गोष्टही इथे दुर्लक्षिली गेलेली आहे.

आता हे पाहा – दि. के. बेडेकर तर सरळच नवकाव्यातील विफलतेचा दोष ‘ व्यवस्थे ‘ वर ढकलत आहेत. सर्वांची सुखेच्छा आणि वर्चस्वाची इच्छा कायम ठेवून या व्यवस्थेत काय मूलभूत बदल होऊ शकतील ? मुळात व्यवस्था ही एकास एक अशा कारण-परिणामांची साखळी असते का की ती अगणित प्रभावांनी युक्त असते ? मौल्यवान कला ही माणूस परिपक्व होण्याला महत्त्व देत असते, नुसते काही बाह्य बदल करण्याला नव्हे – याकडे त्यांना लक्षच द्यायचे नाहीय. हे पाहा -- बेडेकरांच्या समीक्षेबाबत लिहिताना, मालशे-जोशी, त्यांच्या ‘ आधुनिक समीक्षा सिद्धांत ‘ या ग्रंथात पान २१५ म्हणतात --
“ कलाकृतीच्या निर्मितीसंबंधी त्यांनी घेतलेली भूमिका मार्क्सवादी आहे. व्यक्तिसमाज यांच्या द्वंद्वात्मक संबंधातून कलाकृतीचा जन्म होतो असे ते म्हणतात. अन्य मार्क्सवादी समीक्षकांप्रमाणे बेडेकरही कलाकृतीचे मूळ वर्गजाणिवेत शोधतात. ‘ साहित्य : निर्मिती आणि समीक्षा ‘ या ग्रंथातील ‘ नवकाव्यातील विफलता ‘ आणि ‘ मानवजंतूंसाठी वेदांत ‘ या नवकाव्यावरील व नवकथेवरील लेखनात ते स्पष्ट करतात की या नवसाहित्यातील विफलता उत्पादकाशी संबंधित नसलेल्या मध्यमवर्गाच्या जाणिवेतून निर्माण झाली असून त्या वर्गानेच विकृत स्वरूपाच्या व्यक्तिवादातून मानवजंतूंचे तत्त्वज्ञान निर्माण केले आहे. “

आता खालील दोन अवतरणे पाहा. यांवर वेगळ्या भाष्याची गरजच नाही --

“ जागतिक पातळीवर हजारो वर्षांपासून माणसाचा, साहित्याचा आणि साहित्यिकाचा अंत करीत आलेल्या सरंजामशाहीच्या मदतीला मागील काही वर्षांत अधिक जालिम हत्यारं घेऊन भांडवलशाही आलेली आहे आणि तिची वकिली करणारे तिचे उत्तराधुनिकतावादी, उत्तरसंरचनावादी प्रचारक आलेले आहेत. “ ( साहित्याचे इहवादी सौंदर्यशास्त्र – पान १४३ – यशवंत मनोहर. )

“ सरंजामशाहीनं आणि विशेषतः भांडवलशाहीच्या उत्तराधुनिकतावादानं समाजवाद, इतिहास आणि विचारसरणी यांच्या अंताबरोबर माणसाचाही अंत जाहीर केला आहे. या सर्व अंतांचा अंत करू शकणारी माणसंच पृथ्वीला आता नवा माणूस आणि तुरुंग तोडणारी भाषा देऊ शकतात. “ ( साहित्याचे इहवादी सौंदर्यशास्त्र – पान १६३ – यशवंत मनोहर. )

वरील सर्वच अवतरणांमध्ये एक दुराग्रह, आक्रमकता असल्याचे दिसून येते. विशिष्ट उद्देशासाठीच फक्त कलेचा उपयोग केला पाहिजे, अशी ही असहिष्णू भावना आहे. ही अयोग्य असून सर्व तऱ्हांच्या कलाभिव्यक्तीला मुक्त स्वातंत्र्य असायला हवे, असे इथे म्हणायचे आहे. मौल्यवान कला ही हेतू आणि उपयोग यांची बंधने स्वीकारत नाही, म्हणून तर तिचा आवाका मोठा असतो, हे लक्षात घ्यायला हवे.

--- ००० ---

अभिव्यक्तिस्वातंत्र्य

-- चं. प्र. देशपांडे.

महाराष्ट्रीय कलोपासकचे पदाधिकारी, स्वयंसेवक, मंचावरील मान्यवर, स्पर्धेत सहभागी सर्व महाविद्यालये आणि विद्यार्थी, परीक्षक आणि प्रेक्षक – प्रथमतः मी स्पर्धेतल्या सर्व विजेत्यांचे अभिनंदन करतो आणि ज्यांना यश मिळालेले नाही त्यांना एकच सांगू इच्छितो की मीही यश आणि अपयश या दोन्हींतून गेलेलो आहे – आपले काम चालू ठेवणे हीच अपयशाला श्रद्धांजली समजावी. सुदैवाने या अंतिम स्पर्धेला तुम्हाला नाट्यक्षेत्रात हयात घालवलेले उत्तम, अभ्यासू परीक्षक लाभलेले होते. त्यांचा निर्णय दिलखुलासपणे स्वीकारा आणि शक्य झाल्यास त्यांच्याशी चर्चा करून आपली नाट्यसमज वाढवून घ्यायचा प्रयत्न करा. मला आणखी एक गोष्ट सुरुवातीलाच सांगायची आहे – ती म्हणजे या जल्लोशी आणि सळसळत्या उत्सवात तुम्ही मला दोन शब्द बोलण्याची संधी देत आहात त्याबद्दल मी खूपच कृतज्ञ आहे. यासाठी मी तुम्हा सर्वांचा आभारी आहे. बोलणार आहे याचा अर्थ खूप लंबेचौडे भाषण करणार आहे असे नाही. पण, लेखकांना आणि कलावंतांना नेहमीच महत्त्वाच्या ठरणाऱ्या एका प्रश्नाबद्दल मी बोलणार आहे, थोडक्यात. तो प्रश्न म्हणजे अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा आहे. याचा अर्थ मी फक्त राजकीय वातावरणाबद्दल बोलणार आहे असा मुळीच नाही. साहित्य संमेलनांत एक अशी पद्धत रुळते आहे की राजकारणाचे क्षेत्र साहित्याला वर्ज्य असूच नाही शकत, असे म्हणायचे आणि फक्त राजकारणावर बोलायचे ! साहित्याबाबत एक वाक्यही बोलायचे नाही ! मी अर्थातच तसे काही करणार नाही. अभिव्यक्तिस्वातंत्र्य हा नेहमीच माझ्या चिंतनाचा विषय राहात आलेला असल्याने, माझ्या मराठी नाटकाच्या क्षेत्रातल्या नव्याने उभरत्या मित्र-मैत्रिणींना विचाराला काही खाद्य देण्याचा माझा विचार आहे.

कलेत राजकारण वर्ज्य नसते असे म्हणाणाऱ्यांचे एक वैशिष्ट्य विचारात घ्यायलाच हवे असे असते. राजकारण वर्ज्य नाही असे म्हणणारे हे लोक कलेतून बाकी सगळे मानवी जगणेच हद्दपार करू इच्छितात. प्रेम, एकाकीपणा, निराशा, उत्तर-आधुनिक जाणिवा हे सगळे कलेत आले तर त्याला ते भरल्या पोटीची करमणूक वा कलावंताची असंवेदनशीलता म्हणतात. या प्रकारच्या कलावंतांची आणि विचारवंतांची संख्या जेव्हा समाजात वाढते तेव्हा कलावंताच्या सर्जकतेवर तो एक दबाव निर्माण होतो. अशा वेळी आपले अभिव्यक्तिस्वातंत्र्य अबाधित राखणे हे कलावंताला जमले नाही तर तो स्वतःची सर्जकता गमावून बसण्याचा धोका असतो. यात आणखीही एक प्रश्न लक्षात घेण्यासारखा असतो. उदाहरणार्थ, गो. पु. देशपांडे यांचे
‘ उध्वस्त धर्मशाळा ‘ हे नाटक घ्या. त्यातले श्रीधर कुलकर्णी हे पात्र एका विशिष्ट विचारसरणीचे आहे म्हणून त्याला चौकशीच्या दिव्यातून जावे लागते, असे आहे. नाटक अर्थातच त्याची बाजू घेऊन लिहिलेले आहे. त्याचे उदात्तीकरणही आहे. ‘ बघा, किती हा अन्याय ! ‘ असा टोन आहे. पण, त्याच विचारसरणीची सत्ता असलेल्या देशांत विरोधकांना हवेतच मिसळून टाकले जाते, त्याचे काय – हा प्रश्न इथे येत नाही. अशा गोष्टींची भलावण करणारे लोक आणि कोणत्याही भूमिकेचे फुगे फुगवणारे लोक हे मानवी जगणे समजून घेण्याची सर्जकता नाकारत असतात. ते स्वतः तर ती नाकारतातच पण इतरांनीही ती नाकारली पाहिजे असा दबाव ते विविध प्रकारे निर्माण करू पाहतात. तो झुगारून कलावंताला आपल्या स्वतःच्या चिंतनशीलतेने आणि सर्जकतेने जगता येणे आणि अभिव्यक्त होता येणे हे अशा वातावरणात महत्त्वाचे ठरते. असो. यावर फार वेळ न घालवता पुढे जाऊ.

या निमित्ताने तुमच्याशी थोडे बोलायचे म्हणून २७ तारखेला सकाळी मी तीन एकांकिका पाहिल्या. त्यांतल्या एकीचे उदाहरण घेतो आहे. ती म्हणजे, ‘ वन टाईम सेलेब्रेशन ‘. मी शाळाकॉलेजात असताना एक लेख वाचला होता, त्यात असे होते की अमेरिकेत एका तरुण अविवाहित मुलीची आई तिला गर्भनिरोधक गोळी घ्यायची आठवण करते ! आम्ही अचंबित होऊन एकमेकांत याची चर्चा करायचो. किती वेगळे वातावरण ! इकडे हे कदापि घडणे शक्य नाही, असे आम्ही

समजायचो. मी पाहिलेल्या तुमच्या त्या एकांकिकेत असे धक्क्यावर धक्के आहेत. आदल्या वर्षी मुलाला त्याच्या आईने वाढदिवसाला संभोगविषयक पुस्तक भेट दिलेले आहे आणि या वर्षी ती त्याला निरोधांचे पाकीटच भेट देते आहे ! त्याबाबत पति-पत्नींतले संवाद आहेत ! शेवटी कहर म्हणजे तो मुलगा समसंभोगी असल्याचे कबूल करतो. आणि ही विकृती वगैरे न समजता किंवा दुःखाचा खूप गोंधळ न घालता आईवडील ते स्वीकारतात ! काही वर्षांपूर्वी ही एकांकिका खूपच सनसनाटी आणि वादग्रस्त ठरली असती. आज ती निर्भयपणे सादर होते आहे. याचा अर्थच ती एक तर सेन्सॉरही झालेली आहे आणि प्रेक्षकही बराचसा समजुतदार झालेला आहे. असे पाहिले तर हे अभिव्यक्तिस्वातंत्र्य लेखकाने घेतलेलेही आहे आणि शासनाने व समाजाने दिलेलेही आहे, असे म्हणता येते. असे जुळून आले नाही तर समस्या निर्माण होतात.

काही प्रश्न समाजाकडून तयार होतात. अशा नाटकांची उदाहरणे म्हणजे, ‘ यदाकदाचित ‘, ‘ सखाराम बाइंडर ‘, ‘ घाशीराम कोतवाल ‘, ‘ मी नथुराम गोडसे बोलतोय ‘  आणि ‘ गिधाडे ‘. कधी अश्लीलतेचे आरोप कधी इतिहासाशी प्रतारणा केल्याचे आरोप तर कधी पूज्य विभूतींचे वा देवदेवतांचे विडंबन केल्याचे आरोप. ‘ गिधाडे ‘ मध्ये एका स्त्रीच्या पोटावर लाथ मारल्याने होणाऱ्या तिच्या गर्भपाताचे दृश्य होते. ते लोकांना खूपच बीभत्स वाटले. दिग्दर्शक दुबेजींनी यावर मार्ग काढला. त्या स्त्रीच्या साडीवर दिसणारे रक्ताचे डाग त्यांनी निळे दाखवले आणि हा निळा रंग लाल समजावा, अशी घोषणा केली. या प्रकारे, कधी मार्ग काढून वा कधी संघर्ष करून पुढे जावे लागते. अलिकडेच प्रेमानंद गज्वी यांचे ‘ छावणी ‘ हे नाटक आपल्या शासकीय सेन्सॉरने बराच काळ अडवून ठेवले होते. लेखकाला त्यासाठी संघर्ष करावा लागला. इथे माझ्याही एका नाटकाचे उदाहरण देतो. माझे, ‘ जागचं हलायचं नाही ‘ या नावाचे एक दोन अंकी नाटक होते. त्याला मान्यता प्रमाणपत्र मिळालेलेही होते. पण, नंतर त्यातला काही भाग पुनर्लिखित करून त्यात काही बदल केल्यामुळे ते पुन्हा शासनाकडे मी पाठवले. दरम्यानच्या काळात डान्सबार बंदी झालेली होती. गंमत बघा – ते नाटक सत्तरच्या दशकातल्या हिंदी सिनेमाची एक बनावट स्टोरी हाताळणारे आहे. त्यामुळे त्यात कॅबरे डान्सर स्त्रीचे एक पात्र आहे ! तर मला पत्र आले की ते सगळे आणि तिची वाक्ये वगळावी लागतील कारण डान्सबार बंदी आहे ! मी त्यांना उत्तर पाठवले की अहो, या पात्रासह आणि तिच्या संवादांसह तुम्ही अमुक तारखेला आधीच प्रमाणपत्र दिलेले आहे, ही त्याची प्रत ! आता फक्त काही बदल केल्यामुळे पुन्हा पाठवलेय. तरीही बऱ्याच दिवसांनी, अरुण नलावडे तिथे अध्यक्ष झाल्यावर मला ते प्रमाणपत्र मिळाले ! माझ्याच
‘ ढोलताशे ‘ या नाटकात एक वाक्य क्रिकेट आणि पाकिस्तान याबाबत होते, ते वगळायला सांगितले होते. कारण देशाच्या परराष्ट्र धोरणाशी विसंगत असे काही नाटकात असू नये, असे एक कलम असते. ही सर्व लेखकाच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्यावरची एक प्रकारची आक्रमणेच असतात. म्हणूनच, हे सेन्सॉर बोर्डच रद्द करायला हवे अशी मागणी अमोल पालेकरांनी कोर्टाकडे केलेली आहे. त्याबाबतचा निकाल अजून आलेला नाही.

इथे एक लक्षात घ्यायला हवे की जगातल्या अनेक लेखकांच्या बाबतीत, म्हणजे उदाहरणार्थ, तस्लिमा नासरीन, सलमान रश्दी, गाओ झिंगझिआन हे अमुक देशात त्यांच्या लेखनाला धोका आहे म्हणून कुठेतरी दुसऱ्या देशात आश्रयाला जाण्याच्या घटना आपण वाचलेल्या असतात. एक तर त्यांचे साहित्य अनुवादित होऊन जगात पोचलेले असते किंवा मिळतो समजा त्यांना दुसऱ्या देशात आश्रय – तितके तीव्र, तसे आहेत का आपले प्रश्न आणि तसे आश्रयबिश्रय घेणे ही आपल्या बसकी बात आहे का ? आणि आपल्याला खतमच करावेसे वाटावे अशा प्रकारचा काही आशय आपण मांडतोय का ? तसे नसेल तर, इथले कायदे समजून घेऊन लेखन करता येईल असे मला वाटते. कोणत्याच देशात वा मानवी

समूहात शंभर टक्के अभिव्यक्तिस्वातंत्र्य मिळणे अवघड आहे, हे आपणही समजून घेतले पाहिजे. अश्लीलतेच्या बाबतीत, कायद्यात, लेखकाला खूपच झुकते माप आहे. कोणत्याही कलाकृतीतला नुसताच एखादा संदर्भहीन तुकडा अश्लील ठरवता येत नाही. पूर्ण कलाकृतीतले त्याचे स्थान आणि त्या कलाकृतीचा भाग म्हणून त्याची गरज, हे विचारात घ्यावे, असे आहे. त्या बाबतीत काही वाचक, समीक्षक यांची साक्षही काढता येते. दुसरा एक कायदा म्हणतो की इथली कायदा व सुव्यवस्था बिघडवणारे, समाजात फूट पाडून भडकवणारे, असे काही कलेत नसावे. शिवाय, इथले सनदशीर मार्गाने निवडून आलेले सरकार, हिंसा भडकवून वा बेकायदेशीर मार्गांनी उलथून टाकण्याचा हेतू कलेत असता कामा नये. मला वाटते की बहुसंख्य लेखकांना या कायद्यांचा अडथळा येण्याची शक्यता नाही. पण, ज्यांचे हेतूच तेच तसेच बेकायदेशीर काही योजलेले असतील तर त्याचे पुढील संगीत ऐकायची त्यांना तयारी ठेवावी लागणारच, हे उघड आहे. तरीही, अमुक एक कायदा मोडला जातोय का यावर मतभेद होऊ शकतील, समर्थनार्थ वा विरुद्ध मांडणी केली जाऊ शकेल, हेही लेखकांनी समजून राहायला हवे. अशा प्रकारचे निर्बंध घालणारे कायदे जगात जवळ जवळ सर्वच देशांत आहेत, हे आपल्याला विसरता येणार नाही. २०१४ ते २०१६ या काळात पोलिसांनी दाखल केलेल्या या कायद्याखालच्या ११२ केसेसपैकी फक्त दोन केसेसमध्ये दोष सिद्ध होऊ शकलेला आहे, असे नेटवर दिसते. हे पाहता ही काही प्रचंड काळजीची बाब दिसत नाही. तरीही, एखादे सरकारच अशा कायद्याचा गैरवापर करतेय असे वाटले तर न्यायालयाचा दरवाजा ठोठावणे हाच मार्ग उरतो. रीतसर चाललेल्या लोकशाहीमध्ये फार क्वचितच कुणा लेखकाला इतक्या टोकाला जावे लागेल, असे वाटते.

हे झाले समाजाचे वा कायद्याचे निर्बंध. सर्वांत पहिला निर्बंध तर लेखकाचा स्वतःचाच असतो. मनात असलेले वा समजलेले ते सर्वच व्यक्त करायची लेखकाचीच हिंमत होत नाही. नातेवाईक, मित्र, ओळखीचे लोक काय म्हणतील, त्यांना काय वाटेल, त्यांच्या कशा प्रतिक्रिया येतील याच्या विचारांना अनेक लेखक घाबरू शकतात. अत्यंत चावट वा अश्लीलतेच्याही वादात येईल अशी एखादी कादंबरी लिहिली समजा तर आपल्या मुलांच्या जगण्यावर त्याचा काय परिणाम होईल याची कल्पनेने भीती वाटू शकते. माझे ' बुद्धिबळ आणि झब्बू ' हे नाटक स्त्री-पुरुषांतल्या छुप्या आकर्षणांचा विषय हाताळते. एकाने मला विचारले की हे एवढे सगळे तुम्हाला कसे माहिती ? म्हटले, बाबा, अशीच सांगोवांगीची माहिती वापरलेली आहे. स्वतःच्या अनुभवाबरोबरच निरीक्षणातून आणि चिंतनातूनही बरेच मनोव्यापार लेखकाला कळू शकतात, हेही लक्षात घेतले गेले पाहिजे. खानोलकरांनी त्यांच्या कादंबऱ्यांतून स्वतःच्या विकृती व्यक्त केल्या, असे म्हणणारे विद्वानही इथे होऊन गेलेले आहेत. प्रत्यक्ष कलेपेक्षा त्या कलावंताचेच मूल्यमापन आधी करा, ही जर समाजात प्रवृत्ती असेल तर तिचा लेखकाला त्रास होऊ शकतो. त्या त्रासाला लेखकाला तयार राहावेच लागणार. लेखक मध्यमवर्गीय नसावा, तो परिवर्तनवादीच असावा अशा प्रकारच्या अपेक्षा या कलाक्षेत्रातल्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याला अटकाव करणाऱ्या असतात, हे लक्षात घ्यायला हवे. आता माझे हेच ' बुद्धिबळ आणि झब्बू ' हे नाटक परिवर्तनवादी कुठे आहे ? पण ते मानवी जगणे पाहणारे, त्या निमित्ताने काही आशय व्यक्त करणारे आहे की नाही ? ज्यांनी पाहिले त्यांनी ते या समजुतीनेच पाहिले, त्यामुळे मला काही प्रश्न आला नाही.

हे स्वातंत्र्याचे प्रश्न का निर्माण होतात, हे पाहिले पाहिजे. प्रत्येक माणसाचे जनुक नकाशे वेगवेगळे असतात, त्याची वाढ वेगवेगळ्या वातावरणात, वेगवेगळे परिणाम घेत झालेली असते. काही लोकांच्या आयुष्यात अमुक एका विभूतीला सर्वोच्च स्थान असते. थोडक्यात, प्रत्येकाची घडण, प्रोग्रॅमिंग वेगवेगळे असते. अमुक धर्माचे, व्यक्तीचे वा जातीचे विडंबन वा विटंबना सहन होणारच नाही, अशी काहींची अवस्था असू शकते. आणि सगळी कलानिर्मिती ही फक्त त्या त्या लेखकाच्या व्यक्तिगत प्रतिक्रिया व्यक्त करणारीच असते, हा बहुसंख्यांचा समज असतो. त्यामुळे सर्वच कलावंतांबाबत माणसे सौम्य

वा तीव्र मानसिक संघर्षात असू शकतात. जेव्हा जेव्हा लोकांना असे वाटते की अमुक एका कलाकृतीतून आपल्या घडणीलाच विरोध होतो आहे वा धोका निर्माण होतो आहे तेव्हा तेव्हा त्या कलावंताचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य नष्ट केले पाहिजे असे त्यांना वाटते. या बाबतीत हे लक्षात घेतले पाहिजे की जगातले अनेक मान्यताप्राप्त लेखक हे सांगत असतात की त्यांच्या लेखनाचा कच्चा माल हा व्यक्तिगत अनुभवातून वा परिश्रमातून येत असला तरी ते व्यक्तिगत प्रतिक्रिया व्यक्त करण्यासाठी लिहीत नाहीत. ते मानवी जगणे समजून घेण्यासाठी लिहितात. वाचकांनीही व्यक्तिगत पूर्वग्रहांतून वा मतमतांतरांतून कलेकडे पाहू नये, अशी अपेक्षा असते. पण अनेकदा तसे घडत नाही. आणि हेच, ही स्वातंत्र्याची समस्या निर्माण होण्याचे कारण आहे. जिथे कुणावर तरी आक्रमण करणे, कुणाविरुद्धतरी द्वेष पसरवणे असे कलेचे योजनाबद्ध हेतूच असतील तिथे संघर्ष निर्माण होणारच हे समजून घेता येते.

आता थोडे आपल्या राजकीय वातावरणाकडे पाहावे असे वाटते. काय आहे परिस्थिती ? नेते तर इकडून तिकडे उड्या मारतातच आहेत पण पक्षांच्या युत्या वा आघाड्याही कशाही – अनपेक्षितही होत आहेत. जरा डिझाईन बदलले की इकडचे पोपट आणि तिकडचे राघू लगेच वेगवेगळेच बोलायला लागतात, हे आपण पाहात आहोत. थोडक्यात म्हणजे अमुक माणसे वा पक्ष अमुक विचारसरणी मानतात, असे काही दिसत नाही. याचे आता कुणाला आश्चर्यही वाटत नाही. हीच उत्तर आधुनिक अवस्था म्हणायची ! ना धर्म, ना विचारसरणी, ना कोणती मूल्ये ! सगळे जगणे उथळच असते, हीच धारणा ! याही परिस्थितीत परिवर्तनवादी विचारवंत मात्र नेट लावून त्यांची ठराविक मते रेटताना दिसतात, तो भाग वेगळा आणि निरर्थकही. आता काही पक्ष जातवादी, काही धर्मवादी, काही भाषावादी असे असल्याने समाजात फूट पाडणारे आहेत, असे म्हटले जाते. मला वाटते, ते सगळे मतांच्या गठ्ठ्यांसाठी असते. असे फूटपाडे पक्ष इथे कायदेशीर मान्यता कसे प्राप्त करतील ? सगळेच मान्यताप्राप्त आहेत म्हणजेच संविधान मानणारेच आहेत, हेच गृहीत धरायला हवे. कुणाचे काही वेगळे म्हणणे असेल तर कोर्टात जाऊन ते सिद्ध करायला हवे. या सगळ्याचा सारांश असा दिसतो की निवडणुका जिंकणे आणि आपल्या अग्रक्रमांप्रमाणे देश घडवणे हेच सर्वांचे उद्दिष्ट आहे. आणि त्यात विचार वगैरे काही नसून पूर्वग्रह आणि एकूणच घडत आलेले त्यांचे त्यांचे स्वभाव आहेत. म्हणजे काँग्रेसला समजा अनाक्रमक, अहिंसक, समजुतदार, शांततावादी अशी प्रतिमा आवडते तर बीजेपीला स्वाभिमानी, जरूर तर आक्रमक, जशास तसे वागणारी अशी कणखर प्रतिमा पसंत पडत असेल – असे फरक असू शकतात. लोकांना आता मतदानातून विचार निवडायचा नसून स्वभाव निवडायचा आहे. त्यामुळे आता विचार पोचवणे याला महत्त्वच राहिलेले नाही. आपापल्या अस्मिता आणि स्वभाव यांचे राज्य आणणे हेच महत्त्वाचे झालेले आहे. त्यामुळे एकूणच यातल्या संघर्षांना एक शाळकरी आणि माथेफिरू स्वरूप येत चाललेले आहे. तरीही या राजकीय क्षेत्रातल्या लोकांना कलेचे काही देणेघेणे आहे असे दिसत नाही. तुम्ही प्रेमकविता लिहिली की निराशेची लिहिली की एखाद्या कालबाह्य विचारसरणीची लिहिली याने त्यांना काहीच फरक पडत नाही. एक तर त्यांना वेळही नाही आणि कलेकडे जाण्यासाठी लागणाऱ्या तरल मनाचे कौतुकही नाही. एखाद्या राजकीय स्वभावाची तरफदारी करणारे वा त्यांच्या राजकीय स्वभावाच्या विरोधात असलेले असे काही तुम्ही लिहिलेत तरच त्यांचे लक्ष जाऊ शकेल. पण याही परिस्थितीत काही परिवर्तनवादी वा विद्रोही टाईप विचारवंत मात्र कला ही डाव्या विचारसरणीचीच असायला हवी, हे कट्टरपणे मांडत असतात. ते वास्तवापासून तुटलेले आहेत हे एकदा लक्षात आले की त्यांच्याकडे दुर्लक्ष करता येते. म्हणजेच, एकूणात सध्या राजकीय लोकांकडून तरी मराठी लेखकांच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याला काही धोका दिसत नाही.

माणसांच्या जगण्याचा हा जो एक नमूना तयार झाला आहे तो विचारात घेता लेखकाने लेखनपूर्व चिंतनस्वातंत्र्य वापरायचीच जास्त गरज आहे, असे दिसते. आपण का लिहितो आणि आपले लिहिणे हे सर्वच माणसांसाठी असू शकते की नाही – हे विषय लेखकाच्या चिंतनात असायला हवेत, असे वाटते. पुन्हा एकदा आभार मानून थांबतो.
( पुरुषोत्तम करंडक पारितोषिक वितरण समारंभ, पुणे, दिनांक २९-१२-१९. )
--- ००० ---

## कवितालेखनातला एक प्रयोग

https://www.facebook.com/aksharnama/posts/2418156568495414

३४ वे अस्मितादर्श साहित्य संमेलन १४-१५ जानेवारी दरम्यान प्रसिद्ध कवयित्री प्रज्ञा दया पवार यांच्या अध्यक्षतेखाली लातूर येथे पार पडले. समकालीन प्रश्नांना भिडणारे, त्यांचा सविस्तर आढावा घेणारे उदबोधक भाषण पवार यांनी केले. त्यांच्या प्रदीर्घ अध्यक्षीय भाषणाचा हा संपादित अंश...

हा संपादित अंश असला तरी हे संपादन मूळ भाषणाला नीट न्याय देणारेच असणार असे मला वाटते. २०१७ चे भाषण मी अलिकडे म्हणजे बरेच उशिरा वाचले त्यामुळे आता त्यावर बोलत आहे. हे भाषण तीन वर्षांपूर्वीचे असले तरी ' शिळे ' झालेले नाही. आजही यातले वाक्य न वाक्य हळूहळू समजून घेत ते लक्षपूर्वक वाचले पाहिजे असे आहे. हे भाषण पूर्णांशाने मला समजलेले आहे, असे मी मुळीच म्हणणार नाही. स्वतःच्या अनुभवातून आणि चिंतनातून आलेली अशी भाषणे क्वचितच आपल्या समोर येत असतात. त्यांतलेच हे एक अपवादात्मक भाषण आहे. सामान्यतः पुरोगामी व्यक्तीचे भाषण हे अ चे भाषण ब ही कुठेही हाणू शकेल, असे असते. हे भाषण तसे नाही. पुरोगामी भाषणाचा एक उत्तम नमूना म्हणून याकडे पाहिले पाहिजे. या सर्व बाबींमुळे, प्रथमतः, या भाषणाला सलाम !

हे भाषण म्हणजे एक जबरदस्त वैचारिक कॅप्सूल तर आहेच पण ती एक एक आशयगर्भ कविताही आहे, असे माझ्या लक्षात आले. त्यामुळे, मला ' दिसणारी ' कविता मी लिहून काढली. आता ही कविता मी लिहीत असल्याने एक एकसंध कलाकृती म्हणून तिचे अस्तित्व साकारणे हे माझे काम होते. आणि या कवितेतल्या आशयाची जबाबदारी घेणेही. कारण आता फक्त प्रज्ञाच्या भाषणाचाच आशय ही कविता व्यक्त करत असेल, असे नाही. आणि एक टोकाची शक्यता अशीही असू शकते की हा पूर्णतः वेगळाच आशय आहे. त्यामुळे, प्रज्ञाला ही कविता आवडणे-नावडणे हे तिचे तिच्या भाषणनिरपेक्षच असावे लागेल. इतरांचे तर ते तसे असावे लागेलच.

अशी ही कविता तुमच्यासमोर जाहीरपणे सादर करणे, याला अर्थातच भाषणकर्तीची पूर्वानुमती मी घेतलेली आहे. कवितालेखनाचा मराठीतला एक वेगळा प्रयोग म्हणूनही या उपक्रमाकडे पाहता येईल, असे वाटते.

Pradnya Daya Pawar च्या २०१७ च्या भाषणात मला सापडलेली

प्रज्ञाची कविता

होय होय तीच मी
एक स्त्री एक दलित
एक दलितवादी एक स्त्रीवादी
एक दलित स्त्रीवादी
आणि तरीही दलित हिताचे आयाम
तुम्ही म्हणता तेवढेच न मानणारी
मी बौद्ध मी आंबेडकरवादी
आणि हो एक कवयित्री आणि एक साधी
मराठीची प्राध्यापिका
ना खगोलशास्त्राची ना गणिताची

असेच माझे अधिकाधिक विशेष सांगत
मला अधिकाधिक मर्यादित करण्याचे
तुमचे डाव मी जाणते बाळांनो
तुम्ही जसे म्हणता ना रिश्तेमे
हम तुम्हारे बाप लगते हैं
त्याच अर्थाने मी तुमची आई आहे

जातीय पुरोगामी आणि ब्राम्हणी दलित
येताहेत का लक्षात
स्त्रीला जातीचे प्रवेशद्वार मानणारे
कोण कोण आहेत ते पाहा ना
स्त्रीस्वातंत्र्य हे जातीजातीत
वेगवेगळे का लागणार आहे तेही बघा
-- मी मनूविरोधी असले की वाह छान
आंबेडकरवादी -- आणि दलित पुरुषाची
दडपशाही झुगारणार म्हटले की
पाश्च्यात्य पंखांची बेगडी कशी
खाजगी आणि सार्वजनिक स्वातंत्र्यात
भेद कोण का करते आणि यातून शेवटी
आम्हाला एकाकी पाडायचा आहे का डाव याचे काय

कायद्यात सामावेल का
सगळ्यांसाठी सगळा न्याय

की येतील त्यात संघर्षमय
आंतरविरोधी कलमे --
दलितांचा न्याय स्त्रियांचा न्याय
मराठ्यांचा वा ब्राम्हणांचा न्याय
होऊ शकतील का समावेशक आणि एकरूप

हे सगळे प्रश्न इतके एकत्र
की एक धागा ओढला तर
तिसरीकडेच ताण वाढावा

यावर फक्त एकच --
द गूझ इज आऊट
हे झेन सत्य क्षणात उजळणे

जेव्हा सगळेच दिसते
तेव्हा काहीच नाही उरत
हे येतेय का तुमच्या ध्यानात

माझ्या तरी कुठे येतेय
--- ००० ---

**ॲब्सर्डिटी** ( अतर्कता – म्हणजे तर्कविहीनता – अतर्क्यता नव्हे ).

चांगले-वाईट, स्वार्थी-निस्वार्थी, नैतिक-अनैतिक, विवेकी-अविवेकी असे मूल्यात्मक भेद आपल्या बोलण्यात असतात. काहींना वाटते की यांतले ‘ वाईट ‘ ते अतर्क म्हणावे आणि चांगले ते अतर्क म्हणू नये. आणखी काहींचे मत पाहिले तर अतर्क काहीच नाही. आपण कशासाठी काय करतोय हे माणसाला समजत असते. त्यामुळे, सगळेच तर्कयुक्त, ‘ सार्थ ‘ असते. ॲब्सर्डिटी मधली जी अतर्कता आहे ती अशी द्वंद्वात्मक नसते. ती सर्वसमावेशक अतर्कता वा निरर्थता असते, हे लक्षात घ्यायला हवे. ॲब्सर्डिटीमध्ये म्हणजे अतर्कतेत ही असली द्वंद्वात्मकताही ॲब्सर्डच असते, हे पाहायला हवे. यालाच असंगतता, विसंगतता, व्यस्तता वगैरे म्हटले जाते. पूर्ण मानवी जगण्यातली निरर्थता हा त्याचा अर्थ असतो. निवडक निरर्थता नव्हे. ॲब्सर्डिटीला आपण आपल्या आवडत्या सुबुद्धतेत वा निर्बुद्धतेत बसवणे म्हणजे तीच निरर्थक द्वंद्वात्मकता गृहीत धरणे ठरते. तोच निरर्थक आदर्शवाद गिरवणे ठरते. ॲब्सर्डिटीचे पूर्ण आकलन म्हणजे नथिंगनेस म्हणजे ‘ नसणेपण ‘ म्हणजेच अस्तित्ववादाची पूर्णावस्था, हे लक्षात घ्यायला हवे. ॲब्सर्डिटी वा नथिंगनेस या तत्त्वज्ञानात्मक / आध्यात्मिक संकल्पना आहेत. त्यांचा आता काळ संपलेला आहे, त्या काळापुरते ते होते, असे म्हणण्यात अर्थ नाही. या आकलनाला काळाची ॲब्सर्ड कुंपणे नसतात, हेही समजून घ्यायला हवे. ( आदर्शांचे ढाचे वा भ्रम कोसळणे वा दुसऱ्या एखाद्या

आकर्षक कारणाने टाकले जाणे यालाही कधी कधी मी बोलण्याच्या ओघात ॲब्सर्डिटीचे भान येणे म्हणतो – पण ते पूर्ण नव्हे. ते डोलारे कोसळण्या वा टाकण्यापूर्वीचेही ॲब्सर्डच असते, हे विसरू नये. ) इथे हे पाहावे --

￼ "Absurd" originally means "out of harmony," in a musical context. Hence its dictionary definition: "out of harmony with reason or propriety; incongruous, unreasonable, illogical." In common usage, "absurd" may simply mean "ridiculous," but this is not the sense in which Camus uses the word, and in which it is used when we speak of the Theatre of the Absurd. In an essay on Kafka, Ionesco defined his understanding of the term as follows: "Absurd is that which is devoid of purpose.... Cut from his religious, metaphysical, and transcendental roots, man is lost; all his actions become senseless, absurd, useless." -- Martin Esslin.

तसेच हेही पाहा --

In one of the great seminal heart searchings of our time, The Myth of Sisyphus , Albert Camus tried to diagnose the human situation in a world of shattered beliefs. Thus, “... But in a universe that is suddenly deprived of illusions and of light , man feels a stranger. He is in irremediable exile.. .This divorce between man and his life, the actor and his setting, truly constitutes the feeling of Absurdity.”

--- 000 ---

## कवितेतला ' मी '

माझ्या एका कवितेत मधुमेह आणि रक्तदाब यांचे उल्लेख आल्याने माझ्या काही मित्रांना वाटले की मलाच हे आजार आहेत. अजून तरी माझ्यावर त्या आजारांचा हल्ला झालेला नाही. माझ्या कवितेतला ' मी ' हा मीच असतो असे नाही -- अनेकदा नसतोच. काही वेळी एखाद्या व्यक्तिगत अनुभवाचे कवितेला निमित्त होऊ शकते पण सहसा कविता हे हुबेहूब आत्मचरित्र नसते. कवीची सुखदुःखे वाचकाच्या डोक्यात घालणे मला तथ्यहीन वाटते. असंख्य निमित्तांनी कविता निर्माण होऊ शकते -- तिचा मूलाधार मात्र मानवी अनुभव ' पाहण्याची ' वा ' ' समजून घेण्याची ' माझ्यातून येणारी प्रक्रिया असते. पण, व्यक्तिगत प्रतिक्रिया अशा स्वरूपात ती नसते.

हेच काही वेगळ्या प्रकारे आधीही कुठे कुठे बोलले गेलेले आहे. त्यांतले नेटवर सापडलेले काही उद्गार --

Persona refers to the voice a writer creates to tell a story or to define the speaker in a poem. Sometimes the writer may share real-life experience or feelings in autobiographical writing. Or he may write as a detached observer, keeping a distance from events in the poem, or an imaginary character.

Persona, plural personae, in literature, the person who is understood to be speaking (or thinking or writing) a particular work. The persona is almost invariably distinct from the author; it is the voice chosen by the author for a particular artistic purpose. The persona may be a character in the work or merely an unnamed narrator; but, insofar as the manner and style of expression in the work exhibit taste, prejudice, emotion, or other characteristics of a human personality, the work may be said to be in the voice of a persona.

The term derives from the Latin persona, meaning an actor's mask, and is thus etymologically related to the term dramatis personae, designating the characters in a drama.

Now the second important point T.S Eliot is trying to get across is that poetry should be as he calls it "impersonal". What he means by that is that in order for a writer to reach the kind of success he desires he must first learn how to separate his or her personality or perhaps personal experiences with their writing For T.S Eliot real art has nothing to do with a writers personal experiences rather than his ability to do the opposite.

फर्नांडो पेसोआने ७२ टोपण नावांनी वेगवेगळ्या कविता का लिहिल्या असाव्यात याचाही या संदर्भात विचार करावा.

--- ००० ---

कवितेची व्याख्या

शब्द आणि वाक्ये वा ओळी यांच्या साहचर्यातून, क्रमवारीतून व आंतरसंबंधांतून व्यक्त होणारी संसूचक अर्थवलये एका परिपूर्ण आशयाप्रत पोचवणारा एकसंध भाषिक मजकूर म्हणजे कविता.

--- ००० ---

रूप, घाट, रूपबंध यांच्या अर्थांत फारसे फरक करता येतील असे मला वाटत नाही. यांतला कोणताही एक शब्द संपर्कासाठी ठरवून आपण वापरू शकतो. ही साहित्यकृतीची रचना असते. त्यात शब्द, भाषा, विरामचिन्हे, विचार, भावना, मूडस, आठवणी, प्रतिक्रिया, स्वप्ने, भास, संज्ञाप्रवाह, गती, लय वगैरे सगळे येते. या सगळ्यांच्या रचनात्मक माध्यमातून साहित्यकृती घडते. यांतल्या कोणत्याही भागाला ' आशय ' म्हणता येत नाही. बरेच लोक, ' आशय ' म्हणजे काही भावनिक अनुभूती वा वैचारिक कॅप्सूल, असे समजतात. त्यामुळे, गोंधळ होतो. रडू आले, हसू आले, वैचारिक

प्रबोधन झाले -- असे असण्याला लोक आशय समजतात. साहित्यकृतीतून काही ' हाताला लागायला ' हवे, ' नाट्यात्म विधान ' हवे, ' भूमिका ' पोचायला हवी -- असल्या बोलण्यातून ते व्यक्त होते. पण, आशय असा मर्यादित वा बौद्धिक नसतो. आशय म्हणजे शहाणपण, भान, परिपक्वता -- wisdom, awareness, maturity. कोणतीही कलाकृती ही त्या आशयाला पोचणारी असायला हवी. बाकी सगळे माध्यम असते. माध्यमाच्या कौशल्यपूर्ण रचनेतून लेखक आशयाकडे जात असतो. फक्त भावना वा विचार एवढ्याच क्षेत्रात आशय असतो, असे मानले तर त्यांची मूल्यात्मकता सतत विवाद्य राहील. घाट वा रूपबंध हा माध्यमाचा असतो, आशय हा अमर्याद असतो. सर्व मौल्यवान साहित्यकृती या आशयाची कास धरणाऱ्या असतात -- एखाद्या मानसिक पवित्र्याची नव्हे.

--- ००० ---

सामीक्षिक व्यायाम

प्रत्येकाची आवडनिवड वेगळी, मूल्ये वेगळी, निकष वेगळे -- त्यामुळे, साहित्यात अमुकच श्रेष्ठ असे म्हणण्यात काही अर्थ राहात नाही -- हे अनेकदा म्हटले जाते. इथले ज्ञानपीठ काय किंवा तिकडचे नोबेल काय, ते काही पूर्ण मानवजातीचे मूल्यनिर्णयन नसते. बाळ कोल्हटकरांना का देऊ नये या दोन्हींतला एखादा पुरस्कार, यावर माझ्या एका मित्राशी मी नगर ते पुणे या एस्टी प्रवासात चर्चा केली होती.

या एकूण ' मानवी हक्क ' पार्श्वभूमीवर एक वैचारिक व्यायाम सुचलाय. तो मी करणार नाहीय, हे आधीच सांगतो. व्यायाम असा -- नोबेल देताना जे सन्मानपत्र दिले जाते त्यात त्या त्या कवीचे वा लेखकाचे महत्त्व काय कशात आहे, हे सांगितलेले असते. एक प्रकारे ते निकषच असतात. ते समजा गेल्या पंचवीस वर्षांचे एकत्र करायचे आणि त्यातून काही मूल्यरचना सापडतेय का, ते पाहायचे. तसे काही सापडेलच. त्या मूल्यांप्रमाणे वा निकषांप्रमाणे आपले, इथले मराठीतले कुणी -- ज्या बिचाऱ्यांचे इंग्रजीत अनुवाद झालेले नाहीत -- असे कुणी सापडतात का, ते शोधायचे. तसे नसेल काही सापडत तर ती काय अशी वेगळी मूल्यरचना आहे याची चिकित्सा करायची.

एखाद्या तडफदार समीक्षकाने हा सामीक्षिक व्यायाम करून पाहावा, असे सुचवावेसे वाटते. अशा वैचारिक मंथनाचे निदान नावीन्य म्हणून तरी काही महत्त्व राहील, असे वाटते.

--- ००० ---

कवितेची गरज

" तुम्ही ही कविता लिहायची काही गरजच नव्हती " -- असे माझ्या प्रत्येक कवितेबद्दल म्हणणारे एक वा अनेक वाचक असू शकतात याची मला कल्पना असते. माझ्यासारखे असे अनेक कवी आहेत की जे एखादे काम साध्य करण्यासाठी वा एखाद्या वस्तूची वा विचाराची जाहिरात वा प्रचार वा प्रसार करण्यासाठी लिहीतच नाहीत. यावर लगेच असे हेटाळले जाऊ शकते की याचा अर्थ जगातली घाण तुम्ही आहे तशी ठेवू इच्छिता किंवा वाढवू इच्छिता. हा तुमचा आपमतलबीपणा आहे, तुम्ही असंवेदनशील आहात. हे जर खरे असेल तर हेही एक कामच झाले ! या कामासाठी अमुक एक कविता लिहिली आहे, हे दाखवता यायला हवे.

--- ००० ---

कवितेचे पूर्ण होणे -- असेही --

एखाद्या वेळी असे होते -- कविता लिहिली जाते पण मला कळते की माझ्या मनाने गोंधळ केलेला आहे -- नको ते काही त्या कवितेत घुसडलेले आहे. स्वतंत्रपणे म्हटले तर त्या घुसडलेल्या मजकुरात आणखी एक वेगळी कविता असते -- पण ही अशी घुसखोरी झाल्याने, लिहिलेली कविता बिघडलेली असते. याचा अर्थ ती टाकून द्यावी लागते, असे नाही. नको तो मजकूर उडवून हवा तो शोधून काढावा लागतो. आता मनाची अनावश्यक लुडबुड बंद झालेली असते. आता ती एक एकसंध कविता घडते. मग तिच्यात मानसिक विदीर्णतेचे का चित्र असे ना ! प्रत्येक कवितेचे एक आपापले ' पूर्ण असणे ' असते -- ते कवीला कळणे हेच त्याचे सर्वात मोठे कर्तृत्व असते. पण, ते खरे तर त्याचे नसतेच कर्तृत्व -- त्याची ' मीगिरी ' थांबल्यावरच तर ती कविता प्रगट झालेली असते !

--- ००० ---

त्या कार्यक्रमात सागरने तेंडुलकरांचा एक लेख वाचला. ते त्या वेळी लोकसत्तेत ' रामप्रहर ' नावाचे सदर लिहीत असत, त्यात तो आला होता. ( दिनांक २८ मे १९९३. ) त्यात तेंडुलकरांनी त्या प्रयोगाची आणि विशेषतः डॉ. भुथाडियांच्या अभिनय-दिग्दर्शनाची थोरवी, शब्दांची अजिबात काटकसर न करता सांगितलेली आहे ! ती अर्थात योग्यच आहे, असे मीही म्हणू शकतो कारण ते नाटक मीही पाहिले होते.

त्याच लेखात ' मोठे नाटक म्हणजे काय ' यावरही तेंडुलकर बोललेले आहेत. त्यांच्या मते, नुसत्या कथेतल्या गुंतागुंतीने नाटक मोठे ठरत नाही. ते मुख्यतः मानवी स्वभावातील गुंतागुंत, मानवी कृतींतली गूढ अतार्किकता, त्याची स्खलनशीलता आणि नियतीच्या निर्दय न्यायाचा सखोल वेध यांमुळे मौल्यवान ठरते. ( डॉ. लागू आणि तेंडुलकर यांच्या एका जाहीर संवादात, ते नियती मानतात, असे तेंडुलकरांनी सांगितले होते, त्याची आठवण झाली.) ते प्रेक्षकाची तर्कबुद्धी विकल करणाऱ्या प्रखर सत्याचे दर्शन घडवत त्याला हेलपाटून टाकते. थोडक्यात, ते अमुक एक पटवायला वा अमुक एक भूमिका मांडणारे एकरेषीय नाटक नसते. ते समग्र अस्तित्वाचा आवाका घेणारे, कोणत्याही स्पष्टीकरणाशिवाय जगण्याच्या भानाचा झपाटा व्यक्त करणारे असते. ( ही वाक्ये शब्दशः नाहीत -- स्मरणावर आधारित आहेत. )

चांगल्या, मोठ्या नाटकाबाबतचे हे तेंडुलकरांचे विचार मला पूर्ण पटतात. चांगले नाटक हे मानवी संबंधांचेच असावे लागते. तुम्ही एखाद्या पात्राची महती गाऊ लागलात तर मानवी संबंधांना सपाटता येते आणि कलाकृतीतली ' दर्शनाची जान ' संपून जाते.

--- 000 ---

' रंगवाचा ' च्या मार्च २०२० या अंकात आलेला माझा लेख इथे देत आहे. पूर्ण अंकच वाचनीय आणि अभ्यसनीय आहे. मिळवून जरूर वाचा. लेख --

अभिव्यक्तिस्वातंत्र्य

-- चं. प्र. देशपांडे.

महाराष्ट्रीय कलोपासकचे पदाधिकारी, स्वयंसेवक, मंचावरील मान्यवर, स्पर्धेत सहभागी सर्व महाविद्यालये आणि विद्यार्थी, परीक्षक आणि प्रेक्षक – प्रथमतः मी स्पर्धेतल्या सर्व विजेत्यांचे अभिनंदन करतो आणि ज्यांना यश मिळालेले नाही त्यांना एकच सांगू इच्छितो की मीही यश आणि अपयश या दोन्हींतून गेलेलो आहे – आपले काम चालू ठेवणे हीच अपयशाला श्रद्धांजली समजावी. सुदैवाने या अंतिम स्पर्धेला तुम्हाला नाट्यक्षेत्रात हयात घालवलेले उत्तम, अभ्यासू परीक्षक लाभलेले होते. त्यांचा निर्णय दिलखुलासपणे स्वीकारा आणि शक्य झाल्यास त्यांच्याशी चर्चा करून आपली नाट्यसमज वाढवून घ्यायचा प्रयत्न करा. मला आणखी एक गोष्ट सुरुवातीलाच सांगायची आहे – ती म्हणजे या जल्लोशी आणि सळसळत्या उत्सवात तुम्ही मला दोन शब्द बोलण्याची संधी देत आहात त्याबद्दल मी खूपच कृतज्ञ आहे. यासाठी मी तुम्हा सर्वांचा आभारी आहे. बोलणार आहे याचा अर्थ खूप लंबेचौडे भाषण करणार आहे असे नाही. पण, लेखकांना आणि कलावंतांना नेहमीच महत्त्वाच्या ठरणाऱ्या एका प्रश्नाबद्दल मी बोलणार आहे, थोडक्यात. तो प्रश्न म्हणजे अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा आहे. याचा अर्थ मी फक्त राजकीय वातावरणाबद्दल बोलणार आहे असा मुळीच नाही. साहित्य संमेलनांत एक अशी पद्धत रुळते आहे की राजकारणाचे क्षेत्र साहित्याला वर्ज्य असूच नाही शकत, असे म्हणायचे आणि फक्त राजकारणावर बोलायचे ! साहित्याबाबत एक वाक्यही बोलायचे नाही ! मी अर्थातच तसे काही करणार नाही. अभिव्यक्तिस्वातंत्र्य हा नेहमीच माझ्या चिंतनाचा विषय राहात आलेला असल्याने, माझ्या मराठी नाटकाच्या क्षेत्रातल्या नव्याने उभरत्या मित्र-मैत्रिणींना विचाराला काही खाद्य देण्याचा माझा विचार आहे.

कलेत राजकारण वर्ज्य नसते असे म्हणाणाऱ्यांचे एक वैशिष्ट्य विचारात घ्यायलाच हवे असे असते. राजकारण वर्ज्य नाही असे म्हणणारे हे लोक कलेतून बाकी सगळे मानवी जगणेच हद्दपार करू इच्छितात. प्रेम, एकाकीपणा, निराशा, उत्तर-आधुनिक जाणिवा हे सगळे कलेत आले तर त्याला ते भरल्या पोटीची करमणूक वा कलावंताची असंवेदनशीलता म्हणतात. या प्रकारच्या कलावंतांची आणि विचारवंतांची संख्या जेव्हा समाजात वाढते तेव्हा कलावंताच्या सर्जकतेवर तो एक दबाव निर्माण होतो. अशा वेळी आपले अभिव्यक्तिस्वातंत्र्य अबाधित राखणे हे कलावंताला जमले नाही तर तो स्वतःची सर्जकता गमावून बसण्याचा धोका असतो. यात आणखीही एक प्रश्न लक्षात घेण्यासारखा असतो. उदाहरणार्थ, गो. पु. देशपांडे यांचे ‘ उध्वस्त धर्मशाळा ’ हे नाटक घ्या. त्यातले श्रीधर कुलकर्णी हे पात्र एका विशिष्ट विचारसरणीचे आहे म्हणून त्याला चौकशीच्या दिव्यातून जावे लागते, असे आहे. नाटक अर्थातच त्याची बाजू घेऊन लिहिलेले आहे. त्याचे उदात्तीकरणही आहे. ‘ बघा, किती हा अन्याय ! ’ असा टोन आहे. पण, त्याच विचारसरणीची सत्ता असलेल्या देशांत विरोधकांना हवेतच मिसळून टाकले जाते, त्याचे काय – हा प्रश्न इथे येत नाही. अशा गोष्टींची भलावण करणारे लोक आणि कोणत्याही भूमिकेचे फुगे फुगवणारे लोक हे मानवी जगणे समजून घेण्याची सर्जकता नाकारत असतात. ते स्वतः तर ती नाकारतातच पण इतरांनीही ती नाकारली पाहिजे असा दबाव ते विविध प्रकारे निर्माण करू पाहतात. तो झुगारून कलावंताला आपल्या स्वतःच्या चिंतनशीलतेने आणि सर्जकतेने जगता येणे आणि अभिव्यक्त होता येणे हे अशा वातावरणात महत्त्वाचे ठरते. असो. यावर फार वेळ न घालवता पुढे जाऊ.

या निमित्ताने तुमच्याशी थोडे बोलायचे म्हणून २७ तारखेला सकाळी मी तीन एकांकिका पाहिल्या. त्यांतल्या एकीचे उदाहरण घेतो आहे. ती म्हणजे, ‘ वन टाईम सेलेब्रेशन ’. मी शाळाकॉलेजात असताना एक लेख वाचला होता, त्यात असे होते की अमेरिकेत एका तरुण अविवाहित मुलीची आई तिला गर्भनिरोधक गोळी घ्यायची आठवण करते ! आम्ही अचंबित होऊन एकमेकांत याची चर्चा करायचो. किती वेगळे वातावरण ! इकडे हे कदापि घडणे शक्य नाही, असे आम्ही

समजायचो. मी पाहिलेल्या तुमच्या त्या एकांकिकेत असे धक्क्यावर धक्के आहेत. आदल्या वर्षी मुलाला त्याच्या आईने वाढदिवसाला संभोगविषयक पुस्तक भेट दिलेले आहे आणि या वर्षी ती त्याला निरोधांचे पाकीटच भेट देते आहे ! त्याबाबत पति-पत्नींतले संवाद आहेत ! शेवटी कहर म्हणजे तो मुलगा समसंभोगी असल्याचे कबूल करतो. आणि ही विकृती वगैरे न समजता किंवा दुःखाचा खूप गोंधळ न घालता आईवडील ते स्वीकारतात ! काही वर्षांपूर्वी ही एकांकिका खूपच सनसनाटी आणि वादग्रस्त ठरली असती. आज ती निर्भयपणे सादर होते आहे. याचा अर्थच ती एक तर सेन्सॉरही झालेली आहे आणि प्रेक्षकही बराचसा समजुतदार झालेला आहे. असे पाहिले तर हे अभिव्यक्तिस्वातंत्र्य लेखकाने घेतलेलेही आहे आणि शासनाने व समाजाने दिलेलेही आहे, असे म्हणता येते. असे जुळून आले नाही तर समस्या निर्माण होतात.

काही प्रश्न समाजाकडून तयार होतात. अशा नाटकांची उदाहरणे म्हणजे, ‘ यदाकदाचित ‘, ‘ सखाराम बाइंडर ‘, ‘ घाशीराम कोतवाल ‘, ‘ मी नथुराम गोडसे बोलतोय ‘ आणि ‘ गिधाडे ‘. कधी अश्लीलतेचे आरोप कधी इतिहासाशी प्रतारणा केल्याचे आरोप तर कधी पूज्य विभूतींचे वा देवदेवतांचे विडंबन केल्याचे आरोप. ‘ गिधाडे ‘ मध्ये एका स्त्रीच्या पोटावर लाथ मारल्याने होणाऱ्या तिच्या गर्भपाताचे दृश्य होते. ते लोकांना खूपच बीभत्स वाटले. दिग्दर्शक दुबेजींनी यावर मार्ग काढला. त्या स्त्रीच्या साडीवर दिसणारे रक्ताचे डाग त्यांनी निळे दाखवले आणि हा निळा रंग लाल समजावा, अशी घोषणा केली. या प्रकारे, कधी मार्ग काढून वा कधी संघर्ष करून पुढे जावे लागते. अलिकडेच प्रेमानंद गज्वी यांचे ‘ छावणी ‘ हे नाटक आपल्या शासकीय सेन्सॉरने बराच काळ अडवून ठेवले होते. लेखकाला त्यासाठी संघर्ष करावा लागला. इथे माझ्याही एका नाटकाचे उदाहरण देतो. माझे, ‘ जागचं हलायचं नाही ‘ या नावाचे एक दोन अंकी नाटक होते. त्याला मान्यता प्रमाणपत्र मिळालेलेही होते. पण, नंतर त्यातला काही भाग पुनर्लिखित करून त्यात काही बदल केल्यामुळे ते पुन्हा शासनाकडे मी पाठवले. दरम्यानच्या काळात डान्सबार बंदी झालेली होती. गंमत बघा – ते नाटक सत्तरच्या दशकातल्या हिंदी सिनेमाची एक बनावट स्टोरी हाताळणारे आहे. त्यामुळे त्यात कॅबरे डान्सर स्त्रीचे एक पात्र आहे ! तर मला पत्र आले की ते सगळे आणि तिची वाक्ये वगळावी लागतील कारण डान्सबार बंदी आहे ! मी त्यांना उत्तर पाठवले की अहो, या पात्रासह आणि तिच्या संवादांसह तुम्ही अमुक तारखेला आधीच प्रमाणपत्र दिलेले आहे, ही त्याची प्रत ! आता फक्त काही बदल केल्यामुळे पुन्हा पाठवलेय. तरीही बऱ्याच दिवसांनी, अरुण नलावडे तिथे अध्यक्ष झाल्यावर मला ते प्रमाणपत्र मिळाले ! माझ्याच

‘ ढोलताशे ‘ या नाटकात एक वाक्य क्रिकेट आणि पाकिस्तान याबाबत होते, ते वगळायला सांगितले होते. कारण देशाच्या परराष्ट्र धोरणाशी विसंगत असे काही नाटकात असू नये, असे एक कलम असते. ही सर्व लेखकाच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्यावरची एक प्रकारची आक्रमणेच असतात. म्हणूनच, हे सेन्सॉर बोर्डच रद्द करायला हवे अशी मागणी अमोल पालेकरांनी कोर्टाकडे केलेली आहे. त्याबाबतचा निकाल अजून आलेला नाही.

इथे एक लक्षात घ्यायला हवे की जगातल्या अनेक लेखकांच्या बाबतीत, म्हणजे उदाहरणार्थ, तस्लिमा नासरीन, सलमान रश्दी, गाओ झिंगझिआन हे अमुक देशात त्यांच्या लेखनाला धोका आहे म्हणून कुठेतरी दुसऱ्या देशात आश्रयाला जाण्याच्या घटना आपण वाचलेल्या असतात. एक तर त्यांचे साहित्य अनुवादित होऊन जगात पोचलेले असते किंवा मिळतो समजा त्यांना दुसऱ्या देशात आश्रय – तितके तीव्र, तसे आहेत का आपले प्रश्न आणि तसे आश्रयबिश्रय घेणे ही आपल्या बसकी बात आहे का ? आणि आपल्याला खतमच करावेसे वाटावे अशा प्रकारचा काही आशय आपण मांडतोय का ? तसे नसेल तर, इथले कायदे समजून घेऊन लेखन करता येईल असे मला वाटते. कोणत्याच

देशात वा मानवी समूहात शंभर टक्के अभिव्यक्तिस्वातंत्र्य मिळणे अवघड आहे, हे आपणही समजून घेतले पाहिजे. अश्लीलतेच्या बाबतीत, कायद्यात, लेखकाला खूपच झुकते माप आहे. कोणत्याही कलाकृतीतला नुसताच एखादा संदर्भहीन तुकडा अश्लील ठरवता येत नाही. पूर्ण कलाकृतीतले त्याचे स्थान आणि त्या कलाकृतीचा भाग म्हणून त्याची गरज, हे विचारात घ्यावे, असे आहे. त्या बाबतीत काही वाचक, समीक्षक यांची साक्षही काढता येते. दुसरा एक कायदा म्हणतो की इथली कायदा व सुव्यवस्था बिघडवणारे, समाजात फूट पाडून भडकवणारे, असे काही कलेत नसावे. शिवाय, इथले सनदशीर मार्गाने निवडून आलेले सरकार, हिंसा भडकवून वा बेकायदेशीर मार्गांनी उलथून टाकण्याचा हेतू कलेत असता कामा नये. मला वाटते की बहुसंख्य लेखकांना या कायद्यांचा अडथळा येण्याची शक्यता नाही. पण, ज्यांचे हेतूच तेच तसेच बेकायदेशीर काही योजलेले असतील तर त्याचे पुढील संगीत ऐकायची त्यांना तयारी ठेवावी लागणारच, हे उघड आहे. तरीही, अमुक एक कायदा मोडला जातोय का यावर मतभेद होऊ शकतील, समर्थनार्थ वा विरुद्ध मांडणी केली जाऊ शकेल, हेही लेखकांनी समजून राहायला हवे. अशा प्रकारचे निर्बंध घालणारे कायदे जगात जवळ जवळ सर्वच देशांत आहेत, हे आपल्याला विसरता येणार नाही. २०१४ ते २०१६ या काळात पोलिसांनी दाखल केलेल्या या कायद्याखालच्या ११२ केसेसपैकी फक्त दोन केसेसमध्ये दोष सिद्ध होऊ शकलेला आहे, असे नेटवर दिसते. हे पाहता ही काही प्रचंड काळजीची बाब दिसत नाही. तरीही, एखादे सरकारच अशा कायद्याचा गैरवापर करतेय असे वाटले तर न्यायालयाचा दरवाजा ठोठावणे हाच मार्ग उरतो. रीतसर चाललेल्या लोकशाहीमध्ये फार क्वचितच कुणा लेखकाला इतक्या टोकाला जावे लागेल, असे वाटते.

हे झाले समाजाचे वा कायद्याचे निर्बंध. सर्वात पहिला निर्बंध तर लेखकाचा स्वतःचाच असतो. मनात असलेले वा समजलेले ते सर्वच व्यक्त करायची लेखकाचीच हिंमत होत नाही. नातेवाईक, मित्र, ओळखीचे लोक काय म्हणतील, त्यांना काय वाटेल, त्यांच्या कशा प्रतिक्रिया येतील याच्या विचारांना अनेक लेखक घाबरू शकतात. अत्यंत चावट वा अश्लीलतेच्याही वादात येईल अशी एखादी कादंबरी लिहिली समजा तर आपल्या मुलांच्या जगण्यावर त्याचा काय परिणाम होईल याची कल्पनेने भीती वाटू शकते. माझे ' बुद्धिबळ आणि झब्बू ' हे नाटक स्त्री-पुरुषांतल्या छुप्या आकर्षणांचा विषय हाताळते. एकाने मला विचारले की हे एवढे सगळे तुम्हाला कसे माहिती ? म्हटले, बाबा, अशीच सांगोवांगीची माहिती वापरलेली आहे. स्वतःच्या अनुभवाबरोबरच निरीक्षणातून आणि चिंतनातूनही बरेच मनोव्यापार लेखकाला कळू शकतात, हेही लक्षात घेतले गेले पाहिजे. खानोलकरांनी त्यांच्या कादंबऱ्यांतून स्वतःच्या विकृती व्यक्त केल्या, असे म्हणणारे विद्वानही इथे होऊन गेलेले आहेत. प्रत्यक्ष कलेपेक्षा त्या कलावंताचेच मूल्यमापन आधी करा, ही जर समाजात प्रवृत्ती असेल तर तिचा लेखकाला त्रास होऊ शकतो. त्या त्रासाला लेखकाला तयार राहावेच लागणार. लेखक मध्यमवर्गीय नसावा, तो परिवर्तनवादीच असावा अशा प्रकारच्या अपेक्षा या कलाक्षेत्रातल्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याला अटकाव करणाऱ्या असतात, हे लक्षात घ्यायला हवे. आता माझे हेच ' बुद्धिबळ आणि झब्बू ' हे नाटक परिवर्तनवादी कुठे आहे ? पण ते मानवी जगणे पाहणारे, त्या निमित्ताने काही आशय व्यक्त करणारे आहे की नाही ? ज्यांनी पाहिले त्यांनी ते या समजुतीनेच पाहिले, त्यामुळे मला काही प्रश्न आला नाही.

हे स्वातंत्र्याचे प्रश्न का निर्माण होतात, हे पाहिले पाहिजे. प्रत्येक माणसाचे जनुक नकाशे वेगवेगळे असतात, त्याची वाढ वेगवेगळ्या वातावरणात, वेगवेगळे परिणाम घेत झालेली असते. काही लोकांच्या आयुष्यात अमुक एका विभूतीला सर्वोच्च स्थान असते. थोडक्यात, प्रत्येकाची घडण, प्रोग्रॅमिंग वेगवेगळे असते. अमुक धर्माचे, व्यक्तीचे वा जातीचे विडंबन वा विटंबना सहन होणारच नाही, अशी काहींची अवस्था असू शकते. आणि सगळी कलानिर्मिती ही फक्त त्या त्या

लेखकाच्या व्यक्तिगत प्रतिक्रिया व्यक्त करणारीच असते, हा बहुसंख्यांचा समज असतो. त्यामुळे सर्वच कलावंतांबाबत माणसे सौम्य वा तीव्र मानसिक संघर्षात असू शकतात. जेव्हा जेव्हा लोकांना असे वाटते की अमुक एका कलाकृतीतून आपल्या घडणीलाच विरोध होतो आहे वा धोका निर्माण होतो आहे तेव्हा तेव्हा त्या कलावंताचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य नष्ट केले पाहिजे असे त्यांना वाटते. या बाबतीत हे लक्षात घेतले पाहिजे की जगातले अनेक मान्यताप्राप्त लेखक हे सांगत असतात की त्यांच्या लेखनाचा कच्चा माल हा व्यक्तिगत अनुभवातून वा परिश्रमातून येत असला तरी ते व्यक्तिगत प्रतिक्रिया व्यक्त करण्यासाठी लिहीत नाहीत. ते मानवी जगणे समजून घेण्यासाठी लिहितात. वाचकांनीही व्यक्तिगत पूर्वग्रहांतून वा मतमतांतरांतून कलेकडे पाहू नये, अशी अपेक्षा असते. पण अनेकदा तसे घडत नाही. आणि हेच, ही स्वातंत्र्याची समस्या निर्माण होण्याचे कारण आहे. जिथे कुणावर तरी आक्रमण करणे, कुणाविरुद्धतरी द्वेष पसरवणे असे कलेचे योजनाबद्ध हेतूच असतील तिथे संघर्ष निर्माण होणारच हे समजून घेता येते.

आता थोडे आपल्या राजकीय वातावरणाकडे पाहावे असे वाटते. काय आहे परिस्थिती ? नेते तर इकडून तिकडे उड्या मारतातच आहेत पण पक्षांच्या युत्या वा आघाड्याही कशाही – अनपेक्षितही होत आहेत. जरा डिझाईन बदलले की इकडचे पोपट आणि तिकडचे राघू लगेच वेगवेगळेच बोलायला लागतात, हे आपण पाहात आहोत. थोडक्यात म्हणजे अमुक माणसे वा पक्ष अमुक विचारसरणी मानतात, असे काही दिसत नाही. याचे आता कुणाला आश्चर्यही वाटत नाही. हीच उत्तर आधुनिक अवस्था म्हणायची ! ना धर्म, ना विचारसरणी, ना कोणती मूल्ये ! सगळे जगणे उथळच असते, हीच धारणा ! याही परिस्थितीत परिवर्तनवादी विचारवंत मात्र नेट लावून त्यांची ठराविक मते रेटताना दिसतात, तो भाग वेगळा आणि निरर्थकही. आता काही पक्ष जातवादी, काही धर्मवादी, काही भाषावादी असे असल्याने समाजात फूट पाडणारे आहेत, असे म्हटले जाते. मला वाटते, ते सगळे मतांच्या गठ्ठ्यांसाठी असते. असे फूटपाडे पक्ष इथे कायदेशीर मान्यता कसे प्राप्त करतील ? सगळेच मान्यताप्राप्त आहेत म्हणजेच संविधान मानणारेच आहेत, हेच गृहीत धरायला हवे. कुणाचे काही वेगळे म्हणणे असेल तर कोर्टात जाऊन ते सिद्ध करायला हवे. या सगळ्याचा सारांश असा दिसतो की निवडणुका जिंकणे आणि आपल्या अग्रक्रमांप्रमाणे देश घडवणे हेच सर्वांचे उद्दिष्ट आहे. आणि त्यात विचार वगैरे काही नसून पूर्वग्रह आणि एकूणच घडत आलेले त्यांचे त्यांचे स्वभाव आहेत. म्हणजे काँग्रेसला समजा अनाक्रमक, अहिंसक, समजुतदार, शांततावादी अशी प्रतिमा आवडते तर बीजेपीला स्वाभिमानी, जरूर तर आक्रमक, जशास तसे वागणारी अशी कणखर प्रतिमा पसंत पडत असेल – असे फरक असू शकतात. लोकांना आता मतदानातून विचार निवडायचा नसून स्वभाव निवडायचा आहे. त्यामुळे आता विचार पोचवणे याला महत्त्वच राहिलेले नाही. आपापल्या अस्मिता आणि स्वभाव यांचे राज्य आणणे हेच महत्त्वाचे झालेले आहे. त्यामुळे एकूणच यातल्या संघर्षांना एक शाळकरी आणि माथेफिरू स्वरूप येत चाललेले आहे. तरीही या राजकीय क्षेत्रातल्या लोकांना कलेचे काही देणेघेणे आहे असे दिसत नाही. तुम्ही प्रेमकविता लिहिली की निराशेची लिहिली की एखाद्या कालबाह्य विचारसरणीची लिहिली याने त्यांना काहीच फरक पडत नाही. एक तर त्यांना वेळही नाही आणि कलेकडे जाण्यासाठी लागणाऱ्या तरल मनाचे कौतुकही नाही. एखाद्या राजकीय स्वभावाची तरफदारी करणारे वा त्यांच्या राजकीय स्वभावाच्या विरोधात असलेले असे काही तुम्ही लिहिलेत तरच त्यांचे लक्ष जाऊ शकेल. पण याही परिस्थितीत काही परिवर्तनवादी वा विद्रोही टाईप विचारवंत मात्र कला ही डाव्या विचारसरणीचीच असायला हवी, हे कट्टरपणे मांडत असतात. ते वास्तवापासून तुटलेले आहेत हे एकदा लक्षात आले की त्यांच्याकडे दुर्लक्ष करता येते. म्हणजेच, एकूणात सध्या राजकीय लोकांकडून तरी मराठी लेखकांच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याला काही धोका दिसत नाही.

माणसांच्या जगण्याचा हा जो एक नमूना तयार झाला आहे तो विचारात घेता लेखकाने लेखनपूर्व चिंतनस्वातंत्र्य वापरायचीच जास्त गरज आहे, असे दिसते. आपण का लिहितो आणि आपले लिहिणे हे सर्वच माणसांसाठी असू शकते की नाही – हे विषय लेखकाच्या चिंतनात असायला हवेत, असे वाटते. पुन्हा एकदा आभार मानून थांबतो.

( पुरुषोत्तम करंडक पारितोषिक वितरण समारंभ, पुणे, दिनांक २९-१२-१९. )

--- ००० ---

सर्जक कला

कोणत्याही कवीची प्रत्येक कविता ही त्याच्या कुवतीच्या अत्युच्च स्तराला पोचणारी असेलच असे नाही. कवीने त्याची खंत बाळगायचेही कारण नाही. मुख्य समस्या कोणती असते तर कविता ही निर्णयात्मक वा बोधप्रद होण्याची. तशी कविता ही फक्त नाकारली वा स्वीकारली जाऊ शकते. ती कधीच काही नवे देऊ शकत नाही, कारण, आहे ते पाहण्याची वा समस्यांची प्रक्रिया समजून घेण्याची जाग तिच्यात नसते. ती जाग असणारी कविता वर्षानुवर्षे ताजी आणि जिवंत राहते. हे समजलेला कवी कधी कधी, लिहून झालेल्या कवितेतली बोधप्रदता काढू जातो तर त्यात ती पूर्ण कविताच नष्ट होते. ( माझे एक नाटक असे लिहून झाले होते. सगळा सूर बोधप्रदतेचा होता. मलाच ते बालिश वाटू लागले. ती पूर्ण संहिता नाकारून मी त्या नाटकाचे पुनर्लेखनच केले ! ) मतप्रदर्शनाचा हेतू हा कलेचा प्रमुख दोष म्हणता येतो.

काहींच्या मते ' योग्य बोधप्रद ' असणे हेच फक्त कलेचे मूल्य, असे असू शकते. पण, तशी कला पंथस्थापक असते हे पाहायला हवे. त्यामुळे ती संघर्षाची आणि छळाची आहे ती रचना स्वीकारणारी असते, म्हणजेच मूल्यहीन असते, असे म्हणता येते. दुःखाची रचना नुसतीच उगाळत राहणे म्हणजे सर्जक कला नव्हे.

--- ००० ---

अर्थपूर्णता

माझ्या लहानपणची गोष्ट. धावत्या इंग्रजीत लिहिलेला मजकूर पाहून मीही तसेच सरपटते काही गिचमिडून याचा अर्थ काय, असे विचारत असे. तसेच, बरेच पुढे, ' सत्यकथे ' तल्या कविता वाचून, कशाही शेजारी कोणतेही शब्द लिहून मी अशा अनाकलनीय मजकूरांच्या कविता सत्यकथेकडे पाठवल्या होत्या. त्या उलट टपाली परत आल्या ! तर, ' अर्थपूर्णता ' ही लक बाय चान्स म्हणजे अनमान धपक्याने वा राम भरोसे अस्तित्वात येते असे अनेकांना वाटत असेल का ? की न जाणो, फासे आपल्या बाजूने पडले तर आपले लेखन उदाहरणार्थ नोबेलच्या तोडीचे ठरू शकेल, असे ?

--- ००० ---

मूल्यऱ्हास

इथे बरेच विषय मी विचारविनिमयासाठी मांडत असतो – माझी अमुक मते फ्रेंडसच्या गळी उतरवण्यासाठी नाही. त्याच प्रकारची ही पोस्ट आहे. हल्ली ‘ मूल्यऱ्हास ‘ हा शब्द नेहमीच वाचनात येतो. काय आहे ही भानगड, असे आपण कधी विचारत नाही. एक लक्षात घेतले पाहिजे की आपण ज्यांना मूल्ये म्हणतो त्या काही बौद्धिक रचना असतात आणि

सामान्यतः त्या ‘ आदर्श ‘ म्हणून स्वीकारलेल्या असतात. मूल्ये मान्य सगळ्यांनाच असतात पण प्रत्यक्षात आचरणात नसतात. उदाहरणार्थ ‘ समता ‘ हे मूल्य घेऊ. हे मान्य सगळ्यांनाच असते पण आचरण विषमता निर्माण करणारे असते. पतिपत्नींनी शंभर टक्के एकमेकांशी एकनिष्ठ असायला हवे याला सगळेच ‘ हो हो ‘ म्हणतील पण ते आचरणात असणार नाही. भ्रष्टाचार वाईट असे सगळेच म्हणतील पण मनात आणि खाजगीत त्याचे समर्थनही करतील. कोणतेही मूल्य म्हणजे माणसाच्या जगण्यातले एक आंतरद्वंद्वच असते. ‘ अहिंसा ‘ हे मूल्य चांगले आहे हो पण तुम्ही युद्धसज्ज नसाल तर जगात तुम्हाला कुत्रेही विचारणार नाही – असा हा पेच असतो. आणि हे शेकडो-हजारो वर्षे चालू असते. तसे नसते तर ‘ समता ‘ हे मूल्य मानून त्यासाठी झटायची गरजच उरली नसती. मूल्य-स्वीकार आणि मूल्य-विरोध या द्वंद्वातूनच माणसाची ‘ प्रगती ‘ चालू असते ! काळानुरूप त्या प्रकाराची अभिव्यक्ती, प्रमाण बदलते, वेगळे असू शकते, इतकेच.

हे सर्व पाहता ‘ मूल्यऱ्हास ‘ होतोय, म्हणजे काय ? निरनिराळी मूल्ये स्वीकारणे आणि त्यांचा ऱ्हास करत जगणे हेच तर घडत असते. आज वेगळे असे काय घडतेय ? की आपण मूल्यऱ्हासाबद्दल बोललो म्हणजे आपण स्वतः फार मूल्ययुक्त वागणारे आहोत, असे भासवण्याची ही एक युक्ती असते ? आणि यातले मतभेदांचे क्षेत्र लक्षात घेतले तर आता अगदी मूल्यऱ्हास होतोय असे म्हणण्यासारखे आपले मूल्ययुक्त वागणे कधी होते ? वस्तू आणि बाजार यांचे प्रचंड जग खुले झालेले असल्यामुळे मुळातच असणारी द्वंद्वात्मकता खूप मोठी दिसते, इतकेच !

मूल्ये आचरणात असूच नाही शकत तर त्यांचा ऱ्हास कसला ?

--- ००० ---

## कविता आणि वय

मी अगदी थोडा काळ किर्लोस्कर प्रेसमध्ये ‘ मनोहर ‘ मासिकाचा सहसंपादक म्हणून काम करत होतो. त्या वेळी मी ‘ सहशिक्षण ‘ या विषयावर अनेक नामवंतांच्या आणि शिक्षणतज्ज्ञांच्या मुलाखती घेऊन त्यांचा एक मोठा लेख तयार केला होता. त्या लेखाला प्रभाकर काटे यांची चित्रे लाभलेली होती. सुंदर असणे हे काट्यांच्या चित्रांचे प्रमुख वैशिष्ट्य असे. तर त्या प्रक्रियेत एक विचारवंत असे म्हणाले होते की वयाच्या २५ व्या वर्षापर्यंत मुलाने मुलीकडे पाहताही कामा नये. त्याचे पूर्ण लक्ष त्याच्या शिक्षणावरच केंद्रित असायला हवे. अशा विचारांमुळे ते सहशिक्षणाच्या विरोधात होते. मुलामुलींनी एकत्र शिकताच कामा नये, असे त्यांचे मत होते. यावर, अमुक एक शिक्षणतज्ञ असे असे म्हणतो, त्यावर तुमचे काय मत, असे विचारल्यावर ते माझ्यावर खवळले होते. तर ते असो. नैसर्गिक वाढ आणि मानसशास्त्र यांना धरून त्यांचे विचार नव्हते. इथून सुरुवात करायचे कारण म्हणजे कवितेत येणारे अनुभव आणि कवीचे वय यांचा काही संबंध असतो का आणि त्याचे काही नियम वा शिस्त असते का, हा या पोस्टचा विषय आहे.

स्त्रियांनी, विशेषतः विवाहित स्त्रियांनी प्रेमकविता लिहिणे निषिद्ध मानणारे बरेच लोक अजूनही आपल्या समाजात आहेत. स्त्रियांवर घातले जाणारे हे निर्बंध अनैसर्गिक, अन्यायकारक आहेत, हे समजणाऱ्यांची संख्याही आता बऱ्यापैकी आहे, असे म्हणता येईल. असली बंधने वा अपेक्षा या निसर्ग आणि मानसशास्त्र यांना डावलून बाळगल्या जातात. त्यांना प्रत्यक्ष वास्तवाचा वा मानवी जगण्याचा आधार नसतो. तसेच प्रकार, कोणत्या वयात कशा प्रकारच्या कविता लिहिल्या जाव्यात यांबाबतच्या अपेक्षांमध्येही असतो. तरुण वयात औदासीन्य, मृत्यूचे विचार, निराशा, हे असू नये, असे काहींना

वाटते. माणसाच्या जगण्याबाबतचे मूलभूत प्रश्न – जसे की, दुःख का होते, प्रत्येक संबंधात संघर्ष का असतो – हे खरे तर कोणत्याही वयात पडू शकतात. बुद्धाला ते प्रश्न पडले ते फक्त त्याच्यापुरते नव्हते. ते पूर्ण मानवजातीचे प्रश्न होते. अशा प्रकारच्या चिंतनाची कविता तरुण वयातही लिहिली जाऊ शकते. तरुण वयात कशाला आध्यात्मिक, असे म्हणण्याला अर्थ नसतो. आपण ' आध्यात्मिक ' चा संबंध धार्मिक कर्मकांडे, त्यांतल्या अधिकारांची रचना यांच्याशी जोडतो ते पूर्णतः चुकीचे असते. खरे तर प्रत्येक चांगली कविता ही व्यक्तिगत सुखदुःखांच्या पलिकडचा एकूण मानवी जगण्याचा आवाका घेणारीच असते. काही कविता फक्त व्यक्तिगत रागलोभ वा सुखदुःखे वा मते मांडणेच महत्त्वाचे मानणाऱ्या असू शकतात. आणि तरीही, काही कविता, कोणत्याही अनुभवाच्या निमित्ताने, मनाच्या गुंतागुंतीच्या रचना, जगण्यातली आंतरद्वंद्वे यांचे परिपूर्ण भान घेणाऱ्याही असतात. या अर्थाने त्या आध्यात्मिक असतात. तरुण वयात अशा कविता कुणी लिहीत असेल तर, ' अरेरे ' वा ' बिचारा ' असे कवीला म्हणणारे काही असू शकतात. ज्ञानेश्वर काय, ' वरून ' त्या कामासाठीच आले होते, इतर तरुणांनी त्या फंदात पडू नये, असे त्यांना वाटते.

स्त्री-पुरुष यांच्यांतल्या आकर्षणाचा विषय घेऊ. हे फक्त तरुण वयातल्या लोकांचे आरक्षित क्षेत्र असते, असे काहींना वाटते. तसे वाटणे हे अर्थातच अनैसर्गिक, मानवी जगण्याच्या वास्तवाला नाकारणारे आणि हेकटपणे नैतिक स्वरूपाचे असते. स्त्री-पुरुषांतले आकर्षण हे दोन्ही बाजूंनी वयबद्ध असू शकत नाही, तसे ते नसते, हे अगदी आधुनिक संशोधनही सांगते. त्यामुळे, पन्नाशी, साठीच्या पुढच्या स्त्री-पुरुष कवींनी प्रेमकविता लिहू नयेत, असे वाटणाऱ्यांकडे दुर्लक्ष करणेच योग्य ठरते. प्रेमाकडे व्यक्तिगत अनुभव म्हणून पाहणारे कवी जसे ' उतार ' वयातही असू शकतात तसेच ते अनुभव पूर्ण मानवी जगण्याची प्रक्रिया असे भान घेणारेही असू शकतात. स्त्री-पुरुषांतले आकर्षण वा प्रेम म्हणजे फक्त मुले जन्माला घालायचा कार्यक्रम नसतो. त्याला इतर अनेक आयाम असतात. प्रेमामुळे मेंदूत घडणाऱ्या रासायनिक प्रक्रिया, त्यांचे मानवी जगण्यातले स्थान, यांवर खूप संशोधन झालेले आहे. रजोनिवृत्तीनंतरच्या स्त्रीने वा साठीनंतरच्या पुरुषाने प्रेमकविता लिहिणे म्हणजे काहीतरी अघटित वा विकृत आहे असे समजणे, हेच खरे तर विकृत आहे. माणूस ब्रेनडेड -- मेंदूमृत होत नाही तोवर सर्व मानवी भावभावनांनी, विचारांनी तो युक्त असतो, हे समजून घ्यायला हवे. कलेच्या क्षेत्रात सर्व मानवी जगणे, त्याचे कोणतेही विभ्रम कोणत्याही वयात आविष्कृत होऊ शकतात, हे समजणे अवघड जाऊ नये.

कलात्मक अभिव्यक्तीत कोणत्याही कारणाने वयाची बंधने मानणे ही एक सामाजिक विकृती असते. ते फक्त सवयीने बिंबवलेले विचारव्यूह असतात. स्त्री वा पुरुष कलावंतांनी वा कवींनी असल्या समजांना किंमत देण्याचे काहीच कारण नाही. सरकारी सेन्सॉर नसावा असे आपण म्हणतो, तसाच, हा असला सामाजिक सेन्सॉरही नाकारला पाहिजे.

--- ००० ---

अनियंत्रित – स्वयंचलित कविता

सामान्यतः कलानिर्मितीत कलावंताचा व्यक्तिगत सहभाग – त्याच्या सबोध मनाचे निर्मितिप्रक्रियेवर असणारे नियंत्रण -- गृहीत धरलेले असते. त्याच वेळी अबोध मनही थोडेफार काम करत असले तरी त्याला मुक्त संचार करू दिला जात नाही. तो टप्पा या अनियंत्रित कवितेत ओलांडला जातो. ही मुक्त शैली प्रामुख्याने अतिवास्तववादातून आलेली आहे. कवीने कवितेवर कोणतेही संस्करण न करत बसता ती येतेय तशी खडबडीत वा रॉ म्हणजे पिकण्याची वा पिकवण्याची प्रक्रिया न झालेली असायला हवी, असे अतिवास्तववादाचा प्रणेता आंद्रे ब्रेटन म्हणतो. निकॅनोर पारा च्या अँटि-पोएट्री ( न-कविता ) मध्येही ही तत्त्वे अंतर्भूत असतात. संगीत वा चित्र या कलांतल्या ' अवैचारिक ' तत्त्वांचाही इथे मुक्त वावर

असतो. काहीजण असे म्हणू शकतात की हे तिकडच्या लोकांनी आणलेले आहे – आपल्या मातीतले नाही. सगळी मानवजात एकत्र जगत असते, हे त्यांना समजत नाही. जातवादी, धर्मवादी वा देशवादी टोळ्यांच्या मानसिकतेमुळे असे होते. बुद्ध, जे. कृष्णमूर्ती वा ओशो हे भारतात जन्मले म्हणून जगात इतरत्र अप्रस्तुत ठरत नाहीत. मानसशास्त्राचा अमुक एक अभ्यास परदेशात झाला म्हणून तो इथल्या मातीतल्या लोकांना लागू होत नाही, असे नसते. कालिदास, टागोर, शेक्सपियर, पिरांदेल्लो, बेकेट, आयनेस्को हे पूर्ण जगाचे असतात, हे लक्षात घ्यायला हवे. तर, ही जी अनियंत्रित मुक्त शैली असते ती कुठेही काहीही फेकावे, जोडावे अशी असते का ? तर नाही. वर्तमानपत्राचे एखादे पान फाडून, त्याचे तुकडे हवे तसे मांडून त्यातून मिळणारा कुठलाही शब्दसमुच्चय म्हणजे ही अनियंत्रित कविता असते का ? या प्रश्नाला माझे उत्तर, ‘ नाही ‘ असे आहे. कवीच्याही नकळत त्याचे जगण्याबाबतचे आकलन, परिपक्वता ( असलेली-नसलेली ) ही इथे काम करतच असते. ती व्यक्त होण्याला इथे अतिस्वतंत्र आणि अत्यंत नावीन्यपूर्ण वाव मिळतो, असे मी म्हणेन. गेयता, पद्यता, वैचारिक भूमिका वा भावनिकता अशी बंधने इथे नसतात. त्यामुळे, अर्थातच, अशा कविता फक्त सबोध मनाने वा वैचारिकतेने समजत नाहीत. त्यांच्या निर्मितिप्रक्रियेप्रमाणेच त्यांची वाचनप्रक्रियाही असावी लागते. या कवितेतून, कोणत्याही चांगल्या कलाकृतीप्रमाणेच, जगण्याचे आकलन, भान, परिपक्वता हेच व्यक्त होत असते. आज मी इथे दिलेली ‘ उडता उडता ‘ ही कविता या अनियंत्रित प्रकारातली आहे, असे मला वाटते.( यापूर्वीही मी अशा बऱ्याच कविता लिहिलेल्या आहेत. ) तिच्या ‘ यशस्विते ‘ बद्दल वा ‘ मूल्या ‘ बद्दल माझा कोणताही दावा नाही.

--- ००० ---

जगप्रसिद्ध भारतीय चित्रकार व्ही एस गायतोंडे यांच्याबद्दल बोलताना, त्यांचे एक वैशिष्ट्य म्हणून असे बोलले गेले आहे -- radical idea of separating meaning from painting -- अर्थ आणि चित्र यांची फारकत करणे. एखाद्या चित्रकाराला अशी गरज का, कशामुळे वाटू शकते, याचा आपण विचार करायला हवा.

--- ००० ---

अमूर्त चित्राचा अर्थ आणि दर्जा

कीरो या जगविख्यात हस्तरेषातज्ञाची जरा परीक्षाच करावी, असे एकदा काहींनी ठरवले. हातांचे २०-२५ ठसे घेऊन ते त्याच्याकडे गेले. हे सगळे ठसे ३५ वर्षांच्या पुरुषांचे असून यांतला एखादा ठसा फारच वेगळा वाटतो का ते बघा, म्हणाले. कीरोने ते सर्व ठसे पाहून एक ठसा बाहेर काढला. तो म्हणाला की या माणसाला खुनाच्या गुन्ह्यासाठी फाशीची शिक्षा झालेली असून सध्या तो तुरुंगात आहे. हे बरोबर होते ! मग त्याला फाशी कधी दिले जाईल, असा प्रश्न विचारला गेला. कीरो म्हणाला की त्याची फाशीची शिक्षा रद्द होईल. पुढे तसेच झाले ! हे सगळे अंधश्रद्धा म्हणून उडवून लावण्यासारखे नाही, असे माझे मत आहे. हल्ली मेडिकल पामिस्ट्री आणि करियर पामिस्ट्री यांतही खूप संशोधन झालेले आहे आणि होत आहे. ते जाऊ द्या – या मतभेदासाठी मी हे लिहिलेले नाही.

आता दुसरी एक घटना सांगतो. मी बँकेत नोकरीला लागलो त्या काळात स्पेशल कलेक्शन असा एक प्रकार होता. म्हणजे, एखाद्या ग्राहकाच्या विनंतीवरून त्याने भरलेल्या दुसऱ्या बँकेच्या चेकचे पैसे त्या बँकेत जाऊन रोख आणून देणे. तसे रोख पैसे आणायला मी आणि आमचे एक रोखपाल ( कॅशियर ) एका बँकेत गेलो होतो. तिथला कॅशियर आमच्या ओळखीचाच होता. पण त्याने १०० च्या एका पॅकेटमध्ये एक सदोष नोट ( तेलकट वा धुतली गेलेली असेल वा चिकटवलेलीही असेल ) ठेवली होती. आमचा कॅशियर पैसे मोजत असताना तो दुसरा कॅशियर इकडचे-तिकडचे काही

बोलत राहिला. आमचा कॅशियर नोटा मोजत होता. भराभर. ती नोट येताच त्याने ती बाजूला काढून ठेवली आणि तो पुढे मोजू लागला ! त्याला नुसत्या स्पर्शातून कळायचे ते कळले होते ! हेही सांगण्याचा हेतू वेगळा आहे.

अमूर्त चित्रे बघून आपल्याला असा प्रश्न पडू शकतो की हे खरोखर चांगले चित्र आहे की असेच कुणीही काहीही कसेही रंग उधळून वा थापून मारलेली रंगीत थाप वा बनावट चित्र आहे, हे कसे कळणार ? या बाबतीत आपण संगीताचे उदाहरण घेऊ शकतो. अज्ञात गायक गात असला तरी त्याचे गाणे लांबून ऐकूनही त्याची योग्यता ओळखणारे खूपजण असू शकतात, असतात. तसेच चित्रे ‘ पाहणाऱ्या ‘ ला अमुक चित्र मास्टरचे आहे की एखाद्या नवख्या उडाणटप्पू नक्कलबाजाचे आहे, हे कळू शकते.

आणखी एक प्रश्न असा पडू शकतो की, पत्र्यावरचा वा लोखंडावरचा गंज यातही ‘ अमूर्त चित्र ‘ दिसू शकते. तसेच, झाडाचे खोड, फांद्या, भिंतीचे पोपडे, ढग, चहाचे वा अन्नाचे डाग, मोडक्या वस्तू – यांत कुठेही कलाकृती “ दिसू ‘ शकतात. मग त्यांत आणि कलावंताने निर्मिलेल्या कलाकृतीत फरक काय ? तो कसा कळणार ?

हे प्रश्न काही आपल्यालाच पडतात, असे नाही. जगात अनेकजण यावर विचार करत असतातच. मी एका ठिकाणी असे वाचले की अनेक चित्रे समोर मांडून, चित्रे ‘ पाहणे ‘ माहीत असलेल्या काही लोकांना त्यांतल्या चित्रकारांबद्दल विचारले. या प्रयोगात अनेकदा असे दिसून आले की सुमारे ६५ टक्के लोकांना खरोखरच्या गंभीर आणि निष्णात चित्रकारांची चित्रे नेमकी ओळखता येतात.

अमूर्त चित्रातली मास्टरी कशी समजते यावर एक लेख वाचला. त्याचा सारांश असा –

सातत्य -- चित्रातल्या प्रवाहीपणात एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत सातत्य असते.
रंग – संगती नीट असते.
पोत – अनेक थरांचा असू शकतो. त्यातली सहजता कळते.
गुंतागुंत – चित्रातले आंतरसंबंध त्या चित्राची पूर्णता दाखवतात.
निःशंकता – रंगलेपन, रेषा यांत कुठेही भीती वा गोंधळ नसतो.
अर्थ – गायतोंडे बौद्धिक वा भाषिक अर्थ नाकारतात पण पिकॅसो सारख्या चित्रकारात ते असू-कळूही शकतात.

सारांश म्हणजे, काहींना जे वाटते की हे अनमानधपक्याने अंदाजे चालणारे आणि एखाद्या नशीबवानाला ‘ मोठे ‘ करणारे असे क्षेत्र आहे, ते काही खरे नाही. खरोखरची चिंतनात्मकता आणि माध्यमावरची मास्टरी समजू शकते. नासमझ वा समजून घेण्यात इंटरेस्टच नसलेल्या लोकांनी याची चिंता करायचे कारण नाही.

--- ००० ---

कवितेत आलेला एखादा शब्द

कवितेतला ' मी ' हा बहुधा स्वतः व्यक्तिगत असा कवी नसतो -- माझ्या कवितांत तरी नसतो. व्यक्तिगत सुखदुःखे वा मूडस वाचकांना सांगत बसण्यात मला इंटरेस्ट नाही. पण, कवितेत माध्यम म्हणून वापरले जाणारे अनुभव, माहिती, आठवणी हे तर सगळे कवीच्याच मनातले असते. तर, ‘ मांजरसुंबा ‘ या माझ्या कवितेतले गावाचे ते नाव माझ्याच स्मृतीतले आहे. ते कसे माझ्या लक्षात राहिले ते जरा आत्मप्रौढीचा दोष घेत सांगतो. ९० नंतरच काळ. शेतकऱ्यांना एक अमुक इतक्या रक्कमेपर्यंतची कर्जमाफी जाहीर झालेली होती. अजून संगणकीकरण झालेले नसल्याने बँक कर्मचाऱ्यांना सर्व कामे स्वकष्टाने करावी लागत. आता प्रश्न असा होता की काही कर्जदारांनी निरनिराळ्या बँकांतून कर्जे घेतलेली होती. प्रत्येक ठिकाणी त्यांना उच्चतम रक्कमेचा माफीलाभ देणे चुकीचे होणार होते. त्यामुळे, निरनिराळ्या बँकांत असणारे कॉमन म्हणजे समान कर्जदार शोधून काढून त्यांची कर्जमाफी त्या त्या प्रमाणात त्या त्या बँकांकडे जाणे आवश्यक होते. आणि आमची बँक ही तिथली लीड बँक असल्याने या उद्योगाचा पूर्ण कार्यभार आमच्या बँकेकडे होता. त्या वेळी आमच्या बँकेच्या क्षेत्रीय कार्यालयात मी एका विभागाचा प्रमुख होतो. या कामाचे ठिकठिकाणी नेतृत्व करण्यासाठी आमच्या बँकेचे अधिकारी ठिकठिकाणी पाठवण्यात आले होते. माझ्याकडे खुद्द नगर विभागाची सर्वात मोठी जबाबदारी देण्यात आली होती. निरनिराळ्या बँकांचे सुमारे दीडशे प्रतिनिधी आलेले होते. एका मोठ्या सभागृहात या कामाची व्यवस्था केलेली होती. मी तिथे जाण्यापूर्वीच नीट विचार करून हे काम अत्यंत कमी कष्टांत आणि बिनचूकपणे कसे करता येईल हे ठरवून ठेवले होते. मला दिलेल्या तीन सहाय्यकांनाही ते समजावून सांगितले होते. त्यामुळे ३-४ दिवस चाललेले ते काम हसतखेळत कोणताही ताण न येता पार पडले. ( काही ठिकाणी या कामाच्या योजना नीट न झाल्यामुळे अपयश आले आणि तिथे हा कार्यक्रम पुन्हा राबवावा लागला. ) “ आपण समान कर्जदार शोधण्याच्या वारीतले वारकरी आहोत – आपल्या हातात कर्जदार याद्यांच्या पताका आहेत – “ असे किरकोळ विनोद करत ते काम मस्त पार पडले. अनेक बँकांच्या प्रतिनिधींनी मुद्दाम फोन करून आमच्या साहेबांकडे माझ्या नेतृत्वाची स्तुती केली ! हे सगळे सांगितले कारण त्याच कामाच्या रगाड्यात ‘ मांजरसुंबा ‘ हे नाव कानावर पडले ! हे नाव खासच वाटले आणि काहीसे गंमतीशीरही. नंतर तो शब्द आम्हा सहकाऱ्यांत स्लँग म्हणजे आमच्यापुरताच अर्थपूर्ण झाला. “ अरे, असे नको करूस हे काम, सगळा मांजरसुंबा ( म्हणजे बट्ट्याबोळ ) होऊन जाईल ! “ – असे. तर असे स्मृतीत राहिलेले ते नाव कालच्या कवितेत आले. एका फ्रेंडने सांगितले की ते गाव नगर जिल्ह्यात नसून बीड जिल्ह्यात आहे. त्या वेळी ते नगर जिल्ह्यात होते का, हे आता नीट आठवत नाही. ( नेटवर पाहिले तर नगरच दिले आहे -- एकदोन ठिकाणी बीडही आहे ! ) त्याने काही फरकही पडत नाही. मी ‘ महाराष्ट्रात ‘ अशी दुरुस्ती करूनही टाकली. आले ना लक्षात -- कवितेत आलेल्या एखाद्या शब्दाला कसा इतिहास असू शकतो ते ? एक गंमत समझके भूल जाओ –

--- ००० ---

## सांस्कृतिक चाळा

कोरोना काळात जरा मेंदूचे व्यायाम म्हणून सुचतील ते प्रश्नही येऊ द्यायला हरकत नसावी. culture ला संस्कृती हा शब्द ठीक आहे पण civilization ला सभ्यता हा शब्द नाही पटत. मराठीत ते जाते चांगल्या वागणुकीकडे म्हणजे संस्कृतीकडेच. तर सभ्यते ऐवजी प्रस्थिती हा शब्द मला ठीक वाटतो. सध्या तोच वापरतोय. प्रस्थितीमध्ये अनेक संस्कृती सामावलेल्या असू शकतात. याच सत्याबाबत एक प्रश्न आहे. निरनिराळ्या गटांच्या निरनिराळ्या संस्कृती असतात. त्यांचे वर्णन कुणी असंस्कृत पासून सुसंस्कृत पर्यंत करतात. तर संस्कृतीचे दर्जे असतात का ? संस्कृतीचे मूल्य ठरवता येते का ?

येत असल्यास त्याला आधार कसला असतो ? कला ही संस्कृती निर्माण करत असते, असे म्हणतात. समजा तीन माणसे आहेत -- त्यांनी फक्त

१ मर्ढेकर, ढसाळ
२ पु शि रेगे, केशवसुत
३ आरती प्रभू, दिलीप चित्रे

-- असे आणि एवढेच वाचन केलेले आहे. तर त्यांना मिळालेले सांस्कृतिक टॉनिक कोणते अधिक महत्त्वाचे, असे काही असू शकेल का ? प्रचंड साहित्य वाचलेला माणूस आणि फक्त तुकाराम वाचलेला माणूस यांच्यांत काही फरक असेल का ? कसा, कोणता ?

माणसाचे सांस्कृतिक ' असणे ' म्हणजे काय ? नुसत्याच परंपरा, श्रद्धा, धर्म, जात -- हेच ? संस्कृती या शब्दाचा पूर्ण अर्थ काय असेल -- जो प्रत्यक्ष जगण्यात असेल ?

--- ००० ---

व्यवस्था म्हणजे काय रे भाऊ ?

अभिनेता सुशांतसिंह राजपूत याच्या आत्महत्येमुळे अनेक महत्त्वाचे प्रश्न पुन्हा एकदा चर्चांच्या ऐरणीवर किंवा व्यक्तिगत विचारांच्या मैदानांवरही समोर आले. बॉलिवुडमध्ये मोठमोठी आर्थिक साम्राज्ये आणि घराणी असून ती ठरवतात की कोणते सिनेमे कितपत पुढे येऊ द्यायचे, कोणते फ्लॉप करायचे, कोणत्या नटनट्यांना किती ग्लॅमर मिळू द्यायचे, स्पर्धा कशी करायची, पुरस्कार कुणाला मिळू द्यायचे, वगैरे. ( अशा चर्चा तर फिल्मफेयर, ऑस्कर, ज्ञानपीठ आणि नोबेल यांच्या बाबतीतही होत असतात ! ) यात पूर्ण जरी नसले तरी बरेचसे तथ्य असणारच. जिथे करोडो, अब्जावधींचे व्यवहार होतात तिथे आपापले हित आणि वर्चस्व संभाळणे, त्याला धोका निर्माण करेल त्याला नामोहरम करणे, हे घडत राहणारच – आणि विशेष म्हणजे, हे सर्वांना पटणारच ! यावरच्या चर्चेत एकजण म्हणाले की हे असे फक्त बॉलिवुडमध्येच घडते असे नाही. मानवी व्यवहाराच्या, जगण्याच्या सर्वच क्षेत्रांत हेच घडत असते. हेही अर्थात पटण्यासारखेच आहे. राजकीय पक्ष, कारखाने, बँका, संस्था – या सगळीकडे लॉबीज असतात, गट असतात. वर्चस्वाच्या झगड्यांवरून फुटीही पडतात. याला कुणीही अपवाद नसते. अगदी डावी विचारसरणी मानणारे वा समतावादीही याला अपवाद नसतात. हा मानवी दुष्टपणा म्हणा की गधडेपणा म्हणा की क्रूरपणा म्हणा, यासहच सगळीकडे माणसे वागत असतात. हे लक्षात घेऊनच फोडा आणि झोडा सारखी राजकारणे खेळली जातात. स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करण्यात यशस्वी झालेले, ते टिकवण्याचा आणि विरोधकांना डोके वर काढताच येऊ नये याचे प्रयत्न करणारच. हे सगळे कळत नकळत आपल्याला मान्यच असते. कारण आपली टाळकी तशीच असतात. याहून वेगळे असे काही मानवी जगणे असू शकते का, असा प्रश्नही आपल्याला कधी पडत नाही. कारण, आपल्या वागण्या-जगण्यातून आपण याच मानवी वागण्याच्या पद्धतीला प्रोत्साहन, बढावा आणि ताकद देत असतो. आपल्यावर जेव्हा ‘ दुसऱ्याचे ‘ वर्चस्व असते तेव्हा

आपण, जगण्याची ही पद्धत नव्हे तर फक्त वर्चस्ववाले बदलण्याचे प्रयत्न करतो. त्यालाच आपण ' व्यवस्था बदलणे ' असे गोंडस, आदर्शवादी, न्यायवादी, समतावादी, वगैरे नाव देतो. नुसते वर्चस्व कुणाचे यात बदल करण्याने फक्त, अन्याय करणारे आणि तो सहन करणारे हे बदलू शकतात. ' व्यवस्था ' नाही बदलू शकत. ' व्यवस्था ' म्हणजे आपली मन वापरण्याची वर्चस्ववादी, फुटीरतावादी, स्वकेंद्रित जगण्याची पद्धत. ती बदलण्याबाबतचे प्रश्न कुणालाही पडत नाहीत. मग, मानवी जगणे संवेदनशील, सहकार्ययुक्त आणि सुंदर होण्याची स्वप्ने आपण कोणत्या आधारावर पाहात असतो ?

--- ००० ---

दुःखाचे दशावतार

स्त्रीचे दुःख स्त्रीलाच कळणार – ( त्यातही काळ्या स्त्रीचे वेगळे, गोऱ्या स्त्रीचे वेगळे, नोकरदार स्त्रीचे वेगळे, मजूर स्त्रीचे वेगळे आणि समसंभोगी स्त्रीचे वेगळे )

पुरुषाची दुःखे पुरुषालाच माहीत –

श्रीमंताची श्रीमंताला, गरिबाची गरीबाला आणि मध्यम वर्गीयाला तर वालीच नाही –

आणि चिनी माणसाचे दुःख अमेरिकनाला कसे कळणार ?

आणि मुख्य म्हणजे कुठल्याच एका व्यक्तीचे दुःख दुसऱ्या कुठल्याच व्यक्तीला कळणार नाही –

( हे पाहिले तर दुःखाचे दशावतार म्हणायच्या ऐवजी दुःखाचे अब्जावतारच म्हणावे लागेल ! )

तर, असे हे सगळे मान्यच केले समजा, संवेदनशीलता वगैरे झूठ असते, हेही मान्य केले, समजा –

तर काय ?

मानवी आयुष्यातली ही एक सततची, न सुटणारी, शोकात्म समस्या समजावी

की सगळी मने शास्त्राच्या मदतीने एकसारखी करायचे प्रयत्न करावेत – म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोणातूनच सुटेल ही समस्या, असे काही ?

अशा परिस्थितीत करावे काय, ही एकच समस्या आहे, खरे तर, असे नाही वाटत ?

--- ००० ---

## समजून घेणे म्हणजे काय रे भाऊ ?

मी कोणत्याही विषयातला तज्ञ नाही, हे आधीच कबूल करून ठेवतो. त्यामुळे, ही पोस्ट अर्धवट ज्ञान, अज्ञान, तुटपुंजा अनुभव आणि अर्थ लावण्याचे दुर्बल कौशल्य यांवर आधारित असणे भाग आहे आणि त्याबद्दल क्षमायाचनाही करून ठेवतो. जगणे समजून घेण्याचे प्रमुख मार्ग कोणते, तर, धर्म, तत्त्वज्ञान, विज्ञान आणि कला. आता, यांतले तज्ञ पुरतील का जगणे समजायला ? तर, काही विद्वान म्हणतात, एकात्मिक आकलन व्हायला हवे. हे चार मार्ग तर हवेतच, शिवाय, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र, मानसशास्त्र या सगळ्यांचाही अभ्यास हवा. आहे का कुणी असा एकात्मिक तज्ञ, हे मला माहीत नाही. असला तरी तो परिपूर्ण असू शकत नाही, हे स्पष्टच आहे. कारण या सर्वच ज्ञानमार्गांत अफाट ज्ञाननिर्मिती झालेली असून ते काम सतत चालूच आहे. कोणत्याही माणसाचा मेंदू, त्याची क्षमता, उपलब्ध वेळ यांत ते बसणे शक्यच नाही. मग काय, समजून घेणे म्हणजे ? निरनिराळ्या तुकड्यांतून समजून घेणे चालूच असते, ते वाढतही असते, पण ते एकूणात सगळे अपूर्णच असणार आणि एकात्म होणे शक्यच नसणार. तर करावे काय, असा माझ्यासारख्या अतज्ञ माणसाला प्रश्न पडणे साहजिक आहे.

तार्किकता / बौद्धिकता आणि कला यांबाबत मी एक पोस्ट दिली होती. सध्या, जागतिक साहित्यात मराठी साहित्याचे स्थान, यावरही चर्चा चालू आहे. या विषयांचा विचार एकेका मार्गाच्या तुकड्यांची सत्ये शोधण्यातून कसा करणार ? आता, समजा मी म्हटले की सर्व माणसांच्या जगण्यातल्या प्रश्नांना प्रस्तुत असते किंवा त्यांचा आवाका घेते ते जागतिक साहित्य – तर कुणी म्हणेल की ते जगात खपते किती यावर ते जागतिक आहे की नाही ते ठरवायला हवे. म्हणजे इथूनच मतभेद सुरू होतील. मग कुणी म्हणेल की सर्व माणसांच्या जगण्याला प्रस्तुत असे काही असूच नाही शकत. आता अशा अनेक प्रश्नांचे करायचे काय ? सारखे कोणत्या तज्ज्ञांकडे जायचे ? आणि ते तज्ज्ञही बिचारे एकात्मिक तज्ज्ञ असूच नाही शकणार ! याचा अर्थ, आपण समजून घेण्याच्या मार्गात आहोत अशा भ्रमात राहून सर्वांनी नुसती तुकडे-मेहनत करत राहणे – हेच स्वीकारायचे का – हा एक प्रकारचा पराभवच नव्हे का ?

समजून तरी काय घ्यायचे आहे ? माणसामाणसांमधल्या संबंधांच्या जगात अमर्याद, अनिर्बंध गोंधळ आणि हिंसा चालू असलेली दिसते. प्रत्येक गोष्टीवर अधिकारवाणीने बोलणारे तुकडे-विद्वानही आहेत पण त्यांचा कवडीचा काही उपयोग नाही, हे दिसते आहे. आपण विज्ञान विज्ञान म्हणतो, ते सारखे शोधही लावत असते, चंद्रावर वा मंगळावरही जाऊ शकते पण माणसामाणसांतली हिंसा या विषयात ते ढ च असते ! मठ्ठ असते ! फिर क्या करने का ? नुसते तत्त्वज्ञान तरी एकात्म असू शकते का ? वेगवेगळ्या प्रणाल्या, विचारपद्धती, आकलनपद्धती असतात – त्यांतून एकात्म काय समजणार ? की कुणीतरी म्हणणार की यातले अमुकच बरोबर ? या या कारणांनी माणसाच्या जगण्याची बोंब झालेली आहे, त्यांत असे असे बदल करा की इथे स्वर्ग अवतरेल ! – आणि हे कोण सांगणार ? कोण असणार असा सर्वमान्य इसम ? आणि सर्वमान्य होण्यासाठी कुणाची वा कोणत्या समितीची लागेल मान्यता ?

आणि असे एकात्मिकपणे सत्य समजणे हे विद्वानांच्याही बसकी बात नसेल तर इतर सर्वसामान्य माणसांचे काय ? आपल्याला कदापीही काहीच समजू शकणार नाही या खात्रीच्या पराभूत अज्ञानांधकारातच त्यांनी जगायचे ?

तर हा समजून घेण्याचा असा विचका काही कामाचा नाही. प्रत्येक माणसाला समजू शकेल अशी जर काही शक्यताच नसेल तर, नाही तरी शक्यच नाहीय काही पद्धत, असे म्हणून अधिकच वेगाने बरबादीच्या दिशेने जावे ? कुछ तो सिंपल होना चाहिये ! नाहीतर सर्वजण एकमेकांना चुना लावत राहतील ! आता ही अशी सिंपलपणाची कल्पना बालिश आहे, अडाणी आहे, असेही कुणी म्हणू शकेल !

--- ००० ---

मानवी जगण्याचा सर्वंकश आवाका घेणे, हे चांगल्या कलेचे रहस्यच देशीवाद नाकारतो. आपापले प्रोग्रामिंग व्यक्त करणे म्हणजेच कला, असे तो मानतो. प्रोग्रामिंग हे फक्त माध्यम असते कलेचे हे देशीवादाला कळत नाही. तो संकुचित थिट्या कलेचा पुरस्कार करतो.

--- 000 ---

' सभ्यता ' हा शब्द मराठीत वापरात नव्हता, तो हिंदीतून आला असावा. त्याबाबत प्रश्न निर्माण करायचा होता म्हणून ' प्रस्थिती '. वाङ्मयाचे वाचन हे एक उदाहरण म्हणून घेतले आहे. पूर्ण सांस्कृतिकता तेवढ्यानेच घडते, असे म्हणणेच

नाहीय. मुख्य प्रश्न मानवी जगण्यात ' गुणवत्ता ' असे काही असते का, हा आहे. लोकांच्या स्वभावांप्रमाणेच संस्कृती वेगवेगळ्या असतात, असे म्हणून भागणारे नाही. माणूस एकीकडे क्रूर असला तरी दुसरीकडे प्रेमळ असू शकतो -- हे निव्वळ आत्मकेंद्रीपणातून घडते -- याला संस्कृती कसे म्हणणार ? माणूस मधुमेही असो वा नसो, सर्व माणसांसाठी सांस्कृतिक आकलन एका मार्गानेच घ्यावे लागेल. प्रश्न हाच आहे की संस्कृती ही फक्त फरकाची निदर्शक असते की तीत जगण्याची गुणवत्ता असे काही असते ? मला वाटते, ' संस्कृती ' हा शब्द नुसता वर्णनात्मक नसून गुणवत्तानिदर्शकही आहे. तर ती गुणवत्ता म्हणजे काय, ती पूर्ण मानवजातीसाठी एकच असू शकते का, हे प्रश्न आहेत. माणसांच्या सवयी वेगवेगळ्या असतात एवढेच जर असेल तर हिंसा, युद्धे, द्वेष, दुष्टपणा टाळणारे यात काही नाही, असे होते. मग, कलेचे तरी महत्त्व कशाला माजवायला हवेय, असे होते.

--- 000 ---

एकदा कारण-परिणाम ही साखळी आणि कंडिशनिंगचेच फक्त जगणे, ही चौकट फिट झाली की ' अद्भुत ' वगैरे शब्दांना अर्थ राहात नाही. या चौकटीत मूल्यात्मकता कशी असते ते सांगा. या चौकटीबाहेर काही घडतच नसेल तर कला तरी 'सर्जक ' कुठली असणार ? एकूण जगण्यातही ' सर्जकता ' हा विषयच संपणार. सगळे असेच, याच चौकटीत असणार हे मान्य करणे या अर्थी सगळेच समर्थनीय ! नो मूल्यात्मकता ! कलेचे कार्यच नाकारणे !

--- ००० ---

न-कवितेला कुणी नगण्य समजू नये. तीही जगण्याचे भान वाढवणारी महत्त्वाची कविता असते. एकरेषीय विचारप्रक्रियेतून ती बाहेर पडत असल्याने तिला एक वेगळाच ताजेपणा असतो आणि तिचा आवाकाही वाढलेला असतो. भाषेचे अकल्पित नवे आयाम ही कविता खुले करते. अनेकांनी अशी कविता लिहीत राहावे, असे मी सुचवू इच्छितो.

--- ००० ---

. > चं प्र देशपांडेंची कवितालेखन पद्धत हीच मुळात वेगळी आहे मी चुकत नसेन तर ते कविता लेखन करायला बसतात असं त्यांनी म्हंटलं आहे < -- एवढ्यापुरतेच बोलतो. मी कविता करायला वा रचायला बसत नाही. कवितेला काही निमित्त दिसते आणि मी लिहू लागतो -- प्रत्येक ओळ मला नवीच असते. सामान्यतः कविता एका वेळी लिहून पूर्ण होते. पुन्हा वाचताना एखादा शब्द कमीजास्त केला जाऊ शकतो. पण, लिहून झालेले जवळजवळ अंतिमच असते. मी मुद्दाम भावनाशीलता टाळायचा प्रयत्न करत नाही. व्यक्तिगत भावभावना व्यक्त करण्यात मला फारसे स्वारस्यच नाहीय. कवितांची निमित्ते वेगवेगळी असतात -- जगण्यातले ( जे असेल ते ) आकलन हा आशय एकच असतो.

--- ००० ---

माणसांची डोकी आतून फुटलेली आहेत -- मने विदीर्ण आहेत -- जगणे संघर्षमय, हिंसक आहे -- हे सगळ्यांनाच त्रासदायक आहे -- तरीही, हे असे का आहे, हा ठरतो आध्यात्मिक प्रश्न आणि बुद्धिमान लोक लगेच त्याची टवाळी करायला सरसावतात ! टवाळी करणे म्हणजे श्रेष्ठ जगणे असा भ्रम आत्मसात करण्याकडे कल आहे -- कलावंतही याला अपवाद नाहीत !

--- ००० ---

संकेतस्थळ आणि निर्दयता

माझे संकेतस्थळ तयार करताना --

मानव
मरणाचे स्मरण असावे
राज्य
पंतप्रधान येत आहेत
घटना घडतात
आणि
' ट्रायल ' चे पहिले नाट्यरूपांतर

-- ही सहा न जमलेली अपयशी नाटके निकाली काढली. नष्टच केली. त्यांतली, ' पंतप्रधान येत आहेत ' आणि ' घटना घडतात ' ही दोन नाटके ' अभिरुची ' मध्ये आली होती, ती असतील कुठेतरी. त्यांतले ' राज्य ' हे एक रद्दड नाटक माझा मित्र कै. प्रा. अरुण पाटील याने सांगली बँकेमार्फत राज्यनाट्यस्पर्धेत सादर केले होते. कोल्हापुरातल्या आमच्या मित्रमंडळाचा प्रमुख गुण होता निर्दयपणा ! माझ्या त्या नाटकाची मित्रांनी यथेच्छ टिंगल केली होती ! यांतले गंमतीचे भाग म्हणजे, ' मरणाचे स्मरण असावे ' हे लोकनाट्य टाईप नाटक, निळू फुले पुण्यातल्या मीरा सोसायटीत राहात असताना त्यांच्या घरी जाऊन ते आणि राम नगरकर यांना माझ्यासह बोअर करत ऐकवले होते ! ते दोघे खूप दयाळू होते, हे निर्विवाद ! ' ट्रायल ' चे तेव्हा मुळीच न जमलेले नाट्यरूपांतर, माहीमला अरविंद देशपांडे यांच्या घरी जाऊन, ते, सुलभा देशपांडे आणि काकडेकाका यांना ऐकवले होते ! तेही तिघे खूप दयाळूच होते !( नंतर, बराच काळ गेल्यावर, पुन्हा केलेले आणि माझ्या मते जमलेले, ' ट्रायल ' चे नाट्यरूपांतर संकेतस्थळावर उपलब्ध आहे. )

बाकीच्या लेखनात मीच खूप निर्दयपणा केला. न जमलेल्या कविता नष्ट केल्या. काहींची काटछाट केली. निव्वळ लिहून झालेय म्हणून कसले कौतुक ? वाचकांपुढे अमुक हे सादर करावे, असे आपल्याला आधी वाटले पाहिजे.

इन ड्यू कोर्स ( स्वाभाविक ओघात )

हा एक इंग्रजीत लिहिलेल्या कवितांचा संग्रह होता. राष्ट्रीयीकरणानंतर खेड्यापाड्यांत उघडलेल्या शाखांमध्ये शाखाप्रबंधक म्हणून जाऊन काम करणाऱ्यांचे जगणे यात होते. याचा एक किस्सा आहे. एन आय बी एम मध्ये मी एका निवासी व्यावसायिक प्रशिक्षणासाठी आमच्या बँकेतर्फे गेलो होतो. ते सर्व प्रशिक्षण मानसशास्त्राधारित होते. शिकवण्यासाठी खरोखरच प्रचंड आदरणीय असे डॉ. बार्थकूर नामक, शास्त्र आणि व्यवसाय यांची उत्तम सांगड घालत शिकवणारे मास्टर प्रशिक्षक होते ! थोड्याच काळात मी त्यांचा एक आवडता विद्यार्थी झालो होतो. त्यांनी एकदा व्यंगचित्रे काढायची स्पर्धा ठेवली होती. दिवसभर त्यांचे विचार ऐकणे आणि रात्री तिथे चावणारे डास यांची सांगड घालून आमच्या

टीमने ' बार्थकुरांनी सोडलेले वैचारिक डास ' असे काही चित्र काढले होते ! तर मुद्दा असा की त्या इंग्रजी कविता मी त्यांना दाखवल्या होत्या. ते फारच खुश झाले होते. एन आय बी एम ने फक्त आकडेवारीचीच पुस्तके प्रसिद्ध करावीत असे काही नाही – बँकिंगमधला हा असा मानवी भागही त्यांनी प्रसिद्ध करायला हवा, असे त्यांना वाटत होते. त्या कवितांची मांडणी कशी हवी वगैरे आमच्या चर्चाही झाल्या होत्या. पण, कामाचा रामरगाडा, माझे कामाचे ठिकाण हडपसर हे पुण्याचे एक टोक, एन आय बी एम हे दुसरे टोक आणि मी राहात होतो ते सहकारनगर हे तिसरे टोक, या गोंधळात माझ्याकडूनच ते काम काही पुढे गेले नाही. ' आता काय त्याचे ' म्हणून तेही मी संकेतस्थळावर घेतलेले नाही !

हे सगळे सांगायचे एक कारण आहे. थोडे काही लिहायला नाही जमले किंवा कुणी काही लेखनातले दोष सांगितले की नाराज, निराश आणि खट्टू होऊन लिहिणे सोडूनच द्यावे अशा मनःस्थितीत पोचणारे लोक दिसतात. खरी आच पाहिजे, मित्रांनो, पॅशन पाहिजे ! यश मिळवण्यासाठी लिहायचे हा किरकोळ हेतू सोडून पुढे जाता यायला हवे.

--- ००० ---

विद्वत्ता म्हणजे काय रे भाऊ ?

कलेच्या वा मानवी संबंधांच्या क्षेत्रात बुद्धिमान वा विद्वान कुणाला म्हणावे याचे दोन निकष मला दिसतात. एक म्हणजे त्याला एकास एक अशी एकरेषीय कारणमीमांसा देता आली पाहिजे आणि दुसरे म्हणजे जास्तीत जास्त बाबतींत सामान्यीकरण – generalization – करता आले पाहिजे. एकाच बाबतीत अनेक विद्वानांच्या कारणमीमांसा वा सामान्यीकरणे वेगवेगळी असू शकतात. प्रत्येक गोष्टीला हजारो, लाखो, कोट्यवधी कारणे असतात याकडे सर्वच विद्वानांना दुर्लक्ष करावे लागते. आपापले इंटरेस्ट, विचार आणि निवड यांतून ते तसे घडत असते. तुमचे विचार कसे चालावेत हेही तुमचा जनुक नकाशा, मेंदूतल्या पेशी आणि रसायने यांवर अवलंबून असते, असेही संशोधन आहे. पण, ते सोडून देऊ, कारण विद्वानांच्या जगण्याचा आधारच काढून घ्यावा, असा निर्दयपणा करणे हे माणुसकीहीनपणाचे होईल. तर, विद्वत्तेचे एक उदाहरण म्हणून हे देतोय –

" मला म्हणायचंय असं की १८४३ मध्ये पहिल्या नाटकाचा प्रयोग झालेला आहे आणि १८१८ मध्ये शनिवारवाड्यावर युनियन जॅक फडकलेला आहे. म्हणजे सत्तांतर आणि नाटक यांत २५ वर्षांचं अंतर आहे. याचा अर्थ, ज्यांच्या हातून सत्ता गेली त्या मध्यमवर्गीय ब्राम्हणांनी नाटकाचा प्रवाह सुरू करून दिला, असे म्हटले पाहिजे. " – गो. पु. देशपांडे, साधना, १७ डिसेंबर २०११. सत्ता गेल्यामुळे मध्यमवर्गीय ब्राम्हणाच्या जीवनात सांस्कृतिक पोकळी निर्माण झाली, त्यावर तो मार्ग शोधत होता, त्यातून भाव्यांकडून पहिले नाटक लिहिले गेले, अशी ती मीमांसा होती. गोपूंच्या त्या संबंधित बीजभाषणावर मला बोलायचे होते. यावर मी म्हटले होते की, " त्याचप्रमाणे, राजकीय क्षेत्रातून हकालपट्टी झालेल्या लोकांनी मराठीतले सांस्कृतिक क्षेत्र गेली काही वर्षे काबीज करून ठेवलेले आहे की काय, याचेही ऐतिहासिक विश्लेषण व्हायला हरकत नसावी. " – साधना, २४ डिसेंबर २०११.

मला कोणतेच निष्कर्ष सांगायचे नाहीयत. पण, भराभर निष्कर्ष काढत जाणे आणि आपल्याला सगळे समजलेय असा आभास तयार करणे हे मला निर्बुद्धपणाचे वाटते. आणि मग असा निर्बुद्धपणा विद्वानांनी केला काय आणि सामान्यांनी केला काय – निर्बुद्धपणाचा दर्जा तर एकच असणार ! त्यामुळे मीही एक निर्बुद्ध मीमांसा मांडतोय –

एक काळ असा आला की आपण अलग पडण्याचा धोका आहे, अशी ब्राम्हणांना भीती वाटू लागली. त्यातून, आपण, एकूण मोठ्या समूहाशी जोडून घ्यायला हवे, अशी त्यांना गरज वाटू लागली. या उद्दिष्टासाठी काही ब्राम्हणांनी अंगभूत कपटीपणातून डाव्या विचारसरण्यांचा मार्ग निवडला तर इतर काही ब्राम्हणांनी तशाच कपटीपणातून हिंदुत्ववादाचा मार्ग निवडला. वस्तुतः पूर्ण मानवच कपटी असतो पण, बुद्धीचे आणि विचाराचे क्षेत्र स्वतःकडे ठेवणे बरीच वर्षे ब्राम्हणांना जमलेले असल्याने तो गुण त्यांच्याकडे जरा जास्त असतो, हे लक्षात घ्यायला हवे. आता त्यांची ती मक्तेदारी फारशी राहिलेली नाही, हा भाग वेगळा. दोन्हीकडे म्हणजे डावीकडे आणि हिंदुत्ववादाकडेही ब्राम्हणांना तीव्र आणि कट्टर राहणे भाग होते. जिंदगीका सवाल था ! -- प्रत्येक सामान्यीकरणात थोडे तरी तथ्य असतेच ना !

एक लक्षात येतेय ना ? सामान्यीकरण केले की प्रामाणिकपणा, सत्य, असत्य, मूल्यात्मकता, न्यायात्मकता अशा सगळ्या बाबी मातीत घालता येतात ! ( शेवटी एक गुपित सांगून टाकतो. टीव्हीवर जशा विद्वानांच्या चर्चा वा भांडणे चालू असतात ना तसे काही जमण्याची माझ्यात कवडीचीही कुवत नाहीय. त्यामुळे, विद्वत्ताच कशी कुचकामी असते, ते मांडण्याचा माझा डाव असतो ! )

--- ००० ---

चांगली कविता

“A good poem is a contribution to reality. The world is never the same once a good poem has been added to it. A good poem helps to change the shape of the universe, helps to extend everyone's knowledge of himself and the world around him.”

— Dylan Thomas

“ चांगली कविता ही वास्तवाला मिळालेली एक देन असते. एकदा का एखादी चांगली कविता जमा झाली की जग कधीच आहे तसे राहू शकत नाही. चांगली कविता विश्वाचा आकार बदलण्यात साहाय्य करते, प्रत्येकाचे आत्मज्ञान वाढवते आणि त्याचबरोबर भोवतीच्या जगाचेही. “ – डिलन थॉमस.

हा फक्त ३९ वर्षे जगलेला एक विलक्षण कल्पक कवी. मानवी जगण्यातली एकात्मता हा त्याचा प्रमुख आशय असतो, असे एका समीक्षकाने म्हटलेले आहे. त्याला सुसंगत असेच हे त्याने उच्चारलेले वाक्य आहे. 'Light Breaks Where No Sun Shines' ही त्याची एकच कविता वाचूनही टी. एस. एलियट हा अत्यंत प्रभावित झाला होता. एका कवितेवरून कवीची योग्यता ओळखणारे आणि तसे जाहीरपणे म्हणायची हिंमत असलेले लोक इथेही जन्माला येवोत, असे आपण म्हणू शकतो.

तर डिलनचे असे म्हणणे आहे की एक चांगली कविता निर्माण झाली की ती पूर्ण जगावर प्रभाव टाकते. आपण म्हणतो की काफ्का, बेकेट यांनी जग बदलले, याचा अर्थ तोच असतो. काफ्का वाचलेले किंवा ' वेटिंग फॉर गोदो ' नुसते माहीत असलेले तरी किती लोक असतील जगात, असा प्रश्न इथे फिजूल ठरतो. आपल्या सर्वांच्या सर्व कृतींचे आपणा सर्वांवर प्रभाव पडत असतात, हे आपण पाहिले पाहिजे. जे. कृष्णमूर्ती म्हणतात की तुम्हीच जग आहात, तुम्ही बदलणे हेच जग बदलणे असते. या अर्थाने एखादी चांगली कविता वा कलाकृती ही जग बदलत असते, हे खरेच आहे. ती कविता निर्माण झाली एका मानवी भानातून इथेच जगावर प्रभाव पडलेलाच असतो. मग त्या कवितेचे वाचक कमी असोत वा जास्त.

हाच आशय व्यक्त करणारे माझे एक नाटक आहे – ' धागेदोरे '. पूर्ण नाटकभर वेगळेच काही चालू असते आणि शेवटी त्या सगळ्याचा परिणाम भलतीकडेच एका तरुणाच्या मृत्यूत होतो, असा तो कथाभाग आहे. वाटल्यास, जमल्यास वाचून पाहावे.

सारांश, चांगल्या कलाकृती म्हणजे काय याचे चिंतन घडत राहावे. चाललेल्या रटाळ, सवयीच्या, हिंसक जगण्याला धक्का देतील अशा कलाकृतींचे स्वागत होत राहावे.

--- ००० ---

राज कुमार के बेस्ट सीन्स - Raaj Kumar - Best Scenes Compilation - Jukebox

youtube.com

आमचे कॉलेज – इस्माईल युसुफ कॉलेज

मुंबईत जोगेश्वरी पूर्वेला हे कॉलेज आहे. तेव्हा रूपारेल कॉलेज म्हणजे सुंदर मुलींचे कॉलेज आणि हे आमचे म्हणजे मुंबईवरून ओवाळून टाकलेले कॉलेज, असे समजले जाई. पण कॉलेजचा परिसर म्हणाल तर नंबर वन. हे एका छोट्या टेकडीवर आहे – उत्तम झाडी आणि सुंदर निसर्गयुक्त ! मला एस एस सी ला उत्तम गुण होते. अंधेरी ते बोरिवली या सर्व केंद्रांत मी पहिला आलेलो होतो. त्यासाठीचे लायन्स क्लबचे पारितोषिकही मला मिळालेले होते. मला मुंबईत कोणत्याही कॉलेजात प्रवेश मिळाला असता. मला इंग्रजीत एम ए करून त्या विषयाचा प्राध्यापक व्हायचे होते. माझी ही इच्छा लक्षात घेऊन, माझ्या वडिलांच्या ओळखीच्या एका ज्येष्ठ प्राध्यापकांनी असा सल्ला दिला की याला इस्माईल मध्ये घाला. इस्माईल आणि एल्फिन्स्टन ही मुंबईतली दोन सरकारी कॉलेजेस. एल्फिन्स्टन दर्जासाठी प्रसिद्ध होते, तसे हे नव्हते. पण तिथे इंग्लिशच्या विभागप्रमुख होत्या मिस होमाई जे. श्रॉफ – ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या एम ए आणि पूर्ण आयुष्यच वाङ्मयाला वाहिलेल्या. त्या वेळी मुंबईत इंग्रजी शिकवण्यात तीन प्राध्यापक ग्रेट म्हणून ओळखले जात. एक म्हणजे प्रा. बॅनर्जी, दुसरे विंदा करंदीकर आणि तिसऱ्या या श्रॉफ बाई ! मी या श्रॉफ बाईकडून ' मॅक्बेथ ' आणि चॉसरच्या ' कँटरबरी

टेल्स ' शिकलो हे माझे भाग्यच म्हणावे लागेल. या बाई तशा धिप्पाड होत्या आणि यांचा कॉलेजात खूप दरारा होता. यांच्या समोर बसून आम्ही तीन विद्यार्थी शिकू शकतो यासाठीही कॉलेजात आम्ही आदरपात्र होतो ! एखाद्या गुंड मुलाच्या पाठीत गुद्दा मारायचीही या बाईंची हिंमत होती ! मी ग्रांट रोडला एकदा त्यांच्या घरी गेलो होतो. घरात जणू एक मोठे वाचनालयच होते. " कधीही ये आणि यांतली तुला हवी ती पुस्तके वाचायला नेत जा " असे मला त्या म्हणाल्या होत्या. कॉलेजच्या स्नेहसंमेलनाच्या दिवशी मी त्यांना सिगरेट पितानाही पाहिले होते. तेव्हा ते प्रचंड अप्रूप होते. मला एकदा त्यांनी विचारले होते की अमुक प्राध्यापिका कशी शिकवते ? मी काही बोललो नाही, तर म्हणाल्या, ते जाऊ दे, ती स्लीव्हलेस घालून येते, जवळ बसून बघायला तरी छान वाटते ना ? या असल्या संवादांचे अस्तित्वच मी कधी पाहिले नव्हते ! असो. सांगत बसल्यास त्या कॉलेजच्या बऱ्याच आहेत आठवणी. बी ए झाल्यावर, बास आता शिक्षण म्हणून मी तो मार्ग सोडला, हा भाग वेगळा. इंग्रजीचा प्राध्यापक होणे ही आपल्या बसकी बात नही, हे मला समजले होते.

हे सगळे आठवायचे कारण म्हणजे काल काही जुनी गाणी ऐकताना, माझ्या आवडीचा नट राजकुमार याच्या गाजलेल्या संवादांचा एक व्हिडियो समोर आला. तो नट डायलॉग किंग म्हणून प्रख्यात होता. तो पाहू लागलो तर पहिल्याच दृश्यात आमच्या कॉलेजचे दर्शन घडले ! परिसर सुंदर असल्याने तिथे अनेक हिंदी चित्रपटांची चित्रीकरणे होत असत. इमारत दगडाची असल्याने ती बाहेरून कोर्टाची वगैरे वाटू शकते. या दृश्यात ती तशीच दाखवलेली आहे. त्याची लिंक खाली देतोय.

या कॉलेजाचा मराठी साहित्याशीही चांगलाच संबंध आहे. इथे प्राध्यापक वा विद्यार्थी म्हणून येऊन गेलेले मराठी लेखक --

प्राध्यापक
बा. सी. मर्ढेकर ( कवी, कादंबरीकार, समीक्षक. )
पु. शि. रेगे ( कवी, कथाकार, नाटककार, कादंबरीकार आणि समीक्षक. )
शंकर वैद्य ( कवी आणि समीक्षक. )
विद्यार्थी
पु. ल. देशपांडे ( लेखक, नाटककार, अभिनेते, संगीतकार, वगैरे – महाराष्ट्राचे हरहुन्नरी लाडके व्यक्तिमत्व. )
चं. प्र. देशपांडे ( महाराष्ट्राला फारसा माहीत नसलेला नाटककार, कवी. )

आता ही घ्या ती लिंक आणि बघा आमचे कॉलेज --

https://www.youtube.com/watch?v=rf9T18lPT5g
--- ००० ---

माझे परभाषिक कवितांचे अनुवाद

गेल्या काही वर्षांत मी मधून मधून मला आवडलेल्या वा काही कारणाने विशेष वाटलेल्या अशा परभाषिक कवितांचे अनुवाद करत आलेलो आहे. ज्या कविता मुळात इंग्रजीतूनच लिहिल्या गेल्या आहेत त्यांचा त्या मूळ रूपांतून आणि ज्या

अन्यभाषिक कवितांचे इंग्रजीत अनुवाद उपलब्ध आहेत त्यांचे त्या अनुवादांवरून असे मी अनुवाद केलेले आहेत. या प्रक्रियेत अनेक प्रश्न असतात, जसे की मूळ इंग्रजीत असलेली कविता तरी मला कितपत समजलेली आहे इथपासून ते मी अनुवादाला घेतलेला अनुवाद कितपत विश्वासार्ह आहे, इथपर्यंतचे, असे अनेक प्रश्न असतात. मुळात लिखित कविता हीच प्रत्यक्ष सत्य नसून सत्याची अभिव्यक्ती असते असे म्हटले तर ती मूळ कविता हाच सत्याचा पहिला अपलाप असतो. तिचा अनुवाद हा दुसरा अपलाप म्हटला तर अनुवादाचा अनुवाद हा तिसरा अपलाप म्हणावा लागतो. तर, सारांशाने मी कोणत्याही कवितेचा दुसरा वा तिसरा अपलाप करत असतो.

हे अनुवाद करावेतच कशासाठी मुळात, असा एक प्रश्न अनेकांच्या मनात येऊ शकतो. इथल्या मातीतली कला वगैरे बडेजाव माजवणारे आपण लोक आहोत. इथली माती म्हणजे काय ? फक्त शेतकरी, शेतमजूर, दलित वा कामगार यांच्या जगण्याचे वास्तव ? तसे म्हणता येत नाही. कुणाचेही कोणतेही अनुभव कलेची सामुग्री होऊ शकतात. त्यामुळे, इथली माती म्हणजे कुणाच्याही मनाची कोणतीही माती, हे आधी लक्षात घ्यायला हवे. मराठी भाषिक कवींचीही एकमेकांची माती वेगवेगळीच असते. परमातीच असते. तरीही एकमेकांच्या कविता थोड्याफार, अपलाप होत का असे ना, एकमेकांपर्यंत पोचू शकतात. लकबी, सवयी, चालीरीती, श्रद्धा, नीतिकल्पना, आदर्श, अस्मिता हे सगळे जरी वेगवेगळे असले तरी – सुख, दुःख, मानापमान, प्रेम, असूया, हेवा, सूड, महत्त्वाकांक्षा, वर्चस्वाची इच्छा अशी ही माती सगळीकडे जगभर सर्व माणसांत तीच -- एकच असते. त्यामुळेच तर कलेतून होणारी अभिव्यक्ती आणि संपर्क हे सर्वच माणसांना प्रस्तुत असू शकतात. काहीजणांना वाटते की त्या त्या संस्कृतीत आपापले कलाशास्त्र, साहित्यशास्त्र असते आणि ती परंपरा जपत, विकसित करतच सर्वांनी चालले पाहिजे. मला ही धारणा मूर्खपणाची वाटते. ही धारणा मातीच्या वेगवेगळेपणाला महत्त्व देणारी असून तिच्यातल्या समावेशकतेकडे दुर्लक्ष करणारी आणि म्हणून संकुचित आहे. कोणत्याही कलेचा अनेकांशी संपर्क होतो तो मातीच्या वेगळेपणामुळे नव्हे तर तिच्यातल्या समानतेमुळे, समावेशकतेमुळे, हे लक्षात घ्यायला हवे. अशा या आकलनामुळेच, परभाषेतल्या कलाकृती अनुवादित होणे मला आवश्यक, महत्त्वाचे आणि समर्थनीय वाटते. जगातल्या कोणत्याही साहित्यविचारप्रणाली मला महत्त्वाच्याच वाटतात.

याच कारणामुळे अनुवाद हा नुसताच शाब्दिक प्रक्रियेबरोबर जाणारा वा नुसताच शाब्दिक असून चालत नाही. अनुवादकाची आकलनप्रक्रिया ही त्या कवितेच्या समावेशकतेकडे लक्ष देणारी असावी लागते. अनुवादकाच्या आकलनाला अशी एकसंधतेची पार्श्वभूमी नसेल तर तो अनुवाद नुसताच शाब्दिक, तुकड्यातुकड्यांचा, ओबडधोबड आणि मूळ कलाकृतीला ठार करणाराच होईल. त्यामुळे, अनुवादाला घेतलेल्या कवितेत आकलनाच्या या एकसंधतेचे दर्शन अनुवादकाला झालेले असणे महत्त्वाचे ठरते. अनुवाद करताना अनेक पर्यायी शब्दरूपे सुचत असतात, त्यांतले नेमके शब्दरूप निवडताना वा काही वेळी नव्याने घडवतानाही ती आकलनाची एकसंध प्रक्रियाच अबाधित राहायला हवी, अशीच योजना स्वीकारावी लागते. या एकूण दृष्टिकोणामुळेच मी असे म्हणतो की उदाहरणार्थ समजा एका फ्रेंच कवितेच्या इंग्रजीतल्या अनुवादावरून मी मराठी अनुवाद केलेला असला तरीही त्या इंग्रजी रूपापेक्षा माझा मराठी अनुवाद हा मूळ कवितेशी अधिक निष्ठावान असू शकतो. आणि त्याच्याही पुढे जाऊन मी असेही म्हणेन की मूळ कवितेतले पहिले अपलापत्व कमी झाल्यामुळे माझा मराठी अनुवाद हा मूळ कवितेहूनही अधिक सकस व सशक्त झालेला असू शकतो. यात कुणाचा मानापमान वा श्रेष्ठकनिष्ठत्व नसून या प्रक्रियेचेच ते वैशिष्ट्य असते. हे सर्व लक्षात घेता अनुवादाला नवनिर्मितीचेच महत्त्व द्यायला हवे, असे मला वाटते. या सर्व प्रक्रियेत व्यक्तिमाहात्म्य वा विभूतिमत्व हे महत्त्वाचे नसून कवितेचा आशय म्हणजे त्यात अंतर्भूत असलेली जगण्याचे भान घेण्याची प्रक्रियाच महत्त्वाची असते, असे मला म्हणायचे आहे.

माझी माती, माझी भाषा, माझी संस्कृती, माझ्या विचारपद्धती, सवयी, लकबी, कल्पना, आदर्श, चालीरीती वगैरे हेच जगात सर्वोच्च महत्त्वाचे असते, असे मी समजत नाही. या बाबींमधील भेदांमुळे एकमेकांच्या कविता समजण्यात येणाऱ्या व्यावहारिक अडचणी वा अडथळे मान्य असले तरी. जगातले कोणतेही कवी मी त्याच आत्मीयतेने वाचू शकतो ज्या आत्मीयतेने मी आरती प्रभू वा गुरुनाथ धुरी वाचेन. आणि इंटरनेटमुळे प्रचंड खजिनेच आपल्यासाठी खुले आहेत ! मी लहर लागली तर, आज रशियातले वा इंग्लंडमधले वा फ्रान्समधले कवी काय लिहिताहेत, हे पाहात बसतो. कधी ओळीने अतिवास्तववादी कवीच वाचतो किंवा प्रतिमावादी कवी. यात विद्वत्ता जमा करणे हा हेतूच नसतो. याची मी ना टिपणे ठेवतो ना ते लक्षात ठेवायचा आटापिटा करतो. वाचले, जमेल तेवढे समजले की संपले. त्यांतले काही कवी मला महत्त्वाचे वाटतात. त्यांचे मी जरा अधिक वाचतो आणि थोडेफार अभ्यासतोही. त्याचीही विद्वत्ता माझ्याकडे नसते. किंबहुना मी अनुवादासाठी निवडलेल्या कविताही नंतर माझ्या सामान्य ज्ञानाच्या कक्षेत राहतीलच असे नाही. अनुवाद करताना माझ्या कुवतीप्रमाणे मी शंभर टक्के प्रामाणिक असतो पण नंतर ते काहीही लक्षात ठेवायची जबाबदारी मी घेत नाही. त्या त्या क्षणी त्या त्या कलात्मक समृद्धीतून जाणे और बादमे भूल जाओ, असे ते असते. नाटकाच्या बाबतीत बोलताना काहीजण असे म्हणतात की ते पाहून प्रेक्षक अस्वस्थ झाला पाहिजे, त्याने ते नाटक सोबत घरी नेले पाहिजे, आयुष्यभर डोक्यात बाळगले पाहिजे – असल्या बावळट कल्पना मी त्याज्य समजतो. त्या त्या वेळी ती ती सर्जक प्रक्रिया झाली की संपले – त्यातून येणारे भान म्हणजे ते नाटक वा ती कविता नसते. सारांश, मी अनुवाद केलेल्या कविता वा त्यांचे कवी यांबद्दल नंतर मला काहीही विचारू नये.

मला वाटते माझ्या अनुवाद-प्रक्रियेतले बरेच मुद्दे आणि माझे त्याबाबतचे जे असेल ते आकलन स्पष्ट करण्याचे काम या पोस्टमधून पुरेसे झालेले आहे. काही मुद्दे राहिले असतील तर त्यांवरही यातून प्रकाश पडू शकेल. कवितेचे माध्यम हे जगणे समजून घेण्याचेच एक सर्जक माध्यम आहे. ते काम जगात असंख्य पद्धतींनी चालू असते. असे सगळे समोर येत राहिल्याने आपल्याही अभिव्यक्तीच्या शक्यता, कुवती आणि तऱ्हा वाढू शकतात – या हेतूनेही मी थोडेफार हे काम करत असतो. सारखेच करत राहीन असेही नाही. जगण्यातली अनिश्चितता इथेही असणारच ना !

--- ००० ---

अनुवादाचाच विषय पुढे --

या संदर्भात कवितेचा आशय आणि अभिव्यक्तीचे तंत्र, हा एक महत्त्वाचा प्रश्न येतो. आशयच तंत्र घेऊन येतो, आशय आणि तंत्र एकत्रच असतात, असेही म्हटले जाते. यावर थोडे बोलायला हवे. रॉबर्ट फ्रॉस्ट म्हणतो की अनुवादात मूळ कविता आहे तशी राहूच नाही शकत आणि या अर्थाने ती नष्टच होते. यालाच जोडून, वाचनात आलेले एक उदाहरण म्हणजे, ड्रायडेन आणि वर्डस्वर्थ या दोघांनी केलेले व्हर्जिलचे अनुवाद वेगवेगळे झालेले आहेत. आपल्याकडेही ‘ मेघदूता ’ चे चारपाच अनुवाद झालेले असून प्रत्येक अनुवादाची काही वेगळी वैशिष्ट्ये आहेत. याचा अर्थ, एकच कुठला तरी अनुवाद ( त्यातल्या त्यात ) बरोबर आणि बाकीचे चूक असे म्हणता येते का ? तर मला तसे वाटत नाही. कोणताही अनुवाद हा प्रामुख्याने आशयानुगामीच असतो किंवा असायला हवा, असे आपण म्हणू शकतो. मग काय असतो कवितेचा आशय ? यावर बोलण्यासाठी थोडी फोड करून घ्यावी लागेल. कवितेत व्यक्त झालेला अनुभव म्हणजेच आशय असतो का ? काही कवितांत तसे असू शकते. म्हणजे उदाहरणार्थ, आई वारल्यामुळे कवीला झालेले दुःख – ते व्यक्त करणे हेच समजा त्या कवितेचे उद्दिष्ट आहे. ते दुःख जसे च्या तसे, मुळातल्या तीव्रतेने वाचकाला पोचणे-जाणवणे असे झाले की

पोचला आशय, असे कुणी म्हणू शकेल. अनेक कवितांच्या बाबतींत ते खरेही असू शकेल. त्यामुळे, अशा कवितांचे आशय वेगवेगळे आहेत, असे म्हणता येते. सुख, दुःख, चीड वगैरे भावभावना हेच आशय असणे. पण काही कवी, एखादा अनुभव व्यक्त होताना त्याच्याकडे पूर्ण मानवी जगण्याच्या संदर्भात पाहतात. त्या अनुभवाची पूर्ण रचना पाहतात. हे जाणीवपूर्वक वा त्या कवीच्या मोठ्या आवाक्याच्या कुवतीमुळे त्याच्या नकळतही घडू शकते. या प्रकारात तो अंतर्भूत असलेला अनुभव हा कवितेचा आशय नाही राहात – त्या अनुभवाचे एकूण मानवी जगणे म्हणून व्यक्त झालेले भान हा होतो आशय त्या कवितेचा. कवितेतला अनुभव कोणताही असो, हे भान, ही चिंतनशीलता, हा आवाका सगळीकडे तोच – एकच -- असतो. इथे अनुभव ही निमित्ते होत असतात. अशा समावेशक आणि मोठ्या आवाक्याच्या कविता सर्व माणसांना, त्यांच्या जगण्याला प्रस्तुत ठरतात कारण अनुभव-वैविध्याची मर्यादा त्यांनी ओलांडलेली असते. अशा कवितेच्या बाबतीत, जगातल्या कोणत्याही भागातल्या वा परिस्थितीतल्या कवीने लिहिलेली कविता जगातल्या इतर कुठल्याही भागातल्या वा परिस्थितीतल्या माणसासाठी प्रस्तुत आणि महत्त्वाची ठरते. नुसत्या अनुभवाचा प्रश्न असेल तर तो जसा च्या तसा, मूळ रंगरूपासाह पोचणे कदाचित अवघड होऊ शकेल पण हे भान पोचवू इच्छिणाऱ्या कवितेत वैविध्यापेक्षा समावेशकता, समग्रता महत्त्वाची असल्याने, ते सहज घडू शकते. अर्थात त्यासाठी ती कविता तशी असायला हवी आणि अनुवादकर्त्याला, ते समग्र भान हाच आशय याची जाणीव असायला हवी. असे झाले तर भाषेच्या परंपरा, कवीच्या वा अनुवादकर्त्याच्या सवयी, लकबी, स्वभाव यांच्यामुळे येणारे वैविध्य लक्षात घेऊनही आशय स्वच्छपणे, अबाधितपणे पोचू शकतो. जगभर असंख्य तऱ्हांनी माणूस हे भान घेत असतो – या अर्थाने तो निव्वळ क्रियाप्रतिक्रियांच्या जंजाळातून मोकळाही होत असतो, स्वतंत्रही होत असतो. यालाच जगण्यातली सांस्कृतिकता वा परिपक्वता म्हणता येते. धर्म वा तत्त्वज्ञान यांच्या नादी न लागता कलेतून हे भान कुणालाही प्राप्त होऊ शकते. या भानाचा आशय व्यक्त होण्याच्या असंख्य तऱ्हा समोर येत राहणे यालाच सांस्कृतिक देवाणघेवाण म्हणायला हवे. या आशयाकडे लक्ष देऊन होणारे अनुवाद दोन संबंधित भाषांच्या वेगळ्या स्वभावांमुळे वा ढाच्यांमुळे, मुळापासून ढळलेले वाटले तरी काही फारसे बिघडत नाही. कारण तो आशय पोचण्यात बाधा येणार नसते. हे लक्षात घेता, आता हे स्पष्ट होईल की वरील विवेचनात असे का म्हटले आहे की अपलापांच्या बाबतीत पहिल्याहून दुसरा वा तिसरा अपलापही अधिक चांगला असू शकतो. अनुवादाच्या प्रक्रियेत मूळ कवितेचा कस कमीच होतो किंवा ती तिची ताकद थोडीफार गमावूनच बसते, असे समजायचे कारण नाही.

आता थोडे कामाच्या प्रक्रियेबद्दल. दोन भाषांची धाटणी वेगवेगळी असते. इंग्लिशमधून मराठीत येताना कधी एकाची दोन वाक्ये करावी लागतात, कधी शब्दांचा क्रम थोडाफार बदलावा लागतो. त्यामुळे आशयाच्या अभिव्यक्तीला फारशी बाधा येत नसेल तर तसे करायला हरकत नाही. पण, काही वेळी ते आहे तसे एका ओघातच आले पाहिजे असे अनुवादकाला वाटते, तेव्हा थोडा ओबडधोबडपणा येऊ शकतो – मूळ भाषेची धाटणी अनुवाद-भाषेवर आक्रमण करतेय, असे होऊ शकते. अशा वेळी ते स्वीकारावे, असे मला वाटते. असे प्रश्न कथा-कादंबरी यांच्या अनुवादापेक्षा कवितेच्या अनुवादात अधिक येऊ शकतात कारण कवितेत अर्थसंपृक्तता तुलनेने अधिक असते. दुसरा मुद्दा म्हणजे, प्रतिशब्दांची निवड हाही एक महत्त्वाचा प्रश्न असतो. उदाहरणार्थ, light या शब्दाला प्रकाश म्हणावे की उजेड असा प्रश्न येऊ शकतो. त्या वेळी मूळ कवितेतली अर्थवत्ता लक्षा घेऊन आणि अनुवाद भाषेतल्या अर्थवलयांचे भान बाळगून अनुवादकाने निर्णय घ्यायचा असतो. मला नुक्ताच एक गंमतीशीर प्रश्न आला होता. तो सांगतो. फर्लिंघेट्टीच्या ‘ अंडरवेयर ‘ या कवितेतली ही ओळ बघा –

The Pope wears underwear I hope

इथे पोपबरोबर होप हा शब्द योजण्यात नादसाधर्म्याची थोडी गंमत करून पोपचे वजनच कमी करणे हे आहे. आय होप चे ' मला आशा आहे ' – यात ते येणार नाही. मी असे केले –
पोपलासुद्धा मोप गरज असते तिची
आता असा एकमेव मार्ग असतो असे काही नाही. आणखी एखाद्याला वेगळे काही सुचू शकते. मूळ कवितेच्या पृष्ठस्तरीय रचनेशी आणि बारकाव्यांशी संधान ठेवत आशयावरचे लक्ष ढळू न देणे यातच कवितेच्या अनुवादकाचे सर्जकत्व असते, असे मला वाटते. त्यामुळे, इंग्लिशमधल्या transcreation ला अनुलक्षून मराठीत ‘ अनुसर्जन ‘ हा शब्द वापरणेच योग्य वाटते. अनुवाद हे एखादे ‘ लमाण ‘ काम नसून मूळ कवीइतकेच ते सर्जकतेचे काम आहे, असे म्हणायला हरकत नसावी.
--- ००० ---

आणखी पुढे –

माझे कवितांचे अनुसर्जन
१. जागतिक कवितेचा प्रानिधिक संग्रह करावा असे मुळीच मनात नाही. मला आवडलेल्या, विशेषतः अलिकडच्या काळातल्या कविता घेतो आहे. मी ना विद्वान आहे ना शिस्तबद्ध अभ्यासक. काही कवी चांगले असूनही खूप संदर्भमयतेमुळे मला पोचले नाहीत, असे होणे शक्य आहे. ते सोडून दिलेले आहेत.
२. हे काम गुणदोषयुक्तच असणार आहे याची मला जाणीव आहे. अर्थ वा आशय पकडण्यावर लक्ष ठेवायचे आणि भाषेतही स्मूथ पोहायचे हे काम अवघडच आहे. या सर्कसकामात काही ठिकाणी ओबडधोबडपणा येऊ शकतो.
३. कवीचे चरित्र वा त्याचे पूर्ण लेखन यांचा अभ्यास मी करत नाही. पुरेशी माहिती पाहून आवडलेल्या कवितांचे काम सुरू करतो. कवितेची प्रक्रिया थोडीफार मला समजते या विश्वासावर मी हे काम करतो.
४. कवीची सामाजिक, राजकीय, धार्मिक मते काय होती, याला मी महत्त्व देत नाही. कलेची प्रक्रिया जेव्हा निष्ठेने घडत असते तेव्हा ती मताबितांना बांधील राहात नाही. जगण्याचे सर्वांगीण दर्शन ती घडवते. कुणी हिंदू धर्माच्या विरुद्ध बोलले होते वा कुणी कम्युनिस्ट होते याबाबतचे आकस मी बाळगत नाही. ग्रेट कला ही शेवटी सर्व मतमतांतरांना ओलांडणारी असते आणि एकूण माणसाचे एकत्र जगणे महत्त्वाचे मानणारी असते, असे मला दिसते.
५. आपल्याकडे जसे जातिनिहाय, प्रांतनिहाय, भाषानिहाय प्रतिनिधित्व देण्याची पद्धत असते तसे इथे काही होणार नाही.
६. जगातल्या काही महान कवींच्या आणि काही वैशिष्ट्यपूर्ण कवींच्या कविता मराठीत आणाव्यात, एवढाच हेतू आहे. कवितेबाबतच्या आपल्या अपेक्षा आणि कल्पना अधिक उदार व्हाव्यात, हाही एक हेतू आहे.
७. एखादा कवी गंभीरपणे काही करत असेल तर ते समजून घेण्याकडे कल असणे महत्त्वाचे आहे. आपल्या चाकोरीबद्ध विचारांत ते बसत नाही म्हणून आकस, पूर्वग्रह, उपरोध आणि हेटाळणी यांचा तुरंत वापर सुरू करणे हा मूर्खपणा आहे, हे ज्ञान प्रसृत करणे हाही एक छुपा हेतू आहे.
--- ००० ---

ग्रेट म्हणजे काय रे भाऊ ?

मुळात ग्रेट असे काही नसतेच, वैश्विक वा सखोल असे काही नसतेच, सगळे उथळच असते – असे आकलन असणारे काही लोक आहेतच. जे आहे त्यातच जमेल ती मजा करा, असे म्हणत ते कलाभिव्यक्तीत रूटीन अनुभव, लोककला, लोकप्रिय कला, गाणी, चावटपणाचे प्रकार, असे सगळेच एकत्र हाताळत, ग्रेट होण्याची चिंता न बाळगता, विस्तृतपणा, बहुश्रुतता हीच समृद्धी दाखवत खुश राहतात. पण, हे सगळ्यांना पटते, असे नाही. कलेत काही मूल्यात्मकताच नसते हे तत्त्व समोर आले तर भांबावून जाणारेही काही असतात. विद्रोही टाईप लोक तर, या अशा विचाराने आपण पुन्हा एकदा देशोधडीला लागू, ही शक्यता पाहून अधिकच आक्रमक होतात. या विषयातले प्रश्न सर्वांप्रमाणेच मलाही पडत असतात आणि ते सतत माझ्या चिंतनात असतात. त्या बाबतीतली ही पोस्ट आहे. विषयाचा आवाका शून्यापासून ते अनंतापर्यंत ओपन असल्याने सर्व फ्रेंडसनी यावर बिनबिचकतपणे आपले विचार मांडावेत, अशी इथे अपेक्षा आहे.

स्वच्छंदी कविता, भावकविता, अतिवास्तववादी कविता, अ-कविता असे काही प्रकार आपल्याला माहीत आहेत. नुसतेच सुखदुःखाचे वास्तवच चितारण्यात रस न घेणारी बरीच कविता वाचनात येत असते. वास्तवाचा सांधा सोडणाऱ्या कवितेत दोन प्रकार असतात – एक म्हणजे वास्तव हे गोडगुलाबी करण्यात रस असलेले आणि वास्तवाची विरूपता, विद्रूपताही व्यक्त व्हावी असा दृष्टिकोण असलेले. वास्तवाची कास सोडणाऱ्या बऱ्याच कविता शाब्दिक स्तरावर आगापिछा नसलेल्या आणि त्यामुळे दुर्बोध वाटू शकतात. असतातही दुर्बोध कारण त्यांना रूटीन एकरेषीय अभिव्यक्तीहून अधिक काही ' म्हणायचे ' असते. मला अनेकदा असा अनुभव येतो की अशा दुर्बोध कवितेतही एखादी ओळ वा एखादा शब्दसमुच्चय असा येतो की सदर कवी खूप खोलातून चिंतनशील आहे, हे जाणवते. तशा दुर्बोध कथेत वा कादंबरीतही तशा जागा असतात. आणि मग त्या अनुषंगाने त्या एकूण कलाकृतीच्या आकलनाच्या शक्यता वाढतात.

तसे चित्रकलेत होऊ शकते का ? वास्तववादाचा हात सोडलेली बरीच चित्रे गोडगुलाबी असतात. त्यांना स्वतःची शैलीही असते. ते सर्व पाहून आपण चकित होतो आणि उत्स्फूर्तपणे ' ग्रेट ' म्हणतो. पण, एक प्रकारे ते ओळखता येणारे वास्तवच असते. आणि सरळ सरळ वास्तवच चितारणारी अनेक चित्रे अशी असतात की त्यांतले तपशीलांचे बारकावे आणि छायाप्रकाशाचे खेळ पाहून आपण त्यांना ' ग्रेट ' म्हणतो. अशा बाबतीत वर्षानुवर्षे असा एक विचार चालू असतो की फोटोग्राफीत येतेच की हे सगळे, तेही सहज, एका सेकंदात, मग कशाला हे चित्रकार एवढे कष्ट घेत बसतात ? कशाला इतका वेळ वाया घालवतात ? नुसत्याच, कमावलेल्या कौशल्याला ग्रेट का म्हणावे ? आणि ' अ-वास्तव ' चित्रकलेत ' वाह ' म्हणावे अशा जागा असतात का ? त्या कशा प्रकारच्या असतात ? अमूर्त चित्रकलेत असे अनेकदा वाटते की ' वाह ' म्हणणारे लोक त्या संबंधित चित्रकाराची माहिती मनात जोडून त्या चित्राला ग्रेट म्हणताहेत. म्हणजे असे की उदाहरणार्थ, भारतीय तत्त्वज्ञानातल्या ' बिंदू ' या कल्पनेचा त्यांनी सखोल धांडोळा घेतलेला आहे, त्यामुळे त्यांची बिंदूचित्रे ग्रेट आहेत – असे. मग या पद्धतीने एखाद्याचे साधे रंगांचे पट्टेही ग्रेट ठरताना दिसतात. किंवा अनेकरंगी वा एकरंगीही भौमितिक रचनांची चित्रेही ग्रेट म्हटली जाताना दिसतात. ही अशी चित्रे तर थोडेफार कौशल्य कमावलेला कोणताही चित्रकार काढू शकेल, असे पाहणाऱ्याला वाटते. वास्तववादी चित्रात निदान चकित करणारे कौशल्य तरी असते, इथे तेही दिसत नाही. इथे नुसताच एक प्लेन रंग दिलेला चौकोन जेव्हा ग्रेट म्हटला जात असलेला दिसतो तेव्हा मात्र, प्रामाणिकपणे चित्रे समजून घेण्याची इच्छा असलेल्याचा धीर खचतो !

कवितेतही ‘ अ-वास्तव ‘ लिहिणाऱ्यांत काही शैली-उस्ताद असतात. ते रूटीन सुखदुःखांनाच एका मोहक शैलीतून अभिव्यक्ती देत राहतात. जरा ढोबळ भाषेत म्हणजे ते वास्तवच पण आकर्षक वेष्टनातून सादर करत असतात. म्हणजेच, शैलीचे कमावलेले कौशल्य सोडले तर ते वास्तवालाच टाळया घेत असतात. वास्तवातली मोहकता सोडणारे कवीही बऱ्याचदा ‘ वास्तवाला येणाऱ्या त्यांच्या प्रतिक्रियांचे वास्तव ‘ हेच मांडत असतात. प्रतिक्रियांच्या वास्तवाचा दर्जा, असे काही असते का ? हे सगळे पाहता, कलाभिव्यक्तीत, या ना त्या प्रकारचे कौशल्यच शेवटी महत्त्वाचे ठरते का, असा प्रश्न येतो.

तर, या सगळ्याची एकच सारांशरूप ‘ कॅप्सूल ‘ म्हणजे अवगुंठित गोळी करायची झाली तर प्रश्न असा सापडतो – आपण जी कला कला म्हणतो ती फक्त वास्तव अधिक कौशल्य यांची बेरीज किंवा नुसतेच कौशल्य किंवा जाणूनबुजून वाढवलेली ढोंगबाजी, इतकेच असते का ? कौशल्यामुळे करमणुकीचा चांगला आनंद मिळू शकतो हे मान्य केले तरी याहून अधिक काही असते का कलेत ? असू शकते का ? असू शकत असल्यास ते काय असते ? म्हणजेच आपला टायटल-प्रश्न – ग्रेट म्हणजे काय रे भाऊ ?

हा विषय खूपच खुला असल्याने, कुणीही, यावर काही बोलावेसे वाटल्यास, न लाजता बिनदिक्कतपणे बोलावे, ही विनंती.

--- ००० ---

नाटकाचा मूळ आशय असे काही असते का -- हा यातला एक महत्त्वाचा प्रश्न आहे. माझ्या मते मूळ आशय असतो. त्यामुळेच तर प्रेक्षकांच्या मानसिक सवयींना आव्हाने निर्माण होतात. आता कुणी म्हणेल, अनुवादातून अशी वेगळीच आव्हाने निर्माण होऊ शकतील. मूळ आशय समजणे असे काही असूच नसेल शकत तर मग ही एकूण चर्चाच निरर्थक ठरेल.

--- 000 ---

सचिन केतकरांच्या कॉमेंटवर –

'सत्य ' वास्तव असे काही नसते. वास्तव म्हणजे मनाच्या कंडिशनिंगमधून येणारी प्रतिक्रिया. त्यामुळे, सर्वांसाठी एकच वास्तव असे काही असू शकत नाही. बरीच कला ही फक्त प्रतिक्रियेच्या क्षेत्रातच वावरताना दिसते. इथे मूल्याचा प्रश्न येतो.

०००

समकालीन वास्तव असे काही नसते. लेखकाला दिसेल तेच समकालीन वास्तव म्हणता येईल. कलेत वास्तवाचे महत्त्व नसते -- वास्तवाचे भान येण्याच्या प्रक्रियेचे महत्त्व असते. ती प्रक्रिया वास्तवनिरपेक्ष असते.

--- 000 ---

Champra Deshpande replied to Vasant Dahake's comment.

धन्यवाद, सर, सविस्तर कॉमेंटबद्दल. वास्तव म्हणजे ज्याचेत्याचे वास्तव -- उदाहरणार्थ, एका ठिकाणी मी असे मत मांडले होते की ' समकालीन वास्तव ' असे काही नसते -- एकाच काळात हजारो वास्तवे असतात. अमूर्त चित्रकला वा

अमूर्त कविता यांच्या मौलिक शक्यतांवरही मी पूर्वी लिहिलेले आहे. तरीही, कलेबाबतचे मूल्यात्मक प्रश्न, तुम्ही म्हणता तसे शेकडो वर्षे चिंतनात राहात आलेले आहेत आणि राहणार. आपसांत हा विषय जरा ढवळला जावा यासाठी ही पोस्ट आहे. आपण चित्रकलेची भाषा, मोडतोड यांवर काही लिहिले आहे -- आशयदृष्ट्या त्यातून मौल्यवान काय घडते याकडे या चर्चेचा रोख आहे. मौल्यवान याचा अर्थ अर्थातच मानवी जगण्याच्या संदर्भात महत्त्वाचे ठरणारे. मी अर्थात या प्रश्नांची उत्तरे माझ्या थोड्याफार वाचनातून आणि स्वतःच्या चिंतनातूनच शोधत असतो. लोक तांत्रिक खूप बोलतात पण आशयाची मौलिकता म्हणजे काय यावर फारसे बोलत नाहीत, असे मला अनेकदा दिसते.

--- 000 ---

कविता म्हणजे काय ( रे भाऊ ) ?

आजच सकाळी मी ' कलेचे दिवस ' ही माझी कविता इथे फेसबुकवर पोस्ट केली. त्यावर, कोल्हापूरपासूनचे माझे मित्रवर्य प्रा. बाळकृष्ण कवठेकर यांची अशी कॉमेंट आली – " चं प्र, क्षमस्व. ही कविता नाही, छोटा निबंध वाटतो, कोणालाही कमी जास्त करता येईल असा. " त्याला माझे उत्तर असे होते – " माझा काहीही दावा नाही -- दिसले ते लिहिलेय – " नंतर माझ्या असे लक्षात आले की हा विषय फ्रेंडसमध्ये चर्चा व्हावी असा आहे. जगात कवितेच्या शेकडो व्याख्या होत आलेल्या आहेत आणि आता अगदी न-कविता किंवा स्वयंचलित कविताही लिहिल्या जातात, हे आपल्याला माहीत असले तरीही, आपण आपापल्या आकलनानुसार यावर बोलावे, असे वाटले. या निमित्ताने कवितेबाबतच्या आपापल्या कल्पना घासूनपुसून स्पष्टपणे मांडल्या जातील आणि गरज वाटल्यास आपल्याला सर्वांनाच आपापल्या कल्पना बदलून, वाढवून, दुरुस्त करून वा अधिक समावेशक वा कवितेचा नेमका प्रदेश रेखून देणाऱ्या अशा करता येतील, असे वाटले. एखादे औषध वा लस तयार करताना जसे काही लोक स्वेच्छेने त्याच्या जरूरीच्या चाचणीसाठी पुढे येतात, त्याचप्रमाणे, या कामाला आपली ही कविता वा मजकूर उदाहरण म्हणून देऊ करता येईल, हे माझ्या लक्षात आले. तरी, फ्रेंडसना माझी अशी विनंती आहे की निर्भीडपणे त्यांनी हा मजकूर कविता आहे की नाही यावर लिहावे. या मजकूराची कशीही चिरफाड वा चिकित्सा करावी. वाटल्यास आशयावरही हल्ला वा त्याचे कविता म्हणून समर्थन करावे. मुख्यतः हा एक निबंधात्मक गद्य मजकूर आहे का, यावर सकारण मते द्यावीत. यातून, अमुक बरोबर वा तमुक चूक असा निष्कर्ष काढणे हा हेतू नाही. या निमित्ताने या एका महत्त्वाच्या विषयावर आकलन-घुसळण व्हावी, हीच एक मर्यादित अपेक्षा आहे. हे उद्बोधक ठरू शकेल. ही इथली चर्चा जर चांगली झाली तर आपले कुणी संपादक मित्र पुढे ती प्रसिद्धही करू शकतील. या चर्चेत, अर्थातच, कवठेकर सरांनी त्यांचे मत जरा सविस्तर मांडावे, अशी विनंती आहेच. इथे निकाल देणारे कुणी न्यायाधीश नसतील, हे लक्षात घेऊन फ्रेंडसनी खुलेपणाने बोलावे, ही विनंती.
संदर्भासाठी, सकाळी मी कविता म्हणून दिलेला मजकूर असा आहे –

कलेचे दिवस

मुंग्या लागून मेले की वाळवी लागून
असा श्रेयाचा सामना रंगणार हे दिसताच
अनेक चित्रकार हजर झाले
आधी सत्य पाहून मग ते अमूर्त करायला --
नुसते अमूर्तही आपल्याला माहीत असलेल्या

झुंबरांच्या आणि कोळिष्टकांच्या आपल्या
मनांतूनच येते हे त्यांना माहीत होते
पण हाती असलेल्या कौशल्यातून
त्यांना मसिहा म्हणून गाजायचेच होते
आणि जगाच्या संस्कृतीचा व्हायचे होते
एक अविभाज्य पाणीपुरवठा डबल फिल्टर्ड
वाचनसंस्कृतीचे उपटसुंभ भक्त गौरव माजवत
आपल्या प्रगल्भ डबक्यांचा प्रसंगी
हजार सर्प पोसून धाक निर्माण करणाऱ्या
होते हजर त्यांचेही आत्मसंवर्धन साधायला
रात्रीच्या अपॉइंटमेंटसपूर्वी प्रेयसींशी ठरलेल्या
ज्या त्यांच्या प्रगल्भतेच्या जाहिरातींत
हमखास असत अर्धनग्न आकर्षक हुशार मॉडेल्स
हल्ली लोक वाचत नाहीत दृश्यकला तर
फक्त लिलावांतच दिसतात काळ्या
पैशांच्या उत्तुंग आणि सखोल व्यवहारांत
संपले दिवस एकूणच कलेचे
हे समजून काहीजण शांतपणे पाहात वेफर्स खात होते
--- ००० ---
-- हा मजकूर आधाराला घेऊन चर्चा होत असल्याने नुसत्याच औपपत्तिक कल्पना न येता त्यांचे स्पष्टीकरणही येईल, अशी आशा आहे.
--- ००० ---

Lonliness, Aloneness and Solitude ( एकाकीपणा, एकटेपणा आणि एकांत )

सतत सामूहिक, सामाजिक, राजकीय असणे तसेच सर्जकतेच्या, कलेच्या क्षेत्रातही टोळीबहाद्दर असणे हेच नुसते महत्त्वाचेच नव्हे तर अटळ मानणारे काही लोक दिसतात. या विषयावर आणि याच्या आजूबाजूचे आणखी काही असे कुणी कलावंत, चिंतक काही बोलले आहेत का ते पाहावे, असे वाटले. सहजच हा चाळा थोडाफार पार पडला. टोळीबहाद्दरांना लगेच यावर वादाचे काही मुद्दे सवयीने सुचतीलच. पण, ते ठीक आहे. हे इथे चर्चा आणि वाद यांसाठी देत नसून, वाटल्यास, आपापल्या विचारासाठी, चिंतनासाठी समोर असावे म्हणून देत आहे --
Real love is not an escape from loneliness, real love is an overflowing aloneness. One is so happy in being alone that one would like to share.
-- Rajneesh
“If you're lonely when you're alone, you're in bad company.”
― Jean-Paul Sartre

"The more powerful and original a mind, the more it will incline towards the religion of solitude."
― Aldous Huxley
"A man can be himself only so long as he is alone; and if he does not love solitude, he will not love freedom; for it is only when he is alone that he is really free."
― Arthur Schopenhauer, Essays and Aphorisms
"Orlando naturally loved solitary places, vast views, and to feel himself for ever and ever and ever alone."
― Virginia Woolf, Orlando
"I was a man who thrived on solitude; without it I was like another man without food or water. Each day without solitude weakened me. I took no pride in my solitude; but I was dependent on it. The darkness of the room was like sunlight to me."
― Charles Bukowski, Factotum
"The best thinking has been done in solitude." ~ Thomas A. Edison
"Without great solitude no serious work is possible." ~ Pablo Picasso
Writing is utter solitude, the descent into the cold abyss of oneself." ~ Franz Kafka
"We carry about us the burden of what thousands of people have said and the memories of all our misfortunes. To abandon all that is to be alone, and the mind that is alone is not only innocent but young — not in time or age, but young, innocent, alive at whatever age — and only such a mind can see that which is truth and that which is not measurable by words." ~ Jiddu Krishnamurti
I hold this to be the highest task for a bond between two people: that each protects the solitude of the other.
-- Rainer Maria Rilke
Solitary trees, if they grow at all, grow strong. (Winston Churchill)
It's easier to be me than someone else. But just like most famous people, I just want to be left alone most of the time. (Bob Dylan)
Often whole days pass without my speaking to anyone. (Vincent van Gogh)
The only thing that could spoil a day was people. People were always the limiters of happiness except for the very few that were as good as spring itself. (Ernest Hemingway)
Solitude is independence. (Hermann Hesse)
-Aloneness Is Not Loneliness / The Book of Life

Aloneness is obviously not isolation, and it is not uniqueness. To be unique is merely to be exceptional in some way, whereas to be completely alone demands extraordinary sensitivity, intelligence, understanding. (Jiddu Krishnamurti)
A career is born in public - talent in privacy. (Marilyn Monroe)
Aloneness is the presence of oneself. Aloneness is very positive... You are so full of presence that you can fill the whole universe with your presence and there is no need for anybody. (Osho)
If you cannot live alone, you were born a slave. (Fernando Pessoa)
He who does not enjoy solitude will not love freedom. (Arthur Schopenhauer)
"You are in no man's land. Which never moves, which never changes, which never grows older, but remains forever, icy and silent."
― Harold Pinter, No Man's Land
Every true man, sir, who is a little above the level of the beasts and plants does not live for the sake of living, without knowing how to live; but he lives so as to give a meaning and a value of his own to life.
-- Luigi Pirandello
"Solitude seems to oppress me. And so does the company of other people."
― Eugène Ionesco
"Every word is like an unnecessary stain on silence and nothingness."
― Samuel Beckett
"You're safe only when you can't see anybody."
-- Gao Xingjian
The feeling of loneliness is unique to humans. A tree or a bird may seem to be lonely, but this is an attribute bestowed by the person making the observation. The tree or the bird is incapable of perceiving loneliness. This feeling occurs when a person is alone, and, moved by his emotions, associates his own circumstances with those of the bird or the tree that he sees before him. Since this feeling entails an element of self-examination, it is not a purely objective observation. The feeling of loneliness produced is thus a form of aesthetics, in that while observing one's external environment, one is at the same time examining the self that is located within it, and to a certain extent this is an affirmation of one's own personal worth.
GAO XINGJIAN,
Loneliness is a prerequisite for freedom. Freedom depends on the ability to reflect, and reflection can only begin when one is alone.
GAO XINGJIAN

Apply yourself to solitude. One who is given to solitude knows things as they really are.

-- Buddha.

--- ००० ---

गेला काही काळ मी मधून मधून परभाषिक कवितांचे मराठीत अनुवाद करतो आहे. त्या कामाबद्दलची एक पोस्ट मी आधी दिली होती. त्यात आणखी काही मुद्यांची भर घालावी असे वाटल्याने, आता पुन्हा, त्या मूळ पोस्टसह वाढीव मजकूर खाली देत आहे --

माझे परभाषिक कवितांचे अनुवाद

गेल्या काही वर्षांत मी मधून मधून मला आवडलेल्या वा काही कारणाने विशेष वाटलेल्या अशा परभाषिक कवितांचे अनुवाद करत आलेलो आहे. ज्या कविता मुळात इंग्रजीतूनच लिहिल्या गेल्या आहेत त्यांचा त्या मूळ रूपांतून आणि ज्या अन्यभाषिक कवितांचे इंग्रजीत अनुवाद उपलब्ध आहेत त्यांचे त्या अनुवादांवरून असे मी अनुवाद केलेले आहेत. या प्रक्रियेत अनेक प्रश्न असतात, जसे की मूळ इंग्रजीत असलेली कविता तरी मला कितपत समजलेली आहे इथपासून ते मी अनुवादाला घेतलेला अनुवाद कितपत विश्वासार्ह आहे, इथपर्यंतचे, असे अनेक प्रश्न असतात. मुळात लिखित कविता हीच प्रत्यक्ष सत्य नसून सत्याची अभिव्यक्ती असते असे म्हटले तर ती मूळ कविता हाच सत्याचा पहिला अपलाप असतो. तिचा अनुवाद हा दुसरा अपलाप म्हटला तर अनुवादाचा अनुवाद हा तिसरा अपलाप म्हणावा लागतो. तर, सारांशाने मी कोणत्याही कवितेचा दुसरा वा तिसरा अपलाप करत असतो.

हे अनुवाद करावेतच कशासाठी मुळात, असा एक प्रश्न अनेकांच्या मनात येऊ शकतो. इथल्या मातीतली कला वगैरे बडेजाव माजवणारे आपण लोक आहोत. इथली माती म्हणजे काय ? फक्त शेतकरी, शेतमजूर, दलित वा कामगार यांच्या जगण्याचे वास्तव ? तसे म्हणता येत नाही. कुणाचेही कोणतेही अनुभव कलेची सामुग्री होऊ शकतात. त्यामुळे, इथली माती म्हणजे कुणाच्याही मनाची कोणतीही माती, हे आधी लक्षात घ्यायला हवे. मराठी भाषिक कवींचीही एकमेकांची माती वेगवेगळीच असते. परमातीच असते. तरीही एकमेकांच्या कविता थोड्याफार, अपलाप होत का असे ना, एकमेकांपर्यंत पोचू शकतात. लकबी, सवयी, चालीरीती, श्रद्धा, नीतिकल्पना, आदर्श, अस्मिता हे सगळे जरी वेगवेगळे असले तरी – सुख, दुःख, मानापमान, प्रेम, असूया, हेवा, सूड, महत्त्वाकांक्षा, वर्चस्वाची इच्छा अशी ही माती सगळीकडे जगभर सर्व माणसांत तीच -- एकच असते. त्यामुळेच तर कलेतून होणारी अभिव्यक्ती आणि संपर्क हे सर्वच माणसांना प्रस्तुत असू शकतात. काहीजणांना वाटते की त्या त्या संस्कृतीत आपापले कलाशास्त्र, साहित्यशास्त्र असते आणि ती परंपरा जपत, विकसित करतच सर्वांनी चालले पाहिजे. मला ही धारणा मूर्खपणाची वाटते. ही धारणा मातीच्या वेगवेगळेपणाला महत्त्व देणारी असून तिच्यातल्या समावेशकतेकडे दुर्लक्ष करणारी आणि म्हणून संकुचित आहे. कोणत्याही कलेचा अनेकांशी संपर्क होतो तो मातीच्या वेगळेपणामुळे नव्हे तर तिच्यातल्या समानतेमुळे, समावेशकतेमुळे, हे लक्षात घ्यायला हवे. अशा या आकलनामुळेच, परभाषेतल्या कलाकृती अनुवादित होणे मला आवश्यक, महत्त्वाचे आणि समर्थनीय वाटते. जगातल्या कोणत्याही साहित्यविचारप्रणाली मला महत्त्वाच्याच वाटतात.

याच कारणामुळे अनुवाद हा नुसताच शाब्दिक प्रक्रियेबरोबर जाणारा वा नुसताच शाब्दिक असून चालत नाही. अनुवादकाची आकलनप्रक्रिया ही त्या कवितेच्या समावेशकतेकडे लक्ष देणारी असावी लागते. अनुवादकाच्या आकलनाला अशी एकसंधतेची पार्श्वभूमी नसेल तर तो अनुवाद नुसताच शाब्दिक, तुकड्यातुकड्यांचा, ओबडधोबड आणि मूळ कलाकृतीला ठार करणाराच होईल. त्यामुळे, अनुवादाला घेतलेल्या कवितेत आकलनाच्या या एकसंधतेचे दर्शन

अनुवादकाला झालेले असणे महत्त्वाचे ठरते. अनुवाद करताना अनेक पर्यायी शब्दरूपे सुचत असतात, त्यांतले नेमके शब्दरूप निवडताना वा काही वेळी नव्याने घडवतानाही ती आकलनाची एकसंध प्रक्रियाच अबाधित राहायला हवी, अशीच योजना स्वीकारावी लागते. या एकूण दृष्टिकोणामुळेच मी असे म्हणतो की उदाहरणार्थ समजा एका फ्रेंच कवितेच्या इंग्रजीतल्या अनुवादावरून मी मराठी अनुवाद केलेला असला तरीही त्या इंग्रजी रूपापेक्षा माझा मराठी अनुवाद हा मूळ कवितेशी अधिक निष्ठावान असू शकतो. आणि त्याच्याही पुढे जाऊन मी असेही म्हणेन की मूळ कवितेतले पहिले अपलापत्व कमी झाल्यामुळे माझा मराठी अनुवाद हा मूळ कवितेहूनही अधिक सकस व सशक्त झालेला असू शकतो. यात कुणाचा मानापमान वा श्रेष्ठकनिष्ठत्व नसून या प्रक्रियेचेच ते वैशिष्ट्य असते. हे सर्व लक्षात घेता अनुवादाला नवनिर्मितीचेच महत्त्व द्यायला हवे, असे मला वाटते. या सर्व प्रक्रियेत व्यक्तिमाहात्म्य वा विभूतिमत्व हे महत्त्वाचे नसून कवितेचा आशय म्हणजे त्यात अंतर्भूत असलेली जगण्याचे भान घेण्याची प्रक्रियाच महत्त्वाची असते, असे मला म्हणायचे आहे.

माझी माती, माझी भाषा, माझी संस्कृती, माझ्या विचारपद्धती, सवयी, लकबी, कल्पना, आदर्श, चालीरीती वगैरे हेच जगात सर्वोच्च महत्त्वाचे असते, असे मी समजत नाही. या बाबींमधील भेदांमुळे एकमेकांच्या कविता समजण्यात येणाऱ्या व्यावहारिक अडचणी वा अडथळे मान्य असले तरी. जगातले कोणतेही कवी मी त्याच आत्मीयतेने वाचू शकतो ज्या आत्मीयतेने मी आरती प्रभू वा गुरुनाथ धुरी वाचेन. आणि इंटरनेटमुळे प्रचंड खजिनेच आपल्यासाठी खुले आहेत ! मी लहर लागली तर, आज रशियातले वा इंग्लंडमधले वा फ्रान्समधले कवी काय लिहिताहेत, हे पाहात बसतो. कधी ओळीने अतिवास्तववादी कवीच वाचतो किंवा प्रतिमावादी कवी. यात विद्वत्ता जमा करणे हा हेतूच नसतो. याची मी ना टिपणे ठेवतो ना ते लक्षात ठेवायचा आटापिटा करतो. वाचले, जमेल तेवढे समजले की संपले. त्यांतले काही कवी मला महत्त्वाचे वाटतात. त्यांचे मी जरा अधिक वाचतो आणि थोडेफार अभ्यासतोही. त्याचीही विद्वत्ता माझ्याकडे नसते. किंबहुना मी अनुवादासाठी निवडलेल्या कविताही नंतर माझ्या सामान्य ज्ञानाच्या कक्षेत राहतीलच असे नाही. अनुवाद करताना माझ्या कुवतीप्रमाणे मी शंभर टक्के प्रामाणिक असतो पण नंतर ते काहीही लक्षात ठेवायची जबाबदारी मी घेत नाही. त्या त्या क्षणी त्या त्या कलात्मक समृद्धीतून जाणे और बादमे भूल जाओ, असे ते असते. नाटकाच्या बाबतीत बोलताना काहीजण असे म्हणतात की ते पाहून प्रेक्षक अस्वस्थ झाला पाहिजे, त्याने ते नाटक सोबत घरी नेले पाहिजे, आयुष्यभर डोक्यात बाळगले पाहिजे – असल्या बावळट कल्पना मी त्याज्य समजतो. त्या त्या वेळी ती ती सर्जक प्रक्रिया झाली की संपले – त्यातून येणारे भान म्हणजे ते नाटक वा ती कविता नसते. सारांश, मी अनुवाद केलेल्या कविता वा त्यांचे कवी यांबद्दल नंतर मला काहीही विचारू नये.

मला वाटते माझ्या अनुवाद-प्रक्रियेतले बरेच मुद्दे आणि माझे त्याबाबतचे जे असेल ते आकलन स्पष्ट करण्याचे काम या पोस्टमधून पुरेसे झालेले आहे. काही मुद्दे राहिले असतील तर त्यांवरही यातून प्रकाश पडू शकेल. कवितेचे माध्यम हे जगणे समजून घेण्याचेच एक सर्जक माध्यम आहे. ते काम जगात असंख्य पद्धतींनी चालू असते. असे सगळे समोर येत राहिल्याने आपल्याही अभिव्यक्तीच्या शक्यता, कुवती आणि तऱ्हा वाढू शकतात – या हेतूनेही मी थोडेफार हे काम करत असतो. सारखेच करत राहीन असेही नाही. जगण्यातली अनिश्चितता इथेही असणारच ना !

--- ००० ---

या संदर्भात कवितेचा आशय आणि अभिव्यक्तीचे तंत्र, हा एक महत्त्वाचा प्रश्न येतो. आशयच तंत्र घेऊन येतो, आशय आणि तंत्र एकत्रच असतात, असेही म्हटले जाते. यावर थोडे बोलायला हवे. रॉबर्ट फ्रॉस्ट म्हणतो की अनुवादात मूळ कविता आहे तशी राहूच नाही शकत आणि या अर्थाने ती नष्टच होते. यालाच जोडून, वाचनात आलेले एक उदाहरण म्हणजे, ड्रायडेन आणि वर्डस्वर्थ या दोघांनी केलेले व्हर्जिलचे अनुवाद वेगवेगळे झालेले आहेत. आपल्याकडेही ' मेघदूता ' चे चारपाच अनुवाद झालेले असून प्रत्येक अनुवादाची काही वेगळी वैशिष्ट्ये आहेत. याचा अर्थ, एकच कुठला तरी

अनुवाद ( त्यातल्या त्यात ) बरोबर आणि बाकीचे चूक असे म्हणता येते का ? तर मला तसे वाटत नाही. कोणताही अनुवाद हा प्रामुख्याने आशयानुगामीच असतो किंवा असायला हवा, असे आपण म्हणू शकतो. मग काय असतो कवितेचा आशय ? यावर बोलण्यासाठी थोडी फोड करून घ्यावी लागेल. कवितेत व्यक्त झालेला अनुभव म्हणजेच आशय असतो का ? काही कवितांत तसे असू शकते. म्हणजे उदाहरणार्थ, आई वारल्यामुळे कवीला झालेले दुःख – ते व्यक्त करणे हेच समजा त्या कवितेचे उद्दिष्ट आहे. ते दुःख जसे च्या तसे, मुळातल्या तीव्रतेने वाचकाला पोचणे-जाणवणे असे झाले की पोचला आशय, असे कुणी म्हणू शकेल. अनेक कवितांच्या बाबतींत ते खरेही असू शकेल. त्यामुळे, अशा कवितांचे आशय वेगवेगळे आहेत, असे म्हणता येते. सुख, दुःख, चीड वगैरे भावभावना हेच आशय असणे. पण काही कवी, एखादा अनुभव व्यक्त होताना त्याच्याकडे पूर्ण मानवी जगण्याच्या संदर्भात पाहतात. त्या अनुभवाची पूर्ण रचना पाहतात. हे जाणीवपूर्वक वा त्या कवीच्या मोठ्या आवाक्याच्या कुवतीमुळे त्याच्या नकळतही घडू शकते. या प्रकारात तो अंतर्भूत असलेला अनुभव हा कवितेचा आशय नाही राहात – त्या अनुभवाचे एकूण मानवी जगणे म्हणून व्यक्त झालेले भान हा होतो आशय त्या कवितेचा. कवितेतला अनुभव कोणताही असो, हे भान, ही चिंतनशीलता, हा आवाका सगळीकडे तोच – एकच -- असतो. इथे अनुभव ही निमित्ते होत असतात. अशा समावेशक आणि मोठ्या आवाक्याच्या कविता सर्व माणसांना, त्यांच्या जगण्याला प्रस्तुत ठरतात कारण अनुभव-वैविध्याची मर्यादा त्यांनी ओलांडलेली असते. अशा कवितेच्या बाबतीत, जगातल्या कोणत्याही भागातल्या वा परिस्थितीतल्या कवीने लिहिलेली कविता जगातल्या इतर कुठल्याही भागातल्या वा परिस्थितीतल्या माणसासाठी प्रस्तुत आणि महत्त्वाची ठरते. नुसत्या अनुभवाचा प्रश्न असेल तर तो जसा च्या तसा, मूळ रंगरूपासाह पोचणे कदाचित अवघड होऊ शकेल पण हे भान पोचवू इच्छिणाऱ्या कवितेत वैविध्यापेक्षा समावेशकता, समग्रता महत्त्वाची असल्याने, ते सहज घडू शकते. अर्थात त्यासाठी ती कविता तशी असायला हवी आणि अनुवादकर्त्याला, ते समग्र भान हाच आशय याची जाणीव असायला हवी. असे झाले तर भाषेच्या परंपरा, कवीच्या वा अनुवादकर्त्याच्या सवयी, लकबी, स्वभाव यांच्यामुळे येणारे वैविध्य लक्षात घेऊनही आशय स्वच्छपणे, अबाधितपणे पोचू शकतो. जगभर असंख्य तऱ्हांनी माणूस हे भान घेत असतो – या अर्थाने तो निव्वळ क्रियाप्रतिक्रियांच्या जंजाळातून मोकळाही होत असतो, स्वतंत्रही होत असतो. यालाच जगण्यातली सांस्कृतिकता वा परिपक्वता म्हणता येते. धर्म वा तत्त्वज्ञान यांच्या नादी न लागता कलेतून हे भान कुणालाही प्राप्त होऊ शकते. या भानाचा आशय व्यक्त होण्याच्या असंख्य तऱ्हा समोर येत राहणे यालाच सांस्कृतिक देवाणघेवाण म्हणायला हवे. या आशयाकडे लक्ष देऊन होणारे अनुवाद दोन संबंधित भाषांच्या वेगळ्या स्वभावांमुळे वा ढाच्यांमुळे, मुळापासून ढळलेले वाटले तरी काही फारसे बिघडत नाही. कारण तो आशय पोचण्यात बाधा येणार नसते. हे लक्षात घेता, आता हे स्पष्ट होईल की वरील विवेचनात असे का म्हटले आहे की अपलापांच्या बाबतीत पहिल्याहून दुसरा वा तिसरा अपलापही अधिक चांगला असू शकतो. अनुवादाच्या प्रक्रियेत मूळ कवितेचा कस कमीच होतो किंवा ती तिची ताकद थोडीफार गमावूनच बसते, असे समजायचे कारण नाही.
आता थोडे कामाच्या प्रक्रियेबद्दल. दोन भाषांची धाटणी वेगवेगळी असते. इंग्लिशमधून मराठीत येताना कधी एकाची दोन वाक्ये करावी लागतात, कधी शब्दांचा क्रम थोडाफार बदलावा लागतो. त्यामुळे आशयाच्या अभिव्यक्तीला फारशी बाधा येत नसेल तर तसे करायला हरकत नाही. पण, काही वेळी ते आहे तसे एका ओघातच आले पाहिजे असे अनुवादकाला वाटते, तेव्हा थोडा ओबडधोबडपणा येऊ शकतो – मूळ भाषेची धाटणी अनुवाद-भाषेवर आक्रमण करतेय, असे होऊ शकते. अशा वेळी ते स्वीकारावे, असे मला वाटते. असे प्रश्न कथा-कादंबरी यांच्या अनुवादापेक्षा कवितेच्या अनुवादात अधिक येऊ शकतात कारण कवितेत अर्थसंपृक्तता तुलनेने अधिक असते. दुसरा मुद्दा म्हणजे, प्रतिशब्दांची निवड हाही एक महत्त्वाचा प्रश्न असतो. उदाहरणार्थ, light  या शब्दाला प्रकाश म्हणावे की उजेड असा प्रश्न येऊ शकतो. त्या वेळी मूळ कवितेतली अर्थवत्ता लक्षा घेऊन आणि अनुवाद भाषेतल्या अर्थवलयांचे भान बाळगून अनुवादकाने निर्णय घ्यायचा

असतो. मला नुक्ताच एक गंमतीशीर प्रश्न आला होता. तो सांगतो. फर्लिंघेट्टीच्या ‘ अंडरवेयर ‘ या कवितेतली ही ओळ बघा –

The Pope wears underwear I hope

इथे पोपबरोबर होप हा शब्द योजण्यात नादसाधर्म्याची थोडी गंमत करून पोपचे वजनच कमी करणे हे आहे. आय होप चे ' मला आशा आहे ' – यात ते येणार नाही. मी असे केले –

पोपलासुद्धा मोप गरज असते तिची

आता असा एकमेव मार्ग असतो असे काही नाही. आणखी एखाद्याला वेगळे काही सुचू शकते. मूळ कवितेच्या पृष्ठस्तरीय रचनेशी आणि बारकाव्यांशी संधान ठेवत आशयावरचे लक्ष ढळू न देणे यातच कवितेच्या अनुवादकाचे सर्जकत्व असते, असे मला वाटते. त्यामुळे, इंग्लिशमधल्या transcreation ला अनुलक्षून मराठीत ‘ अनुसर्जन ‘ हा शब्द वापरणेच योग्य वाटते. अनुवाद हे एखादे ‘ लमाण ‘ काम नसून मूळ कवीइतकेच ते सर्जकतेचे काम आहे, असे म्हणायला हरकत नसावी.

--- ००० ---

माझे कवितांचे अनुसर्जन

१. जागतिक कवितेचा प्रातिनिधिक संग्रह करावा असे मुळीच मनात नाही. मला आवडलेल्या, विशेषतः अलिकडच्या काळातल्या कविता घेतो आहे. मी ना विद्वान आहे ना शिस्तबद्ध अभ्यासक. काही कवी चांगले असूनही खूप संदर्भमयतेमुळे मला पोचले नाहीत, असे होणे शक्य आहे. ते सोडून दिलेले आहेत.

२. हे काम गुणदोषयुक्तच असणार आहे याची मला जाणीव आहे. अर्थ वा आशय पकडण्यावर लक्ष ठेवायचे आणि भाषेतही स्मूथ पोहायचे हे काम अवघडच आहे. या सर्कसकामात काही ठिकाणी ओबडधोबडपणा येऊ शकतो.

३. कवीचे चरित्र वा त्याचे पूर्ण लेखन यांचा अभ्यास मी करत नाही. पुरेशी माहिती पाहून आवडलेल्या कवितांचे काम सुरू करतो. कवितेची प्रक्रिया थोडीफार मला समजते या विश्वासावर मी हे काम करतो.

४. कवीची सामाजिक, राजकीय, धार्मिक मते काय होती, याला मी महत्त्व देत नाही. कलेची प्रक्रिया जेव्हा निष्ठेने घडत असते तेव्हा ती मताबितांना बांधील राहात नाही. जगण्याचे सर्वांगीण दर्शन ती घडवते. कुणी हिंदू धर्माच्या विरुद्ध बोलले होते वा कुणी कम्युनिस्ट होते याबाबतचे आकस मी बाळगत नाही. ग्रेट कला ही शेवटी सर्व मतमतांतरांना ओलांडणारी असते आणि एकूण माणसाचे एकत्र जगणे महत्त्वाचे मानणारी असते, असे मला दिसते.

५. आपल्याकडे जसे जातिनिहाय, प्रांतनिहाय, भाषानिहाय प्रतिनिधित्व देण्याची पद्धत असते तसे इथे काही होणार नाही.

६. जगातल्या काही महान कवींच्या आणि काही वैशिष्ट्यपूर्ण कवींच्या कविता मराठीत आणाव्यात, एवढाच हेतू आहे. कवितेबाबतच्या आपल्या अपेक्षा आणि कल्पना अधिक उदार व्हाव्यात, हाही एक हेतू आहे.

७. एखादा कवी गंभीरपणे काही करत असेल तर ते समजून घेण्याकडे कल असणे महत्त्वाचे आहे. आपल्या चाकोरीबद्ध विचारांत ते बसत नाही म्हणून आकस, पूर्वग्रह, उपरोध आणि हेटाळणी यांचा तुरंत वापर सुरू करणे हा मूर्खपणा आहे, हे ज्ञान प्रसृत करणे हाही एक छुपा हेतू आहे.

--- ००० ---

अडाण्याचा जाहीरनामा

अतिवास्तववादाचा जाहीरनामा असतो, न-कवितेचा असतो आणि ही माणसे काही वेगळी, महत्त्वाची समज व्यक्त करताहेत म्हणून त्यांच्याकडे लक्षही दिले जाते, आपल्या आवडीचे, आपल्या सवयीचे नाही म्हणून लगेच त्यांची

हिडीसफिडीसही केली जात नाही – तसे, गेल्या कित्येक वर्षांत मराठीत काय घडले ? इथे एक तर सुधारणावादी कला किंवा व्यक्तिगत अनुभवांचे गोडवे गाणारी भावनिक कला, हे दोनच प्रकार का फोफावले ? इथे सुरुवातीलाच एक सांगून ठेवतोय की या जाहीरनाम्यातले प्रत्येक वाक्य विवाद्य असणार आहे, बरेच काही अर्धवट माहितीवर वा अज्ञानावर आधारित असणार आहे, लोकांनी टची होऊ नये आणि लगेच हल्ले करायचे विचार करू नयेत. हा एका अडाण्याचाच जाहीरनामा असल्याने, असे बरेचसे ' चुकीचे ' घडणारच याची विवेकशील जाण बाळगावी.

हा विशेषीकरणाचा जमाना आहे. नुसते डॉक्टर म्हटले तरी पोटाचे वेगळे, दातांचे, हाडांचे वेगळे, हृदयाचे वेगळे आणि टाळक्याचे वेगळे, असे आहे. सगळ्यातले सगळ्यांना कळू शकत नाही. तसेच पदार्थविज्ञानशास्त्र वेगळे आणि राजकारण वेगळे. राजकारणातही अमुक साली तुम्ही काय करत होता किंवा तुम्ही अमुम तमुक म्हणाला होता हे असले प्रकार वेगवेगळ्या माणसांबद्दल वेगवेगळे लक्षात ठेवावे लागतात – तेही विशेषीकरणच असते. पक्ष बदलले तर याच्या आठवणी त्याच्याकडे जातात, हे पाहावे लागते. वैचारिक बोलणाऱ्या सगळ्याच लोकांनी टॉफलर, हरारी किंवा हॉकिंग्ज वाचलेले असतातच असे नाही. त्यांना कांट, हेगेल वा फुकोही माहीत नसतो. त्यातले काही असले माहीत तरी मानववंशशास्त्रातले त्यांना काही कळत नसते. २०३० साली माणसाचे जगणे कसे असणार आहे यावरची पुस्तके त्यांनी वाचलेली नसतात. यापुढे, नऊ महिने पोटात गर्भ वाढवत बसणे आणि मग कळा सहन करत मूल जन्माला घालणे, असले काही असणार नाहीय, प्रयोगशाळेतच मुले जन्माला येणार आहेत, हे आहे माहीत ? इस्पितळांची गरजच राहणार नाहीय, घरच्या घरीच सगळे होईल, हे आहे माहीत ? विनाचालक गाड्यांमुळे अपघात जवळजवळ बंदच होणार आहेत, हे आहे माहीत ? अनेक विषय आहेत, त्या सगळ्या विषयांचे वाचणे जाऊ द्या, त्यांची नावेही कुणाला माहीत नसतात. गेल्या शतकातले जगातले पन्नास महत्त्वाचे विचारवंत सांगा असे म्हटले तर बहुतेकांची बोबडी वळेल. साहित्य, कथा, कविता, कादंबरी हे सगळे म्हटले तरी जगात खूप पुस्तके असतात. " तुम्ही हे अमुक वाचलेत का, तुम्ही ते तमुक वाचाच " असे एकमेकांना माणसे सांगत असतात. खरे तर माणसाच्या समस्या या ज्ञानाच्या सर्वच क्षेत्रांशी एकत्रितपणे संबंधित असतात पण असा आवाका घेऊ शकेल असा एकही विद्वान असू शकत नाही. सगळे एका एका तुकड्याच्या अर्धवट माहितीचे बाजारबुणगे विद्वान असतात.

एखाद्या नटाची आत्महत्या होते आणि तिला निरनिराळी वळणे मिळत राहतात, राजकीय प्रभावांनी ती स्टोरी रंगवणे आणि वादाला वापरणे चालू होते, बलात्काराच्या घटना, आर्थिक गुन्ह्यांच्या घटना, वगैरेंना अनेक कंगोरे असल्याचे कानावर पडत राहते – तर हे असे सगळे प्रकार आणि त्याचबरोबर विमानखरेदीतला भ्रष्टाचार हे सगळे सारखे समजून घेत राहणे कुणाला शक्य असते ? आणि समजणे म्हणजे ' राजकीय समजणे ' असेच असल्यावर अनेकांनी त्याचा नादच सोडून दिला तर चुकीचे काय आहे ?

आमच्या काळी अकरावीनंतर, फर्स्ट इयर, इंटर आणि मग दोन वर्षे पदवीची असे होते. त्यातल्या इंटर आर्टसला आम्हाला जगाचा इतिहास होता ! साधी दोन महायुद्धे म्हटली तरी ते सगळे लक्षात राहणे मला अवघड वाटे. महायुद्धांना ' साधी ' म्हटले कारण तेवढे तरी समजायलाच हवे ना ! आता ते कुठे काय घडले हे तर आहेच, पण, ती ती ठिकाणे, ते ते देश तरी नेमके येतात का डोळ्यांसमोर ? अझरबैजान की काय म्हटल्यावर काय कळते बोंबलायला ? भूगोलही आख्खा माहीत नसतो. शिवाय जंगले, पर्वत, नद्या, अनेक संस्कृती, काहीही नसते माहीत.

हे सर्व पाहता, एखादा माणूस अमुक पुस्तक फार चांगले आहे म्हणतो आणि दुसरा म्हणतो की मलाही वाचायचेय ते, कुठे मिळेल – यासारखे विनोदी काही असू शकत नाही. काही शहाण्या माणसांना अशा ' ज्ञानाच्या ' दिशेने मेहनत न करताही, याचा काही उपयोग नाही, हे कळत होते, आता हुशार लोकांनाही हे कळायला लागले असावे, अशी शंका आहे. एकूण जगातलेच वाचन कमी होत चालले आहे असे संशोधन आहे ! तरीही काही आशावादी पढतमूर्ख म्हणताहेत की

आता डिजिटल वाचन वाढत जाणार आहे ! खरे तर कोणत्याही काळातले कोणत्याही दर्जेदार ( आपल्या मते ) साहित्याचे थोडेफार वाचन केले तरी ‘ शहाणपण ‘ येणार असतेच – गेल्याच महिन्यात इटलीत प्रसिद्ध झालेले पुस्तकच वाचायला हवे, असे काही नाही. हा जाहीरनामा, ‘ अतिवाचन ‘ हा एक रोग मानतो हे इथे लक्षात घ्यावे.
तर अशा या ज्ञानी पार्श्वभूमीवर या जाहीरनाम्याची कलमे अशी आहेत –
१. आजूबाजूला, देशात वा जगात काय काय घडते आहे याची सर्व माहिती मिळवत बसण्याचा प्रयत्न मी करणार नाही.
२. इथला भूतकाळ आणि संस्कृती यांचे आपोआपच माझ्यावर काही प्रभाव असतील, तेवढे मला पुरे आहेत. मी रामायण, महाभारत, हितोपदेश, पंचतंत्र, गांधी, टिळक, शिवाजीमहाराज, आंबेडकर हे वाचत बसणार नाही किंवा शेतकरी आंदोलन, किंवा बेरोजगारीवरचे उपाय या सगळ्याचा अभ्यास करत बसणार नाही.
३. माझ्या कानावर येईल ते वा त्या त्या वेळी मी जे ऐकेन-वाचेन ते यांवर आधारित मी माझी कामचलाऊ मते बनवणार. अगदी विद्वानांची मतेही अर्धवट वा निवडलेल्या वा पूर्वग्रहयुक्त माहितीवर आधारितच असतात, हे मला समजत असल्याने, अशी तात्पुरती फुटकळ मते मी बाळगण्यात काही चूक आहे, असे मला वाटत नाही.
४. ‘ बहुमतवादामुळे लोकशाहीचे खूप नुकसान होते ‘ असे एक ज्वलंत वाक्य माझ्या वाचनात येऊन गेलेले असल्याने आता, मी म्हणतो तेच सत्य, असे म्हणायला मी लाजणार नाही.
५. माझ्या मतांच्या पुष्ट्यर्थ मी आंतरजालावरची माहिती वा उद्धृते ( कोटेशन्स ) त्यांची शहानिशा न करता वापरणार. मला कुणी त्यांचे संदर्भ विचारू नयेत. अगदी संदर्भांसह लेखन केले तरी ते माझ्या लेखनाहून फार उच्च वगैरे नसते, हे मला माहीत आहे. आणि करायचीयत काय नावे आणि संदर्भ ? ते विचार ओघात आलेले आहेत, ते अमुक कुणाचे असोत वा नसोत, असे पाहा ना !
६. साहित्याची वा कवितेची समीक्षा ही अमुक काळ, तेव्हाचे प्रभाव, वगैरे विचारात घेत साठोत्तरी, नव्वदोत्तरी अशी करायची गरज नाही. नको त्या विद्वत्तेने पाने भरू नयेत.
७. कोणत्याही साहित्यकृतीला एक कथनसलगता वा वैचारिक अर्थवत्ता वा व्यक्तिगत सुसंगती असायची गरज नाही. सुचेल तसे काहीही लिहायला हरकत नाही. असंबद्ध, वेडे लेखनही माणसाला शहाणपण देईलच, असा माझा विश्वास आहे. शहाणपण म्हणजे हेच की वैचारिक सत्य असे काही नसते.
-- अजूनही काही कलमे यात वाढू शकतील. हा फक्त एक प्रारंभिक मसुदा तयार केलेला आहे. हा जाहीरनामा ‘ पटणारे ‘ असंख्य सुजाण विचारवंत, लेखक या चळवळीला जोडले जाणार आहेत याची मला खात्री आहे. त्या वेळी वाटल्यास याहून निरर्थक काही कलमे यात वाढवता येतील.
या जाहीरनाम्याबाबत कोणतेही वाद घालून काहीच उपयोग नाही हे सर्व बुद्धिनिष्ठ, तर्कनिष्ठ, विवेकी आणि वैज्ञानिक दृष्टिकोणाच्या मानवांच्या लक्षात येईलच हीच एक माफक आशा बाळगून इथेच सध्या विराम घेत आहे.
--- ००० ---

## विचारस्वातंत्र्य म्हणजे काय रे भाऊ ?

एकदा डॉ. श्रीराम लागू आणि विजय तेंडुलकर यांच्या जाहीर गप्पांचा कार्यक्रम झाला होता. त्यात ‘ नियती ‘ हा विषय आला होता. लागू म्हणाले की ते नियतिबियती काही मानत नाहीत तर तेंडुलकर म्हणाले की ते मानतात. दोघेही तसे पुरोगामी म्हणावेत असेच, मग हा फरक कसा काय ? मग, दोघेही वैज्ञानिक दृष्टिकोण मानत होते की नव्हते ? श्रद्धावान

लोक तेंडुलकरांमुळे खुश झाले असले तरी पुरोगामी लोक डिस्टर्ब होणे साहजिक होते. पण, विचार करता असे दिसते की लागूंचा यातला पुरोगामीपणा हवेतला होता आणि तेंडुलकरांच्या नियतिवादाला वैज्ञानिक पाया होता. विज्ञानाची पायाभूत गृहीतके काय असतात, तर ती अशी आहेत –

१ निसर्ग हा शिस्तबद्ध असतो आणि निसर्गाचे नियम ते दाखवत असतात.

२ आपाल्याला निसर्गाची माहिती होऊ शकते.

३ घडणाऱ्या सर्व गोष्टींना नैसर्गिक कारणे असतात.

४ स्वयंभू असे काही नसते.

५ अनुभवातून ज्ञान मिळू शकते.

६ ज्ञान हे अज्ञानापेक्षा श्रेष्ठ असते.

-- थोडक्यात जे आहे ते सर्व कारण-परिणाम साखळीतच असते. यामुळेच पूर्वी कुणी कर्मविपाक सिद्धांत काढला असेल किंवा स्वर्ग-नरकाच्या कल्पनाही निघाल्या असतील. चांगल्याचे चांगले फळ, वगैरे ( पण, चांगले म्हणजे काय ते मी सांगणार, ही त्यातली, कारणांनीच जन्माला आलेली, हलकट मानवी मखलाशी वेगळी ). आपल्याकडे जसे कफ, वात, पित्त यांपैकी काही एक प्रधान असलेली माणसे सांगितली गेली तशीच तिकडे चार प्रकारची माणसे सांगितली गेली. या सर्व प्रकारच्या माणसांचे स्वभावविशेष वगैरेही सांगितले गेले. उदाहरणार्थ कफप्रधान माणसे जास्त रोमँटिक असतात, वगैरे. यातले बरेचसे आपण विवाद्य समजलो तरी वैज्ञानिक दृष्टिकोणातली कारण-परिणाम साखळी कशी टाळणार ? म्हणजेच एखादा माणूस कम्युनिस्ट व्हायला किंवा भांडवलवादी व्हायला काही ना काही कारणे असणार. स्वयंभू काहीच नसते ! हे सर्व पाहता, लागू हवेत गप्पा मारत होते आणि तेंडुलकरांना मानवी जगण्याची अधिक सखोल जाण होती, असेच म्हणावे लागते.

कालच्या माझ्या पोस्टमध्ये, विचारसरणीवर जनुकरचनेचा प्रभाव असतो या संशोधनाचा उल्लेख होता. तो, स्वतःला स्वयंभू समजणाऱ्या पुरोगाम्यांना आवडणार नाही, हे मला माहीत होते. पण यावर ‘ वैज्ञानिक ‘ मटेरियल आहे नेटवर – हा काही अंधश्रद्धेचा भाग नाहीय.

माणसाचा स्वभाव, विचार हे सर्वच जर कारण-परिणामांनी नियंत्रित असेल तर साहजिकच विनम्र उत्सुकतेने हा प्रश्न विचारावाच लागतो की – विचारस्वातंत्र्य म्हणजे काय रे भाऊ ?

--- ००० ---

कृपया क्रोधाला थारा न देता मैत्रीतच वाचावे, ही विनंती --

समीक्षा म्हणजे काय रे भाऊ ?

मराठीतली समीक्षा थांबलीय का, मराठी समीक्षा जागतिक का होत नाही, मराठी समीक्षेत नवे विचार का दिसत नाहीत, वगैरे विषय आपण चघळत असतो. पण, इतकी वर्षे होऊन गेली तरी आजही माधव आचवलच आठवावेत, असे का होते, याचा विचार आपण टाळतो. अहो, आधी मराठी साहित्य तरी होऊ द्या जागतिक मग समीक्षा आपोआप होईल, असेही आपण म्हणतो. जगप्रसिद्ध होण्यासाठी योग्य, दर्जेदार साहित्याच्या अनुवादाची प्रक्रिया असायला हवी – मराठीतून इंग्रजीत कोण करणार अनुवाद ? अकादेमिक वर्तुळात कार्य असलेल्या काही लेखकांचे होतातही अनुवाद पण अर्थातच ते पुरेसेही नसते आणि प्रातिनिधिकही नसते. त्यामुळे, ते देऊ सोडून आणि असा विचारू प्रश्न की जागतिक दर्जाचे म्हणावे

असे कोणते कितपत साहित्य इथे निर्माण झाले वा होते ? या प्रश्नाला नक्कीच आशादायक असे उत्तर मिळावे अशी साहित्यनिर्मिती आपल्याकडे होत आलेली आहे. पण मग त्या निर्मितीची दखल घेण्याची कुवत इथल्या समीक्षेत आहे का – याचे उत्तर नकारार्थीच येते. असे का होते आहे याचाही रोखठोक विचार करावा लागेल. दलित साहित्य किंवा आंबेडकरी साहित्य आणि ग्रामीण साहित्य हे मराठीतले नक्कीच महत्त्वाचे प्रवाह आहेत पण साहित्य म्हणजे तेवढेच नव्हे. सामाजिक-राजकीय अन्यायाचा निषेध वा न्यायाची प्रस्थापना करायची निकड ही त्यांची उद्दिष्टे असतात. ती तशी असणे भागही असते. पण, मानवी जगण्याचाच आवाका घेणे, भान घेणे, नेहमीच अनुत्तरित राहणाऱ्या समस्यांचे दर्शन घडवणे, माणसाला सुजाण, संवेदनशील, परिपक्व असण्याच्या शक्यता निर्माण करणे, अशाही बाबी वा प्रक्रिया साहित्यात महत्त्वाच्या असतात. प्रत्येक समीक्षक या सर्वच बाबतींत अभ्यासूपणे बोलू शकेल, असे नव्हे. मार्टिन एस्लिनने अब्सर्ड नाटकावर एक जागतिक महत्त्वाचा ग्रंथ सिद्ध केला तसे निवडलेल्या विषयावरचे सखोल काम तरी का होत नाही ? खरे तर परिवर्तनवादी असो की इतर सर्व खुले साहित्य असो, समीक्षेने लेखकांसमोर आव्हाने उभी करायला हवीत. समीक्षेलाही सर्जकच समजायला हवे. समीक्षा आणि साहित्य या एकत्र चालणाऱ्या प्रक्रिया असायला हव्यात. मुळात आपला प्रश्न हा आहे की आशयानुगामी समीक्षेत कुणाला इंटरेस्टच नाहीय. आशयाच्या पाण्यात उतरण्याची हिंमतच नष्ट होत चाललीय. बाहेरून उडाणटप्पू शेरे मारून पळून जाणे हेच घडते आहे. या असल्या समीक्षेचे आद्यपुरुष अर्थात नेमाडे आहेत. त्या पद्धतीने अनेकांची चांगली सोयही झालेली आहे. पण, मूलत: हा दृष्टिकोण सर्जक साहित्याला क्षुद्र लेखणारा ठरतो, हे पाहायला हवे. अगदी परिवर्तनवादी समीक्षक म्हटला तरी त्या साहित्याबद्दल तरी तो खास मौलिक असे काय बोलतो ? इथे साहित्य संमेलनांच्या चार अध्यक्षांची उदाहरणे घेऊ. उत्तम कांबळे, नागनाथ कोत्तापल्ले, लक्ष्मीकांत देशमुख आणि फ्रांसिस दिब्रीटो. हे लोक काय करतात ? साहित्यात राजकारण वर्ज्य नसते असे म्हणत त्यांच्या भाषणातून साहित्यच वर्ज्य करतात आणि फक्त राजकारणावर बोलतात. आणि ते तरी काय असते ? कोणताही परिवर्तनवादी कार्यकर्ता जे भाषण कुठेही करू शकेल तेच भाषण हे संमेलनाच्या अध्यक्षपदावरून हाणतात ! म्हणजे घडते काय तर त्या अध्यक्षपदाच्या खुर्चीवर जाऊन बसणे ! चर्चांचे, परिसंवादांचे विषयही सगळीकडे तेच तसेच असतात – राजकीय विचार भरपूर मांडता यावेत असे. आणि आपण रडत असतो की मराठीत मौलिक समीक्षा का नाही आणि आपली समीक्षा जागतिक का होत नाही ! साहित्य म्हणजे फक्त राजकारण असे सतत बिंबवणारे जे लोक आहेत ते याचे खरे गुन्हेगार आहेत. साहित्याची इतर अनेक अंगे आणि सांस्कृतिक कार्ये नष्ट करत जाण्याचे काम यांनी केलेले आहे. वेळ कधीच गेलेली नसते. आताही यातून जागे होऊन बाहेर येणे शक्य आहे. हे असले ‘ निरुपयोगी ‘ फार लिहीत न बसता खाली काही विषय देतोय – त्यांचा आपल्या सर्जक साहित्याच्या संदर्भात कितपत उपयोग आहे याचा विचार व्हावा –

1. तुकारामाची रिकामीक आणि सार्त्रचा नथिंगनेस
2. मराठी कवितेतले प्रमुख प्रवाह
3. मराठी साहित्यातला उत्तर आधुनिकतावाद
4. साहित्य आणि तत्त्वज्ञान
5. साहित्य आणि मानसशास्त्र
6. मराठीतला भावकवितेचा काळ संपला आहे का
7. मराठी नाटक आणि त्याचे साहित्यमूल्य
8. कविता, पद्य आणि गद्य
9. मराठी कथा / कादंबरी यांचा बदलता कच्चा माल
10. मराठी साहित्यातले परदेश

11. मराठी साहित्य निराशावादी आहे का

12. आजच्या काळाचा दस्तावेज तयार करणे हे साहित्याचे काम आहे का

--- या प्रकारे आणखीही काही विषय सुचवता येतील. मुळात साहित्याशी संबंधित आहेत का हे विषय की साहित्यातून वर्ज्य करावेत असे आहेत, त्यावर आधी चर्चा व्हावी. मग हे विषय घ्यावेत असे सर्जक साहित्य आहे का मराठीत, यावर दुसरी चर्चा घ्यावी. आणि मग तिसरी चर्चा शेवटी यावर घ्यावी की मराठी समीक्षक हे विषय का महत्त्वाचे मानत नाहीत. आता नेहमीप्रमाणे माझ्या डिसक्लेमर – मी स्वत: अभ्यासक नाही – यांतल्या एकाही विषयावर मी बोलू शकणार नाही, पण , कुणी अभ्यासपूर्वक यांवर बोलणार असेल तर मला त्यात प्रचंड इंटरेस्ट असेल. मी व्यक्त केलेले हे विचारही कुठल्या सखोल अभ्यासाचा नतीजा आहेत , असे नाही. इथल्या उथळ प्रचलित पद्धतीतलेच जरा वेगळे बोललोय इतकेच. तुटपुंज्या अभ्यासावर, फारसे काही न कळता बोलायची इतर अनेकांना असलेली सूट मीही घेत आहे. फार मनावर घेऊ नये. सोचना है तो सोचो नही तो छोड दो ! जय हिंद , जय महाराष्ट्र !

--- 000 ---

## आस्वादक आणि सैद्धांतिक

डॉ . सुधीर रसाळ सरांच्या एका लेखावर मी माझी प्रतिक्रिया त्यांना कळवली होती. माझ्या प्रतिक्रियेबाबतचे त्यांचे विचारही त्यांनी मला सविस्तर कळवले. सध्या मी सरांचा तो लेख आणि त्यांचे मला आलेले उत्तर जरा बाजूला ठेवतो आहे. मी त्यांना माझी जी प्रतिक्रिया पाठवली होती तेवढीच पोस्ट इथे त्यांच्या अनुमतीनेच देतो आहे. हेतू हा की आपणा साहित्यप्रेमींत चर्चा व्हावी असे दोन विषय यात आहेत --

१. आस्वादक समीक्षेत वेगवेगळी सैद्धांतिकता असते का ? कशा स्वरूपाची ?

२. माझ्या मते, सैद्धांतिक समीक्षा ही भेद माजवणारी असल्याने ती साहित्याच्या मूल्यात्मकतेलाच हरताळ फासते , त्यामुळे, फक्त आस्वादक समीक्षा हीच योग्य असते.

-- या दोन्ही मुद्यांवर आपण आपापले आकलन मांडावे म्हणून ही पोस्ट --

डॉ . सुधीर रसाळ सर आणि माधव आचवल .

मराठी समीक्षेच्या बाबतीत मी अलीकडेच एक पोस्ट दिली होती. त्या पोस्टमध्ये मी माधव आचवल हे माझे आवडते समीक्षक असल्याचा उल्लेख केला होता. तो रसाळ सरांच्या पाहण्यात आला असावा. योगायोग म्हणजे आचवलांच्या समीक्षेवरच रसाळ सरांचा एक लेख लौकरच एका ठिकाणी प्रसिद्ध होणार आहे. तो त्यांनी मला वाचायला पाठवला. तो मी ईमानदारीत वाचला. बालकल्याण खात्याच्या कारकुनाने अवजड उद्योग आणि पोलाद खात्याच्या मंत्र्याला भेटावे तसे ते झाले. पण हरकत नाही. मराठीत एक बरे आहे – तुम्हाला काही समजो वा न समजो, बोलायला विचारस्वातंत्र्य मुबलक उपलब्ध आहे. त्या आधारावर बोलतोय.

आमच्या बँकेत एक देशभक्त कर्मचारी होते. त्यांनी एकदा एक बातमी वाचली की नेहरू युनोकडे जात असून तिथे ते काश्मीर प्रश्नावर बोलणार आहेत. जाताना थोडा वेळ ते मुंबई विमानतळावर थांबणार आहेत. हे कळल्यावर त्या पठ्ठयाने मुंबई विमानतळाच्या पत्त्यावर नेहरूंना एक मोठी तारच पाठवली की बाबा काश्मीरवर बोलताना हे खालील मुद्दे विसरू नका – ते फार महत्त्वाचे आहेत ! तर हे जे मी लिहितो आहे ते तसेच समजावे, ही विनंती.

रसाळ सरांचे, आदरपूर्वक का असे ना, आचवलांबद्दल असे मत आहे की ना धड आचवलांना आस्वादक समीक्षा जमली ना काही समीक्षा-सिद्धांत मांडता आले. मला तर आचवलांचे ' जास्वंद ' वाचताना अत्युत्तम समीक्षा वाचल्याचा आनंद झाला होता. नंतर, माझ्यासारखाच आनंद झालेले मला आणखीही काही भेटले होते. त्यामुळे, तो सरांचा लेख पुन्हा एकदा वाचला.

रसाळ सरांच्या लेखातल्या पहिल्याच वाक्याला मला खडा लागला. " मराठीत आस्वादक समीक्षेला जरी एक प्रतिष्ठा असली तरी या समीक्षेमागील सैद्धांतिक भूमिका मात्र मराठीत नीट मांडली गेल्याचे दिसत नाही. " – हे ते वाक्य. सैद्धांतिक नाहीय म्हणूनच तर तिला आस्वादक समीक्षा म्हणायचे ना ? जी समीक्षा ना रसवादी आहे, ना दलित आहे ( सवर्णांची मस्त ठासलीय या कादंबरीत – ग्रेट आहे ! ), लिंगवादी ( फ्रेंच कवी रॅम्बो हा गे होता आणि व्हरलेन या कवीशी त्याचे संबंध होते, असे म्हणतात – ते काहीच लक्षात न घेता दि . पु . चित्र्यांनी लिहिलेच आहे की त्याच्यावर – पहा – ' साहित्य आणि अस्तित्वभान – १ ' ), स्त्रीवादी, उत्तर आधुनिकतावादी , मार्क्सवादी -- आशा कोणत्याच सिद्धांतावर आधारित नसलेली तीच ना आस्वादक समीक्षा ? पण, आस्वादक समीक्षेचेही प्रत्येक आस्वादकाने आपापले सिद्धांत निश्चित करून आस्वादक समीक्षेतले सैद्धांतिक उपविभाग मांडावे, अशी ही अपेक्षा असावी. " कलाकृतीचा अभ्यास करताना आपण कलाकृतीत सापडलेल्या गुणांची तपासणी करीत असतो. हे गुणधर्म शास्त्रीय पद्धतीने सिद्ध करण्याची कोणतीही साधने आपल्याला उपलब्ध नाहीत. त्यामुळेही कलाकृतीच्या अभ्यासाला मर्यादा पडतात. " हे आचवलांचे वाक्य रसाळ सरांनीच दिलेले असूनही ते सिद्धांतांची अपेक्षा करत आहेत, असे दिसते. इथेही एक इंटरेस्टिंग गोष्ट दिसते. आचवलांनी सैद्धांतिक मांडणी केलेली नाही हा आक्षेप व्यक्त करता करताच रसाळ सरांनी आचलांच्याच लेखनातून सापडलेले १९ मुद्दे घेऊन त्यांची ' सापडलेली ' भूमिकाही सिद्ध केलेली आहे. त्या सगळ्या घोळात न जाता एका महत्त्वाच्या मुद्याकडे जाऊ.

जगण्यात येणारा सचेतनतेचा अनुभव खरा आणि कलेतून येणारा आभासात्मक ही आचवलांची मांडणी मलाही योग्य नाही वाटत. चैतन्य ते चैतन्य – चैतन्याचा ' आभास ' हे अनावश्यक वेगळेपणा दाखवणारे वाटते. रसाळ सरांनी घातलेला पेच असा आहे की ते चैतन्य जर एकच आहे तर कला अपरिहार्य नाही ठरणार. मग हवीच कशाला कला, असे होईल. हे सरांचे म्हणणे पटणारे नाही. धर्म, तत्त्वज्ञान हेही जगणे समजून घेण्याचे मार्गच असतात – ते काही प्रत्यक्ष जगणे नसतात. तसेच कलेच्या माध्यमातून त्या सचेतनेतेचा प्रत्यय येत असेल तर तो अपरिहार्य आहे का, हा प्रश्न गैरलागू ठरतो. आणि बिनचूकपणाच्या आणि वैज्ञानिकतेच्या हव्यासापायी, जगण्याचा हेतू काय, त्याला काही अर्थ आहे का, दु:ख का होते, दु:खाशिवाय जगता येऊ शकते का, हे प्रश्न मारून नाही टाकता येणार. जगण्यातल्या सचेतनत्वाकडे जर हे प्रश्न नेत असतील तर ते महत्त्वाचेच ठरते. कलेतून आलेल्या त्या सचेतनत्वाची पुनरउभारणी करणे, हे समीक्षेचे काम आहे, असे जर आचवल मानत असतील तर त्यात गैर काहीच नाही. आणि आचवल अशी पुनरउभारणी करण्यात यशस्वी होतात असे माझ्यासारख्या अनेकांचे मत आहे. त्यासाठी आचवल जी भाषा वापरतात ती रसाळ सरांना अचूक बोध देणारी वाटत नाही. त्याला इलाज नाही. समीक्षा हीही एक सर्जक कलाच आहे या दृष्टीने पाहिले तर प्रत्येकच कलाकृती प्रत्येकाला पोचलीच पाहिजे, असा आग्रह धरता येणार नाही.

मला स्वत:ला सैद्धांतिक मर्यादांत अडकणाऱ्या समीक्षेपेक्षा आस्वादक समीक्षाच महत्त्वाची वाटते. सैद्धांतिक समीक्षा ही भेद निर्माण करणारी आणि म्हणून हिंसक असते, असे मला दिसते. त्यामुळे, एकूणच माणसाने एकत्रितपणे शांततेने जगण्याचे मूल्यच ती नाकारते आणि परिणामत: कला ही मूल्यात्मक असताच कामा नये, अशी अट निर्माण करते. याचाच अर्थ कलेचे अस्तित्वसमर्थनच ती घालवते. हे लक्षात घेतले तर शास्त्रीय पद्धतीच्या सिद्धांतांची मागणीच गैर

वाटते.  भौतिक नियमांप्रमाणे कला समीक्षा कधीच, ‘ कुणीही केली तरी ती तशीच येणार ‘ अशी होऊच नाही शकणार, हे लक्षात घ्यायला हवे.
सचेतनतेचा प्रत्यय यायला साहित्यकृतीची अमुक एक रचना महत्त्वाची असते की नसते, असा एक प्रश्न रसाळ सर पुढे आणतात . रचना असतेच ना महत्त्वाची. कसेही काहीही मांडून सचेतनतेचा प्रत्यय कसा येईल ?
रसाळ सरांच्या प्रत्येक मुद्यावर लिहून त्यांच्या लेखाइतकाच मोठा लेख लिहिणे, ये मेरे बसकी बात नही है ! दुसरे म्हणजे, आचवलांचे ‘ जास्वंद ‘ हे पुस्तक पुन्हा एकदा वाचून अधिक तपशीलवार बोलावे इतका माझा दमसास नाही. त्यामुळे, इथेच थांबतो. समीक्षा हे क्षेत्र असे आहे की अमुक म्हणजे पूर्ण चूक वा निरर्थक, असे होण्याचा धोका कमी असतो – याचाच फायदा घेऊन अनेकजण यात लुडबुड करतच असतात – मग मीच का नको, असे याकडे सहानुभूतीने पाहावे, ही विनंती. ही असमान कुस्ती मला खेळायचीच नसल्याने  ( पुरेशा खोड्या काढून झाल्यावर ) आता मी मैदानातून पळ काढत असल्याचे जाहीर करत आहे !
--- ००० ---

तत्त्वशील माणसे

तुकारामाने अनंततेचा उल्लेख केला की तो हिंदू धर्मातले काहीतरी बडबडतोय म्हणून त्याची चेष्टा होऊ शकते. ते जाऊ द्या, हे घ्या –
The fundamental principle of Buddhism is that the whole universe is in Limitless-Oneness, it is originally so, and pure, i.e., free from artificial limits of concepts, values and judgments.  ( बौद्ध धर्माचे मूलभूत तत्त्व हे आहे की संपूर्ण विश्व हे एक अमर्याद एकत्व आहे, म्हणजेच, ते सर्व तऱ्हेच्या कृत्रिम विचारकल्पना , मूल्ये आणि निष्कर्ष यांपासून मुक्त आहे. )
बौद्ध धर्माचे प्राणतत्त्व आहे दु:खमुक्ती म्हणजेच निर्वाण – जे जगण्यात असू शकते. ते शक्य नसेल तर धर्म या शब्दाचा अर्थच खलास होतो. आणि ते तेव्हाच शक्य होते जेव्हा माणसाच्या टाळक्यात कोणते ना कोणते समरूप होण्याचे साचे नसतात. एखाद्या धर्माशी समरूप होऊन कट्टर होणारा आणि एखाद्या विचारसरणीचा कट्टर समर्थक हे दोघेही सारखेच घातक आणि हिंसक आणि विध्वंसक असतात. प्रश्न असा येतो की मानवजात तर अशी अमर्याद भानात जगत नाही – निरनिराळे समरूपतेचे साचे डोक्यात घेऊनच जगते. म्हणून मग घटनेत सर्वधर्मसमभाव, उपासनास्वातंत्र्य वगैरे तत्त्वे घालावी लागतात. ( घटनेत ही तत्त्वे आहेत म्हणून एखादा इहवादी घटना नाकारू शकत नाही. ) मानवी संबंधांच्या कोणत्याही समस्येत विचार, बुद्धी, प्रणाली हे सर्व कुचकामी ठरते. धर्माभिमानी, जात्याभिमानी, विचारसरणीचे अभिमानी हे सर्व एकाच प्रकारचे हिंसक गधडे असतात. फक्त ते सगळे, मी शहाणा आणि बाकीचे वेडे, असे म्हणत असतात, इतकेच.  ‘ मी नास्तिक आहे, मी धर्म मानत नाही, उपासना मानत नाही  ‘ म्हणजे मी कुणीतरी इतरांपेक्षा अधिक शहाणा आणि विवेकी आणि अधिक शूर आहे असे समजणारे काही हुशार मूर्ख लोक असतात. ते स्वत:ला बुद्धिप्राण्यवादी  वा इहवादीही म्हणवून घेतात. समरूपतेचे सगळेच साचे हे इहवादीच असतात आणि सतत एकमेकांच्या संघर्षात असतात, हे समजून घ्यायला हवे. इथे राजकारणप्रियता प्रचंड प्रमाणात आहे आणि त्यात ‘ समान न्यूनतम कार्यक्रम ‘ किंवा common minimum programme याचे खूप महत्त्व आहे. कसले इ्याटाचे तत्त्व ? अंतिमत: तत्त्व म्हणजे काय तर माझे व्यक्तिमत्व, स्वभाव, विचार, मते  -- आणि नेमकी अशीच्या अशीच भेळ असलेली जगात दुसरी व्यक्ती असू शकत नाही. आपल्याला वाटते, मर्यादित असणे म्हणजे तत्त्वशील, आदर्श असणे ! खरे तर ते भंगार आणि हिंसक असणे

असते ! – याचे पूर्ण आकलन झालेले तुकाराम वा बुद्ध हे अमर्याद एकतेबद्दल काय बोलत आहेत, हे समजून घ्यायची आपली कुणाचीच इच्छा नाही. आपल्याला तथाकथित तत्त्वशीलपणा मिरवण्यात जास्त इंटरेस्ट आहे.
पुरस्कार देणाऱ्याचे मूल्यमापन तुम्ही कसे करणार ? समजा तो सरस्वतीभक्त नाही पण भ्रष्टाचारी आहे किंवा अनेक स्त्रियांशी संबंध ठेवणारा आहे – तुम्ही काय कसे तपासणार ? मला एकदा एका ब्राह्मण संस्थेकडून सत्कार करण्यासाठी निमंत्रण आले होते. मला काही चांगले पारितोषिक मिळाले होते म्हणून. मी त्यांना विचारले की तुम्ही माझे काही वाचले आहे का ? तर ते म्हणाले, नाही, ब्राह्मण आहात म्हणून करायचाय सत्कार. त्याला मी नकार दिला होता. माझ्या लेखनासाठी हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन , दलित, मराठा, बौद्ध, ब्राह्मण, कम्युनिस्ट कुणीही मला पारितोषिक दिले तरी मला प्रॉब्लेम नाही येणार. आता पारितोषिक तरी कशाला, हा एक वेगळाच मोठा विषय आहे. जाऊ द्या.
वैचारिक स्तरावर तत्त्वशील-बित्त्वशील ही सगळी नुसती बकवास असते हे स्पष्ट पाहायला हवे.
--- ००० ---

## पुरोगामी म्हणजे काय रे भाऊ ?

ही पोस्ट लिहिण्यात माझा कोणताही प्रतिगामी हेतू नाही. काही शब्द वा संकल्पना यांच्याबाबत अनेकदा गोंधळ दिसतो – फक्त माझाच नव्हे तर अनेकांचा. तर यात काही स्पष्टता आणता येते का ते पाहावे, हा हेतू आहे. यात मला मुख्य प्रश्न हा पडतो की भारतीयांना आपापल्या श्रद्धा बाळगण्याचे आणि उपासनापद्धती अनुसरण्याचे स्वातंत्र्य भारतीय घटनेने दिलेले आहे. आपण यातून जादूटोणा, जारणमारण, भानामती, पशुपक्षी वा मुलेमाणसे यांचे बळी देणे, असले प्रकार वगळू. पण, निरनिराळ्या धर्मांच्या उपासना, देवदेवता वा विभूती यांच्या उपासना, वारी, यात्रा, उत्सव या सर्व बाबी  मान्यताप्राप्त समजू. तर या ज्या मान्यताप्राप्त उपासनापद्धती आहेत, ज्या बुद्धिप्रामाण्यवादी वा इहवादी नाहीत, त्या अवलंबणारे लोक पुरोगामी असू शकतात की नाही ? पुरोगामी हा निरीश्वरवादी आणि बुद्धिप्रामाण्यवादी आणि कोणतीही श्रद्धा नाकारणाराच असावा लागतो का ? मान्यताप्राप्त उपासनांकडे सहानुभूतीने पाहण्यात आणि सहिष्णुता ठेवण्यात पुरोगाम्यांना अडचण नसते. कम्युनिस्टांनी त्यांच्या कार्यकर्त्यांना आणि नेत्यांना निरनिराळ्या समूहांच्या धार्मिक उत्सवांतही सहभागी व्हायला सांगितल्याची बातमी मी वाचली होती. त्यावरून हेच दिसते, असे आपण म्हणू शकतो. दुसऱ्यांच्या भावनांचा आदर राखण्यासाठी गोल टोप्या घालणे किंवा इतर धर्मीयांनी हिंदूंच्या धार्मिक उत्सवांत सहभागी होणे, हेही घडत असतेच. आता हे सर्व लोकशाहीत मते मिळवण्यासाठीही घडू शकते आणि खरोखरच ते गुण्यागोविंदाचा आविष्कारही असू शकते. की बाबा, माझी नाहीय ही उपासना पद्धती पण तुमचा आदर राखायला मला काही प्रॉब्लेम नाही, असे. तर हा आदर आणि ही सहिष्णुता मान्य पण श्रद्धावान पुरोगामी असू शकतो का, यावर जरा स्पष्टता यावी, असे वाटते.
दूसरा प्रश्न जरा वेगळा आहे. काही वर्षांपूर्वी बँकांमध्ये कम्युनिस्टांची युनियन प्रबळ होती. सगळेच त्याच युनियनचे सभासद असत. बाहेर आरेसेस वाले असणारेही इकडे या युनियनचे सभासद असत. हे थोडेफार स्वार्थासाठीच असणार. पण, मग अशा वेळी तो माणूस अर्धा पुरोगामी आणि अर्धा प्रतिगामी असतो का ? कारण आरेसेस म्हणजे प्रतिगामी असे असल्याने हा प्रश्न येतो. समजा जातवाद हा प्रतिगामी आहे तर एकीकडे मराठा महासंघ किंवा ब्राह्मण संस्था आणि शिवाय दुसरीकडे तोच पुरोगामीही, असे असू शकते का ? अशी फाटलेली माणसे पुरोगामी असतात का ? आणि ज्यांचे मेंदू असे तुकड्यातुकड्यांत विभागले गेलेले आहेत अशांना पुरोगामी नाही म्हणायचे, असे म्हटले तर एक म्हणजे पुरोगामी उरतील किती आणि त्यांची संख्या वाढायला कितपत वाव राहील ?

तिसरा प्रश्न येतो ‘ बहुजनसमाज ‘ या नामाभिधानाचा. बहुजनसमाज म्हणजे पुरोगामी, असे सामान्यत: समजले जाते. त्यात मग श्रद्धावान वा भक्तिमार्गीही येतात. बहुजनांत मुसलमानही येतात हे आपण बहुजन वंचित आघाडीत पाहिले. बहुजनांमध्ये नेमके येतात तरी कोण कोण ? की ब्राह्मण सोडून सगळे बहुजन ? मराठा हे उच्चवर्णीयांत येतात की बहुजनांत ? की काही उच्चवर्णीयही बहुजनांत येतात ? म्हणजे मागास उच्चवरणीय, असे काही ? वारकरी घ्या उदाहरणार्थ – ते बहुतेक बहुजनसमाजात येतात पण ते पुरोगामी असतात का ? की वारकऱ्यांत पुरोगामी आणि प्रतिगामी असे गट असतात ? बहुजन हा शब्द जातकेंद्रित असतो की दारिद्र्यकेंद्रित की फक्त ब्राह्मण नसला की तो बहुजन ? इतक्या मोठ्या जनसमुदायाने आणि एकापेक्षा एक दिग्गज नेत्यांनी सतत ब्राम्हणकेंद्रित राहणे हे, किरकोळ, शक्तिहीन लोकांना अनावश्यक मोठे फूटेज देणे नाही होत ? आणि सारखे बहुजनसमाजाला संबोधून बोलणे हे याच देशाचे नागरीक असलेल्या अल्पजनसमाजवाल्यांना दुय्यम समजणे नाही ठरत ? आणि असे करणे हे पुरोगामित्वात बसते ? ( इथे, बहुजन कसे काय पुरोगामी, असा प्रश्न येऊ शकतो. उत्तर सोपे आहे. " शाहू-फुले-आंबेडकरांचा हा पुरोगामी महाराष्ट्र " असे आपण रोजच ऐकतो की नाही ? म्हणजे हा पूर्ण महाराष्ट्र पुरोगामी आहे. इथले बहुजन हे पुरोगामी असल्याशिवाय पूर्ण महाराष्ट्र कसा काय पुरोगामी असू शकेल ? सारांश, बहुजन हे पुरोगामीच आहेत, हे सामान्यत: मान्यच असते ! )
सर्वच नेते, कार्यकर्ते आणि एकूणच जनताही निवडणुकीच्या खेळात, शक्य ते सगळेच प्रतिगामी मार्ग हाताळताना दिसतात. हे पाहता, हा आख्खा देशच प्रतिगामी म्हणावा का ? की अशी शुद्ध विभागणी वगैरे काही नसते आणि त्या त्या वेळच्या आपद्धर्माप्रमाणे हे ठरते ? म्हणजे लोकशाही ही शासनपद्धतच प्रतिगामी असते का ? तसे असेल तर मग लोकशाही देशात पुरोगाम्यांचे गुणगान कशाला ?
मला जरा वेगळे दिसते. निरनिराळे धर्म, श्रद्धा, विचारसरण्या हे काहीही असो, प्रत्येकाचा एकेक जगण्या-वागण्याचा साचा असतो. तो साचा जनुक नकाशा आणि परिस्थिती आणि इतर अनेक परिणाम व संस्कार यांनी घडलेला असतो. प्रत्येकजण आपापली सुरक्षितता आणि जमेल तेवढे वर्चस्व मिळवणे याच्या प्रयत्नात असतो. सगळीच माणसे सुखी-दु:खी, प्रेमळ आणि रागलोभद्वेष बाळगणारी आणि थोडीफार हिंसकच असतात.आणि एकमेकांशी संघर्षातच असतात. सगळेच साचे समस्या निर्माण करणारेच असतात. यात खरा मूलभूत प्रश्न असतो तो हा की माणूस अशा साच्याशिवाय जगू शकतो का ? आणि तसा तो नसेल जगू शकत – तसा निष्कर्ष स्वीकारायचा, असे ठरले तर – माणसाला असे समस्याप्रधान जगायचा एक अभिशापच असतो, असे म्हणावे का ? आणि तसे असेल तर ‘ अभिशाप ‘ ही कल्पना प्रतिगामी की पुरोगामी ?
--- ००० ---

पुरोगामी आणि मी

‘ पुरोगामी म्हणजे काय रे भाऊ ? ‘ या माझ्या पोस्टवर झालेल्या चर्चेनंतर असे दिसू लागले की मी प्रतिगाम्यांना पाठिंबा देऊ इच्छितो असे काहींना वाटतेय. धर्मवाद वा पुनरुज्जीवनवाद चांगला का, तर नाही, विषमता जायला हवी की नको तर होय, जायला हवी , माणसांनी संघर्षात जगणे चांगले की सौहार्दात, तर सौहार्दात – असेच मलाही वाटते, हे मी सांगू इच्छितो. फरक कुठे होतो तर धार्मिक कट्टरतेतकीच वैचारिक कट्टरताही भेद माजवणारी आणि हिंसकच असते हेही मला स्पष्ट दिसणे. त्यामुळे, पुरोगाम्यांमधले आंतरविरोध, दंभ आणि मानवी जगण्याला घातक असणाऱ्या बाबींबद्दलही लिहिले जाते. धर्मवाद ही जशी एक अंधश्रद्धा म्हणता येते तशीच वैचारिक कट्टरता हीही एक अंधश्रद्धाच असते, असे एखाद्याला दिसत असले तर त्याने ते का म्हणू नये ? पुरोगाम्यांना वाटते की सद्यस्थितीत हे काही बोलू नये, करेक्ट राजकीय

भूमिकाच सर्वांनी घेत राहावे. ' सद्यस्थिती ' या प्रकाराला कधीच अंत नसतो. आणि मुख्य म्हणजे, मानवी जगणे चांगले व्हावे, याच मार्गाने सर्वांना जावेसे वाटत असले तरी आत्मकेंद्रितपणाचा सर्वांचा पाया एकच पण वेगवेगळा असल्यामुळे तसे घडू शकत नाही. आहेत किती पुरोगामी ? त्यांना एवढे महत्त्व कशाला द्यावे, हा जसा एक प्रश्न असतो तसाच काहीजण हाही प्रश्न विचारतात की आहेत किती ब्राह्मण, त्यांना एवढे महत्त्व कशाला द्यावे ? पुरोगाम्यांचा मोठा प्रॉब्लेम हा दिसतो की फक्त आपणच तेवढे डोळस आहोत आणि बाकीचे सगळे अंधळे वा गंडलेले आहेत अशी त्यांची पक्की खात्री असते. तेही इतरांप्रमाणेच खोटेपणा करतात, दुटप्पी वागतात यावर कुणी बोलणे म्हणजे जणू त्यांच्या सात्त्विकतेवर अन्याय झाला, असे त्यांना वाटते.

प्रत्येक माणूस जगताना काही आकलन घेत जात असतो. सर्वांचेच आकलन आपापल्या मर्यादेत होत असल्याने त्यात ' सत्य ' असे काही असू शकत नाही. ही जगण्यातली एक प्रमुख समस्या असते. ती भेदणे शक्य आहे का, असाही एखादा महत्त्वाचा प्रश्न एखाद्याला पडू शकतो. आहेत किती असा प्रश्न पडणारे माझ्यासारखे लोक, कशाला त्यांच्याकडूनही तुमच्या राजकीय उद्दिष्टांची अपेक्षा करता, असे मी म्हणू शकतो. पण, पुरोगाम्यांना दिसते त्याबाहेरचे कुणाला काही दिसू-जाणवूही नये, असे त्यांचे ' न्याय्य ' म्हणणे असते.

आता माझे आकलन सांगतो. मला असे दिसते की धर्म, तत्त्वज्ञान आणि विचारसरण्या हे सर्वच माणसाला चांगले जगणे प्रदान करण्याच्या बाबतीत अपयशी ठरलेले आहे. विचारसरणीही भेदाभेद, फुटीरता आणि संघर्ष यांचेच संवर्धन आणि जोपासना करत असते. याचे महत्त्वाचे कारण एकच असते की विचारसरणी ही माणसाच्या आत्मकेंद्रिततेला कोणताच प्रश्न विचारत नाही. तुझ्या आत्मकेंद्रिततेपेक्षा माझी आत्मकेंद्रितता अधिक हितावह आहे, असेच, प्रत्येक विचारसरणीचे म्हणणे असते. हे दुष्टचक्र भेदले जाण्याची शक्यता मला फक्त कलेत दिसते. कोणतीही चांगली, सर्जक कला माणसाच्या अमुक एका आत्मकेंद्रिततेला बढावा देत नसून त्याचे भान व्यापक, समावेशक करून त्याला संवेदनशील करणारी असते. इथे हे स्पष्ट करावे लागेल की हे काम परिवर्तनवादी कला करू शकत नाही कारण ती विचारसरणीभारितच असते. हे काम करणारी कला हीच सर्जक कला असते. हे काम कला अनेक मार्गांनी, अनेक प्रकारे करत असते. इतक्या महत्त्वाच्या, मौल्यवान प्रक्रियांना अडथळे आणणे, त्यांना खोडे घालणे, त्यांची वाढच होऊ नये अशा कृती करणे ही अशी विध्वंसक कामे हे पुरोगामी म्हटले जाणारेच सर्वाधिक कट्टरपणाने करत असतात. त्यांना फक्त ' करेक्ट राजकीय भूमिका ' एवढेच दिसत असल्याने कलेच्या या कार्याचे त्यांना महत्त्व तर नसतेच पण ते काही घडताच कामा नये, असेही त्यांचे प्रयत्न असतात. सांस्कृतिक क्षेत्रातल्या अनेक मोक्याच्या जागा पकडून ते हे त्यांचे जीवनकार्य करत असतात. त्यांच्या विचारांना बढावा मिळणे ही एकच गोष्ट कलेतूनही घडत राहायला हवी, असे त्यांना वाटते. म्हणजे कला ही जी एकमेव गोष्ट माणसामाणसात सौहार्द निर्माण करू शकेल असे मला दिसते त्याच गोष्टीच्या विरोधात हे पुरोगामी असतात. म्हणजेच, मला जे मौल्यवान वाटते त्याचा पाठपुरावा मी करताच कामा नये, असे त्यांचे म्हणणे असते. सगळ्यांबरोबरच सहिष्णुतेच्या गप्पा तेही मारत असतातच !

तर, असा आहे प्रश्न. मी, ज्याला प्रतिगामी म्हणतात तोही नाही आणि कलेतल्या सर्व मौल्यवान प्रक्रिया नष्ट करू इच्छिणारा पुरोगामीही नाही. आपण सगळेच एवढे सहिष्णू आहोत तर मी काय लिहिले पाहिजे याच्या कर्मठ अपेक्षा बाळगणे आणि मला सल्ले देणे, मलाच काय, कोणत्याही कलावंताला सल्ले देणे, असली कामे कुणीच करू नयेत, असे या निमित्ताने सुचवावेसे वाटते.

--- ००० ---

धर्म, परंपरा आणि पुनरुज्जीवनवाद हे बरोबर आहे असे मी कधीच म्हणत नाही -- विचारसरणीची कोणतीही कट्टरता ही धार्मिक कट्टरतेसारखीच वाईट आणि हिंसक असते, हे मात्र म्हणतो. हा गंडलेला आणि तो न गंडलेला असे काही नाही. वैचारिक निराकरणेच नाहीत हिंसकपणावर -- ही मांडणी गंडलेली कशी ते स्पष्ट करा.

जरा अधिक स्पष्ट करतो -- मला असे दिसते की मानवी समस्यांच्या बाबतीत धर्म, तत्त्वज्ञान आणि विचारसरण्या हे सर्व अपयशी ठरलेले आहेत . आता शक्यता फक्त कलेत आहे. कलेतूनच संवेदनशीलता आणि व्यापक, समावेशक भान हे शक्य आहे. परिवर्तनवादी कला नव्हे -- ती विचारसरणीतच येते. तर या कलेच्या सर्जक प्रक्रियांत अडथळे आणणारे, खोडे घालणारे, त्यांची हेटाळणी करणारे हे प्रामुख्याने पुरोगामी म्हटले जातात ते आहेत. त्यामुळे साहजिकच त्यांच्या मठ्ठपणाबाबत अधिक बोलले जाणारच. पुरोगामी हा विचारसरणीचाच भाग आहे. माझे बोलणे, लिहिणे हे माझ्या आकलन-प्रक्रियेतूनच येणार. त्याला कुणी गंडलेले म्हटले तरी हरकत नाही. यात वाद घालून कुणी कुणाला काही पटवून देण्याचा प्रश्न नाही. कुणी म्हणेल, वा, करेक्ट आहे, कुणी म्हणेल, हे सगळे मठ्ठ फालतू आहे ! दोनो चलेगा !

खरे तर या प्रश्नांची उत्तरे वरील पोस्टमध्ये आहेतच -- माणसाच्या जगण्याच्या बाबतीत वेगवेगळया आकलनातून, तरीही चांगल्याच हेतूने, कृती चालू असतात. वैचारिक करेक्ट असणे हेच फक्त काहींना दिसते आणि तेच, तेवढेच महत्त्वाचे असे त्यांना वाटते. कला ही वैचारिक मर्यादेत चालणारी बाब नाही. वैचारिक मार्गाने माणसामाणसात सौहार्द कधीच तयार होणे शक्य नाही. कलेचा मार्ग ही एकच शक्यता समोर दिसते. तो अत्यंत मौल्यवान मार्ग नष्ट करण्याच्या कृती कोण करते ? सिलेक्टिव्ह टीकेचा प्रश्नच नाही -- कलेला स्वतंत्रपणे, मोकळेपणाने काम करता यायला हवे -- राजकीय कृतीपेक्षा हजार पटींनी हे महत्त्वाचे आहे. तरीही, राजकीय कृतीच फक्त महत्त्वाची असे ज्यांना वाटते ते तसे करत राहातातच ना. कलेत सामाजिक, राजकीय, वैचारिक असे वेगळे काही काढता येत नाही -- तो व्यापक, समावेशक आवाका असतो. राजकारणात हे वेगळे काढले जाते. त्यामुळे, कोणताही राजकीय पवित्रा हा करेक्ट वगैरे असू नाही शकत -- तो सर्जक मानवी जगण्याच्या विरोधातच असतो.

सगळे सविस्तर सांगून झालेले आहे, तरीही हेच मनात येत असेल तर तो माझा दोष नाही. धर्म, तत्त्वज्ञान आणि विचारसरण्या अपयशी ठरलेल्या आहेत. फक्त कलेतूनच काही भले होण्याची शक्यता आहे. कोणतीही वैचारिकता ही भेद माजवणारी आणि हिंसकच असते. कला व्यापक आणि समावेशक भान देणारी असते. ( यात परिवर्तनवादी कला येत नाही कारण ती विचारसरणीचाच भाग असते. ) राजकारणापेक्षा कला हजार पटींनी महत्त्वाची आहे. तीच नष्ट करण्याचे ज्यांचे प्रयत्न चालू आहेत त्यांच्यावर रोख असणारच ना ! आणि आहेत किती माझ्यासारखे लोक -- असू द्या ना ! पुरोगामी हे इकडेतिकडे पुरोगामी वगैरे असतात पण, साहित्य, कला यांत तद्दन प्रतिगामी असतात. आधुनिक सर्जकतेच्या प्रक्रिया, अभिव्यक्ति पद्धती यांत त्यांना शून्य इंटरेस्ट असते, त्यामुळे, समजतही नाही काही. आपल्याला ज्याचे महत्त्व वाटत नाही वा जे समजत नाही ते नष्ट करा असे त्यांचे विचार दिसतात. त्यांच्या दृष्टीने, ही राजकीय भूमिका की ती यांतून निवड करायची असते -- माझ्या आकलनात, राजकीय भूमिका की साहित्य-कला यांतून निवड करायची असते. सगळ्या राजकीय भूमिका माणसाच्या जगण्यातल्या सर्जकतेच्या विरोधातच असतात. या उपर माझ्या पोटात आरेसेस आहे असे कुणाला वाटले तर त्याची मी चिंता करू शकत नाही.

मी माझ्या क्लॅरिटीने लिहितो -- कोणतीही राजकीय भूमिका मांडत नाही -- पण, पुरोगामी म्हटल्या जाणाऱ्या लोकांच्या , माझ्या मते इथल्या समाजाच्या दृष्टीने अति-महत्त्वाच्या अशा बाबतीतल्या, विध्वंसकतेबद्दल लिहिल्याने ते कुणाच्या हातचे कोलीत ठरत असेल तर त्याला मी काय करणार ? -- ते असो. तुम्ही वर उल्लेख केलेली ' फट ' कथा पीडीएफ असेल तर प्लीज द्या ना पाठवून.

--- 000 ---

कविता म्हणजे काय रे भाऊ ?

आजच सकाळी मी ‘ कलेचे दिवस ‘ ही माझी कविता इथे फेसबुकवर पोस्ट केली. त्यावर, कोल्हापूरपासूनचे माझे मित्रवर्य प्रा. बाळकृष्ण कवठेकर यांची अशी कॉमेंट आली – “ चं प्र, क्षमस्व. ही कविता नाही, छोटा निबंध वाटतो, कोणालाही कमी जास्त करता येईल असा. “ त्याला माझे उत्तर असे होते – “ माझा काहीही दावा नाही -- दिसले ते लिहिलेय – “

नंतर माझ्या असे लक्षात आले की हा विषय फ्रेंडसमध्ये चर्चा व्हावी असा आहे. जगात कवितेच्या शेकडो व्याख्या होत आलेल्या आहेत आणि आता अगदी न-कविता किंवा स्वयंचलित कविताही लिहिल्या जातात, हे आपल्याला माहीत असले तरीही, आपण आपापल्या आकलनानुसार यावर बोलावे, असे वाटले. या निमित्ताने कवितेबाबतच्या आपापल्या कल्पना घासूनपुसून स्पष्टपणे मांडल्या जातील आणि गरज वाटल्यास आपल्याला सर्वांनाच आपापल्या कल्पना बदलून, वाढवून, दुरुस्त करून वा अधिक समावेशक वा कवितेचा नेमका प्रदेश रेखून देणाऱ्या अशा करता येतील, असे वाटले. एखादे औषध वा लस तयार करताना जसे काही लोक स्वेच्छेने त्याच्या जरूरीच्या चाचणीसाठी पुढे येतात, त्याचप्रमाणे, या कामाला आपली ही कविता वा मजकूर उदाहरण म्हणून देऊ करता येईल, हे माझ्या लक्षात आले. तरी, फ्रेंडसना माझी अशी विनंती आहे की निर्भीडपणे त्यांनी हा मजकूर कविता आहे की नाही यावर लिहावे. या मजकूराची कशीही चिरफाड वा चिकित्सा करावी. वाटल्यास आशयावरही हल्ला वा त्याचे कविता म्हणून समर्थन करावे. मुख्यतः हा एक निबंधात्मक गद्य मजकूर आहे का, यावर सकारण मते द्यावीत. यातून, अमुक बरोबर वा तमुक चूक असा निष्कर्ष काढणे हा हेतू नाही. या निमित्ताने या एका महत्त्वाच्या विषयावर आकलन-घुसळण व्हावी, हीच एक मर्यादित अपेक्षा आहे. हे उद्बोधक ठरू शकेल. ही इथली चर्चा जर चांगली झाली तर आपले कुणी संपादक मित्र पुढे ती प्रसिद्धही करू शकतील. या चर्चेत, अर्थातच, कवठेकर सरांनी त्यांचे मत जरा सविस्तर मांडावे, अशी विनंती आहेच. इथे निकाल देणारे कुणी न्यायाधीश नसतील, हे लक्षात घेऊन फ्रेंडसनी खुलेपणाने बोलावे, ही विनंती.

संदर्भासाठी, सकाळी मी कविता म्हणून दिलेला मजकूर असा आहे –

कलेचे दिवस

मुंग्या लागून मेले की वाळवी लागून
असा श्रेयाचा सामना रंगणार हे दिसताच
अनेक चित्रकार हजर झाले
आधी सत्य पाहून मग ते अमूर्त करायला --
नुसते अमूर्तही आपल्याला माहीत असलेल्या
झुंबरांच्या आणि कोळिष्टकांच्या आपल्या
मनांतूनच येते हे त्यांना माहीत होते
पण हाती असलेल्या कौशल्यातून

त्यांना मसिहा म्हणून गाजायचेच होते
आणि जगाच्या संस्कृतीचा व्हायचे होते
एक अविभाज्य पाणीपुरवठा डबल फिल्टर्ड
वाचनसंस्कृतीचे उपटसुंभ भक्त गौरव माजवत
आपल्या प्रगल्भ डबक्यांचा प्रसंगी
हजार सर्प पोसून धाक निर्माण करणाऱ्या
होते हजर त्यांचेही आत्मसंवर्धन साधायला
रात्रीच्या अपॉइंटमेंटसपूर्वी प्रेयसींशी ठरलेल्या
ज्या त्यांच्या प्रगल्भतेच्या जाहिरातींत
हमखास असत अर्धनग्न आकर्षक हुशार मॉडेल्स
हल्ली लोक वाचत नाहीत दृश्यकला तर
फक्त लिलावांतच दिसतात काळ्या
पैशांच्या उत्तुंग आणि सखोल व्यवहारांत
संपले दिवस एकूणच कलेचे
हे समजून काहीजण शांतपणे पाहात वेफर्स खात होते
--- ००० ---

-- हा मजकूर आधाराला घेऊन चर्चा होत असल्याने नुसत्याच औपपत्तिक कल्पना न येता त्यांचे स्पष्टीकरणही येईल, अशी आशा आहे.

सोयीसाठी ही माझी कवितेची व्याख्या --

' शब्द आणि वाक्ये वा ओळी यांच्या साहचर्यातून, क्रमवारीतून व आंतरसंबंधांतून व्यक्त होणारी संसूचक अर्थवलये एका परिपूर्ण आशयाप्रत पोचवणारा एकसंध भाषिक मजकूर म्हणजे कविता. ' इथे अलंकारिकता, वृत्तबद्धता, सांगीतिक लय, भावनिकता, स्वप्नीलपणा – अशा गोष्टींना महत्त्व दिलेले नाही, हे लक्षात घ्यावे. अलिकडची आणि आजची जागतिक कविता या अशा गोष्टींना कवितेची व्यवच्छेदक लक्षणे मानत नाही.

--- ००० ---

## अध्यात्म म्हणजे काय रे भाऊ ?

' अध्यात्म ' या शब्दाला हिडिसफिडीस करायची हल्ली एक फॅशनच पडलीय.  कुणी म्हणते, अध्यात्म म्हणजे आत्म्याचे ज्ञान, कुणी म्हणते आत्म म्हणजे स्वत: या अर्थी आत्मज्ञान, कुणी म्हणते की धर्माचे ज्ञान, कुणी म्हणते की जगाच्या मूळ सर्वव्यापी चैतन्याचे ज्ञान.  कुणी म्हणतो की ते धर्म, आत्माबित्मा सोडूनच द्या, ते सगळे काल्पनिक असते, नाही ते भ्रम नकोत. आणि आत्मज्ञान कसले ? आपण जे आहोत ते आहोत – ते दिसतेच, समजतेच आपल्याला – याहून अधिक आत्मज्ञान म्हणजे, शरीरात हाडे किती आहेत, रक्त किती आहे, ते समजा – ते कळतेच शरीरशास्त्रातून ! आणखी काय, कसले ज्ञान ? यावर थोडा विचार करू. माणूस एका भूभागावर जन्माला येतो, पुढे त्याच्यावर बिंबवले जाते की हा भूभाग

म्हणजे भारत आहे. तू भारताचा नागरीक आहेस. त्याच पद्धतीने तो हिंदू वा मुसलमान असल्याचेही त्याच्यावर बिंबवले जाते. अशा गोष्टींमुळे अर्थातच माणसामाणसांत अंतर तयार होते, एक दूरी तयार होते, विभाजन तयार होते. हे फक्त एवढ्याचमुळे नाही घडत. त्याचे दिसणे आणि वैचारिक-मानसिक असणे हे सर्वच विभागणारे असते. त्यामुळे, सर्वांचेच जगणे संघर्षमय, युद्धमय, एकमेकांची छळणूक करणारे, एकमेकांवर अन्याय करणारे, असे होते. आपण ' जे आहोत ते आहोत ' म्हणजे हे असते सगळे. धर्म, भाषा, संस्कार, परिस्थिती, जगण्यात आलेली माणसे, घडलेले प्रसंग – हे सगळे मिळून असतो आपण. आणि आपली जनुकरचना, हे आणखी एक अलीकडे माहीत झालेले. हे सगळे विभाजन करणारेच असते. मग माणूस, ' मजहब नही सिखाता आपसमे बैर रखना ,' वगैरे गाणी रचू-म्हणू लागतो. एखादा बुद्धिप्रामाण्यवादी, विवेकी माणूस म्हणतो, ' माणसा माणसा माणूस हो ! 'आणि आपण किती सर्वांच्या हिताचे बोलतो-वागतो, असे त्याला वाटत राहते. तरीही, ' आपण जे आहोत ते आहोत ' म्हणजे हजार प्रकारचे विभाजन, हे त्याला समजून घ्यावेच लागते ! अरे, तू म्हणतोस की माणूस होणे महत्त्वाचे, पण, तो म्हणतो, हिंदू होण्याशिवाय तरणोपायच नाही, आणखी कुणी म्हणतो, कम्युनिझम हेच एकमेव उत्तर ! एका मानसिक अवस्थेत सगळी माणसे येणे हे कधीच शक्य नसते. त्यामुळे, शिरकाण, वर्चस्व, अन्याय हे सर्व अटळच बनते. कसले आत्मज्ञान – जो है सो है – असे म्हणणाऱ्याला हे सर्व मान्यच असते. धर्मवादी आणि विचारसरणीवाले यांनाही हे मान्यच असते. मग काय, आयुष्यभर बोंबलत हिंडत राहणे, हेच जगणे ? सगळ्यांचा, इतरांना बदलण्यावर, इतरांच्यात परिवर्तन करण्यावर किंवा सर्वांच्या हितासाठी विरोधकांना सक्ती करण्यावर विश्वास असतो. तसे त्यांचे प्रयत्नही असतात. अशा उदात्त ध्येयासाठी ते पूर्ण आयुष्य खर्चायलाही तयार असतात. सगळ्यांना ' सत्य ' पटले की इथे स्वर्ग अवतरेल, असे त्यांना वाटते. तशी त्यांची खात्रीच असते. ते सोडून इतर लोक मूर्ख असणे एवढाच खरे तर प्रॉब्लेम असतो ! व्यक्तिव्यक्तीतल्या संबंधातही, एखादी व्यक्ती आवडली की तिच्यावर स्वामित्व असायची गरज वाटणे, त्यातून भीती, मत्सर, द्वेष, हिंसा यांची निर्मिती होणे हे या सर्वच आदर्श, महान, उदात्त लोकांमध्ये सारखेच आणि समानच घडत असते. माणूस मोदीभक्त असो की मोदीद्वेष्टा हे सगळे दोघांचेही एकसारखेच असते.

अगदी फारच इहवादी आणि बुद्धिवादी असतील त्यांना फार तर याबद्दल प्रश्न पडत नाहीत असे समजू. जे आहे ते माणसाचे हे गटारी जगणे आहे आणि ते तसेच असणार, हे मान्य करण्याची हिंमत त्यांच्यामध्ये असते कारण त्यांनी स्वत:ला तसे शूरवीर घडवलेलेच असते. पण, खूप लोक असे नसतात. त्यांना प्रश्न पडतात. हे कसले जगणे, असे त्यांना वाटते. यातून सुटण्याची शक्यता असेल का, असे विचार येतात. त्यातूनच मग, बुद्ध, तुकाराम, जे. कृष्णमूर्ती घडतात. तेही या जगाबाहेरून कुठून आलेले नसतात. आणि या जगाबाहेरचे, काल्पनिक, भ्रमाचेही बोलत नसतात. माणसाचे जगणे असे का होते आणि त्यातून तो बाहेर कसा पडू शकतो, हे ते सांगतात. ते नुसतेच काही बौद्धिक वा मेंदूला वळण लावणारे वगैरे काही नसते. त्या अर्थाने आपल्या जगण्यातल्या सवयीतले नसते. त्याला आपण अध्यात्म म्हणू शकतो. स्वत:च्याच वैचारिक-भावनिक- मानसिक तुरुंगातून बाहेर पडण्याच्या शक्यतेबद्दल ते बोलत असतात – तेच अध्यात्म. हेच काम सर्जक कलाही करत असते. अनेक महत्त्वाचे कलावंत म्हणून गेलेले आहेत की कला ही आत्मकेंद्रित कृती नसते. ती व्यापक, समावेशक भानाची प्रक्रिया असते. वैचारिक, परिवर्तनवादी वा हेतूप्रेरित कला, अर्थातच, हे काम नाही करू शकत. कारण ती कलावंताच्या तुरुंगातूनच घडणारी कृती असते. तीत स्वातंत्र्य नसते. माणसाला अशा व्यापक भानाची समज येणे हीच फक्त त्याच्या जगण्यातली मूल्यात्मकता असू शकते. तेच त्याचे स्वातंत्र्य असते.

स्वातंत्र्ययुक्त कला अध्यात्मिक असते आणि तीही परलोकवादी नसून इहवादीच असते, हे समजून घ्यायला हवे.

--- ००० ---

दिलीप पुरुषोत्तम चित्रे

चाहते त्यांना प्रेमाने दादा म्हणत. होतेच ते, त्यांच्या कामाने आपोआप झालेले दादा. नेमाड्यांप्रमाणे साहित्यिक शेरेबाजीची गुंडगिरी करून त्यांनी दादापद मिळवलेले नव्हते. खरे तर ' टीकास्वयंवर ' वाल्या नेमाड्यांऐवजी ' साहित्य आणि अस्तित्वभान – १ ' वाल्या चित्र्यांना मिळायला हवे होते ज्ञानपीठ. पण इथल्या बाजारबुणग्या विचारवंतांनी चित्र्यांची शिफारससुद्धा केली नसेल. ( टीकास्वयंवर वाचून कलेच्या मूल्यात्मकतेचे भान फारसे वाढणार नाही – ती ताकद अस्तित्वभान मध्ये आहे. नेमाडपंथियांनी हीही शेरेबाजी थोडी पचवून घ्यायला हवी. ) मुळात त्यांनी ते वाचलेच नसेल आणि वाचले असले तर अजीर्ण होऊन आजारी पडले असतील. विद्वत्ता आणि मर्मदृष्टी यांचा इतका प्रचंड आविष्कार असलेले पुस्तक मराठीत दुसरे कोणते आहे, ते मला तरी माहीत नाही. चित्र्यांच्या दर्जेदार सखोल कामांची यादी नेटवर आहे. मी नम्रपणे म्हणेन की आम्हा मराठीवासीयांची कुवत पाहता हा आमच्यासाठी एक चमत्कारच होता !
" तुकारामासारख्या विद्येश्वरानं आत्मभान आणि शब्दभान एकवटून स्वभावसमाधीचा प्रत्यय नोंदवून ठेवला. मानसिक क्षोभाच्या अवस्थेतून थेट तुर्यावस्थेपर्यंत पोचणारी तुकारामाची कविता ही खंडित आत्मभानाला अखंड बनवण्याच्या मराठी काव्यकलेचं उत्तुंग उदाहरण आहे. " असे वाक्य चित्रे सहज लिहून जातात. त्यांचा ' कवी काय काम करतो ' हा लेख मराठीत अजरामर ठरावा असा आहे. त्या लेखातला शेवटचा उतारा असा आहे – " समकालीन मानवी संस्कृतीच्या सार्वभौम संदर्भात भारतीय आणि मराठी वाङ्मयीन परंपरा पाहण्याचा आपल्याला प्रयत्न करावा लागेल. असा प्रयत्न करताना मराठीतही कवीची सांस्कृतिक भूमिका का आणि कशी बदलत गेली आणि तिचा एकूण मूल्यव्यवस्थेशी काय संबंध आहे, याचाही आपल्याला स्वतंत्रपणे शोध घ्यावा लागेल. जगातल्या वेगवेगळया समकालीन संस्कृतींमधल्या कवितेच्या आणि कवींच्या स्थानाची तुलना करून तिचा सार्वभौम मानवी श्रेयाच्या परिप्रेक्ष्यात आढावा घ्यावा लागेल. असं करताना कवी काय काम करतो याचा माणसाचं ह्या अस्तित्वसृष्टीत काम काय ह्या मूळ प्रश्नाशी असलेला संबंध उलगडला जाईल. असं जोवर होत नाही तोवर आपापलं कामसुद्धा आपल्याला कळणार नाही. बिचारा कवी तर दूरच राहिला. " याच लेखात एका ठिकाणी ते लिहितात, " अस्तित्वानुभवाची अनेक पदरी पीडा, आनंद, अचूक इंद्रियसंवेदना, उत्कट भावानुभव, तीव्र आणि सखोल अर्थप्रतीती, सार्वत्रिक मानवी समस्यांचे चिंतन या महत्त्वाच्या बाबी मराठी कवितेत विरळा होत गेल्या. हा काही इंग्रजीचा प्रभाव नाही तर धेडगुजरीपणा पराकोटीला जाऊन भाषिक आणि सांस्कृतिक आत्मभान क्षीण झाल्याचं हे लक्षण. "
हे सर्व समजून घेण्यात कोण इंटरेस्ट घेणार ? मानवी जगणे म्हणजे राजकारण अशा थिल्लर कल्पनांनी स्वत:ची करियर बांधत बसणारे इथले भूमिकावाले लेखक-समीक्षक या अशा कामाकडे लक्ष देणे तरी शक्य आहे का ? मानवी जगणे चालते ते राजकीय डावपेच आणि हलकटपणा यांवर नाही तर सौहार्द आणि प्रेम या मानवी मूल्यांवर, हे इथल्या असंख्य साहित्यप्रेमींच्या डोक्यात शिरण्याची शक्यताच दिसत नाही. असा हा ' आपल्या माती ' च्या दिशेने वेगाने जाणारा समाज लौकरात लौकर दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांना नामशेष करील. या असल्या फडतूस भूमिकेत इंटरेस्ट नसलेल्यांनी तरी चित्र्यांचे ऋण मनापासून मान्य करायला हवे. त्यांची मर्मदृष्टी समजून घ्यायला हवी.
--- ००० ---

वाचन

नोकरीत असताना कधी कधी अगदी सुट्टीच्या दिवशीही ऑफिसात जावे लागे -- तरीही बऱ्यापैकी लेखन-वाचन होत राही. झोपेचे तास कमी करूनही जमत असे. आता तसे नाही जमत. आणि मुख्य म्हणजे आता तशी निकडही नाही वाटत. त्यामुळे मी न वाचलेल्या पुस्तकांची यादी रोज ढिगाने वाढत जाते ! माझे काही मित्र मात्र नेटाने वाचत असतात. ते कधी मला सांगतात की अमुक पुस्तक फालतू आहे, त्यावर तुमचा वेळ नका घालवू. बऱ्याचदा मला ते पुस्तक माहीतही नसते ! तरीही मी एक करतो -- न वाचण्याच्या माझ्या पुस्तकांच्या यादीत, मित्रांनी सांगितलेल्या अशा पुस्तकांना अग्रक्रम देतो ! कधी असेही होते की अमुक पुस्तक फार चांगले आहे असे मला कळते. मी ' अरे वा ! ' म्हणून शांत राहतो. ( तसे तर एकूणातच मी फार वाचलेला माणूस आहे, असे नाही, पण  कधी कधी मी तसा आभास निर्माण करू शकलो असेन, असे मला वाटते. )

मला माझे काही लिहायला जे शक्य वाटते तिकडे लक्ष देणे यालाच आता मी जास्त वाव देतो. तेही फारसे कुणी वाचणार नाही आणि एकूणच मराठीत ते रद्दडच ठरणार आहे, हे मला माहीत असूनही. पण, हा आता माझ्या जगण्याचा भाग आहे. माझी कुणाबद्दल तक्रार नाही तसेच मी वाचत नाही म्हणून इतरांनीही मला मग्रूर वा अहंकारी समजू नये, एवढीच माझी अपेक्षा असते.

लेखकाला मिळणारी प्रसिद्धी वा बक्षिसे ही काही लेखनाची प्रमुख कार्ये म्हणता येणार नाहीत. मग काय ? हा प्रश्न अनेकांच्या चिंतनात असायला हवा, खरे तर. पण असतो का ? -- सारांश, माझे जे काही चाललेय ते कसे बरोबर आणि योग्य आहे, ते सांगितले. जो लेखक इतर लेखकांचे फारसे वाचत नाही त्याचे इतर लेखकांनीच काय, कुणीही का वाचावे ? -- हा प्रश्नही नम्रपणे मी स्वीकारतोच.

थोडक्यात, ' धीरे धीरे चल, चांद गगन में ' असे चालू देतोय, बास !

--- ००० --- १३-०३-२१.

## पारितोषिक

साहित्य अकादमीसाठी शिफारस करणारे मराठीतले विचारवंत कोण असतात, ते कोण, कसे निवडते, हे मला माहीत नाही. पण माहिती करून घ्यावेसे वाटतेय. कारण न जाणो काही चमत्कार घडला आणि मलाच एखादे पारितोषिक मिळण्याची वेळ आली तर ही रचना काय असते ते माहीत तरी करून घेऊ, असे मला वाटते. नंदा खरे यांनी साहित्य अकादमी पुरस्कार नाकारल्याची घटना सध्या चर्चेत आहे, त्यामुळे जरा उत्सुकता जागी झाली.

एकदोन ठिकाणी असे वाचनात आले की ते पारितोषिक जाहीर करण्यापूर्वी त्या सन्मान मूर्तीला याबद्दल कळवून त्या मूर्तीची स्वीकृती-संमती घेतली जाते. मुळात हे खरे आहे का ? की परस्पर आधी जाहीर होतात पारितोषिके आणि नंतर स्वीकृती वा अस्वीकृती कळवता येते ? तसे असेल तर फारच छान आहे. त्यामुळे, लेखकाचे दोन फायदे होऊ शकतात. एक म्हणजे तो त्या पारितोषिकायोग्य असल्याचे प्रसिद्ध होणे आणि शिवाय त्याच्या एखाद्या तत्त्वाला धरून त्याने ते नाकारल्यास त्या तत्त्वाची आणि त्या संबंधित लेखकाच्या तत्त्वशीलपणाचीही प्रसिद्धी होणे. मला वाटते की लेखकाला हे दोन्ही फायदे मिळायला हवेत. सांस्कृतिक घटना अशा खुल्या राहिल्या तर मराठी समाजाचे प्रबोधनही होत राहील, हा एक सामाजिक फायदा होईल तो वेगळाच.

कुणी म्हणते की स्वीकृतीबाबत सन्मानमूर्तीला फोनवर विचारतात. हे अन्याय्य तर आहेच पण यात पारितोषिक देणाऱ्या संस्थेचा भित्रेपणा आणि पळपुटेपणाही आहे. जे जे घडते ते ते लोकांना कळायला हवे. पडद्यामागे सेटिंग करणे काही पटत नाही. म्हणजे, आधीच लेखकाने अस्वीकृती सांगितली तर ते पारितोषिक त्याला जाहीरच होणार नाही ! मग, त्या

पारितोषिकायोग्य असण्याचे आणि ते नाकारण्याचे, अशा दोन्ही पुण्यांपासून लेखक वंचित राहील. असे होऊ नये. आधी विचारा हवे तर, पण ते लेखी पत्र पाठवून विचारा. म्हणजे लेखक त्या दोन्ही पुण्यांना पात्र होता याची नोंद राहील. शिफारस समितीत कोण कोण आहे तेही जाहीर व्हायला हवे. त्याबद्दलही मतभेद असू शकतात. त्याचीही खुली चर्चा व्हावी. हे संस्कृतीचे क्षेत्र आहे, न्यायालय नव्हे. सातत्याने ठराविक विचारसरणीचेच लोक या शिफारस समितीत नेमले जात असतील तर अनेक लेखकांवर अन्याय होऊ शकतो. आपण जर अभिव्यक्तिस्वातंत्र्याचे भोक्ते आहोत तर गुप्तपणा कशाला ? काही लेखकांना, योग्यता असूनही, पारितोषिक का नाही मिळू शकत, याचाही अंदाज लोकांना यायला हवा. माझा या समस्येशी संबंध येण्याची शक्यता फारच कमी आहे कारण माझी फारशी पुस्तके नाहीच आहेत. जे काय आहे ते माझ्या संकेतस्थळावर मोफत आहे. पण, या पारितोषिक यंत्रणेत अशा माध्यमाला अजूनही मान्यताच नाही आहे. या विचारवंत महाराष्ट्राने, याही बाबतीत आपल्याला काळाबरोबर राहण्याचा काही डिजिटल पायंडा पाडता येईल का याचा विचार करायला हवा. मी नाही हो आशा लावून बसलेलो पण महाराष्ट्राने साभिमान आधुनिक होता येते का ते पाहावे यासाठी ही एक ( खोडसाळ ) सूचना !
शिफारस करणाऱ्या समितीला, विचारात कोणती पुस्तके, का घेतली आणि त्यांच्या गुणवत्तेचा कसा विचार केला याबाबत काही चिकित्सक लेखन करून ठेवायचे बंधन ठेवायला हवे. ही एकूण यंत्रणा कशी चालते ते लोकांना कळायला हवे. या समितीवर येणार का हेही संबंधित विचारवंताला लेखी विचारावे आणि त्याचे लेखी उत्तर घ्यावे. हे विचारवंत कसे निवडले जातात हेही कळू शकले तर ग्रेटच काम होईल !
--- ००० --- १४-०३-२१.

कविता आणि गद्य

आम्हाला हिंदी शिकवायला एक शिक्षक होते. त्यांची शिकवायची पद्धत फार भारी आणि सोपी होती. समजा, शिकवत असलेल्या धड्यात असे एक वाक्य आले, " मुझे लगा की अब मुझे कलकत्ता जाना पडेगा I " की ते शिकवत, लेखक कहता है की तब उसे लगा की उसे कलकत्ता जाना पडेगा I -- या पद्धतीने प्रत्येक वाक्याच्या आधी, लेखक कहता है, असे जोडत गेले की तो धडा शिकवून होई ! -- या पद्धतीने जर कविता ' कळत ' असेल तर ती कविताच नव्हे. काही वेळी एखादे वाक्यच असते पण ते वेगळेच काही सांगत असते. मजकुराच्या रचनेत आणि दिसण्यात कविता शोधू नये. एखाद्याला लयबाजीची इतकी सवय असते की तिच्याशिवाय तो कवितेची कल्पनाच नाही करू शकत. चॉसर समजा म्हणाला की तिचे कपाळ सुंदर होते तर त्याला ते नसतेच सांगायचे -- कपाळ उघडे टाकणे हे निषिद्ध असून तिने ते उघडे टाकलेय, हे असे त्यात. समोर दिसणारा मजकूर म्हणजे कविता नव्हे. त्या मजकुरातला क्रम, कशानंतर काय कसे येते, त्यांतले आंतरसंबंध -- असे सगळे विचारात घेतले तर त्या मजकुराच्या दृश्य रूपाच्या बाहेरच असते कविता. काही वेळी वाचकाने बंदिस्त राहिल्यामुळे ती कविता त्याच्या मनात पूर्ण पोचत नाही, मग त्याला फक्त दृश्य मजकूरच पोचतो. जर कविता ' मजकूरबाह्य ' अंगांनी खूप व्यक्त होत असेल तर तो मजकूर गाता येत नाही म्हणून वाचकाने रुसून बसू नये. कवितेच्या रचनेतल्या आणि दृश्य रूपातल्या ढोबळ सवयी आणि अपेक्षा एकूण जगानेच कधीच सोडून दिलेल्या आहेत. एकदा समोरचा मजकूर ' एकूण ' रूपात मजकूरबाह्य असेही खूप काही सांगत असेल तर ती कविताच असते. जगात खूप कविता सरळ उताऱ्यांतूनही लिहिल्या गेलेल्या आहेत. एकदा का त्या मजकुराचे असे ' कवितापण ' कळले की तेच ' गद्य निवेदन ' म्हणून सांगता येईल का, हा प्रयत्न करणे व्यर्थ आहे. आता गद्य की कविता अशी सीमारेषा आखत बसू नये. खुले राहणेच महत्त्वाचे आहे. यावरून हे लक्षात येईल की एकच कविता एकाला गद्य आणि दुसऱ्याला कविता असू शकते.

( १५-०३-२१. )

कविता

मी माझ्यापुरती आणि सध्याची कवितेची व्याख्या अशी करतो --
‘ शब्द आणि वाक्ये वा ओळी यांच्या साहचर्यातून, क्रमवारीतून व आंतरसंबंधांतून व्यक्त होणारी संसूचक अर्थवलये एका परिपूर्ण आशयाप्रत पोचवणारा एकसंध भाषिक मजकूर म्हणजे कविता. ‘ इथे अलंकारिकता, वृत्तबद्धता, सांगीतिक लय, भावनिकता, स्वप्नीलपणा – अशा गोष्टींना महत्त्व दिलेले नाही, हे लक्षात घ्यावे. अलिकडची आणि आजची जागतिक कविता या अशा गोष्टींना कवितेची व्यवच्छेदक लक्षणे मानत नाही.
कोणत्याही कलेत व्यक्तिगत आणि सामाजिक असे द्वंद्व अस्तित्वात नसते. ' सामाजिक ' चा वेगळा विचार ही एक निरर्थक बाब आहे.
फक्त कवितेतच आहे असे कवितेचे व्यवच्छेदक लक्षण असू शकत नाही. कवितेचे महत्त्वाचे लक्षण सतीश तांबे, राजन खान, लाखे वा काफ्का यांच्या कथात्म साहित्यातही असू शकते. शेवटी एखादा मजकूर तारतम्यानेच कविता ठरतो. एखादा मजकूर गद्य वाटतो पण एखाद्याच ओळीने त्याची परिमाणे बदलून ती कविता होते. कविता आणि गद्य हा भेदच खोटा आहे -- तो मजकूर कविता म्हणून अर्थवलये देतोय की नाही, एवढेच पाहता येईल. तरीही मतभेद संभवतीलच.
--- ००० ---

श्रीधर तिळवे यांची मला महत्त्वाची वाटणारी कविता --
काही घडत जाण्याच्या प्रक्रियेचा असा समग्र आवाका घेणाऱ्या कविता आहेत किती मराठीत ? पण हा बाजारबुणग्यांचा, गटातटांचा, मतामतांचा, क्षुद्र मनांचा प्रांत होऊन बसलेला आहे. ही अशी एकच कविताही सगळा क्षुद्रपणा जाळून टाकू शकते. पण भांडणे, वादावादी म्हणजेच जगणे असे पक्के ठरवलेले लोक ही कविता वाचतील तरी कशाला ? मला तरी ही मराठीतली एक अपवादात्मक भान देणारी महत्त्वाची कविता वाटते. कलेची प्रक्रिया ही जिवंत परिपक्वता निर्माण करणारी असते पण त्या प्रक्रियेचा आपल्याला स्पर्शही होता कामा नये अशा निर्धारी अवस्थेतला रक्तमश्गुल समाज त्या प्रक्रियेलाच ' आय हेट यू ' असे म्हणत राहतो. वाचा ती कविता --
"आय हेट यू" श्रीधर तिळवे नाईक
--- 000 ---

विश्लेषण
निवडणुकीतल्या यशापयशाच्या विश्लेषणासाठी महत्त्वाचे मुद्दे --
1. कितीही झाले तरी मार्केटिंगचे महत्त्व आहेच. आय टी  सेल आणि तंत्रज्ञांची टीम कुणाची जास्त कुशल होती.
2. कुणी कुणाची माणसे पळवली. भारतात एखादा पक्ष वाढेल तर तो असाच पळवापळवीनेच वाढेल. पक्षवाढीला बाहेरची कुठली माणसे आणणार.
3. गुंडगिरी ही आता एक सांस्कृतिक परांपराच मानायला हवी. बिनबोभाटपणे ही जमवायचे चातुर्य कुणी जास्त दाखवले.
4. जातिधर्मभेद हे व्यूह आखणीचे एक महत्त्वाचे क्षेत्र असणारच. ते कोण आपल्या बाजूला कितपत वळवून घेऊ शकले.
5. पैसा खूप लागणारच. कुठेतरी चार पत्रके वाटून कुणी निवडून येत नसते.

6. प्रादेशिक अस्मितांचे महत्त्व ओळखण्यात आणि त्या आपल्या बाजूने चेतवण्यात कोण यशस्वी झाले.
7. भावनिक आवाहन करण्याचे कौशल्य कुणी जास्त यशस्वीपणे वापरले.
8. पवारांच्या पावसाप्रमाणे ममतांच्या व्हीलचेअरचा प्रभाव कितपत पडला.
-- एवढे बास. हे सगळे चर्चांमधूनच सापडलेले मुद्दे आहेत. यांतले बहुतेक सर्वच मुद्दे सगळ्याच निकालांच्या वेळी उपयोगी पडतील. या सर्व बाबतीत सर्वांनी आपापले विचारस्वातंत्र्य तर वापरले पाहिजेच पण  शिवाय परमतांबद्दल सहिष्णूही राहिले पाहिजे. किंवा आपणच खरे सहिष्णू असे वातावरण तरी तयार करता आले पाहिजे. या सर्व गोष्टींबरोबरच, कुणाचे विचार काय होते, ते लोकांना कितपत व का पटले असावेत हेही चर्चेत घ्यावे. लोकशाहीसाठी ते अत्यावश्यक समजावे.
--- 000 --- ०३ मे २०२१.

अद्यावतीकरण

माझ्या संकेतस्थळाचे ( Website ) 01 मे 2021 पर्यंतचे अद्यावतीकरण ( Updating )  )झालेले आहे. त्यात, विशेष म्हणजे, ' रंगावाचा ' मध्ये आलेली एकांकिका
खुल्लम खुल्ला
आता जमा झालेली आहे. खालील दोन गोष्टी प्रसिद्ध होण्याच्या मार्गावर असल्याने सध्या यात घेतलेल्या नाहीत ---
1. ' सांस्कृतिक फट -- ' या सतीश तांबे यांच्या कथासंग्रहाचे आस्वादन  करणारा लेख.
2. ' तंबाखूची टपरी ' हा अनुसर्जित कवितांचा संग्रह.
बाकी सर्व लेखन समाविष्ट केलेले आहे.
संकेतस्थळ --
www.champralekhan.com

सत्योत्तर ( post truth )

हा कालखंडच तसा आहे म्हणतात. सत्योत्तर. सत्य की अफवा, खरे की खोटे यांचा फारसा संबंध नसलेला. संबंधच काय, गरजही नसलेला, असेही म्हणायला हरकत नाही. हे तत्त्व फक्त बोलणाऱ्यांबाबतचे नसून ऐकणाऱ्यांबाबतचेही आहे. रेटून बोलणे याप्रमाणेच रेटून ऐकणे हेही तितकेच प्रभावी ठरते आहे. बऱ्याच लोकांनी, कुणावर वा कोणत्या बाजूवर विश्वास ठेवायचा हे ठरवूनच टाकलेले आहे. माध्यमांतून येणाऱ्या प्रत्येक गोष्टीची शहानिशा करणे, प्रत्यक्षात तिची सत्यासत्यता पडताळणे शक्य तरी कुठे असते ? त्यापेक्षा काही सोपा मार्ग काढणेच बरे ठरते ! सारखी खऱ्याखोट्याची चिंता करावी लागत नाही. तर्क, बुद्धी यांचा फारसा वैचारिक व्यायामही करावा लागत नाही. एखाद्या बुवा वा बाबावर श्रद्धा असावी तसाच हा प्रकार दिसतो. मग यातून एकमेकांच्या विरोधी श्रद्धा तयार होतात आणि धर्मयुद्धांसारखीच युद्धे आकाराला येतात ! परदेशातून आलेली स्तुती वा निंदा ही आपल्या श्रद्धेय बाबाबद्दल आहे की विरोधी बाबाबद्दल यावर ठरते काय खरे

मानायचे ते. रोज इतकी माहिती, इतक्या बातम्या येणार, कुठे विचार करत बसणार ! त्यापेक्षा एकनिष्ठ पत्नीप्रमाणे सर्वस्वार्पण करून कुठेतरी वाहून घेणे कधीही चांगले आणि सोपे आणि नीतीमानही !
यातून अर्थातच बेसलेस -- पायाहीन वाद, भांडणे आणि मारामाऱ्याही होतात -- होणारच ! काळाचा महिमा आहे ! इलाज नाही ! आता काळ आपण घडवतो की नियती, काय माहीत ! इथे स्वत:वर विश्वास असणारे आणि नियतीवर विश्वास असणारे अशा टाईमपास वादाची एक वेगळीच संधी मिळू शकते. बोंबलायला काहीही कळणे जर शक्यच नाहीय प्रत्यक्षात तर आपल्या प्रामाणिक विचारातून  काहीही खरे मानायला काय हरकत आहे ?
--- 000 ---

एकत्र

यूनिसेफ ने सांगितलेय की बाबांनो, विसरा ते तुमचे राष्ट्रवाद किंवा तुमच्या त्या राष्ट्रांच्या स्वार्थासाठीही का असे ना, भारताला सत्वर लागेल ती मदत करा आणि त्यांना वाढत्या कोव्हिड संकटातून बाहेर काढा. अन्यथा, तिथल्या वाढत्या संसर्गात कोव्हिड विषाणू अधिकाधिक आणि अनेकदा आत्मक्रांत होत जातील आणि मग ते पूर्ण जगालाच ग्रासून टाकतील. ‘ जगातल्या माणसांनो एक व्हा ! ‘  म्हणजेच, विसरा ते धर्म, प्रांत, भाषा, जाती, वर्ण, लिंग , सगळे आणि एक व्हा ! कॉमन म्हणजे समान शत्रू असला की एक व्हावे इतपत माणसाला समजते, त्यामुळे, या महामारीशी एकत्रितपणे मुकाबला करेलही माणूस. म्हणजेच, एकत्र येण्याने चांगल्या गोष्टी घडू शकतात. मग, हीच अक्कल पुढे वाढवून जगातले सर्व भेदाभेद विसरून सर्व माणसांच्या प्राथमिक गरजा भागवाव्यात, त्यांना एकमेकांशी सौहार्दाने वागत शांततेत, मजेत जगता यावे, अशी व्यवस्था का नाही तयार होऊ शकणार ?
पण ते नाही होणार. भूतकाळातून मिळणारा आत्मगौरव आणि परद्वेष विसरून जायचा ? युद्ध, शौर्य, पराक्रम हे काहीच ठेवायचे नाही ? सर्वश्रेष्ठ होणे, हीरो असणे, दुष्टांची जिरवणे, शत्रूंना देशोधडीला लावणे, सूड घेणे – हे काहीच नको ? बोअर म्हणजे कंटाळवाणे होईल सगळे जगणे ! आपण जगतो आहोत, हेही आपल्याला कळणार नाही ! आणि मग कलानिर्मिती कशावर करणार ? सगळेच एकमेकांशी सहज चांगले वागायला लागले तर संघर्षच बंद होणार ! मग सध्या, ‘ माणसा माणसा माणूस हो ‘ म्हणणारे कलाकार काय करतील ? ते प्रसिद्ध कसे होतील ? रटाळ होईल सगळे जगणे ! संघर्ष, घाण, हिंसा हे हवेच सगळे !
सगळ्यांनी एकत्र छान सहज जगणे म्हणजे अहंकारच नष्ट होणार ना ! मग जगणे रटाळ वाटायला असेलच कोण ? छे छे, नको तसे ! फारच वाट लागायची वेळ येईल तेव्हा मानवतेच्या भूमिकेतून शत्रूलाही करू मदत – सर्वांनी जिवंत तर राहायलाच हवे ! त्याशिवाय जगण्यातली घाण वाढवून, ते अधिकाधिक दु:खमय करून ते अधिकाधिक इंटरेस्टिंग कसे करता येईल ? बिना अहंकाराचे जगणे आपल्याला नाही माहीत आणि ते शक्यही नाही वाटत – त्यामुळे, लाईफ इंटरेस्टिंग करण्याच्या आपल्या सर्व कृतीही चालूच राहायला हव्यात ! या महामारीने मरण्यापेक्षा शौर्य गाजवत, एकमेकांना मारत मरू ! त्यातूनच स्वर्ग घडवण्याचे प्रयत्नही चालू ठेवू ! स्वर्ग म्हणजे काय ते आम्हीच ठरवणार एवढेच आमचे न्याय्य आणि नैतिक म्हणणे आहे ! बास !
--- 000 ---

एक कवितासंग्रह

तुम्हाला काही तीव्र दु:ख आहे का, कोणत्याही कारणाने तुम्ही अत्यानंदात आहात का, तुम्हाला काही जीवनमरणाची वा एखादी साधीशीच का असे ना, समस्या त्रस्त करते आहे का, सामाजिक, आर्थिक वा राजकीय कारणांनी तुमच्यावर काही अन्याय चालू आहे का, स्त्री-पुरुष संबंधांतले काही विशेष बारकावे तुम्हाला जाणवत आहेत का, तुम्हाला खूप एकाकी वा निराश वाटते आहे का, जगण्यातली निरर्थकता जाणवते आहे का, आंतरद्वंद्वांमुळे काही नैतिक प्रश्न बिकट झाले आहेत का, एकूणच मूल्यहीन वाटत असल्याने भाषेचे अडवेतिडवे खेळ करत आहे ते साजरे करावे असे वाटते आहे का, स्वप्न, भ्रम आणि मनाची विचित्र अवस्था अशा काही बाबींतून तुम्हाला जगणे काही वेगळेच दिसते आहे का, कविता हा प्रकारच दांभिक वाटत असल्याने भाषा कशीही निरर्थकतेसाठीच वापरायची आहे का, तुमचे बदलते मूडस तुम्हाला एंजॉय करायचे आहेत का, निसर्गसौंदर्याचे तुम्हाला जाणवणारे हजार विभ्रम तुम्हाला व्यक्त करायचे आहेत का, तुम्हाला राग-तिरस्कार-शौर्य असे काही व्यक्त करायचे आहे का, तुम्हाला स्फूर्तिदायक वा बोधप्रद असे काही लिहायचे आहे का, प्रतिमांची श्रीमंती दाखवत तुम्हाला चमत्कार करून दाखवायचे आहेत का, रोजच्या जगण्यात सामान्यत: सगळ्यांनाच येणारे अनुभव जरा कलात्मक करून तुम्हाला हसू आणि आसू निर्माण करायचे आहेत का, गतकातरता वा बालपणीच्या आठवणी वा आईचे प्रेम हे तुम्हाला व्यक्त करायचे आहे का – असे आणखीही काही – हुश्श --- तर या सर्व प्रश्नांचे एकच उत्तर – नाही हो, असले काहीच नाही – असे असेल तर ? मग कुणीही म्हणेल की बाबा मग तुम्ही कविता लिहिता तरी का आणि कशासाठी ? तर, समजा, काही नाही, तुम्ही म्हणताय ते काही नसूनही हेही एक मन आहेच ना – त्या मनाला उपलब्ध भाषेतून नक्षीकाम करायचा हक्क नाही आहे का ? मनाच्या इतर सर्व अवस्था चालतात तर ही का चालू नये ? – या प्रश्नाचे उत्तर शोधायला प्रवृत्त करणारा एक कवितासंग्रह आलेला आहे --

सटल
अनिरुद्ध दिवाकर आचार्य
वर्णमुद्रा प्रकाशन.

कोणत्या ना कोणत्या किंवा कोणत्याही मानसिक अवस्था जर कवितेतून व्यक्त होऊ शकतात तर सहज काही शाब्दिक नक्षीकाम करणारे मन का बहिष्कृत समजावे ? या संग्रहाचे मला एक वेगळेच महत्त्व वाटते. कोणत्याही मानसिक अवस्थांना अभिव्यक्ती देत राहण्याचे तरी काय महत्त्व आहे मुळात ? करमणूक वा पुन:प्रत्यय ही उत्तरे सोडून याचे काय उत्तर देता येईल ? – हे आव्हानात्मक प्रश्न समोर आणण्याचे काम हा संग्रह करू शकतो.
--- ००० ---

रवींद्र लाखे यांची पोस्ट --

कवी आणि नाटककार चं.प्रं देशपांडेंच्या मते मराठी कविता खालील सतरा कारणानी लिहिली जाते--
१.कवीला तीव्र दु:ख आहे असल्यास कविता लिहिली जाते,
२.कोणत्याही कारणाने कवी अत्यानंदात असल्यास कविता लिहिली जाते,
३.कवीला जीवनमरणाची वा एखादी साधीशीच का असे ना, समस्या असल्यास कविता लिहिली जाते,
४.सामाजिक, आर्थिक वा राजकीय कारणांनी कवीवर काही अन्याय चालू असल्यास कविता लिहिली जाते,
५.स्त्री-पुरुष संबंधांतले काही विशेष बारकावे कवीला जाणवत असल्यास कविता लिहिली जाते,

६.कवीला खूप एकाकी वा निराश वाटत असल्यास, जगण्यातली निरर्थकता जाणवत असल्यास कविता लिहिली जाते,
७.आंतरद्वंद्वांमुळे काही नैतिक प्रश्न बिकट झाले असल्यास कविता लिहिली जाते,
८.एकूणच मूल्यहीन वाटत असल्याने भाषेचे आडवेतिडवे खेळ करत आहे ते साजरे करावे असे वाटत असल्यास कविता लिहिली जाते,
९.स्वप्न, भ्रम आणि मनाची विचित्र अवस्था अशा काही बाबींतून कवीला जगणे काही वेगळेच दिसत असल्यास कविता लिहिली जाते,
१०.कविता हा प्रकारच दांभिक वाटत असल्याने भाषा कशीही निरर्थकतेसाठीच वापरायची असल्यास कविता लिहिली जाते,
११.कवीला कवीचे बदलते मूडस एंजॉय करायचे असल्यास कविता लिहिली जाते,
१२.निसर्गसौंदर्याचे कवीला जाणवणारे हजार विभ्रम कवीला व्यक्त करायचे असल्यास कविता लिहिली जाते,
१३.कवीला राग-तिरस्कार-शौर्य असे काही व्यक्त करायचे असल्यास कविता लिहिली जाते,
१४.कवीला स्फूर्तिदायक वा बोधप्रद असे काही लिहायचे असल्यास कविता लिहिली जाते,
१५.प्रतिमांची श्रीमंती दाखवत कवीला चमत्कार करून दाखवायचे असल्यास कविता लिहिली जाते,
१६.रोजच्या जगण्यात सामान्यत: सगळ्यांनाच येणारे अनुभव जरा कलात्मक करून कवीला हसू आणि आसू निर्माण करायचे असल्यास कविता लिहिली जाते,
१७.गतकातरता वा बालपणीच्या आठवणी वा आईचे प्रेम हे कवीला व्यक्त करायचे असल्यास कविता लिहिली जाते,
--- ००० ---

## माझे लेखक वा कवी असणे

काही एका निमित्ताने कविता लेखनामागची कारणे काय असू शकतात ते लिहिले गेले. मित्रवर्य लाख्यांना ते इंटरेस्टिंग वाटले. त्यांनी सरळ त्या कारणांना क्रमांक देऊन त्याची एक वेगळी पोस्टच टाकली. यात खरे तर विशेष काहीच नव्हते. पण काहींना ते आवडले नसावे किंवा काहींना तर त्याचा रागच आला असावा, असे दिसून आले. ही काय भानगड ? समजा, एवढीच नसतात कारणे, ही आणखी चार असतात बाबा, म्हणा ना, चिडायचे काय कारण आहे ? कुणीतरी हे सगळे कायप्पा वरही नेले. ‘ स्वत:ला श्रेष्ठ समजणारे ‘ असे मला अभिधान देण्यात आले. अरे, सामान्यत: लिहिणाऱ्या प्रत्येकाला वाटत असते की तो काही मौल्यवान निदान दखलपात्र काही काम करतो आहे. त्यामुळे, ते अभिधान सोडून देऊ. पुढे ते सज्जन म्हणतात की मी आडव्या ओळी उभ्या लिहून त्यांना कविता म्हणतो, ते त्यांच्या डोक्यात जाते. माझ्यापेक्षा नवे कवी खूप चांगल्या कविता लिहितात. यावर माझे काही म्हणणे नाही. पण, एक त्रास मी घालवू शकतो किंबहुना घालवू इच्छितो. एक साधा, सोपा उपाय आहे. आपण कवितांचे दोन भाग पाडू – एक पद्य कविता आणि दुसरी गद्य कविता. मी गद्य कविता लिहितो, असे म्हणू. इथे एक लक्षात घ्यावे लागेल की गद्य कविता लिहिणारे कवीही खूप आहेत. जगभरात तर आता हा चर्चेचा विषयही नसतो. पण, आपल्याला येतो राग, तर मराठीत आपण गद्य कविता हा विभागच कमी दर्जाचा असतो, असे जाहीर करू. ते काहींना पटेल, काहींना नाही पटणार. मग ज्यांना नाही पटत ते कोण टिकोजीराव वगैरे म्हणत बसून उपयोग नाही. कवितेतले संगीत वा तिची गेयता हे कवितेचे अटळ वा व्यवच्छेदक लक्षण नसते, हे आपण हळूहळू समजून घ्यावेच लागणार आहे. गद्य कवितेतही ओळींची रचना, शब्दांचा क्रम, आंतरसंबंध

आणि हे सगळे व्यापून असणारी सूचकता महत्त्वाची असते. माझ्या कवितेत ते असते असे काही म्हणतील, काहीजण म्हणतील, तसले काहीही नसते, फालतू असते ती कविता. यातही, अर्थात, मला काही प्रॉब्लेम नाही.

मी नाटकेही लिहितो, ती प्रायोगिक प्रवाहातली म्हटली जातात. त्यामुळे, किती प्रेक्षक आले आहेत याची आम्हाला चिंता नसते. चार लोकांपुढेही प्रयोग होतो. तेच तत्त्व कवितेत. तुम्ही येऊन वाचाच असा आग्रह नाही. तुमच्या हे डोक्यात जाते तर तुम्ही लांबच राहा ना. कशाला त्रास करून घेत राहता ?

कुणी गंमत केली, कुणी नाराजी दाखवली, कुणी म्हणाले, कवी लिहितो कविता, कारणेबिरणे नंतर चिकटवली जातात, कुणी म्हणाले, विचारच नाही करायचा, कविता आवडली, बास. एखाद्याला ही कारणे मांडण्याचा इतका राग आला की तो म्हणाला मग, या कारणांशिवाय लिहिणाऱ्यांना काय दैवी आदेश असतो काय ? पण, हे जरा गूढच वाटते ! काय असावे कारण या रागाचे वा खळबळीचे, हा प्रश्न अनुत्तरितच राहातोय.

कोणत्याही लेखकाला, ‘ अरे ग्रेट ‘ पासून ‘ रद्दड ‘ पर्यंत काहीही प्रतिक्रिया ऐकायची तयारी ठेवावीच लागते. तसे नसेल तर हे क्षेत्र महादु:खाचे होऊ शकते. माझी ‘ बस ‘ ही एकांकिका जेव्हा रंगायनने केली तेव्हा ते अशा नामवंत संस्थेने माझे काही प्रथमच सादर करणे होते. त्या एकांकिकेला माधव मनोहर ‘ सोबत ‘ मधून म्हणाले, ‘ हा कुठला लेखक आणलाय धरून ! ‘ त्याच वेळी त्याच एकांकिकेला ज्ञानेश्वर नाडकर्णी ‘ टाइम्स ऑफ इंडिया ‘ तून म्हणाले, ‘ बस इज बेस्ट ! ‘ तर, हे चालणारच. आता राहिला प्रश्न, मी स्वत:ला श्रेष्ठ लेखक समजण्याचा. याचे खरे उत्तर असे आहे की सर्जक प्रक्रियेत हा काही प्रश्नच नसतो. पण, म्हणू आपण एक संभाव्य सत्य म्हणून की हो, मी खरेच स्वत:ला श्रेष्ठ लेखक समजतो. पण त्याचा कुणाला काही प्रॉब्लेम असायचे कारणच काय ? मी एक फालतू लेखक आहे असे तुम्ही म्हणा ना !

सारांश, मी ज्या लिहितो ओळी त्यांना आपण ‘ कविता ‘ न म्हणता, ‘ गद्य कविता ‘ म्हणू – बास ?

--- ००० ---

## महापूर

काल माझी पंच्याहत्तरी झाली. इथे फेसबुकवर आणि कायप्पावर सदिच्छांचा अक्षरक्ष: महापूरच आला ! शक्य तो प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्रपणे प्रतिसाद देण्याचा, शुभेच्छांचा स्वीकार करण्याचा प्रयत्न केला. तरीही, अनवधानेने कुणी राहिले असेल तर त्यांना आणि पुन्हा एकदा सर्वांनाच धन्यवाद देतो.  मला कल्पना आहे की हे प्रेम माझ्या व्यक्तिमत्वाचे वा माझ्या आत्मकेंद्रित जगण्याबद्दलचे नसून त्यातून बाहेर पडून होणाऱ्या माझ्या लेखनाबाबतचे आहे. त्यामुळे, व्यक्ती म्हणून ते मध्येच ढापून मी हुरळून जाण्याचा प्रश्नच नाही.

गिरीशने त्याच्या पोस्टमध्ये माझ्या कवितांचा विशेष उल्लेख केला, तो मला महत्त्वाचा वाटला. माझ्या कवितांतून मराठीत यापूर्वी न घडलेले काही घडते आहे असेच माझेही आकलन होते पण हा दुजोरा आवश्यकच होता. लाख्यांनी, त्यांच्या पोस्टमध्ये, माझी आणि जेकेंची जन्मतारीख एक असल्याचा उल्लेख केला. इथे माझ्या एका काकांची आठवण झाली. ते म्हणत, ‘ लोक टिळकांचा कित्ता गिरवण्या ऐवजी त्यांचा अडकित्ता घेतात ! ‘ म्हणजे त्यांचे सुपारीचे व्यसन फक्त घेतात ! जन्मतारखेचा हा योगायोग तसा ठरू नये म्हणजे झाले ! माझ्या पत्नीचा भाचा डॉ . उमेश देशपांडे याने माझ्या तुकाराम प्रेमाचा विशेष उल्लेख केला. नुसती ‘ सामाजिक फलश्रुती ‘ म्हणून नव्हे तर कोणत्याही काळात स्वत:चे जगणे समजण्याची शक्यता निर्माण करणारा हा मराठीतला एक दीपस्तंभ आहे. माझ्या जगण्यात तुकारामाचे तेच स्थान आहे. निसर्ग देशमुखने माझ्या एका गुणाचा उल्लेख केला आहे, तो म्हणजे, माझा फेसबुकवरचा वावर आणि कुणाशीही मुक्त संपर्काला तयार असणे. कदाचित हा विशेष माझ्यात बँकेच्या नोकरीमुळे विकसित झाला असावा. मटक्याच्या आकड्यांची

ने-आण करणाऱ्यांपासून सर्वांशी मला बोलता-वागता आले. एका खेड्यात एक अल्पसंख्याक मुलगा होता तो अशी कामे करत असे. म्हटले, अरे, एवढयावर तुझे कसे भागेल, काहीतरी धंदा कर. मग बँकेतर्फे त्याला सायकल दुकानासाठी कर्ज दिले. त्याला जोडून त्याने एक पान टपरीही टाकली. पण, कालांतराने आणखीही एकदोन सायकल दुकाने झाली. शिवाय, शिक्षकांना सायकलींसाठी कर्जे देण्याची एक योजना आली. मी शाळेशाळेत जाऊन त्या योजनेचा प्रचार केला आणि ५०-६० शिक्षकांना सायकली दिल्या ! परिणामत: त्या भागात सगळीकडे नव्याकोऱ्या सायकलींचा चमचमाट सुरू झाला. त्यामुळे, या आमच्या मटकामित्राच्या सायकली भाड्याने जाणे कमी होऊ लागले. अरे, म्हटले, आमची बँक एकदा एकाला गटारातून बाहेर काढल्यावर पुन्हा त्याला तिकडेच पडू देणार नाही. मग त्याला नव्या सायकली घेण्यासाठी पुन्हा कर्ज दिले ! अशी अनेक आहेत उदाहरणे. माझ्या कामातून, माझ्या अधिकारात असलेली अशी खूप सामाजिक बांधिलकी मी केली. ते सगळे सांगत बसत नाही. तर सर्वांत मिसळणे, सर्वांशी गप्पा मारणे हा माझ्या जगण्याचा नमूनाच घडत गेला. आपल्या वाट्याला आलेल्या जगण्यातूनच तर आपण घडत जातो.

खोटे कशाला बोलू, या अशा प्रचंड आत्मीयतेने भारावून जाण्याचा स्वार्थ नकळत साधला गेलाच आहे. त्याबद्दल, पुन्हा एकदा, पण वेगळे धन्यवाद देतो !

१२ मे २०२१.

--- ००० ---

द्वेष

आपण कितीही संविधानाचे गोडवे गात असलो आणि ' अनेकता मे एकता ' चे नारे देत असलो तरी खरोखरच आपण तसे आहोत का, हे मधून मधून पाहायला हवे. कोणतेही संघटन, विशेषत: राजकीय संघटन उभे करताना कुणी तरी एक शत्रू लागतो. नुसतेच शांतता, प्रेम या मूल्यांवर आधारित माणसे एकत्र असू शकतात का, असा प्रश्नच पडावा अशी परिस्थिती दिसते.

गौतम बुद्धाचे एक वचन सांगितले जाते की तुम्ही द्वेष बाळगत जगणे म्हणजे कुणाकडे तरी फेकण्यासाठी हातात निखारा घेऊन जगणे. तो निखारा आधी तुम्हालाच भाजून काढतो. यावर झालेले संशोधन असे सांगते की द्वेष, क्रोध या टॉक्सिक ( विषारी ) भावना असून त्या शरीरावर दुष्परिणाम करतात. हृदयरोग, रक्तदाब असे विकारही घडवतात. तो एक प्रकारचा शक्तीनाशही आहे. सर्जकता नष्ट करून डल, मंद, अकार्यक्षम करणारा. अशी एक गोष्ट सांगितली जाते – एका आजोबाने त्याच्या नातवाला सांगितले की त्याच्यात दोन लांडगे आहेत. एक शांतता हवी म्हणतो आणि दुसरा द्वेष आणि राग हवा म्हणतो. नातू त्याला विचारतो की मग यांतला कोण जिंकेल, त्यावर आजोबा म्हणतो की मी ज्याचे पोषण करेन तो. सॉक्रेटिसला दिले तेच फक्त विष नसते, द्वेष पाजला जाणे हेही विष पाजणेच असते.

जात, धर्म, भाषा वा राजकीय पक्ष यांतले कोणते तरी एक साधन द्वेषासाठी निवडावेच लागते, त्याशिवाय सामूहिक सुरक्षिततेची गरज निर्माण करणे आणि एखाद्या समूहात एकोपा साधणे शक्य होत नाही. स्वातंत्र्यापूर्वी इंग्रज हा एक काँग्रेसपुढे मोठा आणि पूर्ण भारत एकवटेल असा शत्रू होता. त्या साधनाने तयार झालेले संघटन नंतरही काही वर्षे टिकले. पण, देशांतर्गत द्वेष हे काँग्रेसचे तत्त्वज्ञानच नाही तर मग एकोपा कशावर आधारित साधणार ? त्यामुळे, आता राजकीय द्वेष हे एकच साधन उरते. इतर अनेक पक्षांकडे राजकीय द्वेषाबरोबरच काही उपद्वेषही साथीला असतात. त्यामुळे ते काँग्रेसपेक्षा अधिक प्रभावी दिसू लागतात.

द्वेष निर्माण करणे आणि तो जोपासणे हे काम विशेषत: राजकीय पक्षांना करावेच लागते. त्याचा वाईट आणि विनाशक परिणाम आपल्या अनुयायांवर होईल याची फिकीर करून त्यांना चालत नाही. निरनिराळ्या अस्मिता माजवणे, द्वेष

माजवणे, श्रद्धास्थानांचे उत्सव करणे या गोष्टी केल्याशिवाय अनुयायी मिळत नाहीत. या गोष्टींमुळे समाजस्वास्थ्य तर बिघडतेच पण सर्वांच्या व्यक्तिगत आरोग्याचीही हानी होते. त्याला कुणाचाच इलाज नाही, हे सर्वांनाच मान्य असते. या प्रकारांचे आत्मनाशाचे जसे परिणाम असतात तसेच ते द्वेषपात्रांवरही होत असतात. सतत द्वेष, राग, हेटाळणी झेलत, स्वीकारत राहणे हे राग, भीती, न्यूनगंड, आक्रमकता अशा नकारात्मक भावना निर्माण करते. तेही व्यक्तिगत आणि सामाजिक हानी करणारेच असते.

या गोष्टी अटळच दिसतात. यांतली हानी ज्यांना दिसते, जाणवते त्यांनी शक्य तो या प्रकारांना बळी न पडणे हाच यावर एकमेव मार्ग आहे. त्यासाठी, बुद्ध काय म्हणतात, तुकाराम काय म्हणतात, हे समजून घेण्याचे महत्त्व लक्षात यायला हवे. ते सर्व आध्यात्मिक म्हणून फेटाळून लावणे हे आत्महत्या करण्यासारखेच आहे. एकमेकांशी सौहार्दाने जगावे की संघर्ष करत जगावे याचा निर्णय त्यावरच अवलंबून असणार आहे.

--- ००० ---

माझा मित्र मिलिंद शिंत्रे हा एक फारच सज्जन, नम्र माणूस असल्याने तो स्वत:ला अजिबातच कवी समजत नाही. पण, अपघाताने, त्याच्याही न-कळत तो मराठीतली एक अत्युत्तम न-कविता ( anti poem ) लिहून गेलेला आहे. मित्रत्वाच्या नात्याने मी त्याला योग्य तो सल्ला आणि प्रोत्साहन दिलेले आहे. त्याच्या नम्रपणामुळे आपण सर्वांनीच या कवितेच्या न-आस्वादाला मुकू नये म्हणून मी हो-पुढाकार घेत आहे. ओळी तोडून थोडा कवितेचा आभास तयार करायची जबाबदारी मी घेत आहे. मिलिंदची परवानगी न घेताच ( शक्य तिथे न यावा म्हणून ) मी ती न-कविता खाली देत आहे --

एकपात्री समूहनृत्यात

--- कवी --- मिलिंद शिंत्रे ( या कवितेचा शिल्पकार अर्थातच – मी किंवा न-मी ).

गुडघे दुखत असल्याने, आम्ही सायकियाट्रिस्टची अपॉइंटमेंट घेतली होती.
पण त्यांना अर्धशिशीचा त्रास होत असल्याने, ते डर्मिटोलॉजिस्टकडे गेले होते.
मग ते ऐकून आम्हाला खूप भूक लागली. काहीतरी चमचमीत खावे म्हणून नीरा
प्यायला गेलो. तर तिथे आम्हाला उपवासाचे मटण मिळेल, अशी पाटी दिसली.
मटणविक्याच्या एका कानाला बहिर्गोल भिंगांचे कर्णयंत्र होते आणि दुसऱ्या हातात
कबड्डीची हॉकीस्टिक होती.
तितक्यात एका तरुणीने त्याला कॅरमच्या सोंगट्या देता का किलोभर, असे विचारले.
पण मटणविक्या म्हणाला की, शाकाहारी व्हिक्सच लावा मैदानाला उगाळून,
म्हणजे छान पोहता येईल त्यात अंडरवॉटर.
तोच बंद पडलेल्या पालथ्या रेडिओवर बैठकीचा भांगडा लागला आणि नंतर
छातीच्या डेंटिस्टची जाहिरात लागली. त्यामुळे आम्हाला गुडघ्यांची आठवण झाली.
एकपात्री समुहनृत्यात मोठ्या आवाजात गायल्यापासून आम्हाला गुडघेदुखी झाली होती.
शेवटी ती सहन न झाल्याने अंतिम उपाय म्हणून डोळ्यांच्या चेस्ट हॉस्पिटलमध्ये
आम्ही सदेह घुसलो !!! आम्ही म्हणजे मी एकटाच हो , जणू आचार्य मिलिंद अत्रेच !

--- ००० ---

सर्जकता

' आरोग्यता तुका पावला अष्टांगी ll ' असे जाहीर करणे ही काही खाऊची गोष्ट नाही. मराठी मानस सगळ्यात जास्त कशात इंटरेस्ट घेत असेल तर चुका टिपणे, टोच्या मारणे, उपरोधिक आणि कुत्सित बोलणे आणि समोर येईल ते आधी फेटाळून लावणे, यात ! अशा प्रांतात तुकारामाने हे जाहीरपणे म्हटले ! त्याला सर्जकतेचा आणि रोगप्रतिकारक शक्तीचा संबंध उत्स्फूर्तपणे कळला असणार. गेल्या दहा वर्षांत सर्जकता आणि मेंदू यावर झालेले संशोधन नक्कीच विचारात घेण्यासारखे आहे. तुकारामासारखेच रामकृष्ण परमहंस म्हणा किंवा जे. कृष्णमूर्ती म्हणा, सर्जक होतेच ना, तरीही, त्यांना कसा झाला कॅन्सर – असा विचार करून झटकन सगळे नाकारून आपले आहे तेच चालू ठेवणे शक्य आहेच. पण, एकदम टोक न गाठता यात काही तथ्य असेल का, असा समजुतदार शोध घेणेही शक्य आहे.
मानवी जगण्यात कला ही एक निरुपयोगी बाब असून फार तर करमणूक करणे एवढेच तिचे काम असू शकते, असे समजणारे महाभाग बरेच आहेत. ( दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांचा ' कवी काय काम करतो ' हा मराठीतला एक अमर लेख असून तो सर्वांनी वाचावा, असे या निमित्ताने सुचवतो. ) नवे संशोधन याच्या उलट काही सांगते. मेंदूचा डावा भाग म्हणजे तर्क आणि गणित आणि उजवा भाग म्हणजे भावना आणि कल्पना असे ढोबळपणे समजले जात होते. ते आता मागे पडलेले आहे. मेंदूतले सर्वच आंतरसंबंध आणि साहचर्य हे एकूणच जगण्यात महत्त्वाचे असतात असे आता सप्रयोग सिद्ध झालेले आहे. साहित्य, संगीत, बागकाम, विणणे असे काहीही सर्जकतेला बढावा देणारे असते. ही सर्जकता काय काय करते ते जाऊ द्या सध्या, पण, ती मानसिक आणि शारीरिक आरोग्य प्रदान करते, राखते, हे सिद्ध झालेले आहे. आता आरोग्याची काय गरज आहे असा मूर्ख प्रश्न तरी कुणी विचारू नये. सध्याच्या कोव्हिड काळात रोजच रोगप्रतिकारक शक्तीबद्दल बोलले जात आहे. त्यासाठी औषधेही सांगितली जात आहेत. पण, सर्जकतेची वा कलेची आवड असणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे, हे लक्षात घ्यायला हवे. निराशारोग, स्मृतिभ्रंश यांपासून तर सर्जकता बचाव करतेच पण एकूणच विचारशक्ती वाढवणे, केंद्रितता वाढवणे, कार्यक्षमता वाढवणे हीही कामे तिच्यामुळे होतात. तरीही, कला निरुपयोगी आहे, असे ज्यांना वाटते त्यांना बोंबलत त्यांच्या मार्गाने जाऊ द्यावे.
राजकीय पुढारी किंवा कोणतीही सरकारे सर्जकतेच्या क्षेत्रात काय करतात ? सांस्कृतिक वारसे जपणे आणि काही रकाने भरून त्यासाठी निधी खर्च करणे. ( सगळेच तसे नसते, काही चांगलेही केले जाते, हे मान्यच. ) त्यामुळे, सरकारी पाठबळाची वाट बघत थांबायचा हा विषय नाही. ज्यानेत्याने प्रत्येकाने समजून घेणेच महत्त्वाचे आहे. राजकीय पुढारी आपल्याला जयंत्या, पुण्यतिथ्या, उत्सव आणि सोहळे यांत गुंतवून ठेवू इच्छितात कारण त्यात त्यांचा फायदा असतो. त्यातच जगण्याचा अर्थ साठलेला आहे, असे ज्यांना वाटते त्यांचा प्रश्नच नाही. बाकीच्यांनी तरी, जमल्यास, वाटल्यास या विषयाकडे स्वत: लक्ष देणे आवश्यक आहे.
साहित्य वाचा, चित्रे पाहा, संगीत ऐका !
--- ००० ---

16 June 2021.

विज्ञान म्हणून यातले शून्य कळत असूनही कविता म्हणून मला हे कळते आणि ग्रेट वाटते --

With this new insight into gravity, physicists at last were able to make actual predictions about the universe's behavior, turning cosmology into a science. Einstein was the first to try. Yet as events showed, even Einstein was a fallible genius. A misconception about the nature of the universe led him to propose a mysterious new gravitational effect—a notion he soon rejected. But he may have been right for the wrong reasons, and his "mistake" may yet turn out to be one of his deepest insights.

मर्मदृष्टी

विश्वाच्या अवस्थेबाबतच्या चुकीच्या कल्पनांमुळे
त्याने एका गूढ नव्या गुरुत्वाकर्षणाची शक्यता सांगितली
पण लौकरच त्याने तिचा त्याग केला
पण त्याचे बरोबरही असू शकेल काही चुकीच्या कारणांमुळे
आणि अजूनही त्याची ' चूक ' ठरू शकते
त्याच्या सखोल मर्मदृष्टीचे एक उदाहरण.
----- वाह रे वाह ! क्या कमालकी कविता है !!!!!

--- ००० ---

पु. शि. रेगे यांच्या तीन कविता

पु. शि. रेगे यांची कविता सामान्यत: स्त्रीदेह, निसर्ग, काम आणि श्रृंगार या अनुभवक्षेत्रात फिरणारी आहे. पण ती व्यक्तिगत नशेची सुखगाणी वा विरहाची दु:खगाणी गाते, असे म्हणता येत नाही. कवितेतला आशय निसर्गावकाशात पसरून एक व्यक्तिनिरपेक्ष व्यापक अस्तित्व साकारताना दिसतो. कोणत्याही कवितेत व्यक्तिगततेचा अणुस्फोट घडून निर्माण होणारी प्रगल्भता प्रत्ययाला येत असेल तर अनुभव क्षेत्राच्या मर्यादेचा निर्देश करण्यात फारसा अर्थ राहात नाही. इथे रेग्यांबाबतचे एक उद्धृत प्रस्तुत ठरावे -- " छांदसी (१९६२) हा त्यांच्या समीक्षालेखांचा संग्रह असून १९६८ मध्ये त्याची सुधारित आवृत्ती निघाली आहे. रेगे साहित्याला स्वतंत्र वस्तू मानतात. जीवन जगले तर साहित्य जगणार नसून साहित्य जगले तरच जगण्यासारखे काहीतरी उरणार आहे, असा साहित्याच्या सामर्थ्याचा त्यांनी गौरव केला आहे. कलाकृतीचे सौंदर्य तिच्या घाटात असून तिचे श्रेष्ठत्व तिच्यातील जीवनदर्शनाच्या संपन्नतेवर अवलंबून असते, असे सांगताना रेगे यांनी 'परतत्त्वस्पर्श' हा शब्दही वापरला आहे. – गो. म. कुलकर्णी. " रेग्यांसारखे विचक्षण, विदग्ध, प्रगल्भ व्यक्तिमत्व आपल्याकडे असेल वा नसेल पण त्यांची कविता व्यक्तिमत्वबाह्य आशयाला स्पर्श करणारी असल्याने सर्वांनाच एका एकत्रित अनुभवात मिलाफ पावणे इथे शक्य होते. आज वाचताना रेग्यांच्या कविता कशा ' कळतात ' या पद्धतीने मी लिहीत आहे. सुरुवातीला त्यांची ' शेवगा ' ही कविता घेऊ.

शेवगा

दोन प्रहर. निवांत सारें.
श्रमभरानें बाजेवरतीं
            पांगुळलेली तूं.
खिडकीबाहेर ढाळितो चवरी
आसुसलेला शेवगा दारचा.

०००

सुरुवात ‘ दोन प्रहर ‘ अशी आहे. ‘ दुसरा प्रहर ‘ अशी नाही. म्हणजे दोन प्रहर पूर्ण होऊन गेलेले आहेत. दुसरा प्रहर सकाळी ९ ते १२ असतो. म्हणजे ही त्यानंतरची वेळ आहे. दुपारचा एक वाजलाय, असे म्हटलेले नाही – जरा जुनीच कालगणनेची भाषा आहे. आधुनिकतेचा स्पर्श झालेला नसणे, हे यातून जाणवते. निवांत सारे – कोणतीही गडबड, गोंधळ वा आवाज नाहीत. हे एखादे लहान गाव असावे असे मनात येत असतानाच पुढल्या ओळींत त्याला पुष्टी मिळते. श्रमभराने बाजेवरती पांगुळलेली तू. कॉट वा बेड नव्हे, बाज. सकाळच्या अनेक कामांचे श्रम तिने केलेले आहेत. इतके श्रम करून ती पांगुळलेली आहे म्हणजे ती तरुण आहे हे सांगायला नकोच. ( ‘ श्रमभराने ‘ हा शब्द वापरताना ‘ स्तनभाराने ‘ हा पूर्वीच्या साहित्यातला शब्द मनाला स्पर्शून गेला असावाच. ) तिने बरेच श्रम केलेले असून ती पांगुळलेली आहे. अर्थातच घामेजलेलीही असेल. अशा अवस्थेत बाहेर मंदसा वारा आहे हे पुढच्या ओळींतून कळतेय. खिडकीबाहेर शेवग्याचे झाड असून तो शेवगा ‘ ढाळितो चवरी ‘ असा आहे. हे अर्थातच तिच्या विश्रांतीत सुखावणारे आहे. तो शेवगा, शांतपणे तिची विश्रांती व्हावी म्हणून चवरी ढाळतो आहे. जणू एक निष्ठावान सेवकच. पण, त्यालाच येते विशेषण, ‘ आसुसलेला ‘. हे अर्थातच आरोपित विशेषण आहे. आसुसलेला दुसराच कुणी असून ते या शेवग्यावर आरोपित झालेले आहे. याचाच अर्थ त्या शेवग्याची ‘ सेवावृत्ती ‘ त्या दुसऱ्यातही आहे. एकाच वेळी तो आसुसलेलाही आहे आणि तिची तो काळजीही घेऊ इच्छितो. हा या नात्यातल्या समजुतीचा उच्चबिंदू आहे. एका लहान गावातले बैठे घर, खिडकीबाहेर शेवगा, दुपार आणि मंद वारा, असे हे चित्र आहे. आसुसलेला पण चवरी ढाळणारा शेवगा हे या कवितेतले माणूस आणि निसर्ग यांचे व्यक्तिगततेचा अणुस्फोट करणारे अजब मिश्रण आहे. या भानाने ही कविता पाहात गेल्यास आपल्या मनात ही आणखीही अधिकाधिक उलगडत जाऊ शकते.

इथे एक वेगळी गंमत म्हणून याच नावाची सदानंद रेगे यांची ही कविता वाचायला हरकत नसावी --

शेवगा

फुलवुन पंखा

शुभ्र फुलांचा

तुरा टपोरा

तलम उन्हाचा

टाकित टाकित

सुने उसासे

टिपे शेवगा

धुंद कवडसे!

२१. ६.५४ – सदानंद रेगे.

०००

आता दुसरी कविता --

कोरुनि मी नभ घेतों

कोरुनि मी नभ घेतों

झाडांच्या हातांनीं,

वदन तुझें अलवालें

या माझ्या हातांनीं;

फुसलावुनि अन घेतों
मातीच्या ओठांनीं
संथ तळ्यांतिल पाणी,
डोळ्यांतिल तव गाणीं.
०००
इथेही पुरुषाच्या कामभावनेचा निसर्गाच्या अमर्याद अस्तित्वातला आविष्कार व्यक्त होतो आहे. ‘ कोरुनि मी नभ घेतो झाडांच्या ( अगणित ) हातांनी ‘ यात काहीतरी प्रचंड आहे हे जाणवते पण त्याचा खुलासा पुढच्या ओळींत होतो – ‘ वदन तुझे अलवाले ( या शब्दातून नाजुकपणा, लाड आणि आसक्ती जाणवते ) या माझ्या हातांनी ‘. हे दोन्ही मिळून एकच ! पुरुषाच्या कामभावनेची व्यक्तिगतता आणि ती मर्यादा ओलंडणारी निसर्गाची अ-व्यक्तिगतता यांचा हा महाप्रचंड मिलाफ, पहिल्याच कडव्यात तो अणुस्फोट घडवतो. आता याच्यापुढे काय असू शकेल, या प्रचंड उत्सुकतेत आपण असताना पुढचे कडवे येते. याच अवाढव्य विस्तारातले आणखी एक घटित समोर येते – पहिलाच शब्द कामुक येतो – फुसलावुनि. मातीच्या ओठांनी संथ तळ्यातील पाणी तो घेतोय. यात धसमुसळेपणा नसून एक अत्युच्च दर्जाची पूर्वक्रीडा आहे. संथ तळ्यातील पाणी म्हणजेच डोळ्यांतील तव गाणी ! इथे पुन्हा एकदा तोच, पण संथ, अणुस्फोट घडतो. इकडे तर कामभावनेची मग्नता आहे पण त्याच वेळी ती ओलांडणारा निसर्गही आहे. कामघटनेचा आविष्कार निसर्ग-घटनेतून होतो आहे. ती संथ असली तरी तिच्या डोळ्यांत गाणी आहेत आणि ती तो मनसोक्त ‘ पिऊ ‘ शकतोय ! कामभावनेचा प्रत्यय या प्रकारे इतका विस्तारतो की ती नुसती व्यक्तिगत मग्नता राहात नाही. हे सर्व लक्षात घेऊन वेळोवेळी अनेकदा ही कविता वाचली तरी ती आपल्या मनात सदानावीन्याने उलगडत राहते.
आता तिसरी कविता --
बदामी, वैशाख १८८०
उगवत्या सूर्याहून थोडा वेगळाच लालसर,
किंचित तपकिरी छटा पांघरलेल्या
पिवळ्या रंगाची मधूनच ज्याच्यावर उलगडलेंली आहे झालर
असा हा तुकडा
सलग होता स्तन इथल्याच गुंफेतील
कुणा शिल्पित सहेलीचा – अजून उष्ण, आततायी –
आणि तरीही इथून उंचावरून खाली खोल चितारलेल्या तळ्याभोवतालच्या
नाही नाही त्या हिरव्या
कळा सांगणाऱ्या झाडांच्या कालिंदी पानांचा
गारवा सलोख्याने लपेटून घेणारा,
खंडाळ्याला पाहिलेल्या त्या निर्मनस्क जांभुळवेड्या जांघांच्या डोंगराला
पुन्हा एकदा छेडणारा.
०००
--- या कवितेवर आधीच दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांनी लिहिलेले आहे. त्यांचे ऋण मान्य करून काही लिहितो आहे. अमुक कालनिश्चिती करणारा उल्लेख हिंदू पद्धतीचा येणे हे या कवितेतल्या सांस्कृतिक संदर्भांशी सुसंगत आहे. पहिल्या कडव्यात रंगसंवेदनांचे तपशीलवार वर्णन करत उत्सुकता ताणली जात राहते. ‘ असा हा तुकडा ‘ पण कसला ? दुसऱ्या

कडव्याच्या पहिल्याच ओळीत स्पष्टता यायला सुरुवात होते. हा गुंफेतल्या शिल्पाचा तुटून पडलेला तुकडा आहे. आणि ते शिल्प आहे ‘ कुणा सहेलीचे ‘. इथे आता कोणतीही जिवंत स्त्री नाही आहे. जे आहे ते एका स्त्री शिल्पाच्या स्तनाचा तुकडा. ‘ – अजून उष्ण, आततायी – ‘ इथे ही पुरुषाची जाणीव सुरू होते. उत्सुकता ताणत नेण्याचे तंत्र वाचकाला काहीसे अधीर करत जाते. अनुभवाचे हे एकच पूर्ण युनिट असून ते तीन कडव्यांतून विस्तारलेले आहे. ‘ अजून उष्ण, आततायी ‘ च्या नेमके उलट वास्तव पुढे येते, ते असे – ‘ आणि तरीही इथून उंचावरून खाली खोल चितारलेल्या तळ्याभोवतालच्या नाही नाही त्या हिरव्या ‘ या अर्धवट वर्णनावर हे कडवे संपते. ती सहेली जर शिल्पकला आहे तर ते तळे चित्रकला आहे. त्या स्तनाच्या तुकड्याबद्दलच चाललेय, हे लक्षात ठेवायचे. त्या तुकड्याला हे प्रचंड महत्त्व देणेही आहे. तर तो तुकडा ‘ नाही नाही त्या हिरव्या कळा सांगणाऱ्या कालिंदी पानांचा गारवा सलोख्याने लपेटून घेणारा ‘ हे येते. म्हणजे तो तुकडा उष्ण आहे आणि गारवा लपेटून घेतोय. लपेटून घेण्यात एरवीच्या झाकण्याच्या क्रियेचे सूचन वाटते. कालिंदी हे यमुना नदीचे नाव असून तिचा रंग हिरवा आहे. ती हिमालयातून येत असल्याने तिच्या गारव्याचीही कल्पना करता येते. ( मी नाही हे पाहिलेले हो, ही मिळालेली माहिती आहे. आता त्या नदीचे ड्रेनेज झाल्याचे कळते, ते सोडा. ) आता बघा – स्तनाचा तुकडा बदामीचा, यमुना येते हिमालयातून आणि कविता संपते कुठे तर खंडाळ्यात ! खंडाळ्याचे डोंगर दिसतात जांभळे. पण इथे तेवढेच नाही – तो ‘ निर्मनस्क ‘ जांभूळवेड्या जांघांचा डोंगर आहे. जाणीवपूर्वक आलेला हा शारीरिक उल्लेख आहे. तर चाललेय काय तर त्या निर्मनस्क डोंगराला छेडणे ! इथे वाचक हुश्श म्हणून ‘ वा भिडू ‘ म्हणू शकतो ! म्हणजे पुन्हा उष्ण भावना आणि निर्मनस्कता यांच्या मिलाफाचा, महाप्रचंड अवकाश व्यापणारा अणुस्फोट ! झाले, आता कळली ही कविता, असे संपणारे हे प्रकरण नाही. प्रत्येक वेळी नवे नवे काही देत जाण्याची क्षमता असणारी ही कविता आहे.

सारांश, रेग्यांची कविता नुसतीच पूर्वक्रीडा, मध्यस्फोट आणि उत्तरक्रीडा यांच्या अनुभवांचे सुखवर्णन करणारी नसून ती एक प्रकारे त्या भावानांचे उन्नयन करून सम्यक भानाची अनुभूती देणारी आहे, असे म्हणता येईल.

--- ००० ---

बदलती कविता

काळ बदलत असतो म्हणजे काय तर माणसाच्याच कृतींनी जगण्याचा माहोल बदलत जात असतो. यंत्रे येतात मग संगणक येतात मग रोबो येतात, वगैरे. वापरातल्या आणि चैनीच्या वस्तू बदलत जातात. व्यवहारांचे आकार आणि गुंतागुंती वाढत जातात. आकांक्षा वाढत जातात आणि ताणही वाढत जातात. गोंधळ आणि हिंसा वाढत चालल्याची जाणीव होत जाते. या अशा सगळ्या बदलांबरोबरच सामान्यत: त्या त्या काळाला येणाऱ्या माणसाच्या प्रतिक्रियाही बदलत जातात. आधी स्वप्नील, भावनिक, स्वच्छंदी, आदर्शभक्त असणारा माणूस अधिक बुद्धिप्रधान होतो, त्याचा भावनिकपणा कमी होतो पण तरीही तो आदर्श वा तत्त्वे यांची कास सोडत नाही. नंतर एक काळ असा येतो की ही सगळीच त्याला भंकस वाटायला लागते. सत्य, आदर्श हे सगळे फोल वाटायला लागते. यातच समांतरपणे चालणारा एक विद्रोही, परिवर्तनवादी प्रवाह असतो. कष्ट, दु:ख, अन्याय आणि यातना यांचा हा एक क्रोधी उद्गार असतो. प्रत्यक्षात ते तसले आयुष्य जगावे लागणारे त्याला तडक अभिव्यक्ती देतात तर ज्यांना स्वत:ला त्या झळा लागत नाहीत त्यांना एक नैतिक भूमिका घेत, बघा हे दु:ख, बघा हा अन्याय असे संवेदनशील राहणे महत्त्वाचे वाटते. म्हणजे जणू काही ती दु:खे भोगणारे आणि हे संवेदनशील लोक सोडून बाकीचेच सगळे या विषमतेला जबाबदार आहेत, असा हा आत्ममग्न, आत्मतुष्ट पवित्रा असतो.

कला या अर्थी कवितेबद्दल बोलायचे झाल्यास, या सर्व बदलांबरोबर सामान्यत: माणसांच्या प्रतिक्रियारूप मनस्थिती बदलत जात असल्याने कवितेच्या अभिव्यक्तिपद्धतीही बदलत जात असतात. जागतिक कवितेत हे बदल मोठ्या प्रमाणावर झालेले दिसतात. ते बदल स्वीकारणेही जणू त्यांच्या जगण्यातली सहज प्रक्रिया असल्याचे दिसते. मराठीत मात्र जरा डल, मंदबुद्धी वातावरण दिसते. वेगळे काही आले की आधी ते फेटाळायचा प्रयत्न करायचा ही इथली परांपराच आहे. ती इमानेइतबारे जोपासण्याचे काम सर्वच जातींतून आणि वर्गांतून घडत राहते. फेटाळण्याची प्रतिक्रिया विषमताहीन आणि एकोप्याची असल्याचे दिसते. भावनिक किंवा भावविवश कवितेची इथली आवड कोणत्याही बदलांची दखल न घेता वर्षानुवर्षे टिकून राहिलेली दिसते. प्रत्यक्ष जगण्यात खरे तर भावनेचा अभाव, व्यावहारिकता, जे आहे ते आहे तसे पाहणे, ऊरबडवेपणा वा हळवेपणा करत न बसणे, हे घडत असलेले दिसते. पण इथे कवितेत भावनिकता कमी दिसली रे दिसली की लोक उसळून उठतात. रममाण होण्याचे, वाहून जाण्याचे, त्यासाठी लागणारी लयीची गुंगी वा सजावटीचे सामान हे सगळे जर नसेल कवितेत तर हवालदिल होणारे बरेच लोक इथे आहेत. विद्रोही कवितेतही आहे तो रटाळपणा चालू ठेवण्याचे अथक प्रयत्न चाललेले दिसतात.
मुळात बोंबलायला वाचते कोण हो मराठी कविता ? ज्या कवितांची भावविभोर गाणी होऊ शकतात त्याच कविता इथे जरा पोचू शकतात – हे खरेच आहे. तरीही काळानुरूप होणारे प्रतिक्रियांच्या प्रक्रियांतले बदल समजून घेण्याचे महत्त्व आपण ओळखायला हवे, असे सुचवावेसे वाटते.

नुसत्या प्रतिक्रियांतून मौल्यवान कविता नाही निर्माण होत. त्यासाठी लागणारे भान वा मर्मदृष्टी कोणत्याही काळात, कोणत्याही प्रकारच्या मानसिक अवस्थेतून येऊ शकते. ते प्रतिक्रियांचे सम्यक भान असते. ते असलेल्या कोणत्याही कविता या सर्वच काळाला प्रस्तुत असतात कारण त्या मनाच्या साच्यात अडकलेल्या नसतात. व्यक्तिगत अनुभव आणि प्रतिक्रिया यांचे अलिप्त भान असल्याशिवाय कवितेला मूल्यात्मकता येत नाही.
--- ००० ---

२६ जून २०२१.

कविता म्हणजे काय ?

अलीकडे किंवा पूर्वीपासूनच कवितेच्या आकारात, ओळी तोडून मी जो ‘ गद्य ‘ मजकूर कविता म्हणून ‘ खपवतो ‘ त्यामुळे बरेच मित्र-मैत्रिणी अस्वस्थ होतात आणि माझ्याबद्दल मुळात स्नेहभावना असल्यामुळे जरा सौम्यपणे विचारतात की या असल्या मजकूराला कविता का म्हणावे ? अगदी वरवर पाहिले तरी बौद्धिक स्तरावर जगाच्या मूल्यव्यवस्थेत आणि त्यामुळे दृष्टिकोणात बदल होत असतात आणि त्याचे परिणाम अभिव्यक्तिपद्धतींवरही होत असतात, हे समजून घेतले पाहिजे. असे समजून घेण्याची पद्धत आणि कुवत बहुसंख्य मराठी साहित्यिकांत आणि रासिकांत नाही, हे दुर्दैव आहे. खरे तर ‘ रसिक ‘ हा शब्दही बदलायला हवा आहे कारण तो भावनिक परिणामाचा द्योतक आहे. कवितेतल्या भावनिकतेला जोरदार प्रतिक्रिया जगात कधीपासूनच – खूप वर्षांपूर्वीपासून आलेली आहे. भावनिक वा भावविवश नसलेली न-कविता जगात अवतरून बरीच वर्षे झाली. तसेच अतिवास्तववादाचेही आहे. हा काही वैचारिक वाद नसतो नुसता – हे प्रत्यक्ष जगण्यातले सत्य असते. आपण म्हणणार, ते तिकडचे आहे, आपल्या मातीतले नाही. हा निव्वळ बावळटपणा आहे. मन

वापरण्याची पद्धत जगभर एकसारखीच असते, शिवाय, आता तर समजण्या-पाहण्याच्या स्तरावर जगाचे सपाटीकरण झालेले आहे, होत आहे, हे मराठीवाले सोडून सर्व जगाला कळत असते. मराठी मात्र अंग मुडपून पडून असते आपल्याच देशी कोषात. कवितेचे मुख्य लक्षण सूचकता हेच मानले जाते. ही सूचकता एक तर अनुभवाची व्यामिश्रता वेधणारी असू शकते आणि दुसरे म्हणजे दिलेल्या मजकूराच्या बाहेरचे भान निर्माण करणारी असू शकते. ते मजकूराच्या बाहेरचे, मजकूराच्या मर्यादा ओलांडणारे जे भान व्यक्त होते ती असते कविता. आणि ही अशी कविता कोणत्याही साहित्यप्रकारात असू शकते. मेघना पेठे आणि सतीश तांबे यांच्या कथालेखनातही ती असते. दृश्य स्वरूपात कथा, कादंबरी, नाटक, कविता, असे भेद मानले तरीही. ‘ वेटिंग फॉर गोदो ‘ ही या अर्थाने कविताच असते. तरीही ‘ कविता ‘ या साहित्यप्रकाराची दृश्य वैशिष्ट्ये आणि तंत्रकौशल्ये वेगळी असतात. ‘ गद्य ‘ वाटणाऱ्या मजकूरातही, शब्दक्रम, ओळी तोडणे, उताऱ्यांची वा कडव्यांची रचना अशी अनेक तंत्रे वापरली जात असतातच. मराठीची मर्यादा ही आहे की अजूनही इथे भावनिकता, सांगीतिक लयबद्धता, प्रतिमा व अलंकार यांचे स्तोम आहे. मुख्य म्हणजे व्यक्तिगत सुखदु:खे, भावभावना आणि प्रतिक्रिया म्हणजेच कविता अशा खुजा, संकुचित मर्यादेत मराठी कविता फिरत असते. त्यामुळे, माझ्या कविता काय किंवा रवींद्र लाखे वा श्रीधर तिळव्यांच्या कविता काय, नाकारण्याकडेच इथे कल दिसतो. या कवितांना ‘ गद्य ‘ म्हणून  फेटाळावे आणि आपला सवयीचा संसार सुखाने चालू ठेवावा, असा हा प्रकार आहे. जे लोक अशा कवींना ‘ गद्य ‘ म्हणून नाकारत असतात त्यांची मते नाकारणे हे अशा कवींनाही भाग असते.

आता प्रश्न फेसबुकावर येणाऱ्या कविता. या माध्यमाच्या उपलब्धतेमुळे लिहिणारे वाढलेले आहेत आणि बरेचसे सामान्य लेखनही प्रसिद्ध होत असते. या लेखनाला हेटाळून स्वत:चे श्रेष्ठत्व दाखवायची फॅशन मला मान्य नाही. या सगळ्यांचे स्वागतच केले पाहिजे, असे मला वाटते. जे स्वत:ला बनचुके समजतात त्यांचेही सगळेच लेखन खूप दर्जेदार असते, असे काही नाही. प्रत्येक लेखक नेहमीच त्याच्या कुवतीच्या अत्युच्च टोकाला जात असतो का ? तर, असे नाही होत. खूप लोक लिहीत असतील तर लिहू द्यात, त्यांना नाउमेद करणारे आपण कोण ? अशी अधिकारवाणी कुणीही स्वत:कडे घेऊ नये, असे मला वाटते. सध्या सामान्य लिहिणारे जे आहेत तेही शिकत जातील, त्यांच्या लिहिण्याच्या आवडीसाठी इतरांचे वाचतही राहतील, त्यांनाही आशयाचे गांभीर्य म्हणजे काय, हे कळत जाईल, या शक्यता बंदच करायचे प्रयत्न कुणी करू नयेत आणि असे प्रयत्न करणाऱ्या लोकांना लिहिणाऱ्यांनीही जुमानू नये.

माझा अनुभव, माझा राग, माझे शौर्य एवढीच नसते कविता. आणि असे ज्यांना वाटत असेल ते त्यांचे त्यांना लखलाभ !

--- 0 ---

कवितेचा आशय -- १.

चिडचिड करायची नाही. हा एक प्रयोग आहे. आपण साहित्याच्या, कवितेच्या क्षेत्रात आहोत तर आपण स्वत:ला तपासण्याचे कामही चालू ठेवले पाहिजे. माझ्याकडे एक कविता आहे, कुणाची ते विचारायचे नाही. ती मी इथे देतो आहे. ती कविता कशी वाटते, आवडते वा नावडते याच्या सकारण प्रतिक्रिया द्यायच्या. मीही माझी प्रतिक्रिया शेवटी देणार.

कविता अशी आहे --

खुनास अंधाराच्या<br>
सखी सावळी साक्षी<br>
निकाल येण्याआधी<br>
घंटेचा होतो पक्षी

यावर जरूर मते यावीत. आपण कवितेचे रूप आणि आशय यांचा विचार करत आहोत. त्या दृष्टीने मनापासून पण व्यक्तिगत रागालोभाशिवाय बोलावे.

कॉमेंटस मधून --
( १ ) या ओळी मीच लिहिलेल्या आहेत. अतिवास्तववादाचे एक तत्त्व असेही आहे की वैचारिक अर्थाच्या अट्टहासात कवितेची प्रक्रिया न जखडता येतील तशा येऊ द्याव्यात ओळी. ब्रेटन तर म्हणतो की नंतरही त्यांत दुरुस्त्या करून सफाई आणायचा प्रयत्न करू नये. थोडक्यात, ज्या मनातून येणार त्या ओळी त्याची जी काय असेल ती चिंतनशीलता आपोआप त्या ओळींत येईल. त्यामुळे, अगदी प्राथमिक स्तरावर या ओळींकडे एक निरर्थक मजकूर म्हणून पाहावे. शाब्दिक वा वैचारिक अर्थाची आग्रही मागणी न ठेवता काय जाणवते ते पाहावे. ( २ ) खोट्या प्रतिमा, खोटी लयबद्धता आणि निरर्थक चमत्कृती हे मला चांगल्या कवितेसाठी अडथळे वा शत्रूच वाटतात. ते प्रात्यक्षिक देण्यासाठी म्हणून या ओळी लिहिल्या गेलेल्या असू शकतात. ( ३ ) एका बाजूला शब्दार्थ, वैचारिक अर्थ आणि दुसऱ्या बाजूला कृतीची सलगता. पण त्या दोन्हींत एकरूपता – सायुज्यता नसणे. माणसाच्या जगण्यातल्या विदीर्णतेचे हे एक प्रमुख कारण आहे. ते अभिव्यक्त करणे हेही असू शकते. कारण ही मला नेहमीच जाणवत राहणारी बाब आहे. याच अभिव्यक्तितंत्राने मी एक पूर्ण एकांकिका लिहिलेली आहे. ‘ संसाराणुपेंडघार ’. त्या एकांकिकेका आय एन टी चे लेखनाचे पारितोषिक होते. पण एकांकिका लेखनातला हा प्रयोग पूर्णत: दुर्लक्षित राहिलेला आहे. लेखकाला वा कवीलाच स्वत:च्या कलाकृतीबद्दल बोलावे लागावे, याला दुर्दैवच म्हणायला हवे. ( ४ ) खोट्या चमत्कृतीला वाहवा म्हणण्याच्या सत्यतेची खिल्ली उडवणेही मनात असू शकते. त्यामुळे, खरे तर ते ‘ घंट्याचा ’ होतो पक्षी असेही मनात आले असणार पण लिहिताना ‘ घंटेचा ’ असे अर्थशक्यतेच्या अंगानेच लिहिले गेले. ( याचा पुढील भाग दुसऱ्या कोमेन्टमध्ये दिला आहे -- )
( ५ ) आता अर्थाच्या अंगाने पाहू. अंधार म्हणजे काही वाईट, मनाचा गोंधळ, दु:खी अवस्था. ती नष्ट होणे, तिचा खून होणे, तिची हिंसा होणे – ही भाषा गुन्ह्याची आहे पण हा वाईटाचा नाश आहे. आणि हा कुणाच्या उपस्थितीत झाला आहे तर सावळ्या सखीच्या. ही गालिबच्या प्रेयसीसारखीच आहे. ‘ सखी सावळी साक्षी ’ यातल्या अनुप्रासाने तिच्याबद्दलची आपुलकी, लाड हे व्यक्त होते. खरे तर तिच्या साक्षीमुळेच ते घडलेले आहे. ती सावळी आहे. पूर्ण नीट दिसणारी, समजणारी नाही. हे अवधानाचे – भानाचे एक गूढ अस्तित्व आहे. आता या ‘ गुन्ह्या ’ नंतर खटला दाखल होणे आणि शिक्षा होणे ही प्रक्रिया खरे तर अपेक्षित असणार. पण, निकाल येण्याआधीच त्या सखीच्या उपस्थितीमुळे ‘ घंटेचा होतो पक्षी ’. जी घंटा वाजवून, द्वाही फिरवून गाजावाजाने निकाल होऊ शकला असता त्या घंटेचाच पक्षी होऊन उडून जातो आहे. आता त्या ‘ हिंसक ’ घटनेचे काहीच शिल्लक नाही. जणू काही घडलेच नाही. कोणतीही घटना घडते ती एखाद्या केंद्राच्या संदर्भात असते. घटना घडलीच नाही याचा अर्थ केंद्रच राहिलेले नाही. म्हणजेच त्या सखीने वाईटाचा नाश केला याचा अर्थच मानसिक केंद्राचा नाश केला. आणि एकूणात काही घडलेच नाही असे स्वातंत्र्य निर्माण केले. सार्त्रच्या ‘ फ्लाईज ’ या नाटकात ओरिस्टीस या पात्राचे असे सत्य दाखवण्यात आलेले आहे. अलीकडेच मी इथे दिलेली ‘ सार्त्र ’ ही कविता पाहावी. एकूणात, घटनांचे सातत्य आणि वैचारिक अर्थ यांच्या अस्तित्वाबद्दलच ही कविता शंका उपस्थित करत आहे.
तर एवढे बास. मराठीत हा सगळा सहजच चेष्टेचा विषय होऊ शकतो याची मला कल्पना आहे. आहे ते टिकवून ठेवणे आणि नवे काही येऊच न देणे, हा प्रयत्न इथे सतत चालू असतो. कोणत्याही लिहिणाऱ्याने तसल्या गोष्टींची तमा बाळगू नये, असे मला वाटते. ‘ हे बघा माझे दु:ख – हे बघा किती वाईट जगणे ’ एवढेच बोलत राहण्यासाठी असते का कविता ? कोणत्याही मताशिवाय आणि निष्कर्षाशिवाय जगण्याकडे पाहता येईल का, असा प्रश्नही पडू नये ? कवीही जगण्याकडे

वैज्ञानिक दृष्टीने, स्वत:ची भावनिकता बाजूला ठेवून पाहू शकतो, हे लक्षात घ्यावे. म्हणजेच कवितालेखन ही घटनाविरोधी कृती नसून पूर्णत: घटनेशी सुसंगत असणारी ती एक महत्त्वाची प्रक्रिया आहे, हे समजून घ्यावे.
--- 0 ---

कवितेचा आशय – २.

सामान्यत: कवितेचे वाचक हे काव्यमय अर्थाचे भोक्ते असतात. म्हणजे त्यांना बौद्धिक, भावनिक अर्थ हा सांगीतिक लयीतून आणि सजवून हवा असतो. मग तो अर्थ एकरेषीय निवेदनासारखा मर्यादित असला तरी त्यांना चालते. मराठीतल्या बहुसंख्य मान्यताप्राप्त कविता या एकरेषीय निवेदनेच आहेत. कवितेच्या अर्थाला अशी काव्यमयता देण्यात ग्रेस हे कवी आघाडीवर आहेत. मी ज्या प्रकारच्या कविता लिहितो ते पाहता किंवा ‘ व्यक्तिगतता ‘ असणाऱ्या कविता खुज्या असतात असे म्हणतो त्यावरून मी काही ग्रेस यांच्या कवितेचा चाहता नाही, हे कुणीही ओळखू शकेल. सुरुवातीला त्यांच्या काही कविता मी वाचल्या पण नंतर ये मेरी चाय नही है, हे ओळखून मी तो नाद सोडून दिला. तरीही त्यांचे चाहते उदंड असल्यामुळे त्यांच्या काही कविता वा ओळी समोर येत राहिल्या. तर तेवढ्या तुटपुंजा शिदोरीवर आधारितच मला जे प्रश्न पडले ते मांडतोय. ग्रेस यांच्या या ओळी घेऊ --
मी महाकवी दु:खाचा
प्राचीन नदीपरी खोल
दगडाचे माझ्या हाती
वेगाने होते फूल
मुळात दु:खाचा महाकवी ही कल्पनाच मला मान्य होऊ शकत नाही. दु:ख मांडणे वा दु:खाची अनुभूती देणे हे मी कवितेचे सर्जक काम मानतच नाही. पण हा कवी स्वत:ला त्यातला महाकवी म्हणून जाहीर करतो तिथेच माझ्या दृष्टीने विषयच संपतो. माझे म्हणाल तर मी न-कविता, अतिवास्तववादी कविता, असंगत कविता, निरर्थक कविता वा स्वयंचलित कविता – हे सर्व प्रकार महत्त्वाचे मानू शकतो. पण काव्यमय अर्थाचे भोक्ते वाचक जे असतात त्यांचे तसे असू नाही शकणार. त्यांना काव्य आणि अर्थ ( वर दिलेल्या अर्थाने ) दोन्ही लागणार. तसे नसेल तर त्या मजकूराला ते कविता म्हणून मान्यताच नाही देणार. हे लक्षात घेऊन मला असा प्रश्न पडतो की अशा वाचकांना या चार ओळींत अर्थ काय सापडत असावा ? हा प्राचीन नदीपरी खोल आहे म्हणजे हा काही नुसताच सध्याचा संस्कारित वा प्रभावित साचा नाही आहे. शिवाय, त्याचा स्पर्श होताच ‘ वेगाने ‘ म्हणजे सत्वर – त्या क्षणी, दगडाचे फूल होते आहे – म्हणजेच दु:खाचे आनंदात रूपांतर होते आहे ! म्हणजेच, दु:ख क्षणभरही अस्तित्वातच येऊ शकत नाही आहे. मग हा स्वत:ला दु:खाचा महाकवी का म्हणवून घेतो आहे ? वाचकाला यातून ‘ अर्थ ‘ काय प्रतीत होत असेल की तो नुसताच काव्यमय चमत्कृतीने वा जादूने प्रभावित होऊन ‘ वाह ‘ म्हणत असेल ? दुसऱ्या एका ठिकाणी त्यांच्या अशा ओळी पाहिल्या --
सूर्य रोज अस्ताला जातो
कळे ना मज काही
झोळीत कधीही माझ्या
अंधार उगवला नाही
इथेही अर्थ तोच येतोय. यांच्याकडे अंधार उगवलाच नाही ! दु:ख अनुभवाला आलेच नाही ! इथे एक लक्षात घ्यायला हवे की माझ्या काय किंवा अनेक कवींच्या कवितांतला ‘ मी ‘ म्हणजे कवी स्वत: नसतो. तो एक पोएटिक पर्सोना असतो --

एक काव्यगत व्यक्तिमत्व असते – अनेकदा ती वेगवेगळी पात्रेही असतात. पेसोआ या जगप्रसिद्ध कवीने ७६ टोपण नावांनी वेगवेगळ्या कविता लिहिल्या. हे सजावटीचे भावनिक काव्य लिहिणारे कवी जे असतात ते सामान्यत: त्यांच्या कवितेतही स्वत:च उपस्थित असतात. त्यामुळे, तिकडे काय म्हटले त्याचा पुरावा दुसऱ्याही कवितेत, असे चालू शकते. तर अशा कवितांचे शौकीन लोक त्यातली भावनिकता, सजावट आणि जादू यांनाच भुलून ' वाह ' म्हणतात का, असा मला प्रश्न पडतो. इथे तर एकरेषीय अर्थाचाही अभाव दिसतो ! तरी वाचकांना हे कशामुळे चालत असेल ? की भावनिकता, सजावट आणि सांगीतिक लय एवढे सामान असले की अर्थाची गरजच नसते ? मस्त एंजॉय करता येते ? दु:खाच्या महाकवीच्या कविता अशा एंजॉय करणे कितपत समर्थनीय आहे ? की इकडे अशा दु:खहीन कविता लिहायच्या आणि तिकडे दु:खात बुडूनही लिहून त्याचीही वाहवा मिळवायची असा काही हा प्रकार असेल ? दु:खाची अशी चेष्टा करणे कुणालाही परवडणारे नाही, असे इथे सुचवून ठेवावेसे वाटते. राग नसावा, ही विनंती.

--- ००० ---

कवितेचा आशय – ३

आता हा मात्र मी जरा धोक्याचा खेळ करतोय. हा जर फसला तर माझे आख्खे कवितालेखन ( सुमारे १८०० पाने ) एका फटक्यात फेटाळून लावायची सोय उपलब्ध होऊ शकते. पण, वाचक सहृदय असावेत असे एक म्हटले जाते तसेच मराठीतही ते आहेत अशा विश्वासाने मी लिहितो आहे. इथे मी माझीच एक कविता घेऊन ती ( भावनिकता, सजावट आणि सांगीतिक लय नसूनही ) कविताच का आहे, हे सांगायचा प्रयत्न करणार आहे. असे काही करावे असे सुचणारे आणि तशी कुवत असलेले समीक्षकच मराठीत नसल्याने असा थोडा निर्लज्जपणा प्रत्येकच कवीने करणे गरजेचे आहे, असे मला वाटते. मुद्दाम शोधून, माझे नीट मार्केटिंग करता येईल अशी कविता न घेता सध्या हाताला येईल ती घेतोय –

प्लॅन

पटतेय मला तुमचे आम्ही तुमच्याबरोबर
नाही आलो तर तुम्ही आमचे
खूप नुकसान करू शकता पण मी
तुम्हाला वेगळा सांगतोय प्लॅन
आत्ता आमचे सभासद हितचिंतक यांना
डिस्टर्ब नको करायला आमचा तुम्हाला म्हणजेच
आपला एकमेकांना उपयोग होण्यासाठी
आमची शक्ती कमी होऊन चालणार नाही
सध्या आम्हाला त्यांच्याबरोबरच राहू द्या
त्यांची ताकद वाढू नये याची आम्ही काळजी घेत राहू
एकदम निवडणुकीच्या वेळी असे काही घडवू
की आपल्याला एकत्र येता येईल म्हणजे मग
त्यांना चेपणे सोपे जाईल सध्या आम्हाला
तुमच्या विरोधातच राहू द्या फार तर तुम्हीही
आमच्या विरोधी काही करत राहा पण नंतर

ते टोकाला जाणार नाही हे पाहू
हे आज आपण भेटलो ते
शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी असे म्हणू
पण फार तर दोघेही
एकमेकांच्या विरोधाची धार जरा बोथट करू
एखादे काही चांगलेही बोलू एकमेकांबद्दल
म्हणजे आपल्या एकत्र येण्याचा धक्का
त्या वेळी जरा कमी बसू शकेल
बाकी तुमचे आमचे विद्वान आपण जे जे
करत राहू त्याचे समर्थन करतच राहतील
काही असतील स्वत:ला निस्पृह समजणारे
ते फार तर आम्हाला विश्वासघातकी म्हणतील
त्याने फारसे काही बिघडत नाही
शेवटी मतदार संभाळणे महत्त्वाचे विद्वान नव्हे
--- ००० ---

सुमारे १९६५ च्या आसपास ' टाइम ' मासिकात मी निस्सीम ईझीकेल यांचा एक लेख वाचला होता. कवितेतली भावनिकता कशी लोप पावत चाललेली आहे असा काही तो विषय होता. मला तो लेख विशेष महत्त्वाचा वाटला कारण मी तशीच कविता लिहीत होतो. त्यानंतर सुमारे १९७७ ला माझा ' कवितेतील अ-भाव ' हा लेख ' सत्यकथे ' त आला, त्या लेखात मी ईझीकेल यांच्या त्या लेखाचा उल्लेख केला होता. स्वत:ची भावनिकता व्यक्त करणे हे मला कवितेचे महत्त्वाचे काम आहे, असे कधीच वाटले नाही. सांगायचा उद्देश म्हणजे, अजूनही आपल्याकडे हा विषय ताजातवाना आहे याकडे लक्ष वेधणे. मी वर दिलेली माझी कविताही त्याच कारणामुळे काहींना ' कोरडी ' वाटू शकते. खरे तर हा काळाचा महिमा आहे. व्यावहारिक आत्मकेंद्रितता हा आता जगण्याचा मूलमंत्रच आहे. पण, इथली कविता मात्र यापासून अलिप्त, आहे तशी ओली, हळवी राहावी असे प्रयत्न इथे निकराने सुरू असतात. वाचकांचीही सामान्यत: तीच मागणी दिसते. हे असे कशामुळे आहे त्या चर्चेत इथे जात नाही. तर मुद्दा असा की वातावरणातच एक निर्दय स्पर्धा आणि सरळ सरळ मूल्ये, नीती, या सगळ्या गोष्टी विक्रीयोग्य झालेल्या आहेत. काळाच्या याच भानातून ही कविता लिहिलेली आहे. राजकारण हे आपण सामान्यत: समोर येणाऱ्या बातम्यांतून समजून घेत असतो. तेही आपल्या कुवतीप्रमाणे. कवी म्हणून मला याची खोलातली पाताळयंत्रणा पाहावीशी वाटली. मी काही प्रत्यक्ष राजकारणातला अनुभवी वगैरे नाही. पण, माणसाचे मन आणि त्याचा हलकटपणा हे मी जाणून असतो. कोणताही लेखक वा कवी त्याच्या या मन-भानावर आधारितच लिहीत असतो. तर ही कविता म्हणजे दोन पक्षांच्या हायकमांडांमधला संवाद आहे. ही माझी नव्हे तर पात्रांची कविता आहे. कवितेची सुरुवात थंडपणे होते पण विषय काय आहे तर ' तुम्ही आमचे खूप नुकसान करू शकता ' ! तो देवघेवीला वा ' एकत्र ' यायलाही तयार आहे, पण सध्या नको, एवढेच सुचवतोय. पुढे हे कसे घडवायचे याचा प्लॅनही तो त्याच थंडपणाने सांगतोय. मध्यंतरीच्या काळात आपण विरोधीच राहू, म्हणतोय. म्हणजे तो आत्ता ज्यांच्याबरोबर आहे त्यांना पूर्ण गंडवून तो पुढचे ' यश ' साकारू इच्छितोय. यात कोणतीही तत्त्वे वा विवेक वा देशहित वगैरे असले विचार असूच नाही शकत. हे वेळ येईल तसे, त्यातूनही आपले हित साधत जाणे आहे. लोकांना दिसणार वेगळे पण मुळात असणार वेगळे. तुमचे आमचे विद्वान आपण जे काय करत राहू त्याचे समर्थन करत राहतीलच, असे तो म्हणतो.

कहर म्हणजे, एखादा निस्पृह विद्वान आम्हाला विश्वासघातकी म्हणेल, पण , ते काही महत्त्वाचे नाही, असे म्हणतो. विश्वासघातकी असणे आणि कुणी तसे म्हणणे हे इथे मुळीच महत्त्वाचे राहात नाही. म्हणजेच, बातम्यांवरून वरवर दिसणारे सगळे तसेच खरे असण्याची शक्यता नाही, दिसते त्यापेक्षा वेगळेच प्लॅन शिजत असू शकतात आणि बुद्धीने प्रचंड विश्लेषण करू शकणारे विद्वान नगण्य, निरर्थक असतात ! जगण्यातली ही अब्सर्डिटी व्यक्त करणे हे माझ्या कवितेचे एक काम असते. सर्व बौद्धिक भान, समज आणि अभ्यासयुक्त विश्लेषणे फडतूस ठरण्याचे सत्यदर्शन ही कविता देते. ते भान त्या कवितेच्या मजकुरात नसून ते सगळे वाचून झाल्यावर येणारे असे आहे. एकेका ओळीवर असे बोलत बसत नाही. हे काही माहिती देणारे गद्य टिपण नाही. यात जगण्याच्या अवस्थेचे आणि प्रक्रियेचे स्वच्छ पण अमुक असे मर्यादित नसलेले भान व्यक्त होते आहे. त्यामुळे, ही कविताच आहे, असे मला म्हणायचे आहे. मी म्हटल्याने काही खरेखोटे ठरत नाही, हे मला समजते, पण, सद्यस्थितीत असे ‘ आपले आपण ‘ बोलायला हवे, असे मला वाटले. या असल्या लेखनाच्या या उद्योगासाठी मी दिलगीर असून माफी चाहता हूं !

--- ००० ---

०८ जुलै २०२१

कुसुमाग्रजांचा ईश्वर-विचार

वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा जन्म १९१२ साली झाला आणि ते १९९९ साली निवर्तले. या काळातल्या महत्त्वाच्या घटना म्हणजे १९३० साली, डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली झालेल्या काळाराम मंदिराच्या दलित प्रवेश आंदोलनात त्यांनी घेतलेला सहभाग, १९५६ पासून झालेल्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीतही झालेले त्यांचे योगदान आणि १९६७ ते १९८२ या काळातली त्यांची साहित्य निर्मिती लक्षात घेऊन त्यांना १९८७ साली दिला गेलेला ज्ञानपीठ सन्मान. त्यांच्या एकूण जगण्यात त्यांनी कथा, कादंबऱ्या, नाटके, कविता अशी विपुल साहित्य निर्मिती केली. इथे त्यांचे कवितालेखन विचारात घेऊन काही लिहिण्याचा विचार आहे. त्यासाठी प्रामुख्याने माझ्या  समोर, शंकर वैद्य आणि बा. भ. बोरकर यांनी संपादित केलेले कुसुमाग्रजांच्या निवडक कवितांचे ‘ रसयात्रा ‘ हे पुस्तक आहे. शिवाय नेटवर सापडलेला काही प्रस्तुत मजकूरही आहे.

कुसुमाग्रजांच्या कविता वाचत असताना प्रथम लक्ष वेधून घेते ते त्यांचे तेजस्वी भाषावैभव. त्यांच्या कविता सोन्याचांदीप्रमाणे झळाळत्या, रत्नखचित शब्दांच्या, चमकत्या, किरणमयी, तेजस्वी आहेत. शब्द, भाषा, रचना यांवरचे त्यांचे प्रभुत्व आणि कौशल्य दिपवून टाकणारे आहे. अर्थात ते अवडंबर वाचताना अडथळाही ठरते आणि वाचनाची गतीही नियंत्रित करते. कधी कधी तर नको ती श्रीमंती, असेही होते. त्यांच्या बऱ्याच प्रख्यात कविता या वैशिष्ट्यांनी युक्त आहेत. या कविता प्रामुख्याने कल्पना विलासाला मुबलक वाव देणाऱ्या आहेत – उदाहरणार्थ – अहि-नकुल, कोलंबसाचे गर्वगीत, आगगाडी व जमीन, पृथ्वीचे प्रेमगीत, वगैरे. कल्पनाविलास उत्तुंग आहेत. बऱ्याच कविता देशभक्ती व शौर्य यांचा गौरव करणाऱ्या आहेत. या शौर्याची माणसाला गरज पडावी, ही एक मोठी समस्या आहे असे त्यांना वाटल्याचे कुठे दिसत नाही. सर्वसामान्यपणे रागालोभाच्या, अभिमानाच्या, अस्मितेच्या ज्या भावभावना लोकांच्या मनांत असतात त्याच स्वीकारून ते चमक-दमक कविता लिहितात, असे दिसते. यांना जगण्यात कधी मोठ्या दु:खाचा धक्का बसला असेल का, काही असह्य समस्यांची झळ लागली असेल का, असे प्रश्नच पडावेत असा एकूण या कवितांचा माहोल आहे. “ सामाजिक अन्याय व विषमता या विषयांवर कुसुमाग्रजांनी त्यांच्या लिखाणातून कठोर टीका केली. ‘ साहित्यिकाने सामाजिक बांधिलकी मानली पाहिजे ‘ या मताचा त्यांनी पुरस्कार केला. कुसुमाग्रजांचा साहित्यविचार समाजसापेक्ष असून ते सामाजिकतेलाच परतत्त्व मानतात. कुसुमाग्रज, क्रांती ही साहित्याची प्रेरणा मानतात. साहित्य हे परिवर्तनास पूरक ठरू

शकते, असे मानतात. त्यामुळे साहित्याला ते विशुद्ध कला मानत नसून सामाजिक साधन मानतात. “ असे म्हटले गेलेले आहे. पण तेही काही प्रभावीपणे वा तीव्र तातडीने व्यक्त झाले आहे, असे फारसे दिसत नाही. विद्रोह वा परिवर्तनावाद हा त्यांच्या रक्तात भिनून येतो आहे, असे वाटत नाही. इथे ‘ रसयात्रा ‘ च्या प्रस्तावनेत शंकर वैद्यांनी लिहिलेले हे वाक्य प्रस्तुत ठरावे – “ कुसुमाग्रजांचे प्रेम, परमेश्वर, समाज, जीवन अशा वेगवेगळ्या विषयांसंबंधीचे विचार जीवनलहरीपासून व्यक्त होत आलेले आहेत. परंतु त्या सर्वांतून एक सुसूत्र विचारप्रणाली हाती लागावी असे त्या विचारांचे एकमेकांशी खोलवर नाते जुळत नाही. “ हे सर्व लक्षात घेता, प्रश्न असा पडतो की मूलभूत समस्या दिसत नाहीत, जगण्यातली गुंतागुंत जाणवत नाही तर मग या कवीचे गांभीर्य शोधावे तरी कुठे ? या प्रश्नामुळे मग लक्षात येते की देवाचे अस्तित्व यावर विचार मांडणाऱ्या बऱ्याच आहेत त्यांच्या कविता. म्हणून मग मुख्यत: यावरच लक्ष केंद्रित करावे असे ठरवले. याच विषयावर, नेटवर, आसावरी काकडे यांनी लिहिलेला एक लेख उपलब्ध आहे. पण मला काही वेगळे बोलायचे आहे. त्यासाठी खाली काही कविता विचारार्थ घेत आहे.

‘ सुख पाहता जवापाडे दु:ख पर्वताएवढे ‘ हा अनुभव सर्वच माणसांना येत असल्याने, दु:ख का होते, हे निर्माणच कशासाठी झाले सगळे मुळात, याचा कुणी निर्माता वा चालक आहे का, जगण्यात चांगले-वाईट असे काही असते का, शोषक-शोषित असे भेद का आहेत, जगण्याला काही हेतू वा अर्थ आहे का – असे अनेक प्रश्न माणसाला हजारो वर्षे पडत आलेले आहेत. त्यातूनच ईश्वर वा देव ही अस्तित्वे मानली गेलेली आहेत. कुणाही गंभीरपणे जगणाऱ्याला हे प्रश्न पडणे साहजिक आहे. त्याबाबतचे चिंतन घडणे हे तसे अपरिहार्य आहे. खालील कविता वाचताना याबाबतची उत्सुकता असणे योग्यच आहे.

पाऊल चिन्हे

मी एक रात्रि त्या नक्षत्रांना पुसले
परमेश्वर नाही घोकत मन मम बसले
परि तुम्ही चिरंतन विश्वातील प्रवासी
का चरण केधवा तुम्हांस त्याचे दिसले !
स्मित करुन म्हणाल्या मला चांदण्या काही,
तो मुक्त प्रवासी फिरत सदोदित राही
उठतात तमावर त्याची पाउल चिन्हे –
त्यांनाच पुससि तू, आहे की तो नाही
--- ० ---

‘ कलंदर ‘ या कवितेत ते म्हणतात –

माझ्या साम्राज्यात आता
मीच भूप मीच राजा
माझ्या देवळात झालो
मीच देव मीच पूजा

आणि शेवटी –
माझ्या आत्मतेस नाही
आता अहंतेचा पार
झाले आनंताचे घर
त्याला जीवनाचे दार.
--- ० ---

निराकार

या दु:खाला नाही आकार
नाही रंग, नाही नाव –
ते आहे माझे
पण मी ओळखत नाही त्याला
आणि नसशील ओळखत तूही
मला माहीत आहे इतकेच –
तुझा रुपेरी रथ दूर जात असता
या क्षितिजावर जो तरंगत होता
निळापांढरा मेघ
त्या मेघातच जन्म झाला
या निराकार दु:खाचा
आणि त्या मेघाप्रमाणेच –
ते फिरते आहे आकाशाच्या पोकळीत
शोधीत स्वत:साठी
एखादे नाव, एखादी रेषा –
एखादी आकृती.
--- ० ---

जोगीण

मला हवी आहे नास्तिकता
पण सहस्त्र वर्षे
मनाला मिठी घालून बसलेली
ही आस्तिकता होत नाही दूर
माझ्यापासून.
रंगमंचावरील दिव्यांच्या प्रकाशात

व्याधाच्या नक्षत्रासारखी
विविध रंगांत उमलणारी
सुरेल पदन्यास करीत
माझ्या अंत:करणात प्रवेश करणारी
ती मोहक नृत्यांगना
उभी आहे माझ्या मंदिराच्या दाराशी.
पण मलिन वस्त्रे परिधान करून
गहन काळोखात गुरफटलेली
एकतारीवर एकच एक गीत गाणारी
ही उदासी मितभाषी जोगीण
मान टेकून दरवाजाच्या स्तंभावरती
बसली आहे वाट अडवून
प्रवेशाच्या पायरीवर.
--- ० ---

पांथस्थ

अज्ञाताच्या गूढ धुक्यात
अस्पष्टपणे तरळणाऱ्या तुझ्या अस्तित्वापर्यंत
कोणाची पावले कधी पोहोचली नाहीत,
माझीही पोहोचणार नाहीत.
आणि तरीही –
त्या असाध्याकडे जाणाऱ्या मार्गावर
मी जातो आहे पुढे, सारखा पुढे –
गतीने बधिर झालेल्या माझ्या मनाला
आता स्मरण उरले नाही त्या स्थळाचे
ज्याच्याकडे मी जात आहे.
आणि राहिली नाही आवश्यकता
तेथपर्यंत पोहोचण्याचीही.
कारण या गतीतच आहे त्या श्रेयाचे संपादन
या प्रवासातच आहे
प्रवासाची अंतिम सांगता.
--- ० ---

मार्जिन

ईश्वर नाही म्हणता ? माझे –
मतही अगदी तसेच आहे
ऐकलेत ना परवा भाषण
सांगितले मी –
या विश्वाच्या विविध दर्शनी
जड तत्त्वाचा अंध कायदा
भरून राहे.
हेही म्हटले, जिथे न जाते
प्रज्ञा तेथे कशास घ्यावा
शोध वगैरे
म्हणून म्हणतो ईश्वर नाही
या मुद्यावर तुमचे अमुचे
जमते सारे.
हो हो आपण म्हणता तेही
नाही खोटे
रोज प्रार्थना मीही करतो
हात जोडल्याविना जिवाला
बरे न वाटे
देव नसे पण शक्ति असे ती
जिचे नियंत्रण जगतावरती
तिचे कराया स्तवन जरासे
अडचण कोठे ?
नाही – अगदी तसेहि नाही –
मानवमन ना निराकारता
कधी साहते
आणि अखेरी आहे-नाही
तिथेच असते.
अचेतनाला करी सचेतन
शून्याला दे अर्थाचे धन
मग अपुऱ्या नजरेने जीवन
सदा पाहते –
म्हणून माझ्या डोळ्यापुढती
किरीटधारी रूप प्रभूचे
( मंदिरातले तजबिरीतले )

उभे राहते.
असो तसे पण – ( मार्जिन सोडा )
ईश्वर नाही या प्रश्नावर –
अपुले जमते.
--- ० ---

## मार्ग

चालतो मी सारखा हा
चालण्याला अंत नाही
चाललो कोठे कशाला
हीहि आता खंत नाही.
एकदा पूर्वी मलाही
वेड होते शोधण्याचे
वेदनेवाचून काही
लाभ झाला त्यांत नाही
जाणत्या थोरांकडेही
खूप केली चौकशी मी
शब्दजालांतून कळले
अज्ञतेला पार नाही.
योजनेचा या नकाशा
ज्या ठिकाणी ठेवलेला
खंदकाने वेढलेल्या
त्या स्थळाला दार नाही.
ना कळावे हीच इच्छा
जो कुणी आहे तयाची
शोधता त्याच्या कृपेचा
शोधका आधार नाही
मी म्हणोनी सोडला तो
नाद आता मंझिलाचा
चालण्याचे श्रेय आहे
अन्य धर्माचार नाही.
--- ० ---

## गाभारा

दर्शनाला आलात ?
या...
पण या देवालयात
सध्या देव नाही.
गाभारा आहे, चांदीचं मखर आहे,
सोन्याच्या समया आहेत,
हिय्रांची झालर आहे
त्यांचंही दर्शन घ्यायला
हरकत नाही.
वाजवा ती घंटा
आणि असे इकडे या...
पाहिलात तो रिकामा गाभारा ?
नाही...तसं नाही...
एकदा होता तो तिथे.
काकड आरतीला उठायचा
शेजारतीला झोपायचा,
दरवाजे बंद करून
बरोबर बाराला जेवायचा,
दोन तास वामकुक्षी घ्यायचा,
सारं काही ठीक चाललं होतं.
रूपयांच्या राशी
माणिकमोत्यांचे ढीग
पडत होते पायाशी,
दक्षिण दरवाज्याजवळ
मोटारींचे भोंगे वाजत होते,
मंत्रजागर गाजत होते,
रेशमी साड्या, टेरीनचे सूट
समोर दुमडत होते,
बँकेतील हिशेब हरिणाच्या गतीनं
बागडत होते,
सारे काही घडत होते
हवे तसे.
पण एक दिवशी...आमचं दुर्दैव...
उत्तर दरवाज्याजवळ अडवलेला

कोणी एक भणंग महारोगी
तारस्वरात ओरडला...
' बाप्पाजी बाहेर या ! '
आणि काकडआरतीला
पहाटे आम्ही पाहतो तर काय
गाभारा रिकामा.
पोलिसात वर्दी
आम्ही दिलीच आहे;
परत ? कदाचित येईलही तो...
पण महारोग्यांच्या वस्तीत
तो राहिला असेल
तर त्याला पुन्हा
प्रवेश द्यावा की नाही,
याचा विचार करावा लागेल
आमच्या ट्रस्टींना.
जयपूरला पत्रव्यवहार चालू आहे
दुसऱ्या मूर्तीसाठी.
पण तूर्त
गाभाऱ्याचं दर्शन घ्या,
तसं म्हटलं तर
गाभाऱ्याचंच महत्त्व अंतिम असतं.
गाभारा सलामत
तो देव पचास....
---- कुसुमाग्रज.

कुसुमाग्रजांचीच ' देवाच्या दारी ' नावाची एक कविता आहे. त्या कवितेत, वरील सर्व कवितांकडे पाहायला उपयोगी पडतील आशा काही सूत्ररूप ओळी आहेत, त्या अशा --

केव्हाचा रे उभा    मीही तुझ्या दारी
उशीर का परी    आज असा ?
म्हणतात तुझ्या    दयेला न अंत
पुकारती संत    थोरी तुझी
तुझ्या महिम्याची    प्रचंड पुराणे
गमती तराणे    अर्थहीन !
आणि आज मन    शंकित हे होई

आहेस की नाही      मुळात तू
दुर्बलता माझी      दडवाया गेलो
अधिक जाहलो      दुर्बल मी
परततो आता      रणात माघारा
सैनिका निवारा      समरात
माझ्या जीवनाचा      मीच शिलेदार
व्यर्थ हा पुकार      तुझ्या दारी
आहेस की नाही      आज नसे चिंता
दोहींमधे आता      भेद नुरे !

आता, आपण इथे घेतलेली एकेक कविता पाहात जाऊ. कुसुमाग्रजांच्या कवितेत संत वाङमयाचा उल्लेख येतो. आणि मराठीतल्या एवढ्या विपुल-लेखन कवीने ते वाचले असेलच असे आपण गृहीत धरू शकतो. आता, ज्ञानेश्वरांच्या देव कल्पनेचे विशेष कोणते तर स्वसंवेद्यता आणि विश्वात्मकता. तुकाही ' आकाशाएवढा ' होतो म्हणजेच अमर्याद होतो. ते कधी घडते तर जेव्हा ' तुका टाकावा थुंकोन ' म्हणजे आपली प्रतिमा टाकून दिल्यावर. त्यालाच तो ' एकविध मन ' म्हणतो. तसे मन म्हणजेच अमर्याद, विश्वात्मक मन. हे मानवी बुद्धीने – प्रज्ञेने कळत नाही, असाही उल्लेख कुसुमाग्रजांच्या कवितेत येतो. तरीही, ' गाभारा ' ही कविता बघा. ईश्वराला मानवी मनाचे गुणावगुण चिकटवून एक सामाजिक अशी आदर्श कल्पना इथे व्यक्त केली जाते. दु:खिताच्या सेवेसाठी देव गाभारा सोडून गेलेला आहे ! तसे घडत असते तर जगात इतके दु:ख आणि अन्याय का आहेत, असा प्रश्न त्यांना पडत नाही. जणू देवळात येणारे लोक दु:खितांकडे पाठ फिरवणारेच असतात ! खुद्द दु:खित असलेलेही बरेच लोक देवळात येत असतात, त्याचे काय ? पण सामाजिक मूल्यात्मक भूमिका घेतली की बाकीचे गांभीर्य सोडून देता येते, हा यातला व्यावहारिक विचार आहे. ' पाऊल चिन्हे ' या कवितेत कवी चांदण्यांना विचारतो की तुम्हाला कुठे ' तो ' दिसला का, ते. म्हणजे तो नसावाच बहुधा, हा आशय. ' कलंदर ' मध्ये स्वत:ला अंत वा पार राहिला नाही, असे कवी म्हणतो ! खरेच घडले का असे ? की एक आपली बोलायची पद्धत ? ' मी गुरुचरणी लीन झाले ' अशा ज्या कविता धार्मिक मासिकांत येतात, तसे ? हे खरोखरच घडले असते तर मग इतर सर्व कविता अशा आल्या असत्या का ? ' निराकार ' या कवितेत ते अशीच एक निराकार दु:खाची खोटी कल्पना मांडतात. दु:ख जर निर्गुण-निराकार असते तर देवावर एवढ्या कविता लिहायची गरजच कशाला पडली असती ? ' जोगीण ' ही कविता अशीच खोटी वाटते. तुमच्या अनुभवातून आणि निवडीतून तुम्ही नास्तिक झाला असाल तर आस्तिकता तुम्हाला अडवते अशी तुम्ही तक्रार करत बसाल ? ' पांथस्थ ' ही कविता शोध संपवून निष्कर्षात प्रश्न मिटवण्याची पळवाट काढणारी आहे. ' मार्जिन ' ही कविता नास्तिकतेतून थोडा मार्ग काढणारी आहे –

देव नसे पण शक्ति असे ती
जिचे नियंत्रण जगतावरती
तिचे कराया स्तवन जरासे
अडचण कोठे ?

--- असा. त्याचप्रमाणे ' मार्ग ' ही कविता

एकदा पूर्वी मलाही
वेड होते शोधण्याचे

--- असे म्हणून आताच्या ‘ बिनशोध ’ अवस्थेचे समर्थन शोधते !

सारांश म्हणजे, कुसुमाग्रजांच्या ईश्वर शोधात काही तथ्य नाही. आता हे बघा –

‘ तो प्रवास सुंदर होता ’ या पुस्तकात प्रा. के. रं. शिरवाडकर यांनी म्हटलंय, ‘ वादळवेल ’मध्ये ‘ विशाखा ’तील नास्तिकता अथवा संशयवाद संपला आहे.’, ‘ लक्षात येणारी गोष्ट ही की आस्तिकतेच्या विरोधी सूर काढणारी कविता पुढील काळात आली नाही.’, ‘ कुसुमाग्रज दोन कारणांवरून आस्तिकतेचे स्वागत करतात. एक आहे सौंदर्यवादी (aesthetic) आणि दुसरं आहे परमेश्वराचे प्रेममय स्वरूप. या दोन्ही कारणांनी जाणवणारे परमेश्वराचे अस्तित्व प्रातिभ आहे. वादाच्या, तर्काच्या पलीकडे आहे अशी त्यांच्या कवितेची धारणा आहे.’ याच पुस्तकात पंढरपूर भेटीची एक आठवण दिलेली आहे.-- “मराठी संस्कृतीच्या आणि इतिहासाच्या गर्भागाराकडे चाललो आहोत अशा भावनेने आपण पंढरपूरला जात आहोत असे तात्यांना वाटत होते. तात्या लिहितात, ‘ नास्तिकतेच्या प्रांतात वारंवार संचार आणि मुक्काम करणारे मन पाण्यात टाकलेल्या स्पंजासारखे भाविकतेने जड झाले होते ’ (‘प्रतिसाद’- लेखसंग्रह, ३०).”

‘ छंदोमयी ’ या कवितासंग्रहातल्या ‘ चार्वाक ’ या कवितेत चार्वाकाची नास्तिकता समजून घेताना जाणवलेली चार्वाक-विचारातली मर्यादा दाखवून दिलेली आहे. ‘ नजर ’ या कवितेतही कुसुमाग्रजांनी निरीश्वरवादी विचारसरणीतली त्यांच्या कवीमनाला जाणवणारी उणीव दाखवून दिलेली आहे. ती पूर्ण कविता अशी --

‘मार्क्स रसेलसारखे
सारे निरीश्वरवादी
थांबतात सृष्टीच्या उगमाशी असलेल्या
एका कायद्यापाशी.
उदय नाही, अंत नाही
रूप नाही, रंग नाही
अल्याड नाही पल्याड नाही
अशा पार्थिव कायद्यापाशी
एका स्वयंभू जाणीवहीन अस्तित्वापाशी.
माझ्या तर्काला हे पटते
आणि तरीही वाटते
की या निरीश्वरवाद्यांनी
उत्तर रात्री उठून
पाहिलेले नाही कधीही
चांदण्यांनी खचलेले
अपार धूसराने ओथंबलेले आकाश
माझ्या नजरेने..!

***

' अंतहीन ' या कवितेत अस्तित्वाच्या तळाशी सत्य असेल या कल्पनेनं कवीमन जळता पलिता घेऊन खोल उतरत जातं. आलेले अनुभव, हे ' ते ' सत्य नाही म्हणत आणखी खोल नेतात. पण भोवती विझलेले काजवे, भयप्रद निशाचर, पंख तुटलेले गरुड आणि गिधाडे दिसतात. अखेरी हताश झालेल्या कवीमनाला वाटतं --

' कळले आता वृथा शोध हा
मृगजळात या फसलो आहे
याच पायरीवरती आता
पलिता विझवुनी बसलो आहे.'

--- या सर्वातून निघते काय, तर सामाजिकता हेच परतत्त्व ! इथे, जे. कृष्णमूर्तींच्या एका छोट्या उताऱ्याचा अनुवाद देणे प्रस्तुत ठरेल --

" ईश्वराचा शोध घेण्यामागची प्रेरणा कोणती आहे आणि खरोखरच घ्यायचा आहे का तो शोध ? आपल्यापैकी बऱ्याचजणांसाठी ती वास्तवापासून उपलब्ध अशी एक पळवाट असते. त्यामुळे, आपण या बाबतीत अगदी स्पष्ट असले पाहिजे की ही एक पळवाट तर नाही ? की खरोखरच तो सत्याचा शोध आहे ? आपल्या मानवी संबंधांतल्याही सत्याचा ? वस्तू, कल्पना, विचारसरण्या यांच्यामधल्याही सत्याचा ? आपण या दु:खमय जगाला कंटाळलो आहोत म्हणून आपण ईश्वर शोधाचे काम अवलंबत असलो तर ती एक पळवाटच आहे. मग आपण देवाची निर्मिती करतो पण तो देव नसतो. देवळांचा, पुस्तकांचा देव हा देव नसतोच, ती एक विलोभनीय पळवाटच असते. देव वा सत्य हे गोंधळलेल्या, प्रभावित, मर्यादित मनाला समजूच नाही शकत. असले मन त्याचा विचारही नाही करू शकणार. आधी त्या मनाने प्रभावयुक्तता टाकल्याशिवाय त्याला देवाबद्दल काहीच समजू शकणार नाही. "
कुसुमाग्रजांच्या बाबतीत ती नुसती एक पळवाटच नाही तर एकदा असे, एकदा तसे बोलून सर्वांना आपल्या राज्यात सामील करून घेणे आहे. झळाळती भाषा, भव्यदिव्य कल्पनाविलास आणि आस्तिक, नास्तिक या सर्वांनाच ' आपले ' करणे, हे काही लुंग्यासुंग्याचे काम नाही. राहता राहिले शोषित, वंचित, पीडित. त्यांच्यासाठी हे –

ध्रुवपद

हे सारे खरे असेल
अथवा आहेही
पण तरीही –
माझ्या गीताचे ध्रुवपद एकच आहे,
माणसाच्या माथ्यावर
दारिद्र्यासारखा शाप नाही
पृथ्वीच्या पाठीवर

इतके अमंगल, इतके दु:खदायक, इतके भेसूर
दुसरे पाप नाही !
जोपर्यंत माझ्याजवळ गीतासाठी शब्द आहेत,
शब्दासाठी श्वास आहे
तोपर्यंत –
याच ध्रुवपदाचा, याच ध्रुवपदाचा
माझ्या गीताला ध्यास आहे !

--- यापुढेही बरीच आहे कविता – ती मिळवून पूर्ण वाचा.
सारांश, कोणत्याच बाबतीतले गांभीर्य झेपत-पेलत नाही किंवा जगण्यातल्या जटिल गुंतागुंतीचाही आवाका घेण्याची, तो व्यक्त करण्याची कुवत वा हिंमत नाही, असे असेल तर करावे तरी काय – हा बऱ्याच साहित्यिकांचा प्रश्न असू शकतो. ज्यांना गरिबी आणि अन्याय यांची प्रत्यक्ष झळ पोचलेली असून त्यातून ते सामाजिक वा विद्रोही झालेले असतील त्यांचा प्रश्नच नाही. बाकीच्यांना मूल्यात्मकतेसाठी सामाजिकतेशिवाय पर्याय नाही ! कसलीही झळ पोचलेली नाही, कोणत्याही बाबतीत पुरेसे गांभीर्यही नाही पण भाषा आणि कौशल्य बऱ्यापैकी हासिल आहे तर अशांनी साहित्यात यशस्वी होण्याचे प्रयत्न का करू नयेत ? बक्षिसे का मिळवू नयेत ?
असे प्रश्न पडणाऱ्या लेखकांसाठी मराठीत दीपस्तंभ म्हणावेत असे बरेच लोक उपलब्ध आहेत !
--- ००० ---

१३ ऑगस्ट २०२१ पर्यंत